॥ श्री कुलस्वामी वाडेश्वर प्रसन्न ॥

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

सर्व हिंदुस्थानांतील

गोखले व गोखले-रास्ते घराण्याचा इतिहास



लेखक व प्रकाशक

गोविंद विनायक आपटे

(न्यायाचा-मासला ऊर्फ आपटे यांचा खटला, श्रीक्षेत्र निर्मळ वर्णन,
श्रीक्षेत्र वांई वर्णन, अकबर ऐतिहासिक कादंबरी, कै. प्रो.
विष्णुपंत छत्रे यांचे चरित्र, आपटे घराण्याचा इतिहास,
बरवे घराण्याचा इतिहास, व संस्थानिक
पटवर्धन घराण्याचा इतिहास इ.
पुस्तकांचे कर्ते.)

यांनीं

पुणें, शनवार पेठ ५२६ येथें प्रसिद्ध केला.

(ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.)

भाद्रपद शु० ४ शके १८४४. आगष्ट ता. २६ इ. स. १९२२

किंमत ३। रुपये.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, ५०७
शनवार पेठ, पुणें.

कै॰ श्रीमंत सरदार आनंदराव खंडेराव रास्ते, पुणें.

अर्पणपत्रिका.

श्रीमंत फर्स्टक्लास सरदार माधवराव आनंदराव ऊर्फ
रावसाहेब रास्ते यांच्या, पितृभक्ती, कुलाभिमान,
सरळ स्वभाव व औदार्य इत्यादि गुणांवर लुब्ध
होऊन त्यांच्याच आज्ञेनें त्यांचे कै० तीर्थ-
रूप आनंदराव खंडेराव ऊर्फ बाळासाहेब
रास्ते यांच्या स्मरणार्थ त्यांचे आ-
त्म्यास हा त्यांच्याच कुळाचा
इतिहास अर्पण करितों.

लेखक—
गोविंद विनायक आपटे.

अनुक्रमणिका

(कोंकणांतील व देशावरील गांवांवरून तयार केली आहे.)

नांव.	पृष्ठ.
प्रस्तावना, लेखकाचे–विचार व उपोद्घात	१ ,, १६
गोखले–रास्ते घराण्याची माहिती	१ ते ३२
ताम्हनमळा ,, ,, ...	३२ ,, ४२
कांदळ ,, ,, ...	४३ ,, ४६
पुणें म्यु. नं. ८५६।८५७ नं. ४	४६
पुणें म्यु. नं. ५६३।८७ नं ५	४७
वेंगुर्ला नं. ६	४७ ते ४९
संस्थान औंध नं. ७	५० ,, ५१
अंबेर व सांगोले नं. ८	५१ ,, ५२
कल्याण, कारवाड व घुर्णे नं. ९	५२ ,, ५४
पुणें म्यु. नं. ६८७ नं. १०	५४
कल्याण नं. ११	५४
कल्याण नं १२	५५
नाघवडे, पुर्णे व नाशिक नं. १३	५५
वेळणेश्वर नं. १४	५६
जुवाटी नं १५	५६ ते ५७
मिरज व शिरहट्टी नं. १६	५७ ते ५८
मुटाट येथील नं. १७	५८ ,, ५९
केळेमाजगांव–पुणें नं. १८	६०
सोमेश्वर, गराड व पुर्णे (रावडी)	६० ते ६६
पोंवुर्ले, सायगांव व कोल्हापूर	६६ ,, ६९
खुद्द सोमेश्वर	६९
नागपूर येथील गोखले	७० ते ७२
जकातवाडी व बढोदें येथील गोखले	७३ ते ७४
गोवळ येथील गोखले	७४ ,, ७८
दाभोली येथील गोखले	७८ ,, ८०
डोंगर, गोळप व पांवस येथील गोखले	८० ,, ८४

नांव			पृष्ठ
आडिवरें, अतकर, जमखंडी व पुणें येथील	...	...	८४ ,, ८७
नेवरें व पुणें येथील	...	...	८७ ,, ९०
विरवाडी येथील गोखले	...	...	९०
गोळप, पेण व तासगांव येथील	...	...	९०
पेण येथील गोखले	...	...	९१
तासगांव येथील गोखले	...	...	९१
गोळपचे पालकर–गोखले	...	...	९२
कोलें व मुंबई येथील	...	...	९३ ते ९४
मावळंगें येथील गोखले	...	...	९४ ते ९५
वेळदूळ–पनवेल येथील ,,	...	...	९५ ,, ९६
गिमवणें येथील ,, नं. १०	...	...	९६
पोंबुर्ले, कोरेगांव, वांई व चिकोडी येथील	...	...	९६ ते ९७
केतकी–विवली व उमरावती येथील	...	...	९७
वाडा-मारवेल व कोल्हापूर येथील	...	...	९८ ते १०३
वाई येथील नं. १४	...	...	१०३
गोखले ऊर्फ बडे	...	...	१०३ ते १०४
जालिहाळ येथील गोखले	...	...	१०४
महाडचे गोखले नं. १७	...	...	१०४
तासगांव येथील नं. १८	...	...	१०४ ते १०५
गोंवळ येथील (काशीकर) गोखले	...	...	१०५
अणसुरें येथील गोखले	...	...	१०५
आजगांव, पुणें व हरिपूर येथील	...	...	१०५ ते ११०
घाऊलवल्ली येथील गोखले	...	...	११० ते १२१
सासवड येथील ,,	...	...	१२१ ,, १२३
घाऊलवल्ली ,, ,,	...	...	१२४
बेळगांव ,, ,,	...	...	१२४
द्वारका ,, ,,	...	...	१२४ ते १२५
मिरज ,, ,,	...	...	१२५ ,, १३०
मुंबई येथील मोतिवाले	...	...	१३१
पुणें मेहुणपुरा येथील	...	...	१३१
हरिपूर, इचलकरंजी व कल्याण येथील	...	...	१३२ ते १३३
धारवाड व मुंडगोड येथील	...	...	१३३ ,, १३४
घाऊलवल्ली व मुंबई येथील	...	...	१३४

नांव			पृष्ठ
धाऊलवल्ली, केळशी, मुंबई व पुणें येथील	...	...	१३४ ते १३५
पुणें सदाशिव पेठ घ. नं. ८३० येथील	...	...	१३५ ,, १३६
होळी-दळे येथील गोखले	...	...	१३६ ,, १३८
नाटे व भंडारा येथील	...	...	१३८ ,, १४६
भायंदर येथील गोखले	...	...	१४७ ,, १४८
गिमवणें येथील गोखले	...	...	१४८ ,, १६५
दळे व मुंबई येथील	...	...	१६५ ,, १६७
मिरज किल्ल्यांतील गोखले	...	...	१६७ ,, १७०
अलिबाग येथील ,,	...	...	१७० ,, १७१
पोंबुर्ले येथील भुते गोखले	...	...	१७१ ,, १७३
मणचें व पुणें येथील गोखले	...	...	१७४ ,, १७५
अणसुरें, आपट व गिरे कुवेशी येथील	...	...	१७५ ,, १७७
होळी-कुवेशी, गव्हाण व वाडा-खोल येथील	...	...	१७७ ,, १८०
पिरंदवण, वाडी-तळेखाजण येथील	...	...	१८१ ,, २०१
कऱ्हाड येथील गोखले	...	...	२०१ ,, २०४
मिरज, उपळावी व सांगली येथील	...	...	२०४ ,, २१२
सावळगी, जमखंडी व चिकोडी येथील गोखले व ऐतिहासिक पत्रें वगैरे		... ...	२१२ ते २१८
तारळ येथील गोखले	...	...	२१८ ,, २२३
पुणें म्यु. नं. ३१३ नारायणपेठ नाधवडे पुणें पंढरीनाथ महादेव, औंध- दिगंबर दत्तात्रय गोखले वगैरे पृष्ठ २७ व ६४ मधील मजकूर		... ...	२२३ ,, २२६
शके १४१० मधील अस्सल पत्र	...	...	२२७ ,, २२८
कश्यप ऋषीची माहिती	...	...	२२९ ,, २३३
अटघार, झांशी व छतरपूर येथील	...	...	२३४ ,, २३६
विद्यमान गुरुघांची जंत्री (शेवटीं)	...	...	१ ,, ८४

पुस्तकांत ज्या पृष्ठांतून फोटो आहेत तीं पृष्ठें पुढील प्रमाणें:—
१, २३, ३१, ४०, ४८, ५९, ६३, ६५, ७२, ७७, ८५ ८८, ९४. १३०, १३९ व १८१.

पुस्तकांत फोटो जेथल्या तेथें देणें हें उत्तम ! परंतु तसें न घडण्याचें कारण लोकांकडून फोटो फार उशीरां आले हें होय. पुस्तकांत कांहीं चूक भूल झाली असल्यास क्षम्य कराल अशी आशा आहे. हा इतिहास प्रसिद्ध जाहल्यापासून यासंबंधीं एक वर्षाचें आंत कोणी कांहीं माहिती विचारल्यास कळविण्यांत येईल. (टपाल खर्च सोबत ठेवावा.)

ज्यांनीं या कामाचें महत्व लक्षांत आणून, स्वसंतोषानें मदत केली त्या आश्रय दात्यांची नांवें:—श्री० फर्स्ट क्लास सरदार रावसाहेब रास्ते पुणें, रु० ५०० व पांच प्रति, शिवाय बक्षीस. (पैकीं ३७५ रु. पोंचले.) श्री. गंगाबाईसाहेब गोखले महेश्वर, रु. १२५. (पैकीं २५ रु. पोंचले.) श्री. हरी केशव गोखले मुंबई रु. १२५ पोंचले. श्री. नारायण रामचंद्र ऊर्फ नानबा गोखले ' लोकमान्य नाटक कंपनीचे ' मालक, रु. १००. (पैकीं रु. १५ पोंचले.) श्री. माजी अ. चीफजज्य रामचंद्र हरी गोखले बडोदे, रु. ५०. (पैकीं रु. २५ पोंचले.) श्री० रा. खंडेराव रास्ते जमखंडी रु. ५० पोंचले. श्री० बाळासाहेब रास्ते-गोशाळे वाई, रु.५०. (पैकीं रु. ३५ पोंचले.) राव. कृष्णाजी हरी गोखले पुणें, रु. ५०. (पैकीं रु. ३० पोंचले.) श्री. रा. विश्वनाथ हरी गोखले मुंबई रु. ५०. (पैकीं रु. ४० पोंचले.) श्री. रा. श्रीधर बळवंत गोखले नागपूर, रु. ५०. (पैकीं रु. २५ पोंचले.) श्री. रा. लक्ष्मण रघुनाथ ऊर्फ तात्यासाहेब गोखले, पुणें रु. ५०. (पैकीं रु. २५ पोंचलें.) श्री. रा. दत्तात्रय गोविंद गोखले मुंबई रु. ५० पोंचले. ..

प्रस्तावना

कोंकण.

परशुरामानें क्षत्रियांच्या कोपानें निःक्षत्रीय पृथ्वी एकवीस वेळां करून शेवटीं अश्वमेध यज्ञ केला व ब्राह्मणांस सर्व पृथ्वी दान दिली. अशी कथा पुराणांतून प्रसिद्ध आहे. पृथ्वी दान दिल्यावर आपल्यास राहावयास जागा पाहिजे म्हणून परशुरामानें समुद्रापासून सह्याद्रीच्या पश्चिमेस जागा मागून घेतली तें हें परशुराम क्षेत्र अगर कोंकण होय, अशी ही पौराणिक कथा आहे. सह्याद्रीपासून समुद्र हटलेला दिसतो या भौगोलिक परिस्थितीवर ही कथा रचली आहे, हें उघड आहे. या भूमीस नांव कोंकण असून तें मूळच्या द्रविड लोकांनीं दिलेलें आहे. या देशांत मूळ द्राविडी वंशाच्या लोकांची व विशेषतः कोळी (कैवर्त) वगैरे लोकांची वस्ती होती. येथें भारतीय आर्य लोकांची वसति कधीं झाली याचा आपण ऐतिहासिक दृष्ट्या विचार करूं.

महाभारतांत परान्त आणि अपरान्त असे दोन देश उत्तरेकडील आर्य देशांच्या यादींत आहेत (भीष्म. अ. ९), यांचे दक्षिणेकडे जे द्राविड देश आहेत त्यांच्या यादींत कोंकण हें नांव आहे; यावरून महाभारतकाळीं परान्त म्हणजे हल्लींचा सुरत जिल्हा आणि अपरान्त म्हणजे हल्लींचा ठाणें जिल्हा यांत आर्यांची वस्ती झाली होती. अर्थात् इ. स. पू. ३०० च्या सुमारास अपरान्तांत आर्य लोक आले होते. बुद्धाच्या (इ. स. पू. ५०० च्या) सुमारास ते येथें नव्हते, किंवा फार थोडे होते. कारण, बुद्धानें आपला शिष्य पूर्ण यास अपरान्तांत आपला धर्म उपदेशिण्यास पाठविलें. त्या वेळीं तेथील लोकांच्या क्रूर स्वभावाचें अतिशय भयंकर वर्णन केलें आहे. असो; तर बुद्ध काळापासून म्हणजे इ. स. पू. ५०० पासून ३०० शेंपर्यंत येथें आर्यवस्ती झाली आणि बौद्धधर्म आणि आर्यधर्म दोन्ही येथें प्रचलित झाले असें ऐतिहासिक दृष्ट्या मानतां येतें.

आर्यधर्मी ब्राह्मण अपरान्तांत येऊन राहिले तेच बहुधा हल्लींच्या कोंकणस्थांचे पूर्वज असावेत असा माझा तर्क आहे. कोंकणस्थांत परशुराम हें दैवत नाहीं. इतर बहुतेक आर्याप्रमाणें कोणी तरी माहादेव कोणी तरी देवी त्यांचें कुलदैवत असतें. परंतु कोंकणस्थांचा आणि परशुरामाचा संबंध प्राचीन दिसतो. येथें ही गोष्ट सांगणें जरूर आहे कीं, परशुरामाचें प्राचीनतम स्थान पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावर आहे. तेथें वैतरणा नदी आणि महेंद्रपर्वत असून परशुरामाची वेदी आहे. महाभारतांत वनपर्वात पांडव तीर्थयात्रेसाठीं फिरले त्या वेळीं पूर्व समुद्रावर त्यांनी परशुरामाचें दर्शन घेतलें, असें वर्णन आहे (वन. अ. ११५) तें येथेंच.

रेणुकेचा वध व क्षत्रियांचा निःपात वगैरे परशुरामानें केलेल्या पराक्रमाची कथा महाभारतांत येथेंच दिली आहे. कश्यपास पृथ्वीदान केल्यावर परशुराम महेंद्र पर्वतावर वास करूं लागला असें त्यांत वर्णन आहे. अर्थात् सह्याद्रीपासून समुद्रास मागें सारून आपल्याकरितां परशुरामानें नवीन क्षेत्र निर्माण केलें ही कथा मागाहूनची आहे. हें पूर्वेकडचेंच परशुरामाचें क्षेत्र व ब्राह्मण पश्चिमेस शूर्पारक क्षेत्रांत आले असें दिसतें. ज्याप्रमाणें युधिष्ठिरहि पूर्व समुद्रावरून गोदावरी द्राविड देशांतील नारीतीर्थ वगैरे तीर्थें पहात पहात अत्यंत पवित्र अशा शूर्पारक क्षेत्रांत आला, असें वर्णन वनपर्व अ० ११८ यांत आहे, तसेंच हे लोक आले असावे असा तर्क होतो. यांत पश्चिमेकडील अन्य तीर्थांचें नांव नाहीं. शूर्पारक क्षेत्र म्हणजेच अपरान्त आणि शूर्पारक अथवा सोपारें हें पूर्वकाळीं मोठें व्यापाराचें बंदर होतें. तेथें युधिष्ठिरानें समुद्रकांठचा प्रदेश उल्लंघन केल्यानंतर तपस्वी लोकांच्या समुदायांनीं भरलेली घर्नुधर श्रेष्ठ राम याची वेदी पाहिली. तेथें नंतर अनेक इंद्र, वरुण वगैरे वैदिक देवतांचीं मंदिरें अवलोकन केलीं. नंतर तो शूर्पारकास परत येऊन, प्रभास क्षेत्रास गेला असें वर्णन महाभारतांत आहे. (भाषांतर पान २४६ पु. दोन–वनपर्व) यावरून या काळीं शूर्पारक क्षेत्रांतच ब्राह्मण वस्ती असून तेथेंच परशुराम क्षेत्र होतें आणि तें अद्यापि आहे ही गोष्ट वाचकांस सांगितली पाहिजे. सोपाऱ्याच्या पूर्वेस डोंगरांत वज्रेश्वरीच्या बाजूला अजून वैतरणी नदी आणि परशुराम क्षेत्र आहे. महाभारतांत अन्य ठिकाणीं सुद्धां परशुरामानें समुद्रापासून जमीन घेतली तें शूर्पारक क्षेत्र होय; आणि तेंच अपरांत महीतल असें वर्णन आहे. स्कंदपुराण सह्याद्रि खंडांतहि असेंच सांगितलें आहे. आणि येथें कोंकणस्थ ब्राह्मण परशुरामानें उत्पन्न केले असें वर्णन आहे. ते श्लोक असे—

रामेण निहताः क्षत्रा एकविंशति वारतः ।
ब्राह्मणानां ततः पृथ्वी दानं दत्त्वा यथाविधि ॥
नवीनं निर्मितं क्षेत्रं शूर्पारकमनुत्तमम् ।
वैतरण्या दक्षिणेन सुब्रह्मण्यास्तथोत्तरे ॥
सह्यात्सागरपर्यंतं शूर्पाकारं व्यवस्थितम् ॥

असो; तर कोंकणस्थांची वस्ती शूर्पारक क्षेत्रांत असून तेथून पूर्वेस डोंगरांत परशुरामाचें स्थान होतें. वैतरणा नदी येथें प्रसिद्ध आहे. तिच्या दक्षिणेस शूर्पारक क्षेत्र बरोबर आहे. पण सुब्रह्मणी नदी कोणती हें सांगतां येत नाहीं. या ठिकाणाहून कोंकणस्थ चिपळूण शहरास केव्हां गेले हें सांगणें कठीण आहे. शकांनीं अपरान्त देश जिंकला तेव्हां म्हणजे इ. स. १०० राच्या सुमारास ते तेथें गेले असावेत आणि तेथें आतांपर्यंत त्यांची वस्ती आहे. परशुरामाचें स्थानही त्यांनीं आपल्याबरोबर चिपळूणाजवळ नेलें हें साहाजिक आहे. पुढें ज्या वेळीं ब्राह्मणभेद

देशभेदानें झाले त्या वेळीं त्यांस चिपळोणे किंवा चित्तपोलनाहा असे म्हणवूं लागले. सर्व हिंदुस्थानांत हा प्रकार इ. स. दहाव्या शतकाच्या नंतर घडला असें निश्चित म्हणतां येतें. कारण तोंपर्यंत कोणत्याहि शिलालेखांत किंवा ताम्रलेखांत ब्राह्मणांचीं देशभेदावरून निरनिराळीं नांवें पडलेलीं दिसत नाहींत. सर्वत्र नुसता गोत्रभेदाचा उल्लेख अशा लेखांत सांपडतो. याच्यानंतर कनोजे (कनोज), नागर (नगर), दसोरे (दशपूर), श्रीमल्ली (श्री माली), गौडा (गुड), बंगाली (बंगाले) वगैरे उत्तरेकडील नांवें व गोवर्धन (नाशिक), चित्तपावन (चिपळूण), देवरुखे (देवरूख), कऱ्हाडे (करहाटक), देशस्थ (देश), तेलंगी (तेलंग) इत्यादि शहरांवरून व देशांवरून ब्राह्मणांचे भेद होऊन त्यांचा आपसांत विवाह बंद पडून फक्त स्वतःच्या संकुचित प्रांतांतच प्रचलित राहिले. तात्पर्य, ऐतिहासिक साधनांवरून असें म्हणतां येतें कीं, इ. स. १०० राच्या सुमारास कोंकणस्थ हल्लींच्या कोंकणांत आले, व त्यांची एक विशिष्ट ब्राह्मण जात इ. स. १००० राच्या नंतर कायम बनली ती अद्यापपर्यंत आहे.

इ. स. १०० राच्या सुमारास कोंकणस्थ हल्लींच्या कोकणांत आले याजबद्दल आणखी पुरावा हरिवंशांत मिळतो. हरिवंश हें पुराण सर्वांत जुनें असून इ. स १०० सुमाराचें आहे. श्रीकृष्ण, जरासंधभयानें दक्षिणेंत आला तेव्हां कोल्हापुराच्या दक्षिणेस श्रीकृष्णाची आणि परशुरामाची गांठ पडली. आणि परशुरामानें गोमांचल पर्वत तुम्हास रहावयास सुरक्षित आहे असें रामकृष्णास सांगितलें, असें त्यांत वर्णन आहे. यावरून शूर्पारक क्षेत्राहून परशुरामाचें क्षेत्र या काळीं आणखी खालीं दक्षिणेस आलें होतें असें स्पष्ट दिसतें. येथेंच कोंकणस्थ ब्राह्मण आज सुमारें १८०० शें वर्षे राहात आहेत. त्यांस येथोन हालावें लागलें नाहीं याचें कारण त्या ठिकाणची सुरक्षितता होय. रत्नागिरी जिल्हा बहुतेक डोंगरांनीं व्याप्त असून उत्पन्नालाहि कमी आहे. यामुळें राजकीय घडामोडींत त्याजवर जेते लोकांचा फारसा डोळा नव्हता; अर्थात् राजकीय घडामोडी येथें फारशा झाल्या असें दिसत नाहीं.

माझ्या मतें मूळ कोंकण हें नांव रत्नागिरी जिल्ह्यासच महाभारतकाळीं होतें. ह्या जिल्ह्यांत सह्याद्रिपासून तों थेट समुद्रापर्यंत लहान लहान टेकड्या पसरल्या असून हवा उत्कृष्ट आणि पाणीहि उत्कृष्ट आहे. त्यामुळें रहावयास हें क्षेत्र चांगलें असून ज्यांस फार श्रीमंत होण्याची महत्त्वाकांक्षा नाहीं, त्यांस हें क्षेत्र बरें आहे. येथें उत्पन्न शेतकीचें थोडें होतें; तथापि नारळ, सुपारी, काजू वगैरेचें उत्पन्न बरेंच आहे. येथील डोंगरांत दक्षिणेकडील कारवाराप्रमाणें जंगल फार नसल्यानें येथील हवा चांगली आहे. पूर्वकाळीं ठाणे जिल्ह्यांत जंगल अतिशय असून अपरान्तांत हत्ती पुष्कळ होते. किंबहुना तेथील हत्तींची उत्तम म्हणून ख्याती होती, असें महाभारतांतील एका वर्णनावरून दिसतें. याशिवाय या

जिल्ह्यांत सखल प्रदेश असण्यानेंहि अपरांताची हवा चांगली नाहीं. परंतु भात-शेतीचें उत्पन्न मोठें असल्यानें व उत्तरेस लागून हा प्रदेश असल्यानें येथें राज्यक्रांत्या फार झाल्या. कुलाबा जिल्ह्याचीहि स्थिती थोडीफार अशीच आहे. शेतीचें उत्पन्न मोठें असलें तरी हवा तितकी निरोगी नाहीं, आणि राजकीय घडामोडी फार ! तात्पर्य, कोंकणस्थ ब्राह्मणांनीं स्वस्थ बसून वैदिक आचार कायम ठेवण्याकरितां जो प्रांत पाहिला तो उत्तम होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कोंकण हें नांव मूळ या प्रांताला असून प्राचीन काळींच म्हणजे इ. स. १००० च्या सुमारास त्याची व्याप्ति जास्त वाढली हें खरें आहे. प्राचीन लेखांत सप्त कोंकणाचा उल्लेख येतो. म्हणजे मला वाटतें अपरांतापासून येट केरळापर्यंत निरनिराळीं सात कोंकणें होतीं. हयुएनसंगाच्या काळीं हल्लींप्रमाणें घारवाडच्या दक्षिणेस घाटावर कांहीं कोंकणस्थ लोकांची वस्ती असून त्या प्रांताचें कोंकणपूर असें नांव दिलें आहे. पण ऐतिहासिक मूळ कोंकण म्हणजे हल्लींचा रत्नागिरी जिल्हाच होय आणि याच जिल्ह्यांत राहणारे मूळचे कोंकणस्थ ब्राह्मण होत. ठाणे जिल्ह्यांत तर व कुलाबा जिल्ह्यांतहि कोंकणस्थांचीं हल्लीं पुष्कळ घरें आहेत. पण ते सर्व पेशवाईचे काळांत इकडे आलेले असून प्रत्येक कुटुंबास आपण मूळ कोंकणांतून कोठून व केव्हां आलों याचें चांगलें स्मरण आहे. ते बहुधा दोनशें वर्षांतले असून त्यांचें मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यांतच आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील कोंकणस्थ ब्राह्मणांस मात्र आपण बाहेरून कोठून केव्हां आलों याचें निश्चित स्मरण नाहीं. यावरून व एकंदर ऐतिहासिक समालोचनावरून कोंकणस्थ ब्राह्मण कोंकणांत फार प्राचीन काळीं इ. स. १०० च्या सुमारास आले असें अनुमान निघतें.

कोंकणस्थांची उत्पत्ति.

आतां आपण कोंकणस्थांच्या वंशाचा अर्थात् उत्पत्तीचा विचार करूं. इ. स. १००० नंतर प्रत्येक प्रांतांत राहणाऱ्या निरनिराळ्या पोटजाती तुटक झाल्या आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र चारी मुख्य जातींत हजारों पोटजाति उत्पन्न झाल्या असें आपल्यास प्राचीन ऐतिहासिक लेखांवरून म्हणतां येतें. त्यांत विशेषतः प्रांत व नगर भेदानें या जाति उत्पन्न होऊन त्यास त्यावरून नांवेंहि पडलीं. कोंकणांत राहणारे कोंकणस्थ किंवा मुख्य शहरावरून चिपळोणे असें त्यांस नांव पडलें. चित्तपावन हेंहि नांव याच शहरावरून पडलें असें राजवाडे म्हणतात तें बरोबर आहे. या पोटभेदाच्या संकुचितपणांत प्रांतभेद तर आहेच पण कांहीं खाण्यापिण्याचे भेदहि आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कोंकणस्थ पहिल्यापासून निवृत्तमांस दिसतात. अर्थात् मांस खाणारे किंवा नुसते मासे खाणारे इतर ब्राह्मणांपासून ते विलग पडले हें उघड आहे. पर

प्रांतांतला ब्राह्मण कशा तऱ्हेचा आहे आणि तो ब्राह्मण आहे कीं नाहीं या शंकांमुळें आपल्याच प्रांतांत आपल्याच जातींत मुलगी देण्याचा प्रघात जारी झाला व दृढ झाला. नागरांच्या इतिहासांत अशी कथा आहे कीं, एक मांग परदेशस्थ ब्राह्मण समजला जाऊन पुढें तो एकाचा जांवई झाला. गोष्ट उघडकीस आल्यानंतर अर्थात् लग्नाचे कडक नियम नागरांनीं अमलांत आणिले. तात्पर्य हें कीं, खानपानादि भिन्नतेमुळें आणि प्रांताप्रांतात दळण वळण कमी असल्यानें हे पोटजातीचे भेद दृढ झाले. याचा काळ इ. स. १००० च्या सुमाराचा आहे.

पण, ह्याजबरोबर एकमेकांच्या विषयीं क्षुद्र भावना व आमची जात श्रेष्ठ अशा अहंमन्यतेच्या कल्पना सुरू झाल्या. यामुळें या काळीं जातींच्या उत्पत्तीच्या मत्सरयुक्त भ्रांत कल्पना सुरू होऊन कथाहि बनल्या; त्या निरनिराळ्या पुराणांत विशेषतः स्कंदपुराणांत घुसडल्या गेल्या. कोंकणस्थांची जेव्हां पोटजात बनली तेव्हां १४ गोत्रें त्यांत होतीं. हें मूळ धरून ब्राह्मणोत्पत्तिमार्तंड या नूतन ग्रंथांत अशी कथा दिली आहे कीं, परशुरामास यज्ञ करावयास जेव्हां आपल्या नूतन भूमींत ब्राह्मण मिळेनात तेव्हां त्यानें १४ कैवर्त अथवा कोळी यांस ब्राह्मण करून घेतले, आणि त्यांस चौदा गोत्रें दिलीं. पण मग या ब्राह्मणांना बायका कोठून मिळाल्या आणि त्यांचा वंश कसा चालला हें या कथेंतून निघत नाहीं. शिवाय परशुरामानें (सर्वे च गौरवर्णाश्च सुनेत्राश्च सुदर्शनाः । सर्वविद्यानुकूलाश्च भार्गवस्य प्रसादतः ॥) आपल्या प्रसादानें गोरे सुस्वरूप आणि विद्यावान केले; हें वर्णन बरोबर आहे. पण कोळ्यांचे झालेले ब्राह्मण असे होऊं शकत नाहींत. असो. या वर्णनावरून व खऱ्या वर्णनावरून हे मूळचे आर्य आहेत हेंच निश्चित दिसतें. पण या वर्णनानुकूल एक दुसरी कथा बनविली आहे व ती अशी कीं, चौदा प्रेतें वाहून आलीं होतीं, तीं शुद्ध करून परशुरामानें जिवंत केलीं. याप्रमाणें हे ब्राह्मण मूळचे इजिप्शन, ज्यू, पारशी असावे असा तर्क कित्येक बांधतात. पण ही चित्तपावन (चितापावन) या नांवावर बसविलेली कोटी आहे. अशा कोट्या नेहमींच त्याज्य असतात. शिवाय यांना बायका कोठून मिळाल्या ? बरें. परकी लोकांचा भारती आर्यांत सहज प्रवेश होऊं शकतो, ही समजूत अत्यंत चुकीची आहे. वर्णसंकराच्या भयंकर पातकाची हिंदुस्थानांत हजारों वर्षांपासून भगवद्गीतेच्या काळापासून भीति मानली गेली आहे. तेव्हां समुद्राच्या तुफानांतून वांचलेलीं चौदा परकीय कुळें ब्राह्मण बनलीं आणि त्यांनीं वाटेल तीं चौदा गोत्रें मिळविलीं आणि वेदविद्याहि जागृत ठेविली ह्या गोष्टी असंभाव्य होत. परकी लोकांचें अगोदर वेदावर प्रेम बसावाचें नाहीं आणि त्यांच्या जिव्हेंतून वेदाक्षर स्पष्ट व शुद्ध निघावयाचें नाहीं. कोंकणस्थांत वेदविद्या प्राचीन काळापासून जागृत आहे. ती त्यांनीं पेशवाईंत संपादन

केलेली नाहीं. येवढीच गोष्ट त्यांच्या भारतीय आर्यत्वाची साक्ष पुरेशी देत आहे असें आम्हांस वाटतें.

प्राचीन काळीं सर्व ब्राम्हण एक होते. त्यांच्यांतले हल्लींचे देशस्थ, कोंकणस्थ, बंगाली, द्राविडी वगैरे भेद इ. स. १००० (हा आकडा ठोकळ आहे.) नंतरचे आहेत. अर्थात सर्व ब्राम्हणांत गोत्रें एकच आहेत व प्रवरहि एकच आहेत. सर्व वेदांच्या सूत्रांतून प्रवराध्याय आहेत. त्यां सर्वांतील गोत्रप्रवर एकच आहेत. अर्थात बंगाली ब्राम्हण काश्यप गोत्री आहेत. आणि कोंकणस्थहि आहेत आणि तेलंगीहि आहेत. आणि या सर्वांत काश्यप गोत्राचे प्रवरहि एकच आहेत. किंबहुना पूर्वकाळीं ब्राह्मणांत देशभेदहि नव्हता आणि आडनांवेंहि नव्हतीं. इ. स. १००० च्या पूर्वीचे जे शिलालेख ताम्रलेख वगैरे आढळतात त्यांत ब्राह्मणांचें वर्णन फक्त गोत्रानें केलेलें असतें. गुजराती, कनोजिया, देशस्थ असें नसतें किंवा पटवर्धन, तिवारी, त्रिपाठी असेंहि नसतें. अर्थात आडनांवें अलीकडचींच आहेत. ज्या वेळेस कोंकणस्थ ही पोटजात निराळी ठरली त्या वेळीं त्यांच्यांत १४ गोत्रें आणि सुमारें ६० आडनांवें म्हणजे कुटुंब-नांवें होतीं असें दिसतें. आडनांवांस उत्तरेकडे नुख म्हणतात. अलीकडच्या ताम्रादि लेखांत अन्वय शब्द आडनांवार्थी वापरलेला दिसतो. हीं साठ कोंकणस्थांतील आडनांवें कशावरून पडलीं हा एक मनोरंजक पण कठीण प्रश्न आहे. राजवाडयांचे मतें आडनांवें गोत्रांवरूनच उत्पन्न झालीं असावीं. अशीं आडनांवें बरींच आहेत.कांहीं आडनांवें गांवांवरून कर प्रत्ययांनीं उत्पन्न झालीं तीं तर सहज ओळखण्यासारखीं आहेत. कांहीं नांवें धंद्यावरून पडलेलीं आहेत. कांहीं अधिकारावरून, हीं हि ओळखूं येतील, पण येवढे सर्व प्रकार वजा करूनहि कित्येक नांवांचें अद्याप निर्वचन कठीण आहे. पटवर्धन हें आडनांव अधिकारवाचक असून ते प्राचीन (इ. स. १००० च्या पूर्वीच्या) लेखांत मराठयांचे किंबहुना तेलंगणांतील सुद्धां आहे. मूळ साठांतील गोखले, दामले, आपटे, परांजपे, रानडे, लेले, मेहेंदळे, लवाटे वगैरे आडनांवांचा अर्थ लावणें कठीण आहे. हे शब्द अनेकवचनी आहेत यांत शंका नाहीं. एकवचनीं गोखला हा शब्द मुळांत गोखल असा असावा, आणि तो शब्द कोणातरी पवित्र आचरणी सन्मान्य पुरुषावरून त्याच्या कुलाला पडला असावा. एका ऋषीचें नांव गोखलः एके ठिकाणीं पाहिल्याचें मला स्मरतें आहे. या वेळीं ठिकाण पत्ता दाखवूं शकत नाहीं. गोखलः गोत्रऋषी नव्हे हें उघड आहे. गोत्रऋषीच्या कुळांत पुढें कोणी नामांकित पुरुष झाला त्यांवरून तें नांव पुढें चालू झालें.

असो; आतां शेवटीं एका प्रश्नाचा विचार करणें अवश्य आहे. कोंकणस्थ ब्राह्मण जर बुद्धिमान विद्यासंपन्न प्रथमपासून आहेत आणि ते कोंकणांत हजार

अठराशें वर्षापासून आहेत तर त्यांचें नाव इतिहासांत पेशवाईपूर्वी कां दिसत नाहीं. असा प्रश्न उपस्थित होतो व कित्येकदां विचारलाहि जातो. कोंकणांतच नव्हे इतर प्रांतांत तें कां प्रसृत झाले नाहींत, प्राचीन इतिहासांत शिलाहार, राष्ट्रकूट, चालुक्य वगैरे राजकुलांच्या आमदानींत कोंकणांतून ठाण्यांत, घाटावर, देवगिरीस कोंकणस्थ ब्राह्मणांचे दिवाण अधिकारी वगैरे कोठें दिसून येत नाहींत. याचें कारण काय? याचें उत्तर असें दिसतें कीं, पूर्वी ब्राह्मण राजकारणांत पडत नव्हते असें नाहीं, पण ते थोडे असत; शिवाय कोणत्याहि राज्याचें मुख्य ठिकाण कोंकणांत कधींच नव्हतें, आणि कोंकणस्थांत वेदाध्ययन करून स्नानसंध्येंत काल घालविणारे व चरितार्थाकरितां उत्तम शेती करणारेच लोक पुष्कळ होते. व्यापार आणि राजकारण यांत मन घालणारे लोक थोडे होते. ज्या वेळेस जातीजातींच्या निंदात्मक कथा उत्पन्न झाल्या त्या वेळेस (इ. स. १००० च्या नंतर) कोंकणस्थांची स्थिति कशी होती हें पुढील श्लोकावरून दिसून येतें. परशुरामानें माझें स्मरण केल्हांहि करा, मी तुम्हांस मदत करीन, असें कोंकणस्थांस सांगितलें होतें. तेव्हां एकदां त्यांनीं उगीच परशुरामाची परीक्षा पाहण्यासाठीं त्याचें स्मरण केलें, तेव्हां तो तात्काळ येऊन संकट विचारूं लागला; तेव्हां कांहीं नाहीं म्हणोन म्हणतांच त्यानें शाप दिला:——

शापप्रभावान्मे सर्वे कुत्सिताश्च दरिद्रिणः ।
सेवां सर्वत्र कर्तारः इदं निश्चयभाषणम् ॥

यावरून त्या काळीं कोंकणस्थांची स्थिति सुखसंपन्न होती.कोणत्याहि गोष्टींची त्यांस ददात नव्हती. किंबहुना मराठ्यांच्या इतिहासांत असें लोक समजत असल्याचे दाखलेही आहेत. तथापि, काशीस फार प्राचीन काळीं गेलेलीं कोंकणस्थकुळें आहेत असें मला वाटतें. त्यांचा इतिहास रा.गोविंदराव आपटे हे हळुहळु जगतापुढे ठेवितील. हीं कुळें वैदिक ब्राह्मणांचीं असून नामांकित आहेत.

वैदिक विद्या व आचार किंवा सेवा याचसाठीं कधीं कधीं बाहेर जाणारे कोंकणस्थ पूर्वकाळीं असत. पण त्यांची बुद्धिमत्ता व त्यांचें धोरण, शौर्य, साहस इत्यादि राजकीय गुण त्यांच्या ठिकाणीं हजारों वर्षें झांकलेले होते. ते अनेक पुरुषांनीं व कुटुंबांनीं जगाच्या पुढें आणले. सबंध जातीचा उत्कर्ष व तिचें ठिकाणीं अनेक गुण एका पुरुषाच्या कर्तृत्वानें, वैभवानें व भाग्यानें कसे येतात याचेंहि प्रत्यक्ष ऐतिहासिक उदाहरण कोंकणस्थांचें होय. बाळाजी विश्वनाथानें योग्य संधी पाहून शाहूचा पक्ष धरला आणि तो मराठी राज्याचा दिवाण झाला. बाजीरावानें शौर्यानें व राज्यधोरणानें हिंदुस्थानास दिपाविलें व शाहूस खूष केलें.बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेबानें तर आपल्या मुत्सद्देगिरीनें शाहूस प्रसन्न ठेवलें आणि माहाराजांनीं राज्य चालविण्यास हाच समर्थ आहे असें पाहून त्याच्या स्वाधीन राज्य

केलें. याप्रमाणें हिंदुस्थानचें साम्राज्य भट,फडके.भानू,पटवर्धन इ. घराण्यांनीं शंभर वर्षें भोगले आणि आपल्या कोंकणस्थ जातीस उदयास आणलें. कोंकणस्थांच्या ठिकाणीं बुद्धिमत्ता होतीच; पण शौर्य,धैर्य परदेशीं वाटेल त्या ठिकाणीं जाण्याची हिम्मत, वगैरे गुण नवीन उत्पन्न झाले किंवा अंगभूत असलेले योग्य संधी मिळतांच बाहेर पडले. आज हे लोक बहुतेक सर्व हिंदुस्थानभर पसरले आहेत. किंबहुना परदेशींही गेले आहेत. तुरळक कां होईना ते काश्मीरापासून रामेश्वरापर्यंत सर्वत्र दिसतात. मुख्य वस्ती पुणें, सातारा येथें आहे यांत नवल नाहीं. पण कोंकण हें त्यांचें मुळ वसतिस्थान अद्याप आहे, आणि अद्याप येथेंच लोकमान्य टिळकांसारखे अद्वितीय पुरुष बाहेर पडतात आणि पुढेंही पडतील.

असो. भट घराण्याच्या उत्कर्षाबरोबर ज्या कोंकणस्थ घराण्यांचा उत्कर्ष झाला त्यांपैकीं गोखले व गोखले—रास्ते हे प्रमुख होत. रास्ते हे साताऱ्याचे साहुकार,पण पेशवे बाजीराव व्याही आणि नानासाहेब मेहुणे यांच्या अनुकूलतेनें शिपाई व सरदार कसे झाले वगैरे इतिहास रा. गोविंदराव आपटे यांनीं जमा केला आहे तो वाचनीय आहे. गोखले घराणें कोंकणस्थांत फारच मोठें असून त्यांच्या इतकी लोकसंख्या इतर घराण्याची नसावी. एकंदर कोंकणस्थांची लोकसंख्या सुमारें ८२००० आहे. त्यांत गोखले सर्वांत अधिक संख्याक आहेत. ते बहुतेक सर्व बुद्धिवान् आहेत व ते काश्यप गोत्री हिरण्यकेशी आहेत. त्यांच्या सर्वांचा इतिहास मनोरंजक असून तो रा. गोविंदराव आपटे यांनीं मोठ्या प्रयासानें एकत्र केला आहे व सध्यां हयात असलेल्या पुरुषांची एक जंत्रीहि त्यांनीं बनविली आहे ही एक नवीन गोष्ट होय. गोखले-रास्ते घराण्याशिवाय शिपाईगिरींत व स्वदेशनिष्ठेत आणि स्वदेशप्रीतींत ज्या कांहीं गोखल्यांनीं मर्दुमकी गाजविली त्या सर्वांत बापू गोखले हे प्रख्यात होत. बापूगोखल्यांनंतर शिपाईगिरींत नांव कमविण्याचा प्रसंग कोंकणस्थांना मिळाला नाहीं. पण बुद्धिमत्तेच्या कामात नांव मिळविण्यांचें क्षेत्र इंग्रजींत मोठें आहे. त्यांत गोखले हे मागें नाहींत किंबहुना अग्रेसर आहेत. मुंबईचे नारायण विष्णु गोखले हायकोर्ट वकील यांचें घराणें या बाबतींत उल्लेख करण्यासारखें व माझ्या परिचयाचें आहे. सर्वांत वडील बंधू रामभाऊ गोखले हे माझ्या पाहण्यांत असून फारच बुद्धिवान् आणि शरिरानें उंच व भव्य असे होते. ते पहिले ॲडव्होकेट झाले होते;पण दुर्दैवानें अल्पवयी झाले. त्यांच्या बंधूंपैकी माधवराव गोखले हे माझे समकालीन असून मोठे तेजस्वी आणि तडफदार होते. प्रिन्सिपाल वर्डसवर्थ यांची त्यांवर मोठी कृपा होती. ते एम. ए. होऊन डेक्कन कालेजांत इतिहासाचे प्रोफेसर झाले होते. दुर्दैवानें तेही अल्पवयी निघाले. ते जिवंत राहते तर मवाळपक्षाला जसे आनरेबल गोखले ललामभूत झाले होते (हे त्यांचें वेळींच कॉलेजांत असून प्रारंभीं विशेष चमकत नव्हते) त्याप्रमाणें माधवराव गोखले हे राष्ट्रियपक्षाला ललामभूत झाले असते. असो. कल्पनातरंग न

चालविले तरी माधवराव गोखल्यांचा उल्लेख या गोखले कुलाच्या इतिहासाच्या वेळीं केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. रा. गोविंद विनायक आपटे यांनीं ऐतिहासिक कोंकणस्थ घराण्यांचा इतिहास लिहिण्याचा जो उपक्रम चालविला आहे तो प्रशंसनीय असून लोकांच्या आदरास व आश्रयास सर्वतोपरी योग्य आहे. आतां ही माहिती मिळविण्यास त्यांस अतिशय श्रम पडतात या गोष्टीचा निर्देश करणें जरूर आहे. त्यांचे हे श्रम पुष्कळसे वांचण्यासारखे आहेत; ज्या त्या कुटुंबांतील लोकांनीं आपापली संपूर्ण माहिती आपण होऊन त्यांजकडे पाठांविल्यास त्यांचे बरेचसे श्रम वांचतील यांत शंका नाहीं. फडके, मेहेंदळे, वगैरे घराण्यांचा इतिहास लिहिण्याचें ते काम करणार आहेत. त्यांस हिंदुस्थानाच्या सर्व भागांतील त्या त्या कुळांतल्या मंडळींनीं साधार साद्यंत माहिती कळविल्यास इतिहासलेखनाचें काम उत्कृष्ट होईल हें सांगणें नको. यासाठीं कोंकणस्थ जनतेस वरील प्रमाणें विनंती करून ही अल्प प्रस्तावना मी पुरी करतों.

कल्याण
ता० १ ऑगष्ट १९२२. } चिंतामण विनायक वैद्य.

लेखकाचे विचार.

शके १८३४ (इ. स. १९१२) त मी राव० सानेकृत पेशव्यांची बखर वाचली. सदरहु बखरीमध्यें सरदार नारो विष्णु आपटे हे शेवटचे बाजीरावसाहेब पेशवे यांच्या पदरीं सरदार होते. हें वाचून या लेखकास जिज्ञासा उत्पन्न झाली कीं, सर्व आपटे एक गोत्रज असल्यामुळें, आपणही सरदार आपटे यांच्यापैकींच आहोंत; अशी मनाची समजूत होऊन, त्याच्या संशोधनास सुरवात केली. आमचें कोंकणांतील मूळगांव **आजगांव** असल्यामुळें त्या गांवीं जाऊन जों चौकशी करितों तों सरदार नारो विष्णु आपटे यांचे वंशज ग्वाल्हेर येथें असून त्यांचेही मूळगांव आजगांवच ! तेव्हां विशेष चौकशी करितां, सरदार आपटे हे या लेखकास अगदीं जवळचे म्हणजे दशांतील असल्याचें समजलें. मग " **आपटे घराण्याचा इतिहास** मी तयार करीत आहें, ज्यांचें उपनांव आपटे आहे, त्यांनीं आपली माहिती पाठवावी " म्हणून वर्तमानपत्रांत जाहिरात दिली, दहा प्रश्नांचें एक विनंतीपत्र छापिलें. विनंतीपत्रें सर्वांना पाठविलीं, आणि मी माहिती मिळविण्याकरितां प्रवास करूं लागलों. सर्व हिंदुस्थानांतील **आपटे** यांची माहिती मिळवून पुस्तक तयार केलें आणि या पुस्तकास **आपटे घराण्याचा इतिहास** हें नांव देऊन, अभिप्रायार्थ जगमान्य केसरीवर्तमान पत्राचे

संपादकांकडे पाठविलें. केसरीकारांनीं माझ्या या नवीन कल्पनेचा गौरव करून त्यांनीं या लेखकास आज्ञा केली कीं, " तुम्हीं आपल्या आयुष्यांत निरनिराळ्या ऐतिहासिक कोंकणस्थ घराण्यांची माहिती मिळवून ती पुस्तकरूपानें छापा. आणि कोंकणस्थ ब्राह्मणांचीं जीं कांहीं ४।५ ऐतिहासिक घरांणीं आहेत; तीं झाल्यावर इतर ऐतिहासिक घराणीं संशोधनास घ्या. " या लोकमान्यांचे आज्ञेप्रमाणें संशोधनाचें काम चालविलें आहे. इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या या अज्ञ लेखकास लोकमान्यांनीं उत्तेजन देऊन, कायमची स्फूर्ति उत्पन्न केली स्फूर्ति कायम होणें याला विशेष कारण माझ्या **आपटे घराण्याच्या इतिहासावर** त्यांनीं दिलेला अभिप्राय होय ! तो येणें प्रमाणेः—

केसरी—मंगळवार, तारीख २४ नोव्हेंबर सन १९१४ इसवी.

पुस्तकें व अभिप्राय

आपटे घराण्याचा इतिहास—(ले. गोविंद विनायक आपटे, धर्मपुरी वांई):—— कोंकणस्थांत आपटे, गोखले, पटवर्धन, परांजपे, रानडे, बापट, सोठ इ० आडनांवांचीं जीं जुनीं व मोठीं घराणीं आहेत, त्यांचा अव्वलपासूनचा इतिहास लिहिला गेल्यास महाराष्ट्राच्या इतिहासाचें संगतवार ज्ञान होण्यास मदत होईल यांत शंका नाहीं. शिवाय आपल्या घराण्याचा पूर्वापार व खरा इतिहास कळल्यास आपल्या पूर्वजांच्या मनोवृत्ति कशा होत्या? त्यांच्या आंगीं मुख्यत्वेंकरून कोणकोणते गुण होते? त्यांचें शील कसें होतें? त्यांच्या वेळच्या परिस्थितींत व आतांच्या परिस्थितींत जो काय फरक झाला असेल तो राष्ट्रहिताच्या दृष्टीनें कितपत इष्ट किंवा अनिष्ट आहे, यांचा तुलनात्मक दृष्टीनें विचार करण्यास अशा घराण्यांचे स्वतंत्र इतिहास बाहेर पडणें तर अत्यंत जरूरीचें आहे. अशा प्रकारचा ब्राह्मण घराण्यांचा सविस्तर व साधार इतिहास लिहिण्याचा पहिला प्रयत्न रा. गोविंद विनायक आपटे यांनीं केला आहे. रा. आपटे यांची प्रस्तुत कृति निःसंशय कौतुक करण्यासारखी व अनुकरणीय आहे. वंशवृक्षासह सुमारें तीनशें वर्षांपूर्वीपासूनचा आपटघांचा इतिहास या पुस्तकांत आला आहे. कोंकणस्थांत आडनांवें कशीं पडलीं व प्रस्तुतचें आपटे हें आडनांव कां पडलें या संबंधाची माहिती पुस्तकांत नसून त्यासंबंधानें लेखकानें प्रयत्न केलेलाहि दिसत नाहीं. पण आजगांवचे मूळरुष विश्वनाथभट आपटे यांचाच हा वंशविस्तार आहे असें लेखकांनीं शोध करून ठरविलें आहे. हिंदुस्थानांत बहुतेक सर्व ठिकाणीं हिंडून माहिती मिळवणें व ती माहिती व्यवस्थित रीतीनें लोकांपुढें मांडणें किती खर्चाचें व श्रमाचें काम आहे, याची कल्पना पुस्तक पाहिल्याबांचून होणार नाहीं. अठराव्या शतकाच्या अखेरीस या घराण्यांत प्रसिद्धीस

आलेले व शिंद्याच्या पदरीं असलेले सरदार नारो विष्णु, बाबासाहेब व रावसाहेब आपटे यांचीं चरित्रें व फोटोहि या पुस्तकांत दिलेले आहेत. त्याच प्रमाणें आपआपल्या व्यवसायांत नांव काढलेल्या सर्व आपटे मंडळींचेहि फोटो पुस्तकांत दिलेले असून त्यांच्या त्या विशेष गुणासंबंधाची साधार माहितीहि दिली आहे. आपटयांच्या चार वंशवृक्षांचे कागदहि पुस्तकाला जोडलेले आहेत. पुस्तकाच्या शेवटीं आपटे मंडळींच्या नांवांची डायरेक्टरीसारखी सूची जोडली असती तर माहिती पाहण्यास अधिक सुलभ पडलें असतें. महाराष्ट्राच्या इतिहासज्ञानांत भर पडण्यास साधनीभूत होणाऱ्या अशा प्रकारच्या प्रयत्नांस महाराष्ट्राकडून योग्य उत्तेजन मिळेल अशी आशा आहे. पुस्तकाची किं. २। रु. आहे.'

लोकमान्यांच्या आज्ञेनुरूप पुढें मी **बरवे घराण्याचा इतिहास व संस्थानिक पटवर्धन घराण्याचा इतिहास** असे दोन इतिहास प्रसिद्ध केले. नंतर गोखले घरण्यांतील कांहीं मंडळी या लेखकास गोखले घराण्याचा इतिहास तयार करा आम्ही आपल्याला शक्य ती मदत करूं असें म्हणूं लागली. तेव्हां मी त्या मंडळींनां सांगितलें कीं, रास्ते हेहि गोखलेच आहेत; तेव्हां **गोखले व गोखले-रास्ते घराण्याचा इतिहास** तयार करण्याचे व गांवोगांवीं फिरून माहिती मिळविण्याचे परिश्रम कितीहि त्रासदायक असले तरी ते मी करीन परंतु या कामास द्रव्याची मदत करणारा कोणी उदार धनिक पुढारी झाल्याशिवाय मात्र हें काम मी करूं शकणार नाहीं. परंतु ती अडचण तेव्हांच दूर झाली. ती अशीः—एके दिवशीं पुणें मुक्कामीं मी श्रीमंत फर्स्टक्लास सरदार माधवराव आनंदराव ऊर्फ रावसाहेब रास्ते यांच्याकडे जाऊन, **गोखले व गोखले-रास्ते घराण्याचा इतिहास** मी तयार करितों परंतु हें घराणें फार मोठें असल्यामुळें या कार्यास खर्च फार येणार, तेव्हां आपण या कार्यास प्रथमतः योग्य आश्रय द्यावा. ही माझी विनंति श्रीमंत रावसाहेब रास्ते यांनीं ऐकून घेतली. आणि माझ्या प्रॉमिस-लिहिवर श्रीमंत रावसाहेब रास्ते यांनीं लेखी आर्डर दिली कीं, " **गोखले व गोखले-रास्ते घराण्याचा** इतिहास तयार करण्याचे कामीं आम्ही तुम्हांस पांचशें रुपये देण्याचें कबूल केलें असून पुस्तक तयार झाल्यावर पांच प्रति विकत घेऊन, योग्य तें बक्षीसहि देऊं " याप्रमाणें श्रीमंत रावसाहेब रास्ते यांनीं या लेखकास योग्य मदत करून, सदरहू इतिहास तयार करणें भाग पाडले. या औदार्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहें.

विद्वन्मणी चिंतामणराव विनायक वैद्य एम्. ए. एल्.एल्.बी. यांनीं या अशिक्षित अज्ञ लेखकाचे विनंतीस मान देऊन, **गोखले व गोखले-रास्ते** घराण्याच्या इतिहासाला आपली प्रस्तावना जोडून सुशोभित केलें. या बद्दल हा लेखक त्यांचा फार आभारी आहे.

नाशिक जवळील श्री क्षेत्र त्रिंबकेश्वर येथील इनामदार श्री. रा. आपासाहेब व बाळासाहेब जोगळेकर यांच्या सहायानें तेथील वे. मू. कमळाकर रावजी शास्त्री पाटणकर, वे. मू. त्रिंबकभट घैसास वगैरे क्षेत्रोपाध्ये यांनीं वेळोवेळीं जुन्या व नव्या नामावळींच्या चोपड्या माझ्याकडोन कांहीं वेतन न घेतां इतिहासाचें महत्व जाणून उतारे घेऊं दिले याबद्दल हा लेखक त्यांचा व जोगळेकर यांचा अत्यंत आभारी आहे. क्षेत्रोपाध्ये यांनीं जो जो म्हणून कोणी क्षेत्रीं येतो त्याच्याकडोन त्याच्या पूर्वजांचीं नांवें व राहण्याचें ठिकाण वगैरे माहिती घेऊन, ती माहिती (कीर्द व खतावणी प्रमाणें) वह्यांवर फारच व्यवस्थित नोंदिली आहे. हा त्यांचा उद्योग फार महत्वाचा व प्रशंसनीय आहे. तरी क्षेत्रीं जाणाऱ्या यात्रेकरूंनी आपापली माहिती आपल्या क्षेत्रोपाध्यास मोठ्या प्रेमानें देत जावी अशी सर्व यात्रेकरूंना मी विनंती करितों.

पुस्तकाबरोबर या घराण्याचे पांच वंशवृक्ष व विद्यमान पुरुषांची नंत्री दिली आहे. नंत्री पुस्तकांत जोडली आहे आणि वंशवृक्ष मात्र पुस्तकासोबत दिले आहेत.

उपोद्घात.

कोंकण व कोंकणस्थ

कोंकण हा शब्द कोंकण्णा या विशेषनामावरून झालेला आहे. दशावतारांतील सहावा अवतार श्रीपरशुराम याची मातोश्री कोंकण्णा ऊर्फ रेणुका होय. ह्या तिच्या कोंकण्णा ह्या नांवावरून कोंकणप्रांत झाला आहे. हा प्रांत सह्याद्रीचे पश्चिम पायथ्यापासून समुद्रकिनाऱ्यापर्यंत असून ह्या प्रांतास–कोंकणप्रांत–हें नांव पडण्याचें कारण येणें प्रमाणें:—

परशुराम हा भृगुपुत्र जमदग्नि ह्याचा मुलगा. परशुरामाच्या आईचें नांव कोंकण्णा ऊर्फ रेणुका हें असून रेणुका ह्याच नांवाची विशेषतः प्रसिद्धी आहे. तिला जमदग्नीपासून पांच पुत्र झाले. परशुराम हा त्यांपैकीं कनिष्ठ पुत्र होय. एके वेळीं रेणुका नदीवर स्नानास गेली होती. त्या ठिकाणीं गंधर्वाचें एक जोडपें जलक्रीडा करीत असलेलें तिच्या दृष्टीस पडलें. त्या देखाव्यानें तिच्या मनांत कामवासना प्रबल झाली; पुढें घरीं आल्यानंतर तिनें आपली इच्छा पतिजिघळ प्रदर्शित केली. जमदग्नी हा नांवाप्रमाणें अग्नितुल्यप्रखर किंवा जहाल असल्यामुळें पत्नीच्या विषयवासनेमुळें त्याला अत्यंत कोप आला व अत्यंत निंद्य शब्दांनीं तिची निर्भर्त्सना करून तिचें शीर उडविण्याविषयीं आपल्या पुत्रांना त्यानें आज्ञा

केली; परंतु बापाची आज्ञा झाली असतांही आपल्या मातेचा वध करण्याला चौघां पुत्रांपैकीं एकहि तयार होईना; पुढें पांचवा पुत्र परशुराम हा आल्यानंतर जमदग्नीनें तीच आज्ञा परशुरामास केली. व त्या पितृभक्त परशुरामानें बापाची आज्ञा शिरसावंद्य मानून आपल्या हातांतील परशूनें मातोश्री रेणुकेचें शीर उडविलें. पुत्राच्या या कृत्यानें जमदग्नीचा क्रोध शांत झाला व त्याच्यावर खूष होऊन " पाहिजे तो वर माग " असें तो परशुरामास म्हणाला; यावर पितृभक्त परंतु दयार्द्र अंतःकरणाच्या परशुरामानें " आपली मातोश्री सजीव व्हावी " असा वर मागितला व जमदग्नीनें ती गोष्ट मान्य करून रेणुकेला पुन्हां जिवंत केलें. या गोष्टीवरून पितृभक्तीप्रमाणें परशुरामाचें अंतःकरणांत मातृभक्ति किती जाज्वल्य होती ही गोष्ट उघड होत आहे.

वरील गोष्ट घडून आल्यानंतर कांहीं दिवसांनीं कार्तवीर्य नांवाच्या महापराक्रमी राजानें जमदग्नीच्या आश्रमांत प्रवेश करून त्याची कामधेनु हरण केली. कार्तवीर्य हा माहिष्मति नांवानें प्राचीन काळीं प्रसिद्ध असलेल्या प्रांताचा राजा कृतवीर्य याचा मुलगा. कार्तवीर्यानें तीव्र तपश्चर्या करून दत्तात्रेयाला प्रसन्न करून घेऊन त्याच्यापासून अनेक वर मिळविले होते. एका वरानें त्याला सहस्र हात उत्पन्न झाले म्हणून त्याला सहस्रार्जुन असें नांव प्राप्त झालें. दुसऱ्या एका वरानें त्याला एक सुवर्णरथ मिळाला. ह्याच्या योगानें त्याला पाहिजे तिकडे संचार करतां येत असे. तिसऱ्या वरानें तो शत्रूला अजिंक्य होऊन बसला. दत्तात्रेयाच्या मिळालेल्या वरामुळें त्याच्या ठिकाणीं अद्भुत सामर्थ्य उत्पन्न झालें व त्याला स्वर्ग दोन बोटें उरला. या अभिमानामुळेंच याला जमदग्नीच्या आश्रमांतून कामधेनु हरण करण्याचें धाष्टर्य करतां आलें. कामधेनु हरण केली त्या वेळीं परशुराम आश्रमांत नव्हता. आश्रमांत परत आल्यावर ही हकीकत त्याला समजली. व क्रोधानें संतप्त होऊन त्यानें सहस्रार्जुनाशीं युद्ध करून त्याला ठार मारिलें. सहस्रार्जुनाचे मुलांना पित्याचे वधाची बातमी समजतांच क्रोधायमान होऊन ते जमदग्नीच्या आश्रमांत आले. व जमदग्नी आश्रमांत एकटा आहे असें पाहून त्याचा त्यांनीं एकदम वध केला. परशुराम आश्रमांत परत आल्यावर पित्याचा वध झाल्याचें पाहून त्याचा क्रोधाग्नी खवळला व त्याक्षणीं सर्व क्षत्रीयकुलाचा संहार करण्याची त्यानें घोर प्रतिज्ञा केली व त्याप्रमाणें त्यानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली. वास्तविक खऱ्या क्षत्रियानें गोब्राह्मणांचा प्रतिपाल करावा हेंच त्यांचें आद्य कर्तव्य होय. परंतु तें विसरून आणि वरप्रसादानें प्राप्त झालेल्या सामर्थ्याचे योगानें उन्मत्त होऊन सहस्रार्जुनानें तपोबलानें प्राप्त करून घेतलेल्या कामधेनूला हरण करून नेली हा पहिला अन्याय, व पुढ सहस्रार्जुनाच्या पुत्रांनीं सपोनिष्ठ जमदग्नीचा वध केला हा दुसरा अन्याय, अशा दुहेरी अन्यायानें चिडून जाऊन परशुरामानें क्षत्रिय संहाराची प्रतिज्ञा केली. अर्थात् क्षत्रियसंहाराच्य

अनर्थाचें खापर एका क्षत्रियाच्या अन्यायी उन्मत्तपणाच्या माथींच मारलें पाहिजे. परशुरामाचें क्षात्रतेज इतकें असह्य होतें कीं, प्रत्यक्ष रघुकुलोत्पन्न दशरथालाही स्त्रीवेषधारण करून ब्राह्मणाच्या आश्रमांत लपून बसावें लागलें. पुढें श्रीपरशुराम-अवतार–कृत्याची समाप्ती होण्याचे वेळीं त्यांचें व श्रीरामचंद्र यांचें तुमुलयुद्ध होऊन श्रीपरशुरामाचे शरीरांतून दिव्य ज्योत निघून ती श्रीरामचंद्राचे शरिरांत प्रवेशली. अशा रीतीनें ह्या अवताराची समाप्ती झाली. श्री परशुराम हे चिरंजीव असून सप्त चिरंजिवांमध्यें त्यांची गणना आहे. ते सप्तचिरंजीव येणेप्रमाणेः— " अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च विभीषणः । कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ॥ " श्री परशुराम हे अद्याप महेंद्रपर्वतावर तपश्चर्या करीत आहेत असा समज आहे. पित्याचे वधावरून श्रीपरशुरामाला क्षत्रियांबद्दल इतका वीट आला होता कीं, क्षत्रियांनीं ज्या भूमीमध्यें वास्तव्य केलें त्या अपवित्र भूमींत राहणें पापकारक आहे असें वाटून सह्याद्रीच्या तटावरून श्रीपरशुरामानें समुद्रावर बाण फेंकला व त्याच्या योगानें समुद्र द्वादश योजनें (अडेचाळीस कोस) मागें हटविला. आणि ह्या नव्या भूमीला आपल्या मातोश्रीचें स्मारक यावच्चंद्रदिवाकरौ कायम रहावें ह्मणून तिचें नांव या पुण्यभूमीला दिलें तेव्हांपासून या पुण्यभूमिला ' कोंकणप्रांत ' ही संज्ञा प्राप्त झाली. या कोंकण प्रांतामध्यें राहणाऱ्या ब्राह्मणांस कोंकणस्थ ब्राह्मण ही संज्ञा प्राप्त झाली व ब्राह्मणेतरांना कोंकणे असें म्हणूं लागले.

दशावतारांपैकीं सहावा अवतार श्रीपरशुराम यांनीं समुद्रास मागें सारून जी पुण्यभूमी निर्माण केली. ती पुण्यभूमी निरोगी असून उंचसखल प्रदेश व मोठमोठाले गगनचुंबित वृक्ष व लता आणि त्यांमधून वाहणारे स्वच्छ पाण्याचे सुंदर प्रवाह यांनीं युक्त अशी असून मोठी शोभायमान आहे. अशा या पुण्यकारक शोभायमान पुण्यभूमीस परशुरामक्षेत्र असें म्हणूं लागले. व अद्यापिहि परशुरामक्षेत्र (परशुरामभूमी) असें म्हणतात. परंतु विशेषतः हल्लीं या क्षेत्राचें चालू नांव कोंकणप्रांत होय. श्रीपरशुरामानें आपल्या कोंकण्णा मातोश्रीचें चिरकाल स्मरण राहावें म्हणून त्या परशुराम क्षेत्रास कोंकण हें नांव दिलें; तेव्हांपासून पुढें परशुरामक्षेत्र अथवा कोंकणप्रांत असें म्हणूं लागले. या कोंकणप्रांतास इंग्रजींत रत्नागिरी जिल्हा ही संज्ञा प्राप्त झाली आहे.

कोंकणप्रांतांत (रत्नागिरी जिल्ह्यांत) चिपळूण या नांवाचा गांव प्रसिद्ध असून तो तालुका आहे. या गांवीं व्यापारपेठ असून येथून घाटावर जाण्याचा बैलगाडीचा हमरस्ता आहे. चिपळूण गांवापासून सुमारें एक कोसावर श्रीपरशुरामक्षेत्र डोंगरावर आहे. डोंगरावर श्रीपरशुरामाचें मोठें देवालय आहे. या देवालयास लागूनच लोकवस्ती आहे. या ठिकाणीं श्रीपरशुरामजयंतीचा मोठा उत्सव होतो. चिपळूण गांवीं जाण्यास दोन मार्ग आहेत; एक कऱ्हाडवरून बैलगा-

डीचा व दुसरा मुंबईहून आगबोटीचा. आगबोट चिपळूनपासून एक कोसावर गोवळकोट येथें लागते.

श्री परशुरामकालीन (सहाव्या अवतार कालांत) कोकणप्रांतांत ब्राह्मणांची वस्ती होऊं लागली. " सांगरे सर्व तीर्थानि म्हणजे सर्व तीर्थांत सागर (समुद्र) हें तीर्थ विशेष आहे. अशा सागरांतून जी पुण्यभूमी श्रीपरशुरामांनीं उत्पन्न केली त्या पुण्यभूमींत विंध्याद्रि, सातपुडा, हिमालय, सह्याद्री, निलगिरी वगैरे अनेक पर्वतांवरील ऋषींनीं येऊन वास्तव्य केलें.

पौराणिक काळीं आडनांवें नव्हतीं असें वाटतें कारण त्या संबंधीं पौराणिक ग्रंथांत कोठें उल्लेख असल्याचें आढळून येत नाहीं. पुराणकालीं अमुक ऋषिकुलोत्पन्न म्हणजे गोत्रावरूनच सर्वांना संबोधित असावेत असें वाटतें. आतां उपनामें म्हणजे ठेवलेलीं आडनांवें (विशेष नामें) कोणत्या कालापासून सुरू झालीं हें कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं व तसें निश्चित सांगण्यास कांहीं प्रमाणग्रंथ मिळाल्याशिवाय सांगतां येणें अशक्य आहे. आम्हां कोंकणस्थांचीं जीं मूळ साठ उपनामें चालू आहेत तीं फार अनादि आहेत. त्या मूळ साठ उपनामांत आठवेले. या उपनामाचा अर्थ " कोणी पुरुषानें आठवेल लाविले " तेव्हांपासून त्याच्या वंशास आठवेले हें उपनाम सुरू झालें. परंतु अलीकडे आठवेले न म्हणतां " आठवले " असेंच म्हणूं लागले आहेत. परंतु मूळ उपनाम " आठवेले " असेंच आहे. ह्या उपनामाचा जसा स्पष्ट बोध होतो तसा बाकीच्या मूळ उपनामांत कांहींच अर्थबोध होत नाहीं. असो.

पौराणिक कालाच्या शेवटीं व ऐतिहासिकालांत (बादशाही व मराठे शाहींत) मूळ साठ उपनामें जीं होतीं तीं ३०४ झालीं. सन १८५५ सालांत अमरापुरकर, जोशी व गद्रे यांनीं शिळाप्रेसमध्यें उपनामाची जी एक जंत्री छापली आहे, त्या जंत्रीवरून पाहतां मूळ उपनामें साठ असून कोण कोणत्या उपनामाचे किती भेद झाले आहेत तें उत्तम दाखविलें आहे. तो त्यांचा प्रयत्न फारच प्रशंसनीय आहे. सन १८५५ सालांत ६० उपनामांची ३०४ उपनामें भेदानें झालीं. आणि त्या पुढें आज सदुसष्ट वर्षांत आणखी किती तरी त्यांत भेदानें उपनामें जाहालीं असतील ! हीं नवीन जाहलेलीं उपनामें मात्र अर्थबोधक आहेत. त्यांतील जुनीं व नवीं थोडीं नमुन्याकरितां देत आहें. उदाहरणार्थ खासगीवाले, ढमढेरे, हसबनीस, रास्ते, विनीवाले, पेशवे, देशमुख, जामदार, पाटणकर, पाळकर, वेहळेकर, केळकर, सहस्रबुद्धे, गोडबोले, खरे. गोंधळेकर, महाबळ, टिळक, दांडेकर ओंकार, धारपुरे वगैरे पुष्कळच आहेत यावरून पाहतां मूळ साठ उपनामें फार अनादि असून त्या उपनामांचा अर्थबोध होत नाहीं. त्या नंतर मूळ उपनामांत जे भेद झाले ते भेद ऊर्फ उपनामें मात्र बहुतेक अर्थवाचक आहेत.

अभिन्नत्व

गोत्रासंबंधानें विचार करीत असतांना एक महत्वाची बाब लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, कश्यप गोत्रामध्यें ज्या ब्राह्मणांचा अंतर्भाव होतो ते फक्त कोंकणस्थच आहेत असें नाहीं. तर देशस्थ, द्राविडी, कर्नाटकी, वैष्णव, बंगाली, शेणवी वगैरे ब्राह्मण यांचाहि अंतर्भाव होतो.काश्यप गोत्राप्रमाणेंच इतर सर्व गोत्रांची तशीच स्थिति आहे. अशी स्थिति कां असावी आणि निरनिराळ्या ऋषींच्या वंशजांमध्यें आचारविचारसंबंधानें आणि खाण्यापिण्या संबंधानें इतकी भिन्नता कां उत्पन्न व्हावी अशा प्रश्न उत्पन्न होतो. या संबंधाची उपपत्ति येणेंप्रमाणें असावी असें दिसतें—भिन्नभिन्न ऋषींचे वंशज भिन्नभिन्न काळीं तीर्थयात्रा वगैरे करीत असतां निरनिराळी रमणीय स्थानें पाहून त्या त्या ठिकाणीं जाऊन राहिले असावेत व त्या ठिकाणच्या भिन्न गोत्रीय ऋषींच्या वंशजांशीं शरीरसंबंध करीत असावेत व अशा रीतीनें त्या त्या प्रांतांत त्यांचा वंशविस्तार झाला असावा असें वाटतें. पुढें भिन्नभिन्न प्रांतांतील परिस्थिति–भेदामुळें ऋषींच्या या वंशजामध्यें कालमानानें खाणेंपिणें आचारविचार आणि चालिरिती वगैरे बाबतींत भिन्नता उत्पन्न व्हावी हें स्वाभाविक आहे.परंतु हे भेद सध्याच्या काळीं कितीहि वाढलेले असले तरी या भिन्नतेच्या मागें सगोत्रतेचें अभिन्नत्व आजहि दिसून येतें. ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. आतां कोंकणस्थ ब्राह्मण, देशस्थ ब्राह्मण, शेणवी ब्राह्मण, द्राविडीब्राह्मण, बंगालीब्राह्मण व कर्नाटकीब्राह्मण, अशीं विशेषणें जीं ब्राह्मणांनां हल्लीं चालूं आहेत त्याचें मुख्यतः कारण हेंच कीं ज्या ज्या देशांत आमच्या पूर्वजांनीं वास्तव्य केलें त्या त्या देशाचें विशेषण आम्हांला प्राप्त झालें. प्रायः ब्राह्मण सर्व एक हेंच सत्य आहे.

गोखले व गोखले-रास्ते घराण्याचा इतिहास

वेळणेश्वर येथील गोखले ऊर्फ रास्ते.

श्री-वेळणेश्वर देवालयापासून उत्तर दिशेस सुमारें अर्ध्या मैलावर वैतरणी नांवाची लहानशी नदी आहे. या नदीचे कांठीं पुरातन काळीं गोखले यांचीं घरें होतीं. ज्या जागेंत घरें होतीं, त्या जागेस वाकी अशी संज्ञा आहे. या वाकी येथें गोखले यांची विद्यमान शेतजमीन आहे. वैतरणी ज्या ठिकाणीं समुद्रास मिळते, तेथून उत्तर दिशेच्या भागास वेळ अशी संज्ञा आहे. सदरहू भागांत समुद्रकांठीं प्राचीन काळीं जें शंकराचें देऊळ होतें, त्या देवास वेळेश्वर असें प्रथम म्हणत. पुढें कांहीं वर्षांनीं गोखले यांचे पूर्वज वैतरणी संगमाचे दक्षीण भागांत येऊन राहिले. वेळेश्वर देवास आपला कुलदेव मानून गोखले यांचे वंशज त्या देवाची नित्य पूजा करूं लागले. त्या देवास वेळेश्वर न म्हणतां पुढें वेळणेश्वर म्हणूं लागले. पूर्वीचें जुनें देऊळ अगदींच लहान होतें तें काढून गोखल्यांचे पूर्वजांनीं जरा मोठें देवालय बांधिलें. श्रीवेळणेश्वराचे कृपेनें गोखले यांचे कुटुंबाचा विस्तार होऊन, या कुटुंबांतील पुरुष मोठे कर्तृत्ववान् झाले. वेळेश्वर म्हणतां म्हणतां वेळणेश्वर असें म्हणूं लागले. पुढें या देवाचें नांवावरून विद्यमान् देवालय असलेल्या भागास आणि गोखले यांचीं घरें आहेत, त्या दक्षिण-भागास वेळणेश्वर हें नांव प्राप्त होऊन वेळणेश्वर गांव असें म्हणूं लागले. या वेळणेश्वर गांवीं तत्कालीन गोखले घराण्याप्रमाणेंच, गाडगीळ, खरे वगैरे उपनांवांच्या घराण्यांतील पुरुषांनींही घरें बांधिलीं. अदमासें चारशें वर्षांपूर्वी गाडगीळ घराण्यांतील एका पुरुषानें विद्यमान् असलेलें श्रीवेळणेश्वराचें देवालय बांधिलें. गाडगीळ उपनांवाच्या ज्या पुरुषानें देवालय बांधिलें ती हकीकत येणेंप्रमाणें आहे. ज्या पुरुषानें देवालय बांधिलें तो सधन असल्यामुळें सावकारी करीत होता. त्यानें ज्या एका इसमास कर्जाऊ रक्कम दिली ती रक्कम वसूल होणें अशक्य झालें. एके वेळीं चार मंडळीसमवेत ते सावकार गाडगीळ देवालयांत बसलें असतां श्रीपुढें हात जोडून म्हणाले कीं, " जर माझी कर्जाऊ रक्कम मागितल्याशिवाय कर्जदार मला घरीं आणून देईल तर सदरहू रकमेपैकीं एक पैही घरांत न ठेवतां तुझें मोठें देवालय बांधीन आणि राहिलेला पैसाही धर्मकृत्यास खर्च करीन. " पुढें कांहीं दिवसांनीं त्या कर्जदारानें सर्व कर्जाची एकदम फेड केली. तेव्हां गाडगीळ यांनीं, विद्यमान् असलेलें विस्तीर्ण देवालय, वेळणे-

श्वर गांवाजवळील साखरी–आगर गांवीं बांधिलेलें श्रीगणपतीचें देवालय आणि पिंपर गांवांत बांधिलेली विहीर इत्यादि कामें सदरहू रकमेंतून बांधिलीं. सदरहू गाडगीळ यांचे वंशज हल्लीं वेळणेश्वर व श्रीक्षेत्र वाई येथें आहेत.

वेळणेश्वर गांवास जाण्याला तीन मार्ग आहेत. समुद्रमार्गानें तिवरीबंदरावरूनचा मार्ग जवळचा, दुसरा जयगडबंदरावरून आणि तिसरा मार्ग लांबचा चिपळूणवरून पालशेत आणि पालशेतहून वेळणेश्वर असे तीन मार्ग आहेत. वेळणेश्वर गांवांत गोखले यांनीं वस्ती करून सुमारें सातशेंहून अधीक वर्षें झालीं आहेत. यांच्या घराण्यांतील अकरावा पुरुष गोविंद भैरव गोखले हा नाशिक क्षेत्रीं शके १६४० त गेला होता. तेव्हां त्यानें गोखले असेंच लिहून दिलें आहे. त्यानंतर नववा पुरुष जो क्षेत्रीं गेला त्यानें लिहून दिलेला लेख पुढीलप्रमाणेः—

" रघुनाथभट पिते हरी नारायण; बंधू शामजीपंत व रामचंद्र; माता कृष्णाबाई उपनांव गोखले–रसदे गांव वेळणेश्वर वस्ती कर्हाडक " सदरहू लेखांत गोखले–रसदे असें लिहिलें आहे. यावरून या घराण्यांतील अकराव्या पिढीपासून 'रसदे' हें विशेषण लावीत असल्याचें सिद्ध होत आहे. तीनशें वर्षांपूर्वी विजापूरचे अदिलशाहीचे कारकीर्दीत वेळणेश्वर प्रांताची रसद विजापुरीं पाठविण्याचे कामगिरीवर यांची नेमणूक असल्यामुळें यांना गोखले–रसदे असें म्हणूं लागले. या घराण्यांतील एका पुरुषानें वेळणेश्वर प्रांतांतील बिन बारसी मिळकत जप्त केली. ही मिळकत लाखों रुपयाची होती. सदरहू जप्त केलेली संपत्ती नीट बंदोबस्तानें विजापूरकर बादशहाचे दरबारीं हजर केली. बादशहा ती लाखों रुपये किंमतीची मिळकत पाहून, म्हणाला कीं, "रसद पोहोंचानेंवाला गोखले बडा रास्त अदमी है ! इन्ने इसमेंसे दो तीन लाख रुपया खा जाताता तोभी आपकुं मालुम नहीं होताता. इस वास्ते आज से इन्नकु रास्त कहिना " वरीलप्रमाणें रास्त हें विशेषण देऊन, वेळणेश्वर हा गांव इनाम देऊन, वंशपरंपरेची सनद करून दिली. तेव्हांपासून हें गोखले घराणें आपणांस 'रास्ते' हें विशेषण लावूं लागलें.

वेळणेश्वर हा गांव इनाम मिळाल्यानें या घराण्यांतील पुरुषांची सांपत्तिक स्थिति चांगली सुधारल्यावर कांहीं पुरुष सावकारी करूं लागले. ज्या पुरुषाला रसदे म्हणत व जो पुढें इनामदार होऊन, रास्ते म्हणवूं लागला त्याच्या सख्या भावाचा वंश हल्लीं वाई, जमखंडी व पुणें येथें आहे. इ. स. १७०७ मध्यें शाहू महाराज औरंगजेबाच्या कैदेंतून सुटून आपल्या राज्यांत येऊन, सातारा मुक्कामीं आपले सिंहासनीं विराजमान होऊन राज्य करूं लागले. अदमासें इ. स. १७१० ते १२ चे दरम्यान रास्ते घराण्यांतील दोन पुरुष भिकाजी नाईक व सदाशिव नाईक हे वेळणेश्वरहून निघोन सातारा शहरीं येऊन सावकारी धंदा करूं लागले. हे सावकारी व्यवहार करीत असल्यामुळें यांना 'नाईक' म्हणत. यांच्या दुकानांत फाटक उपनांवाचे जे कारकून होते, ते पुढें रास्ते हें विशेषण स्वताहास लावूं

लागले. सदरहू फाटक–रास्ते यांचे वंशज हल्लीं वाई येथें आहेत. भिकाजी शामजी व सदाशिव शामजी हे दोघेच बंधू होते. हे दोघेहि हुषार, व धूर्त व मोठे उद्योगी होते. यांचा सावकारी व्यवहार १०।१५ वर्षे उत्तम चाललेला पाहून शाहू महाराज प्रसन्न झाले होते. या नाईक बंधूनीं शाहू छत्रपती महाराज यांना एकदां दिपवाळीचे सणांत लक्ष्मीपूजन व फराळास आग्रहानें बोलाविल्यावरून शाहूमहाराज यांच्या घरीं आले. त्यावेळीं भिकाजी नाईक यांची मुलगी गोपिकाबाई इला महाराजांनीं बाढत असतानां पाहून म्हणाले,—" नाईक, ही मुलगी मोठी भाग्यवान आहे. ही कोणाची मुलगी ? " हा प्रश्न होतांच भिकाजी नाइकांनीं सांगितलें—" ती माझी मुलगी आहे. " तेव्हां महाराज हासून म्हणाले–" आतां तर इच्या भाग्योदयासंबंधानें शंकाच उरली नाहीं." हे ऐकून भिकाजी नाईक म्हणाले—" आमच्यापेक्षां कोणी मोठा व्याजबट्टा करणारा सावकारपुत्र आमचा जावई होईल एवढेंच ना ! ! " तेव्हां महाराज म्हणाले—" तें कांहीं असो; आमची एक गोष्ट तुम्हीं मान्य केली पाहिजे." तेव्हां भिकाजी नाईक हात जोडून म्हणाले,—" महाराजांची आज्ञा आम्हांस शिरसावंद्य आहे " हें नाईक यांचें बोलणें ऐकून महाराज म्हणाले—" आतां तुम्हाला कांहीं काळजी करण्याचें कारण नाहीं. या मुलीचें लग्न आम्हीच करितों. " असें म्हणून महाराज वाड्यांत गेले. नंतर थोड्याच दिवसांत कांहीं दरबारी कामाकरितां श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे मुख्य प्रधान सातान्यास आले. तेव्हां महाराजांचें बोलणें लग्नसंबंधीं ऐकून पेशवे यांनींही " महाराजांचे आज्ञेबाहेर आम्हीं नाहीं. महाराजांना जें मान्य तें आम्हांसही मान्यच आहे, " असें म्हणाले. सन १७२९ मध्यें गोपिकाबाई रास्ते यांचें लग्न श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्याबरोबर श्रीक्षेत्र वांई मुक्कामीं झालें. लग्नसमारंभास शाहूमहाराज स्वारीनिशीं वांई येथें आले होते. श्रीमंत पेशवे यांच्याबरोबर शरीरसंबंध झाल्यामुळें भिकाजी नाईक यांना पालखीचा मान पेशवे यांनीं दिला. भिकाजी नाईक यांचे मुलगे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्याबरोबर राहून घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें वगैरे युद्धकलेंत निपूण झाले. असो; भिकाजी नाईक यांना मुलगे किती व त्यांनीं केलेला पराक्रम वगैरे सर्व माहिती दुबार होऊं नये म्हणून येथेंच पुरी करतों. बळवंतराव माधवराव रास्ते व उमाबाईसाहेब रास्ते यांच्या कैफियतींतच पुढें येईल. या दोन्ही कैफियतींमधील मजकूरांत कांहीं मजकुराची पुनरोक्ती होणार हें खरें, परंतु त्या तशाच देणें बरें. बळवंतराव रास्ते यांच्या कैफियतमधील थोडा मजकूर कमी केला आहे.

बळवंतराव माधवराव रास्ते यांची कैफियत. (सारांश)



यादी बळवंतराव माधवराव रास्ते सु॥ आर्बा सलासीन मयातैन व अलफ सन १२४३ फसली ता १ माहे जून सन १८३३ इसवीचें खत पाठविलें त्यांत हासील कीं, खानदानीची कैफियत पाठवावी म्हणोन पेशजी पत्र पाठविलें होतें परंतु आजपर्यंत पाठविली नाहीं. त्यास हल्लीं जलद कैफियत पाठविली पाहिजे, सरकारांत पाठविली जाईल म्हणोन लिहिलें. ऐसीयासी आमचे वाडवडील मौजे वेळणेश्वर ता॥ गुहागर तालुके अंजनवेल प्रांत कोंकण येथील वतन खोती व महाजन व इनामदार विजापूर पादशाही कारकीर्दीपासून सावकारी व्यवहार करीत होते. कोंकण जिल्हेच्या रसदेचा कारभार करीत होते. त्या समई व्यवहार रास्ती असे सरकार विजापूर यांनीं मनांत आणून उपनांव मूळचें गोखले होतें परंतु व्यवहारावरून रास्ते असें नांव चालविलें. त्या दिवसापासून रास्ते असें नांव चालत आहे. पुढें श्रीमन्महाराज शाहू राजे छत्रपति यांजवळ सातारे मुक्कामीं आमचे वडील चवथे पुरुष भिकाजी शामराज व सदाशिव शामराज हे उभयतां बंधू सरकारची कृपा संपादून एकविचारें होते. माहाराजांनीं जातीस सरंजाम पांच हजार दोनशें रुपयांचा दिल्हा. तेव्हां सदाशिव शामराज यांस सातारेयास कामावर ठेवून भिकाजी शामराज यांस वाईत वाडा बांधावयास जागा दिल्ही. तेथें वाडा बांधून राहिले. त्यास प्रथम कन्या गोपिकाबाई जाहाली. ती माहाराजांनीं श्रीमंत नानासाहेब पेशवे यांस देवविली. वाईत लग्न जाहालें. दुसरी कन्या सगुणाबाई आप्पाजी गाडगीळयास दिल्या होत्या. पुत्र सात; मल्हारराव, गणपतराव, आनंदराव, लक्ष्मणराव, गंगाधरराव, रामचंद्रराव व जीवनराव. भिकाजी नाईक यांचे चुलते हरबाजी नाईक होते. हरबाजी नाईक यांचे वंशज हल्लीं वांई व जमखंडी येथें आहेत. यांना सावकारी व्यवहारसंबंधीं "नाईक" म्हणत असत. पुढें श्रीमंतांशीं शरीरसंबंध झाल्यापासून "राव" असें म्हणूं लागले.

मल्हारराव भिकाजी पेशवे सरकारांत राहून कामकाज करीत असत. पेशवे यांनीं कर्नाटक प्रांतीं सावनूरकर नबाबावरती स्वारी केली. तेव्हां मल्हारराव बरोबर होते. त्यावेळीं बागलकोट किल्ला घेऊन मल्हारराव यांचे स्वाधीन केला व बंडाईचा बंदोबस्त करण्यास सांगितलें. मल्हारावांनीं फौज, पायदळ व तोफखाना बाळगून बंडाई मोडिली. आणि आलिखानाचा ' बदामी ' किल्ला कारस्थानें घेऊन सरकारअम्मल बसविला. सबब पेशवे यांनीं तीनहजार फौजेची सरदारी करून दिल्ही. तेवेळीं मल्हारराव यांनीं आपणांस व आपले बंधूस तैनाती करून घेतल्या व दौलतशिक्का मिळविला. तैनाती कापडबावसह मल्हारराव यांस एकवीसहजार दोनशें रुपये; आनंदराव व लक्ष्मणराव प्रत्येकीं दहाहजार

चारशें. मल्हारराव मृत्यू पावले संतान नाहीं म्हणून पाठचे बंधू गणपतराव यांचे नांवें सरदारी व्हावी, परंतु आनंदराव यांचे कर्तृत्वावर पेशवे यांची मेहेर होऊन, सरदारी आनंदराव यांसच मिळाली. पुढें गणपतराव यांचें बोलणें श्रीमंतांपाशीं होऊन, श्रीमंतांनीं अलाहिदा सरदारी गणपतराव भिकाजी यांस दिली.

आनंदराव भिकाजी यांस–– जातीस तैनात ९६४५०; कितागांव १५४८८।।; फौजेस सरंजाम १०००००००; इनाम गांव व जमिनी संसारखर्चाकडे वगैरे १७२१० ।≈।।; गणपतराव भिकाजी यांस १९३२५०; एकूण १३२२३९८-।।≈।। सरंजाम व दसऱ्यास पोशाख साडेतीन सनगें होतीं. शिवाय खास तैनाती लक्ष्मणराव भिकाजी यांस––२०८००; गंगाधरराव यांस २५०००; रामचंद्रराव यांस––१००००; आणि जीवनराव यांस––यांचे चुलते सदाशिव शामराज यांनां शाहूमाहाराजांनीं जी तैनात दिली होती तीच तैनात पेशवे यांनीं त्यांना दिली. आनंदराव भिकाजी यांचे कन्येचे पुत्र रामचंद्रराव आप्पाजी साठे यांसही श्रीमंतांकडून ५३५० ची तैनात देवविली. शिवाय रास्ते यांनां पांच हत्तीचे खर्चाबद्दल ५००० तैनात होती.

श्रीमंत पेशवे यांचे कडून देव–ब्राह्मणांस एकंदर इनाम ११४४० ।।≈; पैकीं ९७७५ ।।≈ श्रीक्षेत्र वाईतील देव–ब्राह्मणांस खालीं लिहिल्याप्रमाणें:––

३५३७।। मौजे कॅजळ प्रांत वाई हा गांव देवब्राह्मणांस इनाम. ३४४२।≈ मौजे गुळुंब प्रांत वाई हा गांव श्रीमहालक्ष्मी व श्रीकृष्णेचे उत्साहाबद्दल व गंगापुरी येथील श्रीउमामहेश्वर पंचायतन देवाकडे व वाईतील ब्राह्मणांकडे. कसबे बावधन प्रांत वाई येथील जमीन १५०० दीडहजार रुपये आकाराची, श्रीकाशीविश्वेश्वर क्षेत्र वाई पूजा, नैवेद्य, उत्साह व ब्राह्मणभोजनाबद्दल. ५३६ श्रीगंगारामेश्वर क्षेत्र वाई पूजा नैवेद्याबद्दल–जमीनी ३०० कसबे वाघोली प्रांत वाई. २०० मौजे कंणूर प्रांत वाई. ३६ कसबे बावधन जमीन विठ्ठल येशवंत खासनीस यांनीं आपले इनामपैकीं करून दिली.

३०० मौजे मनगोळी पैकीं उकळी प्रांत विजापूर येथील जमीन वाईतील श्रीथोरल्या गणपतीकडे पूजानैवेद्याबद्दल.

४५० तालीकोट येथील जमीनदाराकडोन श्रीउमामहेश्वराकडे व गंगापुरीतील देव–ब्राह्मणांकडे. बाकी १६६५ इतर ठिकाणीं खालीं लिहिल्याप्रमाणें:–

पंढरपूर येथील श्रीपंढरीनाथास पूजानैवेद्यास ४५० मौजे निंबोणी परगणे करजगी प्रांत विजापूर. २५ मौजे गोपाळपूर नजीक पंढरपूर श्रीदेवाकडे फुलेतुळशीबद्दल १२०० श्रीपंचवटी नाशीक येथील श्रीदेवाकडे.

वाई येथील काजी याची जमीन इनाम खुष खरेदी घेऊन देवालयें श्रीविष्णु व श्रीलक्ष्मीचें बांधिलीं व ब्राह्मणांस घरें बांधून देऊन धर्मपुरी पेंठ नवी वसवली. सोमवारचा बाजार भरवून तें उत्पन्न श्रीदेवाकडे नेमून दिलें.

गंगापुरी नवी वसविली. देवालय व वाडा बांधिला. कांहीं जमीन खरेदी व कांहीं मोबदला देऊन वसाहत केली. दुकानाचा हशील श्रीकडे नेमून दिला.

कुरणें ब्राह्मणांकडे, (डोंगर धामणा सदरहू केंजळ गांवचे सनदेंत आहे.) मौजे कणूर येथील कुरण श्रीकाशीविश्वेश्वराकडील देवाच्या गाई व ब्राह्मणांकडे.

वाडा धर्मपुरी रामचंद्रराव साठे यांस दिला. धर्मपुरी पागा. पुणें जुनावाडा शनवारपेठ सरकारचे वाडयानजीक. पेठ शिवपुरी नवा वाडा व पागा वाडयानजीक व पेठेंत घरें. पुणें पेठ शिवपुरी व बुधवार, शुक्रवार व शनवार येथें कर्जाऊ ऐवजांत घरें चालत आहेत.

मौजे भावडे येथें वाडा होता तो मोडला. जागा आहे. नाशिक पंचवटीस वाडा, त्र्यंबकेश्वरास वाडा, सातान्यास वाडा, तासगांवास वाडा, अनंतपूर किल्ला व वाडा, अथणींत वाडा. क्षेत्र पंढरपूरीं वाडा, तालीकोट वाडा, मौजे वाल्हे तर्फ निरथडी वाडा, पागा मौजे दिगेरी, मौजे कळवडे घर, आंबेगांव बंगला, मौजे मांडवगण पागा.

लक्ष्मण शामराव रास्ते यांनीं ता.१४ जुलई सन १८९२ इसवी अर्ज करून इनाम कमिशनकडून 'ए' ह्या शिक्याची जुन्या जहागिरीची नक्कल ता.१७ जानेवारी १८९३ इसवी रोजीं मिळविली. सदरहू नकलेवरून वरील माहिती दिली आहे. याचप्रमाणें पुढील यादीही लक्ष्मणराव यांनी दिली त्यावरून पुढें देत आहें:—

यादी मेहेरबान येजंटसाहेब बहादुर प्रांत दक्षिण यांजकडे––उमाबाईसाहेब भ्रतार खंडेराव गंगाधर रास्ते सेकंडक्लास सरदार यांजकडोन लिहून जावयाची ऐसिजे. आसाहेबांकडोन यादी ता.७ माहे एप्रिल सन १८८३ इसवीची आली कीं, आपल्या घराण्याची सविस्तर माहिती पूर्वीपासून लिहून पाठवावी म्हणून वगैरे कलमी जाहलें, त्याजवरून हकिकत लिहिण्यांत येते कीं,:—

१ आमचें नांव उमाबाई भ्रतार खंडेराव गंगाधर आडनांव गोखले उर्फ रास्ते जात कोंकणस्थ ब्राह्मण वय ४१ मूळ ठिकाण मौजे वेळणेश्वर जिल्हा रत्नागिरी रहाणार वांई व पुणें.

२ आमचे घराण्याचे मूळ पुरुष भिकाजी शामराज व सदाशिव शामराज हे उभयतां बंधू सातारा येथें शाहूछत्रपती सरकार राजे यांची कृपा संपादून एकविचारें होते. महाराजांनीं त्यांस जातीस रुपये ५२००यांचा सरंजाम करून दिल्हा. सदाशिव शामराज हे सातारा येथें होते. भिकाजी शामराज यांस महाराजांनीं वाडा बांधावयास वांईस जागा दिल्ही. तेथें वाडा बांधून राहिले. यांचा सावकारी व्यापार होता. तो रास्त रीतीनें करीत होते त्यामुळें त्यांचें नांव रास्ते असें पडलें. येविषयीं ग्रँडफ साहेब यांणीं

कै. श्री. उमाबाईसाहेब रास्ते, पुणें.

कै. श्री. सौ. लक्ष्मीबाईसाहेब रास्ते, पुणे.

केलेले मराठ्यांचे बखरींत नमूद आहे. सदाशिव शामराज यांस संतान जहालें नाहीं.

भिकाजी शामराज यांस वडील कन्या गोपिकाबाई म्हणोन होती. ती छत्रपती शाहू महाराज यांणीं बाजीराव बल्लाळ पेशवे यांचे जेष्ठ पुत्र बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांजला लग्न करून दिली. हा लग्न-समारंभ वांई मुक्कामीं महाराज यांणीं स्वतः जाऊन केला. तो सुमारें सु॥ सन इहिदे सलासीन मया व अलफ सन १७२९ माघ मासीं जहाला. भिकाजी शामराज यांस सात पुत्र होते त्यांचीं नांवें:—मल्हार-राव, गणपतराव, आनंदराव, लक्ष्मणराव, गंगाधरराव, रामचंद्रराव, व जीवनराव; हे सात बंधु एका विचारें असून मराठी राज्यांत महाराजांचे पेशवे वगैरे सर्व सरदार मुत्सद्यांचे हाताखालीं मोठमोठाले हुद्यांवर होते. बाळाजी बाजीराव यास सु॥ सन इहिदे अरबैन मया व अलफ म्हणजे सन १७४० इसवी ते पेशव्याचीं वस्त्रें मिळालीं तेव्हांपासून पेशवे हे माळवा, व हिंदुस्थान व कर्नाटक प्रांतीं स्वाऱ्या करून मुलुख सोडवूं लागले त्यांत आमचे पूर्वज सदरीं लिहिले भाऊ मल्हारराव व आनंदराव वगैरे हे मुख्य पेशवे यांचे म्हेवणे म्हणजे गोपिकाबाई यांचे सख्खे बंधु होत. यांचा पेशवे यांस फार उपयोग जाहला. पेशवे यांची स्वारी कर्नाटक प्रांतीं सावनूरकर नबाब वगैरेयांजवर गेली. तेव्हांपासोन पेशवे यांचे स्वारीबरोबर रास्ते हे स्वारीत असोन त्यांचे हातून सरकारकामें मोठमोठालीं जाहलीं. तीं ऐकण्यांत आहेत तीं माहितीवरून खालीं लिहीत आहें:—

१ सब्बा सलासीन मया व अलफ सन १७३६।३७ इसवी सालीं हिंदुस्थानांत श्रीमंत बाजीराव साहेब गेले. त्याजबरोबर मल्हारराव भिकाजी होते. त्यांचे हातून माळवा प्रांत सरकारास जाहला.

१ सन सीत खमसेन मया व आलफ सन १७५५ इसवी सालीं कर्नाटक प्रांतीं बाळाजी बाजीराव यांची स्वारी गेली. त्याजबरोबर मल्हारराव भिकाजी वगैरे बंधू होते. यांनीं सावनूरकराबरोबर लढाई करून त्यास शिकस्त केला. त्यावेळेस नबाबानें पेशवे यासी शरण येऊन, त्यानें आपले एकंदर मुलुखांपैकी निम्मा मुलुख पेशवे यांस देऊन सदरसाली तह केला, व स्वारी खर्चही त्याजकडोन घेतला. नंतर पेशवे यांनीं सदरहू घेतलेल्या मुलखांत आपला विश्वासू सरदार पराक्रमी कोणी असल्यावांचून बस बसणार नाहीं, अंसें जाणोन, घेतलेल्या मुलुखांपैकीं बागलकोट वगैरे महाल मल्हारराव व आनंदराव यांजकडे मामलतीनें तेव्हांच दिला तो तालुका बाजीराव रघुनाथ पेशवे यांचा अम्मल सरेपावेतों होता.

१ या बागलकोट तालुक्यांतच जालीहाळकर देसाई मेचमवास असोन पेशवे यांस खंडणी देत होता. पुढें तो पेशवे यासी बिघडोन हैदर अल्लीशीं मिळाला. त्याचेंही पारिपत्य रास्ते यांनीं करून, अरबा सितैन मया व आलफ सन १७६३ सालीं सदरहू जालीहाळ संस्थान सरकारजमा करून, तो मुलुख बागलकोटाखालीं आपलेकडे कमाविसीनें ठेविला.

१ बदामी किल्ला बागलकोटानजीक मोठा असोन मोगलाईतून रुस्तुमखान किल्लेदार यांजकडे होता. बहुतेक कर्नाटक प्रांत सरकारांत आला असतां हा एकच किल्ला दुसऱ्याकडे असणें बाजवी नाहीं. असें पेशवे सरकारास वाटून तो किल्ला सर करण्याविषयीं मल्हारराव व आनंदराव यांना आज्ञा जाहल्यावरोन, त्यांनीं फौजेसहीत जाऊन किल्लेदार याजवरोवर लढाई करून, समान सितैन मया व आलफ म्हणजे सन १७६७ इसवी सालीं सदरहू किल्ला सर करून सरकारांत घेतला. तोही किल्ला व किल्लेखाली मुलुख पेशवे यांनीं, आनंदराव भिकाजी यांजकडे मामलतीनें बागलकोट तालुक्याखालीं वहिवाटीस दिला.

१ यानंतर एकदोन वर्षांनीं म्हणजे सन १७६९ इसवी सालीं या बागलकोट तालुक्यानजीक हानगुंद संस्थान रामरडी देसाई याजकडे वहिवाटीस असोन त्याजपासोन पेशवे दरसाल खंडणी घेत होते. तो पेशवे यासी बदलल्यावरोन त्याचेंही पारपत्य सरकार आज्ञेवरून आनंदराव भिकाजी रास्ते यांनीं लढाई करून सदरहु संस्थान खालसा केलें. आणि सरकार जमा केलें.

१ कर्नाटक प्रांतीं हैदर व टिपू यांचें प्राबल्य फार वाढत चाललें त्यांचे पारपत्यास सरकारी स्वारी जात होती; तेव्हांही स्वारीबरोबर रास्ते असोन बहुत मदत करून फौजेनसी लढाई करीत असत. टिपूनें बदामी किल्ला वगैरे मुलुख दाबला होता. त्याजवर स्वारी करून आनंदराव रास्ते व महादजी शिंदे व आबाजी बल्लाळ फडके वगैरे सरदार यांस पेशवे यांनीं पाठविल्यावर टिपूशीं लढाई करून त्यास अगदीं खालीं केला. तेव्हां तो शरण येऊन आनंदराव रास्ते यांचे विद्यमानें तह करून मुलुख परत देऊन स्वारीखर्च सुद्धां दिला. पुढें बदामी किल्ला टिपूनें लागलीच घेतला होता तोही शके १७०७ (सन १७८५ त) सीत समानीय मया व आलफ मध्यें बदामी किल्ला परत घेऊन खंडणीही घेतली. आणि सन १७८३ चा तह कायम करून घेतला.

१ याशिवाय ज्या ज्या समई मोठालीं कामें पेशवे यांस पडत गेलीं ते समई आनंदराव भिकाजी वगैरे बंधूनीं फौजेनिसी मदत देऊन कामें बजावीत असत.

येणेंप्रमाणें कामें काजें सरकारची मोठे महत्त्वाचीं केलीं तीं आमचे ऐकण्यांत व पदरचे लोकांचे माहितींत व पूर्वीचे कागदपत्रावरून कळल्यावरून सदरहू हकिकत नमूद केली आहे. याशिवाय आणखीही बहुत पराक्रम मल्हारराव व आनंदराव वगैरे बंधूंनीं केला आहे. ते मोठे पराक्रमी असोन त्यांस फौजेचे खर्चाबद्दल व जातीस खर्चावयास लागेल तो पैसा पेशवे आपले खजिन्यांतून देत असत. याप्रमाणें बाळाजी बाजीराव पेशवे यांचे अमलापर्यंत वहिवाट जाहाली.

१ बाजीराव बल्लाळ व त्यांचे पुत्र बाळाजी बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दीत म्हणजे इ. सन १७२५ पासोन सन १७६० पावेतों. मराठ्यांचें राज्य शतगुणीत वाढलें. त्यासमई ज्या ज्या सरदारांचा पेशव्यांस उपयोग जाहाला त्याजकडे प्रपंचाचे सोईस्तव त्याचे रहाण्याचे ठिकाणालगत थोडेसें गांव व खेडीं लावून दिल्हा असोन जातीचे मुशाहिऱ्या वा। मोठमोठ्या नेमणुका चालत होत्या. त्यांचा ऐवज पेशवे यांचे खजिन्यांतून किंवा त्यांजकडे जे महाल होते त्यांतून पावत असत. पुढें बाळाजी बाजीराव कैलासवासी जाहाले. त्यांचे वडीलपुत्र विश्वासराव पानपतचे लढाईत मारले गेले. यामुळें पेशवे यांचे गादीवर दुसरे पुत्र माधवराव बल्लाळ हे सन १७६१ इसवी सालीं बसले. त्यांजकडे अधिकार आल्यावर त्यांनीं आपले कारकीर्दीत एकंदर सरंजामदार लोकांस नक्त पैसा देणेची चाल बंद करून, नक्त पैशाऐवजीं महाल मुलुख लावून देणेची चाल सुरू केली. त्यावेळेस आमचे पूर्वज मल्हारराव, आनंदराव, लक्ष्मणराव वगैरे बंधू यांस जातीस व फौजेस खर्चाबद्दल सरंजामास मुलुख लावून दिल्हा तोः––

१०००००० फौज सरंजाम कर्नाटक प्रांतीं ९१६३३॥·॥; खानदेश प्रांतीं २९८३६९।≡॥·

४५९०० जात सरंजाम पुणें व नगर प्रांतीं वगैरे गांवाकडील दिले ते.

५२०० सदाशिव शामराज यांचे नांवें छत्रपतीनीं सरंजाम दिला होता. तो ते वारल्यावर जीवनराव भिकाजी रास्ते यांजकडे पेशवे यांनीं नेमून दिला.

२५००० गंगाधरराव भिकाजी रास्ते यांचे नांवें सरंजाम.

१०००० रामचंद्रराव भिकाजी रास्ते यांजकडे सरंजाम.

५३५० रामचंद्रराव आप्पा साठे हे आनंदराव भिकाजी यांचे कन्येचे पुत्र यांचे नांवें सरंजाम दिला तो.

१९३२५० गणपतराव भिकाजी रास्ते यांस जात सरंजाम व फौज सरंजाम. गुजराथ प्रांतीं पेटा परगणे बहादरपूर व कर्नाटक प्रांतीं

होनगुद निराळा करून दिला तो ७०० स्वाराबद्दल सुमासन इहिदे सबैन सालीं दिला.
१५५५८॥· किता गांव किल्ला पांडवगड वगैरे.
५००० हात्तीचे नेमणुकीबद्दल.

१३०५२५८॥·

येणेंप्रमाणें सरंजाम महाल मुकुख लावून दिल्हे ते पेशवाई अखेर चालत होते.

१ सदरहु सरंजामाबद्दल प्रथम मल्हारराव भिकाजी रास्ते वडील सबब त्यांचे नांवें सन सलाफ सितैन सालीं तैनातीचे ऐवजीं गांव लावून दिल्हे. ते लौकरच मयत जाहले, त्यांस संतती नव्हती. त्यांचा जावता सन तिसा सितैन म्हणजे सन १७६९ इसवी सालीं आनंदराव भिकाजी रास्ते यांचे नांवें जाहाला. कारण दुसरे बंधू गणपतराव भिकाजी रास्ते हे वेगळे सारखे असोन त्यांजला निराळा सरंजाम पेशवे सरकारांनीं करून दिल्हा.

१ आनंदराव भिकाजी यांस एक पुत्र महिपतरावबाबा होते. ते अठरावे वर्षी मयत जाहाले. सबब गणपतराव भिकाजी यांचे दुसरे पुत्र माधवराव याजला पेशवे सरकारचे आज्ञेनें शके १७१६ आषाढ शु॥ १२ (सन १७९४ इसवीत) रोजीं आनंदराव भिकाजी यांनीं दत्तक घेतलें. आनंदराव सन १७९९ सालीं मयत जाहाले. नंतर सरदारीचीं वस्त्रें माधवराव आनंद यांचे नांवें जाहालीं. व सरंजामाचा तैनात जावता सदरहुप्रमाणें सर्व त्यांचे नांवें जाहला. ते पेशवाईअखेर होते.

१ चौथे बंधू लक्ष्मणराव भिकाजी हेही टिपू सुलतान यांजकडे पेशवे यांचे दरम्यान वकीलीस होते. त्यांजला पुत्र नव्हता. सबब त्यांनीं भाऊबंदाखेरीज स्वगोत्रापैकीं शामराव याजला पेशवे सरकारचे परवानगीनें दत्तक घेतलें. ते इंग्रजी अम्मलांत सन १८२२ सालांत मयत जाहले. त्यांला एक औरस पुत्र लक्ष्मणराव होते. यानां एक शामराव म्हणून पुत्र होते. शामराव यास वंश नसल्यामुळें पागे (उपनांवा) पैकीं दत्तक घेतला. त्याचें नांव लक्ष्मण शामराव आहे. त्याजला हल्लीं नेमणूक आमचे सरंजामांतून सरकार हुकुमानें सालीना ५०० रुपये पावत आहेत. " हल्लींचे रावसाहेब रास्ते यांनीं माहागाईमुळें यांना ७२० रुपये देत आहेत. यांचें घर सदाशिव पेठेंत आहे. "

१ गंगाधरराव भिकाजी पांचवे बंधू हे नेहमीं अनंतपूर किल्लयांत फौज [सह] कर्नाटकाचे बंदोबस्ताकरितां रहात असत. पुढें गोपिकाबाईसाहेब नाशि-

कास रहाण्यास गेल्या. तेव्हां त्यांजपाशीं त्यांच्या बंदोबस्ताकरितां रहात असत. त्यांस पुत्र व्यंकटराव व विश्वासराव असे होते. त्यांजकडे पेशवे सरकारांतून नेमणुका चालत होत्या.

१ सहावे बंधू रामचंद्रराव यांस संतान जाहलें नाहीं. सातवे जीवनराव यांस अमृतराव पुत्र होते ते पेशवाईतच मयत जाहले.

आनंदराव भिकाजी वगैरे बंधूनीं देशहिताचीं व धर्मकृत्याचीं माठेमोठालीं कामें केलीं त्याचा तपशीलः—

१ वांई येथें श्रीमहाविष्णु, लक्ष्मी, गणपति, काशीविश्वेश्वर व गंगारामेश्वर व पंचायतन येणेंप्रमाणें देवालयें व कृष्णानदीस घांट बांधिले. व धर्मपुरीची पेठ नवी वसवून बावन घरें नवीन बांधून ब्राम्हणांस घर्मादाय दिलीं. व त्यांजला वर्षासनें करून दिलीं व गंगापुरींत ब्राह्मणांस घरें बांधण्यास कांहीं पैसा दिला. याप्रमाणें एकंदर धर्मकृत्यास खर्च अदमासें २५ लक्ष रुपये जाहला. त्याजबद्दल मेहेरबान फ्रेअरसाहेब माजी गव्हरनर हे सातार्‍यास कमिशनर होते, त्यांनीं सदरहु इष्टेटीचे खर्चाचा अजमास १७ लक्ष रुपये केला होता.

१ ब्राह्मण लोकांकरितां व रस्त्याचे सुखाकरितां आंब्यांचीं झाडें बोपर्डीचे जाणेचे दोन मार्ग व सोनजाईचे मार्गास लाविलीं. त्यांचीं फळें धर्मार्थ ब्राह्मणलोकांनीं घ्यावीं असें केलें. व वांई गांवासभोंवतालीं कुसुं बांधिलें. व खांबटकीचा पाट दगडी बांधून काढिला होता. व त्या वाटेनें लोकांचे उपयोगांकरितां पाणी पिण्यास विहिरी बांधिल्या आहेत. व किरकोळ देऊळें रहदारीचे लोकांकरितां बांधिलीं आहेत.

१ बागलकोट, बदामी, अथणी, जालतवाड, कोकटनूर वगैरे महाल रास्ते यांजकडे होते. तेथें हजारों ब्राह्मणांस धर्मादाय जमीनी करून दिल्या. त्या सर्व चालविणेविषयीं माधवराव आनंदराव रास्ते यांनीं बाजीराव रघुनाथ पेशवे यांस विनंती करून पेशवे यांचे हिशेबीं खर्च घालून सर्व चालू ठेविल्या. त्या अद्यापपावेतों इंग्रज सरकारांनीं बहुतेक चालू ठेविल्या आहेत.

१ पुणें येथें मोठा वाडा बांधोन स्वतंत्र रास्त्याची पेठ शके १७०० (सन १७७८ त) मध्यें वसवून श्री लक्ष्मणेश्वराचें देवालय बांधोन सदरहु पेठेचें उत्पन्न १२०० रुपये देवाचे खर्चाकडे नेमून दिल्हें होतें. व पाण्याचा नळ बांधून आणिला. तो पुण्यापासून तीन कोसावर कोंढवें म्हणून गांव आहे तेथून बांधून आणिला. त्या एकंदर कृत्यास ९ लक्ष रुपये खर्च जाहला आहे.

१ अनंतपूर येथें मोठा किल्ला बांधिला त्यास एक लाख रुपये खर्च जाहला आहे.

१ नाशिक येथें मोठा वाडा व देवालयें पुष्कळ खर्चानें बांधिलीं आहेत. तसेंच पंढरपूर व अथणी वगैरे ठिकाणीं वाडे बांधिले आहेत.

येणेंप्रमाणें धर्मकृत्यें व लोकोपयोगीं कृत्यें व खासगत इमारती एकंदर तीस चाळीस लक्ष रुपयांच्या अदमासाचीं कृत्यें केलीं आहेत.

माधवराव आनंद [अनंत] रास्ते, हे पेशवे यांनीं खर्ड्याची स्वारी मोगलावर केली त्या लढाईत होते. व चतुरसिंगाचा दंगा सातारा व वांई प्रांतीं जाहला त्याचा बंदोबस्त पेशवे यांचे हुकुमावरून लढाई करून केला. तारगांवचे लढाईतही त्यास यश आलें.

बाजीराव रघुनाथ पेशवे यांनीं परशरामभाऊ पटवर्धन कैदेंतून पळाले त्याजला माधवराव रास्ते हे अनुकूल आहेत, अशा संशयामुळें त्यांजला पुत्रसहित शके १७२२ (सन १८०० त) चैत्र वा॥ २ रोजीं अटकेंत टाकिलें. व थोडे दिवसांतच निरपराधी आहेत अशी खात्री जाहल्यावर बाजीरावसाहेब यांनीं रायगड मुक्कामीं येऊन शके १७२४ (१८०२ त) सालीं कैदेंतून मुक्तता करून, सर्व सरंजाम वगैरे जप्त केला होता तो परत दिला. व त्याजबद्दल परवानगी यादी सन सलास मयातैन व अलफ (सन १८०३) सालीं कार्तिकमासची जाहली आहे. रायगड मुक्कामीं बाजीरावसाहेब गेले तेव्हां त्यांनीं हाली आमचेवर होळकर यांनीं पुणें घेऊन दंगा केला आहे. हा मोठा प्रसंग आला आहे. त्यास उपाय काय करावा म्हणून माधवराव रास्ते यांस सला विचारिला त्यावेळेस त्यांनीं कंपनीसरकारची दोस्ती करावी त्याखेरीज इलाज नाहीं म्हणोन सांगितलें. त्याप्रमाणें बाजीरावसाहेब यांनीं लागलींच वसईचा तह कंपनी सरकाराबरोबर केला.

माधवराव रास्ते पुत्रासह अटकेंत असतां, त्यांचे वडीलपुत्र बाळासाहेब होते ते कैदेंतून निघोन शके १७२४ (सन १८०२ त) श्रावणमासीं निरा नदीस मोठा पूर आला असतां, रात्रौ त्या पुरांत मोठे धैर्यानें घोडी घालून पोहून पलीकडे जाऊन पांडवगढ किल्ला त्यांजकडे होता तेथें जाऊन, पुढें लागलींच कर्नाटक प्रांतीं बागलकोटास जाऊन २५००० फौज जमा करून अकलकोटचें राज्य व जरीपटक्याचा हत्ती आसाहेब नौबत वगैरे घेतली आणि आजूबाजूचा मुलूख घेऊन तिकडे स्वतंत्र राहिले.

सन १८११।१२ चे सुमारास पटवर्धन घराण्यांतील सरदार यांनीं कंपनीसरकारशीं लेह ठेवून त्याची बहादुरी संपादिली. तसेंच रास्ते यांचा व कंपनीसरकारचा स्नेहभाव आहे तेही असेच करतील असे बाजीरावसाहेब यांनीं मनांत आणून फौजेची जरूर नाहीं असें बाह्यातकारीं दाखवून रास्ते यांचा जातसरजाम कायम ठेवून दरोबस्त फौज सरंजामाची जप्ती सन १८१४ सालीं विनाकारण केली. ही गोष्ट नेक नामदार आलफिस्टनसाहेब त्यावेळीं पुण्यास रेसिडेंट होते त्यांजला माहीत

होती त्यांनीं थोडेच दिवसांत कंपनीसरकार व पेशवेसरकार यांचे दोस्तीबद्दल सन १८१७ सालीं तहनामा केला. त्यावेळीं आलफिस्टनसाहेब यांनीं माधवराव रास्ते यांचें नुकसान कंपनीसरकारचे दोस्तीखातर जाहलें असें मनांत आणून सदरहु तहनामा होण्याचे समईं बाजीरावसाहेब यांजकडून सर्व फौज सरंजामाची मोकळीक करविली त्याचा दाखला सन १८१७ सालच्या तहनाम्याचे सोळावें कलमांत आहे.

पुढें सन १८१८ सालीं बाजीरावसाहेब यांनीं इंग्रज सरकाराशीं लढाई केली त्या समईं आलफिस्टनसाहेब यांनीं माधवराव रास्ते यांस बाजीरावसाहेबाचा पक्ष सोडून देऊन कंपनीसरकारास मदत करावी म्हणून सांगितलें व पत्रें पाठविलीं. परंतु फौजसरंजाम सन १८१७ पावेतों जप्त होता त्यामुळें स्वार शिबंदी वगैरे फौजेची तयारी नाहीं मुळें इलाज नाहीं म्हणून आलफिस्टनसाहेबास हकिगत कळविली. आणि बाजीरावसाहेब यांजकडे आम्ही अटकेंत असतां जसे रायगड मुक्कामीं कंपनीसरकाराशीं दोस्ती करण्याविषयीं सला दिला होता तसाच घुन्हां उभयतांचा सला होण्याविषयीं माझे हातून प्रसंगोपात होईल तितकी मदत मी करीन येणेंकरून माझेविषयीं कंपनीसरकारची जास्ती खात्री होईल. बाजीराव साहेब यांजबरोबर न जातां घरीं बसून राहिल्यास कंपनीसरकारास उपयोग होईल असें नाहीं व्यर्थ बाजीरावसाहेब यांचा दोष मात्र मजवर येईल. याजप्रमाणें आलफिस्टनसाहेबास सांगून बाजीरावसाहेब यांजबरोबर गेले व त्याप्रों बाजीरावसाहेब यांस कंपनीसरकाराशीं दोस्ती करण्याविषीं सला देण्याचा यत्न केला. परंतु बाजीरावसाहेब यांनीं रास्ते (कंपनी) सरकारचे तर्फेचे आहेत असें त्यांस वाटत असल्यामुळें तो यत्न सिद्धीस गेला नाहीं. परंतु बाजीरावसाहेब यांचे धाकटे बंधू चिमाजी आप्पा यांस माधवराव रास्ते यांनीं मसलत देऊन कंपनी सरकाराशीं सला करावा अशी तजवीज केली; व ती सिद्धीसही गेली. ही गोष्ट आलफिस्टनसाहेबास माहित होती. व त्याबद्दल त्याचे दप्तरीं लेखही असावा. इंग्रजी अम्मल जाहला, तेव्हां माधवराव रास्ते हे कायम असोन त्यांकडे इंग्रज सरकारनीं जातसरंजाम पै॥ जे गांव चालत होते; तितके रुपये ३९२९२-॥।-। चालू करून त्यावर फौजसरंजाम पै॥ वीस हजारांचा सरंजाम जास्ती दिला. एकूण ६०००० हजार रुपयांचा सरंजाम चालू ठेवून सर्व फौजसरंजाम जप्त केला. माधवराव हे सन १८२६ इसवीपर्यंत हयात असून तेच सालीं श्रावण शु॥ ५ शके १७४८ त कैलासवासी जाहले.

माधवराव यांस पुत्र तीन; बळवंतराव, गंगाधरराव आणि येशवंतराव पै॥ बळवंतराव यांचे नांवें साठ हजारांचा सरंजाम बसून कंपनीसरकारनें चालविला. बाळासाहेब यांनीं सरकारचे बरोबर बहुत लीनता ठेविली होती. दक्षिणेंतील दुसरे सरदारांपेक्षां फार मुदावत ठेविली होती. मेहेरबान मालकम याची प्रतिष्ठा

विशेष सरकारांनीं ठेविली होती. सन १८३४ चे सर [कार दसरी] दाखला आहे. अनंतपूर इनामगांव होतें. तें सरंजामांत लागलें सबब त्याचे बदला मेहेरबानी करून तीन हजार रुपयांचा गांव मौजे परिंचे ता. पुरंदर जि॥ घुर्णे हा गांव सन १८३० सालीं नवीन दिला. त्याजबरोबर मालकमसाहेब यांचें पत्र ता. ३ डिसेंबर सन १८३० इसवीचें आलें आहे. त्यांत असें लिहिलें आहे कीं. "आमेहेरबान लायख आहेत. व सरकारास हमेशा मदत देत आहेत. याजकरितां सरकारांनीं मेहेरबानगी करून तीन हजार रुपयांचा गांव इनाम देणेचा हुकूम केला आहे " असें लिहिलें आहे.

बाळासाहेब सन १८५१ ता. २६ जून इसवी रोजीं पंढरपूर मुक्कामीं मयत जाहले. त्यांजला पुत्र नाहीं. त्यांचे दुसरे बंधू गंगाधरराव सन १८४९ मध्यें पूर्वीच मयत जाहले होते. यांचे पुत्र खंडेराव यांजला दत्तक घेऊन सरंजाम चालवावा म्हणोन मरणसमयीं मेहेरबान एजंटसाहेब प्रांत दक्षण याजकडे थैली पत्र लिहिलें. त्याप्रों त्यांनीं सरकारास शिफारस केली, परंतु सरकारांनीं खंडेराव यांजकडेच वंशपरंपरा सरंजाम चालविण्याचा ठराव केला. तो असा कीं, एकंदर सरंजाम रुपये साठ हजारांचा पै॥ फौजसरंजाम वीस हजारांचा वजा करून बाकी चाळीसहजारांचा जातसरंजाम पै॥ निम्मे सरंजाम खालसा करून, सरंजाम वीस हजारांचा वंशपरंपरा चालत आहे. म्हणून कोर्ट ऑफ डायरेक्टर याचा हुकूम जाहला. त्याजबद्दल एजंटसाहेब यांचें पत्र नंबर ६५५ ता. १ आक्टोबर सन १८५२ इसवीचें आलें आहे.

खंडेराव गंगाधर हे आमचे भ्रतार यांनीं सन १८५७ सालीं सरकारची फौज बंदावर गेली तेव्हां आमचा सरंजामी गांव ताळिकोट येथें फौजेचा मुक्काम जाहला. त्यावेळेस कर्नल मालकम मोर व कारसाहेब होते. त्यांची भेट खंडेराव यांणीं घेऊन, साहेब यांणीं सांगितल्याप्रमाणें लष्करचे लोकांचा खाण्यापिण्याचा वगैरे बंदोबस्त ठेवून अधिकारी साहेब यास शक्तीप्रमाणें जी मदत देवविली ती दिली आणि सुरापुराचा रस्ता दाखविणेस इकडील स्वार देऊन, फौज सुरापुरास पोचती केली. परत येतांना आमचे स्वाराचा घोडा बंडवाल्यांनीं मौजे काडकोळ इलाखा सुरापूर येथून त्याच सर्व सामानासुद्धां लुटून नेला. त्याजबद्दल शंभर रुपये सरकार आम्हास देत होतें. परंतु रुपये घेतले नाहींत. सन १८६० इसवी आंगष्ट महिन्यांत सोलापूर मुक्काम मे. क्लार्कसाहेब गव्हर्नर यांणीं दरबार केला. त्या दरबारास खंडेराव साहेब यांचा मुदारत चांगली प्रों ठेवून गव्हर्नरसाहेब यांनीं स्वतः असें सांगितलें कीं, बंडाचे समई तुम्हीं सरकारास मदत केली व तुमचें घराणें मोठें खानदानीचें असोन, तुम्हाकडे सरंजाम फार थोडा चालू जाहला. तुमचा गुजारा होऊं शकत नाहीं हें आमचे लक्षांत आहे. याबद्दल तुम्हीं घुर्णे मुक्कामीं येऊन भेटावें, म्हणजे तुमचा बंदोबस्त करूं. कांहीं सरंजाम देऊं अशी इच्छा

दर्शविली. परंतु दुर्दैवानें त्या सालांत म्हणजे इ० स० १८६० सालीं नोव्हेंबर महिन्याचे २९ तारखेस खंडेरावसाहेब वारले. यांणीं मरण समयीं आपल्यास दत्तक मिळावा म्हणून मे. येजंट साहेब यांस थैली पाठविली. त्याजरून सरकार मेहेरबान होऊन आम्हांस दत्तक घेणेविषयीं हुकूम दिला.

त्याप्रों आम्हीं गंगाधररावनानासाहेब यांस सन १८६२ सालीं दत्तक घेतला. त्याप्रों त्याजकडे एक सालीं नजराणा घेऊन वंशपरंपरा सरंजाम चालविण्याचा हुकूम जाहला. गंगाधरराव हे सन १८६६ सालीं वारटल फ्रिअर गव्हनर साहेब यांणीं पुण्यास मोठा दरबार केला त्या दरबारास मिरजेहून पुण्यास येत असतां वाटेंत मौजे पारगांव इलाखा पंतसचीव येथें ता. २४ आकटोबर सन १८६६ इसवी रोजीं मरीचे आजारानें हाक जाहले.

नंतर दुसरा दत्तक घेणेविषयीं मे. फेरसाहेब यांणीं लागलीच हुकूम दिला, परंतु येशवंतराव माधव म्हणजे चुलत सासरे यांची तिसरी स्त्री सरस्वतीबाई यांणीं विगर अधिकारानें व बिनपरवानगीनें माधवराव यांस दत्तक घेतलें. त्याचें तक्रारी वरून काम सुरू होऊन शेवटीं सरंजामावर त्याचा हक्क नाहीं, आमचा हक्क आहे असें ठरून सदर माधवराव यांचा वडील मुलगा आम्हीं दत्तक घ्यावा म्हणोन सरकारचा ठराव ता० ६ नोव्हेंबर सन १८७१ इसवीचा जाहला. त्याप्रमाणें त्याचें दत्तक विधान आम्हीं सन १८७३ इसवी आगष्ट महिन्यांत केलें. त्याचें नांव आनंदराव बाळासाहेब असें ठेविलें. त्याचें वय वारा वर्षांचें आहे. हल्लीं त्याचें नांवें सरंजाम चालत आहे. नजराणा वगैरे घेऊं नये म्हणोन सरकारानें मेहेरबानी केली आहे. ते अज्ञान असल्यामुळें त्यांचें पालण करण्याचें व इस्टंटीचें वहिवाटीचे सर्टिफिकीट सन १८६४ चा आक्ट २० प्रों आम्हांस मिळालें आहे.

इंग्रजी आमल जाहला तेव्हां माधवराव आनंद यांचे नांवें सरंजाम चालू जाहला. आणि त्यांचें नांव सरदारांचें पटांत पहिले क्लासांत दाखल केलें. आणि बाकी आमचे कुटुंबांतील पुरुषांचीं नांवें सेकंड क्लासांत सरकारांनीं दाखल केलीं. पुढें माधवराव आनंद हाक झाल्यावर त्यांचे वडील पुत्र बळवंतराव माधव यांचें नांव वडिलांचे ठिकाणीं पहिले वर्गांत घालण्याविषयीं सरकारचा हुकूम नंबर २२५ चा ता. १२ फेब्रुवारी सन १८२९ रोजीं जाहला. आमचे भ्रतार खंडेराव गंगाधर यांचें नांव दुसरे प्रतींत काळे शाईत घालणेबद्दल सरकारांनीं कबूल केलेचें पत्र नंबर १२१५ ता. १० आकटोबर सन १८५१ सालचें आलें. त्यांचे दत्तक पुत्र गंगाधरराव नानासाहेब अज्ञान होते तरी त्यांचें वडिलांचे ठिकाणीं सेकंड क्लासांत त्यांचें नांव सरकारांनीं घातलें. त्याबद्दल सरकारचा ठराव ता. १ जून १८६३ इसवीचा जाहल्यायद्दल येजंटसाहेब यांचें पत्र नंबर ६६ ता. १८ मार्च १८६३ इसवीचें आलें आहे. हाली आमचे दत्तक

पुत्र आनंदराव हे अज्ञान आहेत. आजवर त्यांचें नांव अद्यापर्यंत पटांत दाखल जाहलें नाहीं.

आमचें नांव सरदारांचे पटांत सन १८६८ सालीं सरकारांनीं काळेशाईत दाखल केलें आहे त्याजबद्दल पत्र आल्याचें आढळांत येत नाहीं. आमचें नांव दाखल केलें तें घराण्याचे चालीप्रों वंशपरंपरा नांव दाखल करणेंचें चालत आलें आहे; त्याप्रों पुढेंही सरकार मेहेरबान होऊन चालू ठेवतील अशी आशा आहे.

आमचे घराण्यास मानपान पाहिले वर्गाचा सरकारांतून मिळत आला. बाळासाहेबांचा मानपान सरकार ठेवीत होतें. माधवराव आनंद यांजकडे दिवाणी फौजदारी वगैरे अधिकार पेशवेप्रों चालत होता. पुढें बळवंतराव माधव यांजकडेही कांहीं दिवस तसाच चालत होता. या मुलखास कायदा लागू जाहला तेव्हां सन १८३० चा कायदा ५ प्रों दिवाणीचे पूर्ण अधिकाराचे सनद सरकारांनीं दिली होती. फौजदारी अधिकाराची सनद सन १८२७चा कायदा १५ प्रों कारभारी याचे नांवें तालिकोट प्रांतींचें गांवची दिली होती. व पुणें प्रांतींचीही होती. मुलकी कामाच्या पूर्ण अधिकाराची सनद सन १८४२ चा कायदा ८ प्रों बाळासाहेब यांचे नांवें होती. पुढें खंडेरावसाहेब यांस दिवाणी सनद देणेंकरितां तयार सन १८६० सालीं जाहली होती. परंतु त्याच सालीं ते मयत जाहले असतां रहित जाहली. हाल्लीं त्याप्रों कांहीं अधिकार मुलगा अज्ञान असल्यामुळें हल्लीं चालत नाहींत. इनाम गांव व सरंजाम गांव यांचें उत्पन्न इकडे चालत असले बद्दल नमुन्याप्रों तक्ता पाठाविला आहे.

आमचे भ्रतार खंडेराव व चुलत सासरे येशवंतराव यांनीं इनाम कमिशनर खात्याकडे पेशवे कारकीर्दीतील आमचे ताब्यांतील कर्नाटक प्रांताचीं हिशोबाचीं दप्तरें त्यांचे मागणीवरोन बिनतक्रार दिल्हीं. त्यापासून सरकारचा पुष्कळ फायदा जाहला. त्याजबद्दल मेहेरबान हार्टसाहेब व कोपरसाहेब यांनीं सरकारास शिफारस केली रास्त्यांस त्यांचा जातसरंजाम चाळीस हजारांचा आहे. तो त्यांजकडे चालवावा. परंतु त्याबद्दल सरकारांनीं नवीन परिंचें गांव सन १८३० सालांत दिला होता. त्याचे मोबदला तीन हजार रुपये दरसाल पेनशन येशवंतराव माधव रास्ते यांचे नांवें करून दिल्हें. येशवंतराव सन १८६० इसवी सालांत मयत जाहले. त्यांची स्त्री सरस्वतीबाई यांकडे एक हजार रुपये चालू ठेविले आहेत.

इंग्रजी अम्मल जाहल्यावेळीं पुणें येथील आमचे थोरले वाड्यांत सरकारची फौज जामदारखाना तोफखाना वगैरे सुमारें एक वर्षभर राहिला होता. तेव्हां आमचे दौलतीचे कागदपत्राची आफरातफर जाहली. याबद्दल एजंट दप्तरीं दाखला आहे. सदरहू मेहेरबान आलफिस्टनसाहेबांनीं परत दिल्हा; त्याची दुरस्ती शुद्ध करण्यास पांचहजार रुपये सुमारें खर्च लागला आहे.

सरकारची फौज वानवडीवर राहिली तेथें आमचा पाण्याचा नंबर आहे. त्या नंबराचे पाणी सरकारांनीं फौजेत जागजागीं घेतलें त्याजबद्दल सरकार आमचे पूर्वजांस लाख रुपये देत होतें; परंतु सरकारचे दोस्तीबद्दल घेतले नाहींत. साठ वर्षे पाणी सतत सरकारानीं घेतलें त्याजमुळें आमचे कुटुंबास, आमचे व पेठेतील लोकांस पाण्याचें फार दुःख सोसावें लागलें आहे व दरसाल त्या पाण्यापासून होणारे पिकाचें नुकसान एक हजार रुपये दरसालप्रमाणें साठ वर्षे होत आलें आहे. याप्रमाणें आजपर्यंत आमचे घराण्यांतील मनुष्यांनीं सरकारची मर्जी संपादन करणेकरितां श्रम घेतले आहेत.

येणेप्रमाणें हकीकत जाहीर केली आहे; मेहेरबानांस कळावे. ता. २५ जून सन १८८३ इसवी. उमाबाई रास्ते.

उमाबाईसाहेब रास्ते यांनीं आपल्या कैफियतींत आपल्या घराण्याची माहिती विशेष परिश्रम करून आवलपासून ते अखेरपर्यंत चांगल्याप्रकारें दिली आहे. बळवंतराव माधवराव यांच्या कैफियतींत मुख्य महत्त्वाचा मुद्दा 'रसदे' (बादशहाची रसद पोंचविणारे) याविषयीं माहिती दिली आहे येवढाच. उमाबाईनीं आपल्या कैफियतींत " भिकाजी शामजी व सदाशिव शामजी या बंधूंनीं सातारा येथें रास्त व्यापार केला म्हणून रास्ते म्हणूं लागले " असें म्हणून, त्याच्या खरेपणाकरितां म्यॉटडफच्या इतिहासाकडे बोट दाखविलें आहे. म्यॉटडफ म्हणजे बाटेल तें लिहीत सुटलेला एक इसम होता. त्याच्या इतिहासांत शेंकडों चुका आढळतात. त्यांपैकींच वरील चूक आहे. तसेंच शाळाखात्यांत चालू असलेल्या क्रमिक पुस्तकांतही रास्ते यांची व्युत्पत्ति चुकीची छापिली आहे.

गोखले हें आडनांव सातशें वर्षांपूर्वी किती अनादी आहे हें कांहीं समजत नाहीं. मात्र सातशें वर्षांपासून गोखले उपनांव जें चालत आलें आहे त्यांत मात्र बरेच भेद उत्पन्न झाले आहेत. यांत, कांहीं भेदांचा अर्थ समजतो व कांहीं भेदांचा अर्थ समजत नाहीं. गोखले यांना चालूं असलेलीं विशेषणें हल्लीं कोंकणांत चालू आहेत, तीं येणेप्रमाणें:—माहाजन अथवा माहाजनी, चौगुले, खोत, कुलकर्णी, बरी, कोल्हे, वेहेळकर, नाईक, रास्ते, चोळकर, भुते, सुभेदार, पालकर, पारकर, कोनकर, जामदार व बडे. यांपैकीं रास्ते, बडे, पालकर, यांशिवाय बाकींचे सर्व प्रथम विशेषण म्हणून मग गोखले असें म्हणतात. जसें—कोनकर गोखले, भुते गोखले, सुभेदार गोखले, कोल्हे गोखले व बरी गोखले वगैरे. यांत रास्ते, बडे व पालकर या उपनांवांचे घराण्यांस गोखले म्हणतात हें पुष्कळांना माहीत नाहीं. याचें कारण विशेषणालाच त्यांनीं आडनांव करून टाकिलें. रास्ते यांची माहिती मागें आलीच आहे. पालकर यांपैकीं कोणी साताऱ्यानजीक पालीचे जत्रेला गेला होता. तो परत गांवीं आल्यावर त्याला प्रत्येकजण 'या पालीकर' ! ! असें म्हणूं लागला; त्यामुळें पुढें गोखले न म्हणतां पालकर असें

म्हणवूं लागले. हे पालकर दोनतीन ठिकाणींच आहेत. तें पुढें येईलच. तसेंच बडे उपनांवापैकीं फक्त इंदोर व सोलापूर येथें आहेत, परंतु गोखल्यांचेऐवजी बडे कसें म्हणूं लागले तें कांहीं समजत नाहीं.

रास्ते हे मूळचे गोखले; यांना माहाजन गोखले, रसदे गोखले, नाईक गोखले नंतर हल्लीं चालू रास्ते–गोखलेच कायम राहिलें. रास्ते यांची राहिलेली माहिती पुढीलप्रमाणेः—

इ. स. १७६३ त कर्नाटक प्रांतीं जी स्वारी जाहली त्या स्वारींतील मिळविलेला मुलूख व किल्ले आणि त्या खालील प्रांत पेशव्यांनीं रास्ते बंधूंच्या स्वाधीन केला. आणि अम्मल सर्वत्र चालावा म्हणून आज्ञा केली. कर्नाटकांतील अम्मल न मानणारे देसाई, लिंगायत, वीरशैव वगैरे आडदांड लोकांना जबर तंबी देऊन व शासन करून पेशवाई अम्मल कर्नाटक प्रांतीं बसाविला. मल्हारराव व आनंदराव या द्वयबंधूंनीं कर्नाटक प्रांतीं जो अम्मल बसाविला तो लष्करी कायदा सुरू करून बसविला. या प्रांतांत जाळपोळ व कडक शिक्षा जेव्हां सुरूं केली, तेव्हां पेशव्यांचा अम्मल मानूं लागले. अद्यापि असें ऐकिवांत येतें कीं, " रास्ते आले " असें म्हटलें कीं लोक भितात. मल्हारराव रास्ते मोठा धाडसी व शूर पुरुष होता. इ स. १७६३ सालीं यांचे नांवें तैनात जाबता जाहला. मल्हारराव सन १७६५ त वारल्यावर सदरहु तैनात जाबता इ. स. १७६९ सालीं आनंदराव रास्ते यांच्या नांवें जाहला. आनंदराव मोठा कर्तृत्ववान होऊन गेला. यानें आपल्या घराण्याची व आपली कीर्ती अजरामर " यावत् चंद्र दिवाकरौ" करून गेला. आनंदराव मोठा दानशूर आणि धर्मनिष्ठ होता. यानें श्रीक्षेत्र वांई येथें मोठमोठालीं देवालयें, घांट, वाडे बांधून नवीन पेठ वसाविली. वांई येथील ब्राह्मणशाही आळीचा उत्तरभाग व पश्चिमभागची वस्ती, अनुक्रमें, आदितवारपेठ, धर्मपुरी, गणपती आळी, मधली आळी, आणि गंगापुरी वगैरे वस्ती वाढवून वांई हा गांव शोभिवंत केला. वांई येथें मोतीबाग व या बागेंतील मोतीमहाल बांधिला. देवालयांची सर्व कायमची व्यवस्था, श्रीमंतांकडोन देवास इनाम गांवें घेऊन कायम केली.

आनंदरावांनीं धर्मपुरी " पेठ, घरें व देवालयें बांधण्याकरितां " जी जागा खरेदी घेतली, त्या खरेदी पत्राचा सारांश—" शके १६९३ आषाढ शु॥ द्वितीया (सन १७७१) ते दिवशीं आनंदराव भिकाजी रास्ते यांसी, खरेदी पत्र लिहून देणार शाहासुलहसन, शाहामीरशहा, काशीमशहा, अहंमदशहा, लालशहा व हजरतशहा वलद दाऊदशहा काजी प्रांत वांई व कुडाळ आम्ही कर्जबाम बहुत जाहलें तें फेडण्याकरितां, आमचा शक्करबिबीचा बाग घेऊन कर्जमुक्त करावें, असें निवेदन केलें. तें तुम्ही मान्य केलें बाग बिघे १५ यासी चतुःसिमा—पूर्वेस शहर वांई, पश्चिमेस सत्यनाथपुरी, उत्तरेस बाग खतिपा, व

दक्षिणेस रस्ता व शिनगारवेश कबर शक्करबिबी येणेप्रमाणें; आमचे वडिलांचें कबरस्थान वजा करून बाकी जमीन आंबराई मुद्दां रु. ५००० घेऊन खुष खरेदी दिली असे."

आनंदराव यांनी काजी यांचेकडून पंधरा बिघे जमीन खरेदी घेऊन, श्रीमहाविष्णु, श्रीमहालक्ष्मी अशी देवालयें बांधून, आणि ४८ घरें बांधून ब्राह्मणांस दान दिलीं. आणि या जागेस पेठ धर्मपुरी असें नांव ठेविलें. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनी धर्मपुरींतील देव ब्राह्मणांस सनद करून दिली त्याचा उतारा:—

" वे. शा. सं. रा. समस्त ब्राह्मण वास्तव्य धर्मपुरी क्षेत्र कसबे वांई संमत हवेली प्रांत मजकूर स्वामी गोसावी यांसी:—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा तिस्सा सबैन मया व आलफ शके १७०० विलंबीनाम संवत्सरे राजश्री आनंदराव भिकाजी उपनांव गोखले गोत्र काश्यप सूत्र हिरण्यकेशी वास्तव्य कसबे मजकूर येथें कृष्णातिरीं प्रांत मजकूरची काजीची इनाम जमीन होती ती त्याजपासोन खुष खरेदी करून घेतली. आणि तेथें देवालय बांधोन श्रीविष्णूची स्थापना केली व ब्राह्मणांस घरें बांधून देऊन नवीन धर्मपुरी केली आहे. त्यांत स्वामींनीं कृपाळु होऊन श्रीची पूजा, नैवेद्य, नंदादीप उत्साह व ब्राह्मणांस कुटुंबाचे योगक्षेमार्थ एक गांव सरकारांतून नूतन इनाम करार करून देऊन चालविला पाहिजे. म्हणोन. त्याजवरोन मनास आणितां श्रीची पूजा, नैवेद्य व तुम्ही ज्ञानसंध्येशील कुटुंबवत्सल ब्राह्मण अहां तरी तुमचें चालविल्यास राज्यास भेयस्कर हें जाणोन तुम्हावरी कृपाळ होऊन श्रीचे सदरहु खर्चास व तुम्हास कुटुंबाचे योगक्षेमार्थ मौजे केंजळ समत हवेली प्रांत मजकूर हा गांव व धामणा डोंगर कुरणासुद्धां स्वराज्य व मागलाई एकूण दुतर्फा सरदेशमुखी कुलबाब कुलकानु हल्ली पट्टी व पेस्तरपट्टी जलतरु, तृणकाष्ठ, पाषाण, निधी निक्षेप सहित खेरीज हकदार व इनामदार करून दरोबस्त सरकारांतून नूतन इनाम करार करून दिला असे. तरी मौजे मजकूरचे ऐवजाची व सदरहु डोंगराचे कुरणाची नेमणूक श्रीकडे व तुम्हास आनंदराव भिकाजी करून देतील, त्याप्रमाणें तुम्ही आपले दुमाला करून घेऊन तुम्ही तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहणें. जाणिजे. चंद्र ११ जिल्हेज. "

श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनी, आनंदराव भिकाजी रास्ते यांस एक पत्र लिहिलें. त्यांतील मुख्य मजकूर येणेप्रमाणें:—" वरील सनदेंत नमूद केल्याप्रमाणें केंजळ गांव व धामणा डोंगर श्री विष्णू व समस्त ब्राह्मण यांना नूतन करार करून भोगवटीयास आलाहिदा इनामपत्रें करून देऊन हे सनद तुम्हास सादर केली असे. तरी इनामपत्राप्रमाणें तुम्ही मौजे मजकूर ऐवजाची व सदरहु डोंगराचे कुरणाची नेमणूक श्रीकडे व समस्त ब्राह्मणांस करून याचे दुमाला

करून देऊन चालविणें. जाणिजे छ ११ जिल्हेज. " हें पत्र सातारचे दप्तरीं बुका ७ ५९६ नंबर नोंदाविलें आहे. ता. ५ । ८ । १८५४ इ.

श्री विष्णु प्रित्यर्थ दरसाल खर्चाचें टिपण.

२१३८-॥	पूजासाहित्य नैवेद्य वगैरे.
१२५	पुजारी याचें वेतन.
११३	देवास पोषाख चैत्र शु॥ १ देस रु. ६५ आणि देवीस आश्विन शु॥ १० स रु. ४८
४५०८-।	तैनातीबद्दल.
१०	आधिक मास्याबद्दल.
९११।	

यादी धर्मपुरींतील समस्त ब्राह्मणांस प्रत्येक घरटी चाळीस रुपये प्रमाणें दरसाल मिळत असत. एकंदर घरें ४६ आणि किता असाम्या दोन मिळून ४८ घरें आनंदराव भिकाजी यांनीं बांधवून ब्रह्मणांस दान दिलीं.

नेमणूक जावता मौजे गुळुंब संमत हवेली प्रांत वांई हा गांव श्रीमंतांनीं देवब्राह्मणास धारादत्त धर्मादाय इनाम अग्रहार दिल्हा. वहिवाट येणेंप्रमाणें सुा सल्लास मयातैन व आलफ. शालिवाहन शके १७२४ दुंदुभिनाम संवत्सरे मौजे मजकूर देहे १ एकूण चतुःसिमा पूर्वक इदलशाई चावर ३० एकूण जिल्हे खालसा सरदेशमुखी पांडवगडची सनदी जमीन सु॥ कुलबाब कुलकानु गांव निसबत इनामदार खेरीज करून हल्लीं वहिवाट तर्फ जाधव दुतर्फा सादिलवार ाट्टी होऊन गांवसंबंधीं खर्च जाऊन बाकी सरकारांत ऐवज देत ती बेरीज नक्त रुपये ३२०९।-

तपशील—२०९५. जिल्हे निसबत. १०३२।- पांडवगड निसबत. १८ पाटील रु. १२ व कुलकर्णी रु. ६. ६४ हकदार परभारे पाळतात ते दरसाल देशमुख रु. ४४ व देशपांडे रु. २०. एकूण ३२०९।-५० सालीना कमाविसदर विठ्ठल गोपाळ क्षीरसागर. २७।- प्यादा हंगामशीर. सदरहु वजा जातां बाकी देवब्राह्मणांकडे अग्रहार इनाम नेमणूक ३०५० रुपये. तपशीलः—

तेल वांई येथील श्रीमहालक्ष्मीची पूजा, नैवेद्य, नंदादीप व उत्साह वगैरे खर्चास प्रतिवर्षी पांचशें रुपये.

श्री कृष्णेच्या उत्साहाकरितां सात घांटांस—श्री भिमकुंड घांट १०० रु. श्री रामडोह घांट १५० रु; श्री चक्रेश्वर घट १०० रु; श्री त्रिशूलेश्वर घांट १०० रु; श्री काशिविश्वेश्वर घांट १०० रु; श्री ओंकारेश्वर घांट १०० रु; श्री

उमामहेश्वर गंगापुरी घांट १०० रु; एकूण ७५० रुपये श्री कृष्णाबाईचे उत्साहास ब्राह्मण करतील त्यांस देऊन पावती घेत जावी. प्रती घांटी ऐवज वेगळा पावता करावा.

वास्तव्य श्री क्षेत्र वांईतील ब्राह्मणांस—घरें १७. वार्षिक दक्षणा. गंगाधरभट महादेवभट खरे १०० रु; बाळंभट रामभट गोगटे १०० रु; विनायकभट नारायणभट रानडे १०० रु; रघुनाथभट घोंडभट भिडे १०० रु. रामभट नारायणभट गद्रे २०० रु; रामचंद्र दि. आपा दि. करंदीकर १०० रु; गोविंदभट नागेशभट मोने १०० रु; गंगाधरभट जोतभिट शेंडे १०० रु. रंगभट अनंताचार्य अष्टपुत्रे १०० रु; जनार्दनभट शेषभट बरखडे १०० रु; रघुनाथभट नारायणभट शेंडे १०० रु; शेषभट नारायणभट ऐनापुरे १०० रु; केशवभट गोपाळभट चित्राव १०० रु; काशिनाथभट बाळंभट थिटे १०० रु; माहादेवभट रंगनाथभट थिटे १०० रु; नागाचार्य आण्णाचार्य कळमकर १०० रु, खंड दि. मोर फाटक आयाचित १०० रु. एकूण १८०० रुपये.

गांवासंबंधी उपसर्ग जाहल्यास कमाविसदार व ब्राह्मण यांणीं एकत्र होऊन गांवास उपसर्ग न लागे तें करीत जावें. वेदमूर्ती गोविंदभट मोने व गंगाधरभट शेंडे व रंगभट अष्टपुत्रे यांणीं लिहिल्या अन्वयें सर्वांस जमा करून बंदोबस्त करीत जावा. येणेप्रों करार. जाणिजे छ १५.

या लेखकानें सन १९११ त " श्री क्षेत्र वांईवर्णन " हें पुस्तक छापिलें आहे. त्यांत वांई येथील देवालयें व घांट यांसंबंधीं सर्व माहिती दिली आहे.

आनंदराव भिकाजी यांस—बहिणाबाई डफळे जाहागीरदार यांनीं एक गांव इनाम दिला आहे. त्या सन्दची नकल येणेप्रमाणें:—

श्रीरामचंद्र प्रसन्न.

श्रीमंत राजश्री आनंदराव भिकाजी उपनांव गोखले ऊर्फ रास्ते वस्ती वांई आसाहेबांचे सेवेशीं:— विनंती बहिणाबाई डफळे चा॥ जाहागीरदार पा॥ जत व करजगी व देशमुख विजापूर दंडवत विज्ञापना लिहून दिल्हे आसाहेबांस इनामत्र ऐसाजे-आम्ही आपले संस्थानांतून परागंदा होऊन मेलों होतों. त्याची आपण आमचा आभिमान धरून सरकारांतून संस्थानचा बंदोबस्त करून घेऊन आम्हांवरी कृपाकरून संस्थान आमचे स्वाध्यानकरून स्थापना केली. सबबं आम्ही आपले स्वसंतोशे मौजे येकुंडी परगणें जत हा गांव आपणास दरोबस्त स्वराज्य व मोगलाई येकून दुतर्फ कुलबाब कुलकानु (वगैरे) सुदां पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें मौजे मजकूर हा गांव अनुभवून सुखरूप राहणें. जाणिजे. आमचे वांसीं कोणी इनामगांव चालवावियाची अंतर करील यासी श्री स्वामींची शेफत असे. हें इनामपत्र लिहून दिल्हें. सही छ. ५ रविलावल सु॥ सन समान हिदैन मया

आलफ सन ११७७ शके १६८९ (सन १७६७ इ.) सर्वजित नाम संवत्सरे श्रावण सुद्ध सप्तमी. बहुत काय लिहिणें हे विशापना.

वि. क. केशव आबाजी उदास मजमदार जत डफळे–

" आनंदराव भिकाजी रास्ते यांचे नांवें शके १७०२ मध्यें श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनीं मौजे येकुंडी ऊर्फ अनंतपूर परगणें जत व मौजे निंबोणी परगणें करजगी हे दोन गांव इनाम करून दिल्हे आहेत. "

माधवराव आनंद यांच्यानंतर त्यांचे पुत्र तीन; पैकीं गंगाधरराव यांचें कुटुंब गोदावरीबाई आणि येशवंतराव यांचें कुटुंब सरस्वतीबाई; आणि खंडेराव गंगाधर यांचें कुटुंब उमाबाई या तिघीजणी तालिकोटास एकत्र रहात असत. उमाबाई यांचा पहिला दत्तक पुत्र मयत जाहल्यावर बरींच वर्षें सर्व जहागिरीची व्यवस्था उमाबाईच पाहात होत्या. त्या दरम्यान सरस्वतीबाई व गोदावरीबाई यांचें घरांत पटेनासें जाहल्यामुळें, पुण्याचे प्रसिद्ध सार्वजनीक काका गणेश वासुदेव जोशी यांच्या खटपटीनें त्या दोघींना प्रत्येकीं १२५ रुपये व उमाबाईंना २५० रुपये अशी व्यवस्था सरकारांतून जाहली.

सार्वजनिक काकांनीं सार्वजनिक लटपट करून आपले मावसबंधू माधवराव गोखले दुसऱ्या घराण्यांतले यांस सरस्वतीबाई रास्ते यांचेकडून दत्तक घेवविलें. हे दत्तक झाल्यावर तंट्याला सुरवात जाहली. सार्वजनीक काकांनीं वडील घराण्यांत म्हणजे उमाबाईना दत्तक न देतां, धाकटे घराण्यांत आपले मावसबंधु दत्तक देऊन तंट्यास मात्र सुरवात केली. सार्वजनिक म्हणविणाऱ्यासही पैसा मोह पाडतोच; हे काका साहेब जोशी नसतांना जर गोखले असते तर स्वतः दत्तक गेले असते असें अनुमान होतें. अखेर जेव्हां काकासाहेबांचा डाव कायदेशीर नसल्यानें फिसकटला तेव्हां, जोशीकाकांनीं लटपट व खटपट करून, सरस्वतीबाईचे दत्तक पुत्र माधवराव यांच्या दोन पुत्रांपैकीं पहिले मल्हारराव यांस, उमाबाईस दत्तक देऊन हें प्रकरण संपविलें. माधवराव येशवंत यांनीं पुणें येथेंच सदाशिव पेठेंत सन १८७६ सालांत घर बांधिलें. त्याच घरांत त्यांचे दुसरे चिरंजीव विद्यमान येशवंतराव भाऊसाहेब रहात आहेत. यांना सालीना ५०० रुपये श्रीमंत माधवराव रावसाहेब रास्ते देत आहेत. भाऊसाहेबांचे पुत्र माधवराव हे ग्वालेर संस्थानांत लष्कराखात्यांत नोकर आहेत आणि तीन मुलगे विद्यार्थी आहेत.

उमाबाई यांचे द्वितीय दत्तक पुत्र मल्हारराव ऊर्फ आनंदराव बाळासाहेब यांना दोन अपत्यें; कन्या गंगूबाई व चिरंजीव माधवराव. गंगूताई यांचा विवाह जमखंडी संस्थानचे विद्यमान असलेले अधिपती श्री० भाऊसाहेब पटवर्धन यांच्याशी केला. या कार्यास आनंदराव बाळासाहेब यांनीं ५०।६० हजार रुपये खर्च केला. गंगूताईचें सासरचें नांव रमाबाईसाहेब होय. या अल्पवयांतच स्वर्गस्थ जाहल्या. यांच्या स्मरणार्थ जमखंडी येथें " सौ० रमाबाईसाहेब वाचनालय '

कै० श्री० सौ० रमाबाईसाहेब पटवर्धन जमखंडी.

श्री० सौ० गिरिजाबाईसाहेब रास्ते पुणे.

श्री. फर्स्ट क्लास सरदार माधवराव आनंदराव
ऊर्फ रावसाहेब रास्ते, पुणें.

ही संस्था चालू आहे. रमाबाईसाहेब यांचा स्वभाव मोठा मानी असून त्या फार चाणाक्ष होत्या. त्यांचे पुत्र श्री० शंकरराव आपासाहेब हे जमखंडी संस्थानचे युवराज आहेत.

आनंदराव बाळासाहेब हे सन १९०८ सालीं कैलासवासी जाहले. यावेळीं त्यांचे पुत्र माधवराव रावसाहेब हे सुमारें १२ वर्षांचे असावेत. श्री. रावसाहेब अल्पवयी असल्यामुळें सरकारनें त्यांच्या जहागिरीची सर्व व्यवस्था आपणाकडे घेऊन, एक कारभारी नेमिला. रावसाहेब यांना शिक्षणाकरितां कोल्हापूर येथें ठेविलें होतें. श्री. रावसाहेब रास्ते यांचा विवाह श्री० आबासाहेब पटवर्धन कुरुंदवाडकर यांची कन्या सखूताई यांच्याशीं सन १९१३ सालीं पुणें मुक्कामीं जाहला. त्यांचें सासरचें नांव श्री. सौ० गिरजाबाईसाहेब असें ठेवण्यांत आलें. श्री० माधवराव रावसाहेब यांना त्यांच्या वयाचे २२ वे वर्षी म्हणजे इ. स. १९१८ सालीं सर्व जहागिरीची पूर्ण मुखत्यारी सरकारकडून मिळाली. सरकारनें आपल्या कारकीर्दीत ज हागिरीची व्यवस्था उत्तम ठेवून शिल्लकही वाढविली. श्री० रावसाहेब रास्ते यांना चार अपत्यें आहेत. पहिलें अपत्य कन्या माईसाहेब यांचा जन्म ता० ४ डिसेंबर सन १९१५ शनवारीं जाहला. दुसरें अपत्य पुत्र आनंदराव बाळासाहेब यांचा जन्म ता० २० फेब्रुआरी सन १९१७ मंगळवारीं जाहला. तिसरें अपत्य कन्या प्रामलाताई यांचा जन्म ता. १३ जून सन १९१८ गुरुवारीं ज हला. आणि चवथें अपत्य पुत्र शंकरराव बापूसाहेब यांचा जन्म ता० २ डिसेंबर सन १९२० गुरुवारी जाहला. श्री० माधवराव रावसाहेब रास्ते यांचा स्वभाव फार गरीब असून ते अंतःकरणाचे थोर व उदार आहेत.

श्रीक्षेत्र बांई येथें यांच्या पूर्वजांनी बांधलेल्या देवालयांपैकीं श्रीविष्णूचें देवालय विशेष प्रसिद्ध आहे. या देवालयाच्या दगडी सभामंडपाचें छत एकाएकीं अदमासें तीन महिन्यांपूर्वी पडलें. श्री० रावसाहेब रास्ते यांच्या मनांतून यंदां बांई येथें मे ती—महालाचे जवळ पागा व मोटारचा तबेला वगैरे इमारती बांधविण्याचें ठरलें होतें; परंतु श्रीविष्णूचे देवालयाचा सभामंडप पडल्यामुळें, आपल्या सोयीकरितां बांधण्याच्या इमारती सहित करून, सदरहु सभामंडपाचे जिर्णोद्धाराचें काम सुरू केलें आहे. या कामास अदमासें २०।२५ हजार रुपये खर्च येईल असें वाटतें. रास्ते पेठेतील यांचा रहाण्याचा खास वाडा जो आहे तो फारच मोठा आहे. असा वाडा हल्लीं पाहूं गेल्यास दक्षिण महाराष्ट्रांत तरी कोठें पहाण्यास मिळणार नाहीं. श्रीमंत पेशवे सरकारचे आप्त व सरदार असलेले रास्ते यांचा वाडा इतका मोठा, मजबूत व सुरेख आहे तर खुद्द पेशवे-सरकार यांचा शनवारांतील वाडा किती भव्य व सुंदर होता हे वाचकांनींच ठरवावें!

रास्ते यांच्या वाड्यांत सभोंवतालचे तटाचे आंत वाड्याचे पूर्व बाजूस उमाबाईसाहेब रास्ते यांनी श्रीराममंदिर बांधविलें आहे. श्रीराम, लक्ष्मण व सीता या

मूर्ती फारच सुंदर असल्यामुळें दर्शन घेतांच, घटकाभर मूर्तींकडे टकारखें पहातच रहावें असें होतें. या राम–मंदराचे प्रथमचे दरवाज्यावर जो लेख आहे त्या लेखावरून श्रीरामाचें देवालय कोणीं बांधविलें व केव्हां बांधविलें तें समजण्याकरितां, त्या लेखाचा उतारा पुढें देत आहें:—

श्री.

श्री सद्गुरु सीता-राम चरणीं तत्पर खंडेराव गंगाधर रास्ते यांचा हेतु श्री रामचंद्र व मारुती देवांची स्थापना करण्याचा होता. तो त्यांची भार्या उमाबाई रास्ते लक्ष्मणराव अण्णासाहेब पटवर्धन यांची कन्या यांनीं श्रीरामकृपेनें देवालय बांधवून चिरंजीव राजेश्री आनंदराव रास्ते यांच्या हस्तानें शके १८०१ प्रमाथीनाम संवत्सरे मिती वैशाख शु॥ १३ रविवार रोजीं स्थापना करवून पूर्ण केला असे.

या वाड्यास लागूनच वाड्याचे दक्षिण दिशेस " श्री लक्ष्मणेश्वराचें " देवालय चिरेबंदी मोठें मजबूत लक्ष्मणराव भिकाजी रास्ते यांनीं बांधविलें आहे. वाड्यांतील श्रीराममंदिराचे पिछाडीस तटाचे जवळ एक पीर आहे. आणि वाड्याचे पश्चिमबाजूसहि एक पीर आहे. पूर्वी रास्ते यांच्या येथें कोणी मुसलमान जातीचे इमानी नोकर होते; त्या मुसलमानांच्या स्मरणार्थ हे पीर (थडगीं) आहेत. वाड्याचा मुख्य दरवाजा उत्तराभिमुख आहे.

गणपतराव भिकाजी रास्ते, यांचा वंश हल्लीं श्रीक्षेत्र वांई येथें आहे. या वंशास गोशाळे–रास्ते असें म्हणतात. गणपतराव भिकाजी यांनीं श्रीगणपतीचें देवालय बांधलें. या देवालयाचे शिखराचें काम चालू असतां त्याला जे पायाड बांधिले होते, त्या पायाडाच्या लांकडांचा पुढें जो वाडा बांधिला गेला त्या, वाड्यांत यांच्या गाई बांधत असल्यामुळें, त्या वाड्याला गोशाळा ही संज्ञा प्राप्त जाहाली. पुढें गणपतराव भिकाजींचे वंशज सदरहू वाड्यांत राहूं लागल्यामुळें त्यांना गोशाळे रास्ते म्हणूं लागले.

गणपतराव भिकाजी यांनीं वांई येथें श्री कृष्णाबाईचे पात्रांत श्री गणपतीचें भव्य देवालय बांधिलें. दक्षिण महाराष्ट्रांत या गणपती येवढी मोठी मूर्ती कोठेंच नाहीं. हे गजाननमहाराज बसलेले आहेत तरी उंच घडवंचीवर उभा राहून पूजा करावी लागते. या गणपतीस ढोल्या गणपती असेंही म्हणतात. या देवालयास अगदीं लागून, उत्तरबाजूस श्री काशीविश्वेश्वराचें देवालय बांधिलें आहे. गणपतराव भिकाजी यांनीं आपल्या पहिल्या मुलाचे स्मरणार्थ हें देवालय बांधून श्री काशीविश्वेश्वराची स्थापना केली. या देवळांचें काम मजबूत केलें आहे. या



श्री. कुमारी माईसाहेब रास्ते.

श्री. कुमार आनंदराव ऊर्फ बाळासाहेब रास्ते.

देवालयांतील नंदी प्रेक्षणीय आहे. गणपतराव भिकाजी यांनीं सदरहु देवालयें बांधिलीं, त्यांत गणपतीचे देवालयाजवळील आळीस गणपतीआळी आणि गणपती घांट ही संज्ञा प्राप्त जाहाली असून अद्यापि गणपतीघांट व गणपतीआळी असेंच म्हणतात. गणपतराव भिकाजी यांस पुत्र तीन; काशीराव, येशवंतराव व माधवराव.

काशीराव यांच्या नांवें श्री काशीविश्वेश्वराचें देवालय बांधिलें आणि आपल्या नांवानें श्री गणपतीचें देवालय बांधून आपल्या नांवाचें स्मारक 'यावत् चंद्रदिवाकरौ' गणपतराव भिकाजी यांनीं करून ठेविलें आहे. काशीराव गणपतराव यांना मल्हारराववाबा म्हणून एक पुत्र होते. हे मल्हारराव शके १७५४ सालीं कैलासवासी जाहले. पुढें त्यांचा वंश नाहीं.

दुसरे चिरंजीव येशवंतराव हे कधीं वारले याबद्दल माहिती सांपडत नाहीं. त्यांचे चिरंजीव गणपतराव येशवंत हे शके १७६४ पौष वा। ४ रोजीं कैलासवासी जाहले. त्यांचें कुटुंब (श्रीमंत नानासाहेब चिंचणीकर यांची वडील बहीण दुर्गाआका) रमाबाईसाहेब यांनीं खटावकर रास्ते यांच्यापैकीं (जमखंडीचे रास्ते पैकींच खटावकर–रास्ते होत.) येशवंतराव रास्ते यांना दत्तक घेतलें. हे येशवंतराव ऊर्फ तात्यासाहेब रास्ते शके १८१२ मध्यें कैलासवासी जाहले. येशवंतराव ऊर्फ तात्यासाहेब रास्ते यांनीं, मिरज येथील माहादाजी कृष्ण गोखले वकील यांचे द्वितीय पुत्र अनंत माहादेव यांस ता. २७।९।९० रोजीं जमखंडी मुक्कामीं दत्तक घेऊन त्यांस गोविंदराव नानासाहेब हें नांव ठेविलें. पुढें येशवंतराव तात्यासाहेब हे जमखंडी येथें ता. १४।१०। ९० रोजीं कैलासवासी जाहले. गोविंदराव येशवंत ऊर्फ नानासाहेब हे ता. २०।१।१८९९ त विषमज्वराचे आजारानें कैलासवासी जाहले. त्या वेळेस त्यांचे चिरंजीव कृष्णराव बाळासाहेब हे साडेतीन वर्षांचे होते.

गणपतराव भिकाजी यांचे तिसरे पुत्र माधवराव हे आनंदराव भिकाजीस दत्तक गेले. पुढें गणपतराव येशवंत लहान असल्यामुळें माधवराव हे सर्व व्यवस्था पहात होते. गणपतराव भिकाजी यांचा वेहडा अलग जाहला होता. माधवराव आनंदराव हे दत्तक जाहल्यावर यांनींच आपल्या पुतण्याच्या वेहड्याची भानगड केली. म्हणजे माधवराव आनंद याच्याच कारकीर्दीत गणपतराव येशवंत यांची लाखों रुपयांची नुकसान जाहली. त्यामुळें या वडील घराण्याची स्थिति सांपत्तिकदृष्टया गरीबीची आहे. गणपतराव भाऊसाहेब यांनीं सन १८४० सालीं रास्ते इष्टेटींतील आपला हिस्सा मिळावा म्हणून, त्यांनीं येजंट कोर्टांत बळवंतराव माधवराव रास्ते यांजवर दावा लाविला होता. त्या कामीं गणपतरावांचे संस्थान वाडा गोशाळा येथील कागदपत्र त्यांनीं त्यांचा कारकून आपाजी रामचंद्र बोपर्डीकर यांनीं घेऊन, बळवंतराव माधव याजकडे दिले. पुढें बोपर्डी-

कर यांचीही तैनात कमी केली. पुढें, निकाल जाहल्यावर गणपतराव भाऊसाहेब हे कंकणवाडी इलाखा जमखंडी येथें जाऊन राहिले. कंकणवाडी येथें भाऊसाहेबांनीं यज्ञ केला. त्यास आपण यावें अशी बळवंतराव माधव यांनीं आपली इच्छा प्रकट करून कुशंभट खरे उपाध्ये याजपाशीं मला यज्ञास बोलावणें आल्यास मी येईन, असें भाऊसाहेबांस पत्र पाठविलें. त्यांत " श्रीकाशीविश्वेश्वर, गणपति व गणकेश्वर देव यांचे मालक तुम्ही आहांत तें घेणेची माझी इच्छा नाहीं; व आनंतपूर गांव तुम्हांस देणें मी आपलें वचन फिरविणार नाहीं. असें पत्रांत लिहून पाठविलें." परंतु एजंटकोर्टातील निकालामुळें जी स्थिति जाहली होती त्यावरोन गणपतरावांनीं खरे भटजीस सांगितलें कीं, बळवंतराव माधव जर यज्ञास येतील तर मी यज्ञ करणार नाहीं.

गणपतराव हे अज्ञान असतांना, बळवंतराव माधव यांनीं श्री काशीविश्वेश्वर, गणकेश्वर व श्री गणपति या देवस्थानांस आपलीं नांवें दाखल केलीं तीं तशींच कायम राहिलीं. पुढें येशवंतराव तात्यासाहेब कैलासवासी जाहले. नंतर त्यांचे दत्तक चिरंजीव गोविंदराव नानासाहेब यांजवर बांई कोर्टांत सदरचे देवस्थानाचे येशवंतराव हे ट्रस्टी होते म्हणून दावा लावला होता. त्या कामीं उभय बाजूंचा पुरावा होऊन अखेर निकाल राव. रामचंद्र दाजी सबजज्ज यांनीं आनंदराव खंडेराव यांचा दावा रद्द करून प्रतिवादी गोविंदराव येशवंत हे मालक आहेत असें ठरविलें. पुढें दोन्ही कोर्टांत खालील ठराव कायम झाला. शेवटीं वरिष्ठ कोर्टांत–देवस्थानें गणपतराव भिकाजी यांनीं बांधिलीं आणि उत्पन्न पेशवे सरकार श्रीमंत माधवराव नारायण यांनीं गणपतराव भिकाजीस दिलें व शके १६९२ सालापासून आज तारखेपर्यंत गणपतराव भिकाजी यांचे घराण्यांत वहिवाट चालत आली जाहे सबब अपील रद्द होऊन गोविंदराव येशवंत हे मालक ठरले.

नंतर श्रीपाद भास्कर गोखले हा येक मिरज किल्ल्यांतील रहाणारा इसम आपण येशवंतराव यांस दत्तक झालों असें म्हणून, त्यापैं अथणी कोर्टांत दावा लावला. कोर्टानें दावा काढून टाकिला. त्यावर अपील बेळगांव कोर्टांत लाविलें. तें काढून घेऊन पुन्हां बेळगांव फ० कोर्टांत अवल दावा नादारींत लावला. त्याचा निकाल ता० २४ जुलई सन १९०४ रोजीं, प्रतिवादी गोविंदराव हेच दत्तक जाहले आहेत, वादी श्रीपाद जाहला नाहीं असा निकाल जाहला. हा निकाल गोविंदराव यांच्या मरणानंतर जाहला.

आनंदराव खंडेराव रास्ते यांनीं बांई कोर्टांत जो दावा लावला. त्यांत जी कांहीं उत्तम मदत जाहली असेल ती गोविंदराव यांचे जनक घराण्यांतील वडील बंधु जनार्दन माहादेव ऊर्फ आपासाहेब गोखले हायकोर्ट प्लीडर यांनीं केली. तसेंच त्यांचे पदरचे कारकून श्रीधर गणेश देशपांडे यांनींही मदत केली.

आपासाहेब गोखले मिरज मुक्कामीं ता. २७।८।१८९८ रोजीं स्वर्गस्थ जाहले. श्रीधर गणेश हे ८५ वर्षांचे होऊन शके १८१८ त वारले.

गोविंदराव नानासाहेब हे वारल्यानंतर त्यांचे चिरंजीव कृष्णराव गोविंद हे लहान असल्यामुळें त्यांची सर्व व्यवस्था त्यांचे कारभारी माधवराव देशपांडे यांनीं पाहिली. हल्लीं कृष्णराव ऊर्फ बाळासाहेब जरी सज्ञान झाले आहेत तरी आपल्या कारभाऱ्यांच्याच सल्यानें वागत आहेत. हें गोशाळे–रास्ते घराणें वडील असल्यामुळें, पिढीजाद देव यांच्याकडे आहेत. कै० आनंदराव बाळासाहेब केव्हांही जेव्हां वांई येथें जात तेव्हां, गोशाळे–रास्ते यांच्या वाड्यांत जाऊन देवाला नमस्कार करीत असत.

शामजी नाईक यांचे पुत्र भिकाजी नाईक व सदाशिव नाईक; या दोन्ही पुरुषांचे वंशाची माहिती मागें दिलीच आहे. आतां शामजी नाईक यांचे बंधु हरिबा नाईक यांचे वंशाची माहिती देतोः—हरिबानाईक यांस पुत्र तीन, विठोबा, धोंडबा व कृष्णाजी; विठोबाचे वंशापैकीं शंकर गोविंद रास्ते हे खटाव येथें रहात आहेत. प्रभाकर सदाशिव रास्ते हे डिस्ट्रिक्ट जज्ज कोर्टात क्लार्क असून पुणें येथें रहात आहेत. यांचे दोन बंधु स्वामी झाले आहेत. पांडुरंग विठ्ठल रास्ते हे सांगली येथें सिटी स्कूलमध्यें शिक्षक आहेत.

धोंडबानाईक यांस पुत्र तिनि, पैकीं वासुदेवराव व निळकंठराव या दोघांचा वंश चालू आहे. धोंडबा नाईक यांचे नातू धोंडो वासुदेव ऊर्फ दाजीसाहेब यांचा व कृष्णाजी नाईक यांचे पणतू हरिहरराव नानासाहेब यांचा असे दोन वाडे वाई येथें आहेत. दाजीसाहेब व नानासाहेब यांचे वंशज जमखंडी व पुणें येथें आहेत.

जमखिंडी येथील रास्ते

धोंडो वासुदेव ऊर्फ दाजीसाहेब रास्ते यांची बहिण सिताबाईसाहेब ह्या जमखंडीचे पहिले रामचंद्र परशराम ऊर्फ आप्पासाहेब पटवर्धन यांच्या पत्नि होत. पहिले आप्पासाहेब पटवर्धन जमखंडीकर हे वारल्यानंतर त्यांचे चिरंजीव गोपाळरावसाहेब पटवर्धन हे जमखंडी संस्थानचे मालक लहान असल्यामुळें त्यांचे मामा धोंडो दाजीसाहेब हे वांईहून निघोन जमखंडी येथें आले. धोंडो दाजी फार हुषार होते. यांचा व कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांचा विशेष स्नेह होता. धोंडो दाजी यांनीं जमखंडीकरांकरितां राजकारण बरेंच केलें. त्यामुळें यांचे भाचे श्री० गोपाळराव रामचंद्र पटवर्धन यांनीं आपला सर्वस्वीं राज्यभार मामासाहेबांवरच सोपविला. होता. धोंडो दाजीसाहेब मामा हे वारल्यावर यांचे चिरंजीव वासुदेव

धोंडो रास्ते यांचे नांवें व मामांचे नांवें, रावसाहेब पटवर्धन यांनीं करून दिलेल्या सनदा पुढील प्रमाणें:—

श्रीगणपती.

तीर्थस्वरूप राजश्री धोंडोपंत दाजी रास्ते वडिलांचे सेवेसीः—आपत्य गोपाळराव रामचंद्र साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ २९ जमादिलाखर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें विशेष आपण विदित केलें जे आम्ही कुटुंबवत्सल योगक्षेमार्थ नूतन गांव इनाम करून दिला पाहिजे म्हणोन त्याजवरोन मनास आणितां आपण कुटुंबवत्सल योगक्षेम चालला पाहिजे हें जाणून मौजे नागनूर परगणे बिद्रि हा गांव विजापुरी तनखा कमाल आकाराचा एक हजार रुपयांचा हक्कदार व इनामदार खेरीज करून दरोबस्त निधिनिक्षेप जलतरु तृणकाष्ट पाषाण सहित तुम्हांस इनाम करून दिल्हा असे. तरी तुम्ही व पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें. शके १७४३ (सन १८२१ इ.) वृषभनाम संवत्सरे सु॥ सन इहिदे अशरीन मयातैन व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री गणपती.

चिरंजीव राजश्री वासुदेव धोंडदेव राज्ते यांस प्रती गोपाळराव रामचंद्र आशिर्वाद उपर मौजे नागनूर परगणें बिद्रि हा गांव तुमचे वडील तीर्थस्वरूप कै० धोंडदेव दाजीमामा रास्ते यांस इनाम सन इहिदे अशरिनांत करून दिल्हा त्यापैकीं दोनशें (२००) रुपयांची जमीन कमाल आकाराची अव्वल प्रतीची परत द्यावी असें गांव देते वेळेस ठरलें होतें. त्याजवरून धोंडोपंत दाजी यांनीं गावांस चिठी जमीन देणेविषयीं दिल्ही परतुं पुढें धोंडोपंत दाजी वारले याजमुळें जमीन दुमाला होणें राहिली त्याजवरून तुम्ही विनंती केली जे दोनशें (२००) रुपयांची जमीन द्यावयाची त्यास त्याचे मोबदला जमखंडी परगण्यांत वडलांचें वेळचीं इनामें आहेत त्यांपैकीं लावून घ्यावीं त्याजवरोन नागनूरचें दोनशें (२००) रुपयाचे मोबदला दिली ती जमीन बिगे प्रमाणें दिली असे छ. २ रबिलावर सु॥ सन खमस सलासीन मयातैन व अलफ (सन १८३४ इ.)

धोंडोपंत दाजीसाहेब यांचे वडील वासुदेव नाईक यांना श्रीमंतांचें पत्रः—

श्री

राजश्री याविराजित राजरामान्य राजश्री वासुदेव नाईक रास्ते स्वामी गोसावी यांसः—

पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकींचें कुशल लिहित जाणें. तुम्ही पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहले. मकर संक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले ते पावले. जाणिजे छ. २२ सफर सु॥ सन

सलास समानीन मया व अलफ (सन १७८२ इ.) बहुत काय लिहिणें हे विनंति.

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब साहेबांचें शेवेसीं:—

आशाधारक लिंगणा वि॥ मुदंणा देशपांडे पो कुंदगोळ कृतानेक दंडवत विज्ञापना ऐसाजे श्रीमंत राजश्री धोंडोपंत दाजी रास्ते यांणीं श्री क्षेत्र वांई येथें श्री विष्णूची स्थापना करून देवालय बांधलें आहे, त्यास श्रीचे नैवेद्य, नंदादीप वगैरे खर्चाबद्दल आम्ही आपलेइनाम चावरात मौजे कुईंब्याळ पा॥ मार येथील मार एक रायरेखीइनाम करून देऊन अलाहिदा चतुःसिमापूर्वक इनामपत्र रास्ते यांचे नांवें लिहून दिलें आहे. त्याप्रमाणें सदरहु १ मार जमीन पत्रा-अन्वयें सर्वमान्य पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सालमजकूरपासून चालेल कोणेविसीं अडथळा पडावयाचा नाहीं. हा लिहून दिला कागद सही तारिख छ १५ माहे. सु॥ सीत आशर मयातैन व आलफ शके १७३७ युवानाम संवत्सरे माघ-बहुल दोन द्वितिया शेवेसीं विनंति होय. कानडी अक्षरानें पुरतें केलें आहे.

हस्ताक्षर नारो माहादेव देशपांडे मुतालिक पो मजकूर.

रास्ते यांच्या दप्तरीं जाहिरनामा कंपनी सरकारचा पुढील प्रमाणें:—

श्री

जाहिरनामा सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बहादूर सु॥ अशरीन मया-तैन व अलफ तमाम लोकांस जाहीर व्हावयाकरितां इस्तिहार केला जातो जे सावक सन १८१८ इसवी माहे फेब्रुवारी छ. ११ मुताबला माहे रबिलावर छ. ५ तारखेचे जाहिरनाम्यांत बाजीरावसाहेब यांची वर्तणूक चांगली नसल्यावरून त्यास दौलतीवरून मवकुफ केलें मजकूर मफसल लिहून आणि त्याची जमीदार वगैरे कोणी लोकांनीं कांहीं इलाखा ठेवूं नये असे तपशीलवार हुकुम केला आहे. तो तमाम लोकांस नीट जाहीर जाहलाच असेल. आतां फिरोन तमाम लोकांस चांगलें समजावयाकरितां लिहिले जातें जे कोणी शकस खुद्द बाजीराव साहेब यास हो कीं, त्याचे अनुमतावरून दिगर कोणासी तरी हो आपण खुद्द अथवा दुसऱ्या चे मार्फतीनें हो जबाब सनदा कागदपत्र या कोणे रीतीनें तरीही कांहीं इलाखा ठेविलीया सरकारांत. त्याची शिक्षा चांगली होईल आणि जहागिरदार ते सरंजामी व इनामदार व वतनदार वगैरे त्यास सरकारगकडोन जें कांहीं चालत आहे कीं, त्याजकडोन असे काम घडल्यास तत्क्षणीं त्यास जें काय चालत आहे तें जप्त करून त्यासिवाय आणखी त्यास जी शिक्षा करणें सरकारांत मुनासब जाणत आहेत कीं त्याप्रमाणें शिक्षाही होईल. याकरितां हे हुकुम तमाम लोकांत नीट ध्यानास आणून वर्तणूक करावी जाणिजे व तारिख १२ नवंबर १८१९

इसवी मुताला सन १२२९ फसली छ. २३ मोहरम बामाजी हुकुम वुईलीअम चंपलन साहेब बहादूर कमिशनर.

दाजीबा रास्ते यांनीं देसाई व पाळेगार वगैरे लोकांबरोबर लढाया करून जमखंडी राज्याचा बंदोबस्त केला व वेळोवेळीं संस्थानचा उत्कर्ष होण्याकरितां कंपनी सरकारबरोबरही राजकारण केलें. दाजीबांचे चिरंजीव वासुदेवराव हेही गोपाळराव रावसाहेब जमखंडीकरांचे वेळीं होते. वासुदेवराव बाबासाहेब यांचे चिरंजीव खंडेराव हे विद्यमान असून, त्यांचे चिरंजीव केशवराव बापूसाहेब व बापूसाहेब यांचे दोन मुलगे; वासुदेवराव बाबासाहेब व मल्हारराव आबासाहेब हे सर्व जमखंडी येथें असतात. बाबासाहेब रास्ते यांना दोन मुलगे आहेत.

पुणें मेहुणपुऱ्यांतील रास्ते.

निळकंठराव घोंडो रास्ते यांस कर्नाटकच्या स्वारींत हैदर अल्लीनें कैद करून पांच वर्षे अटकेंत ठेविलें होतें. पण त्यांची सुटका माधवराव रावसाहेब पेशवे यांनीं करविली. निळकंठराव यांचे वडील घोंडोबा व विठोबा या उभयतांनीं सन १७५४त मल्हारराव रास्ते यांच्याबरोबर लढाईत राहून नांव मिळविल्यावरोन त्यांना सातारा सरकारांतून अनेक गांवें मिळालीं त्यांपैकीं नगर जिल्ह्यांतील नांदगांव अद्यापि ह्या घराण्याकडेसच आहे.

निळकंठराव रास्ते यांना श्रीमंतांनीं आपल्या पदरीं ठेविलें. निळकंठराव यांचे पुत्र विनायकराव व खंडेराव; पैकीं विनायकराव यांनीं कर्नाटकच्या लढाईत परशूरामभाऊ पटवर्धन यांजबरोबर असतांना मर्दुमकी गाजविली. हे वांई येथें रहात असत. खंडेराव रास्ते यांस श्रीमंत माधवराव यांच्या कारकीर्दीत नाना फडणवीसांनीं, सेनापति हरिपंततात्या फडके यांच्याबरोबर पैठण व खर्डा येथील लढाईत कांहीं अधिकार देऊन पाठविलें होतें. तेथून परत आल्यावर त्यांस पुण्यासच कांहीं वर्षे कामावर ठेऊन शेवटच्या बाजीरावांच्या कारकीर्दीत सन १७९६ मध्यें वसईचे सरसुभे व मुताल्लिक नेमिलें व तेथून जंजिऱ्याच्या हबशाचें बंड मोडण्याकरितां १८०१ सनांत सैन्यासह पाठविलें होतें.

पुढें येशवंतराव होळकर यानें पुण्यावर हल्ला केल्यामुळें श्रीमंत बाजीरावसाहेब पुणें सोडून महाडाकडे गेले व तेथून वसईस खंडेराव रास्ते यांच्याकडे गेले. तेथें रास्त्यांच्या सल्लयानें १८०२ मध्यें कंपनीशीं वसईचा तह घडवून आणला. ह्या त्यांच्या सेवेबद्दल बाजीराव साहेब यांनीं खंडेराव यांस वसईचे सरसुभे विजयदुर्ग व लोहोगड विसापूर व येथील किल्लेदाऱ्या व भडोच जिल्ह्यांतील जंबूसरची सरसुभेदारी वगैरे अधिकार दिले. व आणखी साठ हजार रुपयांची सरंजामीहि

बक्षीस दिली. सन १८०२ च्या दुष्काळांत खंडेरावांनीं पुष्कळ पदरमोड करून गरीब गुरीब प्रजेस अतीशय मदत केली.

सन १८०६ मध्यें कुलाब्याच्या बाबुराव आंग्रयाविरुद्ध त्याच्या प्रजेनें बंड केलें त्यांत मुरारजी आंग्रे प्रमुख होते. त्याचा मोड करण्याकारितां बाबुरावानें खंडेराव निळकंठ रास्ते यांची मदत मागितली. व त्यांनीं श्रीमंतांची परवानगी घेऊन बाबुरावांच्या सहाय्यार्थ कुलाब्यास जाऊन बंडाचा मोड केला. त्याबद्दल बाबुराव आंग्रे यानें खंडेरावास पांच हजारांचें गांव इनाम देऊन माणिकगडची किल्लेदारी व त्या सभोवतालच्या चौदा हजारांच्या जमीनीहि दिल्या. हीं सर्व कामगिरीमुळें खंडेराव पुष्कळ दिवस घुण्यांत नव्हते. ती संधी साधून त्यांच्या हितशत्रूंनीं—म्हणजे विशेषें करून सदाशिवरावभाऊ माणकेश्वर यांनीं श्रीमंतांच्या मनांत भरवून दिलें कीं खंडेराव कंपनीं सरकारशीं सामील आहेत. श्रीमंतांचा त्या चहाडीवर विश्वास बसल्यामुळें त्यांनीं सर्व सरंजाम व इनामी उत्पन्न जप्त केलें. हा वृथा दोष सहन न होऊन खंडेराव यांनीं राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें व ते पुणें सोडून भांबुर्ड्यास वस्ती करून राहिले. तेथेंच ते सन १८०९ मध्यें मृत्यु पावले.

खंडेराव निळकंठ यांचे पुत्र गोपाळराव व विश्वासराव; गोपाळराव व आंग्रे यांचा बेबनाव होऊन माणिकगड येथें दोघांची चकमक उडाली. पण मुंबई-सरकारनें मध्यस्थी करून असें ठरविलें कीं, माणिकगड किल्ला व सभोंवतालचा मुलूख आंग्रयाकडेच राहावा. पण त्याबद्दल मोबदला म्हणून गोपाळरावांना आंग्रे यांनीं दरसाल पांच हजार रुपये रोख द्यावेत, त्याचप्रमाणें गोपाळराव यांचे बंधु विश्वासराव यांच्याकडे पांच हजार रुपये उत्पन्नाचीं इनाम गांवें द्यावींत असें ठरलें.

विश्वासराव हे कंपनीसरकारच्या स्थापनेच्या समयीं अल्पवयी होते. त्यांचे तर्फे बाळाजी नारायण नातू हे कारभारी होते. पुढें विश्वासरावांनीं कंपनीच्या पैशाची मदत केली त्यामुळें कंपनीनें त्यांना तीस हजारांचा सरंजाम दिला होता. सदरहु सरंजाम एक वर्षाच्या आंतच जप्तींत ठेविला गेला; आणि त्यांचे कारभारी बाळाजीपंत नातू यांस मात्र चोवीस हजारांचें इनामी वगैरे उत्पन्न देण्यांत आलें. पुढें काम चालविल्यावर सन १८१९ मध्यें विश्वासराव यांना दरसाल सहा हजार रुपये पेनशन बसलें. ते सन १८७० मध्यें मृत्यु पावले. विश्वासराव हे दुसऱ्या वर्गातील सरदार होते.

विश्वासराव यांचे चिरंजीव खंडेराव विश्वनाथ यांस पूना कॉलेजांत मेजर क्याँडीसाहेब यांच्या हस्तें इंग्रजीचें शिक्षण मिळालें. यांना सन १८७० सालीं दुसऱ्या वर्गाचे सरदार केलें. सन १८७७ सालीं दिल्ली दरबारांत रावबहादुरचा किताब व इंपीरियल मेडलही मिळालें. त्यावेळच्या कायदेकौन्सिलांतहि त्यांची

अनेकदां नेमणूक झाली होती. हे सन १९०७ सालीं मृत्यु पावले. यांनीं सन १८९६ माहे एप्रिल तारिख २१ रोजीं इचलकरंजी येथील रा. रा. गोपाळ वामन गोखले यांचे चिरंजीव विश्वनाथ यांस दत्तक घेतलें. विश्वनाथपंत यांचें लग्न त्याच सालीं त्यांच्या वयाचे तेरावे वर्षी तासगांवकर पटवर्धन यांची मुलगी आऊताई यांच्यार्शी झालें.

पहिलें कुटुंब सन १९१० सालीं वारलें. तेव्हां दुसरा विवाह त्याच सालांत पुणें येथील माधवराव गोळे यांची कन्या आऊताई इच्यार्शी जाहला. हें कुटुंब १९१५ त वारलें. तेव्हां विश्वनाथपंत ऊर्फ दाजीसाहेब यांनीं तिसरा विवाह सांगलीचे रा. केशवराव करंदीकर यांची कन्या सुंदरा इच्यार्शी केला. हें कुटुंबही सन १९१६ सालीं वारलें. नंतर चवथा विवाह त्याच सालीं विटें येथील रा. बापुराव बापट यांची कन्या द्वारकाबरोबर जाहला. विद्यमान श्री. सौ० द्वारकाबाई व यांच्या दोन मुली असून दुसरे कुटुंबाची एक मुलगी आहे. श्री० विश्वनाथ खंडेराव ऊर्फ दाजीसाहेब रास्ते यांचें नांव फर्स्टक्लास सरदारांत सन १९०८ सालीं दाखल झालें. यांचा स्वभाव गरीब व शांत असल्यामुळें, त्यांना लोकोपयोगी कामांत बरेच कष्ट सोसावे लागतात. त्यांच्याकडे हल्लीं असलेलीं कामें— " सरपंच संस्थान कमेटी आळंदी, पंच संस्थान पर्वती, ऑनरी म्यॉजिस्ट्रेट बी. बेंच पुणें, मेंबर आफ धी म्यॉनेजिंग कमेटी इन्फर्म असायलम, व्हिजिटर ऑफ धी ल्यूनाटिक असायलम येरवडा, मेंबर, उपाध्यक्ष व खजिनदार संस्कृत पाठशाळा आणि पुणें गायन समाजाचे खजिनदार इत्यादि. " मेहुणपुऱ्यांत यांचा वडिलार्जित वाडा आहे तेथें हे रहात असतात. श्री० सरदार दाजीसाहेब रास्ते यांची वागणूक अगदीं साधी असून धार्मिक आहे.

श्रीक्षेत्र वांई येथें भाऊसाहेब रास्ते हे मोठे कर्मठ व स्नानसंध्येशील होऊन गेले. त्यांचीं दोन मुलें गौरीशंकर व दामोदर आहेत. हे मेहुणपुऱ्यांतीठ रास्ते यांना फार जवळचे आहेत. वांई येथें धर्मपुरींत त्यांचे घर आहे.

ताम्हनमळा येथील चौगुले गोखले.

गोखले यांचें कोंकणांतील मूळगांव वेळणेश्वर असें एकंदर माहितीवरून ठरतें. वेळणेश्वर येथील गोखल्यांचे पुरुष कोंकणांत निरनिराळ्या गांवीं जाऊन राहिलें, तरी बहुतेक गोखले आपलें मूळचें गांव वेळणेश्वर असें सांगतात. शिवाय वेळणेश्वर येथील " श्री वेळणेश्वर " हा देव सर्व गोखल्यांचा कुलस्वामी आहे. गोखले यांचें कुल फार मोठें असल्यानें संशोधनास फारच त्रास झाला. वेळणेश्वर येथील राहणारे माहादाजी गणेश हे विठ्ठलराव यांचे नातू होत. माहादाजी गणेश यांना दोन बायका होत्या. पहिली गंगाबाई व दुसरी पार्वतीबाई; ह्या

दोघेही नाशिक क्षेत्रीं गेल्या होत्या. नाशिक येथील क्षेत्रोपाध्ये दाते यांच्याकडे दोघींचे लेख असलेले आम्ही पाहिले आहेत. पार्वतीबाईचा लेख शके १६६४(सन १७४२) चा आहे. माहादाजी गणेश हे वेळणेश्वरींच रहात होते. माहादाजींचे पुत्र नारायण ऊर्फ बाळाजी हे ताम्हनमळा येथें रहावयास गेले. या घराण्यास चौगुले असें म्हणतात. चौगुलेपणाच्या वतनाची सनद या घराण्यास मिळाली आहे. तिची नक्कल पुढीलप्रमाणें:—

श्री.

आज स्वारी राजश्री आनंदराव भिकाजी गोखले माहाजन इनामदार मौजे वेळणेश्वर ता। गुहागर ता। अंजनवेल सुभा दाभोळ प्रांत हमदाबाद ता। मोकदमानी मौजे मार सुा तिसा तीसैन मया व आलफ बाळाजी माहादेव चौगुले मौजे मार यांनीं येऊन विनंती केली कीं वडिलोपार्जित चौगुलकीचें वतन त्याचे मानपान चालत आहेत. जमाबंदी व वसुलाचें कामकाज करून सरकाचे चाकरी विसी कस्त मेहनत करीत आहों त्यास कृपा करून साल दरसाल बाब खटपट नेमणूक करून देविली पाहिजे म्हणून त्याजवरून मनास आणितां बाळाजी महादेव गोखले तिसरें वतन चौगुलकीचे वतनसंबंधें हक्काची नेमणूक नाहीं कस्त करून मौजे मा।रची जमाबंदी व वसुलाचें कामकाज करितात सा। बराय विनंती मनास आणून चौगुले यांजपासून नजर जीवन माफक रोजमहा सरकारांत घेऊन चौगुले यास हक खटपटे दरसाल रुपये साडेपांच ५॥ करार करून दिलें असे तार सन शीत तिसेन पासून सालदरसाल साडेपांच रुपये देत जाऊन गांवचे हिशेबीं लिहीत जाणें. नवीन पत्राचा आक्षेप न करणें. जाणिजे छ १२ रमजान [मोर्तब सुद]

वेळणेश्वरचे जगन्नाथ दादाजी गोखले हे पूर्वी वेळणेश्वराहून निघोन काश्यप नदीचे कांठीं राहून मोठा मळा वसविला. त्या भागास मळा असेंच लोक म्हणूं लागले. जगन्नाथपंत वारल्यावर मळा येथील गांवांत असलेल्या लोकांस तेथील एक कुणबी (मराठा) इतरांस फार त्रास देऊं लागला. तेव्हां तेथील कांहीं कुणबी वेळणेश्वर येथें जाऊन गोखले यांस वरील हकिकत सांगून, तुम्ही आपले गांवीं येऊन रहा असें म्हणूं लागले, तेव्हां बाळाजी माहादेव हे मळा येथें जाऊन राहिले. मळा येथील कांहीं लोकांस ते नको होते. ज्यांना नको होते ते लोक पुंड असोन फार अडाणी होते. त्यांपैकींच एकजण, मळा गांव आपला आहे असें म्हणे. परंतु गांवांतील इतर लोक व बाळाजीपंत यांचेपुढें त्याचें कांहीं चालेना. बाळाजिपंतांनीं मळा येथें बरेच कष्ट करून उत्पन्न वाढविलें. नंतर पेशवेसरकारांत ताम्हनभर नजराणा देऊन मळा हा गांव आपले ताब्यांत सरकार आशेनें घेतला. तेव्हांपासून ताम्हनमळा असें नांव त्या गांवास सुरू झालें. या गांवास ताम्हनाचीं झाडें फार आहेत, म्हणून ताम्हनमळा असें म्हणूं लागले

असेंही ऐकिवांत आहे. परंतु ताम्हनभर नजराणा देऊन मळा गांव घेतल्यामुळें या गांवास ताम्हनमळा असें म्हणूं लागले हें जास्त सयुक्तिक दिसतें. ताम्हनाचीं झाडें इतर ठिकाणापेक्षां येथें जास्त आहेत हे खरें; परंतु पूर्वी मळा हें नांव तीं झाडें असतानांच चालू होतें. यावरून नजराण्याचीच हकिकत विशेष ग्राह्य आहे. परंतु वास्तविक पहातां दोन्ही दंतकथांविषयीं कागदपत्र उपलब्ध झाल्याशिवाय खात्री देतां येत नाहीं.

ताम्हनमळा गांवाच्या सीमेनें जाणारी काश्यपी अथवा कापशी नदीचा उगम या गांवापासून १०।१२ मैलांवर सह्याद्रि पर्वतांत जाहला असोन, ती पश्चिमवाहिनी होऊन जयगड खाडीला मिळते. तिचे उगमाजवळ सह्याद्रीचे पायथ्याला डेरवण गांवांत दोन दगडी कुंडें व एक आसन आहे व तें पाहण्याला कित्येक लोक जातात. ताम्हनमळा गांवची लांबी ४ मैल व रुंदी ३ मैल आहे. या गावांत खेमबावा, मानाई, नवलाई, पावणाई व चंडकाई अशा नांवाच्या देवता आहेत. याशिवाय श्री गणपती व श्री विठोबारखुमाई अशीं दोन देऊळें गोखले मंडळींनीं बांधिलीं आहेत.

वेळणेश्वराहून ताम्हनमळा येथें बाळाजी माहादेव अदमासें सन १७७२।७३ च्या सुमारें आले. प्रथम एकटेच येऊनजाऊन होते. नजराणा देऊन सवाई माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीत हा गांव कायमचा रहाण्याचा केला. वेळणेश्वरास यांचा कृष्णाजी नांवाचा मुलगा वारल्यामुळें त्याची बायको सती गेली. इकडे ताम्हनमळा येथें गांवांतील विरुद्ध पक्षाच्या मदतीनें दरवडेखोरांनीं बाळाजीपंतांस फार त्रास दिला. म्हणून सर्व मुलाबाळांस वेळणेश्वर येथें ठेवून आपण येऊनजाऊन राहिले. बाळाजी माहादेव यांना त्यांच्या हयातीपर्यंत त्यांना विरुद्ध पक्षाचे लोकांनीं फारच त्रास दिला होता. यांच्या वयाच्या सुमारें ७८ वे वर्षी संधी साधून कांहीं दरोडेखोरांनीं विरुद्धपक्षाचे सहाय्यानें यांच्या घरावर दरवडा घालून बाळाजीपंतास त्या दरोडेखोर रामोशांनीं बराच मार देऊन, जळत्या कांकड्यांनीं त्यांचें शिल्क भाजिल्यामुळें ते १०।१२ दिवसांत मरण पावले.

बाळाजीपंतांचे चारी मुलगे गणेश, गोविंद, भास्कर व रघुनाथ हे आपापल्या मुलांबाळांसह वेळणेश्वराहून निघोन ताम्हनमळा येथें येऊन राहिले. गोविंदाचे पुत्र विष्णु हे मात्र वेळणेश्वरासच राहिले. हल्लीं विष्णु यांचे पुत्र रावजी मुलाबाळांसह तेथेंच आहेत. बाळाजीपंतांचे नातू विठ्ठल गणेश हा पुरुष धाडशी, बुद्धिमान, शक्तिवान व व्यवहारचतुर होता. यांनीं गांवांतील सर्व लोकांवर वचक बसविल्यापासून सर्व गोखले मंडळी त्या गांवीं शांततेनें व सुखानें राहूं लागली.

आजतागायत गोखले यांचीं ताम्हनमळा येथें १४।१५ घरें जाहलीं आहेत. गणेश बाळाजी यांना सहा मुलगे; पैकीं पांच मुलांचा वंश चालू आहे. विठ्ठल

गणेशचे नातू रघुनाथ व शंकर वासुदेव हे घरींच शेतीवाडी करून आहेत. वामन शंकर विद्यार्थी आहे.

रामचंद्र ऊर्फ बच्याशास्त्री गणेश, हे शास्त्री व ज्योतिषी होते. हे नाशिक क्षेत्रीं जाऊन पुढें फिरत फिरत ग्वाल्हेर येथें गेले. तेथें कांहीं दिवस रहातांच यांची ज्योतिषासंबंधीं प्रसिद्धी झाली. त्यावेळचे संस्थानिक जनकोजी शिंदे यांचा हात पाहून 'तुम्हाला मुलगा खास होईल' म्हणून सांगितलें, व त्याप्रमाणें मुलगा जाहला. तेव्हां बच्याशास्त्री गोखले यांना शिंद्यांकडून दरमहा दोनशें रुपये तैनात व सरकारखर्चानें पालखी देण्यांत आली. यांचे पश्चात् यांचे चिरंजीव बल्लाळ यांस शंभर रुपये पेनशन मिळाली. नंतर बल्लाळाचे चिरंजीव गणेश यांना हल्लीं चाळीस रुपये पेनशन चालू आहे. पद्माकर गणेशचे नातू, श्रीधर कृष्ण हे एम्. ए. असून ग्वालेरीसच व्हिक्टोरिया कॉलेजांत प्रोफेसर आहेत.

गोपाळ गणेश यांना सहा मुलगे; पैकीं चौघांचा वंश चालू आहे. गोपाळ यांचे नातू गणेश बाळाजी आपल्या तिन्ही मुलांसह ताम्हनमळां येथें शेती करून रहातात. कृष्णाजी दामोदर घरींच शेती करून आहेत. केशव बापूजी हे पुणें जिल्ह्यांत वडगांवीं वकील आहेत. गणेशचे नातू सखाराम बाबजी हे वयोवृद्ध असून घरींच आहेत. यांचे पुत्र विठ्ठल हे मुंबईला आहेत; त्रिंबक हे बडोद्यास आहेत; आणि निळकंठ मुंबई येथें शाळाखात्यांत नोकर आहेत. दत्तात्रय शाळामास्तर आहेत.

गोविंद बाळाजी यांचे तीन मुलांचा वंश चालू आहे. गोविंदचे पणतू आत्माराम व भार्गवराम हे गांवींच शेती करून आहेत. भार्गवराम हे सार्वजनिक कामांत झीज सोसून काम करणारे असून उत्साही आहेत. सिताराम विनायक व वामन सिताराम हे शेती करून आहेत व परशराम सिताराम शाळामास्तर आहेत. नरहर रामकृष्ण घरींच असतात व शिवराम रामकृष्ण मुंबई येथें सालिसीटर ऑफिसांत नोकर आहेत. गोविंद बाळाजीचे नातू रावजी विष्णु हे वेळणेश्वर येथें रहात आहेत. हरी, रावजी व विष्णु या तिघां बंधूंनीं मिळून व्यापारास सुरुवात केली होती. रावजी हे विभक्त झाल्यावर यांनीं मोठ्या प्रमाणावर व्यापार सुरूं केला. रावजी यांची सचोटी व प्रामाणिकपणा पाहून दुकानाची भरभराट विशेष झाली. रावजी हे फार कष्टाळू व करारी आहेत. यांचें वय ८९ वर्षांचें आहे. हल्लीं दुकानाचा सर्व व्यवहार त्यांनीं मुलावर सोंपविला. तत्रापि इतके वयोवृद्ध झाले असतांही, सकाळीं १०।११ वाजतां जेवण करून जे दुकानावर जातात ते दुसरे दिवशीं ९।९॥ वाजतां घरीं येतात. पुन्हां जेवण झाल्यावर दुकानावर जातात. याप्रमाणें दुकानावर जातांना व येतांना वाटेंत चार ठिकाणीं त्यांना बसावें लागतें, कारण आतां विशेष अशक्त झाले आहेत. आतां वास्तविक पहातां त्यांनीं दुकानावर जाण्याचें काहीं कारण नाहीं. परंतु जुनीं माणसें

उगीच बसणार नाहींत म्हणतात तेंच खरें. दुकानाचा कोणताच व्यवहार ते जरी पाहात नाहींत तरी दुकानांत जाऊन बसल्याशिवाय त्यांना बरें वाटतच नाहीं. यांचे तीन मुलगे, त्यांत विनायकराव हे सर्वांत मोठे, यांच्या विद्यमानें तिघांहीं बंधूंनीं दुकान व व्यापार चांगला चालविला आहे. विनायकराव यांचा स्वभाव चांगला आहे. सार्वजनिक कामांत पडून अंगमेहनत व द्रव्य खर्चही करतात. विनायकरावांनींच मला बरोबर घेऊन वेळणेश्वर येथील देवालय व समुद्र वगैरे दाखवून सर्व माहिती दिली. श्रीवेळणेश्वर देवालयाचे उत्तरेस थोड्या अंतरावर समुद्रतीरीं अदमासें ३५।४० वर्षांपूर्वी एक मोठा मासा येऊन पडला. तो येवढा मोठा होता कीं, समुद्रकांठीं रहाणाऱ्या लोकांना समुद्रदर्शन बंद झालें. लहान टेकडीइतका उंच २।३ माड लांब असा होता. हल्लीं त्या माशाचा सांगाडा तेथें पडला आहे. आतां त्याच्या तोंडाजवळचा सांगाडा फक्त शिल्लक आहे. या सांगाड्याचीं हाडें मोठ्या तुळवटायेवढीं आहेत. मीं स्वतः हात लावून पाहिलें. येथें कांहीं पताकाही उभारल्या आहेत. त्या कां ? तर म्हणे तो नवसास पावतो.

श्री वेळणेश्वर, श्रीरामेश्वर, श्रीगणपति (हें देवालय माहाजन गोखले यांनीं बांधिलें.) श्री वेळणेश्वराचे दक्षिण अंगास एका देऊळांत—बहिरी, गांवराखा, झालबाई, भुताई, झालाई, या मूर्ती आहेत. कृष्णाजी बाळाजी (मागें सांगितलें आहे कीं जे वेळणेश्वर येथें मयत झाले म्हणून,) यांचीच बायको सती गेली होती. याच कृष्णाजीपंतांनीं अथणीहून सुमारें ९०।९५ वर्षांपूर्वी या मूर्ती आणून या ठिकाणीं ठेविल्या. वेळणेश्वर गांव अगदीं डोंगरांत आहे. समुद्राचे तीरावर मात्र सपाटी आहे.

मोरेश्वर व सदाशिव या बंधूंनीं आपल्या वडिलांचें दुकान चालविलें आहे. गणेश हरी महाड येथें अव्वल कारकून आहे. गोपाळ हरी यानें गुहागर येथें चहाचें दुकान काढिलें आहे. पद्माकर चिंतामण व पुरुषोत्तम लक्ष्मण हे ताम्हनमळा येथें शेती करून आहेत.

भास्कर बाळाजीचे पुत्र पांच; पैकीं, तिघांचा वंश चालू आहे. श्रीधर, केशव व दिनकर भास्कर; श्रीधर यांस पुत्र चार; भास्कर यांचे पांच पुत्रांपैकीं नारायण हा वारल्यानंतर, या चौघांभावांमध्यें खासगत वांटणी जाहालीः– "यादी खासगत वांटणी संबंधें ठराव–श्रीधर भास्कर, केसो भास्कर, दिनकर भास्कर, व बाळाजी भास्कर गोखले खोत मौजे ताम्हनमळा तर्फ वेलंब ता॥ अंजनवेल सु॥ सितैन मयातैन व आलफ शके १७८२ रौद्र नाम संवत्सरे माहे मे सन १८६० इसवी वैशाख मास "

ताम्हनमळा येथें गोखले यांचीं जीं १४।१५ घरें आहेत त्यांतच कै. नामदार गोखले यांचे वडील कृष्णाजी व चुलते अंताजी हे शेती करून एकत्र

रहात होते. इतकेंच नव्हे तर नामदार साहेबांचे वडील कृष्णाजी हे लहानपणीं आपल्या घरचीं गुरें राखीत असत. त्यांना फक्त मराठी लिहितांवाचतां येत होतें. त्यामुळें पुढें त्यांना कागल संस्थानांत कारकुनाची नोकरी मिळाली. त्यांचे पोटीं गोपाळरावांसारखें नररत्न जन्मास आलें. कृष्णाजीपंत व त्यांचे वडील बंधू अंताजीपंत हे अखेरपर्यंत एकत्र होते. इतकेंच नव्हे तर कै. ना. गोपाळराव व अंताजीपंतांचे पुत्र भिकाजीपंत हेही विभक्त न होतां प्रेमानें रहात असत. भिकाजीपंत शेती करून ताम्हनमळा येथें वडिलार्जित ठिकाणांत रहात आहेत. भिकाजीपंतांचे चुलते माहादेव श्रीधर हे येथेंच शेती करून रहात आहेत.

भिकाजीपंत यांचे बंधु जगन्नाथपंत हे उमरावती येथें सराफी धंदा करीत आहेत. तसेच दिनकर अनंत हे खामगांव येथें सराफी करीत आहेत. केशव अंताजी हे घरींच शेती करून आहेत. .

ताम्हनमळा येथील गोखले घराण्यांत अलीकडील ५० वर्षांत गोपाळरावांसारखा विद्वान पुरुष कोणीच झाला नाहीं. गोपाळराव यांचा जन्म ता. ९ मे सन १८६६ इ. रोजीं चिपळोण नजीक मौजे कोतळुक या गांवीं आजोळीं जाहला. यांचे वडील कृष्णराव हे कागल संस्थानांत फौजदार होते. गोपाळराव व यांचे बंधु गोविंदराव या दोघांचा मराठी अभ्यास जाहल्यावर, त्यांना इंग्रजी शिक्षणाकरितां कोल्हापूर येथें ठेविलें होतें. गोपाळरावांच्या १३ व्या वर्षीच यांचे वडील मृत्यु पावले. त्यामुळें या दोघां बंधूंवर फारच अडचणीचा प्रसंग गुदरला. घरची फारच गरीबी, त्यांत वडिलांचा अंत, यामुळें प्रपंच व शिक्षण चालणें फारच अवघड झालें. यामुळें गोविंदरावांना शिक्षण सोडून कागल संस्थानांत नोकरी पतकरावी लागली. प्रपंच संभाळून गोविंदरावांनीं गोपाळरावास शिक्षणाचे कामीं मदत केली. इ. स. १८८२ त गोपाळराव पी. ई. जाहले. याच सुमारास कै. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांची निबंधमाला प्रसिद्ध होत असल्यामुळें, तत्कालीन पुढारी मंडळींच्या व्याख्यानानें व इतर चळवळीनें जें शिक्षणाचें कार्य जाहलें; तें शास्त्रीबोवांच्या फक्त लेखांनीं केलें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या वेळच्या हिंदुस्थानच्या परिस्थितीचा आणि धार्मिक, सामाजिक व राजकीय प्रश्नांचा खल करणारा एक वर्ग तयार होत होता. चालूं परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्यास हिंदुस्थानची परिस्थिती किती भयंकर होईल वगैरे विचारांनीं सर्वांचीं मनें क्षुब्ध झालीं होतीं. सर्व हिंदुस्थानांत देशाभिमानाचे विचार जागृत होऊं लागले. त्यामुळें तत्कालीन कॉलेजांतील कांहीं विद्यार्थ्यांचीं मनें या मार्गाकडे वळलीं. त्यांत गोपाळरावांचे विचारतरंग याविषयीं सारखे चालूं होते.

गोपाळराव इ. स. १८८३त फर्स्ट बी. ए.झाले. पुढें यांनीं आपला आवडता गणित विषय घेऊन १८८४ त बी. ए. पास होऊन दुसऱ्या वर्गांत आले. यावेळीं यांचें वय सुमारें१८वर्षांचें होतें.गोपाळरावांना प्रापंचिक अडचणीमुळें नोकरी

पतकरावी लागली. त्यावेळीं त्यांना मोठ्या पगाराची नोकरी सहज मिळाली असती. परंतु सार्वजनिक देशहिताच्या संस्थेची नोकरी करून प्रपंच भागला तरी पुरे, अशा मताचे हे असल्यामुळें, गोपाळरावांनीं कमी पगारावर न्यूइंग्लिश स्कूलसारख्या शिक्षणसंस्थेंत नोकरी धरली. या वेळीं या संस्थेंत टिळक, आगरकर, नामजोशी, केळकर, धारप व गोळे हे सभासद होते. या सुमारास या मंडळींनीं कॉलेज काढण्याचा विचार केला. आणि डे. ए. सोसायटी संस्था स्थापन केली.

गोपाळराव यांनीं अंकगणित लिहिलें तें शाळाखात्यांत अद्यापि चालूं आहे. या पुस्तकामुळें यांना प्रपंचास पुष्कळ मदत झाली. गोपाळरावांनीं आपल्या-शिक्षणाचे वेळीं आपणास गोविंदरावांनीं केलेली मदत न विसरता पुढें त्यांच्या कुटुंबाचें सर्वस्वीं पालन केलें.

इ. स. १८८७ सालांत गोपाळराव फर्ग्युसन कालेजांत शिक्षक झाले. या-वेळीं कॉलेज स्थापन होऊन तीन वर्षें जाहलीं होतीं. पुढें सन १८९२ पासून तें कॉलेज संपूर्ण जाहलें. गोपाळराव हे इंग्रजी विषयाचे प्रोफेसर होते. सन १८९० सालीं टिळकांनीं डे. ए. सोसायटीचा संबंध सोडल्यावर गोपाळरावांनीं सुमारें एक वर्ष गणित शिकविलें. गोपाळराव न्यूइंग्लिश स्कूलचे लाईफमेंबर झाल्यावर संस्थेंत तंटे सुरू झाले. त्यांत एक पक्ष आगरकर यांचा व दुसरा टिळक यांचा. मुख्य तंटा तत्वाबद्दल होता. सामाजिक सुधारणा प्रथम कीं, राजकीय सुधारणा प्रथम हाच मतभेद होता. पुढें हें भांडण इतकें विकोपास गेलें कीं, आगरकर यांनीं सन १८८८ च्या विजयादशमीचे दिवशीं 'सुधारक' या नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें. आर्यभूषण छापखान्यांत मंगळवारीं निघणारा केसरी व आर्यविजय छापखान्यांत सोमवारीं निघणारा सुधारक यांमध्यें संमती वयाचे बिलासंबंधीं लढाई सुरू झाली. याच वेळीं गोपाळरावही सुधारक पंथाचें अनुयायी बनले. आणि सुधारकाच्या इंग्रजी कॉलमाचे संपादक झाले. आगरकरांचे जे विशिष्ट गुण वर्णनीय होते ते त्यांचे शिष्य गोपाळराव यांचे अंगीं न आल्या-मुळें, आणि पुढें या सुधारक पंथास गोपाळरावा इतपतही कोणी वाली नसल्या-मुळें या पंथाचें सर्व धूरीणत्व गोपाळरावांकडेच आलें. सन १८८८ सालीं सार्व-जनिक सभेचे ते दुय्यम सेक्रेटरी जाहले. आणि १८९० सालीं सभेच्या त्रैमासि-काचे गोपाळराव संपादक झाले. हे पुढें सार्वजनिक कामांतही मिसळूं लागले. राष्ट्रीय सभा, प्रांतिक सभा वगैरे ठिकाणीं हे व्याख्यानें देऊं लागले. सन १८९५ त पुणें येथें भरलेल्या राष्ट्रीयसभेचे ते सेक्रेटरी होते. सन १८९७ सालीं विलायतेस हिंदुस्थानच्या वतीनें गेलेल्या प्रतिनिधींपैकीं हे एक प्रतिनिधी होते. त्यावेळीं विलायतेंत कमिशनपुढें सर्वांत उत्तम महत्वाची अशी साक्ष गोपाळ-रावांनींच दिली. उलटतपासणीचे वेळीं प्रश्नांचीं उत्तरें निस्पृहपणानें चोख

दिलीं. त्यांमुळें गोपाळरावांची सर्वतोमुखीं स्तुती सुरूं झाली. आणि पुढें त्यांची राष्ट्रीय पुढाऱ्यांत गणना होऊं लागली.

हिंदुस्थानांतील प्लेग निर्मूल करण्याकरितां अधिकारीवर्गानें जें त्यावेळीं अमानुष वर्तन केलें. तें गोपाळरावांना इकडून पत्रद्वारें कळविलें. तिकडे गोपाळरावांनीं, सर उईलियम वेडरबर्न व दादाभाई प्रभृती यांच्या सल्ल्यानें इकडील अधिकाऱ्यांचे प्लेगप्रतिबंधक जुलमी उपाय इंग्लंडांत प्रसिद्ध केलें. त्यामुळें इंग्लंडमध्यें गडबड उडाली. आणि तिकडील सरकारनें इकडील अधिकाऱ्यांस तारा केल्या. अधिकाऱ्यांनीं इकडून गोखले यांचीं विधानें 'दुष्टपणाचीं केवळ रचींव आहेत, साफ खोटीं आहेत.' असें तारेनें उत्तर पाठविलें. इंग्लंडाहून गोपाळराव परत हिंदुस्थानांत येऊन पोंचतांच वरील आरोपांचें समर्थन कारण्याकरतां गोपाळरावांस विचारण्यांत आलें. वरील आरोपांचें समर्थन गोपाळराव यांच्याकडोन न झाल्यामुळे सरकारची माफी मागावी लागली. गोपाळराव विलायतेंत असतांना ज्यांनीं पत्रद्वारें हिंदुस्थानांतील अधिकारीवर्गाकडोन झालेले अत्याचार कळविलें त्यांच्याकडोन व इतर सर्व लोकांकडून गोपाळरावांच्या बाजूचा पुरावा पुष्कळ मिळाला असतां मुंबईच्या अधिकाऱ्यानें ज्या पद्धतीनें पुराव्याच्या अभावीं गोपाळरावांस दोषी ठरविलें ती पद्धत अधिकारपक्षीयच असणार !!

गोपाळरावांनीं कमिशनपुढें जी साक्ष दिली ती अवर्णनीय होती म्हणून यांची देशभक्ती पाहून सर्वत्रांच्या मनोवृत्ती गोपाळरावांसंबंधीं पूज्य झाल्या. अशी स्थिति असतां, गोपाळरावांचा स्वभाव गरीब व भिन्ना असल्यामुळें सरकारच्या बुजगावणीला ते बळी पडले. आणि पुढें गोपाळराव इतके मवाळ व सरकारपक्षीय राजनिष्ठ बनले कीं, गोपाळरावां इतका दिव्य राजनिष्ठ आजपर्यंत कोणीच जाहला नाहीं व पुढेही होणार नाहीं हें मात्र खास!! गोपाळरावांनीं विलायतचा प्रवास केला. त्यामुळें आणि पुढारी असून विशेष वाचन असल्यामुळें, सरकारचे डावेंपेंच त्यांना समजावयास पाहिजे होते. सन १८९७सालीं गोपाळराव माफी प्रकरणांतून सुटून सरकारच्या प्रीतीला प्रात जाहले. म्हणून म्हणतों, सरकारचें धोरण गोपाळरावांस बिलकूल समजलें नसावें. परंतु असें म्हणणें म्हणजे अज्ञानपणाचें होईल ! गोपाळरावांस सरकारचें धोरण ऊर्फ पोटांतले पाय समजले असलेच पाहिजेत; परंतु सरकाराविरुद्ध सरकारचीं कृष्णकृत्यें लोकांपुढें आणून सरकारच्या अवकृपेला पात्र होऊन यातना भोगण्याइतकें, गोपाळरावांचे अंगीं धैर्य नसल्यामुळें ते लोकप्रीतीला कायमचे अंतरले. जें सरकार लोकतंत्री राज्यपद्धती ज्या विरुद्ध होतें, त्या सरकारची खुशामत करणारे लोक अशिक्षितां पैकींच असणार परंतु अशा वर्गांत विद्वान असणारा विरळा. इंग्रज सरकार या राजनैतिक बाबतींत एका अर्थानें अन्यायी व प्रजाद्रोही होतें हें जर कोणी चांगलें

ओळखलें असेल तर प्रस्तुत लेखकानें होय. प्रत्यक्ष अनुभवानें १८९७त ही गोष्ट पूर्ण ओळखून, राजकीय बाब प्रस्तुत लेखकास सोडणें भाग पडलें. जेथें न्याय असेल तेथें वादविवाद करावा अशा मताचा मी आहें. तसेंच सरकारच्या मायावी अमिषास जो भुलतो तोच सरकारप्रिय होऊन पदवीधर बनून द्रव्यसंचय करितो. दारु-पिऊं नका म्हणणारा, सरकारचे अन्याय जगापुढें आणणारा, देशाभिमानी व धर्माभिमानी अशाव्यक्तींनां सरकार पाण्यांत पहातें आणि वाटेल तें करून त्यांना रसातळाला पोचवितें. या सर्व गोष्टींचा विचार करितां असें म्हणणें भाग पडतें कीं, गोपाळराव जर भित्रे नसून धैर्यवान असते व थोडे कष्ट सोसण्यास तयार जाहले असते तर ते खात्रीनें लोकप्रिय होऊन त्यांच्याअंगीं दिव्यशक्ती प्राप्त जाहली असती. कारण, कांहीं झालें तरी गोपाळराव हिरा तो हिरा.

गोपाळराव अत्यंत हुषार, कष्टाळू, देशभक्त, स्वभावाचे गरीब, मनमिळाऊ, देखणे, मनाचे कोमल पण भित्रे होते. हा भित्रेपणा जर गोपाळरावांच्या अंगीं नसता, तर त्यांच्याइतका लोकप्रिय पुरुष दुसरा कोणी झाला नाहीं व पुढेंही होणार नाहीं असें म्हणावें लागलें असतें. सरकारपक्षानें वाघून पदव्या मिळविणें व मोठमोठ्या अधिकाराच्या जागा मिळविणें हें काम अक्षरशत्रूही करूं शकतो. मग सुशिक्षित तें सहज करूं शकेल ! ! गोपाळराव १९०२ मध्यें वरिष्ठ कायदे कौन्सीलचे सभासद जाहले. १९०४ सालीं लार्ड कर्झन यांनीं गोपाळरावांना सी. आय. ई. पदवी अर्पण केली. हें पदवीदानाचें अमोल्य जूं गोपाळरावांच्या खांद्यावर मोठ्या प्रेमानें बसलें; व तें सरकारप्रेम वृद्धिंगत करूं लागलें. तें सन १९०५ सालीं पुण्याचे म्युनिसिपल अध्यक्ष झाले. गोपाळराव युनिव्हर्सिटीचे फेलो शेवटपर्यंत होते. हे विद्याव्यासंगी असल्यामुळें, विश्वविद्यालयावर लॉर्ड कर्झन यांनीं जी गदा उगारिली होती ती गदा यांनीं कायदेकौन्सिलांत आपल्या विद्वत्तेनें उत्तम कोटिक्रम करून खालीं पाडिली. सन १९०५ सालीं गोपाळराव इंग्लंडला गेले होते. तेथें हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांचीं गाऱ्हाणीं, हिंदुस्थानावरील सहानुभूती बाळगणाऱ्यांच्या सहाय्यानें बरेच दिवस ब्रिटिश लोकांपुढें मांडण्याचा यांनीं प्रयत्न केला. वरील कामगिरीबद्दल स्वदेशीं परत आल्यावर गोपाळरावांचा इकडे सर्वत्र बहुमान जाहला. याच सालीं गोपाळरावांना राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला होता. सन १९०६ व १९०८ सालीं हे विलायतेस गेले होते. सन १९०५ सालीं सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी स्थापन करण्यांत आली, वगैरे बऱ्याच कामगिऱ्या यांनीं केल्या आहेत.

गोपाळरावांचें संपूर्ण चरित्र ज्यांना वाचावयाचें असेल त्यांनीं सांगलीचे गणेश रघुनाथ अभ्यंकर यांनीं लिहिलेलें चरित्र अवश्य वाचावें. मात्र सदरहू चरित्रांत स्तुतिपाठकपणा विशेष केला असून, गोपाळरावांचा द्वेष करणारा एक वर्ग होता, असें म्हणून त्या वर्गावर जरा तोंडसुख घेतलें आहे. अभिमानाचे भरांत मनुष्य

कै० नामदार गो. कृ. गोखले, नाम्हनमळा.

लिहून जातो. परंतु तो असा विचार करीत नाहीं कीं, विरुद्ध वर्गासंबंधीं गोपाळरावांचे अनुयायांनीं सुद्धां वाटेल ती असंभवनीय टीका त्या वर्गावर केली असेल. गोपाळरावांचे कक्षेंतील 'ज्ञानप्रकाश' पत्रांत, प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी जगमान्य केसरी पत्रांत प्रसिद्ध झाल्या कीं, त्याचे विरुद्ध प्रकाश पडलाच ! तेव्हां माझें म्हणणें असें आहे कीं, कोणीही सर्वज्ञ नाहीं. या दृष्टीनें पहातां प्रत्येकांत दोष हे असणारच ! आणि केव्हांही वाईट गोष्टी शिकविल्याशिवाय येतात; म्हणून चांगल्या गोष्टींकरितांच शाळा आहेत. ज्यांचें चरित्र लिहावयाचें त्यानें उत्तम गोष्टी कोणत्या केल्या त्या जगापुढें मांडणें हेंच खरें चरित्र होय. नाहीं तर चरित्र लिहितांना चरित्रनायकाची स्तुती आणि दुसऱ्यांची निंदा, असें कर्म कधींही करूं नये. चांगलें द्यावें व चांगलें घ्यावें हेंच सर्वमान्य आहे. असो, रा. ग. र. अभ्यंकर यांनीं गोखल्यांचें लिहिलेलें चरित्र त्यांतील पक्षाभिमानाचा कुटिल टीकात्मक दोष बाजुला ठेविल्यास तें वाचनीय जाहलें असून थोडक्यांत सर्व माहिती दिली आहे. नामदार गोखल्यांसारखे कर्तृत्ववान पुरुषाचें चरित्र आरंभापासून साद्यंत फक्त गोपाळरावांनीं केलेल्या स्तुत्य कामगिरीचें वर्णन व त्याबद्दल त्यांचे परिश्रम वगैरे गुणांसंबंधीं जो कोणी द्वेषबुद्धी सोडून लिहील, तें चरित्र लोकप्रिय जाहल्याशिवाय रहाणार नाहीं. हा गोखले घराण्याचा इतिहास असल्यानें व गोखल्यांसंबंधीं जुना इतिहास जेवढा उपलब्ध होईल तेवढा प्रसिद्ध करावयाचा असल्यामुळें, येथें नामदार गोखल्यांची त्रोटक माहिती दिली आहे.

इ. स. १९१५ सालीं गोपाळराव मरण पावले. यांचें लग्न ताम्हनमळा येथेंच जाहल्याचें समजतें. यांना फक्त दोन मुली होत्या. पैकीं सौ० काशीताई या एकट्याच आहेत; यांचें लग्न आय. सी. एस् ढवळे यांच्याशीं झालें आहे. यांचें सासरचें नांव सौ. आनंदीबाई ढवळे असें आहे.ह्या बी. ए.आहेत. यांना पुत्ररत्न झालें आहे. यांचा स्वभाव शांत व गरीब आहे. ताम्हनमळा येथून चिपळुणास जाण्याकरितां, ताम्हनमळा येथील गोखले मंडळीनीं साधारण रस्ता तयार केला. 'गणेशखिंड ताम्हनमळा' असें नांव देऊन तो तालुकाबोर्डानें साधारणपणें तयार केला. पुढें कै. नामदार गोखले मरण पावल्यावर सन १९१६ सालीं तालुकाबोर्डानें त्यांचें स्मारक म्हणून त्याला 'गोखले रोड' असें नांव देऊन, त्याच सालीं गणेशखिंडींत जेथून या रस्त्याला आरंभ होतो त्यालगत गोखल्यांचे नांवाचा स्तंभ उभारून पक्का रस्ता करण्याला सुरवात केली. हा रस्ता नामदारांचे सख्खे चुलत बंधु भिकाजीपंत यांच्या घराजवळून पुढें गेला आहे. चिपळोण ते गुहागर रोड जो जातो त्या रोडच्या सह्याद्री मैलावर गणेशखिंड आहे. या खिंडीपासून हा 'गोखले रोड' गोखल्यांचे घरापर्यंत १० मैल ३ फर्लांग आहे. भिकाजीपंत गोखले यांची व या लेखकाची वेळणेश्वरीं भेट जाहली. यापूर्वी त्यांच्याशीं पत्रव्यवहार झाला होता. यांनीं ताम्हनमळा येथें जाण्याचा या

लेखकास आग्रह केला आणि दोन पत्रें ओळखीकरितां दिलीं. भिकाजीपंत व त्यांचे बंधु केशवराव यांनीं आणि ताम्हनमळा येथील गोविंद व्यंकटेश व भार्गवराम यशेश्वर यांनीं परिश्रम घेऊन माहिती दिली आणि या लेखकाचें विशेष स्वागत केलें त्याबद्दल हा लेखक त्या सर्वांचा आभारी आहे. त्यांत भिकाजीपंतांनीं विशेष परिश्रम केले आहेत, असें म्हणणें भाग पडतें.

केशव भास्कर ऊर्फ भाऊसाहेब गोखले हे वयाचे १२ वे वर्षी मुंबईला आले. येथें विद्याभ्यास करून नंतर ठाणे जिल्ह्यांत पोलीस खात्यांत नोकर राहिले. हे ठाणे येथें कोतवाल होते म्हणजे फौजदार होते. यानंतर बावडा संस्थानांत कारभारी होते. त्यानंतर विशाळगड संस्थानांत कारभारी होते. त्यानंतर कोल्हापूर दरबारीं खासगी कारभारी होते. पुढें पेनशन झाल्यावर काशीयात्रेला गेले. श्रीक्षेत्र काशी येथें सन १८८४ मार्च ता. २२ रोजीं यांचा अंत झाला. यांनीं ता. २१ मार्च सन १८८४ रोजीं मृत्युपत्र केलेलें हल्लीं त्यांच्या नातवंडाजवळ आहे. सदरहु मृत्युपत्र या लेखकानें पाहिलें आहे. मृत्युपत्राप्रमाणें पुढें मुलांनीं वागावें येवढ्याकरितां जें एका कलमांत एक वाक्य त्या मृत्युपत्रांत आहे तेवढेंच येथें देतोः—" चिरंजीव रामचंद्र ऊर्फ तात्या व नातू नारायण ऊर्फ नानबा यांनीं या मृत्युपत्राप्रमाणें वागावें अंतर केल्यास मात्रागमन केल्याचें पातक घडेल. " अहा अहा ! कोण ही धर्मनिष्ठा ! ! हल्लीं धर्मनिष्ठेची काय स्थिती झाली आहे पहा. आधीं धर्मच पळाला ! मग निष्ठा बिचारी कशी राहणार ! ! रामचंद्र केशव हे सांगली येथें १९०४ सालीं वारले. यांनींही मृत्युपत्र केलें आहे. हे कोल्हापूर येथें नोकर होते. नाझरच्या जागेवर यांनीं पेनशन घेतलें. यांना पुत्र पांच; पैकीं पहिले नारायण ऊर्फ नानबा गोखले यांचें थोडेसें इंग्रजी शिक्षण होऊन ते नट बनले. हे नामांकित नट असून यांनीं " लोकमान्य नाटक मंडळी " या नांवाची स्वतःच्या मालकीची नाटक कंपनी चालविली आहे. हे पहिल्या कुटुंबाचे पुत्र होत. रामचंद्रपंतांचे दुसरे कुटुंबास चार मुलगे; पैकीं सिताराम ऊर्फ पंडित हे बी. ए. असून पुणें येथें लँड रेकार्डमध्यें नोकर आहेत. गजानन गव्हर्नमेंट लॅबोरेटरीमध्यें नोकर आहेत.

रघुनाथ बाळाजीचे नातू भास्कर व रामचंद्र बाळाजी हे ताम्हनमळा येथें शेती करून आहेत. महेश्वर व भार्गव रामचंद्र हे मुंबई येथें म्युनिसिपालिटींत नोकर आहेत. बाळाजी माहादेव यांचे पणतू–व्यंकटेश व रघुनाथ शिवराम हेही ताम्हनमळा येथेंच शेती करून आहेत. गोविंद व्यंकटेश हे पूर्वी नोकर होते. परंतु हल्लीं घरींच शेती करतात. कृष्णाजी व्यंकटेश हे मुंबई येथें नोकर आहेत. जगन्नाथ दादा गोखले यांच्या पैकीं जे जुने पुरुष होऊन गेले, त्यांचा उल्लेख मागें झालाच आहे. त्यांच्या घराचा चौथरा मात्र हल्लीं आहे. तो व्यंकटेश शिवराम गोखले यांच्या घराचे वरचे बाजूस आहे.

कांदळ येथील गोखले. नं. ३

जिल्हा रत्नागिरी तालुका मालवण नजीक सुमारें पांच मैलांवर कांदळ हा गांव आहे. या गांवांत श्री रामेश्वराचें देवालय असून हें जागृत देवस्थान आहे. कांदळ गांवचे गोखल्यांचा हा ग्रामदेव आहे. कांदळहून कृष्णंभट गोखले उत्तम वैदिक असल्यामुळें, राजधानी नगरी 'सातारा' या शहरीं आले. त्यावेळीं शाहू छत्रपती सिंहासनारूढ होऊन राज्य करूं लागले होते. कृष्णंभट गोखले विद्वान् असून नुकतेच कोंकणांतून आलेले असल्यामुळें त्यांची तेथें बरीच मान्यता जाहली. याच सुमारास साताऱ्याजवळ क्षेत्र माहुलीनजीक माहागांव म्हणून एक खेडे गांव आहे. तो गांव माहाराज सरकारांनीं चाळीस ब्राह्मणांस अग्रहार दिल्याचें समजतें. सदरहु चाळीस ब्राह्मणांत यांचेंही नांव नमूद झाल्यामुळें कृष्णंभट गोखले हे माहागांवीं जाऊन राहिले. बारा बिघे इनाम जमीन मिळाल्यामुळें कृष्णंभट गोखले यांनीं कोंकणांत जाऊन बायकामुलांस घेऊन ते माहागांवीं येऊन राहिले. या गोष्टीस सुमारें दीडशें वर्षे होतील.

कृष्णंभटाचे पुत्र बाळंभट ऊर्फ बल्लाळ; बल्लाळ यांस पुत्र चार; लक्ष्मण, रामचंद्र व चिंतामणी; चौथा शिवराम हा लवकरच मृत्यु पावला. चिंतामण बल्लाळ हा पुरुष माहागांवाहून निघोन पुण्यास आला. नंतर भिडे यांचा गांव रहाटणी येथें कांहीं दिवस राहून, मग चिंचवड येथें राहिले. हे गणेशभक्त होते. हे पुणें येथें कसब्याचे श्री गणपतीचे देवालयांत चाळीस पन्नास वर्षे तपश्चर्या करून व देवाची पूजा करून असल्यामुळें यांना पेशवे यांच्याकडोन नेमणूक सुरू झाली. यांचे चिरंजीव माहादेवभट चिंतामणभट यांनीं ती नेमणूक आपणांस मिळण्याबद्दल केलेली खटपट पुढील पुराव्यावरून सिद्ध होत आहे.

मामलेदार तो शहर पुणें यांचेसमोर.

" जबानी वो माहादेवभट बिन चिंतामणभट आडनांव गोखले जात ब्राह्मण उमर वर्षे ५८ कसब भिक्षुकीचें राहणार पेठ कसबा शहर पुणें प्रोवर लिहून देतों. आमचे तीर्थरूप चिंतामणभट गोखले हे पेठ कसबा येथें श्री गणपतीचे देवालयांत आजमासें चाळीस पन्नास वर्षे तपश्चर्या व देवाची पूजा करून असल्यामुळें श्रीमंत बाजीराव रघुनाथ प्रधान पेशवे यांनीं वर्षासन रुपये १५० व श्री गणपतीचे पूजेबद्दा रुपये ५० एकूण रुपये २०० तो वसईपैकीं दरसाल पावण्याची नेमणूक करून त्याजबद्दा सनद सुद्धा समान तिसैन मयातैन व आलफ छ२ रमजानची करून दिल्ही ती हल्लीं असल हजर करून नकल करून दिल्ही आहे. सदरहु सनदेप्रमाणें दोनशें रुपये पेशवे सरकारांतून लढाईअखेर पावत आले व हाल सरकारांतूनही आमचे तीर्थरूप इयात होते तोंपर्यंत सुमारें पांच सहा वर्षे

पावले. शके १७४५ सालीं चिंतामणभट मैयत झाल्या पासोन १५० रुपये आम्हांस पावले नाहींत. पन्नास रुपये श्री गणपतीचे पूजेचा दोन साला पैसा पाऊन पुढें हरकत होऊन गणपतीची पूजा केल्याचा दाखला आणा म्हणजे मिळतील म्हणोन सांगून रुपये मिळणे बंद जाले. नंतर आम्ही ता। २२ माहे आग्टंबर सन १८२६ इा। ची अर्जी खु।। फष्ट आ।। कलेकटर बाहादूर जिल्हा पुणें याजकडे करून त्याचे हु।। वरून चौकशी होऊन आम्ही गणपतीची पूजा करीत असतों म्हणोन दाखला ता। २ नवंबर १८२६ चा मिळून आम्हांस पैसा मिळाला आहे व पुढें साल दरसाल आज पावेतों पूजेचा दाखला दाखवून आम्ही पैसा ता। वसई येथून घेत आहोंत. दरम्यान कधीं हरकत नाहीं. पूर्वी हरकत पडून निकाल होऊन हु।। जाल्याचा दाखला मजपासीं आहे त्याची असल वा। नकल दिल्ही आहे हें लिहून दिल्हें सही ता। सदरहु नेमणूक आमचे तीर्थरूप चिंतामणभट गोखले यांनीं संपादन केली. सा।। त्याचे आज्याचे नांवापासोन वंशवेल करून दिल्हा आहे तो खरा आहे ता। १० माहे डिसेंबर सन १८६४ इ।।

सही माहादेवभट विन चिंतामणभट गोखले द. खु.

साक्ष

१ बाळाजी रामचंद्र लेले द. खु. } आमचे समोर प्रोवर लिहून दिल्हे ता।
१ अमृत विठ्ठल गु।। कुलकर्णी द. खु. } मार मोरो विनायक मामलेदार पुणें.

सनदेची नकल.

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री वामनाजी हरी गोसावी यासी— सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सु।। समान तिसैन मयातैन व आलफ वे।। रो।। चिंतामणभट विन बाळंभट गोखले वा।। मौजे कांदळ गांव प्रां कुडाळ हे श्री गणपती कसबे पुणें येथें तपश्चर्या करून पूजा निष्ठेनें करितात सबब रुपये—

१५० वर्षासन सालीना.
५० श्री गणपतीचे पूजेचा।।
२००

येकूण दोनशे रुपये सालमजकुरींपासून करार केले असे तरी तो वसई पैकीं दरसाल देत जाणें जाणिजे छ. २ रमजान प।। हुजूर—(लेखनसिमा)

चिंतामणभट यांचे बंधू रामचंद्रभट हेही माहागांवाहून चिंचवड येथे येऊन राहिले. चिंचवड हा गांव मोरया गोसावी यांच्यामुळें प्रसिद्ध असून पुण्यापासून १२ मैल आहे. तेथें एक मोठे महान सत्पुरुष देशस्थ ब्राह्मण मोरया देव या नांवाचे होऊन गेले. ते तुकारामाचे समकालीन होते. या घराण्यांत पुष्कळ मोठाल्या देणग्या मिळाल्या असून त्यांस कित्येक गांवही इनाम मिळाले आहेत. चिंतामण-

भट बाळंभट गोखले हे ज्यावेळीं चिंचवडास आले त्यावेळीं मोरया देव यांचें घराणें चांगल्या स्थितींत होतें. येथें ब्राह्मण वस्तीही चांगलीच होती, त्यांत शास्त्री, वैदिक व पुराणिक यांचा भरणा विशेष होता. रामाजीपंतांनीं येथें व्यापारधंदा सुरू केला होता. यांनीं चिंचवड येथें घर बांधिलें. यांस पुत्र दोन; महेश्वर ऊर्फ मोरो व दुसरे रघुनाथ ऊर्फ राघो; हे दोघेही लहापणीं चिंचवड येथें होते. पुढें कांहीं बाहेर गांवीं जाऊन, पुन्हां चिंचवड येथेंच येऊन राहिले. मोरोपंतांनीं बैलाचे पाठीवरून देशावरील माल कोंकणांत पाठविणें व कोंकणांतील माल देशावर आणणें हा धंदा सुरू केला. यांत चांगली किफायत मिळाल्यावर देवघेवीचा उद्योगही सुरू केला. यांनीं चांगला लौकिक संपादून द्रव्यसंचयही बराच केला. यांनीं धर्मादायही बराच केला. मोरोपंत सुमारें ८५ वर्षांचे होऊन सन १८७७।७८ सालीं मयत जाहले. यांस औरस पुत्र नसल्यानें माहागांव येथें यांचे बंधू लक्ष्मणभट रहात होते त्यांचा गणेश नांवाचा मुलगा यांनीं दत्तक घेतला. गणपराव हेही वडिलार्जित धंदा करीत होते. हे सन १९११ चे सुमारास चिंचवड येथें पाऊणशें वर्षांचे होऊन वारले. यांचा नातू नारायण शिवराम व यांचा मुलगा भिकाजी हा अदमासें १६।१७ वर्षांचा असावा. हे चिंचवड येथें वडिलार्जित घरांत आहेत.

रामाजी पंतांचे दुसरे चिरंजीव रघुनाथ ऊर्फ राघो हे प्रथम कांहीं दिवस मसूर येथें मामलेदार कचेरींत कारकून होते. व कांहीं दिवस पुण्यासही नोकर होते. पुढें नोकरी सोडून चिंचवड येथें व्यापार करूं लागले. प्रथम एकत्रच होते. पुढें मोरोपंतांपासून विभक्त राहून व्यापारच करीत होते. राघोपंत हे भागवतधर्मी असून ज्ञानेश्वरी पंथाचे मोठे पुरस्कर्ते होते. यांचें गुरु घराणें नानाबुवा साखरे होत. राघोपंत हेही अधिकारयुक्त वाणीनें ज्ञानेश्वरीचें विवेचन करीत असत. हे अखेर अखेर संसारांत असूनही विरक्त बनले होते. " प्रपंच साधुनीं परमार्थ साधावा. " या उक्तीप्रमाणें. राघोपंतांची स्थिती होती. हे सन १८९७त चिंचवड येथें वारले. त्यांचे पुत्र दोन; रामचंद्र व लक्ष्मण. रामचंद्र हे पुणें जिल्ह्यांत प्रथम मास्तरपणा करून, नंतर बढोद्यास आपली आत्या राधाबाई साहेब पटवर्धन यांच्याकडे गेले. व तेथें त्यांनीं गायकवाडींत खासगी मास्तरची नोकरी पतकरली. पुढें गायकवाड सरकार यांचे पहिले घरचे बंधु वगैरे त्यांच्या कुटुंबांतील मुलांना शिकवीत होते. यांचे चिरंजीव केशवराव हे १८९७ सालीं प्लेगनें वारले. पुढें १९०४ चे सुमारास रामचंद्रपंतही वारले. केशवराव यांचे चिरंजीव विष्णु केशव हे ग्रॅट मेडिकल कॉलेजांत आहेत.

राघोपंतांचे दुसरे चिरंजीव लक्ष्मणराव; यांचा जन्म सन १८७० सालीं पुणें येथें झाला. लक्ष्मणराव यांस त्यांच्या वडिलांनीं १० । ११ वर्षांचे होईतों पावेतों विशेष शाळेचा त्रास दिला नाहीं, परंतु, संध्यादि-ब्रह्मकर्म व उपनिषदें वगैरे वैदिक

शिक्षण दिलें होतें. आणि रूपावळी, समासचक्र, अमरकोश व रघु वगैरे शिकविले. नंतर चिंचवड येथें चार वर्षें शाळेंतील अभ्यास जाहल्यावर, सन १८८३ सालीं पुणें येथें बहिणीचे घरीं इंग्रजी शिकण्याकरितां ठेविले ते पुणें हायस्कुलांत राहून सन १८८९ सालीं म्यॅट्रिक पास झाले. नंतर यांनीं हायकोर्ट वकिलाची परिक्षा दिली. आज हे पुण्यांतील दिवाणी कामांत पहिल्या प्रतीचे वकील आहेत.

लक्ष्मण बल्लाळ हे माहागांवीं राहिले. त्यास चार; काशीनाथ, चिंतामण, गणेश व रामचंद्र; काशीनाथाचे पणतु वासुदेव व बाळकृष्ण विष्णु हे सातारा येथें शिक्षणाकरितां राहिले आहेत. चिंतामणाचा माहादेव नांवाचा मुलगा परागंदा झाला आहे. गणेश हे चिंचवड येथें मोरोपंतास दत्तक गेले. रामचंद्र बल्लाळ यांचे चिरंजीव हरी हे आपल्या दोन मुलांसह माहागांवींच आहेत. हे शेतीवाडी कारितात. वडिलार्जित घर व जमीन शिवाय स्वसंपादित कोडोली, तांदुळवाडी वगैरे ठिकाणची शेतकी संभाळून आहेत. यांच्या पूर्वजांनीं माहागांव येथें सार्वजानिक फरशिचा रस्ता व विहीर बांधिली. कऱ्हाड तालुक्यांतील वडगांव निम्मे खरेदी केले.

पुणें येथील गोखले नं. ४

येशवंत आप्पाजी गोखले कोंकणांतून देशावर आले. यांना नळवाले गोखले असें म्हणतात. याचें कारण, शेवटचे बाजीराव पेशवे यांच्या कारकीर्दीत पाण्याचे नळावरील येशवंत आप्पाजी गोखले हे अधिकारी होते. म्हणून यांना नळवाले गोखले असें म्हणू लागले. यांनीं पुणें येथें घर बांधिलें. गोविंद येशवंत हे गोपाळ नाईक पेंडशे यांच्याकडे पागेवर नोकर होते. सर्वे ऑफ इंडियाच्या गुजराथ पार्टीमध्यें नोकर होते. नंतर रेलवे खात्यांत सर्वेअर होते. यांनीं बरेंच देशपर्यटन केलें आहे. यांचें वय ७७ । ७८ वर्षांचें आहे. यांचीं तिन्हीं मुलें वारलीं आहेत. परंतु तिन्हीं मुलांचा वंश चालू आहे. चिंतामण कृष्ण हा इंजिनीअर खात्यांत नोकर आहे. वामन बळवंत रेलवेंत नोकर आहे. नरहर विनायक हे मुंबई येथें म्युनिसिपालिटींत नोकर असून, गायक असल्यानें यांनीं गायन-वादन शाळा चालविली आहे. अनंत रेलवेंत व शंकर पाब्लिकवर्क्समध्यें नोकर आहेत. पुणें येथें सदाशिव पेठेंत घर आहे. त्याचे म्युनिसिपल नंबर ८५६ व ८५७ असे आहेत. हे वळेणेश्वरचे रहाणारे होत.

पुणें येथील गोखले. नं. ५

विनायक नारायण गोखले हे वेळणेश्वरहून पुण्यास आले. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीत पुण्यास आले. यांना तीन मुलगे; पैकीं गोपाळराव हे विशेष प्रसिद्धीला आले. गोपाळराव यांचे वडील विनायक नारायण हे सवाई माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दीत सरकार वाड्यांत कारकून होते. हे कारकून असून भाताचा व्यापार करीत असत. यांना जकातीची माफी दिल्याचें श्रीमंतांचें ताकीद–पत्र पुढें देत आहें:—

" दस्तक सरकार राजश्री पंत प्रधान ताा किल्लेदारान व चौकीदारान व रहदारान व बाजे लोकान व जकाती माा निहाय मुाा आर्बा तिसैन मया व आलफ रा विनायक नारायण गोखले कारकून निाा दफ्तर येक बेर्जी याचे तांदूळ खंडी ।॥· पंधरा मण येकूण बैल सर सात खेरीज फिर्गाण कोकणांतून खरीद-करून पुण्यास आणतील त्यास आणू देणें जकातचा तगादा न करणें जाणिजे. छ २८ रमजान आज्ञाप्रमाण. "

विनायक नारायण नोकरी व व्यापार करीत होते. यांचे चिरंजीव गोपाळराव यांनीं पुण्यांतील बरींच घरें विकत घेतलीं. तीं घरें मोडून त्यांतील उपयुक्त सामानाची दुरुस्ती करून नवीं घरें बांधित. त्यावेळीं गोपाळरावांना " घरमोडे गोखले" असेंच म्हणू लागले.यांचे चिरंजीव गणेश अल्पवयांत मरण पावले गोपाळराव यांनीं नातू विनायक यास बरोबर घेऊन यांना केल्या.यांनीं कृष्णभट खरे यांना जी मुलगी दिली होती तिला तपकीर गल्लीतील एक घर बाक्षिस दिलें. विद्यमान गोपाळरावांचें पणतू तिघेजण आहेत. त्यांचीं नारायणपेठेंत ५६३ व ८७ नंबरचीं अशीं दोन घरें खास मालकीचीं आहेत. चिंतामण व माधव विनायक व्यापार करितात आणि गोपाळ विनायक हे सरकारी नोकर आहेत.

वेंगुर्ला येथील गोखले. नं. ६

रत्नागिरी जिल्ह्यांतील तालुका वेंगुर्ला येथील गोखले मूळचे राहणार वेळणेश्वरचे, वेळणेश्वराहून असोली येथें प्रथम आले. नंतर हल्लींचें गांव वेंगुर्ला. माहादाजी मोरेश्वर हे वयोवृद्ध गृहस्थ हल्लीं आहेत. यांच्या वडिलांनीं घर बांधलें माहादाजी हे इंजिनिअर खात्यांत नोकर होते. पुढें कंटूक्टर झाले. हल्लीं उतार वयामुळें घरीं बसून आहेत. यांना अपत्य कांहीं नाहीं.

माहादाजी मोरेश्वर यांना पणजाचें नांव माहित नसल्यानें, येथील दामोदर विनायक गोखले यांचा त्यांच्या वंशांत कोठें मेळ बसत नाहीं. परंतु हे एकमेक दशांतील आहेत. विनायक सदाशिव हे असोलीहून वेंगुर्ल्यास आले. यांचे चिरं-

जीव दामोदर विनायक हे वैदिक होते. यांचे पांच पुत्र विद्यमान आहेत. दामोदर विनायक यांचे चुलत चुलते विष्णु सुखंभट हे संकेश्वर मठांत बरींच वर्षें होते. यांनीं वेंगुर्ल्यास येऊन चतुर्थाश्रम घेतला. यांचेच सख्खे बंधु विनायक हे सदाशिव यांनीं दत्तक घेतले. विष्णुपंत यांनीं चतुर्थाश्रम घेतल्यावर वेंगुर्ला येथेंच समाधिस्थ झाले. दामोदर विनायक यांच्या पांच मुलांपैकीं, पहिले चिरंजीव कृष्णराव हे नामांकित संगीत नट बनले. कृष्णराव गोखले यांना नाट्यकलेंत जें निपुणत्व आलें, त्याचें श्रेय त्यांचें मामा विष्णुपंत आपटे यांनाच दिलें पाहिजे. नाट्यकला ही किती योग्यतेची व महत्त्वाची आहे हें पाश्चात्य देशांत पाहिल्यास समजेल. लेखकापेक्षां, वक्तयाचें महत्त्व जास्त; आणि वक्तयापेक्षांही नटाचें महत्त्व जास्त आहे. असें असतां आमच्या हिंदुस्थानांतील नटवर्गानें दुर्व्यसनांचा स्वीकार करून त्या महत्त्वाची कवडीमोल किंमत केली. नटवर्ग आपल्या नाट्यकलेंत निपुण, आणि निर्व्यसनी राहून व्यवहारचतुर असा ज्यावेळीं होईल, त्याच वेळीं त्याच्या गुणाचें खरें चीज होईल यांत संदेह नाहीं. इकडील कांहीं नट आपल्या गुणांनीं प्रसिद्धीस जेवढे आले तेवढेही व्यसनाचे पायीं धुंद झाल्यामुळें सर्वांना अप्रिय झाले.

व्यसनाधीन न होतां चांगले राहून आपल्या कलेंतही निपूण असे नट कांहीं झाले असतील व हल्लींहि कांहीं आहेत,त्यापैकींच कृष्णराव गोखले हे एक आहेत. कृष्णराव यांनीं निरनिराळ्या कंपन्यांतून मुख्य भूमिकेचें काम केलें आहे. यांनीं पुरुषपार्टीपेक्षां स्त्रीपार्टीमध्यें विशेष प्राविण्य संपादिलें. प्रसिद्ध नट दत्तोपंत हल्याळकर व कृष्णाजीपंत गोखले यांनीं एके वेळीं लोकरंजनाचें काम फारच उत्तम केलें. त्यावेळीं हे दोघे व तिसरे विनूबोवा हे तिघेही कंपनीचे मालक होते. कृष्णरावांना सुवर्णचंदकें पुष्कळ मिळालीं आहेत. एके वेळीं हे 'वाशिमकर संगीत मंडळींत' असतांना कंपनी इंदोर येथें होती. कृष्णराव बाहेर फिरावयास नेहमीं जात. तसें फिरावयास गेले असतां मध्यंतरी रस्त्यावर एका बैराग्यास एक इसम बेसुमार मारूं लागला. पुष्कळ लोक रस्त्यानें जात येत होते परंतु कोणीही त्या बैराग्यास सोडवीना. कृष्णराव यांनीं तो प्रकार कांहीं वेळ पाहिल्यावर त्यांच्यानें राहवेना. एकदम त्यांनीं तेथें जाऊन बैराग्याला मारणाऱ्याचे हात धरून त्याला छडीचें तडाके देऊन बाजूला ओढून त्या बैराग्यास सोडविलें. हा बैराग्यास मारणारा कोण ? असा प्रश्न सहज येतो, आणि कां मारत होता ! तर बैराग्यास मारणारा इलेक्ट्रीक खात्याचा गोरा म्यानेजर. तो आपल्या शिपायाच्या सांगण्यावरून मारीत होता. कां तर तूं इलेक्ट्रीक तार कां तोडलीस असें म्हणून साहेब त्यास मारीत होता. बिचारा गरीब भिक्षा मागणारा बैरागी त्याचा तार तुटण्याशीं कांहीं संबंध नसतां मार खात होता. परंतु त्याच्या

नानाफडनवीस याचा भूमिका.

रा. रा. नारायण रामचंद्र ऊर्फ नानबा गोखले, (प्रसिद्ध प्रोजनट) ताम्हनमळा.

रा. रा. कृष्णाजी दामोदर गोखले, (प्रसिद्ध संगीत नट) बेंगुर्ला.

सुदैवानें ज्यांची भूतदया जागृत होती असे कृष्णराव गोखले त्या ठिकाणीं पोंचल्यामुळें तो बैरागी सुटला आणि कृष्णराव सांपडले. त्या साहेबानें आपल्या शिपायाच्या सहाय्यानें कृष्णरावास घरिलें आणि त्यांना पोलीस ऑफिसांत घेऊन चालला. रस्त्यानें जात असतां तेथील प्रसिद्ध फोटोग्राफर रामचंद्रराव प्रतापराव यांनीं आपल्या घरांतून कृष्णरावांना इलेक्ट्रीक म्यानेजर घरून नेत आहे हें पाहून ते पळत रस्त्यावर आले. आणि त्यांनीं त्या साहेबास आपली जामिनकी देऊन कृष्णरावास सोडविलें. पुढें त्या साहेबानें कृष्णराव यांचेवर खटला केला परंतु पुराव्याच्या अभावीं कृष्णराव सुटले. हे ताम्रमुखी अधिकारयुक्त असोत अगर नसोत हिंदुस्थानांत आल्यावर इतके बेफाम वागतात कीं, जनावर समजून माणसाची शिकार करितात अशीं उदाहरणें पुष्कळ मिळतील. आतां आमचे लोक इतके अविचारी व कर्तव्यपराङ्मुख बनले आहेत कीं, भूतदया ही त्यांच्या स्मरणांतही नाहीं. खरोखर कृष्णराव गोखले यांचें धाष्टर्य कौतुकाई आहे.

कृष्णराव यांनीं 'महाराष्ट्र संगीत मंडळी' या नांवाची कंपनी काढिली होती. परंतु मुंबई मुक्कामीं, 'श्री महालक्ष्मी प्रासादिक संगीत मंडळी' व महाराष्ट्र संगीत मंडळी एक झाली. कृष्णराव गोखले यांना "सारस्वत विद्यालय" कमेटीकडून सन १९११ सालीं सर चंदावरकर यांच्या हस्तें सुवर्णपदक मिळालें आहे. सावंतवाडीकर श्रीमंत राजे बहादर सरदेसाई यांच्या हस्तें सुवर्णपदक मिळालें आहे. श्रीमदिंदिराकांत तीर्थस्वामी याचे हस्तें, पणजीचे श्रीमंत विष्णुबाबा धेपे यांनीं ता. १३।३।१९१५ रोजीं सुवर्णपदक दिलें आहे. सन १९१० सालीं पणजीचे गव्हरनर यांचे हस्तें सुवर्णपदक मिळालें आहे. सन १९१५ त मालवण येथील मित्रमंडळीकडून सुवर्णपदक मिळालें आहे. कुमठ्यास एक मिळालें आहे. नाशिक येथें 'वैद्य संमेलनाच्या' वेळीं लोकमान्यांचे हस्तें सुवर्णपदक मिळालें आहे. टाईम्स आफ इंडियामध्यें यांचा फोटोही प्रसिद्ध झाला आहे. यांनीं नाटक कंपनीचा धंदा करून वेंगुर्ले येथील घर बांधिलें. पांच बंधूमध्यें हे वडील असल्यामुळें प्रपंच संभाळून आहेत. यांचा एक भाऊ कॉलेजांत होता. तो हल्लीं नॉनकोऑपरेशनमध्यें आहे. एक बंधू वैदिक आहे. कृष्णराव यांची प्रकृती मलेरियाच्या योगानें फार क्षीण झाली आहे. प्रकृती बरी नाहीं म्हणून त्यांनीं धंदा सोडिला आहे. स्वभाव फार गरीब असून मोठे करारी आहेत.

संस्थान औंध येथील गोखले. नं. ७

विश्वनाथ महादेव गोखले हे वेळणेश्वरहून पुण्यास आले. यांचे मुलगे गंगाधरशास्त्री, नारायण ऊर्फ बाळशास्त्री व अनंतशास्त्री; पैकीं गंगाधरशास्त्री यांचा वंश पुण्यास आहे. पेशवाईत ह्या तिन्ही शास्त्री बंधूंचा चांगला उत्कर्ष जाहला. सरकारवाड्यांतून चांगली संभावना होत असे. यांनीं पुण्यांत घर बांधिलें. सदरहु घर सदाशिव पेठेंत ३८७ नंबरचें आहे. या घरांत हल्लीं, गंगाधरशास्त्री यांचे पुत्र गोपाळशास्त्री यांचे नातू भालचंद्र अनंत हे रहात आहेत. अनंत गोपाळशास्त्री हे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर होते.

नारायण ऊर्फ बल्लाळशास्त्री यांचे चार पुत्रांपैकीं पहिले गणेश हे इंदोरला तुकोजीराव होळकर यांच्या कारकीर्दीत गेले होते. हे चांगल्यापैकीं वैद्य असल्यामुळें होळकर यांच्या कडोन यांना वार्षिक नेमणूक होती. म्हणून यांना तेथें राजवैद्य म्हणूं लागले. तुकोजीराव होळकर वारल्यानंतर गणेशशास्त्री देशीं परत येऊन, औंध येथें जाऊन राहिले. औंध येथें यांनीं घर आणि श्रीराममंदीरही बांधिलें. या राममंदिरास औंध संस्थानांतून उत्पन्न आहे. यांचे पुत्र तीन; बळवंत, जनार्दन ऊर्फ आपा व नारायण पैकीं जनार्दन ऊर्फ आपा हे नागपूर येथें मुलाजवळ आहेत. हे औंध संस्थानांत, वहिवाटदाराच्या जागेवर होते. हल्लींचे संस्थानचे मालक बाळासाहेबपंत हे संस्थानचे मालक झाल्यावर यांनीं नोकरी सोडून दिली.

जनार्दन आपा गोखले हे स्नानसंध्याशील असून, यांनीं उपनिषदेंहीं म्हटलीं आहेत. यांचे चिरंजीव रामचंद्र हे बी. ए. असून, नॉनकोआपरेशनमध्यें आहेत. हे नागपूर येथेंच असतात.

वामनराव बळवंत हे संस्थानांतच नोकर आहेत. यांचे वडील बळवंत गणेश हे संस्थानिकाचे चिटणीस होते. यांचे दुसरे मुलगे दिगंबर; दिगंबर यांचें मराठी शिक्षण औंध व सातारा येथें झाल्यावर इंग्रजी शिक्षण पुणें येथें झालें. हे फर्ग्युसन व डेक्कन कॉलेजांत होते. सन १९०९ सालीं बी. ए. झाले. पुढें सन १९१३ त एल्. एल्. बी. झाले. आणि हल्लीं सातारा येथेंच वकिली करीत आहेत. नारायण गणेश हे संस्थानांत वकिली करीत होते. यांचे मुलगे सहा; पैकीं सर्वांत मोठे परशराम नारायण हे इंदोर येथें वकिली करीत आहेत. आत्माराम नारायण हे सब् ओव्हरसीयर आहेत. लक्ष्मण नारायण हे फर्ग्युसन कालेजांत होते. हे बी ए. झाले आहेत.

गणेश बाळशास्त्री यांचे बंधु रामचंद्र बल्लाळ हे उज्जैन येथें नोकर होते. रामचंद्रपंत वारले तेव्हां यांचे चिरंजीव विष्णुपंत अवघे दोन वर्षांचे होते. विष्णुपंतांचें आजोळ सायगांव हे साताऱ्याजवळ आहे. विष्णुपंतांची मातोश्री आपल्या मुलासह माहेरीं आली. विष्णुपंतांचे आजोळचें उपनांव देवधर; भास्करपंत-

मामा यांनीं विष्णुपंतास आपल्याकडे जमखंडी येथें नेलें. येथें विष्णुपंत यांचें मराठी शिक्षण झाल्यावर, सायगांवचे पांडुरंगपंत आपटे हे बऱ्हाडांत आकोला येथें जातांना त्यांनीं विष्णुपंत गोखले यांस बरोबर नेलें. पुढें लौकरच सरकारी नोकर झाले. पुढें ८० रुपये पगारावर रेकार्डकीपरचे जागेवरचं यांनीं पेनशन घेतलें. यांनीं आकोल्यास खास घर केलें आहे. शिवाय एक लहानसें कापडाचें दुकानही घातलें आहे. यांनीं लहानपणीं फारच निकृष्टस्थितींत दिवस कांठिले. यांना दोन मुलगे आहेत. पैकीं अनंत विष्णु तेथेंच गिरणींत नोकर आहेत.

गजानन सोमनाथ हे सातारा येथेंच आहेत. आणि मोरेश्वर सोमनाथ हे गुणदाळ येथें कचेरींत नोकर आहेत.

अंबेर व सांगोले येथील गोखले. नं ८.

हें घराणें प्रथमचें वेळणेश्वरचें. वेळणेश्वराहून पुढें रामचंद्र गणेश हे असण अथवा असावण गांवीं आले. येथें बाटवाबाटवीच्या त्रासानें, रामचंद्र गणेश यांच्या तिन्ही मुलांनीं मिळून असावणच्या देसायास हजार रुपये देऊन, पुण्यास नातू यांचेकडे गेले. गणेश, भास्कर व कृष्णाजी रामचंद्र हे तिघेही बंधु पुण्यास होते. नंतर त्यांपैकीं भास्करराव हे सांगोल्याचे शेकदार झाले. आणि कृष्णाजीपंत हे वांई येथें शेकदार होते. आणि गणपतराव हे पुण्यासच निपुत्रिक वारले. भास्करपंत यांनीं तीस वर्षे शेकदारी केली. नंतर चिंतामण भास्कर हे शेकदार झाले. यांनीं १८ वर्षे काम केलें. नंतर सातारा खालसा झाला. नंतर जावळी पेटा करून चिंतोपंतास कारकून केलें. पुढें विजापूर येथें बदली झाली. तेथून तासगांव येथें आले. तेथें पेनशन घेऊन, सांगोल्यास जाऊन राहिले. यांचे पुत्र त्रिंबकराव यांनीं शिक्षण झाल्यावर सॅनिटरी खात्यांत व्याक्सनेटरची नोकरी धरली. पुढें आफिसांत कारकून झाले. नंतर ५॥ वर्षांनीं इन्स्पेक्टर झाले. नंतर बेळगांव जिल्ह्यांत सुपरिंटेंडेंटचे जागीं नेमणूक जाहली. २।३ ग्रेड झाल्यावर पंचावन वर्षे नोकरी झाली. डिपोटि सुपरिंटेंडेंटचे जागीं आणखी सहा वर्षे जास्त ठेवून घेतलें. वयाचे ६२ वे वर्षी पेनशन निम्मी ७५ रु. झाली. यांनीं बेळगांव मध्यें एक्स्टेंशनांत दोन घरें बांधिलीं आहेत, यांनीं आपल्या बंधूचा नातू आत्माराम यांस दत्तक घेऊन त्यांचें नांव रामचंद्र ठेविलें आहे, रामचंद्र हे व्याक्सनेशन डेपोंत नोकर आहेत, त्रिंबकराव चिंतामण यांनीं पेनशन १९१० सालीं घेतल्यावर याच सालीं त्यांना 'रावसाहेब' ही पदवी मिळाली आहे, त्यांचें वयमान ७४।७५ वर्षांचें आहे, त्यांचे पुतणे विनायक दत्तात्रय हेही डेपोंतच नोकर आहेत. वामन दत्तात्रय हे एम्, एस् एम् रेलवेंत नोकर आहेत, नागेश विनायक बी. ए, एल्, एल्, बी. आहेत

रामचंद्र भास्कर यांचे चिरंजीव गणेश हे पंढरपूर येथें पेनशनर आहेत. रामचंद्र भास्कर यांचे नातू पांडुरंग गोविंद हे कलेक्टरचे चिटणीस आहेत. माहादेव भास्कर यांचे वंशजांपैकीं कांहीं सांगोलें येथें आहेत. सांगोलें येथें बडिलार्जित घर व शेती आहे. भास्कर माहादेव हे पेनशनर आहेत. सदाशिव भास्कर हे नोकर आहेत. पंढरीनाथ माहादेव हे क्लार्क आफ दि कोर्ट अकलूज पेटा येथें आहेत. सिताराम माहादेव हे कलेक्टर आफिसांत नोकर आहेत. गजानन विष्णु हे एडन येथें रेव्हिन्यू खात्यांत नोकर आहेत. चिंतामण विष्णु हे सांगोलें येथें कोर्टांत नोकर आहेत. शंकर कृष्ण सांगोलें येथें घरींच आहेत. मारुतीराव कृष्ण हे मुंबई येथें जी. आय. पी. रेलवेंत नोकर आहेत.

कृष्णाजी रामचंद्र हे वांई येथें रहात होते. यांचे पुत्र हरीपंत हे पंढरपूर येथें शेकदार होते. धोंडो हरी हे हल्लीं सांगली येथें असतात. दत्तात्रय धोंडो हे कोल्हापूर येथें वकील आहेत. सदाशिव धोंडो हे बी. ए. बी. एस्. सी. आहेत. नारायण धोंडो हे बी. ए. आहेत. येशवंत केशव हे सातारा येथें आहेत.

कल्याण, कागवाड व पुणें येथील गोखले. नं. ९

बहिरव बाबदेव हे वेळणेश्वराहून कल्याण येथें आले. बहिरव यांचे पुत्र वामनराव हे मराठी व इंग्रजी शिक्षण झाल्यावर मामलेदार झाले होते. यांनीं मामलेदार होण्यापूर्वीच एक नायकीण ठेविली होती. वामनरावांचें त्या नायकिणीवर व नायकीणींचें वामनरावांवर अत्यंत प्रेम होतें. हें जोडपें पतिपत्नी या नात्यानें वागत होतें. त्या नायकीणीचा जन्म मात्र हीनकुलांत झाला होता इतकेंच. वामनरावांचें लग्न करण्याची खटपट सर्व तिनेंच केली. वामनरावांची मान्यता नसतांही, त्यांना प्रापंचिक सुख मिळून त्यांच्या जन्माचें साफल्य व्हावें, या उदात्त हेतूनें प्रेरित होऊन त्या नायकिणीनें त्यांचें लग्न केलें. वामनरावांनींही त्या नायकिणीला पांचपंचवीस हजारांची जिनगी दिली होती. वामनरावांना गायनाचा नाद विशेष होता. ती नायकीण गायनविद्येंत चांगलीच होती. वामनरावांनीं तिच्याजवळून गायनाची विद्या ग्रहण केली होती.

वामनरावांना दोन मुलगे होते. एक अनंत ऊर्फ भाऊबोवा व दुसरे विश्वनाथ ऊर्फ दाजीबा; अनंत यांस त्या नायकिणीनें गायन शिकवून उत्तम गवई बनविलें. व विश्वनाथ ऊर्फ दाजीबा यांना मराठी व इंग्रजी शिक्षण दिलें. त्या नायकिणीलाही दोन अपत्यें झालीं होतीं. एक रामचंद्र नांवाचा मुलगा, व तारा नांवाची मुलगी. अनंत, रामचंद्र व तारा या तिघांनींही गायनविद्येंत प्राविण्य संपादिलें. रामचंद्र हा सारंगी वाद्य उत्तम वाजवूं लागला होता. रामचंद्र व त्याची

वहीण तारा सानी या दोघांनीं एकेवेळीं कागवाड संस्थानीं श्री गणपतीउत्सवास जाऊन श्रीची चाकरी केली, आणि कागवाडकर पटवर्धन यांची मर्जी संपादिली. कागवाडकर पटवर्धन यांनीं त्यांची विद्वत्ता व लीनता पाहून त्यांना जमीन इनाम देऊन आपल्या पदरीं ठेऊन घेतलें. कल्याण येथें वामनराव वारल्यावर ती नायकीणही थोडेच दिवसांत वारली. तेव्हां रामचंद्र व ताराबानी यांनीं, अनंत व विश्वनाथ यांना कागवाड येथें आणिलें. आणि अनंत बोवास संस्थानीं श्रीची चाकरी व इनाम देवविलें. त्या रामचंद्र व ताराबानी यांच्या उज्वल प्रेमाची धन्यता गावी तेवढी थोडीच होईल. त्या बहिणभावंडांनीं या बंधुद्वयावरील निर्मल बंधुप्रेम परस्पर हयातीपर्यंत कायम ठेविलें होतें.

अनंतबोवा हे संस्थानीं राहिल्यावर, दाजिबा यांनीं प्रथम मुंबईस कांहीं दिवस चाकरी करून नंतर मिरज संस्थानांत मराठी शाळेंत मास्तराची नोकरी धरली. नंतर कांहीं वर्षांनीं दाजीबा हे मिरज हायस्कूलांत शिक्षक झाले. हल्लींचे श्रीमंत आपासाहेब सांगलीकर यांनाही दाजीबांनींच शिक्षण दिलें आहे. हा लेखकही मिरज हायस्कुलांत दाजीबांचे हाताखालीं एक वर्ष शिक्षण घेतल्यापैकीं आहे. दाजीबा मास्तर यांचा स्वभाव शांत असून ते मनाचे फारच गरीब होते. दाजीबा उत्तम शिक्षक होते. हे पुढें मुलींच्या शाळेवर हेडमास्तर झाले. दाजीबांना एकंदर मुलगे सहा; पैकीं विद्यमान तीन मुलगे आहेत. त्यांतील दोन, वामनराव व रामभाऊ हे दत्तक गेले आहेत. तिसरा विष्णु हा आहे. याला बालग्रहाचा विकार झाला आहे. दाजीबांचा नंबर दोनचा मुलगा मोरेश्वर हा फारच हुषार होता. तो या लेखकाचा वर्ग-बंधु होता. मोरेश्वर हा क्षयाचे विकारानें अल्प वयांत मरण पावला. दाजीबा वारल्यावर त्यांच्या मुलांची शिक्षणाची सर्व अव्यवस्था झाली होती. श्रीमंत आपासाहेब सांगलीकर हे अधिकारारूढ झाल्यावर त्यांनीं उदार अंतःकरणानें आपले गुरु दाजीबा गोखले यांच्या कुटुंबास तीन माणसांचा चांगला शिधा त्यांच्या हयातीपर्यंत देण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें हल्लींही शिधा मिळत आहे.

वामनराव, रामभाऊ व विष्णु हे हल्लीं कागवाड येथेंच आहेत. दाजीबांच्या मुलांपैकीं दोघांनीं नाट्यकलेंत चांगला लौकिक मिळविला. प्रोज ऍक्टर रामभाऊ गोखले हे 'सामाजिक नाटक कंपनीचे' मालक व मुख्य ऍक्टर होते त्यानंतर 'चित्ताकर्षक नाटक कंपनीचेही' मालक व मुख्य ऍक्टर होते. यांची प्रकृती चांगली सशक्त होती, हे एके वेळीं मोटारमधून पडल्यामुळें आणि कंपनीच्या संबंधी हजारों रुपयांचा झालेला चुराडा, वगैरे गोष्टींचा मनाला जो त्रास झाला, त्यामुळें फार अशक्त होऊन अलीकडे त्यांनीं नाटकांत काम करण्याचें सोडून आपले धाकटे बंधु रघुनाथ यांचे स्वाधीन कंपनी करून आपण कागवाडास जाऊन राहिले. रामभाऊ गोखले हे कसलेले उत्तम प्रोजपार्टी एकेवेळीं होते.

प्रसिद्ध नामांकित नट गणपतराव जोशी यांनीं, रामभाऊ गोखले यांस यांचे काम पाहून शाबासकी दिली होती. हे जितके नाट्यकलेंत चांगले तितके नाटक कंपनीची मालकी चालविण्यांत ढिले; म्हणून हा धंदा त्यांचे अंगलटीं आला. मात्र त्यांचा स्वभाव गरीब व दिलदार असा आहे. हल्लीं रामभाऊ गोखले कागवाड येथें श्रीमंत आपासाहेब पटवर्धन कागवाडकर यांचे जवळ असून ते आतां भजनीबुवा झाल्याचें समजतें. यांचे धाकटे बंधु रघुनाथ हे प्रथम किर्लोस्कर संगीत मंडळींत होते. पुढें तेथून निघोन आपल्या बंधूच्या कंपनींत येऊन स्त्रीपार्ट करूं लागले. रघुनाथराव हे चांगले नांवाजलेले स्त्रीपार्टी होऊन गेले. यांनीं अदमासें १९१९ सालांत आपल्या एकट्या मालकीनें " संगीत चित्ताकर्षक " असें नांव देऊन कंपनी चालविली. पुढें कंपनीसह रबकवी येथें असतांना त्यांना ताप येऊं लागला. हाच ताप जास्त वाढला आणि ता० २८ जानेवारी शुक्रवार रोजीं पहाटे साडेपांच वाजतां ते स्वर्गस्थ झाले. रघुनाथराव वारल्यामुळें कंपनीची वाताहत झाली.

पुणें येथील गोखले. नं. १०

कल्याणहून विद्याधर परशराम गोखले हे पुण्यास आले. यांचें पूर्वज वेळणेश्वराहून कल्याणास आल्याचें समजतें. विद्याधरपंत गोखले हे डिस्ट्रिक्ट जज्जाचे शिरस्तेदार होते. यांनीं पुणें येथें घर खरेदी केलें. यांचे चिरंजीव दामोदरपंत हे डिस्ट्रिक्ट प्लीडर व असिस्टंट गव्हर्मेंट प्लीडर होते. यांनीं वडिलार्जित घराची दुरुस्ती केली. यांना दोन मुलगे; पैकीं दुसरे महादेवराव हे एम्. ए. एल्. एल्. बी. आहेत. हे पुणें येथें वकिली करून वडिलार्जित घरांतच आहेत. यांचें घर पुणें येथें बुधवारपेठेंत ६८७ नंबरचें आहे.

कल्याण येथील गोखले. नं. ११

बहिरव बाबदेव गोखले हे नं. ९ पैकींच गोखल्यांचे भाऊबंद आहेत. परंतु वंशवृक्ष एकमेकांचे जमत नाहींत यांचें कारण, दत्तात्रय कृष्ण यावरील दोन तीन पुरुषांचीं नांवें मिळालीं नाहींत. गणेश दत्तात्रय गोखले हे बॉचमेकर असून कल्याण येथेंच रहातात. यांचे चुलत बंधु कृष्णाजी नारायण हे एम्. एस्. एम्. रेलवेंत गार्ड असून पुणें येथें रहातात. यांचे चुलत बंधु बळवंत रामचंद्र हे सॉरटर असून, कल्याण येथें रहातात. यांच्या पैकींच कृष्णाजी शंकर गोखले हे मुंबई येथें केशवाश्रम मध्यें आहेत. बेळगांव नजीक अनगोळ येथें घर व शेती आहे.

कल्याण येथील गोखले. नं. १२

रघुनाथभट नारायणभट कल्याण येथें आले. गंगाधरभट रघुनाथभट यांचे नातू काशिनाथ प्रभाकर व माहादेव प्रभाकर; पैकीं माहादेव ऊर्फ बापू प्रभाकर हे जी. आय. पी. रेलवेंत कोचिंग क्लार्क आहेत. हे कल्याण येथें स्वतःचे घरांत रहातात. काशिनाथ प्रभाकर हे विजापूर येथें पोष्टमास्तरचे कामावर होते. ते हल्लीं रजेवर आहेत. पोष्टखात्यांत यांची नोकरी ३७ वर्षे झाली आहे. आतां ते पेनशन घेणार आहेत. यांना चार मुलगे आहेत. गणेश हे व्यापार करितात. गंगाधर हे सरकारी नोकर आहेत. सदाशिव कॉलेजांत आहे. व नरहरी हायस्कुलांत आहे.काशिनाथपंत हे हल्लीं पुणें येथें रहात आहेत, ते मूळचे रहाणार वेळणेश्वरचे होय. वेळणेश्वराहून पालशेत येथें आले आणि पालशेतहून देवाचे–गोठणे येथें आले, देवाचे–गोठण्याहून रघुनाथभट नारायणभट हे मातोश्री व सहा बंधूसह कल्याण येथें आले.

नाधवडे, पुणें व नाशिक येथील गोखले. नं, १३

बाजीपंत गणेश गोखले वेळणेश्वराहून नाधवडें गांवीं आले. हा गांव संस्थान बावडा अमलांतील आहे. वडिलार्जित घर व जमीन नाधवडें गांवीं आहे. गणेश कृष्ण यांचे नातू चार; पैकीं रघुनाथ बाजी यांस तीन मुलगे; गोपाळ, महादेव व जिवाजी; गोपाळराव यांस पुत्र चार; पैकीं पहिले विनायक गोपाळ हे एल्. एजी. आहेत. हे हल्लीं रत्नागिरी जिल्ह्याचे डेपुटी डायरेक्टर ऑफ आग्रिकल्चर या हुद्याचे जागीं आहेत. विश्वनाथ गोपाळ एल्. सी. ई. हे प्रवरा कनालवर नोकर आहेत. जगन्नाथ गोपाळ एम्. ए. बी. एस्. सी. हे खानदेश एज्युकेशन सोसायटीचे हायस्कुलांत अमळनेर येथें शिक्षक आहेत. गोविंद गोपाळ विद्यार्थी आहे. पुरुषोत्तम माहादेव नाधवडें येथें शेती करितात. दामोदर जिवाजी पुणें येथें पोस्ट खात्यांत नोकर आहेत. पुरुषोत्तम दत्तात्रय जी. आय. पी. रेलवेंत पी. डब्यु डी. इन्स्पेक्टर आहेत. सदाशिव दत्तालय बी. ई. हे नाशिक येथें इंजिनीयर खात्यांत सुपरवायझर आहेत. रामचंद्र दत्तात्रय यांनीं पुणें येथें कापडाचें व शिलाईचें दुकान चालविलें आहे. पुणें येथें यांचें खास घर आहे. चिंतामण कृष्ण मुंबई येथें विद्यार्थ्यांच्या क्लबाचे व्यवस्थापक आहेत. वामन कृष्ण हे शागीर्द आहेत. व्यंकटेश वासुदेव जिा कारवार पैकीं कुमठें येथें पोष्टांत नोकर आहेत. बापू व्यंकटेश मेक्यानिकल इंजिनीयर आहेत.

वेळणेश्वर येथील गोखले. नं. १४

गोविंद बल्लाळ हा पुरुष कोकणांतून कोपरगांवीं आल्याचें समजतें. रत्नागिरी तालुक्यांत केळयें गांवीं घर व जमीनजुमला आहे. जनार्दन धोंडदेव व नारायण धोंडदेव यांचा विद्याभ्यास, चुलते वामन भिकाजी यांच्याजवळ मुंबईत झाला. जनार्दन हे पुढें विशेष न शिकतां घरीं जाऊन शेती करूं लागले. नारायणराव यांच्या पुणें ट्रेनिंग कॉलिजच्या २ व धुळें ट्रे.का. च्या थर्ड इयरची परीक्षा जाहल्यावर शाळाखात्यांत नोकरी धरली. हल्लीं भिवंडी येथें म्यु. स्कू. मास्तर आहेत. त्यांच्यापैकींच रामचंद्र मोरेश्वर हे मौजे खातिवली जिा ठाणे येथें शेती करून आहेत.

जुवाटी येथील गोखले. नं. १५

या घराण्याचे पुरुष वेळणेश्वराहून डोंगर येथें आले. आणि डोंगरहून जुवाटी येथें आले. नारायणभट माहादेवभट हे वेळणेश्वराहून डोंगर येथें आले. नारायण भटाचे नातू धुंडीराज हरभट हे जुवाटीस आले असावेत. धुंडीराज ऊर्फ धोंडदेव यांचे नातू, गोविंद, विष्णु व गोपाळ भिकाजी हल्लीं सांगली येथें पब्लीकवर्कमध्यें नोकर आहेत. पणतू गणेश गोविंद हे मुंबई येथें अकौंटंट जननर ऑफिसांत आहेत. माहादेव गोविंद मुबंई येथें स्वतंत्र धंदा करीत आहेत. पांडुरंग गोविंद मुंबई येथें म्युनिसिपल आफिसांत नोकर आहेत. प्रभाकर विष्णु हे मुंबई येथें इंजिनीयर खात्यांत नोकर आहेत. नारायण विष्णु खासगी नोकर आहेत. वासुदेव रामचंद्र ऊर्फ बापू; हे हल्लीं तळेखाजण येथें स्नानसंध्या करून आहेत. यांचे पुत्र दत्तात्रय वासुदेव हे सब् असिस्टंट सर्जन होते. हल्लीं प्रकृतिच्या अस्वस्थतेमुळें, हे तळेखांजण येथें राहिले आहेत. श्रीपाद वासुदेव हे बी. ए. आहेत. हे डिस्ट्रीक्ट इन्स्पेक्टर ऑफ लॅंडरेकार्डचे जागीं अहमदनगर येथें नोकरीवर आहेत. नरहरी वासुदेव हे बी. ए. असून जळगांव हायस्कुलांत मास्तर आहेत. केशवराव बापूजी हे बी. ए. असून हल्लीं जळगांव हायस्कुलचे हेडमास्तर आहेत. केशवराव हे स्नानसंध्येशील असून भाविक व गरीब स्वभावाचे आहेत. धुंडिराज हरभट हे जुवाटीहून शके १६८८ (सन १७६६) त नाशिक क्षेत्रीं गेले होते.

महादेवभट धुंडिराज हे जुवाटीहून निघोन पुण्यास आपल्या बहिणीकडे रहात होते. हे उत्तम वैदिक होते. यावेळीं जरी पेशवाईअखेरचा काळ असला तरी त्यावेळीं पुण्यांत वैदिकांचा मोठा मान होता.महादेवभट यांना प्रातिही भरी होत

असे. महादेवभटांचे मेहुणे दाते हे निवर्तल्यामुळें, बहिणीला अशा प्रसंगांत सोडून कोठें जातां येईना. अशी कांहीं वर्षे गेलीं.पुढें रमाबाई भ्रतार लक्ष्मणराव दाते यांचे चिरंजीव हिंदुस्थानांत गेले. त्या मुलानें जाते वेळीं आपल्या मातोश्रीस असें सांगितलें कीं, मी जर परत आलों नाहीं, तर आपलें घर महादेवभट मामांना दान देऊन टाक. बरींच वर्षे मुलाची वाट पाहिली.परंतु त्याचा कांहीं पत्ता नाहीं. तेव्हां, मुलाच्या इच्छेप्रमाणें रमाबाईनीं आपलें घर आपले बंधु महादेवभट यांस दान दिलें. दानपत्र ता. १९ नोव्हेंबर सन १८३९ त झालें. सदरहु दान दिलेलें घर हल्लीं महादेवभटांचे नातू चिंतामण गणेश यांचे ताब्यांत असून, दानपत्रही त्यांच्याजवळ आहे. हें घर हल्लीं नारायणपेठेंत ४११ नंबरचें आहे.

गणेश महादेव हे सदाशिवपेठेंत हौदाजवळ भट यांचा वाडा आहे, त्या भटांचे घरीं कारकून होते. नारायण महादेव हे पुण्यांत इंग्रजी अमलांत इंग्रजांनीं बनाविलेले सरदार नातू यांच्याकडे नोकर होते. चिंतामण गणेश हे युरोपियन जिमखान्यांत नोकर आहेत. हे पुणे येथील सोशलक्लबाचे मेंबर आहेत. यांना नाट्याविषयाची विशेष गोडी आहे. सोशल क्लबाचे जे नाटकप्रयोग होतात त्या नाटकांत मुख्य नायिकेची भूमिका चिंतामणराव यांच्याकडे असते. या कामांत चिंतामणराव चांगले प्रवीण आहेत. भालचंद्र गणेश हे गव्हरमेंट फोटोझिंको डिपार्टमेंट मध्यें नोकर आहेत. येशवंत नारायण हे मुंबई येथें कमरशिअलफर्म-मध्यें नोकर आहेत.

मिरज व शिरहट्टी येथील गोखले. नं.१६

हें घराणें वेळणेश्वरचेंच आहे. सदोबा गोखले हा कापशीकरांचे पदरीं मोठ्या हुद्यावर होता. तेथून कांहीं कारणानें रागावून सदोबा मिरजेस आले. नंतर कुरुंदवाडहून बल्लाळ यास मिरजेस आणून त्यास शेडसाळचे कमाविसदार केलें. बाळाजी लक्ष्मण हे मिरजेस रहात असत. यांचे पुत्र दोन; रामचंद्र व गणेश; रामचंद्र याचा नातू दामोदर बळवंत हे श्रीनरसिंहवाडी येथें किराणा मालाचें दुकान घालून तेथें रहात आहेत. रामचंद्र याचे चिरंजीव बळवंत यास एकंदर वीस मुलें जाहलीं. पैकीं दामोदर बळवंत हे एकटेच हल्लीं हयात आहेत. शिवराम पांडुरंग हे पुणें जिल्ह्यांत देवी डॉक्टर आहेत. गोपाळ रामचंद्र यांचे नातू सदाशिव निळकंठ हे हल्लीं शहापूर येथें आहेत. सदाशिव हे अगदीं लहान असतांना त्यांचे वडील व मातोश्री स्वर्गस्थ झाल्यामुळें, सदाशिवाचें पालनपोषण त्यांच्या मावशीनें केलें. सदाशिव यांची मावशी मिरज येथील प्रसिद्ध वैद्य करमरकर या घराण्यांतील होय. सदाशिवाचे वडील निळकंठ हे पोलिटिकल एजंटचे

ऑफिसांत नोकर होते. सदाशिव निळकंठ गोखले हे हल्लीं बेळगांव येथें सॅनिटरी ऑफिसांत क्लार्क आहेत. हे शहापूर येथें रहात आहेत.

गणेश बल्लाळ यांचे पुत्र चार; वामन गणेशचे पुत्र भास्कर, हे मिरज येथें व्यापार करितात. यांचे चिरंजीव श्रीनिवास भास्कर हे बी. ए. असून सांगली हायस्कुलांत मास्तर आहेत. दुसरे वामन गणेशचे पुत्र वासुदेव हे सासवड येथें गोखले यांस दत्तक गेले. कृष्णाजी गणेश यांचे पुत्र, गणेश हे मिरजेस आहेत. दुसरे चिरंजीव रामचंद्र हे सांगलीचे वुईलिंग्डन कॉलेजांत क्लार्क आहेत. विष्णु पंत गणेश हे हल्लीं शिरहट्टी येथें आहेत. हे पेनशनर आहेत. यांचे चिरंजीव श्रीधर हे इगतपुरी येथें रेलवेंत नोकर आहेत.

मुटाट येथील गोखले. नं. १७

हे मुटाटचे गोखले, मूळ रहाणार बेळणेश्वर. बेळणेश्वराहून केळेंमाजगांव येथें गेले. नंतर केळेंमाजगांवाहून मुटाट येथें गेले. मणचे गांवापासून मुटाट जवळ असल्यामुळें मणचे–मुटाट असेंही म्हणतात. विजयदुर्गहून मुटाटला जाण्यास लहान बोट असते. शिवाय होड्याही पुष्कळ मिळतात. राघो गोविंद हे पेशवाईंत जमाबंदीचे कामावर होते असें म्हणतात. राघो गोविंद यांनीं मुटाट येथील वाडा बांधविला. राघो गोविंद यांचे बंधु नारो गोविंद; नारो गोविंद यांचे नातू आबाजी कृष्ण हे ठाणें येथील म्युनिसिपालटींत नोकर आहेत. गोविंद नारो यांस पुत्र चार; पैकीं तिघांचा वंश चालू आहे. कृष्णाजीचे मुलगे ठाण्यास आहेत; दुसरे हरिपंत हे दत्तक गेले. तिसरे विष्णु यांस मुलगे दोन; विनायक आणि केशव, विनायकराव वाशिम येथें वकिली करीत आहेत. केशवराव विष्णु हे मुंबई येथें कमिशन एजंट आहेत. केशवराव यांना मुलगे सात; पैकीं पहिले आत्माराम केशव हे विलायतेंत शिक्षण घेऊन आले. हल्लीं (सोलापूर येथें शेट नरोत्तमदास मुराजी मिलमध्यें नोकर आहेत. दत्तात्रय वे नागेश हे व्यापार करितात. बाकीचे विद्यार्थी आहेत.

आबाजी राघो यास, हरिपंत दत्तक झाले. हरिपंत यास पुत्र पांच; पहिले रघुनाथ हरी हे मुंबई येथें पानाचा धंदा करितात. यांनीं तालुका हवेली येथें जमीन व घर बांधिलें. त्यांचे चिरंजीव वामनराव हे मुंबई येथें नोकर आहेत. शंकरराव हरी हे मुंबई येथें म्युनिसिपल खात्यांत नोकर आहेत. दिनकरपंत हरी हे मुंबई येथें पानाचा व्यापार करीत आहेत.

मुटाट येथील गोविंदपंत व हरभट सख्खे बंधु होते. गोविंदपंत फार हुषार असून हिशोबी कामांत वाकबगार होते. विजयदुर्ग किल्ल्यांत सन १७८२ त ते

रा. रामभाऊ गोखले. (प्रोजनट)



कै. र. वि. गोखले. (नट



रा वि. वि. गोखले
वकील, वाशिम.

रा. के. वि. गोखले
कमिशन एजंट मुंबई.

फडणविशींचें काम करीत असत. येथें हरभट सन १७९० च्या सुमारास आले. मुटाट हा गांव विजयदुर्गपासून १२ मैलांवर आहे. मुटाट गांवीं पाटाचे पाण्याचा सुकाळ आहे. त्या गांवीं त्यावेळीं ब्राह्मणांची वस्ती होती. हरभटजींस तो गांव फार आवडला. निवांत जागा पाहिजे म्हणून मुटाटपासून १॥ मैलावर वाडा-भेंडी म्हणून वाडी आहे त्या ठिकाणीं पाटाचें पाणी विपूल आहे. शिवाय गोडे पाण्याचा चांगला वहाळ [ओढा] आहे. त्या ठिकाणीं आपले स्नेही बाजी सोहनीसह सन १७९२ च्या सुमारास वस्ती करून राहिले, सोहनी यांचा वंश अद्यापि मुटाट येथें आहे. हरभट विरक्त होते. गोविंदपंतांचा चालता काळ होता त्यामुळें प्रापंचीही बरीच होती. मुटाट येथें गोविंदपंतांनीं चौसोपी वाडा बांधून हरभट यांना दिला. व आपल्या वडील मुलास [नारोपंतास] तेथें ठेविलें. गोविंदपंत व त्याचे चिरंजीव राघोपंत हे धुळपाचे उजवे हात होते. कोणतीही मोहिम किंवा महत्त्वाची गोष्ट ह्यांच्या सल्ल्याखेरीज धुळप करीत नसत, राघोपंत एका आरमारी लढाईत मरण पावले.

पुढें संसार नारोपंतावर पडला. नारोपंत मोठे रुबाबदार मनुष्य होते, पंचक्रोशींत त्यांचें फार वजन व लौकिक होता. वृद्धपणीं यांना बरींच दुःखें सोसावीं लागलीं. हे पंचाऐंशी वर्षांचे होऊन वारले. याच सुमारास बरोबर मोठा दरवडा पडून घरांतील वित्त सर्व गेलें. पुढें कुटुंबाचे निर्वाहाकरितां कर्ज काढावें लागलें.

गोविंदपंतांचे तीन मुलांपैकीं विष्णुपंत हे पराक्रमी पुरुष निघाले. ते फार मातृभक्त होते. हे त्यावेळचें शिक्षण शिकून मामलेदार व मुनसफ कोर्टात कारकुनाचें काम करीत होते. परंतु त्यांचा स्वभाव मोठा मानी, निर्भीड, करारी, तापट व सत्यप्रिय असल्यामुळें, अधिकाऱ्यांचें जमेना म्हणून राजीनामा दिला. पुढें ठाणें येथील प्रसिद्ध वकील रामभाऊ आचार्य यांच्या वडिलांनीं विष्णुपंतांस आपल्याजवळ ठेवून घेतलें. तेथें स. १८५९ सालीं वकिली पास झाले. कोंकणांत राजापूर, खारेपाटण व देवगड येथें ते वकिली करीत होते, या कामांत द्रव्यसंचयही बरा केला. त्यांनीं वडिलार्जित सर्व कर्ज फेडून जमीन जुमला घेऊन आपले बंधु हरीपंत ह्यांच्या स्वाधीन केला. विष्णुपंतांनीं याच गांवीं [मुटाट येथें] नवीन घर बांधिलें. विष्णुपंतांचे मुलगे दोन; केशवराव व विनायकराव; केशवराव हे मुंबई येथें कमिशन एजंट आहेत. यांनीं आपल्या मुलांना व्यापारी शिक्षणच दिलें आहे. विनायकराव हे सन १८९१ सालापासून वकिली करीत आहेत. उभयतां बंधूंनीं कुटुंबाची सांपत्तिक स्थिती चांगली सुधारली आहे. विनायकराव हे वाशिम येथेंच स्थाईक झाले आहेत व ईश्वरकृपेनें त्यांची सांपत्तिक स्थिती चांगली आहे.

केळेंमाजगांव येथील गोखले. नं. १८

केळेंमाजगांव येथिल दिनकर बाबदेव गोखले यांनीं बळवंत यांस दत्तक घेतलें. बळवंत हे आंबेडकरांपैकीं होत. हे आंबेडकर कीं आंबेडकर हें कांहीं समजत नाहीं. आणि कोण गोत्रज तेंही माहित नाहीं. बळवंत दिनकर हे कोर्टांत नोकर होते. त्यांचे चिरंजीव दत्तात्रय हे सरकारी नोकर होते. हल्लीं पेनशनर असून पुणें येथें आहेत. यांस तीन मुलगे आहेत. पहिले विष्णुपंत एम्. ए. असून शिक्षणाकरितां अमेरिकेंत गेले आहेत. दुसरे नारायण हे वसई हायस्कुलांत नोकर आहेत. तिसरे शंकर हे न्यू पूना कालेजांत डेमांस्ट्रेटर आहेत.

सोमेश्वर येथील गोखले.

वेळणेश्वराहून गोविंदभट गोखले माहाजन निघोन रत्नागिरीजवळ एक मैलावर कल्यें गांवीं आले. कल्यें हें खेडेगांव डोंगराचे पायथ्याशीं खाडीपर्यंत आहे. कल्यें येथेंही हल्लीं गोखले यांचें एक घर आहे. परंतु हे गोखले गोळपेच्या गोखल्यांपैकीं होत. कल्यें गांवापासून सुमारें तीन मैलांवर सोमेश्वर नांवाचा गांव आहे. रत्नागिरीचे दक्षिण आंगास रत्नागिरी गांवाला लागून जी खाडी आहे तीच खाडी कल्यें व सोमेश्वर वगैरे गांवांवरून पुढें गेली आहे. सोमेश्वर हा गांव रत्नागिरीपासून ४।५ मैल आहे. रत्नागिरीहून सोमेश्वरास एक वाट डोंगरावरून गेली आहे.आणि दुसऱ्या वाटेनें खाडीच्या मार्गानें समुद्राचे भरतीच्यावेळीं उत्तम वारा असल्यास सोमेश्वरास जाण्यास एक तासही लागणार नाहीं. सोमेश्वर हा गांव खाडीच्या कांठीं डोंगरांत वसलेला आहे. कल्यें येथील गोविंदभट गोखले यांचे पुत्र विश्वनाथभट हे सोमेश्वरास आले. कल्यें गांवीं गोविंदभट यांनीं मिरास करून जमीनजुमला, घरठिकाण वगैरे व उपाध्येपण करून राहिले. यांचे पुत्र विश्वनाथभट हे सोमेश्वर गांवीं जाऊन कुळवें तोडून मिरास करून राहिले. गोविंदभट कल्यें येथें तीनशें वर्षांपूर्वी आले. विश्वनाथभट सोमेश्वरीं राहण्यास अडीचशें वर्षांपूर्वी गेले. सोमेश्वर या गांवीं 'श्री सोमेश्वर' महादेवाचें देवालय फारच मोठें आहे. हें देवालय या गांवाचे मध्यभागीं आहे. देवालयास लागून उत्तरेस मुसलमानांची वस्ती विशेष आहे. या 'सोमेश्वर' महादेवाचे नांवावरूनच गांवासही सोमेश्वर गांव असें म्हणूं लागले. ज्यांना सोमेश्वरास जावयाचें असेल त्यांनीं रत्नागिरीहूनच जावें.

विश्वनाथभट गोखले सोमेश्वरकर यांना पुत्र दोन; महादेवभट व केशवभट. महादेवभटाचे निपणतू कृष्णाजी अनंत हे सातारा शहरीं गेले. कृष्णाजीचे पुत्र दोन; नारायण व अनंत. कृष्णाजी अनंत हे गोसावीपुऱ्याचे दिवाण होते. नारा-

यणकृष्ण हे माहाराजांचे हुजुर दप्तरांत नोकर होते. अनंत हे ताडक्याला कारकून होते. पांडुरंग नारायण हे औंध संस्थानांत श्रीमंत दादासाहेब प्रतिनिधी यांचे टयूटर होते. पुढें शाळाखात्याचे डेप्युटी इन्स्पेक्टरचें काम करीत असतांनाच, कांहीं दिवस एजंटचें काम करीत होते. सन १८९२ सालीं यांना संस्थानांतून पेनशन झाली. पांडुरंग नारायण यांचें वयमान हल्लीं पाऊणशेंच्या पुढें आहे. यांनीं सातारा येथें व्यंकटपुऱ्यांत खास घर केलें आहे व ते तेथें रहात आहेत. यांचे पुत्र दामोदरपंत हे सब् असिस्टंट सर्जन असून नुकतेच वांईहून बदली होऊन पुणें येथें डेक्कन कॉलेजांत आहेत.

अनंत कृष्ण यांचे पुत्र तीन. पैकीं विष्णु अनंत हेही सातारा येथेंच आहेत. यांचें वयमानही पाऊणशेंपर्यंत असावें. यांना संतती नाहीं. यांचे दोन बंधु गोविंद व रामचंद्र. व्यंकटेश गोविंद हे बी. ए. एल्. एल् बी असून वऱ्हाडांत वाशिम येथें वकील आहेत. यांचे बंधु बाळकृष्ण गोविंद बी. ए. हे कराची येथें हायस्कुलांत टीचर होते. हे सन १९१८ चे फेब्रुवारींत वारले. यांचा माधव नांवाचा एक मुलगा आहे. रामचंद्र यांचे मुलगे तीन. वामन रामचंद्र हे हायकोर्ट ग्रीडर असून हल्लीं वऱ्हाडांत दारव्हा येथें वकील आहेत. सदाशिव रामचंद्र हे सब् असिस्टंट सर्जन असून, यांनीं सातारा येथें खासगी दवाखाना चालविला आहे. शिवाय गोखले–वैद्यक नांवाची शाळा सुरू केली आहे. यांना सार्वजनिक कामाची हौस आहे. स्वभाव शांत व गरीब आहे. श्रीधर रामचंद्र हे बी. ए. एल्. एल्. बी. आहेत. सन १९०६ त बी. ए. झाले. नंतर १९१० सालीं एल्. एल्. बी. झाले. नंतर सन १९१२ सालापासून उमरावती येथें वकिली करूं लागले आहेत. यांचे वडील रामचंद्र अनंत हे सातारा येथें पी. डब्ल्यू खात्यांत नोकर होते. शिवाय वैद्यकी करीत असत.

महादेवभट विश्वनाथभट यांचे पुत्र दोन; पैकीं गोविंदभटाच्या वंशासंबंधीं वरील माहिती जाहाली. आतां गोविंदभटाचे बंधु माधवभट, यांस पुत्र तीन; पैकीं विश्वनाथभटाचा वंश हल्लीं सोमेश्वरीं आहे तोः—विश्वनाथभटापासून सहावे पुरुष विष्णु ऊर्फ रावजी भट व गोपाळ विनायक भट हे आणि महादेवभट दाजीभट हे विद्यमान सोमेश्वरीं शेतवाडी व भिक्षुकी करून आहेत. दुसरे कृष्णंभट यांचा वंश वांई येथें विद्यमान नाहीं. तिसरे रामभट; रामभट माधवभट हे सासवडजवळ गराडें मुक्कामीं गेले.

रामभट माधवभट हे पुणें जिल्ह्यांत सासवडजवळ गराडें येथें जाऊन राहिले. रामभट हे सुमारें शके १६९० (सन १७६८) मध्यें येऊन गराडें येथें राहिले. यावेळीं पुणे येथें श्रीमंत बाळाजीबाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे प्रधान यांची कारकीर्द चालू होती. रामभट गोखले यांनीं गराडें येथें सावकारी व्यवहार चालविला. पुढें अदमासें २५ वर्षांनीं म्हणजे शके १७१५ त रामभट यांनीं

गराडें येथें घर बांधिलें. गराडकर गोखल्यांचें गराडें येथील मूळ घर तें हेंच होय. हें घर बांधण्याचे वेळीं एका घडलेल्या गोष्टिबद्दल आख्यायिका सांगतात ती अशीः—" रामभट सावकार गोखले यांनीं घर बांधण्याचें काम चालविलें असतां, त्यावेळचे गराडें येथील कामगार पाटील जगदळे (ठोमे) यांनीं घराचे उत्तर बाजूचे चांदईस हरकत केली. सदर पाटलाचें पुण्यास आपा बळवंत मेहेंदळे यांजकडे वजन होतें. त्या जोरावर त्यानें चांदई बांधण्यास हरकत केली. सदरहु गोष्ट गोखले यांनीं श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या कानावर घातली. त्यानंतर श्रीमंत एके दिवशीं नित्याप्रमाणें वाड्यांतील हौदावर संध्येला बसले असतां, पदरची कांहीं मंडळी तेथें संध्येला बसली होती, त्यांत आपा बळवंतही होते. श्रीमंतांनीं आपा बळवंत यांच्या आंगावर मुद्दाम पाणी फेकलें. तेव्हां आपा बळवंत म्हणाले;—" आज श्रीमंतांचे मनांत मला भिजवावयाचें दिसते आहे.!" तेव्हां श्रीमंत म्हणाले,—" आम्ही तुम्हांस पवित्र करून घेतों. कारण सर्व लोक ब्राह्मणांचीं घरें बांधण्यास मदत करितात. आणि त्यास तुम्ही हरकती करितां." सदरहु गोष्टीवरून आपा बळवंत यांनीं ठोमे पाटील यांस चांदईस हरकत न करण्याबद्दल ताकीद केली. मग गोखले यांनीं एका रात्रींत चांदईचें काम उरकून घेतलें. "

रामभट यांस पुत्र तीन; नारायणभट, हरभट व कृष्णभट; नारायणभटास पुत्र दोन; लक्ष्मणपंत व चिंतोपंत; गोविंद व जनार्दन हे लक्ष्मणपंतांचे; आणि चिंतोपंत यांचे पुत्र रामचंद्र; लक्ष्मणपंत व त्यांचे चिरंजीव गोविंदराव यांनीं सावकारीचा वडिलोपार्जित धंदा पुढें चालविला. पुढें गंगाधर गोविंद हे गराड्यास राहून सावकारी करित. गंगाधरपंत तात्या साहेब यांनीं आपल्या परोपकारी व प्रेमळ अंतःकरणानें गराडे गांवीं व आसपासच्या भागांत चांगलें नांव मिळविलें गावांत कोणी आजारी पडल्यास त्यास गंगुतात्या यांच्या हातच्या नुसत्या कढीनें बरें वाटे, अशी श्रद्धा त्यांच्यावर होती. गंगाधरपंत यांना मुलगे चार. मोरो, पांडुरंग, रामचंद्र व विष्णु. मोरोपंत हे पुण्यास जाईंचे गेटाजवळ स्वतःचे घरीं पेनशन घेऊन रहात आहेत. दुसरे पांडुरंग ऊर्फ बापूसाहेब हे गराडें येथें घरची शेतीवाडी पाहून असतात. यांचे चिरंजीव विठ्ठलराव हे जी. बी. ई. सी. असून घाडस करून हजार कोसांवर जाऊन मलाया पेनिन्सुलामध्यें आज दाहा वर्षे मोठी सरकारी नोकरी करीत आहेत. तिसरे रामचंद्र हे मुंबई म्युनिसिपालिटींत होते. ह्यांचे चिरंजीव नारायणराव हे बी. ए.एल्.एल्.बी. असून हल्लीं पुण्यास वकील आहेत. चवथे विष्णुपंत हे सासवड व तळेगांव ढमढेरें येथें वकिली करीत असून, सासवड व पुणें येथें त्यांनीं घरें बांधिलीं आहेत.

गंगाधर गोविंद यांचे बंधु गणेश गोविंद हे गोंडळसंस्थानांत ईंजिनियर होते. यांनीं पुण्यास नव्या विष्णुजवळील [सरदार नारो विष्णु आपटे यांचा] वाडा

के. के. जे. गोखले.

के. आर. के. गोखले.

रा. के. के. गोखले.

के. डॉ. पी. के गोखले.

रा. एम्. के गोखले.

रा. वी. के. गोखले.



सौ. यमुनाबाई गोखले. कु. मथुराबाई गोखले. सौ. राधाबाई गोखले.

विकत घेतला आहे. यांनीं हिंगणें येथील जमीनीपैकीं कांहीं जमीन प्रो. कर्वे यांच्या आश्रमास दिली आहे. पुण्यास हे फार वर्षे ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. यांना रा. ब. ही पदवी होती. यांचे पहिले चिरंजीव जनार्दन गणेश हे बी. ए. असून भडोच येथें मास्तर होते.यांचे चिरंजीव धुंडिराज ऊर्फ बाबूराव हे पुणें येथें सीनिअर बी. ए, त आहेत. दुसरे त्रिंबक हे पुणें येथें आहेत. त्यांचा मुलगा गोविंद हा इंजिनिअर (बी. ई.) झाला आहे. तिसरे श्रीधर हे एम्. ए. असून पुणें येथें मास्तर आहेत. चवथे सदाशिव हे एम्. बी. बी. एस् आहेत.

गंगाधर गोविंद यांचे सख्खे चुलत बंधु केशव जनार्दन हे मुंबई येथें असिस्टंट इंजिनीयर होते. कुलाबा, महालक्ष्मी वगैरे ठिकाणचीं तोफखान्याची कामें त्यांच्या हातून झालीं. त्यांचा स्वभाव करारी, व्यवस्थित व टापटिपीचा असे. त्यांनीं पुणें येथें भाऊ महाराज यांचे बोळांत घर बांधिलें. त्यांचे पहिले चिरंजीव गोविंद ऊर्फ रावजी हे फार उत्कृष्ट चित्रकार होते. त्यांचे चिरंजीव गोपाळराव, हे डॉक्टर आहेत. दुसरे चिरंजीव कृष्णाबापू हे हायकोर्ट प्लीडर असून जत संस्थानांत मुनसफ आहेत. हे प्रसिद्ध लेखक व कादंबरीकार आहेत. यांचे चिरंजीव रा. भालचंद्रपंत एम्. ए. होऊन नंतर इंग्लंडांत तीन वर्षे राहून आय्. सी. एस्. होऊन आले, व ते हल्लीं बिहार प्रांतांत कलेक्टर आहेत. हे पुरुष या घराण्यांत अग्रगण्य होत. तिसरे, पुरुषोत्तम ऊर्फ नाना हे लहान वयांत एल्. एम्. अँड. एस्. चे परीक्षेंत फर्स्टक्लास फर्स्ट आले होते. पण प्लेगमुळें डिग्री घेण्यापूर्वीच मृत्यु पावले. चवथे महादेवराव (एम्. के. गोखले) हे पुण्यास प्रसिद्ध फोटोग्राफर आहेत.

नारायणभट यांचे धाकटे चिरंजीव चिंतोपंत; यांचे नातू नारायण रामचंद्र हे काठेवाडांत इंजिनीयर होते. यांचे थोरले चिरंजीव चिंतामणराव, यांचे चिरंजीव विश्वनाथराव हे एल्. एम्. अँड, एस्, असून पुण्यांत प्रसिद्ध डॉक्टर आहेत. हे हरएक सार्वजनिक चळवळींत अत्यंत आस्थेनें मेहनत करीत असतात. हे थियॉसफिस्ट असून अत्यंत प्रेमळ आहेत. यांनीं सदाशिव पेठेंत सोट्या म्हसोबाजवळ घर विकत घेतलें आहे. यांना आळस म्हणून बिलकूल नाहीं. सर्व दिवसभर सारखें डॉक्टरीचें काम चालू असतें. यांचे चुलते दामोदर नारायण हे बी.ए. असून मास्तर आहेत. दामोदरपंत व डॉ. विश्वनाथराव हे एका ठिकाणींच सोट्याम्हसोबाजवळील घरांत रहातात.

गराडे हें गांव पुण्याहून आठ कोस आणि सासवड व पुरंदर किल्लयापासून तीन कोस, मावळ भाग व देश यांचे मध्यें वसलेलें आहे. गांवांत ब्राह्मणांचीं १० । १२ च घरें आहेत. गराडें येथें चैत्र शु॥ पौर्णिमेला श्रीकऱ्हावाई नदीचा उत्सव नदीतटाकीं दरसाल होत असतो. आज १५० वर्षे हा उत्सव चालू आहे. उत्सवास पंचक्रोशींतील सर्व ब्राह्मणमंडळी गराड्यास जमत असतात.

त्याचप्रमाणें निरनिराळ्या कारणांनीं गराड्याबाहेर रहात असलेली गराडकर गोखले मंडळीही उत्सवाचे निमित्तानें दरवर्षी इतर नातेवाईक व स्नेही मंडळीसह गराड्यास जमत असल्यामुळें हा उत्सव हें एक प्रकारचें संमेलनच होय.

या घराण्यांत पुढें लिहिलेल्या स्त्रिया नांव घेण्यासारख्या आहेत. १ रा. ब. गणेश गोविंद यांची कन्या सौ. ताईबाई ही सुप्रसिद्ध व्याख्याते व थिऑसफिस्ट श्री. वासुदेवराव त्रिपळूणकर वकील अकोला यांची पत्नी असून स्वतः थियॉसफिस्ट व व्याख्याती आहे. २ श्री. रा. कृष्णाबापू गोखले यांची पत्नी सौ. राधाबाई गोखले या एक लेखिका असून त्यांनी जत येथें सेवासदनाचे धर्तीवर स्त्रियांची संस्था नेटानें चालविली आहे. आणि त्यांना वीणकामांत व शिवणकामांत अनेक ठिकाणीं बक्षिसें मिळालीं आहेत. यांची पहिली कन्या सौ. द्वारकाबाई आपटे ग्रॅज्युएटपर्यंत शिकल्या असून, दुसरी कुमारी मथुरा या फर्ग्युसनमध्यें सीनियर बी. ए. च्या क्लासांत आहेत. कॉलेजांत गेलेली या घराण्यांत ही पहिलीच मुलगी होय, हें तिला फार भूषणावह आहे. ३ पुणें येथील प्रसिद्ध फोटोग्राफर एम. के. गोखले यांची पत्नी सौ. यमुनाबाई गोखले ह्या वीणकामांत फारच कुशल असून, त्यांनीं काढलेल्या पंचमजार्ज यांच्या रेशमाच्या भव्य चित्राबद्दल जिकडे तिकडे वाहवा झाली आहे. त्या आपल्या पतिप्रमाणें फोटो काढण्यांतही कुशल आहेत. ४ डॉ. गोखले यांची पत्नी सौ. रंगुबाई गोखले ह्या पुण्यांत सेवासदन संस्थेस आपल्या पतीप्रमाणें रात्रंदिवस मदत करितात.

पुणें येथील गोखले.

(सदाशिव पेठ घ.नं.९७४)

सोमेश्वर येथील शिवभट यांचे चिरंजीव गणेश, नारायण व बाबु हे त्रिवर्ग बंधु प्रथम देशावर संस्थान भोरपैकीं रावडी या गांवीं आले. रावडी येथें शके १७०५।६ सालीं वरील त्रिवर्ग बंधु येऊन राहिले. नंतर तेथें घर बांधिलें व शेती संपादिली, आणि पुढें भोर संस्थानचे मालकांकडून वंशपरंपराच्या सनदाही मिळविल्या त्या पुढील प्रमाणें:—

श्री (सनदेचा सारांश)

" राजश्री गणेशभट व नारायणभट व बाबुभट यांचा सिवभट उपनाम गोखले सोमेश्वरकर गोत्र काश्यप सूत्र हिरण्यकेशी हल्लीं वास्तव्य वा मौजे रावडी ता भोर स्वामीचे सेवेसीः—

ॐ वेदमूर्ती सेवक शंकरराव रघुनाथ सचीव नमस्कार सुा हिसब्दे तिसैन मयातैन व आलफ शके १७१४ परिधावी नाम संवत्सरे तुम्ही हुजुर कसबे भोर येथील मुक्कामीं येऊन, विदित केलें कीं आम्ही कोंकणांतून येऊन मौजे

कै० जनार्दन गणेश गोखले, B. A. पुणें.

डॉ. विश्वनाथ चिंतामण गोखले, L. M. & S. पुणें.



श्री० दत्तात्रय हरी गोखले, एम्. ए., एल्एल्. बी.
कोल्हापूर.

के० दामोदर जनार्दन गोखले, पुणें.

माारीं घर बांधून राहिलों यासी आठ वर्षें जाहालीं जिराईत कुटुंबाचा योगक्षेम चालिला पाहिजे. याजकरितां मौजे माारचे कमाविसदार व गांवकरी यांणीं शेत करावयास दिली दोन खंड मिती यांणें दिल्हे आहेत. त्याचा मक्ता दरसाल रुपये साहा द्यावे लागतात त्यास स्वामींनीं कृपाळु होऊन, साहा रुपयांची जमीन धर्मादाय करून देऊन चालविलीया स्नानसंध्यादिषट्कर्म आचरोन स्वामींस व स्वामींचे राज्यास आभिष्ट चिंतन करून राहुं [वगैरे मामुल प्रों] मोर्तब.

श्री. (सिका)

आशापत्र राजश्री पंतसचीव तां मोकादम मौजे रावडी तां भोर तर्फ राहिडेखोरे सुा मया तैन व अलफ वो राजश्री गणेशभट व नारायणभट व बाबुभट गोखले यांणी हुजुर कों भोर येथील मुक्कामीं येऊन विदित केलें कीं आम्ही त्रिवर्ग बंधु मौजे माारी कुणबावियाचे जमीनींत घर बांधोन आहों. सभावती शेरताटी लाविली आहे ती जागा पेशजी राजश्री माहादाजी बल्लाळ फाटक यांजकडे दोन रुपयांस व बापूजी दादाजी फाटक यांजकडे दीड रुपयास ठेवुन साडेतीन रुपयांचे जाग्यांत सुखवस्तीस घर बांधोन कुटुंबासुद्धां आहों. त्या जागीयाचा पैका आम्हास माफ केला पाहिजे म्हणोन त्याजवरोन हें आशापत्र सादर केलें तरी साल मजकुरापासोन साडेतीन रुपये खंडाचे त्रिवर्ग भटजीस माफ केले आहेत. तरी सदरहु साडेतीन रुपये घरं व परसाचे चालविणें जाणिजे छ. १७ जमादिलावल पाा हुजुर मोर्तब.

गणेशभट शिवभट यांचे नातू जनार्दन कृष्ण व शिवराम कृष्ण हे पुणें मुक्कामीं वकिली करीत होते. जनार्दन कृष्ण व शिवराम हे एकत्र रहात होते. शिवराम कृष्ण यांना वकिलीची जी सनद मिळाली ती पुढील प्रों:—

(एकाच कागदावर इंग्रजी व मराठी अशी आहे. पैकीं मराठी देतों.)

" शिवराम कृष्ण गोखले चितपावन ब्राह्मण वस्ती पुणें सन १८२७ चे दुसरे कायद्याचे हुकुमावरून सदर दिवाणी आदालतीनें तुम्हास पुणें आदालतीचे कोर्टात वकील ठरविलें आहे. याजकरितां तुम्ही येथें वकालत करावी आणि जोंपर्यंत तुमची रीत भात चांगली असेल आणि तुम्ही कायद्याप्रमाणें बिनकपटानें चांगलें रीतीनें आपलें काम चालवितां पर्यंत तुमचे जवळ हें काम राहील तारिख १२ माहे एप्रील सन १८३८ "

" या वकिलानें थर्ड मुनसफ कोर्टात वकिलाचें काम करावें ता. १३ जुलई सन १८२८ " (स्टॉप नं. १६६० दाहा रुपयांचा.)

जनार्दन कृष्ण हे सुद्धां पुणे येथें वकिली करीत होते. यांचे चिरंजीव दामोदरपंत हे इंजिनियर खात्यांत अकौंटंट होते. यांनीं २८ वर्षें नोकरी केली पुणें, खडकी वगैरे ठिकाणच्या सरकारी इमारती व मोठमोठाले रस्ते यांच्याच

देखरेखीखालीं तयार झाले. गव्हर्मेंट हाऊस व कौन्सिल हॉल हीं कामें दामोदरपंत गोखले यांच्या कर्तृत्वाची साक्ष देत आहेत. हे खडकी ऑफिसांत १४ वर्षें एकाच हुद्यावर होते. यांचा जन्म शके १७५२ (सन १८३०) मध्यें झाला. यांना २८० रुपये पगार होता. हे वयाचे ६९ वे वर्षी म्हणजे शके १८२१ (सन १८९९) मध्यें कैलासवासी झाले. यांना सव्वावर्षांचा पगार ग्रॅच्युटी म्हणून देऊन, १२७ रुपये पेनशन दिली. बीस वर्षें पेनशन घेतलें. यांची रहाणी जुन्या पद्धतीची होती. हे मोठे बाणेदार असल्यामुळें साहेब लोक यांना फार मान देत असत. सदाशिवपेठेंत यांनीं मोठें घर बांधिलें आहे. त्या घरचा हल्लीचा म्यु. नं. ९७४ आहे. दामोदरपंत यांना घरांत नानासाहेब म्हणत व ऑफिसांतील लोक आण्णासाहेब म्हणत असत. यांना मुलगे पांच; पैकीं हल्ली श्रीधरपंत हे एकटेच असून हे इंजिनियर खात्यांत नोकर आहेत.

दामोदरपंतांचे नातू विष्णु कृष्ण ॲग्रिकलचरमध्यें नोकर आहेत· रघुनाथ कृष्ण सब्ओव्हरसीयर आहेत. रामचंद्र कृष्ण हे मेकॅनिकल इंजिनीयर आहेत. नरहर केशव हे बी. ए. असून फार्निचर व बिल्डिंग कॅंट्राक्टर आहेत. पुरुषोत्तम केशव हेही कॅंट्राक्टर आहेत. दत्तात्रय नारायण हे विद्यार्थी आहेत. गजानन व श्रीपाद हे विद्यार्थी आहेत. शिवराम कृष्ण यांचे नातू वासुदेव व शंकर अनंत हे पोष्ट खात्यांत नोकर आहेत. नारायण जनार्दन रेलवेंत नोकर असून, दिनकर गणेश हे खासगी नोकर आहेत. नरहर केशव, विष्णु कृष्ण, दत्तात्रय नारायण व गजानन भालचंद्र यांची मालकीचीं घरें पुण्यांत आहेत.

पोंबुर्ले, सायगाव व कोल्हापुर येथील गोखले.

गोविंदभट केशवभट गोखले हे सोमेश्वराहून निघोन पोंबुर्ल्यास येऊन सुमारे दोनशें वर्षें झालीं असावींत. मालपे व पोंबुर्ले हे जवळ जवळ असल्यामुळें, मालपें–पोंबुर्ले असें म्हणतात. हे दोन्ही गांव, बावडे संस्थानांतील आहेत. मालपे गांवची माहिती आपटे घराण्याच्या इतिहासांत दिली आहे. कारण मालपें येथें आपटे यांचीं जास्त घरें आहेत.पोंबुर्ले गांव अगदीं डोंगरांत असून खाडी त्या गांवाजवळ आहे. विजयदुर्गहून होडीनें पोंबुर्ल्यास जाण्यास सोपें आहे. पोंबुर्ल्याचे समोर खाडीपलीकडे तळेखांजण हा प्रसिद्ध बापू गोखले यांचा गांव आहे. पोंबुर्ले येथील ' श्रीस्थानेश्वर महादेव ' स्वयंभू आहे. देवालयही मोठें आहे. पोंबुर्ले येथें वामन परशराम गोखले यांचेकडे मी उतरलों होतों. इचलकरंजीचे जनूभाऊ दातार ऊर्फ फडणीस जे आहेत ते पोंबुर्ल्याचे होत. या गांवीं त्यांनीं गणपतिचें देऊळ बांधिलें आहे. त्यांचा येथें जमीनजुमला आहे.

गोविंदभट गोखले हे मोठे शिवभक्त होते. हे पोंबुर्ल्यास श्रीस्थानेश्वराची सेवा करीत राहिले. ह्यांच्याविषयीं एक दंतकथा समजते कीं, " एके वेळीं श्रीस घालण्यास बेल कोठेंच मिळाला नाहीं. तेव्हां गोविंदभट यांनीं थोडी जागा सारवून तेथें ध्यानस्थ श्रीचें स्मरण करीत राहिले. तों त्या ठिकाणीं बिल्वदळ आपोआप एकच उगवलें. नंतर श्रीस तें अर्पण केलें. " हा चमत्कार पाहून पोंबुर्ल्याचे लोकांनीं गोविंदभटास स्थानेश्वराजवळ राहण्यास जागा दिली. गोविंद भटाचे पणतू आबाभट यांस पुत्र चार. पैकीं रामचंद्रभट, कृष्णाजीपंत व सदाशिवभट या तिघांचा वंश हल्लीं चालू आहे. आबाभटाचे पुत्र रामचंद्र ऊर्फ बापूभट, यांचे पुत्र गोपाळराव. हे नाझराचे जागीं असतां पेनशनर झाले होते. यांचे चिरंजीव महादेवराव यांनीं डोळ्याच्या विकारामुळें लवकर पेनशन घेऊन ते पुण्यास राहिले आहेत. यांचे बंधु गंगाधर गोपाळ हे बी. ए. असून मामलेदार होते. यांचे दोन मुलगे विद्यार्थी असून महादेवरावाजवळ आहेत.

कृष्णाजी आबा यांचे नातू श्रीधर नारायण हे रेलवेंत नोकर आहेत. दामोदर कृष्ण यांचे पुत्र तीन पैकीं पहिले श्रीधर हे नारायणानें दत्तक घेतले. दुसरे रामचंद्र हे मुंबई येथें खासगी नोकर आहेत. सदाशिवभट आबाभट गोखले यांस पुत्र पांच, विष्णु सदाशिव यांस तीन मुलगे, कृष्णंभट, लक्ष्मण व सदाशिव. सदाशिवभट आबाभट हे दशग्रंथी वैदिक होते. यांचे यजमान मालपें येथील आपटे होत. सातार्‍यानजीक सायगांव येथील इनामदार आपटे हे मालपें येथील असल्यामुळें, यांचें उपाध्येपण करण्याकरितां सदाशिवभट सायगांवीं राहिले होते. यांना पुत्र सात, पैकीं पांच पुत्रांचा वंश चालू आहे. विष्णु, शंकर, परशराम, हरिपंत व येशवंत. कृष्णंभट विष्णु हे नामांकित वैदिक असून नागपुरास रहातात. ते नागपूर येथील वेदशाळेचे गुरुजी आहेत. लक्ष्मण विष्णु हे मुंबई येथें खाजगी नोकर आहेत. सदाशीराव हा मुका आहे. दिनकर शंकर हे मद्रास सदर्न मराठा रेलवेंत गार्ड आहेत. रघुनाथभट हे वैदिक आहेत. वामन परशराम हे मुंबई येथें खाजगी नोकर आहेत. वामनराव यांनीं पोंबुर्लें येथील जुनें घर मोडून हल्लीं त्याच जागेवर नवें घर बांधिलें आहे.

हरी सदाशिव यांनीं वेद म्हणून प्रथम यजमानकृत्य चालविलें होतें. हे आपले चुलत बंधु जे डेप्युटी होते त्यांचेजवळ राहून मराठी व इंग्रजी चार इयत्ता शिकले. नंतर कोल्हापूर येथील राजाराम हायस्कुलांत पुढील अभ्यास करून सन १८७५ त मॅट्रिक झाले. नंतर १।२ वर्षें स्वतंत्र रीतीनें कांहीं उद्योग आरंभिला. परंतु त्यांत विशेष यश न आल्यामुळें, राजाराम हायस्कुलांत नोकरी धरली. त्यानंतर सांगली येथें इंग्रजी शाळेंत राहिले. नंतर सन १८८०त आबासाहेब कागलकर कोल्हापूरचे रिजंट यांनीं आपल्या उभयतां मुलांवर हरिपंत यांना टयूटर नेमिलें. नंतर सन १८८४ त आबासाहेब कागलकर

यांचे थोरले चिरंजीव कोल्हापूरच्या गादीस दत्तक झाल्यावर, धाकटे चिरंजीव बापूसाहेब कागलकर हे एकटेच विद्यार्थी शिल्लक राहिले, पुढें सन १८९४ साली १२५ रुपये पगारावर पेनशन घेतलें, यांचे एकुलते एक चिरंजीव दत्तात्रय यांचें शिक्षण कोल्हापूर हायस्कुल मध्यें होऊन, पुढें राजाराम कालेजांत गेले, नंतर फर्ग्युसन व डेक्कन कॉलेजांतही होते, सन १९०५ मध्यें बी. ए. झाले. नंतर कोल्हापूर दरबारांत महाराज सरकार यांनीं दत्तोपंत यांना रेव्हिन्यू खात्यांत नोकरी देऊन एल्. एल्. बीच्या टर्म भरण्याकरितां निम्मे पगारी दोन वर्षें रजा दिली. दत्तोपंत सन १९०८ सालीं एल्. एल्. बी. झाले. पुढें दरमहा १५० रुपये पगारावर सदर अमीन व फर्स्ट क्लास सिटी म्याजिस्ट्रेट नेमिलें. यांनीं कोल्हापूर येथें शाहूपुरींत घर बांधिलें आहे.

जगन्नाथ व शंकर येशवंत हे छत्रे यांच्या सरकसमध्यें आहेत. व्यंकटेश येशवंत सांगली हायस्कुलांत शिकत आहे. पोंबुर्ले येथील देवः–स्थानेश्वर, जांवाई व वास्तुपुरुष.

सोमेश्वर येथील गोविंदभट केशवभट पोंबुर्ल्यांस आल्याचें मागें सांगितलेंच आहे. गोविंदभट यांचे पणतू लक्ष्मणभट नारायणभट हे सायगांव येथें यजमान आपटे यांचें उपाध्येपण संपादून राहिले. लक्ष्मणभट यांचे नातू रामकृष्णभट गोविंदभट हे हल्लीं सायगांवीं उपाध्येपण संपादून आहेत.दामोदर गोविंद हे मामलेदार होते,हल्लीं पेनशनर आहेत. लक्ष्मणभट नारायणभट यांचे बंधू रामचंद्रभट यांस पुत्र पांच; पैकीं पहिले गोविंदभट यांस लक्ष्मणभटांनीं दत्तक घेतलें. वामन रामचंद्र यांचे नातू–विठ्ठल येशवंत पोष्ट खात्यांत नोकर आहेत. चिंतामणही जनरल पोष्टांत नोकर आहेत. दत्तात्रय व अनंत हे रेलवेखात्यांत नोकर आहेत.मेघःशाम कोर्टांत व पुरुषोत्तम पोष्ट खात्यांत नोकर आहेत. रामचंद्र जनार्दन हे सन १८९८ त बी. ए. झाले. हल्लीं पुणें ट्रेनिंग कॉलेजांत नोकर आहेत. वासुदेव जनार्दन हे सन १९०३ त बी. ए. झाले. पुढें सन १९०५ मध्यें बडोदे संस्थानची स्कॉलरशिप घेऊन जपानास गेले. जपानहून सन १९११ त मायनिंग इंजिनियर होऊन परत हिंदुस्थानांत आले. हल्लीं नोकरी चांदा येथें कोळशाच्या खाणीवर इंजिनिअर आहेत.

साताऱ्यानजीक १४ मैलांवर मेढें या गांवीं वामनराव रामचंद्र रहात असत. वामनराव रामचंद्र गोखले हे पोंबुर्ल्याहून प्रथम सायगांवीं आले. नंतर सायगांवकर आपटे यांनीं वामनराव यांना आपल्याकडे कारकून ठेवून, त्यांच्याकडे मेढें येथील सर्व व्यवस्था सोंपविली. बेलाचे झाडावर चढून बेल काढीत असतां वामनराव खालीं पडले, त्यामुळें यांचा हात मोडला होता. यांचें हस्ताक्षर उत्तम असून हे फार हुषार होते. यांनीं सायगांव व मेढें येथील व्यापार मोठा भरभराटीस आणिला. यामुळें आपटे यांची वामनरावांवर विशेष मर्जी होती. वामनराव

यांचे चिरंजीव सितारामपंत हे रेव्हिन्यू खात्यांत सातारा येथें क्लार्क होते. यांना पुत्र दोन; वामनराव व रामचंद्र. वामनराव हे हल्लीं मिलिटरी अकौंट्स डिपार्टमेंट-मध्यें नोकर आहेत. सन १९१४ सालांतील फ्रान्सचे लढाईंत हे फ्रान्समध्यें गेले होते. हल्लीं दिल्लीनजीक रुरकी येथें अकौंटंटचे जागीं २५० रुपये पगारा-वर आहेत. रामचंद्रपंत हे पुणें येथें इंजिनियरिंग कॉलेजांत ड्रॉईंग इंस्ट्रक्टर असून पगार २०० रुपये आहे.

सोमेश्वर येथील गोखले.

विश्वनाथ गोविंदभट हे सोमेश्वरास आले. विश्वनाथभट यांजपासून आठवे पुरुष हरी श्रीधर व केशव श्रीधर; हरी श्रीधर हे संस्थानांत नोकर होते; हल्लीं खामगांव येथें आपल्या मुलाजवळ आहेत. केशव श्रीधर हे वैदिक होते. हरी श्रीधर यांचे थोरले चिरंजीव गणपतराव हे १९०२ सालीं बी. ए. झाले. व सन १९०५ सालीं एल्. एल्. बी. झाले. सन १९०६ सालीं मुनसफ झाले. हल्लीं खामगांव येथें सबू जज्जाचे जागीं नोकर आहेत. ह्यांच्या वडिलांचे चुलते जनार्दन दीक्षित हे ब्रह्मावर्तास पुष्कळ वर्षे होते. हे मोठे वैदिक असून, यांनीं अग्निहोत्र घेतलें होतें. यांच्या हातून बरेच यज्ञ झाले म्हणून यांना दीक्षित हें विशेषण चालू होतें. केशव श्रीधर यांचे चिरंजीव जनार्दन केशव हे मुंबई येथें कॉलेजांत आहेत. गणपतराव हरी सबूजज्ज यांचे बंधू चिंतामण हरी हे इन्कम-टॅक्स आफिसांत नोकर आहेत. गणपतराव सबूजज्ज यांची व आमची प्रथम भेट रेलवेंत बोरीबंदर स्टेशनमध्यें झाली. गाडी चालू झाल्यावर, 'गोखले घराण्याचा इतिहास' लिहिणारे इसम ते आम्हीच, असें त्यांना समजल्यावर, आपल्या सोमे-श्वर गांवचे गोखल्यांचा वंशवृक्ष व त्याची माहिती काळजीपूर्वक आमच्याकडे पाठवून, या कामास थोडी मदतही त्यांनीं केली आहे. हा सोमेश्वरचा वंशवृक्ष मिळाल्यानें इतर बऱ्याच प्रकरणांचा चांगला उलगडा झाला आहे.

सोमेश्वर येथें गोखले यांचीं घरें बरींच होतीं. परंतु हल्लीं तेथें उघडे पडलेले चौथरे जे आहेत त्या चवथऱ्यांचे मालकांचे वंशज बाहेर गांवीं गेले आहेत. विद्यमान ४।५ घरें तरी तेथें आहेत. सदाशिव विठ्ठल व कृष्ण विठ्ठल नोकरीवर बाहेरगांवीं आहेत. लक्ष्मण सखाराम यांचे पुत्र धोंडभट, गोपाळभट व वासुदेव हे सोमेश्वर येथेंच आहेत. विष्णु विनायक व महादेवभट दाजीभट हेही सोमेश्वर येथें आहेत.

नागपूर येथील गोखले.

या घराण्यांतील पूर्वज वेळणेश्वराहून सोमेश्वर येथें आले. सोमेश्वराहून पेशवाई अमदानींत बापूभट व आपाभट हे दोघे बंधु पुणें मुक्कामीं आले. हे दोघेही बंधु विद्वान् मोठे ज्ञानसंध्येशील होते. हे पुणें येथून नगराकडे गेले वगैरे पुढें देत आहें.

पुणें मुक्कामीं ज्या वेळीं पेशवाई अंमल गाजत होता त्या वेळीं रा. माधवराव अभ्यंकर म्हणून मोठे श्रीमंत गृहस्थ प्रसिद्ध होते. त्यांचें घर पुणें येथें तपकीर गल्लींत होतें. विद्यमानही आहे. ह्यांचें नांव दुसऱ्या प्रतीच्या सरदारांच्या पटांत होतें. इंग्रजींतही त्यांचा मानमरातब आहे. ह्या नगरकर अभ्यंकरांचा गोखले बंधूंस आश्रय होता. या गोखलेघराण्यांत बापूभटकाका म्हणून होते, त्यांना प्रथम हा आश्रय मिळाला. हे मोठे विद्वान होते. हे मोठे वैदिक व याज्ञिक असून न्याय व व्याकरण शास्त्रांत पारंगत होते. बापूभटकाका गोखले यांचा लौकिक काशीपासून रामेश्वरापर्यंत होता. त्यावेळचे गृहस्थ व त्यांचे आश्रित भिक्षुक ह्यांचा संबंध फार निराळा असे भिक्षुकांचेंच गृहस्थांवर वर्चस्व असे. बापूभटकाका गोखले यांची अशी एक गोष्ट समजते कीं, नगरकरांचे घरीं जेवणाची पंगत असे. त्या वेळीं बापूभटांचे पुतणे सदाशिवभट हे आयत्यावेळीं येत; आणि ते आले म्हणजे यजमानांसह सर्वांनीं खडी ताजिम द्यावी. असाच मान नगरकरांच्या माणसांनीं त्यांस इतर प्रसंगींही द्यावा.

अभ्यंकर हे नगरचे किल्लेदार होते. त्यामुळें त्यांस नगरकर असें म्हणूं लागले. नगरकरांस कान्होर मुक्कामीं जहागीर होती, त्यामुळें त्यांचें रहाण्याचें मूळ ठिकाण तेथेंच होतें. त्यांचें उपास्य दैवत शिव असे, त्यास नित्य एकादशिनी असे; व ती विष्णुभटकाका गोखले यांजकडे असे. पूर्वी गृहस्थ व भिक्षुक व्यवहारचतुर होते. अलीकडील गृहस्थ भिजाशी बनून वाटेल तसे वागूं लागले. आणि आतां खुशामत करणारे भिक्षुक असल्यासच त्यांचा निभाव लागतो. बापूभटांनंतर पुढें त्यांचे चिरंजीव विष्णुभट व सदाशिवभट आप्पाभट यांचे पुतणे विनायकभट चिंतामणभट हे दोघेही चांगले विद्वान होते. या दोघांचे अंगीं 'खुशामत करण्याचा' गुण नसल्यानें यजमानांच्या मर्जीतून ते उतरले. विष्णुभट व विनायकभट यांच्या सासऱ्यांनाही त्याची बिलकुल परवा नव्हती. त्यांची विद्या त्यांना पोटापुरतें देण्यास समर्थ होती, व जगदंबा आपणांस कमी पडूं देणार नाहीं असा त्यांचा दृढ विश्वास होता, व त्याप्रमाणें अखेरपर्यंत यांस कांहीं कमी पडलें नाहीं. विनायकभट हे आश्रित नव्हते. त्यांचें वागणें भाऊसाहेब नगरकरांबरोबर मित्रत्वाचें होतें.

विष्णुभट हे जोतिष व याज्ञिक कामांत फार निष्णात असत. ज्योतिषपैकीं प्रश्न उपस्थित झाल्यास मोठमोठे विद्वानही यांना विचारण्यास येत. ज्योतिष पढविण्याचा यांचा क्रम अखेरपर्यंत चालला होता. यांना पुत्रसंतान नव्हतें.

आपाभटांचे चिरंजीव सदाशिवभट हे पुण्यांतील विद्वान मंडळींत फार प्रसिद्ध असत. हेही याज्ञिक व जोतिषी होते. एके वेळीं कांहीं ज्योतिषशास्त्रांतील प्रश्न काशीक्षेत्राकडून आला होता. अभिप्रायाकरितां पेशव्यांचा वाडा, विश्रामबाग येथें मोठी सभा भरली होती. बराच खल झाल्यावर, सदाशिवभट्टांस बोलाविल्याशिवाय ह्याचा निर्णय होणार नाहीं. तेव्हां त्यांस बोलावून त्यांचे पुढें तो प्रश्न टाकला. तेव्हां थोडा वेळ विचार करून, तत्काळ त्यांनीं त्याचा उलगडा करून दिला. हे फार साधे व भोळे असत. त्यांच्या विद्वत्तेचा त्यांना स्वतःच पत्ता नव्हता. यांस पुत्र एक बाळंभट म्हणून होते. हे जड बुद्धीचे होते. तरी परंपरेप्रमाणें करारी व अभिमानी होते. यांना दोन पुत्र; गंगाधर व रामभाऊ; गंगाधर इंजानियरींग कॉलेजांत इंडस्ट्रीयल क्लासांत शिकले. अमदावाद व रत्नागिरी येथील इंडस्ट्रीयल स्कुलचे मास्तर होते. दोघांचींही लग्नें झालीं आहेत. त्यानंतरची माहिती मिळत नाहीं.

चिंतामणभट हे साधारण वैदिक होते. परंतु गृहस्थ मंडळींत मिळून मिसळून व त्यांच्या कामा कारभारांत मदत देणें. त्यामुळें त्यांच्याजवळ वित्तसंचय साधारण बराच होऊन चरितार्थ चांगल्यारीतीनें चालत असे. श्री. नगरकर यांचेजवळ त्यांची बरीच प्रतिष्ठा होती. ह्या संबंधात परस्पर प्रीति हा एक गुण विशेष होता. चिंतामण वारले तेव्हां, त्यांचे पुत्र विनायकभट हे बारा वर्षांचे होते. विनायकभट यांचा संभाळ यांचे चुलते सदाशिवभट यांनीं केला.

विनायकभट यांस बापूभट दाते यांची मुलगी भिमाताई केली होती. हे दाते पुण्याजवळ भीमेच्या कांठीं फुलगांव येथील होत. ही मंडळी फार धूर्त होती. विनायकभट यांचा जन्म इ. स. १८१५ सालीं झाला. ह्यांच्या वडिलांचा द्रव्य संचय याना नगरकरांकडून मिळाला होता. हे चांगले वैदिक होते. यांचा निर्वाहही भिक्षुकीवरच होता. हे सन १८५० मध्यें मरण पावले. हे देण्याघेण्याचाही व्यवहार करीत होते. हे एकलकोंडे व फार तापट स्वभावाचे होते. घरांतील माणसें यांना थरथरा कांपत असत. यांना मुलगे तिन, चिंतामण, अनंत व कृष्ण; हे तिघेही वडील वारले तेव्हां अनुक्रमें ८–५–३ वर्षांचे होते. मुलाचें संगोपन त्यांच्या मातोश्रीनें आपले माहेरीं दाते यांच्या आश्रयास राहुन केलें, देणें घेणें हातावर व गहाणावर वगैरे करून, मुलें मोठीं होईं तों चालविलें.

चिंतामण ऊर्फ बळवंत यांचें शिक्षण जेमतेम लीटल गो पर्यंत झाले. पुढें चाकरी करणें भाग पडलें. ह्यांच्या वेळीं हरिपंत लंगडे व रुद्राक्ष पंतोजी यांच्या शाळेंत मोडी लिहिणें व वाचणें ह्यांत उत्तम प्रवीणता येत असे. तोंडचे हिशेब

ही उत्तम येत. हे कॉलेजांतही होते. इ. स. १८६३ सालीं नगर येथें नोकरीवर गेले. तेंही जमेना म्हणून पुन्हां कॉजेजांतील अभ्यास सुरू केला. लिटलगो-ची परीक्षा नापास झाली. इतक्यांत जगनाथ नारायण दाते ह्यांची जागा रिकामी झाली. तेव्हां पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजांत ५० रु. पगाराची नोकरी मिळाली बळवंतराव त्या जागेस वास्तवीक लायख नव्हते. परंतु तेथें दैवानें चांगलें निभावून विद्यार्थ्यांची यांच्यावर प्रीति जडली. तों त्यांची बदली कराचीस झाली.तेव्हां सर्वांस फार वाईट वाटलें. मंतर अदमासें सन १८७४ च्या सुमारास बळवंतराव बऱ्हाणपूर मुक्कामीं हेडमास्तर असावेत असा अंदाज होतो. या ठिकाणीं ५ । ६ वर्षें नोकरी केली असावी. एवढ्याकाळांत यांची मान्यता फार विशेष होती. तसेंच श्री. भुस्कुटे साहेब यांचेकडे जाणें येणें विशेष होतें. त्यांनीं लाभास्तव बळवंतरावाची बऱ्हाणपुरांहून बदली झाली त्या वेळीं यांना एक सोन्याचें घड्याळ व शालजोडी बक्षिस दिली होती. पुढें बडिलांची बदली कामटीस झाली नंतर नागपूरास नार्मल स्कूलचे हेडमास्तर होऊन गेले असावेत या जागेवर सन १८८२ पर्यंत असावेत. यांना व्यसनंही कसलेंच नव्हतें. त्यांच्या नितीनें वागण्याचा त्यांच्या वडील मुलावर कांहीं परिणाम झाला नाहीं. हें एक यांना दुःख झालें होतें शहरांत हे बांकाबाईच्या महालांत रहात होते तेथें दक्षिणी ब्राह्मणांची दोन तीन बिऱ्हाडें होतीं त्यांचे परस्परांत तंटे होत तेव्हां बळवंतराव यांच्या कुटुंबानें नेहमीं मध्यस्थी करून ते मिटवावेत या प्रकारची कीर्ती यांनीं नागपूर येथें मिळविली होती

ह्या वेळीं रूढी अशी होती कीं, पुण्याहून इकडे शाळाखात्यांत यावें व पुढें संधान बांधून मुलकी खात्यांत शिरावें शाळाखात्यांत पगार फार हलके असत व अजूनही ते मुंबई इलाख्याचे धर्तीवर मूळींच नाहींत त्याभुळें लोकांचा ओढा मुलकी खात्याकडे विशेष असे पुढें जबलपुरास बदली झाली तेथें बंगाली लोकांत मैत्री संपादन केली व नागपुराप्रमाणें येथें ही नांव मिळविलें पुढें इन्स्पेक्टर झाले. दक्षिण विभागाचे इन्स्पेक्टर ह्या नात्यानें ६ महिने काम केलें. या पूर्वी यांना मधुमेहाचा विकार झाला होता चांद्याहून वर्ध्यास परत आले तेथें पिठलें खाल्याचें निमित्य होऊन पायास सूज आली, ती पुढें जलोदराचें कारण ठरून त्यांतच सन १८८७ फेब्रुवारी ता० १० रोजीं शेवटीं अर्धांगाचा झटका होऊन अंत झाला. त्यांचा मनोदय होता कीं द्वितीय पुत्र श्रीधर हे बी. ए. झालेलें पहावें पण हें मुलाच्या नशीबीं नव्हतें. बळवंतराव यांचे पुत्रापैकीं विद्यमान श्रीधरपंत हे बी. ए. एल्. एल्. बी. आहेत. हे खांडवा येथें वकीली करीत होते.पुढें जबलपूर येथेंही वकिली करीत होते. हल्लीं नागपुर येथें वकिली करीत आहेत. यांनींही वडिला प्रमाणेंच आपली मान्यता राखिली आहे. यांनां दोन मुलगे व दोन नातवंडें आहेत.

श्री० रामचंद्र हरि ऊर्फ भाऊसाहेब गोखले, माजी अ. चीफ जज्ज, बडोदे.

राव० गणेश हरि गोखले, B. A. LL. B.
सबजज्ज, खामगांव.

रा. रा. श्रीधर बळवंत गोखले, वकील,
B. A. LL. B. नागपूर.

जकातवाडी व वडोदें येथील गोखले.

सोमेश्वराहून नारायण हा पुरुष जकातवाडी येथें आला. जकातवाडी साताऱ्यानजीक दक्षिण आंगांस बोगद्याचे पलीकडे अगदीं जवळ आहे. जकातवाडी येथें गोडबोले उपनांवाचें एक कुटुंब रहात होतें. त्या कुटुंबाच्या आश्रयानें नारायणराव गोखले राहिले होते. पुढें सन १८३० चे सुमारास जकातवाडीहून गोडबोले बडोद्यास गेले त्यांचे बरोबर नारायणरावांचे नातू सदाशिव काशिनाथ गोखले हे ही बडोद्यास गेले. सदाशिव काशिनाथ हे बडोदें येथें गिर्वीकर कदम यांचेकडे नोकरीस राहिले.

सदाशिवराव यांचे पुत्र हरी, हरी याचा विद्याभ्यास झाल्यावर यांनी ज्युडिशियल खात्यांत कारकुनी पतकरीली. पुढें सन १८८४।८५ सालांत दीडशें रुपये पगारावर सब्जज्जाचे जागीं कायम झाले. यांच्या नियमीतपणाबद्दल त्या वेळीं यांची फारच ख्याती होती. तसेच आपल्या अम्मलदारीचे कामातही निस्पृह व न्यायी होते. हे स्नान संध्येशील होते. नित्य सकाळीं प्रातःस्नानसंध्यादि देवपूजा व श्रीसूर्यास नमस्कार व जप जाहल्यावर भोजन करून कचेरीला जात असत. यांनीं सन १८९० सालांत पेनशन घेतली.

हरीपंत यांनीं पेनशन घेतल्यावर आपला काल ईश्वराचें भजन-पूजन व जपजाप्य यांमध्यें घालविला. यांनीं दोन गायत्री पुरश्चरणें केली. यांना बहुतेक लोक सत्पुरुषाप्रमाणें मानीत असत. यांचे कुटुंब सौ. सरस्वतीबाई यांनी पतिसेवा अखंड केली म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. सौ. सरस्वतीबाईचीं पतिनिष्ठा पाहून परमेश्वरानेंही त्यांना सौभाग्य अखंड दिलें सुमारें १९०२ सालात सौ. सरस्वतीबाई स्वर्गस्थ जाहल्यानंतर हरीपंतांनीं चतुर्थाश्रम घेतला. पुढें सन १९०८ सालीं स्वामी महाराजही समाधिस्थ झाले.

हरीपंताचे पुत्र रामचंद्र यांचें शिक्षण मराठी व इंग्रजी बडोद्यास झाले सन १८८० सालीं मॉट्रिक झाले. बडोद्याची स्कॉलरशिप मिळवून पुढील अभ्यासाकरितां मुंबई येथें एल्फिस्टन कॉलेजांत गेले. सन १८८४ त रामचंद्रपंत बी. ए. झाले. सन १८८९ साली एल्. एल्. बी. झाले. सन १८९० सालीं वडिलांनीं पेनशन घेतली,याच सालीं रामचंद्र उर्फ भाऊसाहेब वकीली करूं लागले. स.१९०१ सालापर्यंत खाजगी वाकिली करीत होते. पुढें वरीष्ट कोर्टात पांचशें रुपये पगारावर सरकारी वकील झाले.पुढें इ. स. १९१५ चे मार्च महिन्यांत दरमहा ९०० शें रुपये पगारावर हायकोर्ट जज्ज झाले. सन १९१८ त सेकंड जज्जांचे जागीं नेमणूक होऊन पगार एक हजार रुपये जाहला. सन १९१९ त ॲक्टिंग चीफ जज्जाचे जागेवर नेमणूक होऊन पगार दरमहा, १२०० शें रुपये झाला.

भाऊसाहेब सन १९१२ ते १९१४ सालापर्यंत शहर सुधराई (म्युनिसिपल)

खात्यांत काम करीत असतां दोन वेळ व्हॉईसप्रेसिडेंट झाले होते. सन १९१३ तं श्रीमंत महाराज सरकार सयाजीराव यांच्या हस्तें एक रौप्य पदक मिळालें आहे. सदरहु रौप्य पदकाचे एका बाजूवर (हरहर महादेव जीन घर जीनतख्त) असा मजकूर असून दुसऱ्या बाजूवर " श्री. सयाजीराव महाराज गायकवाड" अशी अक्षरें व फोटो आहे. भाऊसाहेब यानां श्रीजगद्गुरू शंकराचार्य यांच्याकडून एक सुवर्ण पदक मिळालें आहे. त्या पदकाच्या एका बाजूवर शंकराचार्य यांचा फोटो व दुसऱ्या बाजूवर " धाराशास्त्र मार्तंड रा. हरी गोखले" असें लिहिलेलें आहे. सन १९०८ मध्यें कायदेकानु करण्याचे प्रतिनिधींत श्रीमंत महाराजांनीं भाऊसाहेब यांची नेमणूक केली. तेव्हां बडोदें येथील वकील मंडळीनीं रेशमी रुमालावर लिहुन एक' मानपत्र' भाऊसाहेबांनां सन १९०८ सालांतच दिलें आहे.

पूर्वी हरीपंतांनीं जें घर घेतलें होतें, त्याच्या जवळील जास्त जागा खरेदी करून तेंच घर मोठें करून तिमजली बांधिलें आहे. पादरारोड वर एक बाग व या बागेंत एक बंगला बांधिला आहे. भाऊसाहेबांचें वय अजमासें ६२ वर्षांचे असावे. यांची रहाणी साधी व गरीब असून हे शांत स्वभावाचे आहेत. यांना द्वितिय कुटुंबापासून एक पुत्र रत्न प्राप्त झालें असून, त्याचें नांव हरी ऊर्फ बाळासाहेब असें ठेविलें आहे.

हल्लीं जकातवाडी येथें भाऊसाहेबांचे दशांतील एकच पुरुष विद्यमान आहे. शंकर पांडुरंग गोखले; हे विद्यार्थी असून पुणें येथें टिळक कॉलेजांत आहेत.

गोवळ येथील गोखले.

गोंवळ हा गांव राजापूर तालुक्यांत आहे. जैतापुरावरून जी खाडी राजापुरास जाते त्या खाडीचें कांठीं गोंवळ हा गांव आहे. या गांवीं गोखले यांचीं घरें बरींच आहेत. गोंवळचे गोखल्यांचें एक घराणें नागपूर, महेश्वर कडे जें विद्यमान आहे त्यांच्यापैकीं गोवळ येथें कोणींच नाहीं. नागपूर, महेश्वर व मुंबई वगैरे ठिकाणीं, त्या कुटुंबांतील गोखले विशेष हुन्नरी आहेत. मुंबई येथें केशवराव ऊर्फ बबन गोखले इलेक्ट्रिक व मेक्यानिकल इंजिनीयर प्रसिद्ध असून, यांचें कुटुंब सौ०अवंतिकाबाई सर्वश्रुत आहेतच. गोवळ या गांवापासून डोंगर हा गांव अदमासे एक कोसभर आहे. गोवळ येथें हल्लीं गोखले यांचीं घरें निरनिराळ्या अशा तीन जागीं आहेत. चौथी जागा ओसाड पडली आहे. कारण या जागेवरील गोखले नागपूर, महेश्वरकडे गेले आहेत, खाडीच्या जवळ जे गोखले विद्यमान आहेत, ते चांगले सुखवस्तु आहेत. वामनराव विष्णु यांचे

पणजे विठ्ठलराम हे प्रथम गोवळ गांवीं आल्याचा क्षेत्रीचा दाखला आहे. या घराण्यांत रामचंद्र बापुजी हे अतिशय हुषार व मोठे मुत्सद्दी होऊन गेले. हे पद्धीधर वकील नसतांना कायदेपंडित होते. कायदेशीर सल्ला विचारण्याकरितां यांच्याकडे शेंकडो लोक नेहमीं येत असत. यांचा दरारादी विशेष होता. यांनी द्रव्यसंचयही बराच केला होता. हे बापुजी यांचे दत्तक पुत्र होते, यांचे वडील बंधु कृष्णराव हे ही बाळाजी यानां दत्तक गेले. हल्लीं कृष्णाजीपंत व यांचे कनिष्ठ बंधु वामनराव हे आहेत, कृष्णाजीपंताचे चिरंजीव विठ्ठलराव आणि वामनराव विष्णु हे गोंवळ येथें राहून व्यापार व शेती करतात. या घराण्यास गोंवळ गांवीं येऊन अदमासें १५० वर्षे होत आलीं. हें घराणें चांगलें घरंदाज असून आल्या गेल्याचा चांगला सत्कार करितात. या घराण्यापैकींच म्हणजे विठ्ठलराव यांचे चुलते कृष्णंभट विठ्ठल यांचे वंशजही गोवळ येथें वामनराव विष्णु गोखले यांच्या घरानजीक आहेत.

बाबजी कृष्ण यांचे पणतु कृष्णाजी विठ्ठल व गणेश लक्ष्मण हें घराणें व वरील घराणें दशापैकीं आहे. कृष्णाजी व गणेश हे गोवळ येथें शेती करून आहेत.

विठ्ठल राम यांचे वडील बंधु गणेश राम यांचा वंश हल्लीं मुटाट येथें आहे. गणेश राम यांचे नातु पांडुरंग व बाजी नारायण; पांडुरंग नारायण यांचे नातु शिवराम हरी गोखले एम्. ए. हे हल्लीं जबलपूर ट्रेनिंग कालेजांत प्रोफेसर आहेत. बाजी नारायण यांचे नातु विष्णु भास्कर व श्रीधर भास्कर विद्यमान, बापर्डे व मुटाट येथें आहेत. भास्कर बाजी यांना पुत्र पांच, पैकीं विष्णु व श्रीधर हे हयात असून सर्वांची मुलें आहेत. बाळाजी भास्कर हे कोची मलबार येथें (राजापूरचे शेवडे–आपटे यांचे) मुनीम होते. विनायक व विठ्ठल भास्कर कमिशन एजन्सी करीत होते. विष्णु भास्कर हे पेन्शनर आहेत. श्रीधर भास्कर हे बापर्डे येथें राहून शेती करितात. अनंत बाळाजी, शंकरराव विनायक यांनीं माहिती देतांना, "आम्ही कुवेशीहून मुटाटला आलों" असें सांगितलें होतें. परंतु तें चुकीचें आहे. गोवळहून मुटाटला गेले हें बरोबर आहे. याला आधार यांच्या पूर्वजांचे नाशीक–त्रिंबकेश्वरी जे लेख आहेत त्यावरून सिद्ध होत आहे.

विठ्ठलराम व गणेशराम यांचे चुलते कृष्णंभट्ट विठ्ठल यांचे पुत्र बाळाजी ऊर्फ बल्लाळ यांचे नातू विष्णु आबा हे गोंवळाहून कोर्लें येथें गेले होते, हे चांगले वैदीक होते, विष्णु आबा यांनीं दोन वेळां पायीं तीर्थयात्रा केल्या. विष्णु आबा यांचे चिरंजीव रामकृष्ण हे गवई आहेत. रामकृष्णपंत हे हल्लीं इंदोर येथें मुलींचे शाळेंत गायन मास्तर आहेत.

कृष्णंभट विठ्ठलभट यांचे बंधु जिऊभट; जिऊभटाचे नातु सखारामउर्फ त्रिंबक गंगाधर जिऊभट हे पुण्यास पेशवाई अमलांत आले, गंगाधराचे नातू राघोनाईक

हे पुण्यांत प्रसिद्ध होते. यांनीं सदाशिव पेठेंतील हौदास लागून दक्षिण आंगास मोठा वाडा बांधिला आहे. सदरहु वाडयापैकीं कांहीं भाग आतां गोखले यांचा आहे. व कांहीं भाग यांच्या पैकीं कोणी विकला असावा त्या वाडयाचा म्यु. नं ५९३ चा जो भाग आहे त्याचा मालक सखाराम शंकर गोखले हा विद्यमान तेथें रहात आहे. हा विद्यार्थी आहे. राघोपंत यांचे पुत्र रामचंद्र नाईक. रामचंद्र नाईक गोखले यांचा वाडा असें अद्यापि म्हणतात.

सदाशिव पेठेंतील म्यु. नं. २९५ चें घर बळवंतराव गोखले यांचें होय. बळवंतराव गोखले हे कंट्राक्टर होते बळवंतराव गोखले यांचे कुटुंब वांई येथील असल्यामुळें त्यांचा व लेखकाचा विशेष परिचय होता. बळवंतराव स्नानसंध्येशील असून, फार कष्टाळु होते. स्वभाव गरीब आणि रहाणी अगदीं साधी होती. यांचे एकुलते एक पुत्र विनायकराव गोखले होत, हे बीए. ए. एल्. एम्. अँड. एस् होऊन विलायतमध्यें दोन वेळा जाऊन शिक्षण घेऊन आले. हल्लीं त्यांनीं पुण्यास दोन खासगी दवाखाने चालूं केले आहेत. त्यांना "V.B. Gokhale D.O. (oxon) D.O. & S. [London] F. R. C. S. E. Surgeon of EYE Specialist." असें म्हणतात. सखाराम शंकर व विनायक बळवंत हे दशांतील आहेत.

जिऊभट विष्टलभट यांचे बंधू वासुदेवभट विष्टलभट गोखले यांचा मुलगा धोंडदेव वासुदेव हे बेळगांवपैकीं महाल चंदगड येथें आले, चंदगड येथें या गोखल्यांनीं वस्ती केल्यास अदमासें शंभर वर्षें झालीं असावींत, धोंडदेव वासुदेव, रामचंद्र धोंडदेव व गोपाळ रामचंद्र हे तिघेही वैदीक व ज्योतिषी होते. रामचंद्र धोंडदेव यास पुत्र सहा; पैकीं गोविंद रामचंद्र यांचा वंश हल्लीं चंदगड येथें आहे; आणि गोपाळ रामचंद्र यांचा वंश हुबळी येथें आहे. वासुदेव रामचंद्र हे हल्लीं चंदगड येथें शेती करून आहेत, गोपाळ रामचंद्र यांस पुत्र तीन, गणेश, विष्णु व पांडुरंग, गणेश गोपाळ गोखले हे हुबळी येथें प्रसिद्ध ज्योतिषी आहेत विष्णु गोपाळ हे रेल्वेत नोकर आहेत, आणि पांडुरंग गोपाळ हे कंट्राक्टर असून, लोंढा येथें रहातात.

अनंत रामाजीपंत गोखले हा पुरुष वेळणेश्वराहून अदमासें दोनशें वर्षांपूर्वी गोवळ येथें आला असावा. अनंत याचे नातू लक्ष्मण विष्टल यांस पुत्र चार; विमणाजी, वासुदेव, केशव व बाळाजी, गोविंद वासुदेव गोखले हे गोवळहून निघोन, गानू खासगीवाले ह्यांच्याबरोबर त्यांचे कारकून म्हणून देशावर मंडलेश्वरीं आले. इंदोर संस्थानांत नर्मदेच्या कांठीं असलेलें मंडलेश्वर गांवीं येऊन, गोविंद वासुदेव यांनीं कारकुनी संभाळून एक बाग केली. पुढें त्या बागेंत चांगलें उत्पन्न होऊं लागलें. गोविंदराव यांचे चिरंजीव काशीनाथपंत

सौ० अवंतिकाबाई गोखले, मुंबई.

हे मोठे हुषार व धूर्त होते. अहिल्याबाई होळकर यांनीं महेश्वर येथें नर्मदेच्या कांठीं मोठा घांट बांधविण्याचें कामावरील व सर्व देखरेख काशीनाथपंत गोखले यांच्या स्वाधीन केली. तेव्हां काशीनाथपंत गोखले हे महेश्वरीं राहून सर्व व्यवस्था पाहूं लागले. इकडे गोविंदराव यांनीं आपल्या मदतीस आपल्या चुलतबंधूच्या मुलास देशावर आणिलें रामचंद्र सदाशिव हे कोंकणांतून निघोन चुलत चुलते गोविंदराव यांच्या जवळ मंडलेश्वरीं आले. गोविंदरावांचे मागें त्यांचा व्यवसाय रामचंद्र यांनीं पुढें चांगला चालविला. कोंकणांत ह्या घराण्यापैकीं ह्यात हल्लीं कोणीं नाहीं. देशावर रामचंद्र सदाशिव व काशीनाथ यांचे वंशज हल्लीं, मुंबई व्यारा, नागपूर व मंडलेश्वर येथें आहेत.

पुढें कांहीं कारणानें मल्हारराव होळकर यांनीं काशीनाथपंत यांचा अपमान करून सर्व इस्टेट जप्त केली. तेव्हां महेश्वर सोडून काशीनाथपंत मंडलेश्वरीं आले. आणि मंडलेश्वर येथें शेती वाडी करून घर बांधिलें. हल्लीं शेती व घर तेथें आहे. रामचंद्र सदाशिव यांचे तीन मुलांचा आणि काशीनाथ गोविंद यांच्या दोन मुलांचा वंश हल्लीं चालू आहे.काशीनाथपंताचे वडील चिरंजीव गणपतराव हे बी. ए. होते. यांनीं मध्यप्रांतांत बस्तर स्टेटमध्यें दिवाणाचें काम पांच वर्षे केलें. नंतर रिटायर्ड होईपर्यंत मध्यप्रांतांत सिव्हील जज होते. दुसरे चिरंजीव वामन ऊर्फ रावजी हे नागपूर येथें वकिली करीत होते. हे नामांकित वकील होते. नागपूरच्या गोरक्षण सभेचे सतत ७ वर्षें सेक्रेटरी होते. काशीनाथपंताचे तिसरे चिरंजीव कृष्णराव एल्. एम्. अँड एस्. यांनीं मध्य प्रांतांत असिष्टंट सर्जनचें काम बरींच वर्षे केलें होते. रावजी यांचे वडील चिरंजीव शंकरराव हे शेती करून आहेत. यांचे धाकटे बंधु पद्माकर हे कालेजांत आहेत. नागपूर येथें वडिलोपार्जित घर असून हे मालगुजार आहेत.

रामचंद्रपंतांनीं दोन बायका केल्या होत्या. प्रथमचे कुटुंबापासोन चिमणाजीपंत झाले. यांनीं महेश्वरीं खासगींत काम केले. व उतारवयांत संन्यास घेतला. यांचे चिरंजीव विनायकराव हे कलकत्ता युनिव्हर्सिटीचे बी. ए. असून हल्लीं नागपूर येथें वकिली करीत आहेत. दुसरे कुटुंबापासून गोपाळ, वासुदेव व गोविंद असे तीन मुलगे झाले. गोपाळराव रेलवेंत स्टोअर कीपर होते. वासुदेवराव हे शाळाखात्यांत इन्स्पेक्टर होते आणि गोविंदराव हे हल्लीं व्यारा येथें व्यापार करीत आहेत.गोपाळराव यांचीं मुलें दोन;केशव व शरत्चंद्र.केशवराव ऊर्फ बबन हे हल्लीं मुंबई येथें इलेक्ट्रीक व मेकयानिकल मशीनरीचा व्यापार करीत आहेत. केशवराव हे बबन गोखले या नांवानेंच प्रसिद्ध आहेत. यांचें कुटुंब सौ. अवंतिकाबाई गोखले ह्या सुशिक्षित आहेत. यांनीं महात्मा गांधी यांचें चरित्र लिहिलें आहे. ह्या चांगल्या व्याख्याता आहेत. यांनीं विलायतचा प्रवासहि केलेला आहे. ह्या देशाभिमानी असून स्त्रीसमाजास भूषणभूत आहेत. बबनराव यांचे

घाकटे बंधु शरत्चंद्र हे न्यारा येथें चुलते गोविंदराव यांच्याजवळ राहून व्यापार करीत आहेत.

अनंत रामाजी यांचे चवथे पुत्र माहादाजी, माहादाजीचे पणतु माहादेव कृष्ण हे हल्लीं उमरावती येथें आहेत. हे प्रथम जळगांवीं आले. नंतर उमरावती येथें जाऊन खाणावळीचा धंदा सुरू केला. या धंद्यावर मुलाबाळांचें शिक्षण वगैरे होऊन, पहिला मुलगा मोरेश्वर हा जळगांवीं जपानी कंपनींत नोकर आहे. बाकीचे दोघे विद्यार्थी आहेत महादेव कृष्ण यांची खाणावळ हल्लीं उमरावती येथें चालू आहे. यांचें वय ६३ वर्षांचें आहे. यांचे १०९० रुपये चोरीस गेले. तेव्हां सरकार चौकशी चालली. अखेर चोरी तर मिळाली नाहींच, परंतु कचेरींत हेलपाटे खातां खातां हे त्रासले. अखेर यांनीं निश्चय केला कीं, आपलें कितीहि नुकसान होवो परंतु कोर्टाची पायरी पुन्हां कधींहि चढणार नाहीं. व हा वेळ पावेतों चढली नाहीं.

दाभोली येथील गोखले.

दाभोली हा गांव वेंगुर्ल्यापासून साधारण दोन मैल आहे. वेंगुर्ला हा गांव समुद्रापासून उंच जागेवर आहे. या गांवापासून एक डोंगर चढून वरील सपाटी थोडी चालून, डोंगराखालीं उतरण्यास सुरवात करावयाची म्हणजे खालीं सपाटीवर दिनकर सिताराम गोखले यांचे घराजवळ पोंचतो. दोन्हीं डोंगरांमधील समुद्रापासून आंत सुमारें ३।४ मैलांच्या खोऱ्यांतील सर्व जमीन बागाईत आहे. या खोऱ्यांतील सर्व जमीन दाभोली गांवाची आहे. खोऱ्यामधून एक नदी वाहत जाऊन समुद्रास मिळते; या नदीचे दोन्ही बाजूस दाभोली गांव वसला आहे. नदीच्या दोन्ही बाजूस गोखले यांचीं घरें व जमिनी आहेत.या गांवीं प्रथम सुमारें १७५वर्षांपूर्वी वाडी संस्थानांतील कोणी आठवले या उपनांवाचे इसम रहात होते. त्यानें आपले मेहुणे माहादेवभट गोखले यांना आणून दाभोली हा गांव मक्त्यानें केला. पुढें कांहीं वर्षांनीं आठवले यांनीं खटपट करून वाडीकर संस्थानिकांकडून दाभोली गांव माहादेवभट गोखले यांस इनाम देवविला. माहादेवभट गोखले यांनीं दाभोली गांव सर्व जंगलमय होता त्यांत जमिनी पाडून नारळ व सुपारी यांची लागवड करून गांव सुंदर व चांगला वसविला. त्यानंतर बंडाल्याचे त्रासानें महादेवभट गोखले व इतर वस्ती केलेले सर्व लोक गांव सोडून पळाले.पुढें कांहीं दिवसांनंतर संस्थानिक वाडीकर यांनीं बंदोबस्त करून बंडावा मोडला. दाभोली गांव उत्तम बागाइताचा वसविलेला पाडून ज्यांनीं भयंकर कष्ट करून हा गांव बागाईत केला त्यालाच हा गांव दिला पाहिजे असें मनांत आणून, महादेवभट

गोखले यांची चौकशी करून त्यांना आणिलें. आणि सर्व ठिकाण व जमीन त्यांच्या स्वाधीन करून, महादेवभट गोखले यांच्या नांवें वंशपरंपरा कायम खंडानें सनद करून दिली. हा दाभोली गांव इंग्रज बहादुर यांनीं सर करून काय कारणानें आपले अमलांत घेतला तो त्यांनाच ठाऊक ! परंतु हल्लीं हा गांव इंग्रजी अंमलाखालीं आहे हें खास. पूर्वीच्या करारास मान देऊन या सरकारांनींही कायम खंडानेंच गोखले यांच्या जमिनी त्यांच्याकडे चालविल्या आहेत.

माहादेवभट यांनीं चतुर्थाश्रम घेतला होता. यांना पुत्र तीन; अनंतभट, त्रिंबकभट व गोपाळभट; अनंतभटाचे पुत्र रामचंद्रभट; रामचंद्रभटास पुत्र पांच; पैकीं दामोदरभट रामचंद्रभट गोखले हे सर्वांत विद्वान् वेा शा. सं. आणि तपोनिष्ठ होते. बेळगांव येथील तातोबा सुंठणकर यांचे चिरंजीव कृष्णराव हे मुधोळ संस्थानांत कारभारी होते. कृष्णराव सुंठणकर यांनीं दामोदरभट गोखले यांना गुरु केलें होतें. एकदां दामोदरभट यांना मुधोळ येथें कृष्णरावांनीं नेलें. तेथें मुधोळकर राजे यांच्या दर्शनास आले. सतेज शांत अशा तपोनिष्ठ ब्राह्मणास पाहून राजेसाहेब प्रसन्न झाले. आणि पुढीलप्रमाणें दामोदरभट गोखले यांना सनद करून दिली.

श्रीराम

वेदशास्त्रसंपन्न राजश्री दामोदरभट बिा रामचंद्रभट गोखले रार दाभोली नजीक वेंगुर्ले जिा रत्नागिरी स्वामीचे शेवेसीः—

विद्यार्थी बळवंतराव राजे घोरपडे संस्थान मुधोळ दंड [वत] विनंती विज्ञापना आपण थोर ब्राह्मण सत्पात्र सत्रव आपल्यास संस्थानाकडून दरसाल पन्नास ५० रुपये वर्षासन करून दिल्हें आहे. तरी तुम्हांस व तुमचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरा दरसाल पन्नास रुपये श्री रामनवमीचे उत्साहांत देत जाऊं. ते घेऊन दौलतीस कल्याण चिंतून असावें. ताा २५ माहे जानेवारी सन १८६१ इसवी शके १७८२ रौद्रीनामसंवत्सरे पौष शुा १४ रोज भृगुवार बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

बळवंतराव राजे घोरपडे व यांचे कारभारी सुंठणकर हे दामोदरभट गोखले यांचे शिष्य होते. पुढें दामोदरभट यांनीं चतुर्थाश्रम घेतला. स्वामी झाल्यावर लवकरच समाधिस्थ झाले. दाभोली तेथें दामोदरभट गोखले स्वामी यांची समाधी रंगराव विठ्ठल सुंठणकर यांनीं बांधविली. मोठ्या देवालयाप्रमाणें सभामंडप व त्याला लागून गर्भागार; त्यांत समाधि. येणेप्रमाणें बांधवून समाधीच्या प्रीत्यर्थ नंदादीप व पूजेअर्चेकरितां ८०० रुपयांची जमीन विकत घेऊन तिचें उत्पन्न वरील खर्चास लावून दिलें आहे.

दामोदरभट गोखले, यांचे पणजे माहादेवभट आणि चिरंजीव नारायणभट अशा तिघांनीं चतुर्थाश्रम घेतल्यामुळें तिघांच्याही समाधी वरील सभामंडपाजवळ

आहेत. श्रीधरभट कृष्णंभट यांनीं आणि गंगाधर भास्कर यांनींही संन्यास घेतला होता. ह्या समाधी ज्याच्या त्याच्या जमिनीमध्यें आहेत.

दत्तात्रय व चिंतामण विष्णु हे शेती करतात. शंकर विष्णु हे देवी डॉक्टर आहेत. सखाराम, गोविंद व काशिनाथ विनायक हे डाहाणू येथें शेती करून आहेत. आबाजी बाळकृष्ण मुंबई येथें म्युनिसिपालिटींत नोकर आहेत. कृष्णाजी हरी शेती करितात. विठ्ठल येशवंत शेती करीत आहेत. दिनकर सिताराम रत्नागिरी येथें ट्रेनिंग कॉलेजांत आहे. लक्ष्मण मोरेश्वर शेती करून आहेत. जगन्नाथ त्रिंबक रेलवेंत नोकर आहेत. भास्कर वामन हे वडगांव येथें मास्तर आहेत.

गोपाळभट माहादेवभट यांचा वंश वेतोरें येथें आहे. गोविंद शिवराम मोठे वैदिक होते. केशव शिवराम यांचे चिरंजीव सदाशिव केशव हे मुंबई येथें म्युनिसिपल स्कूलमध्यें मास्तर आहेत. कृष्णाजी घोंडदेव हे वेतोरें येथें आहेत.

डोंगर, गोळप व पांवस येथील गोखले.

डोंगर, गोळप व पांवस येथील गोखले घराण्याचे मूळ पुरुष वेळणेश्वर येथील राहणारे होत. वेळणेश्वराहून सोमेश्वर व सोमेश्वराहून घाऊलवल्ली; घाऊलवल्लीहून कासारवेल व कासारवेलहून डोंगर, गोळप व पांवस. येणेंप्रमाणें या घराण्यांतील पुरुष ज्या ज्या गांवीं गेले, त्या त्या गांवचे देवांना प्रतिवर्षी नैवेद्य घालूं लागले. श्रीवेळणेश्वर, श्रीसोमेश्वर आणि श्रीविश्वेश्वर या देवांना वरील गांवचे गोखले नैवेद्य घालतात. देवांच्या दिवाळींत कोंकणांतील देवांना नैवेद्य घालण्याची चाल आम्हां कोंकणस्थांत आहे. या देवांच्या नांवांवरून निरनिराळ्या ठिकाणीं कोण कोठें गेले हें निश्चित ठरवितां येतें.

कासारवेल या गांवाहून माहादेवभट बाळंभट गोखले निघोन डोंगर या गांवीं आले. यांना पुत्र पांच; नारायणभट, केशवभट, कृष्णाजीपंत, गोविंदपंत व सखंभट नारायणभट यांचे पणतू सिताराभट बाळंभट हे राजापूर येथील वेदशाळेचे अध्यापक आहेत. निपणतू सदाशिव भिकाजी डोंगरे येथेंच असतात. हे वैदिक आहेत. विठ्ठल भिकाजी हे वार्शी लाईट रेलवेंत नोकर आहेत. पुरुषोत्तम पांडुरंग मुंबई येथें इंजिनियर खात्यांत नोकर आहेत.

केशवभट यांचे पणतू गोपाळभट व कृष्णाजीपंत; गोपाळभट हे वैदिक असून मोठे नामांकित शास्त्री आहेत. कृष्णाजी लक्ष्मण हे बी. ए. एल्. एल्. बी. असून, हल्लीचे रामदुर्ग संस्थानाधिपति श्रीमंत सरदार रावसाहेब भावे रामदुर्गकर यांचे ट्यूटर होते. हल्ली वासदा संस्थानचे सेक्रेटरी आहेत. वामनभट गोपाळ-

भट हे वैदिक असून राजापूर येथील वेदशाळेचे चिटणीस आहेत. विनायक व अनंत हे मुंबई येथें सावकारी नोकर आहेत. चिंतामण, श्रीधर व परशराम हे वैदिक असून डोंगर येथेंच आहेत. वामन केशव हे वैदिक असून डोंगर येथेंच रहात आहेत.

गोविंदपंत व कृष्णाजीपंत हे दोघेही प्रसिद्ध शूर वीर परशरामभाऊ पटवर्धन यांच्या कारकीर्दीत तासगांव येथें गेले. नंतर तेथून जमखंडी येथें गेले. गोविंदपंतांचे वंशज हल्लीं जमखंडी येथें आहेत, ते मोरेश्वर काशिनाथ व श्रीधर काशिनाथ; मोरेश्वरपंत हे जमखंडी येथील मराठी शाळेचे हेडमस्तर आहेत. आणि श्रीधरपंत हे मुलींच्या शाळेंत मास्तर आहेत. येशवंत मोरेश्वर हे कॉलेजांत आहेत. गोविंद गंगाधर हे पुष्कळ वर्षे रेलवेंत नोकर होते. हल्लीं बेळगांवनजीक शाहापूर येथें (मोरो काशीनाथ यांचे चुलत बंधु) बारट इनामदार यांचेकडे आहेत. बायको व मुलें वारल्यामुळें नोकरी सोडून दिली. गोविंद गंगाधर यांचे आजे परशराम गोविंद गोखले यांना जमखंडी येथील त्या वेळचे प्रसिद्ध विठ्ठलपंत आपटे यांची बहीण दिली होती. नांव जानकीबाई गोखले असें होतें.

महादेवभट बाळंभट यांचे बंधु सदाशिवभट बाळंभट हे अग्निहोत्री होते. हे कासारवेलहून प्रथम डोंगर या गांवीं येऊन राहिले. यांनाही पुत्र पांच; पैकीं तीन मुलांचा वंश हल्लीं चालू आहे. सदाशिवभट बाळंभट गोखले अग्निहोत्री यांचे पणतू सखाराम बामुदेव हे देशावर बेळगांव मुक्कामीं आले. येथें भिक्षुकी करून राहिले. स्थिती फारच गरीबीची होती. सखारामभट यांचे एकुलते एक पुत्र कृष्णाजी यांनीं मधुकरी मागून मराठी अभ्यास पुरा करून इंग्रजी ४।५ पुस्तकें केलीं. नंतर बेळगांव येथेंच कृष्णाजीपंतांनीं मराठी शाळा सुरू केली. या शाळेंत पोलिसांचीं मुलें बरींच येत होतीं. त्यामुळें कृष्णाजी सखाराम यांनीं पोलिस खात्यांत नोकरी धरली. नंतर रेव्हिन्यू खात्यांत शिरले. या खात्यांत नेटिव्ह अकौंटंट झाले. तेव्हां साठ रुपये पगार होता. याच पगारावर पेनशन झालें. पेनशन झाल्यावर ५।६ वर्षांनीं वारले. यांनीं आपल्या मुलांना, हरीभाऊ व गोविंदराव यांना बी. ए. पर्यंत शिक्षण दिलें. यांनीं बेळगांव येथें घरखरेदी केलें. हरी कृष्णाजी हे फर्ग्युसन, डेक्कन व उईलसन इत्यादि कॉलेजांत अभ्यास करून सन १८९९ त बी. ए. झाले. नंतर १९०० सालांत एज्युकेशनल खात्यांत नोकरी धरली. हल्लीं परसनल असिस्टंट टु धी एज्युकेशनल इन्स्पेक्टर सदर्न डिव्हीजन या जागीं असून धारवाड येथें रहातात. गोविंदराव कृष्ण हेही सन १८९९ त डेक्कन कॉलेजांतून बी. ए. झाले. नंतर रेव्हिन्यू खात्यांत नोकरी धरली. हल्लीं कारवार जिल्ह्याचे कलेक्टर यांचे चिटणीस आहेत. कृष्णाजीपंतांचे तिसरे चिरंजीव सखाराम हे बेळगांव येथें सब् असिस्टंट सर्जन आहेत.

वामन हरी हे सब् असिस्टंट सर्जन असून धारवाड येथें टूरिंग मेडिकल ऑफिसर आहेत. श्रीधर हरी हे फर्ग्यूसन कॉलेजांत ज्युनिअर बी. ए. त आहेत. केशव गोविंद हे सन १९१९ त फर्ग्यूसन कॉलेजांतून बी. ए. झाले. हल्लीं बेळगांव येथें राष्ट्रीय कार्यांत आहेत. हे उत्तम वक्ते असून पक्के राष्ट्रभक्त आहेत. सध्यां असहकारितेच्या चळवळीमुळें सरकारानें त्यांना तुरुंगांत टाकिलें आहे, सदाशिव गोविंद हे सदर्न मराठा रेलवेंत नोकर आहेत. बाबजीभट यांचे पणतू श्रीधर बळवंत हे रत्नागिरीजवळ कलें गांवीं शेतीवाडी करून आहेत.

सदाशिवभट बाळंभट अग्निहोत्री हे प्रथम डोंगर येथें आले, हें वर सांगितलेंच आहे. हे डोंगरहून गोळप येथें कां गेले ती हकिकत अशी आहे कीं, डोंगरजवळ श्रीधूतपापेश्वर म्हणून श्रीशंकराचें स्वयंभू स्थान आहे. सदाशिवभट यांचा नित्य नियम असे कीं, श्री धूतपापेश्वरावर एकादशिनी—अभिषेक—पूजा केल्याशिवाय अन्नग्रहण करावयाचें नाहीं. पुढें यांची पत्नी अपस्मारानें आजारी पडली. अग्निहोत्र चालू होतें. त्यांत पत्नी फारच आजारी झाल्यामुळें सदाशिवभट श्रीधूतपापेश्वराचे देवालयांत जाऊन तपःश्चर्येस बसले. दृष्टांत झाला कीं, हा गांव सोडून स्थलांतर केल्यास गुण येईल. तेव्हां सदाशिवभटांनीं तुझ्या सेवेंत मी अंतरणार नाहीं म्हणून निश्चय केला. देवालयांतून बाहेर न निघतां श्रीचें एकाग्र ध्यान करीत राहिले. यांची निष्ठा पाहून श्रीधूतपापेश्वर प्रसन्न होऊन दृष्टांत झाला. " प्रसाद म्हणून दोन गरे व एक इंचाएवढा बाण असे उजव्या हातावर प्रत्यक्ष प्रमाण म्हणून देऊन सांगितलें कीं, ह्या बाणाची नित्य पूजा केली असतां मला पावेल. " याप्रमाणें आज्ञा होतांच कोठें तरी स्थलांतर करण्याच्या उद्देशानें गोळप येथें जाऊन तेथें घर बांधून राहिले. गोळप हा गांव रत्नागिरीपासून ७।८ मैल आहे. या गांवास लागूनच पांवस हा गांव आहे.

वडिलांचे मागें त्यांचे पुत्र रामचंद्रभट ऊर्फ भाऊभट गोखले हे त्या बाणाची नित्य एकादशिनी पूजा करून राहिले. भाऊभट यांचे पुत्र गोविंदभाऊ यांनीं लहानपणांत गरीबींत दिवस काढून घुढें हे कर्ते झाल्यावर यांनीं व्यापारधंदा सुरू करून सुमारें ४० वर्षांत पुष्कळ द्रव्यसंचय केला. गोविंदभाऊ यांनीं अनेक सत्कृत्यें केलीं. त्यांपैकीं, श्रीधूतपापेश्वरावर स्वाहाकारी महारुद्र, अतिरुद्र, कोटिलिंगार्चन, कोटि बिल्वपत्र व कोटि तुलशीपत्रांनीं श्रीविष्णूची पूजा; धर्मार्थ बारा मुंजी आणि कित्येकवेळां सहस्रभोजनें घातलीं. यांचा व्यापार यांच्या मरणसमई अजमासें एक लक्ष रुपयेपर्यंत होता. त्यांत त्यांनीं नित्य नियमित एकादशिनी व कोणीही केव्हांही येवो त्यास अन्नदान हें चालू केलें होतें. पुढें यांच्या मागें यांचे पहिले पुत्र विसाजीपंत यांनीं त्यांच्या मागें अन्नछत्र व श्रीची एकादशिनी नित्य चालू ठेविली होती. याप्रमाणें चार पिढ्या श्रीधूतपापेश्वराची एकनिष्ठ सेवा चालली होती. व ती सेवा अद्यापिही चालू आहे. एके वेळीं मद्यपान-

निषेधाची लाट प्रथम कोंकणप्रांतीं उसळली त्यावेळीं गांवोगांव सभा भरत असत. असा सुयोग एकदां श्रीधूतपापेश्वरकृपेनें गोळप गांवीं आला होता. श्रीसत्येश्वर ग्रामदेवाचे देवालयांत सभा भरली होती. सर्व जातींचे मिळून सुमारें ५००।६०० सभासद जमले होते. त्यांत ४।६ मैलांहून लांबचेही बरेच लोक आले होते. ठराव वगैरे पास होण्यास रात्रींचे ८।९ वाजले. त्यानंतर काळोख्या रात्रीं गांवोगांवीं जाणें शक्य नव्हतें. सबब त्या सर्व देशबांधवांस श्री विसाजीपंतदादा गोखले यांनीं विनंती करून एकाएकीं इतक्या रात्रीं एकदम ५००।६०० सभासदांस आपल्या घरीं बोलावून मोठ्या प्रेमानें यथाशक्ति भोजन दिलें ह्याप्रमाणें विसाजीपंतांचे अंगीं धर्मजागृती जागृत होती. विसाजीपंत यांचे पुत्र केशवराव हे आकोल्यास मिलमध्यें नोकर आहेत. यांनीं श्रीधूतपापेश्वरास नित्य एकादशिनी पूजा चालविली आहे. यांच्या मनांतून हें निरंतर चालावें म्हणून त्यासंबंधीं कांहीं कायमचें उत्पन्न देवाचे खर्चाकरितां करण्याचा हेतु आहे.

विसाजीपंतांचे बंधु काशीनाथ यांचे दोन मुलगे; हरी काशीनाथ हे रत्नागिरी येथें आहेत. दुसरे कृष्णाजी काशीनाथ हे मुंबई येथें वेस्ट एंड् सिनेमाचें म्यानेजर आहेत. विसाजीपंतांचे बंधु गोपाळराव गोविंद हे रत्नागिरी येथें आहेत. यांना पुत्र चार; पहिले जनार्दन गोपाळ हे व्हेटरनरी डॉक्टर आहेत. भार्गव यांनीं रत्नागिरी येथें कापडाचें दुकान घातलें आहे.

सदाशिवभट अग्निहोत्री यांचे नातू विष्णुभट विश्वनाथभट हे पांवस येथें रहात होते. यांना पुत्र सहा; रामचंद्र, विठ्ठल, कृष्णाजी, नारायण, माहादेव,व दिनकर; रामचंद्र विष्णु हे अँग्लोव्हर्न्याक्यूलर स्कूलमध्यें रत्नागिरी येथें शिकत होते नंतर तेथेंच हायस्कुलांत गेले. यांची ती बुद्धी पाहून डॉ. भांडारकर यांची रामचंद्रावर फारच मर्जी बसली होती. डॉ. भांडारकर हे त्यावेळीं रत्नागिरी हायस्कूलचे हेडमास्तर होते. रामचंद्र ऊर्फ रामभाऊ हे प्रत्येक शनवारीं घरीं पांवसला जाऊन सोमवारीं परत येत. येते वेळीं ताकाची कासंडी भरून आणीत. डॉ. भांडारकर यांनीं रामभाऊची सर्व व्यवस्था लावून दिली होती. रामभाऊंना म्याट्रिक झाल्यावर जगन्नाथ शंकरशेटची स्कॉलरशिप मिळाली. बी. ए. झाल्यावर कॉलेजांत फेलोशिप मिळाली. सरजमशेटजी जिजिभाई यांचे मुलास शिकविण्याबद्दल दरमहा ५० रुपये पगार होता. फेलो असतांनाच एल्. एल्. बी. झाले. पुढें ॲडव्होकेट झाले. हे मुंबईचे पहिले ॲडव्होकेट होते. रामभाऊ हे सुरतेस अगदीं पहिली केस चालविण्यास गेले होते. तेथून परत आले. तों कॉलऱ्यानें त्याच दिवशीं वारले. त्यानंतर १ । २ दिवसांत कृष्णाजी विष्णु हेही कॉलऱ्यानें वारले. कृष्णाजी विष्णु हे गणितविषयांत अत्यंत प्रवीण होते. स्वभावानें फारच मनमिळाऊ असून आपल्या बरोबरीच्या मंडळीस गणितविषयाची माहिती देत असत. हे बी. ए. होते. महादेव विष्णु यांवर प्रिन्सिपाल

घर्डस्वर्थ यांची बहाल मर्जी होती. याचें कारण माहादेव हे लॉजिक व मॉरल फिलासफी या विषयांत तयार होते. माहादेव विष्णु हे एम्. ए. होते. हे वारल्यावर प्रिन्सिपाल यांनीं त्यावेळीं टाईम्स ऑफ इंडियांत माहादेवरावासंबंधीं अग्रलेख लिहिला आहे. कृष्णाजी विष्णु गोखले यांचे रुहाध्यायी कृष्णाजी महादेव जोगळेकर एम्. ए. यांनी वरील माहिती दिल्याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे.

विष्णुभट यांचे सहा मुलांपैकीं वर तिघांची माहिती दिली आहे. रामभाऊ यांचे चिरंजीव सदाशिवराव ऊर्फ बाबूराव हे बी. ए. एल्. एल्. बी. असून, मुंबई येथें हायकोर्टात वाकली करतात. हे वांद्रा येथें रहात आहेत. विठ्ठलराव एम्. ए. एम्. डी. होते. नारायण विष्णु हे बी. ए. एल्. एल्. बी. असून हायकोर्टात वकीली करीत आहेत. मुंबई येथें स्वतःचे घरांत रहात आहेत. दिनकर विष्णु हे मुंबई येथेंच रहात आहेत. दिनकर विष्णु हे बी. ए. आहेत. विष्णुभटाचे सहा पुत्रही पदवीधर असून अत्यंत हुषार; सहांपैकीं हल्ली नारायणराव व दिनकरराव हे मुंबई येथें रहात आहेत.

आडिवरें, अतकर व जमखंडी येथील गोखले.

नारायण गोपाळ हे आडिवऱ्याहून अतकर गांवीं आले. यांचे पुत्र गणेश हे मोठे विद्वान ब्राह्मण असल्यामुळें, त्यांचें अतकर येथेंच स्वास्थ्य करण्याकरितां अतकर गांवचे इनामदार कवें यांनीं गणेशभट नारायणभट यांस जमीन व भांडींकुंडीं आणि घर बांधण्यास जागा वगैरे देऊन, अतकर येथेंच त्यांना ठेवून घेतलें. गणेशभट यांचे पुत्र वासुदेवराव हे इनामदार कवें यांच्या इनाम गांवाची व्यवस्था पहात आहेत. यांना पुत्र चार; पहिले विनायकराव हे फॉरेस्ट डिपार्टमेंटमध्यें नाशिक डिव्हीजनचे हेड् क्लार्क आहेत. हे नाशिक येथेंच रहात आहेत. दुसरे व तिसरे शंकर व चिंतामणी हे अतकर येथेंच घरीं शेती करून आहेत. गणेश वासुदेव चवथे हे जी. आय. पी. रेलवेंत नोकर आहेत. नारायण विनायक हेही घरीं राहून शेती करतात.

बाळंभट पुरुषोत्तमभट हे प्रथम पुण्यास आले. यांचे चिरंजीव नारायणराव बल्लाळ हे नगर जिल्ह्यातील फॉरेस्ट खात्यांत नोकर होते. नंतर पुणें म्युनिसिपालिटींत नोकर होते. विष्णु बल्लाळ हे एम्. ए. होते. सन १९०४ चे केसरीत यांचें चरित्र आलें आहे. कृष्णाजी बल्लाळ हे सब डिव्हिजनल ऑफिसर होते. यांची नोकरी १६ च वर्षे झाली. हे वयाच्या ४६ वर्षी वारले. हे एल्. सी. ई. होते. गणपतराव बल्लाळ हे संस्थान बडोदेपैकीं कडीपट्टण येथें

ग. धोंडो सखाराम गोखले, मामलेदार. कुंदगोळ.

सब इंजिनियरचे कामावर आहेत. हे बी. ए. एल्. सी. ई. आहेत. वासुदेवराव कृष्ण हे निरा क्यॉनालवर्कमध्यें नोकर आहेत. हे बी. ए. जी. आहेत. रघुनाथराव नारायण हे सब् ओव्हरसियर आहेत. आणि गंगाधर नारायण हे एल्. सी. ई. असून प्रवरा क्यॉनल वर्कमध्यें नोकर आहेत. यांचे भाऊबंद विनायक बापू, परशराम गोपाळ व काशिनाथ नरसू हे आडिवरें येथें आहेत.

घोंडो सखाराम यांचा जन्म आडिवरें येथें ता. १७ ज्यानेवारी सन १८६९त झाला. यांचे वडील व मातोश्री लहानपणींच वारले म्हणून हे जमखंडीस मातुलगृहीं आले. तेथें यांचा विद्याभ्यास झाला. प्रथम हे शाळा खात्यांत नोकर होते. हल्लींचे जमखंडीकर श्रीमंत सर भाऊसाहेब पटवर्धन यांचे घोंडोपंत हे कांहीं वर्षें ट्यूटर होते. तसेंच श्रीमंतांचे पहिले कुटुंबासही यांनींच शिकविलें होतें. या मुळें श्रीमंतांनीं खुष होऊन घोंडोपंतांस मुलकी खात्यांत घातलें. हायर सरव्हिस वगैरे परीक्षा यांनीं दिल्यावर यांची बढती होऊन मामलतदारीचें काम आज १५। २० वर्षें करीत आहेत. जमखंडी व बिद्री या तालुक्यांत यांनीं काम करून हल्लीं कुंदगोळ तालुक्यांत मामलेदार आहेत. संस्थानांतच नोकरी तीस वर्षांची होत आली आहे. संस्थान जमखंडी हायस्कुलांतून जो विद्यार्थी मॅट्रिकच्या परीक्षेत पहिला येईल त्यास " सरस्वती प्राईज " म्हणून पंधरा रुपयांचें यांणीं आपल्या कुटुंबाचें नांवें बक्षीस ठेविलें आहे. बिद्री तालुक्यांत टकळगी गांवीं विश्वेश्वराचे देवालयाच्या जीर्णोद्धारास पांच सहा हजार रुपये यांनीं खर्च केले आहेत. यंदां कन्यागत असल्यानें श्री कृष्णास्नानास जाणाऱ्यास फार मोठी सोय झाली आहे. महादेव गोपाळ हे यवतमाळ येथें फौजदार आहेत.

सातारा जिल्ह्यांतील लिंब–गोंवें या गांवीं या घराण्याचा कोणता पुरुष आला हें कांहीं समजत नाहीं. लिंबगांवीं इनाम जमीन व घर आहे. हरी गंगाधर गोखले हे अग्निहोत्री होते. हें वैदिक घराणें आहे. अनंत हरीचे मुलगे नरहर अनंत हे हल्लीं जोधपूर बिकानेर स्टेट रेलवेंत ट्रॉफिक इन्स्पेक्टर आहेत. सदाशिव हरी हे वऱ्हाडांत रीळगांवीं शेती करून आहेत. चिंतामण हरी वऱ्हाडांत बाशीम येथें मुखवस्तु आहेत. हे पूर्वी असिस्टंट सर्जन होते. त्रिंबक रामचंद्र जी. आय. पी. रेलवेंत नोकर आहे. जनार्दन रामचंद्र जोधपूर बिकानेर स्टे. रेलवेंत नोकर आहे. नारायण बापू हे पुणें येथें बॉंबे मिलिटरी अकौंट आफिसांत आहेत.

हरीचे पुत्र राम हे प्रथम आडिवऱ्याहून कल्याण येथें आले. त्रिंबक हरी हे पनवेल येथें गेले व राम हे कल्याण येथेंच राहिले. राम हे कल्याण येथें निवर्तले तेव्हां त्यांचें कुटुंब सती गेलें. सती जातेवेळीं तिनें आपलीं मुलें, " माझे दीर त्रिंबक पनवेलीस आहेत; त्यांनीं संभाळल्यास त्यांजला द्यावींत. नाहींतर येथें अश्वत्थाचे पारावर ठेवावींत " असें सांगितलें.

त्रिंबक हरी यांना हें वर्तमान समजतांच ते कल्याणास येऊन आपल्या बंधूच्या मुलांना घेऊन पनवेलीस गेले. पनवेल येथें त्रिंबक हरी व पुतणे बाळाजी रामचंद्र यांनीं प्रपंच चालविला, पुढें हरी रामचंद्र व गणेश हरी हे सावकारी नोकरीवर होते. गोविंद हरी हे म्याट्रिक झाल्यावर शाळा मास्तराचें काम करून पेनशनर झाले होते. कृष्णाजी हरी म्याट्रिक झाल्यावर, ॲग्रिकलचर खात्यांत पंचवीस रुपये पगारावर कारकुनाचे कामावर होते. पुढें वाढतां वाढतां परसनल असिस्टंट टु डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर होऊन हल्लीं पेन्शन घेतलें आहे. कृष्णाजीपंत पुण्यासच रहात आहेत. हे स्वभावानें फार गरीब असून, दानसंध्येशील आहेत.

रामचंद्र गणेश पनवेल येथें शाळामास्तर आहेत. दामोदर गणेश गोखले हे बी. ए. एल्. एल्. बी. असून संस्थान इंदोरपैकीं कनोद गांवीं वकिली करीत आहेत. विष्णु गणेश हे बी. ए. असून, हल्लीं मालेगांव येथें सब रजिस्टर आहेत. विनायक त्रिंबक हे सोलापूर येथें " हरिभाई देवकरण हायस्कूलमध्यें " मास्तर आहेत. हे अंडर ग्रॅज्युएट आहेत.

नारायण हरी हे सन १८५० सालीं पुण्यास आले असावेत. यापूर्वी प्रथम आडिवऱ्याहून आले ते भोर संस्थानांतील रांझे गांवीं आले. या गांवीं राहून स्नानसंध्यादि षट्कर्मे करून रहाण्याकरितां यांना इनाम जमीन मिळाली आहे. ती जमीन हल्लीं नारायण हरीचे वंशजांकडे चालू आहे. नारायण हरी यांचे नातू हरी सखाराम गोखले हे सदर्न मराठा रेलवे कंपनींत स्टेशन मास्तर होते. हे मिरज स्टेशनचे मास्तर होऊन जे एकदां आले ते ग्रॅचुटी घेईपर्यंत तेथेंच होते. म्हणजे बरींच वर्षे तरी मिरज स्टेशनचे मास्तर होते. हे चांगले नांवाजलेले मास्तर होऊन गेले. यांचें युरोपियन लोकांत चांगलें वजन होतें. हा लेखकही मिरजेचा रहाणारा असल्यामुळें हरीभाऊ गोखले स्टेशन मास्तर यांना प्रत्यक्ष पाहण्याचा व त्यांच्या बरोबर बोलण्याचाही प्रसंग बरेच वेळां या लेखकास आला होता. हरीभाऊ गोखले यांनीं पुणें येथें नारायण पेठेंत खास घर खरेदी केलें होतें. त्याच घरांत विद्यमान त्यांचीं मुलें रहात आहेत. निळकंठ हरी हे मुंबई येथें म्यु. ओव्हरसियर आहेत. माहादेव हरी हे एम्. ए. एस्. टी. सी. असून पुणें येथें न्यु इंग्लिश स्कूलमध्यें मास्तर आहेत. तिसरे दत्तात्रय हरी गोखले हे श्रीक्षेत्र वांई येथें ' द्रवीड हायस्कुलांत ' ड्राइंग मास्तर आहेत.

विश्वनाथ गोखले हे पुण्यास पेशवाई अंमलांत आले. यांना चार मुलगे. थोरले गणेश हे पुण्यासच नोकर होते. दुसरे वैदिक होते. तिसरे काशीस जाऊन आश्रम घेऊन समाधिस्थ झाले. विश्वनाथपंत हेही मरण समयीं आडिवरें येथें गेले. लक्ष्मण गणेश हे क्लार्क ऑफ दि कोर्ट होते. नंतर वकिली करीत होते. नंतर मुनसफ झाले, हे पुण्यासच वारले. तेव्हां यांचे चिरंजीव गंगाधर हे दडि-

वर्षाचे होते. मातोश्रीनें संगोपन करून वाढविलें. गंगाधर लक्ष्मण गोखले यांचें मराठी व इंग्रजी शिक्षण झाल्यावर यांनीं रेलवे खात्यांत नोकरी धरली. सन १९०१ मध्यें झांशी येथें होते. १९२० आक्टोबरमध्यें नोकरी सोडून मुंबई येथें येऊन राहिले आहेत.

लक्ष्मण शिवाजी हे विजापूर जिल्ह्यांत सरकल इन्स्पेक्टर होते. दत्तात्रय लक्ष्मण बेळगांव येथें म्युनिसिपालिटींत नोकर आहेत. शिवाजी लक्ष्मण हे डाहाणू येथें शाळा मास्तर असून बी. ए. चा अभ्यास करीत जाहेत.

नेवरें येथील गोखले. १

नेवरें हा गांव रत्नागिरीपासून अदमासें दहा बारा मैल आहे. रत्नागिरीहून कासारवेल व कासारवेलहून कोतवडें आणि कोतवड्याहून नेवरें हा गांव अदमासें दोन मैल आहे. या गांवीं पेशवाई अमदानींत ब्राह्मणांची घरें बरींच होतीं; व येथें राहणारे कुटुंबांत बरवे, परांजपे, कोल्हटकर व देसाई या घराण्यांतील पुरुष पेशवाईंत कोंकण प्रांतांचेअधिकारी होऊन गेले. नेवऱ्याहून गणपतीबाबा गोखले हे ऐन पेशवाईंत पुणें येथें आले. यांचे नातू कृष्णाजी नारायण ऊर्फ आबा यांनीं श्रीक्षेत्र काशी येथें जाऊन चतुर्थाश्रम घेतला. हे काशी येथेंच समाधिस्थ झाले. त्यांचे चिरंजीव गोविंदराव ऊर्फ रावजी हे पेशवे सरकारांत खानगी कामगार होते. त्यांना श्रीमंतांकडून पालखी होती. इ. स. १८०१ सालांत होळकरानें पुणें लुटलें त्यावेळीं यांच्या इष्टेटीची फार वाताहात झाली त्यामुळें रावजींना वेड लागलें होतें.

रावजींचे पुत्र भिकाजी ऊर्फ नाना हे व्यापार करीत असत. यांचा काल सन १८५० जून ता. २० रोजीं झाला. यांचे पाहिले चिरंजीव कृष्णाजी ऊर्फ बळवंत हे सबइंजिनीयर होते. यांनीं पेनशन घेतल्यावर यात्रा करण्यास गेले असतां, काशीक्षेत्रीं सन १९१४ता०३जाने०रोजीं कैलासवासी झाले.पुणें येथील गव्हर्नमेंट इमारतींचीं बरींच कामें यांच्या हातून झालीं आहेत. पुणें येथिल वेदशास्त्रोत्तेजक सभेचे हे सेक्रेटरी होते आणि मरकनटाईल ब्यांकेचे हे डायरेक्टर होते.

नानांचे दुसरे चिरंजीव गणपतराव नारायण ऊर्फ भाऊसाहेब गोखले यांचा जन्म इ. स. १८३४ त पुणें मुकामीं झाला, ह्यांचे तीर्थरूप कै० भिकाजीपंतनाना ह्यांनीं कंट्राक्टचा धंदा आरंभिल्यामुळें त्यांत त्यांना बूड येऊन घरची स्थिती फार हवालदिल झाली होती.अशा स्थितींतच गणपतराव यांचा जन्म झाला.इतकी गरीबी होती तरी ह्यांचे वडील बंधु कै. बळवंतरावजी रावसाहेब गोखले यांच्यावर पितृतुल्य प्रेम असल्यामुळें, तशांतूनच गणपतरावांनीं आपलें

नशीब काढलें. सुरवातीला शिक्षण खात्यांत नौकरी धरली व पुढें नाशिक येथें मुख्य अध्यापकाच्या जागीं गणपतरावांची बदली झाली. तेथें नोकरीवर असतांना, ह्यांच्या करारी स्वभावामुळें, अनपेक्षित कारणांनीं ह्यांना नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. शिक्षणखात्यांत असतांना, शिक्षक ह्या नात्यानें यांचा नांवलौकिक बराच होता. नोकरी सोडल्यावर जीं कांहीं थोडीबहुत धाडसी, धोरणी व कर्तबगार अशीं माणसें कै. गोपाळरावजी भिडे, कै. बळवंतरावजी महाजन हीं मुक्कामीं गेलीं, त्यांतच भाऊसाहेब गोखले हे ही होते. नागपूर येथें गेल्यावर यांनीं जिल्हा कचेरींत शिरस्तेदाराची नोकरी पत्करली. परंतु मूळपासूनच करारी स्वभाव असल्यामुळें मनापासून नोकरीचा कंटाळा म्हणून नोकरीवर असतांनाच वेळांत वेळ काढून व घरच्या गरीबी मुळें देवळांतील दिव्यावर अभ्यास करून वकिलीची परीक्षा दिली,व तेव्हां पासून हे नागपूर येथें वकीलीचा धंदा करूं लागले. त्यांत ह्यांनीं इतकें यश व नांव लौकिक मिळविला कीं, फौजदारी खटल्यांत ह्यांचा हात धरणारा कोणी नव्हता. यशाबरोबर संपत्तीही ठेवलेलीच असल्यामुळें, त्यांतही ह्यांना ईश्वरानें कांहीं कमी केलें नाहीं. संपत्तीबरोबर संततीही बरीच होती. ह्यांचे दोनतीन मुलगे ह्याच धंद्यांत चांगले नांवालौकिकास येऊन, त्यांनीं आपले वडिलांचे नांवांत भर घातली.

गणपतराव भाऊसाहेब ह्यांची वाचनाभिरुची व विद्याव्यासंग फारच दांडगा होता. विशेषतः इंग्रजी व मराठी वाङ्मयाचा ह्यांना फारच नाद असे व त्या दृष्टीनें ह्यांनीं रामायण, महाभारत ह्यांच्या असल प्रती शुद्ध करण्याकरितां कै. हरी नारायण आपटे ह्यांना कांहीं पैसेही दिले होते. हे जरी प्रत्यक्ष राजकारणांत पडत नसत तरी सुद्धां ह्यांच्या ठिकाणीं देशभक्ती व देशांतील राजकारणी विभूति ह्यांविषयीं प्रेम जाज्वल्य असे; व त्या अनुरोधानेंच ह्यांनीं सर्व महाराष्ट्राला ललामभूत असलेले श्रीछत्रपती शिवाजीमहाराज ह्यांच्या रायगड येथील छत्रीच्या जिर्णोद्धारार्थ कांहीं पैसे दिले होते व पुणें येथील शिवमंदिरास पंधरा हजार रुपये देणगी दाखल देऊन, ऐतिहासिक पुण्यनगरींत म्हणजे पुण्यांत आपलें नांव अजरामर केलें. दानधर्मासंबंधीं ह्यांचा फारसा गवगवा नव्हता. तरी पण ह्यांनीं आपले हयातींत शिक्षणकार्याला मदत म्हणून शिक्षणप्रसारक मंडळीला पन्नास हजार रुपये कांहीं थोड्या व्याजावर दिले आहेत.

गणपतरावांनीं सार्वजनीक लोकोपयोगी कामांतही बराच पुढाकार घेतला होता. ह्यांनीं बरींच वर्षे नागपुर प्रांतांतील मुक्काम पुलगांव येथील गिरणीमध्यें कांहीं वेतन न घेतां म्यानेजर व डायरेक्टर ह्या हुद्यांवर कामें करून त्या गिरणीस बरेंच नांवारूपास आणिल्याचें श्रेय संपादिलें. ह्यांचा स्वभाव करारी, धोरणी, निर्भीड व सत्यप्रिय; आणि राहणी अगदीं साधी असल्यामुळें हे बरेच नांवा-



कै. गणेश नारायण गोखले, वकील, पुणें व नागपूर.

कै० केदारेश्वर केशव गोखले, नागपूर.

कै. मार्तंड केशव गोखले, नागपूर.



कै० केशव गणश गोखले, M. A. L. L. B.
नागपूर.



डॉ० भिकाजी गणेश गोखले, L. M. & S. पुणें.

रूपास आले व तो लौकिक यानीं मरेपर्यंत कायम ठेविला. अशा या श्रेष्ठ धोरणी पुरुषाचा अन्त माहे फेब्रुवारी ता. ५ सन १९१९ रोजी संध्याकाळचे पांच वाजतां स्वतःचे घरीं पुण्यनगरींत (पुण्यांत) झाला. ईश्वर ह्यांच्या आत्म्यास सदैव शांती देवो.

गणपतरावांचे बंधु माधवराव नारायण हे फॉरेस्ट खात्यांत शिरस्तेदार होते. हल्लीं पेनशनर असून शनवार पेठेंत स्वतःचे घरांत रहात आहेत. पुतणे मोरेश्वर रामचंद्र हे अल्प वयांतच पितृसौख्यास अंतरले. मातृसौख्य मात्र अद्यापि अनुभवीत आहेत. मोरेश्वर ऊर्फ रघुनाथराव यांनीं नोकरीपुरतें इंग्रजी शिकून पोलिस ऑफिसांत क्लार्कची नोकरी पत्करली आहे. नोकरी पेनशनची असून हल्लीं पगार ५० । ६० रुपये असावा. हे स्वभावानें गरीब व स्नानसंध्येशील आहेत. ह्यांचे वडीलही फॉरेस्ट खात्यांतच नोकर होते. विश्वनाथराव बल्लाळ व विष्णु बल्लाळ हे शनवारांत आपले वडिलार्जित घरांतच रहात आहेत. दोघेही सुशिक्षित असून व्यापार धंदा करून आहेत.

गणपतराव भाऊसाहेब यांना पुत्र पांच; नारायण, गंगाधर, केशव, परशराम व भिकाजी; नारायणराव हे पुलगांव मिलमध्यें क्यॉशीयर आहेत. यांना पुत्र पांच; त्यांत हरी हे बी. ए. आहेत. गंगाधरराव हे बी. ए. एल् एल्. बी. होऊन बऱ्हाणपूर येथें वकिली करीत होते. यांचा एक मुलगा सदाशिव हे मेडिकल कॉलेजांत आहेत. केशवराव हे एम्. ए. एल् एल्. बी. होते. हे नागपूर येथेंच वकिली करीत होते. हे सार्वजनिक कामाचे पुढारी होते. यांचा दरारा विशेष होता. यांना दोन मुलगे. एक केदारेश्वर व दुसरा मार्तंड; हे दोघेही कॉलेजांत असतां वारले. केशवराव वारल्यावर त्यांच्या पत्नी गंगाबाईनीं मुलांकडे पाहून त्यांचें विद्यार्जन करण्यांत दिवस कंठित असतां, हीं राम लक्ष्मणासारखीं मुलेंही त्यांना सोडून गेलीं. केवढा भयंकर प्रसंग हा ! ! हल्लीं गंगाबाई ह्या आपल्या माहेरीं नर्मदाकांठीं राहून दिवस कंठीत आहेत. श्रीमती गंगाबाई भ्रतार केशवराव गोखले यांनीं पुणें येथील " श्रीशिवमंदिराच्या कामाकडे २००० रुपयांच्या म्युनि. नोटी बक्षिस दिल्या आहेत. " सासरे गणपतराव भाऊसाहेब यांचें औदार्य सूनबाईच्या अंगींही वास्तव्य करीत आहे.

परशराम गणेश यांचें कुटुंब आपल्या श्रीपाद मुलासह माहेरीं मलकापूर येथें रानडे यांच्या घरीं रहात आहे. भिकाजी गणेश हे एल्. एम्. अँड. एस्. असून पुणें येथें त्यांनीं प्रायव्हेट डिस्पेनसरी घातली आहे. हे स्वभावानें गरीब असून यांनीं या लेखकास माहिती देण्याचे कामीं विशेष मदत केली आहे.

गणपतीबाबा यांचे दुसरे चिरंजीव गोविंदराव यांचा वंश पांचवड वांई येथें आहे काशिनाथ नारायण हे पेनशनर असून पांचवड येथें रहात आहेत. गणेश माधव व वामन गणेश हे वांई येथें शेती व व्यापार करून आहेत, तसेंच महा-

देव विष्णु व दत्तात्रय गोविंद हे आपल्या बंधूंसह वांई येथें गणपती आळींत वडिलार्जित घरांत राहून शेती व व्यापार करून आहेत.

बिरवाडी येथील गोखले. २

नेवरें येथें पूर्वी रहाणारें दुसरें गोखले घराणें, जिा कुलाबा, ता. महाड मधील मुा बिरवाडी येथील होय. वरील नेवरें येथील गोखल्यांचे व यांचे पुरुष एक जमत नाहींत. दोन्हीं घराण्यांपैकीं हल्लीं नेवरें येथें कोणीच गोखले नाहींत. बिरवाडी येथील गोखल्यांपैकीं खुद्द बिरवाडी येथें वडिलार्जित घर आहे. शिवाय बिरवाडी, महाड व पुणें येथें या कुटुंबांतील लोक रहात आहेत. अनंत सखाराम हे आपल्या तिघां बंधूसह पुण्यास राहून कांहीं शिकत आहेत व कांहीं नोकरी करीत आहेत.

गोळप, पेण व तासगांव येथील गोखले. ३

वेळणेश्वराहून नरसिंह गोखले गोळप येथें आले. हल्लीं गोळप येथें सातवी पिढी चालू आहे. सुमारें २५० वर्षांपूर्वीपासून हें गोखले घराणें गोळप येथें रहात आहे. हल्लीं विश्वनाथ गोविंद व रघुनाथ गोविंद हे पेनशनर बंधु तेथें शेतीवाडी करून आहेत. विश्वनाथ गोविंद यांस मुलगे चार; त्यापैकीं प्रभाकर विश्वनाथ हे बी. ए. असून नॉनकोआपरेशन मध्यें आहेत. सिताराम विश्वनाथ घरीं शेती करून आहे. गोळप येथें विद्यमान तीन घरें गोखल्यांचीं आहेत. त्यांत एक घर गोखले ऊर्फ पालकर यांचें आहे. नरसिंह गोखले यांचे निपणतु रामचंद्र आपा हे सातारा जिल्ह्यांतील पडुंब्रें गांवीं जाऊन राहिले. रामचंद्र यास पुत्र दोन, बापू व गंगाधर; बापू याचे नातु गणेश नारायण हे रेलवेंत नोकर आहेत. गणपतराव यांना रेलवेंत नोकरी करून ३५ वर्षें झालीं. हल्लीं पुणें स्टेशनवर असिस्टंट गुड्स स्टेशनमास्तर आहेत. यांना सरकारकडून 'रावसाहेब' ही पदवी सन १९१९ त मिळाली आहे. गणपतराव हे नोकरी उत्तमप्रकारें करीत आहेत, हें वरील पदवीदानावरून सिद्ध होत आहे. यांनीं पुणें येथें सदाशिवपेठेंत नवें घर बांधिलें असून ते तेथें रहात आहेत.

गोविंद पांडुरंग हे पडुंब्रें येथेंच शेती करून आहेत. दामोदर विष्णु हे रेलवेंत कोचिंग क्लार्क आहेत. कृष्णाजी विष्णु हे उज्जैन येथें वाटरवर्क्स खात्याचे सेक्रेटरी आहेत. यांचे वडील विष्णु गंगाधर हे रेलवेंतच नोकर होते. यांनीं म्याच्युटी

घेतल्या नंतर ते उज्जैन येथें राहूं लागले. उज्जैन येथें म्युनिसिपल सेक्रेटरीचे कामा वर असतांना येथें चांगला लौकिक संपादिला होता. माधवराव रंगो राहुरी येथें वकिली करीत आहेत.

पेण येथील गोखले. ४

सदाशिव बल्लाळ हे पांवस–गोळपहून पेण येथें आले. येथें एका सद्गृहस्थाच्या सहाय्यानें आपला चारितार्थ चालविला. उत्तम प्रकारें प्रपंच करून नातवंड पाहिल्यावर सदाशिव बल्लाळ स्वर्गस्थ झाले. यांनीं आपल्या मुलांना वैदिकधर्माचें चांगलें बाळकडूं पाजलें म्हणण्यास हरकत नाहीं. हल्लीं त्यांच्या नातवंडांपैकीं भिकाजी, शंकर व मोरेश्वर हे वैदिक आहेत. नारायणराव बल्लाळ हे जळगांव येथें पब्लिकवर्क्स अकौंटंट आहेत. यांनीं जळगांव येथेंच घर बांधिलें आहे. भास्कर बल्लाळ हे मुंबई येथें कस्टम खात्यांत नोकर आहेत. महादेव बल्लाळ हे विलें–पारलें येथें शाळामास्तर आहेत. विष्णु सदाशिव यांनीं इंजिनीयर खात्यांत नोकरी धरली होती. परंतु करारी व निस्पृह असल्यामुळें नोकरी सोडून देऊन चेंबूर नजीक गोवंडी येथें शापुरजी पेस्तमजी नांवाच्या प्रसिद्ध व्यापाऱ्याकडे नोकरी धरली. यांनीं ती सावकारी नोकरी पसतीस वर्षें करून पेनशन घेतलें होतें. सदाशिव बल्लाळ यांनीं मुलांच्या सहाय्यानें पेण येथें घर बांधिलें. केशव नारायण हे सीनियर बी. ए. त आहेत. लक्ष्मण नरहर ज्युनीयर बी. ए. मध्यें आहेत. वामनभट सदाशिवभट हे नामांकित वैदिक होते. गोविंद विष्णु हे मुंबई येथें जनरल पोष्टांत आहेत. यांनीं आपल्या घराण्याचा वंशवृक्ष व थोडक्यांत माहिती संग्रह करून ठेविली आहे. दत्तात्रय रामचंद्र हेही मुंबईसच असतात.

तासगांव येथील गोखले. ५

विष्णुभट सदाशिवभट हे पांवसहून तासगांव येथें गेले. हें घराणें भिक्षुक आहे. विष्णु अनंत हे पोष्टांत व श्रीपाद हे गव्हरमेंट टेलिग्राफ ऑफिसांत नोकर आहेत. कृष्णंभट मोरेश्वर हे तासगांव येथें भिक्षुकी करून आहेत. यांचें खास घर येथें आहे. मोरेश्वर कृष्ण रेलवेंत नोकर आहेत.

गोळपचे पालकर गोखले. ६

गोळप येथें हें घराणें अदमासें १७५ वर्षांपूर्वीचें आहे. या गोखले घराण्यापैकीं एक पुरुष सातारा जिल्ह्यांत 'खंडोबाचे पालीस' जाऊन घरीं परत आला. त्यास सर्वजण पालीकर गोखले म्हणतां म्हणतां, पालकर असें म्हणूं लागले त्या पुरुषाचे पुढील पिढींतील पुरुष आपलें आडनांव गोखले न लिहितां 'पालकर' असें लिहूं लागले. या पालकर गोखल्यांचें गोळप येथें घर, जमीन व वंशही आहे. या पालकर गोखले घराण्यांतील हरी महादेव व भिकंभट विष्टल या दोघांनीं चतुर्थाश्रम घेतला होता. या दोघांच्या समाधी हरिहरेश्वराचे देवळाजवळ आहेत. महादेव भिकंभट हा गोळप येथें शेती करून आहे. सदाशिव विष्टल हे रत्नागिरी येथें सत्यशोधक प्रेसमध्यें असतात. यांनीं रत्नागिरी येथें घर बांधिलें आहे. सदाशिवराव हे फार कष्टाळु असून स्वभावानें गरीब आहेत. यांना सात मुलगे आहेत. हरी व विष्णु सदाशिव हे शाळाखात्यांत नोकर आहेत. आणि कृष्णाजी सदाशिव हे मुंबई येथें गव्हरमेंट सेंट्रल प्रेसमध्यें आहेत. बाकीचे विद्यार्थी आहेत.

या वरील पालकर (गोखले) पैकीं विद्यमान दोनच घरें आहेत. पैकीं एक घर इचलकरंजी येथें आणि दुसरें तळेखाजण येथें. गोळपहून या पालकर गोखल्यांपैकीं कोणी एक पुरुष प्रथम पोंबुर्ले गांवीं आला. या पालकर घराण्यांत कोणी अग्निहोत्री होता. त्यास पोंबुर्ल्याहून बापू गोखले यांनी आपल्या गांवीं (तळेखाजण) आणून आपले वाड्यांत ठेविलें. बापू गोखले यांच्या पश्चात् यज्ञेश्वर गोविंद पालकर यांनीं त्यांच्या वाड्यांतून बाहेर त्यांच्याच जागेंत घर बांधून राहिले. यज्ञेश्वर गोविंद यांचे नातू धोंडो प्रभाकर व पणतू नारायण रामचंद्र हे हल्लीं तळेखांजण येथें वडिलार्जित घरांत रहात आहेत. पोंबुर्ल्याहून कृष्णंभट लक्ष्मणभट पालकर गोखले, हे इचलकरंजी येथें गेले. हे चांगले वैदिक होते. यांनींच इचलकरंजी येथें घर संपादिलें. यांना पुत्र चार; बाळंभट कृष्णंभट हेही वैदिक होते. माधव कृष्ण हे चिंचभुवन येथें रेलवेंत नोकर आहेत. नारायण कृष्ण हेही वैदिक असून इचलकरंजी येथें रहात आहेत. जनार्दनभट बाळंभट हेही वैदिकच आहेत. शंकर नारायण हे किर्लोस्करवाडी येथें छापखान्यांत आहेत आणि विष्णु नारायण इचलकरंजी येथेंच नोकर आहेत.

कोलें येथील गोखले. ७

विश्वनाथभट गोविंदभट हे कोलें गांवीं आल्याचें समजतें. विश्वनाथभट हे पट्टीचे वैदिक असून, याज्ञिकींत पूर्ण होते. शिवाय वैद्यकींत उत्तम होते. माल वैद्यकी फुकट करीत असत. पेशवाईत यांना मोठी दक्षणा व शालजोडी मिळाली होती. हे काशीयात्रा करून परत गांवीं आले, तेव्हां यांना सर्व काशीकर असें म्हणूं लागले. कोलें येथील लोकांनीं विश्वनाथभट काशीकर यांना आपले गांवीं रहाण्याचा आग्रह करून घर बांधण्यास जागा दिली. घर बांधून घराजवळ एक विहीर खोदली, विश्वनाथभट यांनीं याज्ञिकींत व भिक्षुकींत दोन पैसे मिळवून तेथेंच थोडी शेती विकत घेतली. यांच्या पुत्रांपैकीं विनायकभट व विष्णुभट यांनीं याज्ञिकींत द्रव्यसंचय करून आणखी शेत जमीन संपादिली. आपण घेतलेली व वडिलांनीं घेतलेली जमीन मिळून त्यावर प्रपंच चालविला.

कृष्णाजी विनायक हे नामांकित शास्त्री होते. यांचे पुत्र हरी हे मुंबई येथें विड्याचे पानांच्या वखारींत नोकर राहिले. आठदहा वर्षें नोकरी करून नंतर स्वतंत्र वखार काढिली, हल्लीं मुंबईत हरिपंतांची पानाची वखार चालूं आहे. या धंद्यांत हरीभाऊंनीं हजारों रुपये मिळविले. यांचे पुत्र विश्वनाथ हे एल्फिन्स्टन कॉलेजांत होते. सन १९११ सालीं बी. ए. झाले. नंतर विश्वनाथराव यांनीं सिक्युरिटीज लँड आणि गहाणाचा व्यवहार हा धंदा चालविला आहे.

गोविंद विष्णु यांना लहानपणापासून मातीचीं चित्रें करण्याचा नाद असे. गोविंद विष्णु हे आपल्या १५।१६ वर्षांच्या वयाचे सुमारास मुंबईला आले. मराठी शिक्षण पुरें होई पावेतों मधुकरी मागून निर्वाह केला. यांना लहानपणापासून चित्रकलेचा नाद असल्यामुळें, मुंबईत ज्या ज्या ठिकाणीं गणपती तयार करण्याचे कारखाने असत त्या त्या ठिकाणीं जाऊन तेथील कारागिरांच्या आर्जवानें त्यांच्याशीं वागून गणपती करण्याचें काम शिकत. असें करितां करितां दरवर्षी स्वतः खासगी गणपती करून विकूं लागले. त्यांत इ. स. १८९६ सालापासून निरनिराळ्या प्रसंगाचीं चित्रें करून ते देखावे पहाणाऱ्यास अर्धा आणा फी ठेविली. याप्रमाणें प्रतिवर्षी चित्रांचे निरनिराळे देखावे करून आपल्या चित्रकलेनें लोकांचें मनरंजन करीत आहेत.

प्रतिवर्षी गणपती तयार करणें व चित्रांचे देखावे तयार करणें हें काम चालू आहेच, त्यांत कांहीं चित्रें फारच प्रेक्षणीय झाल्यामुळें यांना सुवर्णपदकेंही मिळालीं आहेत. सन १९०४ सालच्या मुंबई येथील प्रदर्शनांत " श्री पार्वती गणपतीस खाऊं घालीत आहे, " असें चित्र तयार करून ठेविलें. या चित्राच्या पसंतीवरून गोविंदराव यांना एक पदक मिळालें असून, एक्झीबिशन कमिटीच्या चेअरमननें सर्टिफिकीटही दिलें आहे. सन १९०६ मे ता. १२ रोजीं उंमरा-

वंतीच्या प्रदर्शनांत पदक व सर्टिफिकीट मिळालें आहे. ' शेतकी औद्योगिक प्रदर्शन ' धुळें यांच्याकडून शके १८३० सन १९०८ मध्यें सुवर्णपदक मिळालें आहे. आणि सर्टिफिकेटही मिळालें आहे. ' उद्योगवृद्धि संस्था पुणें ' यांजकडून सन १८९४ त सुवर्णपदक मिळालें आहे. पुणें येथें ' श्रीकरुणेश उत्सव मंडळाकडून ' नेने घांटावर शके १८३९सन १९१७ त पदक मिळालें आहे.

गोविंदरावजींना अशीं पदकें व सर्टिफिकीटें बरींच मिळालीं आहेत. यांच्या चित्रकलेसंबंधीं यांची फारच ख्याती आहे. त्याप्रमाणें यांचें रंगाचें काम फारच प्रशंसनीय होत असतें. गोविंदरावांनीं आपला हा स्वतंत्र धंदा आपल्या दोन्ही मुलांना त्यांच्या नोकऱ्या सोडवून करावयास लाविला आहे. त्याप्रमाणे आपल्या वडिलांच्या देखरेखेखालीं त्यांचीं दोन्हीं मुलें गणेश व नारायण यांनीं वडिलार्जित स्वतंत्र धंदा चांगला चालविला आहे, हें त्या मुलांना भूषणावह आहे. गोविंदराव अत्यंत मेहनती व आपल्या कामांत मोठे दक्ष आहेत. यांनीं मातीवर देण्याचे रंग कसे तयार करावेत या संबंधींच्या माहितीचें वर्णन लिहून तयार केलें आहे. याला त्यांनीं " रंगविद्या " हें नांव दिलें आहे. हें पुस्तक फारच उपयुक्त होणारें आहे. हें पुस्तक यांच्याकडून लवकर प्रसिद्ध होवो असें इच्छितों !

गोविंदराव मुंबईत गिरगांवमध्यें सदाशिवगल्लींत नेने यांचे घरांत तळमजल्यांत रहात असून प्रतिवर्षी चित्रांचें प्रदर्शन व गणपती तयार करणें वगैरे याच जागीं करतात. अशा गुणी मनुष्यास राजाश्रय पाहिजे, म्हणजे त्या गुणांचें चीज होऊन त्यांचा सर्वांना लाभ होतो.

मावळंगें येथील गोखले. ८

मावळंगें येथील गोखले मूळचे रहाणारे वेळणेश्वरचे; वेळणेश्वराहून गोवळ येथें आले. आणि गोवळहून कृष्णाजी बल्लाळ गोखले शके १६८५ (सन १७६३) त मावळंगें येथें जाऊन घर बांधून राहिले. मावळंगें गांवचे सर्व लोकांनीं मिळून हरजोशी नांवाचे ठिकाणाचें मिरासपत्र शके १७०५ (सन १७८३) त करून दिलें. सदरहू ठिकाण हल्लीं कृष्णाजी बल्लाळ यांच्या वंशजांकडे चालत आहे. मावळंगें गांवचें ग्रामदैवत श्रीविमलेश्वर आहे. कृष्णाजी बल्लाळ यांस पुत्र त्रिंबक; त्रिंबकचा मुलगा सदाशिव; सदाशिव त्रिंबक गोखले हे देशावर गुर्लहोसुरास नारो रंगनाथ किर्लोस्कर यांचे घरीं कारकुनी करीत होते. या गोष्टीस सुमारें १२५ वर्षें होतील.

रा. गोविंद विष्णु गोखले चित्रकार, मुंबई.

श्रीपार्वती.

श्रीगजानन (गोखले कृत).

सदाशिव त्रिंबक यांस पुत्र दोन; त्रिंबक व व्यंकटेश; त्रिंबक सदाशिव हे मराठी शाळेंत मास्तर होते. हे सन १९०७ मध्यें वारले. यांचे पुत्र डॉ. कृष्णाजी त्रिंबक गोखले यांचा जन्म इ. स. १८६० मध्यें झाला. त्यांचें शिक्षण धारवाड हायस्कुलांत होऊन घरची अत्यंत गरिबी असतांना देखील ते ग्रॉंट मेडिकल कॉलेजमध्यें वैद्यकीचा अभ्यास करण्याकरितां गेले. इ. स. १८८५ मध्यें तेथील शेवटची एल. एम्. अँड एस्. ची परीक्षा पहिल्या वर्गांत पास झाले. नंतर लवकरच त्यांना सरकारी नोकरी मिळाली. इ. स. १८९४ मध्यें मालेगांव येथें असिस्टंट सर्जन असतांना त्यांची बदली सिंधमध्यें लारखान्यास झाली. याच सुमारास दम्याच्या विकारानें त्यांस त्रास होऊं लागला होता. लारखान्यास जाऊन सहा महिने होण्याच्या आंतच त्यांस सरकारी नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. नंतर धारवाड जिल्ह्यांत हुबळी येथें त्यांनीं खासगी दवाखाना काढला. पुढें बावीस वर्षें आपल्या धंद्यांत पुष्कळ नांव मिळवून ते हुबळींतील पहिले डॉक्टर झाले. इ. स. १९१६ डिसेंबर ता. २ रोजीं दम्याच्या झटक्यांतच त्यांचा अंत झाला. रोगनिदान व चिकित्सा या बाबतींत एकंदर दक्षिण भागांत त्यांची प्रसिद्धी होती. सतत उद्योग, सरळ व्यवहार व उत्तम शील यांच्या जोरावर गरिबींतूनही माणसें कशीं भरभराटीस येतात याचें प्रस्तुत चरित्र ठळक उदाहरण आहे.

कै. डॉ. कृष्णराव यांना पुत्र चार; पहिले चिरंजीव गोपाळ कृष्ण हे एम्. ए. असून हुबळी येथील न्यू इंग्लिश स्कूलचे प्रिन्सिपाल आहेत. दुसरे शंकर कृष्ण हे त्याच स्कूलमध्यें मास्तर असून हे बी. ए. आहेत. दोघे विद्यार्थी आहेत. गोपाळराव यांचा स्वभाव फारच चांगला आहे. विद्वान असून अंगीं लीनता, हें त्यांना भूषणावह आहे. हे बडिलार्जित घरांत राहून प्रपंच करीत आहेत.

सदाशिव त्रिंबक यांचे दुसरे पुत्र, व्यंकटराव हे मराठी शाळेंत मास्तर होते. हल्लीं पेनशनर असून, विजापूर येथें आपल्या मुलाजवळ रहात आहेत. व्यंकटेश सदाशिव यांना पुत्र तीन; पहिले निळकंठराव व्यंकटेश हे बी. ए. असून डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर आहेत. हे विजापूर येथें रहातात. दुसरे गणेश व्यंकटेश हे हुबळी येथें वकिली करीत असून स्वतःचे घरांत रहात आहेत. तिसरे रघुनाथ व्यंकटेश हे एल्. एम्. अँड एस्. असून बेळगांव येथें ऑफिसर आहेत.

वेळदूळ--पनवेल येथील गोखले. ९

वेळदूळ हा गांव कोंकणांत गुहागराजवळ आहे. असें समजतें. वेळदूळहून रामचंद्र गोविंद किंवा गोविंद जिवाजी गोखले हे पनवेल येथें आले असावेत.

हरी रामचंद्र हे शेती करीत होते. हल्लीं पनवेल येथेंच त्यांचे चिरंजीव सदाशिव हरी हे रहात आहेत. हे म्याट्रिक झाल्यावर, डिस्ट्रिक्ट ग्रीडर झाले. परंतु वकिली न करितां लोकोपयोगार्थ आपलें आयुष्य खर्च करीत आहेत. व्यापारी असोशीएशनचे हे प्रेसिडेंट आहेत. हे कीनाईन धर्मार्थ देत असतात. हे वडिलार्जित घरांत राहून शेती करीत आहेत. यांचे चुलत बंधु सिताराम भास्कर हेही शेतीवाडी करून आहेत.

गिमवणें येथील गोखले. १०

हें घराणें प्रथम हर्णै-मुरूड येथें रहात होतें. तें गिमवण्यास आलें. या गिमवणें येथील गोखल्यांपैकीं, दत्तात्रय हरी गोखले यांनी मध्यंतरीं पुणें येथे राहून " दुनिया " नांवाचें वर्तमानपत्र चालविलें होतें. दत्तात्रय हरी यांचे चुलत बंधु भार्गव कृष्णाजी हे मुंबई येथें हिंदु जिमखान्यांत क्लार्क आहेत. यांचे आजे नारायण व पणजे पांडुरंग हे क्षेत्रीं गेले होते. तसेंच निपणजे रामचंद्र हरी यांचे बंधु रघुनाथभट हेही क्षेत्रीं गेल्याचा दाखला मिळतो. यांचें हर्णै मुरूड येथें खास घर व शेती आहे.

पोंबुर्ले, कोरेगांव, वांई व चिकोडी येथील गोखले. ११

रामचंद्र बाबदेवभट हे प्रथम वांई क्षेत्रीं आले. यांना दोन पुत्र; एक बाळंभट व दुसरे नारायणशास्त्री; बाळंभट व यांचे पुत्र भिकंभट हे वैदिक होते. भिकंभटांचे पुत्र महादेवभट हे हल्लीं वांई येथें गणपतीआळींत स्वतःचे घरांत रहात आहेत. हे सुद्धां वैदिकच आहेत. नारायणभट यांनीं शास्त्राध्ययन करून पदवी मिळविली. महामहोपाध्याय नारायणशास्त्री गोखले, यांना ही पदवी पहिल्या ज्युबिलीचे सालीं मिळाली. पुढें हे वांईहून निघोन कागल येथें गेले. यांचे पहिले चिरंजीव रामचंद्र ऊर्फ भाऊसाहेब यांनीं कोल्हापूर येथें विद्याभ्यास करून सन १८९८ त डिस्ट्रिक्ट ग्रीडरची परीक्षा दिली. नंतर कोल्हापूर येथें वकिली करूं लागले. सन १९०७ सालीं कोल्हापूरशाही सोडून, प्रथम सातारा येथें सुमारें एकदीड वर्ष वकिली करून नंतर कोरेगांव येथें राहून वकिली करीत आहेत. दुसरे चिरंजीव लक्ष्मण हे कागल येथें वैद्यकी करीत आहेत. तिसरे चिरंजीव वासुदेवराव हे चिकोडी येथें वकिली करीत होते. हल्लीं वकिली सोडिली आहे. हे देशाभिमानी व धर्माभिमानी आहेत. रामचंद्र नारायण व वासुदेव नारायण यांनीं सिद्धांत कौमुदी व परिभाषेंदुशेखर वगैरे व्याकरणशास्त्राचें अध्ययन वडि-

लांजवळ केलें आहे. सिद्धांत कौमुदीचें मराठी भाषांतर वासुदेवराव नारायण यांनीं केलें आहे. गोपाळ लक्ष्मण यांनीं कागल येथें स्टेशनरी दुकान घातलें आहे. चौथे चिरंजीव गणेश नारायण हे एल्. एम्. ॲंड. एस्. असून कागल येथेंच रहात आहेत, येशवंत वासुदेव हा राष्ट्रीय कॉलेजांत आहे.

लक्ष्मण बाबदेव हे पेशवाईचे अमदानींत पुण्यास आले. यांचे बंधु रामचंद्रभट बाबदेव बांई येथें आले. त्यांची माहिती वर दिलीच आहे. लक्ष्मण बाबदेव प्रथम इसलामपूर तालुक्यांत आष्टे गांवीं आले असें समजतें. बाबदेवभट हे पुण्यास दक्षणा घेण्यास जात असत. यांचे नातु नरहर; नरहर लक्ष्मण हे डेप्युटी इन्स्पेक्टर पूना या जागेवर आहेत. यांना मुलगे दोन; अच्युत नरहर हे बी. ए. असून एल्फिंस्टन हायस्कुलांत नोकर आहेत. केशव नरहर हे बी. ए. असून हल्लीं लॉ क्लासांत आहेत. हे दोघे बंधु मुंबई येथें रहात आहेत.

बाबजीपंत राम हे पॉंबुर्ल्याहून इचलकरंजी येथें आले. हे इचलकरंजी संस्थानचे कारभारी होते. बाबजीपंतांनीं जमीनजुमला व घर इचलकरंजी येथें केलें. बाबजीपंत यांचे पुत्र दिनकरभट व नातू कृष्णंभट हे वैदिकच होते. कृष्णंभट यांचे चिरंजीव गंगाधर; गंगाधरपंत हे वकिली करीत होते. गंगाधरपंतांचे चिरंजीव केशवराव व महादेवराव हे वडिलार्जित जमीन शेती करून व वडिलार्जितच घरांत रहात आहेत.

केतकी-बिवली व उमरावती येथील गोखले. १२

केतकी-बिवली हा गांव चिपळूणजवळ आहे. केतकी-बिवली येथें विद्यमान एक गोखले घराणें आहे. विठ्ठलभट परशरामभट गोखले यांचे चुलते लक्ष्मणभट सदाशिव गोखले हे केतकी बिवली येथें आहेत. लक्ष्मण सदाशिव यांचे चुलत बंधु संभाजी विनायक गोखले हे उमरावती येथें असतात. संभाजीराव गोखले हे बी. ए. एल्. एल्. बी. असून देशभक्त आहेत. यांच्यावर सरकारनें पिकेटिंग संबंधीं खटला केला होता. म्हणून यांची सनद रद्द झाली होती. हायकोर्टानें योग्य विचार करून व खटल्याचें क्षुद्र स्वरूप लक्षांत आणून संभाजीराव यांची वकिलीची सनद रद्द न करतां चालू केली. त्याप्रमाणें संभाजीराव हे उमरावती येथें वकिली करीत आहेत. यांची रहाणी अगदीं साधी असून हे राष्ट्रकार्याभिमानी आहेत.

वाडा-मारवेल येथील गोखले. १३

धाऊलवल्ली व देवाचें–गोटणें या दोन्ही गांवांचे मध्यें वाडा–मारवेल म्हणून एक अगदीं लहान गांव आहे. धाऊलवल्लीचे गोखले बाळाजी माहादेव यांनीं ता० १४।१०।०७ रोजीं सरकारांतअर्ज करून, वाडा-मारवेल येथील गोखल्यांच्या एका जदनाम्याची नक्कल मागिविली ती खालील प्रमाणेः–

" फेरिस्ट नं. १४० जदनामा नारो जगन्नाथ गोखले रा मौजे धाऊलवल्ली तर्फ राजापूर तो विजयदुर्ग मुरुसन सीत आर्बेन मयातैन व आलफ मौजे मार पैकीं कौली इनामत सरकार जाबत्यास आमचे तीर्थरूप जगन्नाथ बाबूराव गोखले यांचे नांवें ४८१०८१ खर्च पडत आहेत " सदरहु जदनामा प्रथम जगन्नाथ बाबूराव यांचे आजे शंकराजीनाईक बल्लाळनाईक गोखले यांच्या नांवाचा सुा सन तिस्सा सबैन मया व अलफ (शके १७०१ सन १७७९ त) मध्यें झाला होता, सन १८४६ मध्यें नारो जगन्नाथ गोखले यांनीं वंशावळीचा उतारा सरकारांत दिला होता, तो उतारा आम्हांस धाऊलवल्ली येथें मिळाला, हल्लीं वाडा–मारवेल येथें गोखले कोणी नाहीं. धाऊलवल्लीपैकींच वाडा–मारवेलचे गोखले असावेत असें वरील हकिकतीवरून सिद्ध होत आहे. कोल्हापूर येथील कै. शंकरशास्त्री गोखले हे राहणारे वाडा–मारवेल येथील आहेत. वाडा–मारवेलचा आम्हांस जो वंशावळीचा उतारा मिळाला आहे त्यांत शंकरशास्त्री गोखले यांचे आजे पणजे वगैरे आम्हांस मिळाले. यावरून कै. शंकरशास्त्री गोखले यांचें कोंकणांतील मूळगांव धाऊलवल्ली. धाऊलवल्लीहून शंकरशास्त्री यांचे निपणजे किंवा खापर पणजे वाडा–मारवेल येथें राहूं लागले.

कै. शंकरशास्त्री गोखले यांचें चरित्र.

राजापूर तालुक्यांत धाऊलवल्ली नजीक वाडा–मारवेल या खेडे गांवीं शास्त्रीबुवांचे पूर्वज रहात असत. शास्त्रीबुवांच्या तीर्थरूपांचें नांव वे. रघुनाथशास्त्री असें होतें. त्यांना लोक राघोबादादा असेंही म्हणत. हे वैद्यशास्त्रांत चांगले तयार असून संस्कृत साहित्यांतही बरेच प्रवीण होते. त्यांच्या पत्नीचें नांव जानकीबाई असून, ता. राजापूरपैकी गांवखडी येथें त्यांचें माहेर होतें. वे. रघुनाथशास्त्री हे चांगले प्रौढ व वैद्यशास्त्रांत तयार झाल्यावर, कोंकणप्रांत सोडून देऊन कोल्हापूर येथें येऊन राहिले. ह्या ठिकाणीं ते वैद्यकीवर आपला निर्वाह करीत असत. शके १७७८ (सन १८५६) सालीं सौ. जानकीबाई या गरोदर असल्यानें वे. राघोबादादा यांनी त्यांस त्यांच्या माहेरी अर्थात गांवखडी

येथें पाठविलें. सौ. जानकीबाई गांवखडी येथें शके १७७८ [सन १८५६] च्या फाल्गुन वा ११ च्या दिवशीं प्रसूत होऊन पुत्रप्राप्ती झाली. त्याचें नांव शंकर असें ठेविलें. हेच शंकरशास्त्री होत.

पुढें १०। ११ महिने गेल्यानंतर वे. राघोबादादांनीं आपली प्रिय पत्नी व पुत्र यांस कोल्हापुरीं आणिलें. या वेळीं त्यांच्या कुटुंबांत या नवकुमारासह अवघीं तीनच मनुष्यें होतीं. यानंतर राघोबादादांचीं जवळ जवळ दोन वर्षें कोल्हापुरास त्यांची सुशील पत्नी आणि प्रिय पुत्र यांच्या सहवासांत आनंदानें व सुखानें गेलीं. पण मृत्युलोकीं प्राप्त होणारें सुख हें कायमचें असें केव्हांही असावयाचें नाहीं. ह्या नियमाप्रमाणें शके १७८० (सन १८५८) मध्यें राघोबादादांच्या सुखावर अकल्पित आकाशांतील कुऱ्हाड कोसळली, व त्यांची पतिपरायण सुशील प्रिय पत्नी परलोकवासी झाली. दोन वर्षांचें लहान मूल [शंकर] व घरींही दुसरें मनुष्य नाहीं अशा प्रसंगीं प्रिय पत्नीच्या निधनामुळें दादांवर कोणत्या प्रकारचें संकट ओढवलें असेल व त्यांस किती दुःख झालें असेल त्याची कल्पना करण्याचें काम वाचकांवरच सोंपविणें भाग आहे. आपल्या चरित्रनायकाच्या बाळपणांतील संकटाची जी एक इमारत ईश्वरानें उभारली होती, त्याचा हा यावेळीं पाया होता म्हणावयाचा !

पुढें दादांनीं आपल्या मेहुणीस कोंकणांतून आणिलें व तिनेंच या लहान मुलाचें मातेप्रमाणें संगोपन केलें. दादांनीं आपल्या पुत्रास पांच वर्षें होतांच त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें मराठी शिकण्यासाठीं शाळेंत घातलें. व मराठी पांच इयत्तेपर्यंतचें शिक्षण मिळाल्यानंतर त्यांस इंग्रजीही शिकावयास घातलें. दादांनीं आपल्या पुत्रास जें शाळेंत घातलें, तें केवळ कांहीं लेही मंडळीच्या आग्रहावरूनच होय. यामुळें पुढें त्यास त्यांच्या धार्मिक समजुतीप्रमाणें हें यावनी भाषेचें शिक्षण पसंत न पडून, त्यांनीं आपल्या मुलास, अर्थात् शास्त्रीबोवांस त्या शिक्षणांतून काढिलें. बावडा संस्थानचे अधिपती श्री. बाळासाहेब पंत अमात्य व रा. ब. विश्वनाथ रावजी गोखले हे शास्त्रीबुवांचे त्यावेळचे सहाध्यायी होत. शास्त्रीबोवा इंग्रजी ३।४ इयत्तेपर्यंत शिकले होते. शास्त्रीबोवांस इंग्रजी शाळेतून काढल्यानंतर दादांनीं त्यांस येथील सुप्रसिद्ध वैद्य वे. रा. भिकुशास्त्री द्रवीड यांजकडून वैद्यक शिक्षण देण्याचें काम सुरू केलें. त्यापूर्वी संस्कृत शिक्षणास अवश्य लागणारी रूपावली वगैरे सर्व सामुग्री त्यांनीं शास्त्रीबुवांस स्वतः शिकविली होती.

शास्त्रीबुवा १४ वर्षांचे झाल्यानंतर दादांनीं कोल्हापूर येथील केसोपंत मराठे यांच्या कन्येशीं शके १७९२ [सन १८७०] त ह्यांचा विवाह केला. पुढें दोन वर्षें लोटल्यानंतर कोल्हापूर सोडून देऊन दुसरीकडे रहावें असा दादांचा विचार ठरला व त्याप्रमाणें ते निघाले. अर्थात् शास्त्रीबुवाही त्यांच्याच बरोबर

तिकडे गेले. ते पुण्यास शके १७९५ च्या चैत्र शु॥ ३ स पोचल्यानंतर रामनवमी होईपर्यंत शास्त्रीबुवा तेथें राहिले व नंतर विद्यासंपादनासाठीं हे पायवाटेनें नाशिकास निघोन गेले. पण तेथें शास्त्रीबुवांच्या इच्छेप्रमाणें त्यांचें अध्ययन होईना; त्यामुळें हे पुढें चारच महिन्यांनीं बडोद्यास जाऊन राहिले. तेथें शास्त्रीबुवा सुमारें दोन वर्षें होते. शके १७९६ च्या मार्गशीर्षांत मात्र हे सिद्धपुरास जाऊन आले. शास्त्रीबुवांस संस्कृत भाषेची व्युत्पत्ति पूर्वीच चांगली झाली असल्यामुळें, बडोद्यास त्यांनीं व्याकरणशास्त्राचें कांहीं ज्ञान संपादिलें. यावेळीं शास्त्रीबुवांस मधुकरी मागावी लागली होती.

शके १७९७ (सन १८७५) च्या चैत्र महिन्यांत शास्त्रीबुवा बडोद्याहून कोंकणांत जावयास निघाले. तिकडे जाऊन आषाढांत पुनः बडोद्यास परत आले. नंतर तेथें शके १७९८ (स.१८७६) च्या भाद्रपदापर्यंत होते. मध्यंतरीं गुजरायेंत फिरून आले. बडोद्यास श्रावणमासांत संस्कृत परीक्षा देऊन, त्यांत ह्यांनीं संभावना मिळाविली. नंतर शास्त्रीबुवा कल्याणास आले. ह्या वेळेपासून शास्त्रीबुवा " शास्त्रीबुवा " या नांवानें प्रसिद्धीस आले. कल्याणास आल्यानंतर हे तेथें पुराण सांगूं लागले. त्या ठिकाणीं शास्त्रीबुवा सुमारें दोन वर्षें राहिले होते. मध्यंतरीं हे इंदुरास जाऊन ३ । ४ महिने राहून परत आले. शके १८०० [स. १८७८] च्या ज्येष्ठ वद्यांत आपल्या तीर्थरूपांसह पुनः कोल्हापुरास परत येऊन राहिले. यावेळीं दादांच्या नेत्रांत मोतीबिंदू आल्यामुळें त्यांस ४ । ५ वर्षें दिसेनासें झालें होतें. पितृसेवेंत दक्ष असणारे शास्त्रीबुवा वडिलांची उत्कृष्ट प्रकारें सेवा करीत व त्यांस पुराण सांगत असत. शके १८०२ [सन १८८०] मध्यें शास्त्रीबुवांस पहिला पुत्र झाला. त्याचें नांव त्यांनीं गणपती ठेविलें. याच सालीं शास्त्रीबुवांच्या पित्याचा म्हणजे राघोबादादांचा मोतीबिंदूचा आजार बरा होऊन त्यांस दिसूं लागलें. नंतर शास्त्रीबोवा मुंबई, पुणें, इंदूर वगैरे ठिकाणीं फिरून आले. हे परत येतांच त्यांजवर पित्याच्या निधनजन्य दुःखाचा डोंगर शके १८०४ [सन १८८२] मध्यें कोसळला. पुढें कांहीं दिवस लोटून तें दुःख कमी झाल्यावर शास्त्रीबुवांनीं पुण्यास वैद्यकीची परीक्षा दिली. व त्यांत पसार होऊन त्यांनीं उत्कृष्ट प्रतीचें प्रशंसापत्र मिळविलें.

योग्य प्रकारें आपल्या हातून कांहीं तरी देशसेवा घडावी अशी शास्त्रीबुवांची पूर्वीपासूनचीच इच्छा होती. त्या बीजास हे कोल्हापूर येथें परत आल्यावर अंकुर फुटला. पुढें कांहीं दिवस सातार्‍यास जाऊन आल्यावर शास्त्रीबुवांच्या लोकसेवेचा अंकुर विकसीत झाला.

या वेळीं कोल्हापुरास ' आर्यप्रबोध ' नांवाचा शिळेचा छापखाना होता. त्याचे मालक रा. आबासाहेब पारसनीस ह्यांस प्रोत्साहन देऊन शास्त्रीबुवांनीं त्यांजकडून ' दक्षिणवृत्त ' हें वर्तमान पत्र सुरू केलें. नवे नवे लेख उत्कृष्टप्रकारें

लिहिण्याकडे शास्त्रीबुवांची प्रवृत्ती होती. यामुळें शास्त्रीबुवांनींच त्यावेळीं त्या पत्राचें संपादकत्व पत्करिलें. शास्त्रीबुवांच्या सारगर्भित आणि हृदयंगम लेखांमुळें त्या पत्राचा खप पुष्कळ होऊं लागला होता. दक्षिणवृत्त आणि आर्यप्रबोध छापखाना ह्यांचा उत्कृष्टप्रकारें अभ्युदय व्हावा अशी ह्यांची फार इच्छा होती. याप्रमाणें सन १८८३ च्या नोव्हेंबरमध्यें शास्त्रीबुवा हे एका वृत्तपत्राचे संपादक बनले. एक दोन वर्षे गेल्यानंतर ' दक्षिणवृत्त ' टाइपावर निघावें असें शास्त्रीबुवांस वाटूं लागलें. व त्याच साली पुण्यास जाऊन ह्यांनीं टाइपाच्या छापखान्याचें सर्व सामानसुमान खरेदी केलें. पण हे पुण्यास आहेत तोंच ' दक्षिणवृत्त व आर्यप्रबोध ' ह्या दोन्ही संस्थांशीं असणारा ह्यांचा संबंध सुटला अशी वार्ता ह्यांस समजली. तथापि शास्त्रीबुवांच्या अंगचें धैर्य बिलकुल कमी झालें नाहीं. अथवा ह्यांचा टाइपाचा छापखाना कोल्हापुरांत काढण्याचा उत्साह यत्किंचित् देखील मंदावला नाहीं. शास्त्रीबुवा छापखान्याचें सामान घेऊन कोल्हापुरास आले; व ह्यांनीं आपल्या प्रेमळ, उदार आणि साहाय्यशील अशा मित्रांच्या मदतीनें ' विद्याविलास ' ह्या नांवाचा टाइपाचा स्वतंत्र छापखाना सन १८८५ च्या मार्च महिन्यांत सुरू केला. हाच या शहरांतील पहिला टाइपाचा छापखाना होय.

शास्त्रीबुवा जरी पूर्वी दक्षिणवृत्ताचे लेखक होते, तथापि त्यावेळीं ते स्वतंत्रपणें संपादक नव्हते. पण आतां शास्त्रीबुवांच्या स्वरूपावरील आवरण पार नाहींसें होऊन हे स्वतंत्र संपादक बनले. छापखान्याची स्थापना होऊन कांहीं महिने लोटल्यानंतर शास्त्रीबुवांनीं ' विद्याविलास ' ह्या नांवाचें मासिक पुस्तक सुरू केलें व इ. स. १८८८ च्या आगष्टमध्यें ह्यांनीं त्यास साप्ताहिकाचें स्वरूप दिलें. हें साप्ताहिक शास्त्रीबुवांनीं किती जोमानें, सत्यनिष्ठेनें आणि दक्षतेनें चालविलें होतें हें विद्याविलासाच्या वाचकांस सांगितलें पाहिजे असें मुळींच नाहीं. लांगूलचालनाचा बिलकुल अंगिकार न करितां, केवळ सत्याची बाजू धरून वृत्तपत्रांचें काम चालविणाऱ्या मनुष्यांवर कशीं भयंकर संकटें येऊन पडतात, याचें शास्त्रीबुवा हें एक मूर्तिमंत उदाहरणच होते. आपला व्यवसाय योग्य प्रकारें चालवीत असतां, शास्त्रीबुवांवर एकंदर पांच खटले झाले. त्यांतील एक खेरीज करून बाकी सर्वांमध्यें हेच विजयी झाले; तथापि त्यामुळें द्रव्यदृष्ट्या शास्त्रीबुवांना भयंकर नुकसान सोसावें लागलें. या वेळीं येथील प्रसिद्ध डॉ. आपटे यांच्या सारख्या सन्मित्रांनीं जें ह्यांस साह्य केलें, त्याचें विस्मरण ह्यांस तर मुळींच झालें नव्हतें, व हे प्रसंग ओढवल्यामुळें शास्त्रीबुवांचें धैर्य कांहीं कमी झालें होतें असें नाहीं. यांनीं आपला उद्योग फार नेटानें चालविला होता. व विद्याविलास पत्र आठवड्यांतून दोन वेळ काढण्याचें सुरू केलें

होतें. पण दुर्दैवामुळें त्याला एक वर्षही झालें नाहीं. तोंच असा प्रसंग ओढवला याबद्दल परमावधी दुःख झालें.

शास्त्रीबुवांनीं शके १८१४ च्या वर्षप्रतिपदेपासून 'तत्वप्रकाशक' नांवाचें मासिक पुस्तकही सुरू केलें होतें. यांत आर्यांच्या विद्याविषयींची माहिती सप्रमाण व शोधकबुद्धीनें लिहिलेली असे. हें पुस्तक एक वर्ष चालून पुढें कांहीं कारणानें बंद पडलें. पण पुढें त्याऐवजी तशाच प्रकारचीं लहान लहान स्वतंत्र ग्रंथाची मालिका काढण्याचा शास्त्रीबुवांचा विचार ठरला होता. व त्याप्रमाणें "आर्यांच्या चौदा विद्या" हें छोटेसें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें. शास्त्रीबुवांनीं उपयुक्त असे लहान लहान अनेक ग्रंथ लिहिले आहेत. ह्यांनीं आरंभी प्रसिद्ध केलेलें पुस्तक "हेमाद्री" हें होय. वैद्यक शिकणाऱ्या लोकांस ह्याच्या इतका उपयोगी असा दुसरा ग्रंथ नाहीं. ह्यानंतर शास्त्रीबुवांनीं विद्याविलास पुस्तकमाला ह्या नांवाची एक पुस्तकमाला सुरू केली होती. यांतील पहिलें पुष्प पुण्याच्या हायस्कूल मधील अ. मा. रा. धोंडो बाळकृष्ण सहस्रबुद्धे यांनीं गोंवलेल्या पुस्तकाचें नांव "भरतस्थलादर्श" असें असून, यांत हिंदुस्थानांतील प्राचीन देशादिकांचें वर्णन, सीमा आणि नांवें वगैरेंचा विचार सप्रमाण केला आहे. दुसरें पुष्प "वैद्यवर्य वाग्भट" हे शास्त्रीबुवांनीं स्वतःच गोंविलें आहे. यांत सुप्रसिद्ध वैद्यवर्य वाग्भट यांच्या जीवनचरित्राचा व त्यांनीं केलेल्या ग्रंथांचा सप्रमाण विचार केलेला आहे. ह्यांनीं लिहिलेलें दुसरें पुस्तक "संसर्गजन्यव्याधि अथवा गर्मीचे विकार" हें होय. 'रासोत्सव' लिहिलेले तिसरें पुस्तक होय. हें संगीत नाटक आहे. चवथे 'प्रल्हाद चरित्र' पांचवें 'आर्यांच्या चौदा विद्या' याखेरीज शास्त्रीबुवांनीं आणखी कांहीं लिहिलेली पुस्तके आहेत. पण तीं अपुरींच राहून गेलीं आहेत, या लेखकाचा शास्त्रीबुवांशीं विशेष स्नेह होता.

कोल्हापुरास अनेक सार्वजनिक संस्थांत शास्त्रीबुवांनीं पुढाकार घेतलेला होता. व कित्येक संस्थांचे हे व्यवस्थापक ही होते. यांनींच कोल्हापुरास गणेशोत्सवांत मेळे काढण्याचा प्रथम उपक्रम केला. शास्त्रीबुवांस सतार वाजविण्याचा व गाण्याचा बराच नाद होता. यांचा स्वभाव फार विनोदी व मनमिळाऊ होता. हे ता. २१ आक्टोबर सन १९०४ रोजीं परलोकवासी झाले. ह्यांस एकंदर नऊ अपत्यें झालीं होतीं. त्यांपैकीं सांप्रत दोन मुलगे व दोन मुली आहेत. ह्यांच्या वडील मुलाचें नांव गणपती होय. गणेश शंकरशास्त्री गोखले हेच शास्त्रीबुवांचे मागें 'विद्याविलास' छापखाना व वर्तमानपत्र चालवीत होते. अल्प वयांत प्रपंचाची सर्व जबाबदारी अंगावर पडल्यामुळें शिक्षणही अपुरेंच राहिलें. धैर्यानें संकटास तोंड देऊन न डगमगतां ह्यांनीं छापखाना व वर्तमानपत्र जोमानें परवांपर्यंत चालविलें होतें. या जबाबदारीमुळेंच विद्याविलासावर पहिली

फिर्याद ता. ११–१–२१ रोजीं कोल्हापुरचे पो. सब् इन्सपेक्टरनें विद्याविलास पत्राच्या ता. २९–१०–२०च्या अंकांत 'गळदगेकर' या सहीनें ता. २६-१० २०चें कोल्हापूरचें एक बातमीपत्र छापल्यासंबंधानें केली. या खटल्याचा निकाल ता. ८।७।२१ रोजीं होऊन येथील डि. मा. नें पत्राचे मुद्रक म्हणून रा. गणेश शंकरशास्त्री गोखले यांना १८ महिने सक्त मजुरीची शिक्षा दिली. हल्लीं कोल्हापूर येथील सेंट्रल जेलमध्यें ते शिक्षा भोगीत आहेत. यांचेवर दुसरी फिर्याद कोल्हापूरचे मुक्त्यार वकील तात्या नरसू गौडा पाटील यानें अब्रूनुकसानीची केली. त्याचाही निकाल लागून त्यांतही गणपतरावांना १०० रु. दंड १ महिना साधी कैद अशी शिक्षा देण्यांत आली. ही शिक्षा पहिली संपल्यावर दुसरीचा अम्मल सुरू व्हावयाचा आहे. आणखी तिसरी शिक्षा १२४ कलमाखालीं झाली आहे.

जो प्रसंग अल्पवयांत गणपतरावांवर आला तोच प्रसंग गणपतराव संकटांत सांपडल्यामुळें त्यांचे कनिष्ठ बंधु रामकृष्ण यांच्यावरही ओढवला आहे. अल्पवयांत प्रपंचाची व सर्व छापखान्याची जबाबदारी आज रामकृष्ण शंकर गोखले यांच्यावर पडली आहे. प्रसंगास पाठ देऊन धैर्यानें व नेटानें जबाबदारी चालविण्याची शक्ती परमेश्वर त्यांना देवो !

वांई येथील गोखले, १४

श्रीक्षेत्र वांई येथें गंगापुरींत गोखले यांचीं घरें दोन आहेत. त्यांपैकीं हें एक घराणें आहे. या घरांतील गोखले किती वर्षांपूर्वी वांईला आले वगैरे माहिती मिळाली नाहीं याचें कारण यांपैकीं घरीं कोणीच नाहीं. या गोखले घराण्यांत एक गणेश वामन हा अज्ञान आहे. नारायण रामचंद्र हे जोधपूर बिकानेर रेलवेंत नोकर आहेत. आणि यांचे कनिष्ठ बंधु दत्तात्रय रामचंद्र हे अग्रिकलचर खात्यांत नोकर आहेत. ही माहिती वांई येथील त्यांचे घरांत राहणारे त्यांचे स्नेही ह्यांनीं सांगितली. आम्ही माहिती मिळविण्याकरितां वरील गोखले बंधूंनां पत्रें पाठविलीं होतीं, परंतु उत्तर आलें नाहीं.

गोखले ऊर्फ बडे, १५

गोखले यांचे बडे कसे झाले याबद्दल कांहींच माहिती मिळत नाहीं. विद्यमान इंदोर व सोलापूर येथें बडे उपनांवाचे गोखले आहेत. इंदोर येथील रामचंद्र गणेश बडे यांस सहा मुलगे, या सहाजणांनाहि मुलें आहेत. यांपैकीं बहुतेक सर्व नोकर

आहेत. मी नाशीक येथें गेलों होतों, त्यावेळीं तेथें बडे उपनांवाचे सब्‌रजिस्टर होते, त्यांचा पत्ता काढून भेटण्यास गेलों, तों घरीं त्यांचें कुटुंब व मुलें होतीं त्यांच्याकडे चौकशी करतां रजिष्टर यांची बदली होऊन ते सोलापूर येथें गेले होते व त्यांची मंडळीहि १।२ दिवसांत तिकडे जाणार होती, मी सब्‌रजिस्टर यांना सोलापूर येथें छापील विनंतीपत्र पाठविलें, परंतु कांहींच उत्तर नाहीं. मात्र चौकशी करितां असें समजलें कीं, हे पूर्वीचे गोखले आहेत. बडे हें विशेषण केव्हां व कां धारणकेलें तें कांहींच समजत नाहीं. बडे हें विशेषण अदिलशाहींत मिळालें कीं पेशवाईत मिळालें तें कांहींच जरी तूर्त समजलें नाहीं तरी अदिलशाहींत किंवा पेशवाईत 'बडे' हें विशेषण मिळालें असावें असें वाटतें.

जालिहाळ येथील गोखले. १६

विजापूर जिल्ह्यांत जालिहाळ या गांवीं एक गोखले घराणें आहे. या घराण्यापैकीं कांहीं नोकर आहेत असें समजतें. तूर्त जालीहाळ येथें व्यंकटेश गणेश गोखले हा सुमारें १०।११ वर्षांचा मुलगा व त्याची आई अशीं आहेत. त्यांच्या नांवें आम्हीं विनंतीपत्र पाठविलें, परंतु माहिती कांहींच मिळाली नाहीं. जरी माहिती मिळाली नाहीं, तरी या घराण्यांतील पुरुषांनीं पेशवाईत चांगली कामगिरी केली असली पाहिजे. या घराण्यास जालीहाळ येथें जमिनीचें उत्पन्न बरें आहे, असें समजतें.

महाडचे गोखले. १७

संगीत चित्ताकर्षक नाटक मंडळींत रंगनाथ रामचंद्र गोखले हे इसम होते. त्यांनीं आपले चुलते व वडील महाडास आहेत, त्यांचे कडून माहिती मिळेल असें सांगितल्यावरून महाड येथें रामचंद्र गोपाळ गोखले यांना आम्हीं 'छापील विनंतीपत्र' पाठविलें, परंतु उत्तर नाहीं.

तासगांव येथील गोखले. १८

गोवळच्या गोखल्यांपैकीं एक पुरुष तासगांवीं आला, कोण आला वगैरे कांहीं माहिती मिळत नाहीं. तूर्त तासगांव येथें कृष्णाजी सदाशिव गोखले यांचे पांच पुत्र रहात आहेत, त्यांत सर्वांत वडील सच्चिदानंद हे बी. ए. एल्. एल्. बी, झाले असून वडिलांनीं चालविलेलें कापडाचें दुकान आपल्या बंधूच्या मदतीनें चा-

लवीत आहेत, वडिलार्जित घरांत रहात आहेत, यांच्या दशांतील रामचंद्र विसाजी व लक्ष्मण विसाजी हे दोघे बंधु मुंबई येथें रहात आहेत. रामचंद्र हे कस्टम खात्यांत व लक्ष्मण हे ट्रामकंपनींत नोकर आहेत.

गोंवळ येथील काशीकर गोखले. १९

गोंवळ येथें गोखले यांचीं घरें ७।८ तरी आहेत, यांतील विद्यमान घराणीं चार आहेत. त्यांपैकीं काशीकर गोखले हें एक घराणें होय. या घराण्यांतील पुरुष विशेषतः शेती करणारे व वैदिक आहेत. भास्कर परशराम हे वैदिक असून मुंबई येथें भिक्षुकी करितात. यांचे दोघे बंधु त्रिंबक व वामन हे कालेजांत आहेत. मोरेश्वर वासुदेव हे वैदिक व शास्त्री आहेत. या घराण्यास गोंवळ येथें वस्ती करून सुमारे १५० वर्षें होतील.

अणसुरें येथील गोखले. २०

धाऊलवल्लीहून महादेव रामचंद्र हे अणसुरें येथे आले. पुढें अणसुरेंहून विश्वनाथ वामन हे मुरुडास आले. रामचंद्र विश्वनाथ वय वर्षें ८० हे हल्लीं हयात असून कोंकणांतच रहात आहेत. त्यांचे चिरंजीव महादेव रामचंद्र हे बन्हाडांत मुा वणी येथें 'जमनादास नर्सी जिनिंग अँड प्रेसिंग' या कारखान्यांत इंजिनीयर आहेत. मु. मुरुड ता, दापोली येथें जमीन व घर आहे. अणसुरें येथें विद्यमान या घराण्यापैकीं कोणी नाहीं.

आजगांव, पुणें व हरिपूर येथील गोखले.

आजगांव हा गांव वेंगुर्ल्यापासून ८।९ मैल असावा. ह्या गांवासंबंधीं सर्व माहिती 'आपटे घराण्याचा इतिहास' यामध्यें दिली आहे. आजगांव सावंतवाडी संस्थानांत आहे. वेंगुर्ला हा बंदरकाटचा उत्तम गांव पूर्वी सावंतवाडीकरांचा होता, तो हल्लीं दयाळुसरकारचा कसा झाला हें माहीत नाहीं. वेंगुर्ल्याखालील आजगांव मात्र वाडी संस्थानापैकींच आहे. आजगांव येथें 'आपटे' घराण्याचींच घरें जास्त आहेत. गोखल्यांचीं घरें दोनच आहेत. आजगांव येथें गोखले घराण्याची वस्ती होऊन दोनशें वर्षें झालीं असावींत.या गांवचें प्रसिद्ध व जाज्वल्य स्थान श्रीवेताळाचें होय.

आजगांवाहून बाजीभट येसंभट गोखले हे पुण्यास आले. बाजीभट यांस पुत्र चार; हरभट, गोविंद, कृष्णाजी व विनायक. हरभट हे मोठे वैदिक होते. गोविंदराव हे फडणीसीचे कामावर होते, कृष्णाजी-पंत हे मामलतदारीवर होते. विनायकराव हे कालेजांत सायन्सचे शिक्षक होते. सदाशिव हरी हे ओव्हरसीयर होते. बळवंतराव गोविंद हे घरप्रपंच पहात होते. बाबाजी कृष्ण हे खासगी इंग्रजी शाळा चालवून वकिली करीत होते. बळवंत विनायक हे कालेजांत क्लार्क होते. रावजी हे ओव्हरसीयर होते. वामन-राव विनायक हे हास्पिटल असिस्टंटचे कामावर मिरज–मळा संस्थानांत होते. वामनराव यांना हल्लीं पेनशन मिळत आहे. हे पुण्यांत आपल्या वाडयांत रहात आहेत. हरी सदाशिव हे फर्ग्युसन कालेजांत आहेत. गणेश बळवंत हे इंजिनियर खात्यांत नोकर आहेत.गोविंदराव बाबा हे असिस्टंट सर्जन आहेत. यांच्या वडि-लांनीं शुक्रवार पेठेंत घर खरेदी केलें त्याचा म्यु. नं. ३५१ आहे.केशव बळवंत हे बी. ए. असून हल्लीं जळगांव येथें हायस्कुलांत असिस्टंट हेडमास्तर आहेत. चिंतामणी रावजी हे सोलापूर येथें ॲग्रिकलचर ओव्हरसीयर आहेत.

बाजीभट यांच्या मुलांनीं पेशव्यांचे आप्त थत्ते यांचें घर विकत घेतलें. बाजीभट यांचे चारी मुलगे एकत्र रहात असत. सदरहू घर बुधवारांत श्रीजोगेश्वरीचे समो-रील दक्षिण कोपऱ्यांत आहे, हें घर (वाडा) मोठें असून हल्लीं त्यांत वांटण्या झाल्या आहेत, या घराचा हल्लींचा म्यु. नं. १२७ आहे, या कुटुंबांतील गोविंदराव बाजी यांनीं शेती संपादून प्रपंच उत्तम केला होता.

येसंभट हरभट यांचे चुलत पुतणे गणेशभट गोविंदभट हे आजगांवाहून पुण्यास आले. गणेशभटाचे पुत्र नारायणभट व केशवबुवा; केशव गणेश ऊर्फ केशवबुवा हे चंडिराम बुवांचे शिष्य होते हे ब्रह्मचारी असून, पूर्ण विरक्त झाले होते यांची समाधी खेड नजीक लिंब गांवी आहे. यांचा समाधिकाल वैशाख वा। ८ आहे. नारायणभट गणेशभट यांनीं पुणें येथें घर संपादिलें. सदरहु घर सदाशिव पेठेंत हौदाजवळ म्यु. नं. ३७० चें होय. नारायणभट यांचे मुलगे व नातू या घरांत रहात आहेत. शिवराम नारायण हे शिक्षक होते. हल्लीं घरींच असतात. गणपतराव नारायण हे पोष्टमास्तर आहेत. बाळकृष्ण शिवराम हे खासगी नोकर आहेत.

आजगांवाहून दोन कोसांवर आरोस येथें रामचंद्र विष्णु गोखले रहात होते. परंतु अलीकडे गणेश व विष्णुभट रामचंद्र हे पुन्हां आजगांव येथेंच राहूं लागले. कृष्णाजी गणेश व श्रीधरभट गणेश यांचे मुलगे नरसिंह, गणेश व वासुदेव हे आजगांव येथेंच रहात आहेत. हे वैदिक आहेत. विष्णुभट रामचंद्रभट गोखले यांस पुत्र तीन; वामनभट, भलंभट व शंकरभट. हे त्रिवर्ग बंधु गोमांतकमधील

मंगेश या गांवीं असतात. भलंभट हे वैदिक आहेत. शंकरभट हे श्रीमंगेश संस्थानीं गवई आहेत.

येसंभट हरभट यांचे नारायणभट व माधवभट कृष्णंभट, हे चुलत बंधु होत. कृष्णंभट हे हरिपुरास आले असें समजतें. हरिपुरांत घर व इनाम संपादिलें आहे. कृष्णंभटांचे नातू मोरभट महादेवभट ह्यांनीं चतुर्थाश्रम घेतला होता. हे हरिपूर येथेंच समाधिस्थ झाले. ह्या घराण्यांतील पूर्वज आजगांवपासून एक मैलावर ढाकोरें म्हणून एक वाडा आहे, या ठिकाणीं रहात असत. हल्लीं तेथें घर व शेत आहे. बाळाजी गणेश गोखले हे वरचेवर कोंकणांत जात येत असतात. मोरभटांचे तीन मुलांपैकीं पहिले गणेशभट हे चुलत चुलत्यास (रामभट नारायणभट यांस) दत्तक गेले. त्यांचे पुत्र बाळाजी गणेश हे देशावर मिरज–मळा संस्थानची राजधानी बुदगांव येथें हल्लीं स्टॉपवेंडर आहेत. यांचे चिरंजीव मोरो बाळाजी हेही बुदगांव येथें सर्वे खात्यांत नोकर आहेत. बाळाजी गणेश यांचेंच घर व जमीन ढाकोरें येथें आहे. दुसरे नरहरभट मोरभट, यांचे नातू दत्तात्रय लक्ष्मणभट हे फर्ग्युसन कॉलेजांत सीनीयर बी. ए. त आहेत. तिसरे यशेश्वर ऊर्फ बाळंभट; यांचे पुत्र रामभट व गोपाळ; रामभट हे वैदिक होते. हे नित्य हरिपुराहून कोरान्न मागण्यास सांगली येथें येत. हे गरीब स्वभावाचे व धर्मशील होते. गोपाळराव हे बुदगांव येथें शाळा मास्तर आहेत.

हरिपूर येथें गोखले यांचीं घरें तीन आहेत. एक रामभट यशेश्वर यांचें, दुसरें श्रीपादराव गोखले यांचा वाडा; आणि तिसरें दिनकरभट पुरुषोत्तमभट यांचें; दिनकरभट पुरुषोत्तमभट यांचे निपणजे महादेवभट गणेशभट हे हरिपूर येथें आले. महादेवभट चांगले वैदिक असून स्नानसंध्येशील होते. मिरजेचे गोविंद हरी पटवर्धन यांच्याकडे महादेवभट यांनीं विनंती केल्यावरून, यांना इनाम मिळालें. सदरहु इनामाची सनद मात्र महादेवभटांचे पुत्र श्रीधर यांचे नांवची झाली आहे. ती सनद येणेंप्रमाणें:—" वेदमूर्ती राजश्री श्रीधरभट बिा महादेवभट उपनाम गोखले गोत्र काश्यप सूत्र हिरण्यकेशी वास्तव्य मौजे आजगांव प्रांत कुडाळ हल्लीं वस्ती मजरे क्षेत्र हरिपूर कसबे सांगली प्रांत मिरज स्वामी गोसावी यासी—सेवक गंगाधरराव गोविंद दिमत राजश्री पंत प्रधान नमस्कार सुा सन सबा मयातैन व अलफ शके १७२८ क्षयनाम संवत्सरे तुम्ही किले मिरज येथील मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, पेशजी सन इसने सबैनात आमचे तीर्थरूप महादेवभट यांनीं कैलासवासी गोविंदपंतनाना यांजपाशीं येऊन विनंती केली जे आम्ही कुटुंबवत्सल योगक्षेम चालला पाहिजे त्यास कसबे मजकुरी कृष्णातीरीं श्री संनिध ब्राह्मणास अग्रहार करून घ्यावयाकरितां आपण हुजूर श्रीमंतापाशीं विनंती करून जमीन नेमून घेऊन क्षेत्र हरिपूर वसविलें आहे. तेथें आम्हांस रहावयासी घर बांधून देऊन कुटुंबाचे योगक्षेमार्थ अग्रहारपैकीं कांहीं

नूतन इनाम जमीन करून दिल्हीया स्नानसंध्यादि षट्कर्मे आचरोन श्रीमंतांस व श्रीमंतांचे राज्यास अभिष्ट चिंतन करून सुखरूप राहूं. त्याजवरून क्षेत्रीं बांधोन देऊन कुटुंबाचे योगक्षेमास अग्रहारापैकीं साडेसात हाताच्या दोरीच्या मोजणीनें इनाम वहीत जिराईत जमीन काळी बिघे १० येकूण दहा बिघे जमीन नेमून दिल्ही त्याप्रमाणें चालत आहे. परंतु भोगवटीयास पत्रें नाहींत. यास्तव कृपाळू होऊन चतुःसिमापूर्वक पत्रें करून दिल्हीं पाहिजेत म्हणोन त्याजवरून मनास आणितां तुमचे वडील व तुम्ही थोर सत्पात्र तुमचें चालविल्यास श्रीमंतांस व श्रीमंतांचे राज्यास श्रेयस्कर जाणून तीर्थरूप कैलासवासी यांनीं क्षेत्रीं घर बांधून देऊन कुटुंबाचे योगक्षेमास अग्रहारापैकीं सदरहु दहा बिघे जमीन इनाम तुमचे दुमाला करून दिल्ही आहे. त्याचे चतुःसिमेचा जाबता आणविला ब्री तपसील—पूर्वेस रामचंद्रभट पंडीत यांचें इनामशेत; दक्षिणेस अंताजीराम खाडिलकर यांज कडे रयताविवाचें शेत; पश्चिमेस आंकलीस जावयाचा मार्ग; उत्तरेस हरभट चरणकर यांचें इनाम शेत; येणेंप्रमाणें दहा बिघे जमीन चतुःसिमापूर्वक कुलबाब कुलकानु हाल्ली पट्टी व पेस्तरपट्टी देखील इनाम तिजाई खेरीज हकदार व इनामदार करार करून देऊन तुम्हास हें पत्र सादर केलें असे तरी तुम्ही पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें क्षेत्रीं वास्तव्य करून इनाम जमीन अनभवून सुखरूप रहाणें. जाणिजे छ१२ माहे जिल्हेज बहुत काय लिहिणे" [मोर्तब सुद] मोठ्या शिक्यांतील मजकूर [श्री० गणपतीजयती श्रीमंत प्रधान चरणीं तत्पर गंगाधरराव गोविंद निरंतर]

महादेवभट आजगांवाहून मिरजेस आल्यानंतर गोविंद हरी यांजकडून हरिपूरक्षेत्रीं वास्तव्य करणेस घर बांधून घेऊन कुटुंबाचे योगक्षेमास दहा बिघे जमीन इनाम घेऊन राहिले. त्यांस पुत्र चार; श्रीधरभट, दिनकरभट, भास्करभट व चिंतामणभट; पैकीं चिंतामणभटास चिंतूमामा असें नांव पडण्याचें कारण, मिरजेचे किल्लयांतील वाड्यांत गोपाळराव पटवर्धन यांचें कुटुंब बाईसाहेब नांवें होतें. चिंतामणभट हे वाड्यांतून मधुकरी घेऊन जात असतां वाड्यांतील कुत्रें त्यांस चावलें. यामुळें चिंतामणभट रडूं लागले. वाड्यांतील पंक्तीची सर्व मंडळी बाहेर येऊन पहातात तों कुत्रें चावल्यामुळें व मधुकरी विटाळली यामुळें चिंतामणभट सारखा रडत आहे. पंक्तीची सर्व मंडळी बाहेर कां गेली तें पाहण्याकरितां बाईसाहेब बाहेर आल्या तों वरील सर्व प्रकार त्यांच्या दृष्टीस पडला. बाईसाहेबांनीं त्या मधुकऱ्यास [चिंतामणभटास] वाड्यांत नेऊन त्याची समजूत केली आणि जेवणास बसावेलें. बाईसाहेब यांनीं त्यांस वाड्यांत कायमचे ठेवून घेऊन त्याची जेवणाची वगैरे सर्व व्यवस्था करून हा आपला भाऊ आहे असें सर्वांस सांगितलें. तेव्हांपासून चिंतामणभटास " चिंतूमामा " असें वाड्यांतील सर्व लोक म्हणूं लागले. पुढें बाईनीं आपल्या सर्व किल्लया चिंतूमामांचे स्वाधीन केल्या आणि आपला सर्व कारभार त्यांचे स्वाधीन केला. पुढें कांहीं दिवसांनीं बाईसा-

हेच शरीरयात्रा सोडण्यास तयार जाहले वेळीं त्यांच्याजवळ असलेलें लाखों रुपयांचें जडजवाहीर वगैरे इष्टेट वामनराव बाळासाहेब सोनीकर यांचे हवालीं करावी अशी आज्ञा जाहली. चिंतामणराव आपासाहेब सांगली येथें रहात असल्यामुळें व त्यांचे वारस असल्या कारणानें द्रव्य आपणांस मिळावें, म्हणून हरिपुरावर स्वारी करून हत्तीकडून अंकलीवेश पाडवून आंत प्रवेश केला. परंतु चिंतुमामा यांनीं बाईची आज्ञा शिरसावंद्य मानून, बाईचें शव पालखींतून बाहेर काढतेवेळीं सर्व जवाहीर पालखींत ठेवून आपण स्त्रीवेष घेऊन त्या पालखी बरोबर गांवाचे बाहेर येऊन, बाईसाहेबांच्या शवाची सर्व व्यवस्था करण्यास दुसऱ्यास सांगून आपण तें जवाहीर घेऊन मिरजेस गेले. किल्लयांत वामनराव बाबासाहेब सोनीकर रहात होते त्यांचेकडे जाऊन तें जवाहीर त्यांच्या स्वाधीन केलें. हें कृत्य चिंतामणराव आपासाहेब यांना न आवडून त्यांनीं चिंतुमामांस कैद केलें. कैदेंतून मुक्त होण्यास कोणताच मार्ग उरला नाहीं. सबब त्यांचे वडील बंधु श्रीधरभट यांनीं गणपतीचे बागेंतील गणपतीस अनुष्ठान सुरू केलें.

एके वेळीं आपासाहेब सांगलीकर श्रीगणपतीचे दर्शनास आले. त्याबरोबर श्रीधरभट उठून उभें राहिले. तेव्हां उभें राहण्याचें कारण भटजींस विचारलें. भटजी यांनीं आमचे बंधूंस विनाकारण आपण तुरुंगांत घातलें, तेव्हां आम्हांस तरी उठून उभें राहिलें पाहिजेच !! असा जबाब दिला. त्यावेळीं आपासाहेबांनीं चिंतुमामांस सोडून दिलें. हें वर्तमान वामनराव बाबासाहेब सोनीकर यांना समजतांच, त्यांनीं बहुत सन्मानानें चिंतुमामांस आपलेकडे नेऊन, आपले दौलतीस त्यांच्याकडे पागेचें काम सांगितलें, व इतमामही दिला. पुढें सोनीकर यांचा बेदरी नांवाचा तालुका कर्नाटकांत असलेला त्याचा वसूल येत नसल्यामुळें चिंतुमामांस त्या तालुक्यावर जाणेस हुकूम दिला. चिंतुमामांनीं कांहीं बेरड व कांहीं शिपाई बदरीं ठेवून, तालुक्यांतील पुंड व गट्टीचोर वगैरे सर्व कैद केले. कांहीं फरारी झाले. तालुका पिकास लागला व वसूलही येऊं लागला. तालुक्यांतील ब्राह्मणांना इनाम जमिनी करून दिल्या. त्या अद्याप चालत आहेत. पुढें वामनराव बाबासाहेब सोनीकर वारल्यामुळें, इंग्रज बहादुरांनीं संस्थान सर [जप्त] केलें. बाळासाहेब सोनीकर यांना फक्त एक मुलगी होती. ती इचलकरंजीकर यांस दिली. सोनीकरीण बाई हरिपुरास वाड्यांत रहात होत्या. पुढें काशीयात्रेस गेल्यावर त्याही वारल्या. त्यांच्या शेऱ्या जमिनी त्यांच्या मुलीकडे अद्याप चालत आहेत. चिंतुमामांच्या वंशाकडे पागेकडील मळा अद्यापि चालत आहे. चिंतुमामांचे चिरंजीव गणेश; मुलगा पुरुषोत्तमभट हरिपूर येथील महादेवभटास दत्तक गेला. हल्लीं चिंतुमामांचे नातू चिंतामणी व विंचक नारायण हे सोनी येथें शेती करून आहेत.

हरिपूर येथील पुरुषोत्तमभट महादेवभट यांचे चिरंजीव दिनकरभट ऊर्फ नाना गोखले हे चांगले वैदिक आहेत. हे हल्ली सांगली येथेंच रहात आहेत. यांना दोन मुलगे आहेत. पैकीं वडील चिरंजीव महादेवभट हे वैदिक असून, कारपेंटरचे कामांतही हुषार आहेत.

धाऊलवल्ली येथील गोखले.

कोंकणांत राजापूर तालुक्यांत धाऊलवल्ली व धालवल अशीं दोन गांवें आहेत. त्या योगानें कोणी आपलें गांव धालवल, धालवली अथवा धाऊलवल्ली असेंही सांगतात. धाउलवल्ली हा गांव जैतापूरच्या समोर आहे. धाऊलवल्ली येथें जाण्यास जैतापूरवर उतरून पलतडी जावें, हा गांव सहा मैल लांब व तीन मैल रुंद इतका मोठा असावा. धालवल हा गांव कोलें या गांवाजवळ असून विजयदुर्ग खाडीवर आहे. आणि धाऊलवल्ली हा गांव जैतापूर खाडीवर आहे. धाऊलवल्ली येथें जो गोखले उपनामाचा पुरुष प्रथम आला, तो वेळणेश्वराहून निघोन प्रथम राजापूर प्रांतांतील ' साखर-गोटिवरें ' या गांवीं आला. नंतर कर्यात मिठगवणें, होळी. तळेखाजण पिरंदवण, मणचें मुटाट, पोंबुर्ले व गोवळ वगैरे गांवीं या घराण्यांतील पुरुषांनीं वस्ती केली. होळीहून दळें व धाऊलवल्ली येथें कोण पुरुष केव्हां गेले ती हकिकत, वेळणेश्वराहून प्रथम कोणता पुरुष कोठें आला, नंतर त्याचा विस्तार व कोण कोठें कसे गेले वगैरे सर्व हकिकत पुढें देत आहे.

" मुक्काम धाऊलवल्ली तालुके राजापूर जिल्हा रत्नागिरी या गांवची वसाहत शके १३४३ च्या सुमारास गोखले यांणीं केली. पूर्वी येथील वस्ती बहुतेक मुसलमानांचीच असून गांवची खोती व कुलकर्ण त्या जातींतील पुरुषांकडेच होतें. गोखल्यांचें मूळचें रहाण्याचें ठिकाण वेळणेश्वर मुक्कामीं असून त्या घराण्याची स्थिती साधारण होती. या घराण्यांतील पुरुषाचें व तेथील अन्य ब्राह्मण रहिवासी यांचें आपसांत बरें नव्हतें. कारण सदरील गोखले यांचा स्वभाव इतर लोकांप्रमाणें हांजी हांजी करून रहाण्याचा नव्हता. यामुळें त्या लोकांशीं यांचें पटेना. अर्थातच या सद्गृहस्थाचा त्या लोकांकडून हेवा होऊं लागला. एके काळीं त्या दुष्ट लोकांनीं या गृहस्थाची फजिती व्हावी म्हणून गांवोगांवच्या ब्राह्मणांस त्याच्या नांवच्या खोट्या आमंत्रणचिठ्या पाठवून सदर गृहस्थ घरीं नसतां सुमारें ७५ पाऊणशें ब्राह्मण याचे घरीं जमविले. ब्राह्मण घरीं येऊन बसले तरी यजमानाचा कोठें पत्ता नाहीं व घरीं तयारी कांहीं नाहीं, असें पाहून ब्राह्मणांसही मोठा अचंबा वाटला.

गोखले यांची पत्नी घरांत होती; तिलाही इतके ब्राह्मण न बोलावितां आलेले पाहून आश्चर्यच वाटलें. तिच्याशिवाय घरांत कोणीही नसून, गावांतील लोक-

तर दुरून मौजा पाहण्यास जणूंकाय टपून बसलेले होते. इतक्यांत परगांवीं गेलेले गोखले सुमारें दोन प्रहरीं बारा वाजतां घरीं परत आले, पाहतात तों इतके ब्राह्मण केवळ आपल्याकरितां वाट पाहात बसलेले त्यांना दिसले. त्यांनीं ग्रामस्थांचें हें कौटिल्य ओळखून प्रथमतः घरांत सामान कितीसें आहे वगैरे चौकशी केली. परंतु सामान पुरेसें नाहीं असें समजतांच, नजीकच्या वाण्याचे दुकानावर जाऊन जरूर असलेलें सामान त्याजकडून उधार आणिलें. स्वयंपाकाची तयारी होतांच ब्राह्मणांचीं पानें वाढून यथाशक्ति ब्राह्मणांना संतुष्ट केलें. हा वरील प्रकार व सदर गोखले यांची अप्रतीम ब्राह्मणनिष्ठा पाहून ब्राह्मणांसही हा विश्वासघाताचा प्रकार कळून आला, व त्यांणीं अगदीं मनापासून त्या यजमानास मंत्र म्हणून मंत्राक्षतानियुक्त असे आशीर्वाद दिले, व आपण जाल त्या ठिकाणीं विजयी व्हाल असें सर्व ब्राह्मणांनीं एकदांच सांगितलें व ब्राह्मण आपआपल्या घरीं निघून गेले. ब्राह्मणभोजनार्थ झालेली उचापत भागविण्याकरितां त्यांणीं असलेली थोडीशी इष्टेट विकून सर्व कर्ज भागवून त्या कुग्रामांतून वस्ती सोडिली. तेथून निघतांना गोखले यांणीं आपल्या 'खरे' या उपनांवाच्या उपाध्यास आपल्या बरोबर येण्यास सांगितलें. यजमानाची अशी विपन्न स्थिती पाहून अर्थातच त्यांणीं ती गोष्ट नाकारिली. पुढें खरे या पाशीं बापट या उपनांवाचे शिष्ये असत. त्यांना आपल्याबरोबर येण्याविषयीं विनंती केली. पण बापट यांची एकादशी दुसरी व गोखल्यांची पहिली. तेव्हां आपलें आश्रित आम्हांला कसें होतां येईल असा प्रश्न बापट यांणीं केला असता, त्या मानी व सत्यानिष्ठ गृहस्थानें आपण मज बरोबर येत असल्यास मी दुसरी एकादशी करीन असा विचार करून बापट यांना आपला उपाध्याय केला, व हे दोघे व गोखले यांची पत्नी अशीं तिघेंही देशांतरास निघालीं. ते सर्वजण राजापूर प्रांतीं 'साखर गोटिवरें' या गांवीं आले. तेथें त्यांणीं घर बांधून आपली वसाहत केली.

साखर हा गांव रावनाईक मराठ्याच्या ताब्यांत होता. कांहीं दिवस या गृहस्थांचे चांगल्या रीतीनें गेले. त्यांना चार मुलगे होऊन त्यांचे विवाहादिक जाले. व नंतर सदरील गोखले या घराण्याचा हा मूळ पुरुष निवर्तला. याच्या घराखालीं एक वोहळ होता. त्या वोहळाचा ओघ कातळ फोडून त्यामार्गें लावला. त्या ठिकाणीं शेत करण्याचा प्रयत्न या गोखले बंधुचतुष्टय यांनीं चालविला. ही बातमी या रावलोकांस समजतांच त्यांना मोठा राग आला व हे गोखले मोठे दीर्घप्रयत्नी व मोठे मानी असल्यामुळें केव्हां काय करतील याचा नेम नाहीं अशी भीतीही त्यांना उत्पन्न जाहली. म्हणून त्यांणीं त्या सर्वांस ठार मारिलें. त्यांच्या स्त्रियां पैकीं येक गरोदर होती ती मागें राहून, बाकीच्या तिघीजणी सहगमन करत्या जाहल्या. गरोदर असलेली ती साध्वी सदरील ठिकाणीं

राहणें फार धोक्याचें आहे असें पाहून कर्यात मिठगवणें तर्फ सौंदळ तो राजापूर या गांवीं पळून येऊन राहिली. मिठगवणें हा गांव मुसलमान लोकांचा असून अजूनही तेथें त्यांची अवलाद [वंश] आहे. त्यांचे कारकून भोगले [देसाई] होते. पुढें मुसलमानांचा जोर कमी होतांच, त्याचा देसाईपणाचा अधिकार भोगले यांणीं मिळविला. वरील गरोदर गोखले स्त्रीला पुत्ररत्न होऊन, त्यांचा वंश सुरू जाहला. पुढें या गोखल्यांनीं श्रीअंजनेश्वर याचें देवालय बांधिलें. अंजनेश्वराचें स्थान स्वयंभू असून अगदीं लगतच पीर आहे. या देवालयांतील पूजा गोखले स्वतःच करीत असत. यांची त्या गांवीं मामूल वहिवाटी प्रो माल· कीची जमीन होती. आपला चरितार्थ योग्य रीतीनें चालत नाहीं व देवाची पूजा मोडणेंही योग्य नाहीं असें पाहून त्याणीं श्रीअंजनेश्वराची पूजा लिंगाईत गुरवास सांगून त्यांना आपली जमीन दिल्ही; व आपण होळी या गांवीं येऊन राहिले. अद्यापि मिठगवणें गांवांतील श्रीअंजनेश्वराचे देवालयांत पहिली वसंत पूजा गोखले यांचीच आहे. देवास नारळ ठेवणें जाहाल्यास गोखले कुळांतील गृहस्थानें स्वतः ठेवून गाऱ्हाणें घालून [प्रार्थना करून] तो त्यानेंच फोडावा अशी चाल चालली आहे. बाकीच्यांचा नारळ गुरव ठेवितो, व गाऱ्हाणें घालितो, व नारळ फोडिला जात नाहीं; व नारळ फोडणें जाहल्यास गुरवाशिवाय दुसरें कोणास फोडण्याचा अधिकार नाहीं.

* भोगले यांच्या पूर्वजांनीं जसा देसाईपणा बळकाविला; तसेच त्यांचे वंशज हल्लीं मिठगवण्यास असलेले भोगले देसाई यांनीं श्रीअंजनेश्वराचे देवालयांतील जो मुख्य मान गोखल्यांचा तोही लाटण्याचा प्रयत्न चालला आहे. या भोगले देसायांच्या जवळ जुने कागदपत्र खात्रीनें असावेत असे वाटतें ! परंतु एकार्थी आपलें कृत्य उघडकीस न यावें म्हणून कदाचित् जुन्या कागदपत्रांचा निकालही केला असावा. वास्तविक पहातां त्यांत वाईट असें कांहींच नाहीं. राष्ट्राच्या घडामोडीचे काळांत असा एक वेळ येतो कीं, त्यावेळीं ज्याला जें साध्य होईल तें त्यानें करावें; अशी जगरहाटीच आहे.

होळी मुक्कामीं आल्या नंतर गोखल्यांनीं बरीच वर्षें तेथें राहून तेथील खोती व कुलकर्ण मानपान मिळविले.देवस्थापना केली व येथें त्यांचें बरेंच कुटुंब वाढलें.व म्हणून त्यांच्यापैकीं, कांहींनीं मुक्काम मजरे दळें तेथें वसाहत करून तेथील खोती व कुलकर्ण मानपान वगैरे मिळविलें व देवस्थापना केली. तसेंच कांहींजण तळे· खाजण–पिंरदवण, मणचें·मुटाट, पोंबुर्ले व गोवळ वगैरे गांवीं जाऊन वसाहत केली· प्रसिद्ध बापू गोखले हे गृहस्थ मुक्काम पिरंदावण येथील असून यांणीं श्री मल्लिकार्जुन नामक देवालय बांधिलें तें अद्यापि आहे. व होळी मुक्कामाहून बाब· देवमानी नामक गोखले सहज धाऊलवल्ली येथें पाराबर आले. तेथें मुसलमान लोकांची वस्ती होती. खाडीच्या कांठीं येक मुसलमानीन स्त्री बहिर्दिशेस

गेली होती. पण या गृहस्थास पाहून तिला याच्या जाण्याची वाट पहात बसावें लागलें. कांहीं वेळ गेला तरी हा बामण उभा राहिलेल्या ठिकाणाहून हालत नाहीं, असें पाहून त्रासून त्याला ऐकायाला जाईल अशा उंच स्वरानें " भटाचीं पाळेंमुळें जर्मनींत गेलीं आहेत." असें म्हणाली. हाच शुभ शकून असें मानून यांणीं त्याच ठिकाणीं आपल्या घराचा पाया खणण्याचा निश्चय करून हातांतील काठीवजा असलेल्या पाहारीनें खूण केली व होळी मुक्कामीं परत गेले. पुन्हां धाऊलवल्ली येथें येऊन त्याच ठिकाणीं घर बांधून वसाहत केली. सदरील बाबदेवमानी निवर्तल्यावर त्याचे चिरंजीव पोमदेवमानी यांणीं धाऊलवल्ली गांवासंबंधीं इत्थंभूत माहिती मिळविणेचा प्रयत्न चालविला. त्यावेळीं जिकडे तिकडे जंगल होतें. व मधून कोठें कोठें वस्ती होती. जंगल वाढल्यामुळें सर्व घरें येकदम दिसणें कठीण होतें. म्हणून या गांवाची सीमा तरी कोठें संपते हेंही समजणें वरील मानी यांस फार त्रासाचें वाटूं लागले. तेव्हां त्यांणीं सड्यावर (सडा म्हणजे डोंगरावरील माळजमीन. कोंकणांतील वस्ती बहुतेक दोन डोंगरांच्या खोऱ्यांत त्याच्या पायथ्याशीं असते. व डोंगराच्या माथ्याला धार असें म्हणतात. व धारेच्या पलीकडील जी सपाट जमीन तिला सडा म्हणण्याचा प्रघात आहे.) जाऊन दोन्ही डोंगर यांच्या मधील झाडींत जेथें जेथें धूर दिसेल त्या त्या ठिकाणीं जाऊन तेथील वस्ती क्रमानें पाहूं लागले.

प्रथमतः मारवेलीस गेले. देवाचें—गोठणें व धाऊलवल्ली यांच्या दरम्यान एक ओझरचा वाहाळ आहे. त्या लगत धाऊलवल्लीचे हद्दींतील वाडीस मारवेल असें म्हणतात व गोठण्याचे हद्दींतील वाडीस करवेलें म्हणतात. त्या ठिकाणीं मारवेलकर गोखला, काळा, कान्हेरा, पडवेकर, बापट व परांजप्ये अशीं घरें असून पुरुखाचे देवळानजीक मुसलमानांची वस्ती होती. परांजप्ये यांस गांवखडीहून बाळाजी दादाजी काळे यांणीं उपाध्ये म्हणून आणिलें. याच वाडीस पूर्वी ऐनापूर असें म्हणत. प्रस्तुतच्या श्रीविश्वेश्वराचे देवालयानजीक वाहाळाच्या पूर्वेस चौगुला, आंबलेकर, मोऱ्ये यांचीं घरें होतीं. (चौगुले, आंबलेकर व मोऱ्ये हे जातीचे कुणबी होते) व प्रस्तुतच्या नवलादेवीच्या देवळाजवळ पूर्वतडीस मुसलमान लोकांची वस्ती होती. अद्यापिही त्या ठिकाणच्या रस्त्यास जोडयाची पालंद असें म्हणतात. (पालंद म्हणजे जाण्यायेण्याचा रस्ता) मुसलमान लोकांचीं थडगींही सुमारें चारपांचशें वर्षांचीं जुनीं अद्यापि आहेत. प्रस्तुत ज्या ठिकाणीं न्हाव्यांचीं घरें आहेत त्या ठिकाणीं कासाराचें घर असून तेथील एका जुनाट आम्रवृक्षास अद्यापि कासार—आंबा असें म्हणतात.प्रस्तुतच्या भंडारवाडयांत मिराशी याचें घर होतें. (मिराशी म्हणजे भंडारी) म्हणूनच त्याला भंडारवाडा असें म्हणतात. तेथेंच एक चांभाराचें घर होतें, प्रस्तुतच्या दाते यांच्या ठिकाणाजवळ पूर्व बाजूस घवड याचें घर होतें, तेथें वाहाळी आहे तीस घवडवाहाळी असें अद्यापि

नांव आहे. मिरवण्यांत मिराशी व मुसलमान यांची वस्ती होती. मुसलमानांच्या ठिकाणास सिलमाचें ठिकाण असें म्हणण्याचा प्रस्तुतचा प्रघात आहे. कारण त्या मुसलमानाचें आडनांव सिलीम असें होतें. नजीकच गिज्म म्हणून एका शूद्राचें घर होतें. आतां नदीच्या मावळततडीची माहिती मिळविली ती अशीः–– प्रस्तुत श्री विश्वेश्वराचे देवळापासून तों प्रस्तुत देवीच्या घांटीपर्यंत म्हारांचे ठिकाण होतें. त्यांचीं घरें देवीच्या देवळाचे वरचे बाजूस होतीं; व अजूनही आहेत. काळे यांचे घरानजीक म्हाराचे सतीची जागा आहे. रावण आडनांवाचा कुणबी रावणाच्या आळीपाशीं रहात असे. पुढें घडावांच्या ओळीनजीक घडंबा नाईक शूद्र राही. प्रस्तुतच्या वरचे वठारी जुवाड या ठिकाणाजवळ जो वाहाळ आहे, त्यानजीक धुळप रहात असे. व त्या वाहाळास धुळपाचा वाहाळ असें म्हणतात. यापुढें आडीत गौळी रहात असे. त्यांचें घर प्रस्तुतच्या (गणाबिन बाळा सोडया) याचे घरानजीक असे तेथें बरीच मोठी शिला आहे तिला गवळ्याची धोंड असें म्हणतात. असा तपास स्वतः मानी यांनीं लाविला. पाण्याची वगैरे विपुलता आहे. व ब्राह्मणवस्तीस योग्य अशा ठिकाणीं ब्राह्मणेतरांची वस्ती असलेली पाहून ब्राह्मणवस्ती वाढवणेची खटपट त्यांणीं सुरू केली व त्या वेळीं येथें वस्ती करून राहिलेल्या सर्व हिंदु लोकांचे सहाय्य घेऊन खोत व कुलकर्णी मुसलमान यांचा पाडाव केल्यावांचून आपला हेत [हेतू] अक्षरशहा सिद्धीस जाणार नाहीं. ही गोष्ट सुद्धां त्याच्या लक्षांत आली, व तदनुरूप त्यांणीं प्रयत्न चालविला. इतक्यांत त्यांचे कनिष्ठ बंधु विठ्ठल मानी हेही आपला इस्टेटीवर हक्क सांगून वांटणी मागूं लागले. तेव्हां त्या पारावरील घर व गांवचा तिसरा भाग त्यास दिला. पूर्वी त्या ठिकाणीं इसला देवीचें एकच देवालय असून व मारवेलच्या बाजूस पुरुख म्हणजे म्हाराचा देव यांचें देवालय होतें.

पुढें गोखले मानी हे आपला अम्मल बसवीत क्रमानें वर वर येऊं लागले. नंतर श्री नवलादेवीचें देवालय बांधोन त्यांत इसला देवीचें मत मिळवून घेऊन देवीची स्थापना केली. बहुतेक मुसलमानांचा मोड जाहला, तरी प्रस्तुतच्या नारायण हरी वेलणकर यांच्या घराजवळील खोत व कुलकर्णी मुखरीया आडनांवाचा मुसलमान महान बलाढय होता व तो युक्ति प्रयुक्तीनें आपणास लवकर हटत नाहीं असें पाहून, त्याचा कारकून जोग या उपनांवाचा ब्राह्मण असे; त्याला धार्मिक उपदेशाच्या गोष्टी व ऐहिक फायद्याचीं वचनें देऊन, मानी यांणीं आपल्याकडे वळवून घेतला. श्री नवलादेवीचे देवळांत हा मुसलमान जोडयाच्या पायांनीं कोणाची परवा न करतां दर्शनाच्या मिषानें यांना चिडवण्याकरितां रोज जात असे. ही गोष्ट मानी यास सहन न होऊन त्यांणीं श्रीस कऊल (प्रसाद) लाऊन त्याच्या पारपत्त्याचा उपाय विचारला. देवीनें " त्याला खालीं पाडा म्हणजे मी पुन्हां त्याला वर उठूं देत नाहीं. " असें सांगितलें, कऊल अथवा प्रसाद म्हणजेः—

(देवीच्या आंगास पाण्यावर डावे उजवे बाजूस छातीपासून कमरेपर्यंत पांच पांच तांदूळ चिकटवितात. व त्यांतून दोन्ही कडील मधला तांदूळ पडणें हें इष्ट आहे.) त्यावर श्री देवी समोर खाली जमीनीवर (म्हणजे देवीचे चौकावर) हरभरे घालून त्यावर डाळी (चटई) हातरली. मुसलमान मजकुराची रोजची वेळ होतांच तो नेहमी प्रमाणें जोडयाचे पायानें छाती वर करून मोठया ऐटीनें देवळांत शिरला व त्या चटईवर पाय देतांच पाय निसरून खालीं पडला व तो पुन्हां उठला नाहीं, त्याला लोकांनीं उचलून घरीं नेले व लागलाच तो मरण पावला, कांहीं दिवसांनीं सर्व गांवांत अम्मल बसवून खोती कुलकर्ण आपणाकडे घेऊन पाहिले कारकून जोग* यांचे कडेस कारकुनींचें काम सांगितलें, व पोमदेव मानी निजधामास गेले.

पोमदेव मानी यांस बायका दोन; वडील स्त्रीस दोन मुलगे. वडील बाबदेव व कनिष्ठ विसमानी; [विसमानी] यांच्या घराण्यास वडील घराणें म्हणतात. विसमानी यांणीं श्री विश्वेश्वराच्या मंदिरानजीक नदीचे पलीकडे पूर्व बाजूस चौगुल्याचे ठिकाणांत घर बांधोन वसाहत केली. यांच्याच वंशजास पेलतडकरी असें म्हणतात. व बाबदेवमानी यांणीं वरचे वठारीं घर बांधिलें. व त्यांच्या वंशजांस वरचे वठारकरी म्हणूं लागले. दुसऱ्या स्त्रीस जुळे दोन पुत्र; वडील दादमानी मधले वठारकरी यांणीं मधील वठारांत घर बांधिलें. कनिष्ठ महादेवमानी मिरवणेकर यांणीं मिरवण्यास घर बांधिलें. असें करण्याचा हेतु प्रत्येक वठारांत गोखल्यांचें घर असणें हा होता. पोमदेव हे वारल्यानंतर कारकून जोग हेच खोतीचें काम पहात असत. व कांहीं दिवसांनीं त्या कामावर ते आपला हक्क सांगूं लागले. त्या [कडोन] ह्या बंधुचतुष्टय यांणीं त्याजवळून कागदपत्र हिसकावून घेऊन, त्यांना हांकून लाविलें. पोमदेव मानी यांपासून नाटे मुक्कामच्या

---

* धाऊलवल्ली येथें विद्यमान जोग यांचा वंश आहे. याच वंशांतील रा. रा. बाबासाहेब जोग रिटायर्ड स्टेट कारभारी संस्थान जव्हार हे पुणें येथें सदाशिव पेठेंत स्वतःचे घरांत रहात आहेत. त्यांच्या आज्यांनीं " धाऊलवल्ली येथें गोखले केव्हां आले व आपले पूर्वज यांच्याजवळ कारकून होते वगैरे हकिकत लिहून ठेविलेले विश्वसनीय जुने कागद " रा. रा. बाबासाहेब जोग यांनीं या लेखकास दिले. सदरहु विश्वसनीय माहिती प्रमाणें, धाऊलवल्लीस या लेखकास माहिती उत्तम मिळाली. रा. रा. बाबासाहेब जोग यांनीं आपल्या जवळील जुने कागद या लेखकास देऊन ऐतिहासिक अभिमान व्यक्त केल्याबद्दल लेखक त्यांचा फार फार आभारी आहे. ज्यांच्याजवळ जुने ऐतिहासिक कागद असतील त्यांना परमेश्वर वरीलप्रमाणें सद्बुद्धी देवो !

श्रीनाटेश्वरास पूजा घेऊन जाण्याची त्यांची वहिवाट होती. ती वहिवाट सुमारें पन्नासपाऊणशें वर्षें अव्याहत चालू होती. पुढें कांहीं कारणानें नाट्याचे कऱ्हाडे ब्राह्मणांनीं या गोखल्यांशीं तंटा केला व या चिपट्या लोकांनीं आम्हांस त्रास दिला असें स्पष्ट बोलून दाखविलें. ही गोष्ट या गोखल्यांच्या मनास लागून त्यांणीं श्रीविश्वेश्वराचें देवालय बांधण्याचा निश्चय करून गांवीं आले व देवळाचा पाया घातल्या शिवाय अन्नस्पर्श करायचा नाहीं असा निर्धार केला. आणि त्याच रात्रीस गोखले यांस दृष्टांत जाहला कीं, ज्या ठिकाणीं तुम्ही आहांत तेथें मी आहें. असा दृष्टांत जाहला. नंतर प्रस्तुत देवालयाची जागा सर्व गांवास मध्यवस्ती आहे असें पाहून त्या ठिकाणीं देवालय बांधणेंस सुरवात केली. पण नाटेश्वरास जात होते. तेव्हां धाऊलवल्लीची कोकरीकडील गोवर्धनीचे वाहाळाचे बाजूची कांहीं जमीन नाटेश्वरास तोडून दिली ती अद्यापि नाटे गांवाकडे चालू आहे." (नाटेश्वर हा देव स्वयंभू आहे.)

धाऊलवल्ली येथें असलेले विद्यमान रा. बाळाजी महादेव गोखले, यांचे आजे मोरो दामोदर गोखले यांनीं आपल्या घराण्याविषयीं लिहून ठेविलेल्या माहितीचें टिपण पुढीलप्रमाणें:—" गोखले माहाजनी हे मजरे होळीहून ठिकाण पार येथें राहिले. त्याचे पूर्वी होळी येथें सात हिशाचे मालक व त्याचे पूर्वी मिठगवणें येथें होते. त्याचे पूर्वी मौजे साखर येथें व अगोदर वेळणेश्वर मूळ ठिकाण. धाऊलवल्ली गांवीं आले तेव्हां सांबाचें देऊळ नाहीं. श्रीनवदुर्गा व श्री असलादेवीचीं देवालयें होतीं. व श्रीब्रह्मदेव हा जुवाडांत होता. तेथून आणून श्री असलादेवी लगत स्थापना जाहली. गांवची मंडळी नाटें येथें श्रीदेव नाटेश्वरास जात होती. तेव्हां श्रीदेवास कोकरीची जागा गोवर्धनी पर्यापर्यंत होती. नंतर नाटे येथें मंडळी गांवची थोडी व धाऊलवल्ली येथील बहुत मंडळी सबब नाटेकर व धाऊलवल्लीकर यांचा [श्री नाटेश्वरास] पाणी घालण्याच्या कलशावरून तंटा जाहला. तेव्हां पोमदेव माहाजनी यांनीं देवालय [धाऊलवल्ली] येथें बांधावयाचें बोलले. त्यास मंडळींनीं अनुमोदन देऊन देवाची प्रार्थना करून आसोल्या नारळावर आम्हावर कृपा आहे ती द्यावी. पूजेस हाल्लीं लिंगायत गुरव आहेत हे नाटे येथील लिंगाईताचा भाचा मुडगे येथून आणला. देवाचें लिंग साळशी महाल येथून आणून स्थापना होईपर्यंत माहे तीन लागले. तेथपर्यंत पोमदेव हे निराहार उपोषणें करीत होते.

वाडा मारवेल धाऊलवल्ली नजीकचे गोखले व काळे व कान्हेरे व बापट व परांजपे; पैकीं, चार असामी कुवेशीहून आले. त्यांस जागा नेमून दिल्यावर परांजप्ये मौजे आडिवरें येथून आणून काळे यांनीं रहाण्यास ठिकाण दिल्हें, व ऋग्वेदी उपाध्या नाहीं सबब आपले घरचे चालवणुकेस दिल्हें. पूर्वी मौजे गोठणेदेवाचें या गांवीं ग्रामउपाध्या चितळा होता. तो धाऊलवल्लीस वहिवाट करीत

होता. जोग हे नांदिवडें येथून आले. त्यांस रहाण्यास जागा गौळी याचे ठिकाणा-पैकीं दिल्ही. व बापट यांसी पूर्वी गौळी याणें ठिकाण दिल्हें. बापट प्रकरणें चार; पैकीं पुराणिक बापट यांचा वंश नाहीं, सबब त्यानें आपलें वतन उपाध्ये बापट यांस दिलें. उपाध्ये बापट हे होळीहून बरोबर आणिले. व नवा बापट हा पांचस माहालांतून आला. त्यानें काडवींचें ठिकाण खरेदी घेऊन राहिला. दाते हे मौजे आडिवरें येथील, तो पुरुष ब्रह्मचारी आणि विद्वान त्याला मुलगी नार माहाजनी गोखले यांनीं दिल्ही; आणि कुळंबावा आंदण दिला. सिवरामभट दाते मौजे आडिवरें येथील ठिकाणें दोन रामाजी विठ्ठल यांचे वडिलानें देऊन दानपत्र करून दिल्हीं आहेत. आपटे हे मौजे गोठणें–देवाचें येथील यांस गिज्माचे-कुणबावा पैकीं ठिकाण देवाविलें. आडीतील ठिकाण गवळ्यांपैकीं देवविलें. वेलणकर हे मौजे वाडें तर्फे खारेपाटण येथून आले. त्यांस ठिकाण धोपेभट करमवेळकर यास रहाण्यास जागा दिल्ही, त्यास बरें भागीना सबब तें ठिकाण वेलणकर यास दिल्हें. पैकीं खालील वेलणकर हे वरील वेल-णकर यांचे विभागी, पैकीं वरचे वेलणकर यांचें कुटुंब मोठें आणि इनाम-तीशिवाय पैसा उत्पन्न करणारा कोणी नाहीं. सबब वरील भावाकडे इनामत चालवून स्वतः इनामत मिळविली, त्यास ठिकाण मोरणीचें; मोरीण म्हणजे वाणीण त्याजबाबत ठिकाण वेलणकर यास चार विभागीं यांणीं दिल्हें. तें गोखले पोमदेव यांचे वंशांतील. परांजपे हे मारवेली येथून गांवांत येऊन राहिले. त्यांस ठिकाण खरेदी पारकर गोखले यांणीं मोरणीचें ठिकाण दिल्हें त्याचे रुपये तीस. नेने माहाजन हे मजरें दळें कर्यातमिठगवर्णे येथून आले. व भुस्कुटे हे मिठगवर्णे येथून आले. बोडस हे मौजे पडेल तर्फ खारेपाटण येथुन आले. दामले माहाजन हे मौजे सागवें येथून आले. त्यांस जागा मोरणी पैकीं दिल्ही. आपटे हल्लीं वसा-हत पालगडास आहे; हे मौजे गोठणें–देवाचें येथील. भिडे, हे आडिवरें येथून आले. ते सर खोताचे तक्षिमदार. करंदीकर हे मजरें कुवेशीहून आले. रानड्ये हे सावंतवाडीहून आले. "

सदरहु माहिती आणि जोग यांची माहिती या दोन्हींमध्यें बरेंच साम्य आहे.श्री विश्वेश्वराचे देवळांतील एका लांकडी तुळवटावर एका सुतारानें लेख कोरला आहे. तो लेख पुढीलप्रमाणें:–"श्री शके १६५१ राक्षस नाम संवत्सरे फाल्गुन शुा ८ इं दुवारें तदिने देवालय श्रीविश्वेश्वराचें कर्ता राजश्री पोमदेव माहाजनी;प्रस्तुत जिर्णो द्धार प्रपौत्र महादेव माहाजनी, अनंत माहाजनी, विस माहाजनी, नान माहाजनी, कृष्ण माहाजनी, बाबदेव माहाजनी बाबदेव महाजनी व महादेव माहाजनी पार-कर हजरबंद कानसुतारे वाड्ये. " तुळवट उलटे बसविल्यामुळें लेख उलटा झाला आहे. शके १७६४ त देवळापुढील सभामंडप बांधण्याचें काम, विद्यमान घाऊलवल्ली येथें असलेले रा. बाळाजी महादेव गोखले यांचे आजे मोरो दामो-

दर गोखले यांनी सुरू करून, शके १७६८ त पुरें केलें. यांनीं स्वतः अंगमेहनतीनें व द्रव्य खर्चून आणि लोकांच्या मदतीनें हें काम केलें.

धाऊलवल्ली येथील गोखले यांचे देव.

१ श्री वेळणेश्वर. [वेळणेश्वर गांव.]
२ श्री नवदुर्गा [नवलाई] धाऊलवल्ली.
३ श्री पुरुख [माहाराचा देव] धाऊल०,
४ श्री भरतदुर्गा [भराडीण] होळीगांवची.
५ श्री असलादेवी—धाऊलवल्ली.
६ श्री ब्रह्मदेव— ,,
७ श्री शिमरादेवी. धाऊल०
८ श्री जाखादेवी. ,,

नदीपलीकडील गोखले 'जाखादेवी' स मानतात.

बाबदेव मानी हा होळीहून शके १३४३ त धाऊलवल्ली येथें आला. म्हणजे आजला या गोष्टीस पांचशें वर्षें झालीं. त्यापूर्वी मिठगवणें येथें बाबदेव मानी यांचे पूर्वज रहात होते. त्याचेही पूर्वी साखर गांवीं सुमारें अर्ध शतक तरी होतेच वेळणेश्वराहून साखर–गोटिवरें येथें आले. वेळणेश्वर येथें किती पिढ्या होते हें समजणें शक्य नाहीं. परंतु जो पुरुष प्रथम साखर गांवीं आला, त्याची वस्ती वेळणेश्वर येथें ३०।४० वर्षांची होती. मिळून एकंदरींत पहातां, वेळणेश्वर, साखर, मिठगवणें नंतर होळी; या चार गांवांतील या गोखले घराण्याची वस्ती तीनशें वर्षांपेक्षां जास्त असली पाहिजे. आपण कमींत कमी तीनशेंच वर्षें धरूं ! हीं तीनशें आणि धाऊलवल्लीची वस्ती पांचशें वर्षांची मिळून आठशें वर्षांपासून गोखले घराणें प्रसिद्ध आहे. आतां वेळणेश्वराहून निघून साखर, मिठगवणें, नंतर होळी; याप्रमाणें गोखले यांनीं वस्ती केली. होळी या गांवीं या घराण्याचा मोठा विस्तार झाला. आणि होळी या गांवाहूनच कोंकणांत इतर गांवीं गेले. आणि त्या ठिकाणीं विशेष विस्तार झाल्यावर तेथून देशावर निरनिराळ्या ठिकाणीं येऊन वसाहत केली. पेशवाईचे पूर्वी ह्या गोखले घराण्यांतील पुरुष देशावर फार थोडे आले. शाहू छत्रपतीचे अमलांत व पेशवाई अमलांत हें गोखले घराणें देशावर विशेष आलें.

धाऊलवल्ली येथें बाबदेव माहाजनी गोखले यानें प्रथम वस्ती केली. नंतर बाबदेव यांचे चिरंजीव पद्माकर ऊर्फ पोमदेव गोखले या पुरुषानें धाऊलवल्ली या गांवीं वसाहत वाढवून सगळा गांव आपले ताब्यांत घेऊन खोती व कुलकर्ण आपलें ताब्यांत घेतलें. हें वरील माहितीवरून सिद्ध होत आहे. पोमदेव मानी हा पुरुष या गोखले घराण्यांत अत्यंत धूर्त, धाडसी, पराक्रमी व धर्माभिमानी होता. याच्या पुण्यप्रतापानें पुढें यांचे वंशांत मोठमोठे पराक्रमी व धर्माभिमानी पुरुष निर्माण झाले. आणि त्यांनीं ऐतिहासिक कालांत आपल्या बाहुबलानें

सर्वांस आश्चर्यचकित केलें. इतिहासांत पोमदेवानें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. वेळणेश्वर येथील ह्या घराण्याचा मूळ पुरुष मोठा धर्मात्मा, सत्पुरुष व सत्वशील होऊन गेला. घाऊलवल्ली येथें या घराण्यांतील बाबदेव पोमदेव यांच्या वंशांतील शिवाजी राम, हरी राम व विठ्ठल राम या त्रयमूर्तींनीं पेशवाईत स्वाऱ्या शिकाऱ्या करून द्रव्यसंचय बहुत केला. हार्दा, टेंभुर्णी व खांडवा या गांवीं लष्करांत होते. विठ्ठल राम गोखले यांनीं घाऊलवल्ली गांवांत लोकोपयोगार्थ लाखों रुपये खर्चून मोठमोठ्या घांट्या चिरेबंदी बांधिल्या. ५०।७५ अश्वत्थाचे पार बांधिले. मिठगवण्यास पूल व घांटी बांधिली. यांचे वंशज हल्लीं घाऊलवल्ली येथें शेतीवाडी करून आहेत. तसेंच टेंभुर्णी व खांडवा येथेंही वंशज आहेत. खांडवा येथें इनामी उत्पन्न आहे. विठ्ठल व रामचंद्र वासुदेव आणि कृष्णाजी आत्माराम हे घाऊलवल्ली येथें आहेत.

भास्कर नान माहाजनी हे बऱ्हाणपूर येथें भुस्कुटे यांचे घरीं कांहीं दिवस दिवाण होते. नंतर हे कोंकणांत घरीं आले. ते घरींच वारले. भास्करपंताचे दोन मुलगे चिमणाजी व लक्ष्मण; चिमणाजीला कांहीं संतान नव्हतें. लक्ष्मणराव यांना दोन मुलगे; एक व्यंकटेश व दुसरा बळवंत. व्यंकटेशपंतांना हर्दा परगण्याचें काम पाहण्याकरितां भुस्कुटे साहेबांनीं त्यांना हर्दा मुक्कामीं ठेविलें. व बळवंतराव यांना टेंभुर्णीत टेंभुर्णीचें काम पाहण्याकरितां ठेविलें. कांहीं दिवसांनीं बळवंतराव बऱ्हाणपुरास परत गेले व तेथें वारले. बळवंतराव यांचा मुलगा लक्ष्मण हा लहान असल्यामुळें, चुलते व्यंकटेश यांनीं त्याला हर्द्यास नेलें, व्यंकटेशपंतांना एक मुलगा होता त्याचें नांव विनायकराव; हे कांहीं दिवस बडोद्यास खजिनदार याचे मुख्य कारकून होते. बडोद्यास खंडेराव गायकवाड यांच्या कारकीर्दीत जी गडबड झाली; त्यावेळीं हे परत हर्दा येथें येऊन राहिले त्यांना एकच मुलगा. ते नारायण विनायक हे हल्लीं हर्दा मुक्कामीं आहेत. यांना एक हरी नांवाचा मुलगा आहे. लक्ष्मणराव यांचे चिरंजीव वामनराव ह्यांनीं हर्दा मुक्कामीं बरींच वर्षें खासगी कारकुनाचें काम केलें. हल्लीं खांडवा येथें आपल्या मुलांजवळ असतात. यांना पुत्र पांच; गोपाळ, केशव, रघुनाथ, दिनकर व महादेव; गोपाळराव हे नागपूर येथें सेटलमेंट डिपार्टमेंट मध्यें नोकर आहेत. केशवराव व रघुनाथराव हे नोकर आहेत. दिनकरपंत हे बी. ए. एल्. एल्. बी. असून खांडवा येथें वकिली करीत आहेत. भास्कर गोपाळ हे बी. ए. च्या क्लासांत आहेत.

रामचंद्र ऊर्फ बाळाजी गणेश हे कोची येथें आहेत. विष्णु निळकंठ हे मुंबई येथें जनरल पोष्टांत नोकर आहेत. यापूर्वी हे रेवदंडा येथें मिशन स्कूल मध्यें दाहावर्षें मास्तर होते. यांचे आजे चिंतामण शंकर हे कोंकणांतून प्रथम रोहें येथें मेहेंदळे यांचे कडे आले. यांनीं रेवदंडा हें रहाण्याचें ठिकाण केलें.

यांचे चिरंजीव नीलकंठ यांनीं रेवदंडा येथें घर बांधिलें. निळकंठ हे व्यापार करीत होते.

विस माहाजनी यांचें वंशांतील विस माहाजनी यांचे पणतू केसो नारायण हे देशावर गेले. बऱ्हाणपूरचे भुस्कुटे यांचे मूळपुरुष रामचंद्र व नारो बल्लाळ भुस्कुटे हे बंधु बऱ्हाणपूर येथें रहात होते. पैकीं रामचंद्र बल्लाळ यांस केसोपंत गोखले यांची बहीण दिली होती. भुस्कुटे यांच्या पुरुषाबरोबर केसोपंत हे घाटावर आले होते. पूर्वी शिंदे यांच्या ताब्यांत बऱ्हाणपूर प्रांत होता. त्या वेळीं केसोपंत यांना इनाम मिळालें आहे. केसोपंत गोखले यांनीं खांडवा येथें वाडा बांधिला आहे. तोच विद्यमान खांडवा येथें असून त्याच वाड्यांत केसोपंतांचे पणतू कृष्णराव सदाशिव हे रहात आहेत. यांचें इनामी उत्पन्न अदमासें पांच हजारांचें आहे. यांचे वडील सदाशिवराव लक्ष्मण गोखले यांचा लौकिक अद्यापि खांडवा येथें सर्वतोमुखीं ऐकूं येतो. सदाशिवराव खरे दानशूर व सरदारी बाण्याचे होते. या घराण्याची हकिकत कागदपत्रांवरून चांगली मिळाली असती ! परंतु कृष्णराव यांनीं कागदपत्र न दाखविण्याची व या पुस्तकास वर्गणीदार सुद्धां न होण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यामुळें कांहीं माहिती मिळाली नाहीं.

विस माहाजनी यांस चार मुलगे; गोविंद, नारायण, विठ्ठल व दादो; गोविंद यांच्या वंशाची माहिती वर दिलीच आहे. आतां नारायण यांचा वंश हल्लीं चांदवड व धाऊलवल्ली येथें आहे. नारायणाचे पणतू पांडुरंग; पांडुरंग यांचे नातू विसाजी व मोरो गोविंद हे वयोवृद्ध बंधु धाऊलवल्ली येथें आपल्या घरीं आहेत. पांडुरंग विनायक हे बी. ए. एल् एल्. बी. असून हायकोर्टांत अपिलेट साईड मध्यें नोकर आहेत. पांडुरंगपंत हे गोकुलदास तेजपाल हायस्कुलांत होते. पुढें वुईलसन कालेजांत बी. ए. पर्यंतचा अभ्यास करून १९०३ मध्यें बी. ए. झाले. नंतर हायकोर्टांत नोकरी धरली. नोकरी संभाळून १९०९ सालीं एल्. एल्. बी. झाले.

नारायण विस माहाजनी यांचे नातू विठ्ठल बावदेव होत. विठ्ठल बावदेव यांचे नातू मोरो दामोदर यांनींच श्री विश्वेश्वराचा सभामंडप बांधिला. यांचे नातू सद्दा; पाहिले बाळाजी माहादेव यांनींच लेखकास कांहीं माहिती दिली. हे शेती वाडी करून धाऊलवल्ली येथेंच आहेत. यांचे बंधु कृष्णाजीपंत हे मुंबई येथें सावकारी नोकरीवर आहेत. नारायणराव जी. आय. पी. रेलवेंत नोकर आहेत. गोविंदराव नॅशनल बँकेत नोकर आहेत. आणि विष्णुपंत देवगड येथें शाळा मास्तर आहेत.

विठ्ठल विसाजी यांचे वंशजांपैकीं, विश्वनाथ रामचंद्र हे जिा कुलाबा, ता. अलिबाग पैकीं मौजे नवखार येथें आहेत. विश्वनाथराव यांच्या वडिलांनीं

इकडे शेती संपादिली. विश्वनाथराव हे शेती करून आहेत. यांचें उत्पन्न घाऊलवल्ली येथेंही आहे. दत्तात्रय विनायक हे मुंबई येथें असतात. केशव अंताजी हे माटुंगा येथें आहेत, दत्तोपंत व केशवराव यांचीं घरें व शेती घाऊलवल्ली येथें आहे.

सासवड येथील गोखले.

दादो विस महाजनी यांचे नातू सदाशिव नागेश ऊर्फ बापूराव गोखले हे घाऊलवल्ली येथून निघोन पुण्यास आले, सदाशिवबापू हे शेवटचे श्रीमंत बाजीराव साहेब पेशवे यांचे मावस बंधु होत. श्रीमंत बाजीराव यांनीं सदाशिवबापू गोखले यांस कोथरूड येथील पूजा नेमून दिली, ती पूजा कांहीं दिवस केली. नंतर ती सोडून सासवड येथील श्रीलक्ष्मीनारायणाची पूजा नेमून घेऊन सासवड येथें येऊन राहिले, हल्लीं सदाशिवबापू गोखले यांच्या वंशजांस श्रीलक्ष्मीनारायणाचे पूजेबद्दल सरकारांतून सालिना सातशें रुपये मिळत आहेत, सदाशिवबापू यांचे चिरंजीव सखाराम यांनी दुनाखे उपनांवाचे ब्राह्मणाचें घर लिलावांत घेतलें. सखाराम सदाशिव, व आत्माराम सदाशिव ह्या बंधुद्वयानें सासवड मुक्कामीं प्रपंच चांगला चालविला, व्यापार व शेती करून द्रव्य संचय बरा केला, सखाराम सदाशिव हे माहा यात्रेला गेले तेव्हां श्रीलक्ष्मीनारायणाची वार्षिक नेमणूक आपले मुलास देण्या संबंधीं त्यांनीं सरकारांत अर्जी केली होती, त्यानंतर यात्रेहून आल्यावर जी अर्जी सरकारांत केली ती पुढील प्रमाणें:—

नंबर ३८०२ श्री नकल

आर्जी वेा सखारामभट बिन बापूभट भट गोखले संस्थान लक्ष्मीनारायण काा सासवड कारणे आर्जी लिहून दिल्ही ऐसि जे.आम्ही शके १७४६ [सन १८२४त] सालीं माहायात्रेस जाऊं लागलों ते समई आर्जी केली होती कीं, चिरंजीव याचे नावें वकिलातनामा देतों. म्हणजे देवस्थानचा ऐवज दरसाल चिरंजीव घेतील यावरून तोंडी हुकूम कीं, चिरंजीवान वकिलात नामा XXX गरज नाहीं. असे सांगितल्यावरून आम्ही यात्रा करून आलों, तो पावेतों साहा वर्षे चिरंजीव यांणीं देवस्थानाचा ऐवज घेऊन पावत्या दिल्या त्या सरकारांत दाखल्यास आहेत. हल्लीं आमचे आर्ज आहे कीं मजला येण्याजाण्यास आडचण पडती कारण माझे नेत्रानें दिसत नाहीं आणि दप्तरदार तर माझा आक्षेप येण्याविसीं दरसाल घेतात. यास्तव मेहरबानगी करून दप्तरदार यास हुकुम दिल्हा असतां चिरंजीव साल दरसाल येऊन ऐवंज घेऊन जातील यांत आम्हास * * होणार नाहींत ता० २३ नवंबर सन १८२३ इसवी.

मामलेदार पो पुरंदर यांस हुकुम आर्जदार यास समक्ष आणवून ही आर्जी तुमची खरी आहे किंवा नाहीं हें पुसून याणी कबूल केल्यास तो शेरा याचे खालीं लिहून याची सही घेऊन दोन साक्षी यावर घालून हुजुर पाा देणें ता. २६ नवंबर सन १८३३ इसवी.

सदरहु हुकुमाप्रमाणें चौकशी होऊन त्याच्या चिरंजीवास नेमणूक मिळत होती. हें पुढील पावतीवरून सिद्ध होत आहे.

श्री

सरकार कुंपणी इंग्रज बहादुर विाा प्रणसीपाल कलटकर सुभा पुणें पावती वाा सखारामभट बिन बापूभट गोखले सासवडकर हल्लीं पुणे सुाासीत सलासीन मया तैन व आलफ आम्हास सालाबाद मौजे सासवड येथील लक्ष्मीनारायण देवस्था रुपये ७०० सातशें पावत असतात त्याप्रों सन १२४५ फसली वाा रुपये ७०० सातशें हुजुरून जामदारखान्यांतून रोख दिल्हे ते वाा खुद्द भरून पावलों. ता. १९ माहे नवंबर सन १८३५ इस्त आक्षर बाबाजी सखाराम गोखले आमचे वडील सखारामभट बिन बापूभट गोखले यांस दिसत नाहीं सबब आम्ही त्याचे चिरंजीव मशार निल्हे सही करितो तारिख माा २

सही बाबाजी सखाराम गोखले.

सखाराम सदाशिव यांच्या दोन मुलांचा वंश हल्लीं चालू आहे.सदाशिव रामचंद्र यांचे दत्तकपुत्र सखाराम यांनीं सासवड येथें निराळें घर बांधिलें आहे.यांना पांच पुत्र आहेत. सखारामपंत यांचे चुलते गोपाळ, हे चुलत्यास दत्तक गेले. गोपाळराव यांनीं रामचंद्र (लिंब येथील जोग घराण्यांतील) यांस दत्तक घेतलें. रामचंद्र गोपाळ यांनीं पुणें येथें शुक्रवारपेठेंत १२७९ नंबरचें घर सन १९१८ सालीं विकत घेतलें. सासवड येथें मेहेंदळे यांचा वाडा विकत घेतला. या वाड्यांतील दिवाणखाना उत्तम आहे. रामचंद्रपंत वारल्यामुळें प्रपंचाची सर्व जबाबदारी त्रिंबकराव यांच्यावर पडली आहे. रामचंद्रपंत यांना पुत्र सहा; सर्वांत वडील त्रिंबकराव हे कोपरगांवीं असतात. कारण कोपरगांव येथें शेती व व्यापार करीत आहेत. कृष्णराव हे सासवड येथील शेती व व्यापार पाहात आहेत.

पुण्यापासून सासवड वीस मैल आहे. सासवडहून पुरंदर किल्ला सहा मैल लांब आहे. सासवड हा गांव जरी लहान आहे, तरी ऐतिहासिकदृष्टया फारच महत्त्वाचा असून विद्यमान सासवड येथें सरदार लोकांचे मोठमोठाले वाडे पूर्व ऐश्वर्याचें स्मरण देत आहेत.हा गांव पेशवाईत फारच भरभराटीस आला होता.येथें सरदार पुरंदरे यांचे वाडे पांच आहेत.पैकीं दोन वाडे भयंकर मजबूत व विस्तीर्ण आहेत. त्यांत श्रीमंत आबासाहेब पुरंदरे यांच्या वाड्याचा काळ्या पाषाणाचा चिरेबंदी तट मजबूत व फारच उंच आहे. बाळाजी विश्वनाथ भट पहिले पेशवे

हे पुरंदरे यांच्या पेटीच्या वाड्यांत (पहिल्या जुन्यावाड्यांत) वारले. यांची समाधी पुलाजवळ पाश्चिमबाजूस नदीचे कांठी आहे. पुरंदरे यांचा पुरुष अंताजीपंत पुरंदरे हे वारले तेव्हां यांचें कुटुंब सती गेलें. तो सतीचा अश्वत्थाचा पार कऱ्हानदींत संगमेश्वराचे दक्षिण बाजूस आहे. कऱ्हानदीस घांट व देवालयें पुरंदरे यांनींच बांधिलीं आहेत. त्यांत श्री संगमेश्वर व श्री वंटेश्वराचें ही देवालयें मोठीं असून प्रेक्षणीय आहेत. या दोन्हीं देवालयांतील नंदी फारच चांगले आहेत. श्री बहिरोबाचें देवालय अहिल्याबाई होळकर यांनीं बांधिलें आहे. श्री बहिरोबाचें देवालय मोठें असून चिरेबंदी आहे. या देवास चौघडा मेहेंदळे यांनीं दिला आहे. व खर्चाबद्दल कायमचें उत्पन्न देऊन ठेविलें आहे. याची हकिकत अशी आहे कीं, मेहेंदळे हे सरदार असल्यामुळें त्यांनीं चौघडा आपले वाड्यांत ठेविला होता. एके वेळीं श्रीमंत बाजीराव रघुनाथ पेशवे सरकार यांची स्वारी सासवडीं असतांना, चौघडा वाजत असलेला त्यांनीं ऐकला. आणि श्रीमंत म्हणालेः—" हा चौघडा वाजत आहे तो कोठें व कुणाचा आहे तो तपास करून लवकर कळवा. " तेव्हां चौकशी करणारे, मेहेंदळे यांच्याकडे जाऊन श्रीमंतांची आज्ञा कळविली. मेहेंदळे मोठे धूर्त होते. त्यांनीं सर्व घोरण लक्षांत आणून, वाड्यांतील चौघडा उचलून बहिरोबाचे देवालयांत ठेवून. श्री बहिरोबाचा चौघडा वाजत आहे असें कळविण्यास, त्या चौकशी करणाऱ्यांजबळ सांगितलें. श्रीमंतांस समजलें कीं, सदरहु वाजत असलेला चौघडा श्री बहिरोबाचा आहे. तेव्हां श्रीमंत स्वस्थ बसले.तो चौघडा मेहेंदळे यांच्या वाड्यावर वाजतो आहे असें जर श्रीमंतांना कळलें असतें तर तो चौघडा उत्पन्नासह जप्त झाला असता. परंतु मेहेंदळे यांची पूर्वपुण्याई सबळ असल्यामुळें त्या वेळीं त्यांना योग्य बुद्धि सुचली. आणि चौघडा त्याच्या उत्पन्नासह देवास देऊन त्यांनीं आपलें नांव कायम केलें. या मेहेंदळ्यांपकींच एका भाऊबंदाचा वाडा तेथील गोखले यांनीं विकत घेतला आहे. येथें सखारामपंत बोकील यांचा वाडा आहे. पेशव्याचे दोन वाडे आहेत. त्यांपकीं एकांत शाळा व दुसऱ्यांत कचेरी आहे. कुंजर याचा चौफेर चिरेबंदी फक्त तट बांधिलेला आहे. या गांवास पाणी कऱ्हानदीचें आहे. सासवड या गांवचें सांगोपांग वर्णन लिहिण्यासारखें आहे. व तें कोणी लिहिल्यास ऐतिहासिकदृष्ट्या फार उपयुक्त होईल.

धाऊलवल्ली येथील गोखले.

दादो विस माहाजनी यांच्या वंशांपैकीं नारायण प्रल्हाद गोखले हे धाऊलवल्ली येथें आले, यांचे नातु कृष्णाजी प्रल्हाद; कृष्णाजी प्रल्हाद यांना पुत्र तीन; नारायण, विसाजी व गोविंद; नारायण यास प्रल्हाद दत्तक; प्रल्हादचे पुत्र दोन; कृष्ण व नारायण; कृष्णराव हे क्राऊन मिलमध्यें हेड विव्हींग क्लार्क आहेत. आणि नारायणराव हे म्याट्रिक होऊन व्हिक्टोरिया टेकनिकलमध्यें सेकंड इयरमध्यें आहेत. हे दाहर येथे असतात. दादो विस माहाजनी याचें दुसरें वंशज विद्यमान धाऊलवल्ली येथें सदाशिव सखाराम व विनायक सखाराम हे शेती वाडी करून आहेत. सदाशिवराव हे वैद्यकी करितात. यांचा हेतु फार स्तुत्य असून, स्वभावही परोपकारी आहे. सदाशिवराव यांनीं या लेखकास माहिती देऊन बरोबर हिंडण्याचेहि श्रम घेतल्याबद्दल लेखक त्यांचा फार फार आभारी आहे.

बेळगांव येथील गोखले.

दादो पामदेव माहाजनी यास पुत्र दोन; पोमदेव व बाबदेव. पोमदेव यांस पुत्र माहादेव व नारायण; माहादेव यास पुत्र दोन; दादो व शंभू. दादो यांचे नातू प्रथम तळेखाजण व तेथून (खारेपाटणजवळ) शिरप; आणि शिरप्याहून देशावर उपळावी येथें पणतू अनंत आले असावेत. अनंताचे पणतू गुंडो नारायण; नारायण रामचंद्र हे मिशन स्कूलमध्यें बेळगांव येथें मास्तर होते. नारायणराव यांचे चिरंजीव गुंडो यांचा जन्म बेळगांव येथेंच झाला. शिक्षण मराठी होऊन इंग्रजी म्याट्रिक झाल्यावर पोलिस खात्यांत नोकरी धरली. पुढें कांहीं वर्षांनीं रेव्हिन्यू खात्यांत शिरले. हल्लीं बेळगांव येथेंच डेप्युटी अकौंटंटचे जागीं नोकर आहेत. बेळगांव येथें यांनीं घर बांधिलें आहे. यांचे चिरंजीव अनंत हे आसिटोन फ्यॉक्टरींत नोकर आहेत.

द्वारका येथील गोखले.

विसाजी शंभू अगर नारायण विसाजी गोखले हे प्रथम गुजराथेंत गेले असावेत. इकडे विजयदुर्ग किल्ल्यावर किल्लेदार व कुलकर्णी म्हणून काम करीत असत. तेथून संवत् १८१५ते२० चे दरम्यान गुजराथेंत डभोई किल्ला पेशव्याकडे असल्यामुळें किल्लेदार होऊन आले. नंतर जेव्हां कर्नल किटिंग ह्यानें त्या किल्ल्यावर हल्ला केला तेव्हां त्यांत हे गोखले किल्लेदार कामीं आले. आणि पुढें कुटुंबांतील

तीन पुरुष तिकींकडे गेले. पैकी माहादेव नारायण हे बडोद्यास आले. एक बंधु इंदुरास व एक उत्तर हिंदुस्थानांतील धोलपूर स्टेटमध्यें होते व कांहीं दिवस शिंदे रियासतमध्येंही होते. याप्रमाणें कुटुंबांतील माणसांची वाताहात जाहली. डभोईतील घर जळून गेल्यामुळें सर्व नुकसान झाली. पेशव्यांकडून डभोई जवळ ९०० शें कुंभे म्हणजे नऊशें एकर जमीन इनाम होती तींही इंग्रज सरकारनें हस्तगत केली. मालमिळकत सर्व लुटून फस्त जाहली. गायकवाड सरकारचा भाग अहमदाबादेत होता. त्याचे बदला गायकवाड सरकारास डभोई देण्यांत आली. त्यानंतर विश्वनाथ माहादेव गोखले हे बडोद्यास नोकर असल्यामुळें ज्या ठिकाणीं यांच्या पूर्वजांचें घर होतें. ती जमीन पुन्हां मिळवून व कांहीं जमीन गहाण होती ती सोडवून परत घेतली.हल्लीं तेथें मूळ जागेवर गोविंदराव विश्वनाथ गोखले वहिवाटदार यांनीं पांचसहाहजार रुपये खर्चून घर बांधिलें आहे.

विश्वनाथ माहादेव गोखले यांना मुलगे तीन; नारायण, गोविंद व अनंत; नारायण हे मयत असून त्यांचे चिरंजीव बाबुराव नारायण हे मुंबई येथें बी. बी. सी. आय रेलवेंत नोकर आहेत. गोविंदराव विश्वनाथ हे ॲग्रीकलचर ग्रॅज्युएट (L. A. G.) असून बडोदे राज्यांत २३० रुपये पगारावर मामलेदार आहेत. हे हल्लीं द्वारका येथें आहेत. अनंतराव विश्वनाथ हे पुण्यास येरवडा जेलमध्यें असिस्टंट सर्जन आहेत.

मिरज येथील गोखले.

नारायण पोमदेव यांस पुत्र तीन; रामदेव, गोविंद व विसाजी. रामदेव यांचे नातू माहादेव हरी गोखले यांनीं आपली कन्या गोदुबाई इचा विवाह मिरज येथील पहिले गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन मिरज संस्थानाधिपति यांच्याशीं केला. माहादेवभट हे चांगले वैदिक होते. हे एके वेळीं आपल्या कन्येबरोबर मिरजेस आले. ते मिरज येथेंच राहिले. माहादेवभट यांना प्रपंचाचे खर्चास व राहण्यास घर वगैरे सर्व व्यवस्था बाळासाहेब पटवर्धन यांनीं केली होती. माहादेवभटास पुत्र पांच; हरभट, बाबुराव, त्रिंबकपंत, विसाजी व भास्कर. त्यांत भास्कर यांचा वंश नाहीं. हरभट यांस पुत्र गणेश व गोविंद; गणेशाचे निपणतू दामोदर विश्वनाथ गोखले बी. ए. एल्. एल्. बी. हे विद्यमान पुणे येथें असून 'मराठा' या इंग्रजी वर्तमानपत्राचे संपादक आहेत. लेखक, वक्ते व सार्वजनिक कार्यकर्ते या नात्यानें ते सर्वत्र माहित आहेतच हल्लीं स्वराज्य या विषयावर बाहेर गांवीं व पुण्यांत सारखीं व्याख्यानें देत आहेत. हे कट्टे देशा-

भिमानी असून लोकमान्य मतानुयायी आहेत. देशबंधूंना दारूसारख्या नीच व्यसनांतून सोडविण्याकरितां दारूच्या गुत्त्यांवर दारू पिऊं नका ! दारू पिऊं नका ! म्हणून सारखा उपदेश करीत आहेत. या त्यांच्या स्तुत्य अभिनंदनीय उद्योगाबद्दल या विद्वान गृहस्थास बक्षिस काय ! तर मानहानी व फरासखान्याचे दर्शन ! ! वाहवारे इंग्रजी न्याय ! ! !

गोविंद हरीचे पणतू हरिहर बळवंत हे पुणे म्युनिसिपालिटींत हेल्थ आफिसर आहेत. आणि नातू चिंतामण काशीनाथ गोखले हे इंजिनियर खात्यांत नोकर होते. हल्लीं हे पेनशनर असून पुणें येथें रहात आहेत. दुसरे नातू गंगाधर निळकंठ हे बी. ए, एल्. सी. ई. असून हल्लीं कराची येथें एक्झीक्यूटिव्ह इंजिनियर आहेत.

बाबूराव महादेव यांचे नातू भास्कर मोरो हे जुने वकील हल्लीं अर्धांगाचे विकारानें पडून आहेत. दुसरे नातू माहादाजी कृष्ण गोखले हे मिरज येथें वकिली करीत होते. हे त्या वेळचे नामांकित वकील होते. यांनीं पैसा चांगला मिळविला होता. यांना दोन मुलगे; एक जनार्दन व दुसरे अनंत. अनंत हे श्रीक्षेत्र वांई येथील गोशाळे-रास्ते यांना दत्तक गेले होते.आपासाहेब गोखले हे ग्रीडर होते.घाकटे बंधु अनंत हे दत्तक गेले होते. दत्तकसंबंधीं कोर्टांत काम चाललें होतें. जनार्दन ऊर्फ आपासाहेब हें स्वतः कोर्टांत काम चालवीत असत. अखेर हायकोर्टांत काम चालवून आपल्यासारखा निकाल मिळविला. हे फारच हुषार होते. यांना दोन बायका होत्या. त्यांत पहिली बायको सती गेली म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. आपासाहेब यांची आई विलक्षण कजाग बायको होती. इनें पहिल्या सुनेचा फार छळ केला. परंतु पुढें मातृभक्त आप्पासाहेब यांच्या लक्षांत सर्व गोष्टी आल्या. आपासाहेब यांनीं पहिल्या बायकोला मिरजेस ठेविलें आणि दुसऱ्या बायकोला वांई येथें आईजवळ ठेविलें आणि आपण कांहीं दिवस मिरजेस व कांहीं दिवस वांई याप्रमाणें रहात असत. विचाऱ्या पहिल्या कुटुंबाच्या नशीबींच सुख नव्हतें दुसरें काय ? एका खेपेस आपासाहेब वांईहून जे मिरजेस आले तेच आजारी होऊन आले. त्यांतच आपासाहेब यांचा ऐन तरुणपणांत ता. २७ आगष्ट १८९८ रोजीं अंत झाला. आपासाहेबांस घोर लागला, फार झालें तर १०।१५ मिनिटांत प्राणोत्क्रमण होणार एवढ्या संधींत त्यांचेजवळ असलेल्या पहिले कुटुंबानें घरांतील देवाजवळ जाऊन हातांतील पाटल्या व कुंकूं देवीला वाहून,विहिरींत उडी टाकिली.कोणी म्हणेल ही आत्महत्या होय.परंतु ही आत्महत्या खास नव्हे. कारण, तिची इच्छा सती जाण्याची होती; परंतु इंग्रजी कायदा आड आल्यामुळें तिला तसें करण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. असो, धन्य धन्य त्या कुलदीपिक साध्वीची ! ! 'आपासाहेब गोखले ज्यावेळीं मिरजहायस्कुलांत होते त्यावेळीं हा लेखकही त्या हायस्कुलांत व आपासाहेब ज्या भानूंच्या

तालमींत जात असत त्याच तालमींतही जात होता. त्यामुळें त्यांचा लोभ होता म्हणून, आपासाहेबांस व त्यांच्या धर्मपत्नीस खांदा देण्यास व एका चितेवर दोघांना ठेवून दहन करण्यास हा लेखक घांटावर गेला होता.' त्या साध्वीची बलवत्तर इच्छा पूर्ण झाली, म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं आपासाहेबांच्या स्मशानयात्रेस त्यांचे तालमींतील सहाध्यायी बरेच होते. आपासाहेबांचे पश्चात् त्यांच्या कजाग मातोश्रीनें घराचें देऊळ करून टाकिलें आहे. आपासाहेबांच्या द्वितीय कुटुंबानें मिरज येथील गोखले घराण्यांतीलच अनंत यांस दत्तक घेऊन माहादेव नांव ठेविलें. हे माहादेव जनार्दन हल्लीं सांगली संस्थानांत नोकर आहेत. गोविंद त्रिंबक हे मिरज येथें आहेत. यांना हरी व राजाराम असे दोन मुलगे आहेत.

त्रिंबक माहादेव यांचे पणतू विष्णु कृष्ण गोखले एम्. एस्. सी. यांनीं लिहून पाठाविलेली माहिती जशीच्या तशी पुढें देत आहें:—

" आमचे वडील ती. रा. रा. कृष्णाजी भिकाजी गोखले यांनीं स्वतःचें आत्मवृत्त सांगून सन १९०४ त लिहविलें; तें पुरें नसून त्यांचे जन्मापासून म्हणजे शके १८६१ शुक्लपक्ष प्रतिपदेपासून सन १८९० मार्च पर्यंत आहे. सन १८९० नंतरचें म्हणजे १९०४ पर्यंतचें वृत्त लिहिणें थांबण्याचें कारण त्यांच्या द्वितीय चिरंजीवाचा म्हणजे आमच्या (मधल्या) बंधूचा आकस्मिक प्लेगनें मृत्यु हें होय. तथापि त्यांनीं सन १८९४ । ९५ च्या सुमारास पेनशन घेतल्यामुळें व अत्यंत स्वास्थ्याची म्हणजे बिन भानगडीची कालक्रमणा सुरू केल्यानें त्या अवधींत त्यांच्या विषयीं नमूद करण्याजोगें कांहींही विशेष नव्हतें.

आमच्या घराण्याची माहिती होण्याकरितां आमच्या वडिलांनीं लिहिलेल्या आत्मवृत्तांतील आरंभींचा उतारा देऊन मग आमच्या वडिलांचें योड्यांत चरित्र लिहित आहें. आतां उतारा देतों— " ह्या लेखांतील मुख्य पुरुष हे मिरज येथील राहणार भिकाजी त्रिंबक गोखले यांचे तृतीय चिरंजीव होत. भिकाजीपंतांचे वडील त्रिंबकपंत व त्रिंबकपंतांचे वडील माहादेवभट हे रत्नागिरी जिल्ह्यांतील राजापूर तालुक्यांत आडिवरें म्हणून गांव आहे त्याचे जवळच ' धालवल ' म्हणून खेडें आहे तेथें रहात होते. त्यांचें मूळचें वैदिकाचें घराणें. तेव्हां महादेवभट यांची कन्या पटवर्धन घराण्यांपैकीं श्रीमंत राजश्री गंगाधरराव बाळासाहेब ह्यांस लग्न करून दिल्ही. त्यावेळेस ते आपल्या मुलीवरोबर मिरजेस आले. त्यांस सहा मुलगे झाले होते. सगळ्यांत वडील हरभट, दुसरे बाबुराव, तिसरे त्रिंबकपंत, चवथे विश्वनाथराव व पांचवे भास्करपंत. ह्यावरून ज्यावेळीं श्री. गंगाधरराव बाळासाहेब ह्यांस पुत्र झाले तेव्हां हे सर्व बंधु मिरज येथील पटवर्धन घराण्याच्या मालकांचे मातुल झाले. तेव्हां या मातुलांचें चालविण्याकरितां श्रीमंतांनीं त्यांस मिरज येथें घरें दिलीं व जमिनीही दिल्या. ह्यांपैकीं ह्या लेखकाच्या मुख्य पुरु-

षाचे आजे त्रिंबकपंत यांस कर्नाटकांत बेहट्टी येथें फडणविशीची जागा दिली होती व त्रिंबकपंत तें काम कांहीं दिवस करीत होते. नंतर ते कर्नाटकांतून मिरजेस आले असतां कांहीं आजार होऊन कैलासवासी झाले. त्यावेळेस त्यांचे पुत्र भिकाजीपंत हे सहा वर्षांचे होते. भिकाजीपंतांची मातोश्री उमाबाई या वयानें बऱ्याच झालेल्या होत्या व त्यांना एक भिकाजीपंत मात्र अपत्य होतें. तरी उमाबाईनीं पतिसह गमन करण्याचा [सती जाण्याचा] निश्चय करून तो तडीस नेला." (उतारा संपला.) आतां भिकाजीपंतांच्या घराण्याची माहिती [देतों.] भिकाजीपंत यांस चार मुलगे. श्रीधरपंत, रामचंद्र, कृष्णराव व पुरुषोत्तम. पैकीं श्रीधरपंत व्यापार करीत. त्यांस मुलगे जनार्दन, हरिपंत, त्रिंबकराव, वासुदेव व महादेव. पैकीं आज जनार्दन याचा मुलगा गंगाधरपंत हा श्री०बुदगांवकर मिरजमळा यांचा मावसभाऊ असून बुदगांवास श्रीमंतांचे पदरीं आहे. हरीपंत यांचे दामोदर, शंकर व गोपाळ असे मुलगे असून पहिले दोन मिरजेस व्यापार करितात. व गोपाळराव, मुंबईच्या ग्रबांट मेडिकल कालेजांत पांचव्या वर्गांत आहेत. त्रिंबकराव व माधवराव हे कोल्हापुरीं व्यापार करितात. त्यांपैकीं त्रिंबकराव यांस वासुदेवराव, विठ्ठलराव व विश्वनाथ असे तिघे पुत्र हयात असून तेही व्यापार बघतात. व माधवराव यास गोविंद व नारायण लहान पुत्र आहेत.

रामभाऊ अथवा रामचंद्र भिकाजी गोखले हे सुमारें ७७ वर्षांचे होऊन सन १९२१ सालीं पुणें मुक्कामीं वारले. हे श्री. बापूसाहेब व बाळासाहेब व आबासाहेब कुरुंदवाडकरांचे टयूटर होते. हे उत्तम मराठी लेखक असून फार मार्मिक व रसिक होते. यांनीं काश्मीरवर्णन, राष्ट्रीय प्रदर्शन व सुलोचना माधव नाटक इत्यादि पुस्तकें लिहिलीं, पैकीं काश्मीर वर्णन हा ग्रंथ सरस आहे. ह्यास पुरुष वंश नाहीं.

तिसरे कृष्णाजी भिकाजी गोखले ह्यांचें चरित्र पुढें दिलें आहे. यांस दोन चिरंजीव; भिकाजीपंत ऊर्फ बाबा हे कोल्हापूर संस्थानांत नायब दप्तरदार आहेत व दुसरे विष्णुपंत (प्रस्तुत लेखक) हे मुंबई युनिव्हर्सिटीचे एम्. एस. सी. आहेत. यांपैकीं बाबासाहेब यांस भालचंद्र नांवाचा बारा वर्षांचा पुत्र येणेप्रमाणें माहिती. आतां ती. रा. कृष्णाजी भिकाजी गोखले यांचें चारित्रः—यांचा जन्म मिरज येथें शके १७६० फाल्गुन (वद्य) अमावास्येला उत्तररात्रीं म्हणजे शके १७६१ त चैत्र शुद्ध प्रतिपदेस झाला. व हे कोल्हापूर येथें ता. २९ डिसेंबर सन १९२० सालीं कैलासवासी झाले. म्हणजे यांनीं सुमारें ८२ वर्षें आयुष्य क्रमिलें. यापैकीं शेवटचीं पंचवीस वर्षें यांनीं पेनशन घेऊन स्वास्थ्यांत घालविलीं व त्यापूर्वीचें सर्व आयुष्य शिकण्यांत अगर नोकरींत घालविलें. हे फार स्वावलंबी असून मूळची गरिबी असतांही केवळ उद्योगानें, चिकाटीनें व सालसपणानें यांनीं स्वतःस बऱ्या स्थितींत आणिलें. हे लहानपणीं पुण्यास शिकण्यास

गेले. तेथें जुन्या पूनाकॉलेजमध्यें त्यांचें शिक्षण झालें. हे फार मेहनती व हुशार असल्यानें त्यांना पूनाकॉलेजची फेलोशिप मिळाली. पुढें ते नोकरींत शिरले. नोकरींत असतांना त्यांनीं वकिलीची व पुढें मुनसफीची अशा परीक्षा दिल्या. पुढें मुंबईच्या हायकोर्टानें त्यांस हायकोर्टाची सनदही देण्याचा ठराव केला होता. ते मुंबईच्या एलफिन्स्टन हायस्कूलमध्यें मास्तर होते. तेथून कोल्हापुरास तेथील हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागेवर आले. त्यानंतर तेथें रजा घेऊन नागपूरच्या जुडिशियल कमिशनरच्या हाताखालीं डेपुटी रजिस्टरच्या मोठ्या जागेवर गेले. परंतु नागपूरची हवा न मानवल्यामुळें कोल्हापूरच्या जागेवर परत आले. पुढें ते श्री. इचलकरंजीकर, बावडेकर, सरलष्कर वगैरे सरदारांचे व मुधोळच्या राजेसाहेबांचे ट्यूटर होते. त्यानंतर श्री.आबासाहेब कागलकर यांचे ते ट्यूटर झाले. श्री. कागलकर कोल्हापुरचे रीजंट झाल्यावर त्यांनीं त्यांना रीजंटचे प्रायव्हेट सेक्रेटरी नेमिलें. त्यानंतर श्री. कागलकरांचे चिरंजीव कोल्हापूरचे छत्रपती झाल्यावर त्यांची नेमणूक छत्रपतींच्या ट्यूटरच्या जागीं झाली व त्याच जागेवर असतांना त्यांनीं पेनशन घेतली. श्री. आबासाहेब कागलकर यांनीं त्यांची प्रामाणिक सेवा व इतर गुण लक्षांत घेऊन त्यांस दरमाहा १०० शंभर रुपये पेनशन करून दिलें होतें. याशिवाय कोल्हापूर दरबारांतूनही त्यांना १०० रुपये पेनशन मिळत होतें.

त्यांचा स्वभाव पाहिला असतां त्यांच्यांत सर्वसामान्य सद्गुण म्हणजे प्रामाणिकपणा, उद्योगीपणा, निर्व्यसनता वगैरे होतेच, पण त्यांच्यांत विशेष हा होता कीं, ते कट्टे कर्मयोगी असत. म्हणजे कर्मे करीत ती करावयाचीं म्हणून अशक्तीनें नव्हें. ते धार्मिक होते. त्यांचीं स्नानसंध्यादि कर्मे आमरणान्त चुकलीं नाहींत. त्याचप्रमाणें ते फार नियमित असत. सर्व गोष्टी वेळच्या वेळीं करीत. एकंदरींत त्यांनीं असें आयुष्य क्रमिलें कीं, प्रपंच करून परमार्थ साधिला असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांनीं लंकेचा प्रवास श्री. आबासाहेब कागलकर याजबरोबर केला. व लंकावर्णन नांवाचें पुस्तक लिहिलें. "

या घराण्याचे देशावर आलेले मूळ पुरुष माहादेवभट बिन हरभट गोखले यांनीं आपली कन्या गोदुबाईचा मिरजकर पहिले बाळासाहेब पटवर्धन यांच्यांशीं विवाह केल्यावर, कांहीं दिवसांनीं माहादेवभट मिरजेस येऊन राहिले. तेव्हां पटवर्धन यांणीं माहादेवभटांस जमीन इनाम करून देऊन सनद करून दिल्ही ती:—

श्री गजानन.

आजस्वारी राा हरीहरराव पांडुरंग दिमत राजश्री पंतप्रधान ताा मोकदमानी मौजे वाडी कर्यात सांगली प्रांत मिरज सुा सन समानीन मया व अलफ शके १७०१ (सन १७७९) विकारी नाम संवत्सरे वेदमूर्ती राजश्री माहादेवभट बिो हरभट

उपनाम गोखले गोत्र काश्यप सूत्र हिरण्यकेशी वास्तव्य मौजे धालवली ता॥ राजापूर हल्लीं वास्तव्य कसबे मिरज यांनीं किल्ले मिरजेच्या मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, आपण कुटुंबवत्सल योगक्षेम चालत नाहीं. त्यास कृपाळू होऊन कांहीं नूतन इनाम जमीन करून दिल्ही या स्नानसंध्यादि षटकर्में आचरोन श्रीमंतांच्या राज्यास अभिष्ट चिंतन करून सुखरूप राहूं म्हणोन त्याजवरून मनास आणितां भटजी थोर सत्पात्र ब्राह्मण कुटुंबवत्सल यांचे चालविल्यास श्रीमंतांस व श्रीमंतांचे राज्यास श्रेयस्कर जाणून मौजे मजकूरपैकीं जमीन वहीत जिराईत काळी मोजणी दोरी ७॥ साडेसात हातांची बिघे १६ जमीन करार करून दिल्ही याची चतुःसिमा बीा तपशील.

वसला डाग एक नंद्यालकर रयते बाबद मौजणी कारकीर्द सिवाजी बल्लाळ पूर्वेस रस्तामार्ग पश्चिमेस आनंदमूर्ती स्वामी संस्थान बिरनाळ यांचें इनाम शेत उत्तरेस मार्ग लगत शेत बाळाजी आबाजी कुलकर्णी मौजे मजकूर दाक्षिणेस वेदमूर्ती राजश्री विनायक दिक्षित उपनाम जोशी यांचें शेत इनाम येणेप्रमाणें चतुःसिमा येकूण जमीन.

वसला डाग साल गुदस्त कर्दे शाबाबाई तांबोळी रयत पूर्वेस शेत बाळाजी आबाजी कुलकर्णी मौजे मजकूर पाश्चिमेस शेत सटवाजी मोंगलकर रयत उत्तरेस देवजी बिा रुद्राजी बारादर पाटील मौजे मजकूर यांचें शेत दाक्षिणेस मार्ग लगत शेत नंदीयालकर रयत बाबद हल्लीं इनाम वेदमूर्तीकडे येणेप्रमाणें चतुःसिमा एकूण जमीन.

८१२॥।८बीो ८३८३ बिो

येकूण जमीन काळी बिघे १६ सोळा बिघे जमीन येणेप्रमाणें वसले डाग दोन चतुःसिमेपूर्वक नूतन इनाम कुलबाब कुलकानु हल्लीपट्टी पेरतरपट्टी खेरीज इनाम तिजाई खेरीज हकदार व इनामदार करार करून दिल्ही असे तरी भटजींचे दुमाला इनाम जमीन करून पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालविणे तुम्ही या पत्राची प्रत लिहून घेऊन हें अस्सल पत्र वेदमूर्तीजवळ भोगवटी यास परतोन देणें जाणिजे छ. १४ माहे सफर मोर्तब खुद (सिका)

माहादेवभटांचे चवथे पुत्र विसाजी यांचे नातू विश्वनाथ माहादेव हे मिरज–मळा संस्थानांत सेकंडक्लास म्याॅजिस्ट्रेटच्या कामावर होते, यांना मुलगे तीन, पहिले हरीभाऊ हे संस्थानांत मामलतदारीच्या कामावर होते. दुसरे गोपाळ हे बी. ए. आहेत. तिसरे रामचंद्र हेही बी. ए. झाले आहेत. हरीभाऊचे दोन मुलगे अनंत व सदानंद; अनंत हे मुंबई येथें नोकरीवर आहेत. गणेश अच्युत हेही नोकर आहेत. विष्णु बळवंत लहान आहे. या लेखकाचें हें आजोळ घराणें आहे. म्हणजे या लेखकाच्या वडीलांची मातोश्री वरील गोखले घराण्यांतील होय.



रा. दा. वि. गोखले संपादक (मराठा) पुणे.

कै० कृ. भि. गोखले, ट्यूटर (कोल्हापूर)

मुंबई येथील गोखले.

पोमदेव दादो माहाजनी यांचे पणतू सदाशिव विस माहाजनी; सदाशिवांचे पणतू रामचंद्र, कृष्ण, गणेश व गोपाळ पैकीं रामचंद्र यांचे पुत्र गोपाळ हे मुंबई येथें चुलते कृष्णाजीपंत यांचे चवळ आहेत. कृष्णाजी गोपाळ; हे सन १८८६ पासून सुमारें १९०१ । २ पावेतो गवालिया टँकजवळ ॲंग्लो व्हर्न्याक्युलर स्कूल मध्यें टीचर होते. शाळेंत टीचर असतांनाच यांना व्यापारी शिक्षण यांच्या मातोश्रीकडून मिळालें. म्हणजे कृष्णाजीपंतांच्या मातोश्रींना मोत्यांची परीक्षा उत्तम होती. हा गुण न शिकतां आला तर हें पूर्वदत्त होय. मातोश्रींचा गुण चिरंजीवांनीं ग्रहणकरून यांनीं मुंबई येथें दुकान काढिलें. मुंबई येथील हरी गोविंद विडकर मोत्यांचे व्यापारी यांनीं कृष्णाजीपंतांस दुकान काढण्यास प्रथम मदत केली. त्यांचा धंदा सुरू करून अदमासें २२।२३ वर्षें होत आहेत. यांचे पुतणे गोपाळराव ही मोत्यांचाच धंदा करितात. म्हणून त्यांना मोतीवाले गोखले असें म्हणतात. कृष्णाजीपंत यांचें मुंबई येथें रहाण्याचें ठिकाण लिंबक वैद्याची चाळ. घाऊलवल्ली येथें यांचें घर आहे. कृष्णाजीपंत यांना पुत्र नसल्यामुळें सर्व दुकानची व्यवस्था पुतण्यावरच सोंपविली आहे. कृष्णाजीपंत बहुतेक जास्त दिवस नाशिक येथें पंचवटींत राहातात. यांचे बंधु गणेश गोपाळ हे मिशनस्कूलमध्यें मास्तर होते हल्ली मुंबई येथें आपले मुलाजवळ रहात आहेत. ह्यांची आजी इंग्रजी अम्मलांत सती गेली होती. ह्यांचे चिरंजीव केशवराव हे हायकोर्टांत क्लार्क आहेत.

पुणें येथील गोखले.

बाबदेव दाद माहाजनी यांस पुत्र दोन; अनंत व गणेश. गणेश यास संतती नाहीं. अनंत यांस पुत्र चार; पैकीं बाळ महाजनी यांस पुत्र अनंत ऊर्फ बच्याजी; बच्याजीस पुत्र दोन; भास्कर व मोरो; भास्कराचे पणतू कृष्णाजी रावजी आहेत असें समजतें. परंतु कोठें आहेत तें माहित नाहीं. मोरो यांचे पणतू मोरेश्वर, अनंत, वासुदेव व विनायक; हे पुणें येथें आहेत. मोरो यांचे नातू गोविंद विनायक हे भोर संस्थानांत फारेस्ट ऑफिसरचे शिरस्तेदार होते. यांचे चिरंजीव मोरेश्वर गोविंद हे १९१० सालीं मॅट्रिक झाल्यावर मिलिटरी फायनन्स ऑफिसांत नोकरी धरली. पगार ६० रुपये आहे. हे आपल्या तिन्ही बंधु व मातोश्रींसह पुणें येथें असतात.

हरिपूर, इचलकरंजी व कल्याण येथील गोखले.

अनंत बाबदेव यांचे पुत्र शिवाजी; शिवाजी यांस पुत्र सात. त्यांत विश्वनाथ, राघो व विठ्ठल या तिघांचा वंश चालू आहे. विश्वनाथ यास पुत्र तीन; लक्ष्मण, गणेश व गोपाळ; लक्ष्मणाचे नातू धोंडो रामचंद्र; धोंडो रामचंद्र यांचे नातू हरी, गिरिधर, माधव व राम लक्ष्मण; हे लक्ष्मण धोंडोचे पुत्र; पैकीं गिरिधर हा दत्तक गेला आहे. हरी लक्ष्मण यांस पुत्र सहा. विष्णु, गोविंद, व्यंकटेश, श्रीपाद, अनंत व शामू; विष्णु हे रेलवेंत गार्ड आहेत. गोविंदराव हे मुबई येथें वॉलेस कंपनींत नोकर आहेत. माधवराव लक्ष्मण हे महोलिया येथें आहेत. रामचंद्र लक्ष्मण हे पोष्ट मास्तर आहेत. यांना पुत्र चार आहेत. पैकीं थोरले सदाशिव हे विद्यार्जनाकारितां पुण्यास असतात. गणेश विश्वनाथ यांचे पणतू गोविंद व्यंकटेश हे मिरज येथें, गोविंदराव रानडे यांचे जावई असल्यामुळें त्यांच्या घरीं असतात. गोपाळ विश्वनाथ यांचे नातू गिरिधर ऊर्फ गोपाळ वामन हे इचलकरंजी येथें आहेत. यांचे आजे गोपाळ विश्वनाथ हे धाऊलवल्लीहून इचलकरंजीस आले. हे संकेश्वर:गादीकडे नोकर होते. यांनीं कांहीं शेती संपादिली व इचलकरंजी येथें स्थाईक घर केलें. वामन गोपाळ हे वैद्य होते. यांचे दत्तक पुत्र गोपाळराव हेही वैद्यकी करीत असून शेतीही करीत आहेत. यांना पुत्र चार; विश्वनाथ, शंकर, गणेश व वामन; विश्वनाथ हे पुणें येथें मेहुणपुऱ्यांतील रास्ते घराण्यांत दत्तक दिले आहेत. शंकरराव हे रामदुर्ग येथें डॉक्टर आहेत. गणेश हे खासगी नोकर आहेत. आणि वामन हे पुणें येथें टिळकमहाविद्यालयांत आहेत.

राघो शिवाजी यांचे पुत्र रामाजीपंत; रामाजीपंतास पुत्र तीन; पैकीं सदाशिव याचा वंश चालू आहे. सदाशिव यास पुत्र पांच; पैकीं गंगाधर, विष्णु व श्रीपाद हे हयात आहेत. हे सांगली जवळील हरीपूर येथील रहाणारे होत. यांचा कोणता पुरुष हरिपूर येथें आला व हरिपूर येथील वाडा कोणी बांधिला वगैरे कांहींच माहिती वरील तिघांपैकीं; कोणाकडूनही मिळाली नाहीं. तरी हरिपूर येथें रामाजीपंत अगर सदाशिवराव गोखले यांची भरभराट होती असें हरिपूर येथील त्यांच्या वाडयावरून अनुमान ठरतें. हल्लीं तो वाडा जमीनदोस्त जाहला आहे. गंगाधर ताया गोखले हे इंजिनियर असल्यामुळें मुंबई येथें त्यांनी बरेच दिवस काढिले. गंगाधरपंत यांनीं कल्याण येथें घर बांधिलें आहे. व आतां ते व्यवसाय न करितां घरींच असतात. यांना दोन मुलगे आहेत. एक वासुदेवराव हे मुंबई येथें ड्रंबरमध्यें नोकर आहेत. दुसरे नारायणराव जी. आय. पी. रेलवेंत नोकर आहेत. विष्णुपंत यांनीं चतुर्थाश्रम घेतला असून आळंदी येथें रहात आहेत. यांचे चिरंजीव रामचंद्र विष्णु हे मुंबई येथें फिलिप्स अँड को मध्यें

नोकर आहेत. यांना तीन मुलगे आहेत. श्रीपाद सदाशिव हे मुंबई व हरिपूर येथें असतात.

धारवाड व मुंडगोड येथील गोखले.

शिवाजी अनंत गोखले, हे पेशवाई मुलखांत त्यावेळीं धुंडाई करीत असलेला हदुखान सावनूर संस्थानचा सरदार याच्या पारिपत्याकरितां म्हणजे बंदोबस्ताकरितां हल्लींच्या इनगल तालुक्यांतील 'आलूर' गांवीं आले. इकडे आल्यानंतर सदरील सावनूरच्या हद्दुखानाच्या कैदेंत सांपडले.शिवाजी पंताबरोबर कोणीएक मराठीबाई होती म्हणे.तिनें कैदेंत असलेल्या शिवाजीपंत गोखले यास स्त्रीवेष देऊन फार युक्तीनें सुटका केली. त्यावेळीं पेशवे यांचे आश्रित संस्थानिक 'हंदिगनूरचे' देसाई (हे जातीनें लिंगाईत आहेत) सदरील हाद्दुखान यास आंतून सामील होते. त्यामुळें त्यावेळीं शिवाजीपंत हे दग्यानें अटकेंत सांपडले. हद्दूखानाच्या अटकेंतून युक्तीनें सुटून शिवाजीपंत हे पुन्हां पुण्यास सरकारास सर्व हकीकत निवेदन करून पुन्हां जास्त सरंजामानिशीं येऊन हद्दूखानाचें पारिपत्य करून बहादुरी मिळविली; इतकेंच नव्हे तर हंदिगनूरचे देसाई यांनीं पेशवे सरकारास देणेचा वसूल पुष्कळ दिवसापासून न देतां गिळंकृत केला होता त्या सर्व रकमेचा वसूल एका दिवसांत करून रसद पाठविली, या कामाबद्दल सरकारनी 'आडूर' माहालाची मामलत शिवाजीपंतांचे नांवें करून दिल्ही. शिवाजीपंतांनीं कांहीं दिवस मामलत केल्यावर त्यांनीं आपले चिरंजीव विठ्ठलपंत गोखले यांचे नांवें मामलतीचा कारभार सरकार परवानगीनें सोंपवून,तीर्थयात्रेस जाऊन कोंकणांत आपलें गांवीं जाऊन आले. ते फार करारी, धाडसी व पराक्रमी होते. विठ्ठलपंतांनीं पुष्कळ दिवस 'आडूर' महालाची पेशवाईत मामलत केली. त्या वेळीं आडूरास सरकार कचेरी होती. हल्लीं त्या जागीं कानडी शाळा आहे. आडूर गांवास किल्ला होता व सरकार कचेरी लगतच विठ्ठलपंत यांचा वाडा होता. हल्लीं त्या जागीं कांहींच नाहीं. विठ्ठलपंतास दिनकरपंत व श्रीधरपंत हे दोन मुलगे व एक कन्या होती. पेशवाई बरोबरच यांच्याकडील मामलत गेली. कोणत्या सालीं काय काय झालें वगैरे लिहून ठेविलेला कागद जळून गेल्यामुळें संपूर्ण माहिती मिळाली नाहीं. 'कालाय तस्मै नमः'

आडूर गांवीं एक लहानसें घर व भात,शेतीची जमीन एवढेंच शिल्लक उरलें आहे. शिवाजीपंत गोखले यास सात पुत्र होते. पैकीं विठ्ठल शिवाजी यांस पुत्र दोन, दिनकर व श्रीधर, यांच्या पैकीं हल्लीं आडूर गांवीं कोणीच नसतें. दिनकर विठ्ठल यांचे नातू दत्तात्रय गणेश व रामचंद्र गणेश हे पुणें येथें आहेत.

दत्तात्रय हे मेक्यानिकल इंजिनीयर आहेत.रामचंद्र हे बी.ए.आहेत.श्रीधर विठ्ठल हे आडूर येथें होतेच. यांचे पुत्र कृष्णाजी श्रीधर हे आडूर महाल होता तेव्हां कचेरींत कारकून होते. यांचे चिरंजीव वामनराव यांनीं म्यॅट्रिक पर्यंत शिकून पुढें पोष्टखात्यांत नोकरी धरली. अखेर मालेगांव येथें पोष्टमास्तरचें जागीं असतां पेनशन घेतलें. हल्लीं धारवाड येथें स्वाईक घर करून राहिले आहेत. यांना पुत्र तीन; पहिले गणपतराव हे वुइलसन कॉलेजांत शिकून १९०७।८ सालीं बी. ए. झाले. हल्लीं धारवाड येथें ट्रेनिंग कालेजांत मास्तर आहेत. दुसरे श्रीपतराव हे फर्स्ट क्लास मेक्यानिकल इंजिनियर असून, हल्लीं दादर येथें कोहिनूर मिल मध्यें नोकर आहेत. तिसरे पुरुषोत्तम हे पी. ई. झाल्यावर मेडिकल स्कूलमध्यें शिकत आहेत. जगन्नाथ श्रीधर यांस पुत्र पांच; पैकीं सर्वांत थोरले रामचंद्र जगन्नाथ पोलीस सब् इन्स्पेक्टर होते. हल्लीं पेनशनर असून धारवाड नजीक घर खरेदी करून राहिले आहेत. नारायण जगन्नाथ हे कारवार जिल्ह्यांतील मुंडगोड गांवीं शेती व व्यापार करून रहात आहेत. यांनीं आपल्या घराण्याची माहिती व वंशवृक्ष काळजीपूर्वक तयार करून पाठविला.

धाऊलवल्ली येथील गोखले.

गोविंद अनंतचे नातू गोविंद सदाशिव, गोविंद सदाशिव यांचें पणतू अंताजी ऊर्फ धाकोपंत भास्कर हे धाऊलवल्ली येथेंच रहात आहेत. धाऊलवल्ली येथें यांनीं शेती वाडी चांगली केली असून ते मोठे खटपटी आहेत. यांना पुत्र चार; पैकीं थोरले रामचंद्र अंताजी हे मुंबई येथें ईस्टर्न बँक मध्यें नोकर आहेत.

धाऊलवल्ली, केळशी, मुंबई व पुणें येथील गोखले.

विठ्ठल मानी बाबदेव मानी याचे नातू रत्नाकर नारायण माहाजनी यांस पुत्र बाबदेव;बाबदेव यांस पुत्र दोन हरी व भास्कर; हरी यांस पुत्र तीन; पैकीं लक्ष्मण व गुणाजी यांचा वंश चालू आहे. लक्ष्मण हरी यांचे नातू दिनकर गोविंद हे शेढें गांवीं रहावयास धाऊलवल्लीहून गेले. शेढें हा गांव राजापूर तालुक्यांतच आहे. शेढें गांवाहून लक्ष्मण दिनकर हे तेथें उदरनिर्वाह होईना म्हणून फिरत फिरत ता. दापोली मौजे केळशी या गांवीं येऊन राहिले. केळशी या गांवीं अखेरपर्यंत मधुकरी मागून दिवस काढिले, व याच गांवीं त्यांचा अंत झाला. यांना पुत्र तीन; हल्लीं तिघांपैकीं विष्णु व गोविंद यांचाच वंश चालू आहे. विष्णुपंतही वारले आहेत. गोविंदराव यांचा जन्म केळशी येथेंच झाला. यांच्या मातोश्री अद्यापि आहेत. त्या

केळशी येथेंच आहेत. गोविंदराव हे १६।१७ वर्षांचे असतां मुंबई येथें आले. तेव्हांपासून आज तीस वर्षें होत आलीं ते मुंबई येथेंच रहात आहेत. गोविंदराव आपल्या वयाचें ४७।४८ वर्षीं मुंबई येथें वारले.यांनीं लहानपणीं अतिशय निकृष्ट स्थितींत दिवस काढिले. यांनीं चहाकाफीचा धंदा सुरू केल्यावर सहासात वर्षें फारच कष्टमय गेलीं, तीं लिहितां येणें शक्य नाहीं. परंतु कितीहि खडतर प्रसंग आला तरी न डगमगतां आपण जो धंदा सुरू केला त्यांतच आपल्या कर्तबगारीनें व नेकीनें वागून एकच धंदा निश्चयानें व नेटानें सतत चालविल्यास त्यांत यश येऊन केलेल्या परिश्रमाचें उत्तम चीज कसें होतें, हें उदाहरण ज्यांना पहावयाचें असेल त्यांनीं गोविंदराव गोखले यांच्याप्रमाणें निश्चयी बनलें पाहिजे. गोविंदराव गोखले यांनीं ग्रँटरोडवर जें ' विश्रांतीगृह ' चालविलें आहे, त्याची व्यवस्था किती उत्तम आहे हें नीट पाहिल्याशिवाय समजणार नाहीं. विष्णु लक्ष्मण यांस दोन मुलगे. दिनकर व शंकर; दिनकर विष्णु शेती करतात व शंकर हा शिवणकाम शिकत आहे. हे दोघेही केळशी येथेंच असतात. गोविंदराव यांना दोन मुलगे व दोन मुली आहेत. मुलांचीं नांवें दत्तात्रय व मनोहर. दत्तात्रय विद्यार्थी आहे व मनोहर लहान आहे. दुसरे कोणाचीही मदत नाहीं. शिवाय पूर्ण गरीबी अशा स्थितींतून एक ईश्वराची कृपा व दीर्घ प्रयत्न यांचे योगानें गोविंदरावांस हे सुखाचे दिवस प्राप्त झाले म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. आज गोविंदराव यांनीं केळशी मुक्कामीं सुमारें दीड लाखापर्यंत इस्टेट घेतली आहे. आणि मुंबई मुक्कामीं साडेतीन लाखांपर्यंत इस्टेट केलेली आहे.

गुणाजी हरी यांचे नातू आत्माराम मोरो हे धाऊलवल्ली येथें शेतीवाडी करून आहेत यांना दत्तात्रय व हरी असे दोन मुलगे आहेत सदाशिव सखाराम गोखले यांचें घर व आत्मारामपंत यांचें घर जवळ जवळ आहे. धाऊलवल्ली येथील भास्कर बावदेव यांचे नातू भास्कर बाळाजी हे पेशवाईत पुणें येथें गेले. भास्करपंत हे श्रीमंत सरकार पेशवे यांच्या पदरीं फुलझाडें व बागाईत कामगार होते. पुणें येथें सदाशिवपेठेंत यांचें घर ३५१ नंबरचें आहे. भास्करपंत यांचे नातू नारायण, बापू, बळवंत व गोपाळ रामचंद्र असे चौघेजण आहेत. नारायण रामचंद्र हे पुण्यांत घरीं राहून शेती करीत आहेत. आणि बापू, बळवंत व गोपाळ हे रेल्वे खात्यांत नोकर आहेत.

पुणें येथील गोखले.

पुणें येथें सदाशिव पेठेंत बदामी हौदासमोर कोपऱ्यावर गोखले यांचें घर आहे. हल्लीं बदामी हौद म्युनिसिपालिटीनें गिळंकृत केल्यामुळें दिसेनासा झाला आहे. या गोखल्यांच्या घराचा म्यु. नं. ८१० आहे. पूर्वी हें घर फार मोठें

होतें. आणि पेशवाईत हें गोखले घराणें फारच श्रीमान होतें. हे मूळचे राहणारे कोंकणांतील धाऊलवल्लीचे होत. यांच्या घरचे जुने कागदपत्र जर मिळते तर बरीच ऐतिहासिक माहिती उपलब्ध झाली असती. असो; केशव कृष्ण गोखले हे पुण्याहून निघोन बडोद्यास गेले होते. कारण बडोदकर गायकवाड यांस यांनीं कर्ज दिलें होतें तें वसूल करण्याकरितां गेले होते. बडोदकरांनीं यांचा मानपान चांगला ठेविला होता. केशवराव यांस बाबजी, बळवंत व चिंतामणी असे तीन मुलगे. चिंतामणीस संतान नाहीं. बळवंतराव यांचा जन्म बडोद्यास झाला. बळवंतराव यांनीं पुणें येथें म्युनिसिपालिटींत नोकरी केली. यांचे चिरंजीव शंकरराव हे पूर्वी पी. डब्ल्यु. डी. खात्यांत नोकर होते. हल्लीं शंकरराव यांनीं नाशिक येथें राहून टिंबर मर्चंटचा स्वतंत्र धंदा चालविला आहे. बाबजी केशव यांस पुत्र दोन; महादेव व गणपती. महादेव यांस पुत्र तीन; रामचंद्र, लक्ष्मण व शिवराम; रामचंद्र महादेव हे गवई आहेत. हे नागपूर येथें आजे सब्जज्ज यांचेकडे आहेत. लक्ष्मणराव हे राहुरी येथें मामलेदार कचेरींत नोकर आहेत. शिवरामपंत हे पुणें येथें स्वतःचे घरांत रहात असून मुंबई इलाख्याचे जेल खात्याचे आफिसांत पुणें येथेंच नोकर आहेत. अनंत गणेश हे पुणें येथें मिलिटरी वर्क सप्लाय ऑफिसांत नोकर आहेत. हे पुणें येथें स्वतःचे घरीं रहात आहेत. यांचे बंधु विष्णु गणेश हे मुंबई येथें म्युनिसिपल ऑफिसांत हेल्थ डिपार्टमेंटमध्यें हेड्क्लार्क आहेत.

यांचेच देशांतील गोविंद भैरव गोखले व विष्णु भैरव गोखले; पैकीं सापत्न विष्णु भैरव हे आहेत असें समजतें. गोविंद भैरव यांचे चिरंजीव गोपाळ व नरहर; गोपाळ गोविंद हे कुलाबा जिल्ह्यांत महाड येथें सब् ओव्हरसीयर असल्याचें समजतें. तसेंच नरहर गोविंद हे बडोद्यास रहात आहेत असें समजतें.

होळी-दळें येथील गोखले.

विश्वनाथ हरी गोखले हे दळयाहून कल्याण येथें आले. विश्वनाथ हरी यांचे बंधु गोविंदभट यांचा वंश हल्लीं कल्याण येथें आहे. विश्वनाथ हरी व गोविंद हरी यांनीं कल्याण येथें घर बांधिलें व कांहीं जमीन संपादिली. गोविंद हरी यास पुत्र चार; नारायण हे वैदिक होते. मोरोपंत तलाठी होते. अंताजीपंत फौजदार होते. व रघुनाथ हे तलाठी होते. नारायण गोविंद यांचे पणतू शंकरराव गोविंद हे वडिलार्जित घरांत रहात असून शेती वाडी करून आहेत. रघुनाथ गोविंद यांचे चिरंजीव सखाराम यांस, मोरो गोविंद यांनीं दत्तक

घेतले. सखाराम मोरो यांचे चिरंजीव माहादेवराव हे शेती व व्यापार करीत असून वडिलार्जित घरांत रहात आहेत.

कल्याणहून विश्वनाथ हरी गोखले यांचे चिरंजीव बाळाजी विश्वनाथ हे सुमारें सन १८४४ त कोल्हापूर येथें आले. हे करवीर येथें न्यायाधीश होते. यांचे चिरंजीव विष्णुपंत व विश्वनाथराव हे हल्लीं कोल्हापूर येथेंच आहेत. विष्णुपंत हे पेनशनर असून वयोवृद्ध झाल्यामुळें विशेष यकले आहेत. विश्वनाथराव हे कोल्हापूर येथें मोठ्या अधिकाराचे जागेवर आज बरींच वर्षे नोकरी करीत आहेत. हे न्यायखात्यांत नोकरी करून पुढें १९१० त सरन्यायाधीश व कौन्सिलर झाले. सन १९२१ चे नोव्हेंबर महिन्यांत यांनीं पेनशन घेतलें. विश्वनाथराव हे कडक स्नान संध्येशील आहेत. सरकारी कामा शिवाय बाकीचा वेळ व्यर्थ न घालवितां धार्मिक कृत्यांत खर्च करित असतात.यांचा स्वभाव शांत, गंभीर व दयार्द्र असून अंगीं लीनता विशेष आहे. खऱ्या विद्वानांचें हें एक मुख्य लक्षण होय. विश्वनाथराव हे आपल्या वैदिक धर्माचे पूर्ण चहाते आहेत. यांना पुत्र सहा आहेत. पहिले माधवराव हे बी. ए. एल्. एल्. बी. असून मुंबई येथें सॉलिसीटर आहेत. तिसरे पुरुषोत्तमपंत डॉक्टर हे एम्. डी. असून हल्लीं मुंबई येथें खासगी दवाखाना चालवीत आहेत. चवथे गंगाधरपंत हे बी. ए. एल्. एल्. बी. आहेत. पांचवे वासुदेवराव हे बी. ए. आहेत. सहावे भास्करपंत हे कॉलेजांत आहेत. विष्णुपंत यांना तीन मुलगे, पहिले रामचंद्र विष्णु हे बेळगांव येथें मिशन स्कूल मध्यें नोकर आहेत. हरी विष्णु हे सांगली येथें इंजिनियर ऑफिसांत क्लार्क आहेत. बाळकृष्ण विष्णु हे कोल्हापूर येथें शाळामास्तर आहेत.

बाबदेवभट बाळंभट यास तीन पुत्र; पैकीं आपाजी व अनंत यांचा वंश चालू आहे. आपाजीचे पणतू माहादेव गणेश हे दळें येथें असतात. आपाजीचे नातू सदाशिव परशराम यांचे चिरंजीव रामचंद्र सदाशिव हे मुंबई येथें तार ऑफिसांत नोकर आहेत. आपाजीचे नातू नारायण परशराम यांस पुत्र तीन; पहिले विष्णु नारायण हे मुंबई हायकोर्टात नोकर आहेत. दुसरे पुरुषोत्तम नारायण बी. इ. हे बॉबे म्युनिसिपल इंजिनियरींग ऑफिसांत नोकर आहेत. दत्तात्रय नारायण हे हिंदुस्थान फिल्म कंपनींत नोकर आहेत. गणेश व सदाशिव परशराम हे मुंबई येथें सावकारी पेढीवर नोकर होते. नारायण परशराम हे कस्टम खात्यांत नोकर होते. दळें येथें या सर्वांचें घर व शेती आहे.

अनंत बाबदेव यांस पुत्र दोन; गोपाळ व विठ्ठल. गोपाळ यांचा वंश कल्याण येथें आहे. आणि विठ्ठल यांचे वंशज भंडारा, वांई व इंदोर येथें आहेत; नारायण गोपाळ हे कल्याण येथें रहावयास आले. नारायणाचे पुत्र गोविंद. गोविंद नारायण यांस, माहादेव, रामचंद्र व लक्ष्मण असे तीन मुलगे; हें घराणें वैदिक आहे. कल्याण येथें लक्ष्मण गोविंद यांनीं कायमचें घर विकत घेतलें.

रामचंद्र व लक्ष्मण हे वैदिक होते. गोविंद माहादेव हे त्रावणकोर ह्रीलान येथें इंजिनियर आहेत. नारायण रामचंद्र हे जी. आय. पी. रेलवेंत नोकर आहेत. हरी रामचंद्र वैदिक आहेत. कृष्णाजी रामचंद्र रेलवेंत नोकर आहेत.

नाटें येथील गोखले.

नाटें हा गांव धाऊलवल्लीस लागून आहे. नाटें या गांवीं अनंत बाबदेव, किंवा बाबदेव बल्लाळ या दोघांपैकीं कोणी तरी होळी–दळ्याहून गेले असावेत. अनंत बाबदेव यांचे नातू कृष्णाजी विठ्ठल गोखले हे नाटें गांवीं शेती करून होते. विठ्ठल अनंत यांस पुत्र चार; कृष्णाजी, बळवंत, लक्ष्मण व वामन; पैकीं बळवंत व लक्ष्मण या दोघाचा वंश चालू आहे. बळवंतराव विठ्ठल हे इनाम कमिशनच्या खात्यांत नोकर होते. लक्ष्मणराव विठ्ठल हे पुणें येथें तुळशीबागवाले यांच्याकडे नोकर होते. विष्णु बळवंत यांचा विद्याभ्यास पुणें मुक्कामीं झाल्यावर शिक्षकाचें काम करीत होते.नंतर कलेक्टर ऑफिसांत दप्तरदार झाले.पुढें नागपूर कमिशनरच्या ऑफिसांत दप्तरदार झाले. गंगाधर बळवंत यांचें मराठी शिक्षण चार इयत्तेपर्यंत श्रीक्षेत्र वांई येथें झालें. म्याट्रिकची परिक्षा सी. पी. प्राव्ही-नसेंस मध्यें झाल्यावर एफ. ए. ची परिक्षा जबलपूर येथें झाल्यावर लखनौ येथें बी. ए. पर्यंतचें शिक्षण झालें. नंतर आग्रा येथें बी. एल. चे परिक्षेंत सन १८९१ त पास झाले. नंतर त्याच सालीं भंडारा येथें वकिली करण्यास सुरवात केली. यांनीं भंडारा येथें घर बांधिलें असून शेती केली आहे. हे भंडारा येथील मालगुजार आहेत. गंगाधर बळवंत यांनीं हल्लीं वकिली सोडली आहे. यांचे चिरंजीव वामनराव हे बी. ए. च्या क्लासांत आहे.

रामचंद्र लक्ष्मण गोखले हे सी. पी. प्रांतांत अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत होते. हल्लीं पेन्शन वेतली असून हे श्रीक्षेत्र वांई येथें रहात आहेत. यांचे सख्खे बंधु शंकरराव लक्ष्मण गोखले एम. ए. यांचें चरित्र पुढीलप्रमाणें:—

प्रो. शंकर लक्ष्मण गोखले एम्. ए. यांचें चरित्र.

" चरित्राला विषयीभूत होणाऱ्या अनेक प्रकारच्या व्यक्ति असतात. ज्या पुरुषांच्या ठिकाणीं कांहीं तरी असामान्य गुण असतात, ज्यांच्या गुणवर्णनामुळें सामान्य जनतेंत एक प्रकारची स्फूर्ति उत्पन्न होते, अशाच पुरुषांचीं बहुधा चरित्रें लिहिलीं जातात. त्यांतल्या त्यांत ज्या पुरुषांनीं स्वतःच्या बळावर अनेक संकटांशीं झगडून आपलें ध्येय प्राप्त करून घेतलें असतें व त्या ध्येयासंबंधाचा

श्री० **विश्वनाथ बल्लाळ गोखले,** माजी सर-न्यायाधीश, कोल्हापूर.

कै० डॉ. **काशिनाथ नारायण गोखले,** मुंबई.

मार्ग इतरांना सुलभ करून दिलेला असतो अशांचीं चरित्रें जनतेंतील तरुण पिढीला अनुकरणीय व स्फूर्तिदायक होत असतात. आज आम्ही अशाच प्रकारच्या एका अनुकरणीय गुणांनीं युक्त अशा श्रेष्ठ पुरुषाच्या चरित्राचा वाचकांना परिचय करून देत आहोंत.

इंग्रजी राज्य महाराष्ट्रांत स्थापन झाल्यानंतर आरंभीं आरंभीं आमच्या लोकांना जी एक प्रकारची हताश स्थिति आली होती, व जीमुळें पाश्चात्य तेवढें चांगलें व आपलें तेवढें सारें गचाळ, अशी भावना होऊन यापुढें आपण दास्यच करण्यास योग्य, आपल्या हातून कसचा पराक्रम किंवा कसचें अलौकिक कृत्य होणार, अशा तऱ्हेचे गळाटल्यासारखे विचार महाराष्ट्रजनतेंत पसरत चालले होते, त्या आणीबाणीच्या प्रसंगीं विष्णुशास्त्री चिपळुणकरांसारखा पुरुष उत्पन्न होऊन त्यानें महाराष्ट्राला त्या मोहनिद्रेतून डवचून, ओरडून, कोरडे ओढून, चिमटे घेऊन इतऱ्हांनीं जागृत केलें.

चिपळुणकरांनीं जागृत केलेल्या तेजस्वी महाराष्ट्राचे; आमचे चरित्र नायक एक सत्पुत्र आहेत. जागृत झालेल्या महाराष्ट्रानें हल्लींच्या शास्त्रीय प्रगतीच्या युगांत काय केलें पाहिजे; जगाच्या घांवपळीच्या शर्यतींत आपलें तट्टू सर्वांच्या आघाडी नाहीं तरी निदान सर्वांच्या बरोबरीनें तरी कसें ठेविलें पाहिजे, भौतिक उन्नतींत आपलें स्थान निश्चल कोणत्या प्रकारानें राखलें पाहिजे इत्यादि कार्याचें क्षेत्र, आमच्या चरित्रनायकांनीं–प्रो० शंकरराव गोखले–यांनीं आपल्या कर्तृत्वासाठीं निवडलें आहे, व त्या क्षेत्रांतील त्यांचें एकंदर कार्य यशस्वी, स्फूर्तिजनक स्वदेशीयांस अभिमानास्पद आणि अनुकरणीय असेंच झालें आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा एकच नमुना, आमच्या म्हणण्याची सत्यता वाचकांस पटवून देण्यास समर्थ आहे. तो असा,

आपल्या देशांत कोणतेंही काम निघो त्यावर युरोपियन साहेबाची देखरेख अगर पसंती असल्याखेरीज त्या कामाला लोकांत मान्यता मिळत नाहीं. केवळ एतद्देशीयांच्या देखरेखीखालीं चालणारें काम नीट होत नाहीं. असा एक आमच्यासंबंधानें आमच्याच लोकांचा अनाठायीं समज होऊन बसलेला आहे, पण प्रो० शंकररावजींनीं हा समज नुसता पालटवून टाकिला, एवढेंच नव्हे तर पाश्चात्त्य देशांत जाऊन त्यांनीं आपला इतका जम बसविला कीं,ग्लासगो येथील एक यंत्रें बनविणारी कंपनी आपल्या यंत्राची जाहिरात देतांना मुद्दाम Constructed under the Expert Supervision of Mr. S. L. Gokhale (शंकर लक्ष्मण गोखले यांच्या निष्णांत देखरेखीखालीं बनविलेलीं यंत्रें,) अशी इशारत देत असते. पाश्चात्त्य देशांत जाऊन तेथील लोकांवर, त्यांच्याकडून मिळविलेल्या ज्ञानाची छाप पाडून त्यांच्याकडून आपलें वर्चस्व कबूल करून घेणें ही आम्हां महाराष्ट्रियांस केवढी अभिमानास्पद गोष्ट आहे! तें कार्य प्रो०

गोखले यांनीं यशस्वी तऱ्हेनें पार पाडलें. स्वामी विवेकानंद किंवा रामतीर्थ यांनीं वेदांताची ध्वजा अमेरिकेंत फडकविली हें कार्य तर अलौकिकच आहे. पण त्यासंबंधी असेंही म्हणतां येईल कीं, वेदांतज्ञान हें हिंदुस्थानच्या मालकीचें ज्ञान आहे, ती हिंदुस्थानची संपत्ति आहे. पण यांत्रिक किंवा भौतिक शास्त्रीय ज्ञान आमचें असा हक्क सांगणाऱ्या पाश्चात्त्यांना, त्यांच्या ज्ञानांत आपलें श्रेष्ठत्व कबूल करावयाला लावणें हें फारच विशेष होय, यांत कांहीं एक संशय नाहीं. शंकररावजींचें हें कार्य, देशांतील तरुण पिढीला अत्यंत स्फूर्तिजनक आणि अनुकरणीय असून मातृभूमीचें मुख उज्वल करणारें आहे. असो.

शंकररावांचा जन्म महाराष्ट्राची एके काळीं राजधानी म्हणून गाजलेल्या सातारा जिल्ह्यांतील सुप्रसिद्ध वांई क्षेत्रीं इ. स. १८६९ या सालीं झाला. परंतु कृष्णा तीरचें हें दिव्य रोप तेथील हवापाणी कांहीं काळ उपभोगून आमच्या नागपूर प्रांतांत आलें.- शंकररावांचे थोडेंबहुत प्राथमिक शिक्षण वांईसच झालें. ते इकडे आल्यावर चांदा व भंडारा जिल्ह्यांत त्यांचे चुलत बंधु कै. विष्णुपंत गोखले यांच्याजवळ त्यांचें प्राथमिक शिक्षण पूर्ण होऊन दुय्यम शिक्षणासाठीं ते नागपूरच्या नीलसिटी हायस्कुलांत दाखल झाले.

नागपूरस्थांशीं त्यांचा परिचय ते नील हायस्कुलांत प्रविष्ट झाले तेव्हांपासूनच झाला. विद्यार्थीदशेंतील त्यांच्या चारित्राचा विशेष म्हणजे त्यांची स्वतंत्र बुद्धिमत्ता हा होय ! परप्रत्ययनेय बुद्धीचा त्यांना फार तिटकारा. दुसऱ्याच्या धोरणानें आपलें मत बनविणें, ह्याच्या ते फार विरुद्ध. शाळेंत विद्यार्थ्यांनीं एखादी गोष्ट करण्याचें योजिल्यास तींत केवळ भावनेनें अगर भरीं भरून शंकरराव सामील होत नसत. त्या गोष्टीसंबंधीं, ती योग्य असल्याबद्दल त्यांची पुरी खात्री झाली म्हणजे तींत ते सामील होत असत. अभ्यासाच्या विषयांत देखील शंकररावांची दृष्टी इतर विद्यार्थ्यांहून अगदीं भिन्न असे. जी गोष्ट वर्गांतील विद्यार्थ्यांच्या ध्यानांतहि भरावयाची नाहीं, ती यांना चटकन् समजून येई व ती नुसती समजूनच न भागतां तिच्यावर, आणखी कल्पना लढवून, आपलें स्वतःचें म्हणून ते कांहीं तरी लादीत. या गोष्टींचा प्रत्यय ते इंग्रजी तिसऱ्या वर्गांत असतांनाच दिसून आला. त्यावेळीं हायस्कूल स्कालरशिप परीक्षेकरितां युक्लिडच्या भूमितीच्या पहिल्या पुस्तकांतील फक्त सव्वीस सिद्धांत नेमले होते, व तितकेंच सिद्धांत समजून घेतांना विद्यार्थ्यांची तारांबळ उडे. परंतु शंकररावांनीं कोणाचीहि मदत न घेतां स्वतःच्या बुद्धीनें तें सारें पुस्तक, म्हणजे ४८ सिद्धांत सोडवून दाखविले होते. विद्यार्थिदशा आटोपून ते कॉलेजांत प्रोफेसर झाले तेव्हां, त्यांनीं दिलेल्या व्याख्यानांत आणि लिहिलेल्या लेखांत देखील त्यांची विचार करण्याची स्वतंत्र दृष्टि ठळक दिसून येई. 'दुर्योधनाची कैफियत' या त्यांच्या विविधज्ञानविस्तार मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांत त्यांची स्वतंत्र विचारसरणी आणि

शोधकबुद्धि यांचा पूर्ण प्रत्यय येतो. आजपर्यंत बहुतेक विद्वानांनीं, भारताच्या आधारें, पांडवांचें स्तुतिस्तोत्र गाऊन कौरवांचा निषेध केला आहे. षण शंकररावांनीं भारताच्या आधारानेंच कौरवांचा, विशेषतः दुर्योधनाचा पक्ष स्वीकारून त्याची उत्तम वकिली केली आहे. हा लेख विद्वानांना मान्य झाला आहे. त्याचप्रमाणें भगवद्गीतेवरील त्यांच्या व्याख्यानांतहि त्यांची हीच स्वतंत्र विचारसरणी स्पष्ट दिसून येते. भगवद्गीता ही महाभारतांत मूळचीच आहे कीं प्रक्षिप्त म्हणजे मागाहून सामील केली आहे यासंबंधीं वाद उपस्थित झाला असतां गीता प्रक्षिप्त आहे, मूळची नव्हे हा पक्ष स्वीकारून त्या पक्षाचें त्यांनीं फार सुंदर रीतीनें मंडण केलें आहे. आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यांनीं इतकी मजेदार प्रमाणें पुढें आणलीं कीं, प्रतिपक्षानें देखील त्यांच्या शोधकबुद्धीचें व स्वतंत्र विचारपद्धतीचें मोठया आनंदानें कौतुक केलें.

शंकरराव सन १८८७ ह्या वर्षी नील सिटीहायस्कुलांतून पहिले वर्गांत प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले. त्यावेळीं येथील सर्व परीक्षा कलकत्ता युनिव्हर्सिटीतर्फे होत असत. प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठीं नागपूर येथील हिस्लाप कॉलेजांत प्रवेश केला. हिस्लाप कॉलेज ही मिशनरी मंडळीनें स्थापन केलेली विद्यादान करणारी संस्था असून हिच्यांतून विद्याविभूषित व नांवलौकिकवान अशी बरीच मंडळी बाहेर पडली आहे. कॉलेजांतील कोणत्याही परीक्षेंत अपयश न घेतां त्यांनीं उच्च शिक्षणाचें शेवटचें शिखर गांठलें.

सन १८९० त ते एफ्. ए. ची परीक्षा पास झाले. सन १८९२ सालीं फिजिक्स (पदार्थविज्ञान) विषयांत मान (Honours) मिळवून बी. ए. पास झाले. एम्. ए. करितां कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्यें एक वर्ष राहून १८९३ त रसायनशास्त्रांत [Chemistry] पहिले वर्गांत एम्. ए. पास झाले. त्यांचा साऱ्या युनिव्हर्सिटींत दुसरा नंबर आला. व त्याबद्दल त्यांना रौप्यपदक बक्षीस मिळालें.

यानंतर कायद्याची परीक्षा देऊन वकील अगर जज्ज व्हावें अशी सूचना त्यांच्या आप्त व मित्र मंडळींकडून वारंवार होत असतांही, त्यांचें ध्येय निराळेंच असल्यामुळें, त्यांचें या द्रव्यार्जनाच्या तत्कालीन राजमार्गाकडे मुळींच लक्ष वेधलें नाहीं. यांत्रिकशिक्षण मिळविण्याकडे मनाचा ओढा असल्यामुळें त्यांनीं कित्येक दिवसपर्यंत नागपूरच्या स्वदेशी मिलचे व हिंगणघांटच्या मिलचे वर्कशॉपमध्यें मजुरांबरोबर सकाळपासून संध्याकाळपर्यंत अवघड काम करण्यासही माघार घेतली नाहीं.

अशाप्रकारें ज्ञानार्जनाचे निरनिराळे उद्योग करून त्यांनीं ज्ञानदानाचें कार्य हातीं घेतलें. हिस्लाप कॉलेजमध्येंच त्यांना शास्त्रीय व गणित विषयांच्या असि-

स्टंट प्रोफेसरची जागा मिळाली. प्रोफेसर असतांना त्यांच्या मनमिळाऊ व विनोदी स्वभावामुळें विद्यार्थिवर्गाचें त्यांच्यावर फार प्रेम असे. त्यांतल्या त्यांत आपल्या स्वतंत्र विचारसरणीचा व शोधकबुद्धीचा शिकवितांना ते नेहमीं उपयोग करीत, त्यामुळें आणि उपकरणें व साधनें यांची अनुकूलता असूनही इतर प्रोफेसरांस न साधणारे शास्त्रीय प्रयोग ते ठराविक उपकरणांवर व साधनांवर भिस्त न ठेवतां, स्वतःस सुचलेल्या उपकरणांनीं सुलभ रीतीनें करून त्यांच्याद्वारें शास्त्रीय तत्त्वें विद्यार्थ्यांस समजावून देत. त्यामुळें विद्यार्थिसमूह त्यांच्यावर बालबाल खुष असे. मित्रमंडळींत असतांना नानाप्रकारच्या कोट्या, विनोदी भाषणें यांच्यायोगानें ते मित्रमंडळीच्या आनंदाचें स्थान होऊन बसले होते.

हिस्लाप कॉलेजमध्यें कांहीं वर्षें प्रोफेसरीचें काम केल्यावर इंदूर येथील होळकर कॉलेजांत सायन्स प्रोफेसरची त्यांना जागा मिळाली. तेथें असतां तेथील रासायनिक प्रयोगशाळेंतील लागणाऱ्या यंत्रांची योजना व रचना त्यांनीं फार थोड्या खर्चांत केली. भरमसाट कांहीं तरी यंत्रें न बोलावितां कित्येक तेथल्या तेथें बनवून प्रयोगशाळेची उभारणी केली. शास्त्रतत्त्वें जुजबी वस्तूंच्या सहाय्यानें विशद करण्याची त्यांस पूर्वीपासूनच हातोटी होती. यामुळें हें काम अर्थात् त्यांस अवघड नव्हतें. पुढें कांहीं वर्षांकरितां सेंट्रल इंडिया मेडिकलस्कूलमध्येंही लेक्चरर या नात्यानें त्यांची नेमणूक झाली होती. होळकर कॉलेजांत दहा वर्षेपर्यंत ते प्रोफेसर होते. तेथें असतांनाच १९०५ सालीं ते फिरून पदार्थविज्ञान [physics] शास्त्रांत एम्. ए. च्या परीक्षेस बसले, व त्या विषयांत त्यांनीं सर्वांत युनिव्हर्सिटींत पहिला नंबर मिळविला. त्याबद्दल त्यांना युनिव्हर्सिटीकडून बक्षीस मिळून, कलकत्ता युनिव्हर्सिटी व मोतीलाल हीं सुवर्णपदकें मिळालीं. ह्यावेळीं सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. जगदीशचंद्र बोस यांनीं, शंकररावांना खालील मजकुराचें पत्र पाठविलें होतें:—

Prof. Gokhale, M. A. 15 th May 1906.

Sir, Indore College.

As your Examiner in Physics on two occasi ons it gives me pleasure to say that I formed a very high opinion of your work.

PRESIDENCY COLLEGE,
Calcutta.

I am,
Sir,
Yours truly,
(Sd.) J. C. BOSE,

श्री० सरदार विश्वनाथ खंडेराव रास्ते, पुणें.

कै० सरदार खंडेराव विश्वनाथ रास्ते, पुणें.

भावार्थः—

प्रोफेसर गोखले, एम्. ए. १५ मे, १९०६

इंदूर कॉलेज यांस,—

महाराज,

मला पदार्थविज्ञानशास्त्रांत तुमचा परीक्षक होण्याचा दोनदां प्रसंग आला. मला आपणांस कळविण्यास आनंद वाटतो कीं, आपलें काम फार उच्च दर्जाचें आहे, असें माझें मत झालें आहे.

प्रेसिडेंसी कॉलेज, आपला

कलकत्ता. जे. सी. बोस.

होळकर कॉलेजमध्यें असतांना इंदूर येथील प्रसिद्ध सिव्हिल सर्जन, कर्नल रॉबर्टस यांच्याकडे एक गणिताचा सिद्धांत [problem] सोडविण्याकरितां आला असतां त्यांनीं प्रिंसिपाल शॉमले यांचेकडे तो प्रॉब्लेम कोण सोडवूं शकेल अशी चौकशी केली; तेव्हां त्यांनीं शंकररावांचें नांव सुचविलें व शंकररावांनीं तो प्रॉब्लेम आपल्या नांवाप्रमाणें अगदीं सहज व समाधानकारक रीतीनें सोडविला.

पुढें कांहीं महिन्यांकरितां त्यांनीं पवना कॉलेजमध्यें प्रोफेसर व प्रिन्सिपाल या नात्यांनीं काम केलें. येथेंच त्यांची प्रकृति बिघडल्यामुळें डॉक्टराच्या सल्लयावरून हवा पालटण्याकरितां ते स्कॉटलंडला निघून गेले.

विद्यार्थिदशेंत असतांच परदेशांत जाऊन शास्त्रीयविषयांत पारंगत व्हावें या महत्त्वाकांक्षेचा अंकुर त्यांच्या मनांत वाढत जात होता. हा पल्लवित होण्याची अनुकूल परिस्थिती त्यांच्या बिघडलेल्या प्रकृतीनें आणून दिली. आपत्तीचा देखील आयुष्यक्रमाला उच्च वळण देण्याचा उपयोग होतो. याचसाठीं श्रेष्ठ पुरुष " आपदः सन्तु नः शश्वत् तत्र तत्र जगत्पते " अशी परमेश्वराची प्रार्थना करीत असतात.

स्कॉटलंडला पोंचल्यावर जिचें अंतःकरणांत दृढ पालन केलें होतें अशा चिरवांछित कामगिरीस अवसर मिळाल्यामुळें औषधाखेरीजच त्यांची प्रकृती दुरुस्त झाली. सुरेशचंद्र विश्वास बंगाली गृहस्थ असेच ब्राझिल देशांत जाऊन आपल्या कर्तृत्वानें आणि धाडशीपणानें तेथील सैन्याचे अधिपती झाले, व बंगाली लोकांचें लष्करी कौशल्य आणि धैर्य यांचा जगाला त्यांनीं प्रत्यय आणून दिला; ही गोष्ट, शंकरराव विद्यार्थी असतांना त्यांच्या मनावर फार परिणाम करी. त्यांचें असेंही मत असे कीं, हिंदुस्थानच्या लोकांची घरांत किंमत वाढविण्यासाठीं त्यांनीं परराष्ट्रांत जाऊन आपली किंमत करून घेतली पाहिजे. त्यांनीं सर्व जगाचें रहिवाशी बनलें पाहिजे. पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही जातां येईल किंवा राहतां येईल अशी त्यांनीं आपली संस्कृती आणि रीतरिवाज बनविले पाहिजेत. प्रत्येक

राष्ट्रांतिल मोठाल्या शहरीं आपल्या लोकांची वस्ती झाली पाहिजे आणि त्या वस्तीचा उपयोग हिंदी प्रवाशांच्या कामीं झाला पाहिजे. हिंदी मनुष्यांस स्वदेश व परदेश हें घर अंगणाप्रमाणें वाटून त्यांनीं सर्व जगांत आपली किंमत वाढविण्यासाठीं मुक्तपणें संचार करणें अवश्य आहे; वगैरे-संबंधीं त्यांचे विचार खासगी संभाषणांत नेहमीं ऐकूं येत. हे त्यांचे विचार प्रत्यक्ष आचारांत आणण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा अशा रीतीनें पूर्ण झाली. त्यांनीं स्कॉटलंडच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवलें व तेथून त्यांच्या आयुष्यांतील खऱ्या कामगिरीस प्रारंभ झाला.

स्कॉटलंडला पोहोंचल्यावर त्यांनीं ग्लासगो येथील मेसर्स वर्ड अँड टॅटलॉक नांवाच्या कंपनींत इलेक्ट्रिशीयन [विजेचे तज्ज्ञ] म्हणून नोकरी धरली. व ग्लासगो अँड वेस्ट स्कॉटलंड टेक्निकल कॉलेजमध्यें विशिष्ट विद्यार्थी [Special Student] या नात्यानें प्रवेश करून घेतला. स्कॉटलंडमध्यें ते फक्त चवदा महिने होते. नंतर तेथून ते अमेरिकेंत गेले. स्कॉटलंडमधील ज्या वर्ड अँड टॅटलॉक कंपनींत हे इलक्ट्रिशियन होते, तिच्या मालकानें शंकररावांचें काम व हुषारी पाहून त्यांना पुढीलप्रमाणें प्रशंसापत्र दिलें आहे.

" रा. शं. ल. गोखले हे बरेच दिवसांपासून आमच्या कारखान्यांत इलेक्ट्रिशियनचें काम करीत आहेत. आम्हीं जीं यंत्रें बनवितों तीं बाहेर पाठविण्यापूर्वी रा. गोखल्यांकडून तीं योग्य असल्याची परीक्षा करून घेतों. व तीं त्यांनीं योग्य ठरविल्यानंतर विकावयास काढतों. याखेरीज रा. गोखले स्वतः विजेच्या व इतर दुसऱ्या यंत्रांचे नमुने आम्हांला करून देत असतात. तीं तयार होत असतां त्यांवर गोखल्यांचीच देखरेख असते. गोखल्यांनीं सुचविलेल्या सुधारणांप्रमाणें आम्हीं तयार केलेलीं यंत्रें उत्कृष्ट होऊनही तीं तयार करण्यास आम्हांस श्रम व पैसा फार कमी लागला. रा. गोखल्यांचा सहवास आम्हांस अशा प्रकारें फार फायद्याचा झाला. "

[सही] जे. टी. टॅटलॉक्.

या प्रशंसापत्रावरून शंकररावांची अलौकिक योग्यता कळून येते. हिंदुस्थानांतील मोठमोठे कारखाने अगर उद्योगधंदे ' युरोपियनांच्या देखरेखीखेरीज नीट चालूं शकत नाहींत ' अशी वारंवार फुशारकी मारली जाते. ही फुशारकी कधीं कधीं सार्थही आहे. परंतु हिला ' क्रिया केवलमुत्तरं ' असें रा. गोखले यांनीं वरील पत्रद्वारें योग्य उत्तर दिलें आहे. महाराष्ट्रीयांच्या किंवा हिंदवासीयांच्या अंगीं असलेल्या कर्तबगारीस अवकाश मिळतांच ती कसें कार्य करूं शकते हें शंकररावांनीं आपल्या उदाहरणानें सर्व जगास व वेळोवेळीं हिंदी लोकांचा पाणउतारा करणाऱ्या स्वदेशी व परदेशी वावदूकांस स्पष्ट दाखविलें आहे. उद्यम दृष्टीनें देखील ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. सांधे आणि साधनें यांची अनुकू-

लता मिळतांच जगांतील इतर राष्ट्रांतील लोक जर पाहिजे तीं कार्यें करूं शकतात तर हिंदी मनुष्यालाच तसें करण्यास काय म्हणून अडचण पडावी ? खरी अडचणच संधि मिळविण्याचाच आहे. संधि वायां घालविणारीं माणसें महाराष्ट्रांतही असतील तशीं तीं इतरत्रही सांपडतील. परंतु संधीचा अभाव हें आमचे देशांतील कर्तबगारी न दिसण्याचें मोठें कारण आहे येवढेंच आमचें म्हणणें आहे. असो.

अमेरिकेंत गेल्यावर शंकररावांनी (the unemployment problem) ' बेकारीचा प्रश्न' नांवाचें सोशियालिझमच्या तत्त्वांचें विवरण करणारें एक पुस्तक लिहिलें. त्यांतील मतें प्रचलित सोश्यालिझमच्या मतांहून कांहींशीं भिन्न आहेत. आपल्या पुस्तकांत नमूद केलेलीं मतें खोडून काढण्याकरितां शंकररावांनीं तेथील सोशियालिस्ट मंडळींना आव्हान केलें. व त्याकरितां, आपलीं मतें खोडून काढणारांस शंभर पौंडांचें बक्षिस देखील लावलें. पण, ' काळा आदमी ' म्हणून त्यांची कोणी दाद घेतली नाहीं, उलट हेटाळणी करूं लागले. काळा हिंदी मनुष्य म्हणजे जवळ जवळ रानटी, अपक्व विचाराचा, अशी त्यांची समजूत आमच्या हितशत्रूंनीं करून दिलेली. आणि मुख्यत्वें परदेशांत जाणाऱ्या लोकांची मोठी संख्या मजुरांची असल्यामुळें ' हिंदी आणि कूली ' हे शब्द जवळ जवळ परदेशांत समानार्थक मानले गेले आहेत. त्यामुळें शंकररावांच्या आव्हानाकडे कोणीं लक्ष न देणें साहजिक होतें. त्यांचा तो समज, येथील आमच्या राजकीय पारतंत्र्यामुळें पुसून टाकणें अवघडही झालें होतें. पण काळ बदलत आहे. सुरेशश्चंद्र विश्वास, विवेकानंद, रामतीर्थ व या स्वामींची शिष्य मंडळी, रवींद्रनाथ टागोर, लजपतराय, गांधी, शंकरराव आणि बरेच हिंदी विद्यार्थी वगैरे लोकांनीं परदेशांत जाऊन आपल्या कर्तबगारीनें व बुद्धिमत्तेनें वरील समज बदलून टाकण्यास फार मदत केली आहे. हिंदी शिपायांनीं जर्मन चढाईपासून फ्रान्सचें रक्षण केल्यामुळें तर तो कुलीपणाचा डाग फार झपाट्यानें पुसून जात आहे. राष्ट्रसंघांत हिंदुस्थानचें नांव दर्ज झाल्यापासून व हिंदुस्थानला अंतःस्वराज्याचा कांहीं अंश मिळाल्यापासून वरील समज नष्ट होण्यास बरीच मदत होण्याचा संभव आहे. असो.

शंकररावांचें आव्हान, बरेच दिवसपर्यंत वरील समजामुळें, कोणींच स्वीकारलें नाहीं. मात्र शंकररावांचा त्यांच्याशीं वाद करून आपलीं मतें त्यांच्याकडून कबूल करून घेण्याचा प्रयत्न चालूच होता. व त्यांच्या प्रयत्नाला यश आलें, त्या लोकांना पुढें पुढें शंकररावांची किंमत कळून आली त्यांनीं शंकररावांचें म्हणणें ऐकून घेतलें व त्यांचीं बरींच मतें योग्य असल्याचें कबूलही केलें.

हल्ली शंकरराव, अमेरीकेंतील स्केनेकटेडी येथील " जनरल इलेक्ट्रिक कंपनी या नांवाच्या एका जगद्विख्यात कंपनीमध्यें ' मॅग्नेटिक इंजिनीअर ' अशा नव्या होऊं घातलेल्या विद्युत् शास्त्रांतील एका शाखेवर नोकर आहेत. कंपनीनें त्यांना मुख्य नेमून त्यांचे हाताखालीं चार अमेरिकन तज्ज्ञ मदतीस दिले आहेत. ' बरोज मेथड ' नांवाच्या विद्युत् मापकाच्या जागीं त्यांनीं ' एस एल परमियामिटर ' नांवाचें यंत्र काढलें असून त्याची श्रेष्ठता स्थापित करण्यांत ते गुंतले आहेत.

शंकररावांच्या बाबतींत आणखी एक विशेष गोष्ट म्हटली म्हणजे त्यांनीं स्वदेशांतील पैसा, इतर लोकांप्रमाणें, परदेशांत न नेतां तो स्वतःच्या मेहनतीनें तेथेंच कमवून आपला चरितार्थ चालविला होता. हिंदुस्थानांत एक तप नोकरी करून स्वतःचा संसारखर्च भागवून सांचविलेला त्यांचा पैसा, बँकांच्या बावटळींत नाहींसा झाला होता. तोही खळगा त्यांनीं परदेशांत केलेल्या मिळकतीवर भरून काढिला. नुसता पैसाच मिळविणें व त्याचा संचय करून ठेवणें हें शंकररावांचें ध्येय नाहीं. खाणेंपिणें व कपडालत्ता यांच्या बाबतींत चैन करणें हें त्यांना माहित नाहीं. परदेशांत जाऊन आज दहा वर्षें झालीं. येवढ्या अवधींत त्यांनीं आपला आहार येथल्याप्रमाणेंच साधा ठेवला असून त्यांची शरीरप्रकृति येथल्या पेक्षांही सुदृढ आहे. मद्यमांस सेवन केल्याखेरीज परकीय थंड देशांत सुखानें राहतां येणें अशक्य आहे, असें म्हणणारांस त्यांनीं आपल्या राहणीनें चोख उत्तर दिलें आहे. असो.

उत्तरोत्तर शंकररावांच्या हातून शास्त्रीय जगांत नवेनवे शोध लागून त्यांच्या कर्तबगारीनें त्यांच्या मातृभूमीचें–या भारतमातेचें–मुख परदेशांत उज्वल होत जावो, व शंकररावांना दीर्घायुरारोग्य लाभो, असें चिंतून त्यांचें हें अनुकरणीय चारित्र तात्पुरतें आटपतें घेतों. "

नागपूर येथील 'उद्यम' मासिकाचे संपादक श्रीयुत माधवराव पाध्ये बी. ए. बी.एल. यांनीं प्रिन्सिपाल शंकरराव गोखले एम् ए.यांचें चरित्र जें लिहून प्रसिद्ध केलें तें वर दिलेंच आहे. परंतु येथें माधवराव पाध्यें यांचे प्रथम आभार मानणें भाग आहे. कारण आमचे श्रम त्यांनीं वांचविले आहेत. रा. रा. शंकर राव गोखले यांनीं १९१० सालीं इंदोर येथील होळकर कॉलेजची प्रोफेसरशिप त्या वेळच्या वातावरणामुळें सोडिली होती. परंतु पुन्हां त्याच कॉलेजाचे ते गेल्या सालीं (Principal and consulting Engineer) प्रिन्सिपाल आणि कनसलटिंग इंजिनियर होते. हल्ली ते अमेरिकेला गेले आहेत. यांना एक मधुसूदन नांवाचा मुलगा असून तो कॉलेजांत आहे.

भायंदर येथील गोखले.

दळें येथें कोनकर गोखले म्हणून आहेत. डोंगराच्या कोनांत यांचीं घरें आहेत, म्हणून यांना कोनकर गोखले असें म्हणतात. ते प्रथम होळी येथें रहात होते. जनार्दन, नारायण व हरि महादजी हे सर्व दळें येथें शेतीवाडी करून रहात आहेत. तसेंच गणेश व वासुदेव केशव हेही दळें येथेंच रहात आहेत.

कोंकणांत होळी हा गांव जैतापूर बंदरापासून दोन मैल आहे, आणि दळें हा गांव एक मैल आहे. ह्या गांवचें गोखले घराणें कोंकणांत व देशावर बरेच ठिकाणीं पसरलें आहे ह्या घराण्यांतील कांहीं पुरुष दळ्यांहून डोंगर या गांवीं जाऊन राहिले. डोंगर या गांवाहून मोरो नारायण गोखले हे प्रथम मुंबई येथें आले.मुंबई येथें केरो लक्ष्मण छत्रे यांच्याकडे मोरो नारायण हे शागिर्दीचें कामावर दरमहा पगार रुपये तीन व जेवण असा ठराव करून राहिले.अशा दारिद्र्यावस्थेंत मोरो पंत दिवस कंठित असतां परमेश्वरास त्यांची दया आली. भाग्योदयाची वेळ आली म्हणजे बुद्धि सुचते अशी म्हण आहे. त्याप्रमाणें एके दिवशीं मुंबई येथें भायंदरच्या कांहीं लोकांची गांठ पडली. ते लोक मोरोपंतास म्हणालेः–" आम्हां ला आमच्या भायंदर गांवाकरितां एक मास्तर पाहिजे" तेव्हां मोरोपंत म्हणालेः– तुमच्या गांवीं मुलें किती जमतील व प्रत्येक मुलाची दरमहा फी काय द्याल? तेव्हां ते लोक म्हणालेः—निदान कमींतकमी ५०।७५ पर्यंत मुलें जमतील आणि आम्ही प्रत्येक मुलामागें एक शेर तांदूळ व एक पैसा दरमहा देत जाऊं. हें ऐकून मोरोपंतांनीं त्यांना सांगितलें कीं, मी आपल्या धन्याची परवानगी घेऊन २।३ दिवसांत तुमच्या गांवीं येतों. हें ऐकून त्या लोकांस आपणास चांगला मास्तर मिळाल्याबद्दल आनंद झाला.

इकडे मोरोपंतांनीं घरीं येतांच आपल्या मालकास वरील हकिकत सांगून मला तिकडे जाण्यास आपणांकडून रजा मिळावी असें दर्शविलें. हें ऐकून मालकांनीं मोठया आनंदानें त्यांस रजा दिली. मालकांची परवानगी मिळाल्यावर दुसरेंच दिवशीं मोरोपंताची स्वारी भायंदर गांवीं हजर झाली. भायंदर गांवीं मोरोपंतांनीं शाळा सुरू करून सुमारें दोन वर्षें झाल्यावर आपले धाकटे बंधु चिंतामण यांस कोंकणांतून आणवून भायंदरजवळ मुर्धे नांवाच्या खेडयांत त्यास शाळा घालून दिली. याप्रमाणें मोरो व चिंतामण या द्वयबंधूंनीं ४।५ वर्षांत थोडासा द्रव्यसंचय केला. याच सुमारास बी. बी. अँड सी. आय रेलवे कंपनीनें वसई व भायंदर या दोन पुलांचीं कामें सुरू केलीं. त्यामुळें तेथें मजूर लोकांची वस्ती बरीच झाली. अशा संधीस मोरो व चिंतामण यांनीं मजुरदार लोकांच्या सोयी सोठीं या ठिकाणीं एक किराणा मालाचें दुकान सुरूं केलें. या दुकानाचे धंद्यांत उत्तम किफायत झाल्यामुळें, मोरो नारायण यांनीं भायंदर येथें कायम रहाण्याचें

घर बांधिलें आणि ज्या जमिनींत मीठ पिकते अशा जमीनी खरेदी केल्या चिंतामण नारायण यांनीही मुर्धे येथें किराणा मालाचे दुकान सुरूं केलें

याप्रमाणें मोरो नारायण गोखले यांच्या खटपटीनें त्यांना संपन्न स्थिति प्राप्त झाली पुढें यांचे कनिष्ठ बंधु महादेव व हरी हे कोंकणांतून भायंदर येथें आले. पुढें सर्वांनीं मिठाचा व्यापार सुरूं केला. या मिठाच्या व्यापारांत हजारों रुपये कमाविले. मोरो नारायण यांनीं अविश्रांत श्रम करून, एकामागून एक याप्रमाणें आपल्या बंधूंना कोंकणातून आणून निश्चयानें व चिकाटीनें प्रयत्न करून हजारों रुपये कमाविले आणि भायंदर गांवाच्या व लगतच्या खेडे गांवांतल्या लोकांची प्रीति संपादिली. पुढें चौघां बंधूंनीं एक विचारें एकत्र राहून प्रपंच मोठया थाटानें चालविला. परंतु हें जास्त वर्षें चाललें नाहीं. कारण ज्यांच्या परिश्रमानें संपन्नता प्राप्त झाली ते पुरुष एकामागून एक या इहलोकची यात्रा संपवून परलोकवासी झाले. त्यांच्या पश्चात् कलहरूपी पिशाच्यानें गृहप्रवेश करून आपला अम्मल बसवून त्यानें एका घराचीं सात घरें केलीं. हल्लीं भायंदर येथें या गोखल्यांचीं सात घरें झालीं आहेत. पूर्वीचें दुकान अद्यापि चालू आहेच. त्यानंतर अलीकडे चिंतामण नारायण यांचे पुत्र रघुनाथ चिंतामण यांनीं दुसरें दुकान चालविलें आहे. या कुटुंबांत पाश्चात्य पदवीधर असें एकच आहेत ते रघुनाथ चिंतामण यांचे चिरंजीव येशवंतराव हे बी. ए. आहेत. महादेव नारायण गोखले यांनीं दुसरे गोखले घराण्यापैकींच दत्तक घेतला. दत्तक पुत्र सखाराम महादेव हे चांगले संपन्न आहेत. या घराण्यांतील सर्व मंडळी व्यापारी आहेत. या सात घरांतील मिळून कदाचित् २।३ इसम नोकर असतील असें वाटतें. भायंदर हा गांव स्टेशनपासून अगदीं जवळ आहे. महादेव नारायण यांचे दत्तक पुत्र सखाराम, हे कुवेशी वाडा-खोल येथील असून यांचें पूर्व घरचें पूर्ण नांव श्रीधर बाळकृष्ण गोखले असें आहे.

गिमवणें येथील गोखले.

श्रीयुत रा. रा. हरी केशव गोखले यांच्या घराण्याची माहिती व त्यांचें चरित्र.

प्रांत कोंकणमधील राजापूर तालुक्यांत होळी दळें या नांवाचें एक खेडें आहे. या गांवीं हरीभाऊंचे पूर्वज रहात होते. महादेव गणेश यांचे पुत्र हरि यांचा प्रवास बराच झाला होता. श्रीमंत पेशवे यांचे उपाध्याय कवे यांची कन्या, हरि महादेव यांना दिली होती. हरि महादेव हे मोठे धूर्त व कर्तृत्ववान पुरुष अस-

त्यामुळें, अदमासें शके १६६४ त झांशी येथें फडणविशीच्या अधिकारावर दाखल झाले. यांनीं आपली एक कन्या ढमढेरे घराण्यांत दिली होती. यांनीं आपलें रहाण्याचें ठिकाण दापोली नजीक गिम्हवणें या गांवीं केलें होतें. यांनीं झांशी येथें नोकरी संभाळून सोन्याचांदीचा व्यापार चालविला होता. हे ज्या ज्या वेळीं आपल्या गांवीं येत, त्या त्या वेळीं अहंमदनगरच्या रस्त्यानें घोड्यावरून येत जात असत. श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर येथें शके १६९९ त व धोममहाबळेश्वर येथें शके १७१३ त हरि महादेव यांनीं जाऊन तेथील क्षेत्रोपाध्ये यांचेकडे जे लेख लिहून दिले आहेत ते लेख यांचे पणतू हरि केशव यांनीं पाहिले आहेत.

हरि महादेव यांचे पुत्र रामचंद्र हे गिम्हवणें येथेंच रहात असत. गिम्हवणें येथील घर रामचंद्र यांचे कारकीर्दीत जळाल्यामुळें, जुने कागद सर्व जळाले. परंतु सदरहु कागद रामचंद्र यांच्या पहाण्यांत आले असल्यामुळें, त्यांनीं आपले पुत्र केशव यांस पूर्वीची सर्व माहिती दिली होती. केशव रामचंद्र यांचें बालपण विशेषेंकरून आजोळीं (केळशी येथील परांजपे यांचेकडे) गेलें असून, मराठी शिक्षणही तेथेंच झालें. नंतर दापोली येथें थोडा इंग्रजी अभ्यास झाल्यावर, मुंबई मुक्कामीं कंट्राक्टरकडे कारकूनाचे कामावर राहिले. सुमारें १८६८ सालीं, ता. महाडमधील मुगा बिरवाडी येथें पोष्टमास्तर होते. पुढें महाड, माणगांव वगैरे ठिकाणांहून सावंतवाडी संस्थानांत आकेरी या गांवीं सन १८८५ सालांत प्रेनशन होण्यापूर्वीच वारले. केशवराव ज्या दिवशीं रात्रौ वारले, त्याचे दुसरे दिवशीं सकाळीं त्यांचे पुत्र हरीभाऊ हे तेथें पोंचले. हरीभाऊंनीं वडिलांची क्रिया तेथेंच केली. केशवराव यांना बुद्धिबळें खेळण्याचा नाद विशेष होता. त्यावेळीं दापोली येथें लष्करी ठाणें असल्यामुळें, युरोपियनांची वस्ती होती. त्यांपैकीं कांहीं युरोपियनांस हे बुद्धिबळें खेळण्यास शिकवीत. यांची पत्नी ज्यावेळीं वारली त्यावेळीं यांचे पुत्र हरीभाऊ यांचें वय ५।६ वर्षांचें होतें. केशवराव यांनीं, एक पुत्र असल्यामुळें, जरी तरुणपणांत कुटुंब वारलें, तरी स्वार्थाकडे दृष्टी न देतां पुढील दिवस विधुरावस्थेंतच कंठिले.

रा. रा. हरि केशव गोखले यांचा जन्म शके १७८१ त गिम्हवणें मुक्कामीं झाला. हरीभाऊंनीं " घड्याळाचा व्यापार " या विषयावर जें व्याख्यान दिलें त्या व्याख्यानाचे आरंभीं त्यांनीं आपली बाळपणापासूनची सर्व हकीकत दिलें; असून, आपण वॉचमेकर होऊन व्यापारी कसे झालों, वगैरे सर्व अनुभवाची माहिती दिली आहे. हरीभाऊंनीं आपल्या हातानें आपली सर्व हकीकत लिहून तयार केली आहे. म्हणून त्यांनीं आपली जी माहिती आम्हांला दिली, त्या माहितींत थोडा कमी जास्त फरक करून त्यांच्याच शब्दानें अत्यंत उपयुक्त असलेली माहिती पुढें देत आहें:—

रा. रा. हरीभाऊंची जन्मकुंडली:—

शके १७८१ आश्विन शुद्ध १२, घ. ४५ प. ३९ ता. २६-१२-१९१८ त मुंबई येथील 'संजय' या वर्तमानपत्रांत डेकन मर्चंट असोशीएशनमध्यें 'घड्याळाचे कांटे' या विषयावर दिलेलें व्याख्यान, पुणें येथील वसंतव्याख्यानमालेंत "सोन्याचांदीचा व्यापार" या विषयावरील दहावें व्याख्यान, या व्याख्यानांतील गोषवारा ता. २० मे १९१९ च्या केसरी-वर्तमानपत्रांत आला आहे. ता. २९ जानेवारी १९१९ च्या मुंबईच्या संजयांत व ता. ३० मे. १९१९ च्या दैवज्ञप्रबोधिनी या वर्तमानपत्रांतून "चांदी-सोन्याचा व्यापार" या विषयांवरील व्याख्यानें प्रसिद्ध झालीं आहेत.

घड्याळांचे व्यापाराबद्दल माहिती.

अध्यक्षसाहेब व सभ्यगृहस्थ हो, घड्याळाचे व्यापाराबद्दल धंद्याची अनुभवीक माहिती सांगण्याकरितां मी आपणांपुढें उभा राहिलों आहें. तरी चुकांची क्षमा होऊन त्यांतून कांहीं घेण्यासारख्या गोष्टी वाटल्यास त्यांचा स्वीकार व्हावा अशी प्रार्थना करितों. माझे सांगण्यांत पुढील गोष्टींचें विवरण होईल:—

१ लहानपणचें वय व कुशल गोष्टींची आवड.
२ वॉचमेकर कसा झालों.
३ मी व्यापारी कसा व कां झालों.
४ दुकानांतील मूळचें भांडवल जाऊन तोटा कसा आला.
५ अशा स्थितींत कोणतें इलाज केले.
६ स्नेही व ओळखीचे मंडळीकडून घेतलेलें कर्ज.
७ मारवाडी यांजकडून घेतलेलें कर्ज व त्यानें केलेली खोटी फिर्याद.
८ मीं आपले नांवाचीं स्विझरलंड मधून आणविलेलीं वॉचेस व त्यासंबंधीं झालेले व्यापारी लढे.
९ क्लॉकचा व्यापार.
१० युरोपियनांचा स्वदेशाभिमान व जातभाईस मदत.

११ युरोपियन दुकानीं इंडियन लोकांनीं माल घेतल्यानें नुकसान कसें होतें.
१२ इंडियन शॉपमध्यें माल घेण्यास इंडियन लोकांस आग्रह.
१३ कोणतीं घड्याळें घ्यावीं. व तीं कोणत्या दुकानीं घ्यावीं.
१४ इंग्लिश व स्विसवॉच यांची तुलना.
१५ चांदीचें वॉच व सोन्याचें वॉच ओळखण्याच्या खुणा.
१६ दुरुस्तीचें काम माझे दुकानीं कसें चालत असे याबद्दल इंडियन व युरोपियन गृहस्थ यांचे दोन दाखले.
१७ नवा माल माझे दुकानांतून कोणत्या दरजाचा विकला जात असे त्याजबद्दल इंडियन व युरोपियन गृहस्थांचे दोन दाखले.
१८ घड्याळाचें पुस्तक कां लिहिलें व त्यांत कोणती माहिती आहे.
१९ घड्याळाचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास.
२० स्विझरलंडचें वर्णन.
२१ पुस्तकांबद्दल इंडियन व युरोपियन गृहस्थांचे अभिप्राय.

येणेंप्रमाणें हकिकत मंडळीना कंटाळा किंवा त्रास न होतां थोडक्याच अवधींत सांगतों.

जिल्हा रत्नागिरी, ता. दापोली, मौजे गिम्हवणें येथें माझा जन्म झाला. उजळणी आणि वाचन तेथील शाळेंत झालें. नंतरचें शिक्षण जिल्हा कुलाबा, ता० महाड, मौजे बिरवाडी येथें झालें. येथें माझे वडील पोष्टमास्तर होते. तेथील बाळशास्त्री जोशी हे माझे लहानपणचे स्नेही होत. बाळशास्त्री हे कागदावर चित्रें काढणें, देवांचीं मखरें तयार करणें, जाळ्या कोरणें, वगैरे कामांत निपुण होते. मी आपला अभ्यासाशिवाय मिळेल तितका वेळ स्नेह्यांकडे घालवीत असल्यामुळें, त्यांच्या गुणाचा लाभ मला साहाजिक झाला. लहानपणीं गारुड्याचा खेळ करणें, कसरत करणें, पोहणें व तद्हस्तहेचीं मातीचीं चित्रें करणें, दिवाळीचे इंगामी नळे, चंद्रज्योती वगैरे दारूकाम, नाटकांतील जुन्या पद्धतीचे मुकुट करणें आणि बुद्धीबळें खेळणें, या कामांत माझा वेळ जाई. बिरवाडीचे शाळेंत तीन इयत्तेपर्यंत शिक्षण झाल्यावर, तालुके दापोली येथील शाळेंत पुढील शिक्षण झालें, स.१८७७त मराठी सहावे इयत्तेची परीक्षा रत्नागिरी येथें झाली. त्यावर्षी पास झाल्यावर दापोलीनजीक जालगांव येथें पांच रुपये पगारावर शाळामास्तराची नोकरी घरली. खासगी पद्धतीनें थोडेसें इंग्रजी शिक्षण तेथेंच केलें. कांहीं तरी उद्योग (धंदा) स्वतंत्र काढावा असें वरचेवर मनांत येई.

विद्यार्थी असतांना दापोली येथील शाळेंत एक घड्याळ पाहिजे होतें. तें कसें चालतें, त्याचे ठोके कसे वाजतात वगैरे जाणण्याची मला उत्कंठा विशेष लागली,

परंतु कांहीं इलाज चालेना. जालगांवीं रहात असतांना शेजारच्या घरीं एक लांकडाचें टाईमपीस होतें तें बंद पडलें होतें. तें उघडून पहाण्यास मालकाची परवानगी मिळाली. परंतु घड्याळ उघडून पहाण्यास हत्यारें नाहींत. तेव्हां चाकू सुरी यांच्या सहाय्यानें तें उघडून, प्रत्येक चक्रावर लाल शाईचे आंकडे घालून, पुन्हां पुन्हां जुळवून पाहिलें. त्यांस तेल देऊन तें चालू केलें. तेंच घड्याळ आमचे गुरुस्थानीं झालें. नंतर मोठी घड्याळें उघडूं लागलों. चांगली माहिती होण्याकरितां फुकट काम करूं लागलों. एकेवेळीं शिमग्याचे सुट्टींत मुंबईला गेलों. आणि चोरबाजारांत एक रासकोपचें वॉच ४।५ रुपयांत विकत घेतलें. तें घड्याळ कांहीं वेळ चाले व बंद पडे अशी स्थिती त्या-वॉचची होती. दुरुस्तीचीं चार हत्यारें विकत घेतलीं. कोंकणांत परत आल्यावर त्या घड्याळाचे सर्व भाग उलगडून जुळविण्याचे खटपटीस लागलों. पुढें घड्याळें दुरस्तींत व बुकें बांधण्यांत थोडे पैसे मिळवून, घड्याळ दुरुस्तीचें सामान मुंबई-हून आणविलें. एका सोनाराचे मुलास शिकाविण्यास जात असें. तेव्हां सोनारी कसब सर्व लक्ष ठेवून पाहिलें होतें. त्याचा उपयोग हल्लीं मला सोन्याचांदीचे धंद्यांत होत आहे. शाळाखात्यांत सहावर्षें नोकरी केली. मुंबई येथें कस्टम खात्यांत नोकर असलेले रामचंद्र दाजी कानिटकर यांनीं मला मदत करण्याचें कबूल केल्यामुळें मी मुंबईला गेलों, आणि कानिटकर यांच्या सहाय्यानें घड्याळें नीट करण्याचें काम करूं लागलों. मात्र सकाळीं घरीं काम करावें व दुपारीं कंपनींत फुकट काम करावें. याचे कारण घड्याळासंबंधीं सर्व माहिती मिळावी म्हणून ! अशा रीतीनें सुमारें दोन वर्षें गेल्यावर कामांत चांगलीच शास्त्रोक्त सुधारणा झाली. सन १८८४ सालांत सावंतवाडी संस्थानांत आमचे वडील पोष्ट मास्तर होते. त्यांना भेटावयास गेलों. वडिलांनीं माझा हात व पत्रिका पाहून मला सांगितलें कीं, तूं पुष्कळ पैसे मिळवीशील व माझ्या पैशापासून तुझें ऐश्वर्य वाढेल.

मी परत मुंबईला आल्यावर आमचे वडील सन १८८५ चे जून महिन्यांत कैलासवासी झाले. त्यांच्याजवळ दागिने व रोकड मिळून अदमासें एक हजार रुपयांचा विषय होता. पूर्वी वडिलांनीं सांगितलें होतें कीं, माझ्या पैशापासून तुला पुष्कळ पैसा मिळेल हें लक्षांत आणून, रोज घड्याळें घांसून दोन तीन रुपये मिळविण्यापेक्षां व्यापार करून पहाण्याची इच्छा झाली. सन १८८५ अखेर कांदेवाडींत शांतारामाचे चाळींत प्रथम दुकान उघडलें. हें दुकान वास्तवीक काळबादेवी रोड किंवा ज्या ठिकाणीं घड्याळांचीं दुकानें बरींच आहेत अशा बाजारांत उघडलें पाहिजे होतें; परंतु मनाचा असा एक हेतु होता कीं, आपल्या दुकानाकडे आपले व्यवसायबंधूंनीं वक्रदृष्टीनें पाहूं नये. एकाच व्यवसायाचे लोकांनीं

शेजारीं शेजारीं दुकानें घालणें माझ्या स्वभावास आवडत नाहीं. धंद्याचे सुरवातीस क्यॉटलाग काढणें, हॅंडबिलें काढणें व जाहिराती देणें वगैरे बाबतींत, सखाराम महादेव टिळक वॉचमेकर यांचा सल्ला मी घेत असें. कांचकपार्टे घेतलीं, हत्यारें घेतलीं, घड्याळांची खरेदी कंपन्यांतून व इतर व्यापारी मंडळीकडून करूं लागलों. क्यॉटलाग छापले. विक्री व रिपेअरचीं कामें बरींच येऊं लागलीं. तेव्हां दुकानांत एक पगारी नोकर रिपेअर खात्याकडे ठेविला. त्यानंतर लवकरच दुसराही एक नोकर ठेवावा लागला.

धंद्याचे सुरवातीनंतर एक वर्षाचे आंत ' गोल्डन् ग्यॉंग ' ची मंडळी भेटली. परंतु कोणतेही प्रकारें फसलों गेलों नाहीं. त्या प्रसंगाची थोडक्यांत हकिकत सांगतों:—एक पारशी गृहस्थ शरीरानें मजबूत, झुलपें राखलेला, काळासांवळा रंग असलेला, दोनतीन वेळां दुकानांत येऊन ४००।५०० शें रुपयांचा माल (घड्याळांचा) बाहेर गांवीं पाठविण्याचा आहे, असें म्हणून आमचे शेटजी यांस तुम्ही येऊन भेटा मी तुमच्या बरोबर येतों. तुमची खात्री झाल्यावर व्यवहार करा असें म्हणूं लागला. तेव्हां मीं तर्क केला कीं, हा मनुष्य मार्केट सोडून गल्लींतील लहानशा दुकानामध्यें माल खरेदी करूं कां इच्छितो ! तेव्हां हें कांहीं तरी गूढ असलें पाहिजे असें मला वाटलें. तरी पारशी याचे आग्रहास्तव, मी बरोबर एक नोकर घेऊन त्याच्या बरोबर गेलों. भुलेश्वरा जवळ भोईवाडा आहे त्या गल्लींत गेलों. प्रथम मी नोकरास वर पाठविला. त्यानें वर या म्हणून मला हांक मारिली तेव्हां मी वर गेलों. मोठ्या पेढीवाल्याप्रमाणें बैठकीची व्यवस्था केलेली होती. तेथें एक भंगसाळी बसला होता. त्यानें मला प्रश्न केला कीं, ' तमे कोण छे ' ? मी कोंकणस्थ ब्राह्मण असें म्हणतांच, त्याचा चेहरा एकदम उतरला. पेढीवाल्याजवळ सध्या मालाचे रुपये देण्यास नाहींत; म्हणून एका करंड्यांत सोन्याचे दागिने घालून सील करून, आमचे जवळ ठेवण्यास देणार होते.आणि माल पोंचून पैसे आल्यावर ते आम्हांस देऊन, नंतर तो करंडा परत नेणार होते. त्यांचा हा मजकूर ऐकून, मीं त्यांना सांगितलें कीं, आमचे शेट रोखीचा व्यापार करीत असतात. तथापि त्यांना विचारून आपणांस कळवूं. असें सांगून आम्ही परत आलों. पुढें कांहीं एक झालें नाहीं. मात्र तपासाअंतीं असें कळून आलें कीं. त्या घरांत तिसरे मजल्यावर खाणावळ होती. ज्या ठिकाणीं पेढीची व्यवस्था केली होती तेथें जुगार चालत असे.

दुकान उघडल्यापासून सुमारें १॥ वर्षानें असें आढळून आलें कीं, दुकानांतून वॉचेस व शेडे वगैरे सामान चोरीस जातें. तेव्हां दुकानांतील ज्या नोकरानें हें कृत्य केलें; त्या नोकरास दुसऱ्या नोकराच्या सहाय्यानें मुद्देमालासह पकडून, नंतर त्यास कायमची रजा दिली. एकादे वेळीं वाईट गोष्ट बऱ्याकरितां होते तसें झालें. ' झोंपेत दचकून एकाएकीं मनुष्य जसा खडबडून उठतो ' तसें ह्या

वेळीं माझें झालें. आपल्या दुकानाची काय व्यवस्था आहे हें पहाण्याची सुबुद्धी मला झाली. दुकानांत माल किती आहे, आपण लोकांचें देणें किती आहे; वगैरे हिशोब करून पहातां, १९०० रु. अजिबात तोटा झाला. आतां प्रसंग फार कठीण येणार असें वाटून अंतःकरणास असह्य वेदना होऊं लागल्या. त्यामुळें एक एक रात्र झोंप सुद्धां येईना. कित्येकांना १९०० शें रुपये म्हणजे काय ? असें वाटेल खरें ! व आज मीही तसें म्हणण्यास तयार आहें. परंतु त्यावेळीं माझी जी भयंकर स्थिती होती तिचें कारण शाळामास्तराचे कार्मी दहा रुपये पगारावर राहून राखलेली शिल्लक अदमासें तीनशें रुपये व बडिलार्जित रक्कम अदमासें एक हजार ही सर्व शिल्लक जाऊन जेव्हां एकोणीसशें रुपये कर्ज झालें तेव्हां माझ्या संकटाची कल्पना मलाच माहीत ! आतां या कर्जातून मी मोकळा होईन किंवा नाहीं हा विचार वारंवार पुढें उभा राहात असे. मोठ्या धैर्यानें व नेटानें चिंताग्रस्त न बसतां, " जेथें सांडलें तेथेंच शोधिलें पाहिजे. " अशी मनाची समजूत करून व्यापारामध्यें घुन्हां कंबर बांधिली.

कोणतीही गोष्ट गुप्त असते तोंपर्यंत त्या गोष्टीची महती असते. ह्या वेळीं मला सर्वांना असें सुचवावयाचें आहे कीं, ज्या वेळीं मी व्यापारास आरंभ केला त्या वेळीं असा निश्चय केला होता कीं, व्यापारांत भागीदार म्हणून कोणासच घ्यावयाचें नाहीं. मी जो निश्चय केला होता तो मला ह्या प्रसंगीं फारच उपयोगीं पडला. मला कर्ज झालें आहे हें मीं कोणासच कळूं दिलें नाहीं. जर कोणी भागीदार असता, तर कर्ज चवाट्यावर येऊन दुकानाची बजबज होऊन दिवाळें काढून पळून जाण्याची पाळी येण्याचा संभव होता. माझे व्यापारांत मला तोटा आल्याबरोबर एक गोष्ट सुचली ती ही कीं, आपले आयुष्याचा विमा उतरावा. आणि त्याप्रमाणें एक हजार रुपयांचा ओरिएंटल लाइफ इन्शुअरन्सचा, आणि सोळाशें रुपयांचा म्युच्युअल प्रॉव्हिडंट सोसायटीचा असे दोन विमे उतरिले आणि ह्या गोष्टीमुळें जिवास बराच धीर आला.

दुकानांत कारकून ठेवून वर्षांतून दोन वेळां आढावे काढूं लागलों. त्या वेळेपासून आज पावेतों सुमारें ३० । ३२ वर्षें व्यवस्थेशीर चाललें आहे. म्हणून म्हणतों, जेवढें व्यापारी असतील त्यांनीं वर्षांतून दोन आढावे काढावेत. असें केल्यानें हितच होईल. दोनतीन वर्षें जरा नेटानें सारखें काम चालूं ठेवितां, आमचे दुकान रिपेअरमध्यें व खात्रीचे मालामध्यें बरेंच नांवाजल्यामुळें, पुढें दरमहा साठ रुपये पगारावर मुख्य रिपेअरचे कामावर एक इसम ठेवून, त्याच्या हाता खालीं पांच सहा नोकर ठेविले. जास्त फायद्याकडे दृष्टी न ठेवितां, गिऱ्हाईकांचें काम उत्तम करून देण्यांत जास्त वेळ लागला तरी हरकत नाहीं; परंतु काम चोख करून देण्याचें माझें ध्येय असल्यामुळें गिऱ्हाईकें संतुष्ट असत. जास्त फायदा झाला नाहीं तरी चालेल; परंतु काम उत्तम झालें पाहिजे. अशी नोकरांना

माझी ताकीद असे. तात्पर्य लौकिक चांगला व्हावा, हा हेतु. घड्याळ दुरुस्तीचे कामांत मला जरी विशेष फायदा झाला नाहीं; तरी त्या बाबतींत मोठमोठे लोकांत चांगला लौकिक संपादन झाल्यामुळें, घड्याळविक्रीचे कामांत पुष्कळ फायदा होत असे. मुंबई म्युनिसिपालिटी, जिल्ह्यांतून व तालुक्यांतून डे. ए. इन्स्पेक्टर्स व सबार्डिनेटजजीस आणि मोठमोठ्या धनिक लोकांकडून ग्राहक या दृष्टीनें चांगला फायदा होऊं लागला. अशा स्थितींत परमेश्वरानें मला ठेविल्यामुळें माझ्या मनास समाधान वाटूं लागलें. हा काल सन १८९४ चा होय.

सन १८९० चे सुमारास डी. पी. या नांवाचीं वॉचेस नजरेस आलीं. त्यांची मशीनरी फार चांगली सफाईदार असून टिकाऊ होती. सदर घड्याळामध्यें जे कांहीं फरक करावे असें वाटूं लागलें, त्याप्रमाणें ते करवून व त्यांत सामान उंची प्रतीचें वापरून कंपनीमार्फत सन १८९२ पासून माझे नांवाची वॉचेस मागवूं लागलों. माल फार उत्कृष्ट असल्यानें गिऱ्हाईकांनीं परस्पर स्तुति करावी. तेणेंकरून गिऱ्हाईक फार यावें. असें होतां होतां धंदा फार फैलावला व पैसेही बरेच मिळाले. तथापि भांडवल पुरें पडेना. फेव्हरलुवा कंपनीकडून एक उत्तम घड्याळाचा लॉट माझे हातीं आला. हीं घड्याळें सुटे चावीचीं होतीं. फुलज्युवेल्स असून मजबूत होतीं. त्यामुळें खप फार झाला. त्यांतही पैसे बरेच मिळाले. थोडाबहुत राहिलेला माल कराची येथील व्यापाऱ्यानें नेला. आमचे नांवाचीं वॉचेस सन १८९२ पासून सन १९०७ पर्यंत मागवीत होतों. त्यांत रासकोपच्या आकारायेवढीं मोठीं वॉचेस आर्डर देऊन मागविण्याचें ठरविलें. आर्डर देतेवेळीं नमुन्यापेक्षां फरक कोठें कोठें करावयाचे अडचणी कोणत्या आहेत, तें दाखवून आर्डर कंपनींत नोंदविली. दोन तीन महिन्यांनीं वॉचेस आलीं, घड्याळांवर माझें नांव होतें. परंतु ऑर्डर दिल्याप्रमाणें फेरफार कांहींएक न करितां पूर्वीचें रफ काम तसेंच होतें. म्हणून आर्डर प्रमाणें माल नसल्यामुळें माल घेत नाहीं म्हणून सांगितलें, मॅनेजरानें तिकडे लक्ष न देतां, मला रजिस्टर नोटीस पाठविली. त्यास उत्तर वरीलप्रमाणें हायकोर्ट वकिलाचे मार्फत पाठविलें. तरी मॅनेजरानें मनुष्य पाठवून माल घेऊन जाण्यास सांगितलें. तरी मी गेलों नाहीं. पुन्हां पत्र आलें कीं, किंमतींत सवलत देतों माल घेऊन जावें. तेव्हां मी त्यांस समक्ष जाऊन सांगितलें कीं, केवळ पैशाकरितां दुकान काढिलें नाहीं. या कामांत मीं संपादिलेली अब्रू जाईल. तुमचा माल खराब आहे. माझीं गिऱ्हाईकें तीं घड्याळें घेतील परंतु तीं लवकर बिघडल्यामुळें मला नीट करून देण्याचा फार त्रास होईल. येवढ्याकरितां मला तो माल नको, असें निक्षून सांगितलें. तेव्हां कंपनीनें नाइलाजानें आमच्या नांवाच्या प्लेटी बदलून, त्या मालास ब्रह्मदेशाचा मार्ग दाख-

विला. यावरून इतकें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, जो धंदा आपण काढिला त्या धंद्यांत आपण वाकबगार असलेंच पाहिजे.

आमचे लोक युरोपियन कंपनींत माल घेण्यास जातात. आणि आपले पैसे वाजवीपेक्षां जास्त व्यर्थ खर्च करितात. परंतु आपल्या देशबांधवांकडे तो माल घेण्यास जात नाहींत. याला म्हणावें तरी काय ? माल खराब लागल्यास हिंदी-व्यापाऱ्यास जसें विचारतां येऊन योग्य तें उत्तर मिळेल, तसें परकीय व्यापाऱ्यास विचारतां योग्य उत्तर सुद्धां मिळणार नाहीं. यासंबंधीं एकदोन अनुभविक उदाहरणें देतोः–उमरावतीचे एका धनिक गृहस्थाचे चिरंजीव मुंबईला आले. त्यांनीं एका युरोपियन कंपनींत जाऊन सेंट थॉमसचें टेबल टाईमपीस विकत घेतलें. चारपांच महिने झाले न झाले तोंच तें दर दिवसास १॥ तास मागें राहूं लागलें. दुसऱ्या कांहीं कामाकरितां सदर गृहस्थ मुंबईला आले. तेव्हां सदरहू कंपनींत जाऊन त्या घड्याळाची स्थिती सांगितली. तेव्हां त्यांस चोख जबाब मिळाला कीं, अशा घड्याळास ग्यॅरंटी देतां येत नाहीं.

दुसरे एक गृहस्थ एका संस्थानिकाकडे टयूटर होते. त्यांनीं एका युरोपियन कंपनींतून सन १८८९ सालांत मुंबईला कांग्रेस झाली त्यावर्षी एक वॉच २४ रुपये किंमतीस विकत घेतलें. नंतर दुसरें दिवशीं त्या घड्याळाची काय किंमत असावी, असें विचारण्यास ते आमच्या दुकानीं मजकडे आले. त्यांनीं मला सदरहू घड्याळ दाखविल्यावर, त्याच मेकरचीं घड्याळें आमचेजवळ असलेलीं त्यांना आम्हीं दाखविलीं. तेव्हां ते म्हणालें तुम्ही हीं घड्याळें काय किंमतीस विकतां? मी सांगितलें हें घड्याळ १२ रुपये किंमतीचें आहे. हें माझें उत्तर ऐकतांच, ते टयूटरसाहेब आश्चर्यचकित झाले. आणि म्हणाले-मी कंपनींतून हें घड्याळ २४ रुपये किंमतीस आणिलें. तेव्हां मीं त्यांना सांगितलें कीं, आपले लोक तुमच्यासारखे पुष्कळ फसतात. निव्वळ फयॉशन व भपका पाहून माल घेण्यापेक्षां, योग्य चौकशी करावी. आपल्या देशीव्यापाऱ्याकडून माल घेऊन, त्यांना उत्तेजन द्यावें. उलट देशी व्यापाऱ्याकडे माल घेतल्यास स्वस्त मिळून, देशी व्यापाऱ्यास सहाय्य केल्याचेंही श्रेय मिळेल. युरोपियन दुकानांत व आमचे दुकानांत माल एकच असतो. त्यांत कांहींच फरक नसतो. होल सेलचे दर निराळे असतात. युरोपियन कंपन्यांचा खर्च मोठा असल्यामुळें माल महाग पडतो."

हरीभाऊंनीं सन १८९२ ते ९५ पर्यंत विशेष नेटानें उद्योग करून लोकोपयोगी घड्याळ वापरण्याचे नियम आणि तीं दुरुस्त करण्याची उपयुक्त माहिती या विषयावर एक पुस्तक सन १८९५ त छापिलें. हें पुस्तक फारच प्रशंसनीय केलें आहे. सदरहु पुस्तकावर तज्ज्ञ व विद्वानांचें पुष्कळ अभिप्राय मिळाले आहेत. पैकीं कांहीं अभिप्राय पुढें देत आहें:–

वेस्ट अँड वॉच कंपनी—मि. हरि केशव गोखले यांनीं घडयाळा (वाचिस) संबंधानें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत मौल्यवान् दुर्मिळ व भरंवसा ठेवण्यालायक अशी भरपूर माहिती दिली आहे. आणि ह्या पुस्तकाच्या पुष्कळ आवृत्त्या काढाव्या लागणारच. घडयाळें नीट करणाऱ्याला त्यानें आपल्या कामासाठीं अगदीं नवीन तऱ्हेचीं हत्यारें कोणतीं विकत घ्यावीं, याविषयीं अनुभवशीर अशा सूचना या पुस्तकांत सांपडतील. घडयाळें विकण्याचा धंदा करणारास त्यानें कोणत्या जातीचीं घडयाळें विकावयाला ठेविलीं असतां, त्याच्या व्यापारांत पूर्ण यश मिळेल तेंही यामध्यें सांगितलें आहे. पण साधारणलोकसमूहासाठीं ह्या पुस्तकांत जी (घडयाळें वापरण्याची) माहिती दिली आहे, ती तर अत्यंत महत्वाची आहे. कारण पुष्कळ पहिल्या नंबरचीं घडयाळें अज्ञानी लोकांच्या हातांत जाऊन त्यांनीं तीं दोन आणे किंमतीच्या एखाद्या खेळण्याप्रमाणें, निष्काळजीनें वापरल्यामुळें घेतल्यावर लवकरच बिघडून जाऊन नाश पावतात.

मुंबईचें ऑफीस ड्रोझ आणि अस्टूझ,
वेस्ट एन्ड वॉच कंपनी.

रा. रा. बाळाजी प्रभाकर मोडक प्रोफेसर ऑफ सायन्स राजाराम कॉलेज कोल्हापूर यांचा अभिप्रायः—रा. रा. हरि केशव गोखले यांचें घडयाळें वापरण्याचे नियम व तीं दुरुस्त करण्याची उपयुक्त माहिती हें पुस्तक पाहिलें. त्यांतील बराच भाग वाचून पाहिला. रा. गोखले हे बरेच दिवसापासून हा धंदा करीत असल्यानें हें पुस्तक लिहिण्यास ते सर्व प्रकारें योग्य आहेत. धंदा करणारानें आपल्या धंद्यांतील किळवा सांगण्याचें काम केल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. याजबद्दल ते स्तुतीस विशेष पात्र आहेत.

घडयाळें वापरणारांस तर यांनीं आरंभीं दिलेले नियम फारच उपयोगी पडतील अशी खात्री वाटते. नवीनच ज्यानें घडयाळ घेतलें असेल त्यास तर ही माहिती अतिशय उपयोगीं पडेल.

मी आज इतके दिवस लहान मोठीं घडयाळें वापरतों, तरी सुद्धां मला रा. गोखले यांनीं सांगितलेली माहिती उपयुक्त वाटली. खेडवापाडयांनीं व लहान गांवीं लोकांस व स्कूल मास्तरांस या नियमांचा फार उपयोग होईल.

आरंभीं जी ऐतिहासिक माहिती फार त्रोटक दिली आहे, ती थोडी विस्तृत असावी. स्विट्झर्लंडचें वर्णन फार थोडक्यांत केलें आहे. तेथील घडयाळांच्या कारखान्यांचें थोडें अधीक तपशीलवार वर्णन दिलें असतें तर फार मनोवेधक झालें असतें. एकंदरींत हा पहिला भाग फार चांगला साधला आहे व तो साधारण लोकांच्या फार उपयोगी आहे.

ऑनरेबल दाजी आबाजी खरे बी.ए.एल्.एल्.बी. हायकोर्ट वकील मुंबई यांचा अभिप्रायः—रा. रा. हरि केशव गोखले यांनीं घडयाळें वापरण्याचें नियम

आणि तीं दुरुस्त करण्याची उपयुक्त माहिती या विषयावर लिहिलेलें पुस्तक मीं वाचलें. ह्या पुस्तकांत रा. गोखले यांनीं नुसती कारागिरीबद्दलच माहिती दिलेली नाहीं. ऐतिहासिक दृष्टयाहि थोडेंसें विवेचन केलें आहे, तो भाग बराच उपयुक्त आहे. कारागिरीविषयीं व नीट करण्यासंबंधानें जें लिहिलें आहे, तेंही बरेंच पूर्ण असून त्यांत त्यांनीं आपल्या धंद्याचें त्यांस फार चांगलें ज्ञान आहे असें व्यक्त केलें आहे. यासंबंधानें आपले देशांतील कारागिरांनीं उदाहरण घेण्याजोगीं व सर्वांनीं ध्यानांत ठेवण्याजोगीं ही गोष्ट सांगितली पाहिजे कीं, आपली माहिती कोणास न सांगण्याची रीत आहे. ती रा. गोखले मुळींच मानीत नाहींत. व ते जें कांहीं त्यांस ठाऊक आहे तें सर्वांस सांगण्यास तयार आहेत ह्यामुळें त्यांचा तोटा न होतां फायदाच होईल; हें वेगळें सांगण्यास नको. रा. गोखले ह्यांच्या उदाहरणाचें दुसरे लोक जर अनुकरण करतील तर ते आपला व दुसऱ्यांचाही फायदा करतील ह्यांत संशय नाहीं.

हरिभाऊ यांच्या कडोन घुष्कळांनीं घडयाळें खरेदी केलीं. त्यांत गिऱ्हाइकांना माल उत्तम देणेविषयीं यांना बरींच सर्टिफिकीटें मिळालीं आहेत. पैकीं एक येथें देत आहें.:—

रा. रा. हरि केशव गोखले वॉचमेकर मुंबई यांस—सा. न. वि. वि. पुणें येथें आनंदाश्रमाकरितां तुह्मांकडून आमचे चुलते तीर्थस्वरूप रा. महादेव चिमणाजी ऊर्फ अण्णासाहेब आपटे यांनीं घडयाळ घेतलें होतें. तें त्यांनीं ४ वर्षें वापरलेलें पाहिलें व तें त्या अवधींत चांगलें चाललें अशाबद्दल आपणांस त्यांनीं सर्टिफिकीटहि दिलें होतें तेंच घडयाळ अजूनहि आनंदाश्रमांत आहे आणि फार चांगल्याप्रकारें अगदीं नियमित असें चाललें आहे. हें आपणांस कळविण्यास फार आनंद वाटतो. आज सुमारें २० वर्षें जाहलीं इतक्या अवधींत तें फक्त एकच वेळ साफसूफ करण्यासाठीं घडयाळजीकडे पाठविलें होतें. यावरून आपणाकडील माल निवडक, टिकाऊ आणि चांगला असतो अशी खात्री वाटते. कळावें लोभ असावा हे विनंती "

पुणें ता० ४ एप्रील १९०७ } हरी नारायण आपटे, व्यवस्थापक आनंदाश्रम.

" अध्यक्षसाहेब आणि बंधुभगिनी हो—माझा चांदीचा आणि सोन्याचा व्यापार व तत्संबंधीं (दागिन्यांची) व्यवहारोपयोगी माहिती, आणखी स्वतःचे अनुभव सांगण्याकरितां मी आपणांपुढें उभा राहिलों आहें. मी विद्वान नसून व्यापारी आहें, हेंही सर्वांस माहीत आहेच. तेव्हां चुकांबद्दल क्षमा करून त्यांत कांहीं घेण्यासारखें असल्यास त्याचा विचार व्हावा, अशी प्रार्थना आहे, माझे सांगण्यांत पुढील गोष्टींचें विवरण होईल:—

१ मला चांदीचा धंदा कसा सुचला.
२ मी धंद्याचें ज्ञान कसें संपादन केलें.
३ धंद्याचे ज्ञानापासून आपली बाजू खरी कशी करितां आली.
४ सन १८९६ मध्यें प्लेगाला भिऊन घरीं गेलों व १९०० सालीं परत आलों. दरम्यानची थोडी हकिकत.
५ चांदीचे दागिने बनविण्यास केलेली सुरवात आणि प्रामेसरी नोटा देऊन काढलेलें कर्ज.
६ नोकर लोक व त्यांचा इमानीपणा.
७ चांदीविषयीं एकंदर माहिती.
८ सोन्याविषयीं एकंदर माहिती.
९ सोनारी पारिभाषिक शब्द व त्यांच्या व्याख्या. खेडवळ सोनारांचे पूर्वीचे रिवाज.
१० गिऱ्हाइकाची किंवा स्नेह्यांची चांदी किंवा सोनें आटवून आणणें किंवा शुद्ध करणें हें काम कोणाचेंही करूं नये, व तें कां करूं नये अशाबद्दल उदाहरणें.
११ धंद्यांतील धोके अथवा प्रसंग.
१२ धंद्यांतील आपली बाजू खरी असतांही गिऱ्हाइकाचे गैरसमजुतीनें अथवा भ्रांतीनें तो प्रश्न सोडविण्यास अतिशय त्रास सोसावा लागतो अशाबद्दल उदाहरणें.
१३ लक्ष्यांत ठेवण्यासारख्या कांहीं गोष्टी.

मनुष्यानें खरेपणानें वागून धन मिळविण्याकरितां नेटानें यत्न करावेत. त्यांत यशप्राप्ति करून घेऊन, आपलें उतारवय सुखानें जाईल असें करण्यास झटावें. धनप्राप्ति झाल्यानें, त्याला मित्र मिळतात, बंधु मिळतात, तो पंडित बनतो, त्याला लोकांत मान मिळतो. धनापासून सर्व कांहीं होऊं शकते. म्हणून तें मिळविण्याविषयीं यत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे. आपले शास्त्रांत धन मिळविण्याचे सहा प्रकार सांगितले आहेत.त्या सर्वांत वाणिग् वृत्तीपासून कोणालाही त्रास न होतां द्रव्य संपादन करितां येतें. म्हणून ह्या वृत्तीला पहिला नंबर दिला पाहिजे.

जे कोणी व्यापारी माल खरेदी करून किंवा तयार करून त्याची विक्री करून उदरनिर्वाह करितात, ते वणीग्वृत्तींतील होत. आणि त्यांपैकींच मी एक आहें. माझ्या घड्याळाचे व्यापारांत मला चांदीचा धंदा कसा सुचला हें मी आपणास प्रथम सांगणार आहें.

सन १८९३ सालीं ग्वालेरच्या एका इसमानें आमचेकडे एक चांदीचा तांब्या व पेला मागितला. माझा कमिशन एजंटचा धंदा नव्हता. तथापि क्वचित्

कोणी कांहीं मागितल्यास पाठवीत असें. मुंबईमध्यें एका मोठ्या दुकानावर आर्डर नोंदविली. एके दिवशीं सहज माल तयार आहे किंवा नाहीं हें पाहण्याकरितां सदरील दुकानीं मीं गेलों. माल तयार होता. परंतु मालाचे किंमतीपेक्षां ५। १० रुपये माझ्या खिशांत कमी होते. म्हणून त्या दुकानदारानें मला माल देण्याचें नाकारिलें. माझे गांवचा कांसार त्या पेढीवर काम करण्यास होता. त्यानेंही मध्यस्थी केली. परंतु त्याचेंही त्यानें ऐकलें नाहीं. खरोखर हें त्या दुकानदाराचें वर्तन माझ्या उदयास कारणीभूत झालें ! नाहींतर त्याचा व माझा परिचय असतां व पैशाचे बाबतींत कधींही तक्रार झाली नसतां, तो माल देत नाहीं म्हणाला! घुढें कासार याचीं व माझीं बोलणीं होऊन चांदीचे भांड्याचें दुकान काढण्याचें ठरलें. घड्याळाचे बाबतींत माझें दुकान महशूर असल्यानें धंदा चालण्यास मुळींच विलंब लागला नाहीं. धंदा सुरू केला.

पण बुद्धीचा अंधेर होता. ही चांदी आहे किंवा रुपें आहे अथवा तें जर्मन-सिलव्हर आहे, हें समजण्यास मला बुद्धी नव्हती. कोणत्याहि धंद्यांत त्या धंद्याचें ज्ञान प्राप्त झाल्याशिवाय कोणताही धंदा करणें धोक्याचें आहे. म्हणून ती विद्या साध्य करून घेण्याविषयीं यत्न सुरू केला.

मिंटमध्यें नोकरीस असलेले एक स्नेही गांठून, चांदीचे परीक्षेबद्दल त्यांजपाशीं चौकशी केली. त्यानें नैट्रिक आसीड व म्युरिआटीक आसीड ह्यांपासून तुम्हांस काय पाहिजे तें प्राप्त होईल म्हणून सांगितलें. नंतर बाजारांत जाऊन सदरिल आसिड विकत घेतलीं. कांचेच्या नळ्या स्पिरिट लँप इत्यादि साधनें जमा केलीं. पुढें चांदीची परीक्षा करणारांचे दुकानीं जाऊन, त्या दुकानदारांची बारकाईनें कृती पाहून, ती स्वतः आसिडच्या सहाय्यानें करण्याचा यत्न चालविला. हा नाद जवळ जवळ सहा महिने चालविला. त्याच्या योगानें धंद्यास लागणारी माहिती प्राप्त झाली. आतां शंभर तोळे चिनई चांदीमध्यें कांसारानें चांदी आटतांना पाव आणा भेसळ केली तर तिची परीक्षा भेसळ केलेल्या चांदीपैकीं पाव वाल चांदी घेऊन त्यांत करितां येते.

थोडेच दिवसांत अशी एक गोष्ट घडून आली कीं, एका गृहस्थास एक तांब्या व एक ताम्हन करावयाचें होतें; म्हणून अडीचशें भार चिनई चांदीचा तुकडा घेऊन दरशेंकडयास सव्वासहा तोळेप्रमाणें तांबें घेऊन, मी आपले समक्ष त्या चांदीचा रस करून गांवठी चांदी बनविली. आणि तिचे तीन ठिकाणीं रस ओतविले. एकाचा तांब्या व एकाचें ताम्हन केलें. आणि तिसरा तुकडा तसाच ठेविला. सदरहू भांडीं तयार होतांक्षणीं परीक्षकांकडे पाठविलीं. परीक्षकानें एका भांड्यास वाजवी भाव दिला व दुसऱ्या भांड्यास पाव आणा कमी भाव दिला. तेव्हां मी त्या परीक्षकाकडे तिसरा तुकडा घेऊन गेलों आणि त्यास पुन्हां नीट परीक्षा करून सांगा नांहींतर मला मिंटमध्यें जावें लागेल असें सांगितलें. मग त्या परीक्षकानें

पुन्हां काळजीपूर्वक तपासतां दोन्हीचा एकच भाव लाविला. एकंदरींत आपली चांदी कशी आहे ह्याची खात्री असल्यानें व धंद्यापुरती परीक्षा असल्यानें, चांदी तपासणारे दुकानदारास मला जरा जोरानें विचारितां आलें आणि माझी बाजू खरी ठरली. धंद्यांतील माहिती नसती, तर जोरानें सांगण्याचें धैर्य झालें नसतें; आणि खऱ्याचें खोटें होऊन गेलें असतें.

सन १८९६ डिसेंबर महिन्यांत, प्लेगला भिऊन घरीं (कोंकणांत) गेलों. यावेळीं चांदीचा धंदा सुरू करून सुमारें २॥ वर्षें झालीं होतीं. घरीं वडिलार्जित शेतवाडी होती. परंतु त्यावर निर्वाह होणें कठीण होतें. म्हणून तेथें जमीन-जुमला विकत घेऊन, पांच दहा मंडळींचा निर्वाह होईल अशी तजवीज केली. एक गांव विकत घेतल्यावर तंटे बखेडे झाले. त्यांचें निवारण करून स्वतः २।३ वर्षें त्या खोती गांवाची वहिवाट केली. दापोली येथें प्लेग सुरू झाल्यामुळें सन १९०० सालीं पुन्हां मुंबईचा मार्ग स्वीकारला.

आमचे दुकानीं हा वेळपर्यंत चांदीचीं भांडींच तयार होत असत. नंतर चांदीचे सर्व प्रकारचे दागिने बनविण्याचें काम सुरू केलें. परंतु भांडवलाकडून फार अडचण झाली. ह्या गोष्टीचा बरेच दिवस विचार केल्यावर अशी गोष्ट सुचली कीं, कोणावर विशेष भार न पडावा आणि साधारण मनुष्यासही मदत करितां यावी अशी योजना मनांत आणून, पंचवीस रुपये किंमतीच्या मी आपले नांवाच्या प्रॉमिसरी नोटा काढल्या. हस्तपत्रकें काढून स्नेह्यांकडे पाठविलीं. त्यांत मजकूर हा कीं, धंद्यास भांडवलाची जरूर आहे; तेव्हां पंचवीस रुपयांची प्रॉमिसरी नोट घेणाऱ्यास दरसाल दरशेंकडा आठ रुपये व्याज मिळेल व तें सहा महिन्यांनीं घरीं पोचतें होईल आणि मुद्दल रकम मागाल तेव्हां देण्यांत येईल. एकाचें नांवावर चार पेक्षां जास्त प्रॉमिसरी नोटा मिळणार नाहींत.

स्नेही व इतर मंडळींनीं भराभर आमच्या नोटा घेऊन आम्हांला मदत केली. धंदा जोरानें चालला. केसरीमध्यें जिन्नसांची नांवनिशीवार जाहिरात दिली. स्टॉटलाग छापले. काम चांगलें चाललें. पुढें तीन वर्षांनीं प्रॉमिसरी नोटांची मुदत खलास झाली. नंतर दरसाल दरशेंकडा सहा टक्के दराप्रमाणें प्रत्येक नोट शंभर रुपयांची; अशा शंभर प्रॉमिसरी नोटा काढिल्या. त्याही स्नेही मंडळींत तावडतोब खपल्या. बरीच रक्कम हातीं आल्यावर सोन्याचे दागिने तयार करण्याचें ठरविलें. प्रत्येक प्रॉमेसरी नोटीचा धनी दुकान आपलें आहे असें समजून स्वतः आणि स्नेह्याकडून मदत करूं लागला. गिऱ्हाईकी पुष्कळ वाढली. धंदा उत्तम चालला. पुन्हां तीन वर्षांनीं प्रॉमिसरी नोटांचा दर दरसाल दरशेंकडा पांच रुपये केला. तोही सर्वांस मान्य झाला. नंतर व्यापार समाधानकारक होऊन जसजसे रुपये जमतील तसतसे फेड करण्याचें ठरविलें. मद्रास येथें एमडन येईपर्यंत बहुतेक लोकांचे रुपये दिले होते. मद्रासची बातमी समजतांच, सर्वांचे घरीं

जाऊन रुपये पोचते केले. आणि मी लोकांच्या देण्यांतून मोकळा झालों. हल्लीं मला कोणाचेंही देणें नाहीं. जें कांहीं आहे तें स्वतःचें आहे. त्यांतच व्यापार करून निर्वाह करितों. अलीकडे पांचदहा वर्षे वर्षांतून बरेच महिने मुंबईचे बाहेर राहून घालवितों. तेणेंकरून बरेच महिने औषधाशिवाय घालवितां येतात.

वरील गोष्टीवरून असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, जोखमाचा धंदा असतां तुम्ही बाहेर गांवीं फिरत रहातां हे कसें ? त्यास उत्तर कीं,—ईश्वर कृपेनें मला जसे नोकर लोक मिळाले आहेत; तसे इतरांस क्वचितच मिळतील, असें मला वाटतें. कारण ह्या नोकर मंडळीस चहा, विडी व पानसुपारी अशा तऱ्हेचें कोणतेंही व्यसन नाहीं. फक्त त्यांस इमानीपणाचें जें व्यसन जडलें आहे, त्याचें वर्णन मला होत नाहीं. सोन्याचे आणि चांदीचे जरी हिशोब असले तरी विश्वास ही एक मोठी चीज आहे. ते मोठ्या लाभाकरितां सुद्धां आपली नीति बिघडविणार नाहींत अशी मला खात्री वाटते. माझा नोकर लोकांवर इतका कमालीचा विश्वास बसून गेला आहे कीं, सोन्याचांदीच्या दागिन्यांच्या व रोकडीच्या तिजोरींच्या किल्ल्या माझे घरीं किती वर्षे आल्या नाहींत हें मला खातरीपूर्वक सांगतां येणार नाहीं.

माझे नोकरलोक गिऱ्हाइकाजवळ नम्रतेनें वागतात. एकच किंमत सांगतात. वजन बरोबर देतात. दुकानांतील व्यवहारासंबंधीं कोणतीही गोष्ट कोणाजवळ सांगत नाहींत. व दुकानाचे मालक हजर नसले तरी तसें गिऱ्हाईकास भासूं देत नाहींत. दुकानाची अत्यंत काळजी घेतात. आणि आनंदानें काम करितात. असे नोकर लोक मिळाल्यावर दुकानीं मालकाची काय जरूर आहे ? अशा त्यांच्या इमानीपणाचे वर्तनाबद्दल मजकडून त्यांस पुरा मोबदला अद्याप मिळाला नाहीं. तथापि थोडीबहुत त्यांची सोय केली आहे ती येणेंप्रमाणें––

प्रत्येकाचा एक हजार रुपयांचा विमा आहे. त्याचे रुपये त्यास त्याच्या चाळिसाव्या वर्षी मिळावयाचे आहेत. निम्मे प्रीमियम दुकानांतून भरला जातो. प्रत्येकास दरवर्षास प्रमोशन असतें. घरभाडयाकरितां अलाउन्स देण्यांत येतो. प्रत्येकाच्या कुटुंबाचा डॉक्टर अथवा वैद्य याचा खर्च दुकानांतून दिला जातो. आजारी असतां भरपूर पगार चालू असतो. वर्षाचे अखेरीस बोनस दिला जातो. तो सोन्याचे रूपानें दिला जातो.तो त्यांस विकण्याचा हक्क नाहीं.तें स्त्रीधन समजलें जातें. माझ्या नोकर लोकांच्या जमीनजुमल्याकरितां कांहीं तरी विशेष सोय झाली पाहिजे, असें मला वाटतें. आणि त्या विचारांत मी आहें.

चांदी विशेषें करून चीन आणि अमेरिका ह्या देशांत उत्पन्न होते. युनायटेड किंग्डम आणि चीन ह्या देशांतून हिंदुस्थानांत येते.मुंबई बंदरांत स.१९११ सालीं नऊ कोटींची चांदी आली. १२ सालीं सात कोटींची, १३ सालीं पांच कोटींची

१४ सालीं सात कोटींची आणि १५ सालीं चार कोटींची चांदी आली. पुढील सालांचे आंकडे गुप्त ठेवण्यांत आले आहेत.

उत्तम चिनई चांदी म्हणजे एक हजार टचची गणली जाते. ज्या चांदीस स्टरलींग सिल्व्हर म्हणतात, त्या चांदीचा टच ९३५ असतो. म्हणजे इकडील गांवठी चांदी बरोबर असतो. ८००–९००–९३५ अशा चांदीच्या घडयाळांच्या केसीस करितात, चांदीचा मोठा पाट सुमारें तीन हजार तोळे वजन असतो. त्याचे आठ तुकडे करून उपयोगांत आणितात. हे तुकडे शेंकडा दोन पासून चार आणे फायद्यानें विकत मिळतात.

भांडीं चिनई चांदीचीं करावींत, त्यांत दूध पाजण्याचें बोंडलें, औषधाची वाटी आणि चमचा हीं भांडीं अवश्य चिनई चांदीचीं असावींत. म्हणजे औषध कसलेंही असलें तरी त्यापासून अपाय होत नाहीं. मुलांचे दागीने गांवठी चांदीचे करावे ते कारणाशिवाय विघडत नाहींत व फार झिजत नाहींत. चांदीचीं भांडीं साफ करणें झाल्यास चुलींतील बारीक राख किंवा कोळशाची बारीक भुकी, अथवा चॉकची भुकी करून घांसावीं; म्हणजे उत्तम स्वच्छ भांडीं होतात. केव्हां केव्हां चांदीचे भांड्यांत ओषट पदार्थ किंवा लिंबू ताक अथवा मीठ अशाचा संयोग होऊन बराच वेळ तें मिश्रण किंवा त्याचा अंश पाण्याचे रूपानें चांदीचे भांड्यांत राहिल्यास मध्येंच कोठें तरी शाईसारखा काळा डाग उत्पन्न होतो,असा डाग लक्षांत आल्यास त्या डागावर पाण्याचा थेंब सोडून चुलींतील जळणाचा विझलेला कोळसाघेऊन त्या डागावर घांसावा म्हणजे डाग त्वरीत निघून जाईल.नंतर तें भांडें राखेनें घासून फडक्यानें पुसून ठेवावें; म्हणजे पूर्ववत् होईल. जसें कुत्र्याचें व मांजराचें वैर स्वाभाविक असतें; तसेंच चांदीचें आणि गंधकाचें वैर आहे. म्हणून अशा द्रव्याचा संसर्गही चांदीचे भांड्यास उपयोगी नाहीं. चीन देशांतून आपले देशांत जो चांदीचा माल येतो, तो ८५ टचचे चांदीचा असतो. त्यांत तपकीरीच्या डब्या, मुलांचीं खेळणीं, सीगार बॉकसेस, गुलाबदाण्या वगैरे जिन्नस येतात. चांदीवर सरकारची जकात दर औंसास म्हणजे अडीच तोळ्यांस चार आणे आहे.

सोन्याविषयीं—मुंबई चालीचें कोष्टक २॥ वाल म्हणजे एक आणा. पांच वाल म्हणजे दोन आणे; किंवा एक चवली. दाहा वाल म्हणजे एक पावली. आणि चाळीस वाल म्हणजे एक रुपया अथवा एक तोळा.

सोनें आपल्या देशांत युनाईटेड किंगडम, माल्टा, आस्त्रेलिया, फ्रान्स, आणि इजिप्त या देशांतून येतें. फक्त मुंबई बंदरांत सन १९११सालीं११ कोटी रुपयांचें सोनें आलें १२ सालांत १२॥ कोटींचें, १३ सालांत १३॥ कोटींचें, १४ सालांत ७ कोटी ३१ लक्षांचें आणि १५ सालांत ३ कोटी १४ लक्षांचें सोनें आलें.पुढील

सालांचे आंकडे गुप्त ठेवण्यांत आले आहेत. एकंदर जगावर जें सोनें निघतें त्याचें एक पन्नासांश हिशाबरोबर हिंदुस्थानांत सोनें उत्पन्न होतें. हें सोनें म्हैसूर प्रांतांत उत्पन्न होतें. आणि तें कच्चास्थितींत विलायतेस जातें. सोन्यावर जकात नाहीं.तथापि अंगठ्या वगैरे जुवेलरीवर शेंकडा दाहा रुपये जकात आहे.

न्याशनल बँकच्या ३ चिपा वजन केल्यास बरोबर ८० तोळे ठरतात. चिपेवर १०० नंबरी सोनें असा आंकडा असतो, परंतु त्या चिपेचा खरा टच ९९ आणि ६५ दोकडे असतो. १०० दोकडे म्हणजे एक टच गणला जातो. आणि सोन्याचा भाव एक तोळ्यास २५ रुपये असल्यास, एक टचाची किंमत चार आणे होईल. हल्लींचे मानानें पांच आणे होईल. १०० नंबरी सोनें फार मऊ असतें. म्हणून त्याचें ९७ नंबरी सोनें बनवावें लागतें. १०० नंबरी एक तोळा सोन्यांत एक वाल चिनई चांदी, आणि पाववाल तांबें घातलें असतां, ९७ नंबरी सोनें तयार होतें. हें सोनें विस्तवांत काळें पडत नाहीं. सोन्याचा रस होण्याकरितां, त्यांत स्वागीखार घालावा लागतो.

मुंबई मार्केटमध्यें १०० नंबरी एक तोळा सोन्यांत २ वालपासून २॥ वालपर्यंत मिश्रण करितात. म्हणजे ९४ टचपासून ९६ टचपर्यंतचें सोनें ९७ नंबरीच्या सदराखालीं विकलें जातें. परंतु खरें ९७ नंबरी सोनें मुंबई येथें पटवर्धन यांचे पेढीवर किंवा आमचे दुकानीं विकत मिळतें. इतर ठिकाणीं क्वचितच आढळेल.

सोन्याची परीक्षा करण्याकरितां सोन्याचे टच नमुन्याकरितां ठेवावे लागतात. शिवाय त्यास तापवावें लागतें; ठोकून पहावें लागतें; त्याला सुलाख काढावा लागतो; तें कसोटीवर घांसावें लागतें; आणि त्याचें वजन पहावें लागतें; तेव्हां त्याची परीक्षा होते. सोनें व पितळ ह्यांची परीक्षा पहाणें असल्यास दोन्ही वस्तु कसोटीवर घांसाव्या. आणि दोन्ही कसावर नैट्रिक असिडचे दोन थेंब सोडावेत; म्हणजे सोनें तें कायम राहील व पितळ तें जळून जाईल.

चांगला मुलगा वाईट मुलाच्या संगतीनें बिघडूं शकतो. परंतु वाईट मुलगा चांगल्या मुलाची संगत धरीत नाहीं. तसें चांगल्या सोन्यास वाईट डाख लागूं शकतो. परंतु वाईट सोन्यास चांगला डाख लागूं शकत नाहीं. कारण चांगले डाखाचें पाणी होण्यापूर्वीच वाईट सोन्याचें पाणी होऊन जातें. मग सांधकाम कसें व्हावें ! दुधांत जर मीठ टाकलें तर जसें दूध फुटतें, तसें सोनें हें कथील, शिसें आणि कांसें ह्यांपैकीं कोणाचेही सहवासानें फुटतें व ठोकिलें असतां वाढत नाहीं; आणि त्यास भेगा पडतात. म्हणून कल्हई केलेल्या डब्यामध्यें सोन्याचे दागिने ठेवूं नयेत.

हरिभाऊ गोखले अती मेहनती व उद्योगप्रिय असून, गरीबांचे कनवाळू आहेत. व्यापारांतील सचोटी व विश्वासूपणामुळें हे सर्वत्र लोकप्रिय झाले आहेत. यांनीं अनेक संस्थांना द्रव्यसहाय्य केलें आहे. पुणें येथील श्रीशिवाजी मंदिराच्या सुवर्णकळसाचें काम हरीभाऊंनीं स्वतःच्या खर्चानें करून आपली कीर्ति पुणें येथें कायम करून ठेविली आहे. यांची रहाणी साधी असून धार्मिक आहे. हरीभाऊ प्रमाणें निर्व्यसनी व व्यापारनिपुण असे पुरुष या हिंदुस्थानाला पुष्कळ लाभोत व हरीभाऊ दीर्घायु होवोत अशी ईश्वरचरणीं या लेखकाची नम्र प्रार्थना आहे.

दळें व मुंबई येथील गोखले.

मुक्काम दळें येथें श्री गणपतीचे देवळाजवळ बरी गोखल्यांपैकीं दोन घरें आहेत. विष्णु सखाराम गोखले यांचें एक व गणेश रामचंद्र गोखले यांचें एक अशीं दोन घरें आहेत. विष्णुपंत व रामचंद्रपंत हे तेथेंच आहेत.

शंभूभट गोखले हे होळी येथें रहात होते. शंभूभटांचे नातू गणेश बाळंभट यांस पुत्र तीन; बचंभट, चिमणभट व रामाजी. यांचा वंश हल्लीं दळें येथें आहे. होळीहून दळें येथें कोणता पुरुष आला हें नक्की समजत नाहीं. या शंभूभटांचे वंशास ' कोल्हे गोखले ' असें म्हणतात. याचे मागिल प्रकरणांतील 'बरी गोखले' व हें चालू प्रकरण ' कोल्हे गोखले ' यांचें होय. हें घराणें खोत कुलकर्णीपणाचें वतनदार आहे. बचंभटांचे पणतू रामकृष्ण वासुदेव हे दत्तक असून दळें येथें शेती करून आहेत. यांना दिनकर नांवाचा मुलगा आहे. चिमणभटांचे नातू महादाजी गोविंद हे वयोवृद्ध आहेत. यांना तीन मुलगे; गणेश, पुरुषोत्तम व रामकृष्ण. रामकृष्ण हे दत्तक गेले आहेत. गणेश हे मुंबईस मोत्यांचा व्यापार करितात. पुरुषोत्तम हे घरीं दळें येथें वडिलांजवळ राहून प्रपंच करितात. पुरुषोत्तमपंत यांनीं जैतापूर येथें घाऊक मालाचें दुकान घातलें आहे. हे शेती व व्यापार करून सुखवस्तु आहेत. यांना एक गोविंद नांवाचा मुलगा आहे. पुरुषोत्तमपंतांचा स्वभाव गरीब असून यांना सार्वजनिक कामाचें विशेष अगत्य आहे. गांवांतील चार मंडळींच्या सहाय्यानें दळें येथें यांनीं शाळा चालविली आहे. हा लेखक संशोधनार्थ त्या प्रांतीं फिरत असतां दळें येथें पुरुषोत्तमपंत यांच्या घरीं सातआठ दिवस मुक्कामास होता.

चिमणभटांचे दुसरे नातू नारायण व विष्णु विश्वनाथ. नारायण हे हयात नाहींत. नारायण विश्वनाथ यांचे पुत्र डॉ. काशिनाथ नारायण गोखले एल्. एम्.

अँड. एस्. हे मुंबई येथें प्रसिद्ध डॉक्टर होऊन गेले. डॉ. काशिनाथपंत यांचे आजोबा विश्वनाथभट व वडील नारायणभट हे पहिल्या-प्रतीचे विद्वान् होते. मुंबईत त्यांना सर्व ब्राह्मणमंडळींत अतिशय मान असे. त्यांना विश्वनाथदेव व नारायणदेव असें म्हणत. नारायण भटजी प्रकृती बिघडल्यामुळें मुंबई सोडून घरीं जाऊन राहिले. यांचे चिरंजीव काशिनाथपंत यांना त्यांचे चुलते विष्णुपंत यांनीं मुंबईत आणवून, आपल्या स्वतःच्या मुलांचेंही कोणी करणार नाहीं अशा प्रकारें त्यांचें पालन करून त्याजकडून विद्यार्जन करविलें. पगार थोडा असतांही सकाळीं व दुपारीं शिकवण्या शिकवून खर्चाची व्यवस्था करीत. म्यॉट्रिक झाल्यावर काशिनाथपंतांचे इच्छेप्रमाणें त्यांना मेडिकल कॉलेजांत घातलें. पुढें एल्. एम्. अँड. एस. झाल्यावर भोर येथें गेले. तेथें एक वर्ष राहून परत मुंबईला येऊन खासगी दवाखाना घातला. दवाखाना घालून पैसे मिळविणें येवढाच त्यांचा हेतु नसून आपल्या हातून कांहीं तरी देशोन्नति व परोपकार व्हावा असा हेतु होता. त्याप्रमाणें त्यांनीं अती श्रम करून इकडील वनस्पतींचे गुणदोषावबद्दलची व आयुर्वेदिक पद्धतीनें औषधें तयार करण्याची माहिती मिळविली. सन १९०० मध्यें 'भारतीय औषधी शाळा' (धी इंडियन फार्मसी) संस्था स्थापन केली.

ह्या संस्थेत सर्व आयुर्वेदिक औषधें व इंग्रजी पद्धतीप्रमाणें टिंक्चर्स ते तयार करूं लागले. आपल्या देशाला इंग्रजी औषधांनीं कसें खग्रास ग्रहण लाविलें आहे, आणि पुस्तकांतील विद्या फक्त पुस्तकांतच राहून आपण हजारों रुपये खर्चून इंग्रजी डॉक्टर झालों हें खरें परंतु जर कां तीं इंग्रजी औषधें इकडे येण्याचीं बंद झालीं तर सर्व पदवीधर इंग्रजी डॉक्टरांनीं आपापले दवाखाने बंद करून फक्त आकाशाकडे डोळे लावून इंग्रजी पुस्तकांचें ध्यान करीत रहावें लागणार ! अशी ही परावलंबी स्थिती सुधारण्याचा हा अत्यंत स्तुत्य उद्योग काशिनाथपंत यांनीं सुरू केला होता. परंतु आमच्या देशाचें नष्टचर्य अद्यापि संपलें नाहीं म्हणायचें दुसरें काय ? डॉ. काशिनाथपंत यांना अवघ्या ३६ वे वर्षींच सन १९०७ मध्यें मृत्यूनें गांठलें. काशिनाथपंत यांचा स्वभाव शांत व गरीब असून ते गरिबांचे कनवाळू होते. आपला दवाखाना संभाळून, मुंबईहून दर आठवड्यास पुणें येथील सेवासदनांत व मुंबई येथें एक स्त्रियांकरितां क्लास काढून त्या दोन्ही ठिकाणीं वेतन घेतल्याशिवाय स्वतःस झीज सोसून हे आनंदानें शिकवीत असत. हे आयुर्वेदिक दवाखान्याचे अध्यापक होते. सार्वजनिक कामाचीही त्यांना हौस असे. यांना तीन मुलगे; सिताराम, शंकर व दत्तात्रय, सितारामपंतही एल्. एम्. अँड. एस्. होऊन गिरगांवमध्यें त्यांनीं खासगी दवाखाना सुरू केला आहे. शंकरराव हे बी. ए. बी. एस. सी. झाले आहेत. आणि दत्तात्रय विद्यार्थी आहे.

डॉ. काशिनाथपंत यांचे चुलते विष्णु विश्वनाथ हे वयोवृद्ध असून हे डॉ. सितारामपंत गोखले यांच्याजवळ आहेत.

देशाचें दुर्भाग्य किती बलवत्तर आहे पहा ! या आर्य भूमींतील आज तागायतपर्यंत इंग्रजी अध्ययन करून इंग्रजी डॉ. एम्. डी. व एल्. एम्. अँड. एस्. किती तरी झाले असतील. परंतु एकाही डॉक्टरानें देशाच्या हिताकडे ढुंकून सुद्धां पाहिलें नाहीं. याचें मुख्य कारण ती विद्याच अशी आहे कीं, आपल्यामधील आपलेपणा म्हणून जो एक गुण आहे त्याचा ती विद्या निकाल करते. वास्तविक पहातां आमच्या या देशांतील हवामानपरत्वें इंग्रजी औषधें कधींही घेऊं नयेत. सदरहु औषधें त्यांच्या त्या थंड प्रदेशासच उपयुक्त ! असें असतां, तीं इंग्रजी औषधें खपून आपणांस विपुल द्रव्य मिळावें हा हेतु सफल होण्याकरितां, आमच्या आर्य वैद्यकाला राजानें आश्रय न देतां, उलट गदाप्रहार केला म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. आमच्या देशांतील वनस्पती किती दिव्य आहे व ती परमेश्वरानें आम्हां आर्यांच्या सुखाकरितां म्हणून प्रेरित केली असून ती वाटेल तितकी मिळूं शकते. इंग्रजी औषधें वास्तवीक पहातां आम्हां महाराष्ट्रीयांस [सर्व आर्य बंधूंस] वीर्यनाशक आहेत असें माझें मत आहे. आज एक शतकांत आमच्या पूर्वजांच्या व आमच्या प्रकृतिमानामध्यें जो जमीनअस्मानाचा फरक पडला आहे त्याला इतर कांहीं जीं कारणें आहेत त्यांत हें मुख्य कारण आहे. म्हणून सर्व देशबांधवांस हा लेखक सविनय विनंती करितो कीं, होतां होईं तों इंग्रजी औषधांचें सेवन करूं नका.

मिरज येथील किल्ल्यांतील गोखले.

होळी-दळ्याहून विठ्ठलभट रामचंद्रभट गोखले देशावर प्रथम कृष्णाकांठीं श्रीक्षेत्र वांई येथें गेले. हे वेदशास्त्रसंपन्न असून मोठे कर्मठ होते. वांई येथें कृष्णाकांठीं एका देवालयांत मुलांबाळांसह राहिले. वांई येथील कांहीं क्षेत्रस्थ मंडळींनीं या सत्पात्र व तपोनिष्ठ ब्राह्मणास, आपण येथें उघड्यावर कशाकरितां रहातां ! तुमचेबरोबर मुलेंबाळें आहेत. तरी येथून जवळच एक वाडा आहे. त्यांत विहिर असून सर्व सोयी आहेत. आपणांस तिकडे येण्याची इच्छा असल्यास तो वाडा आम्ही दाखवितों असें सांगितलें. या कपटी मंडळींचा विचार न समजून तो ब्राह्मण त्यांच्याबरोबर निघाला. या क्षेत्रस्थ मंडळींनीं त्या विठ्ठलभटास सहकुटुंब वाड्यांत आणून सोडिलें आणि सांगितलें कीं, आतां तुम्हाला वाटेल तितके दिवस येथें रहाण्यास कोणाचीही हरकत येणार नाहीं.

काय विचित्र मंडळी ही ! कीं ज्या वाड्यांत भयंकर भुताटकी आहे, अशा वाड्यांत त्या ब्राह्मणास मुलांबाळांसह आणून सोडिलें. हा वेळ पावेतों या

वाड्यांत असलेल्या ब्रह्मसंधानें कोणालाही वाड्यांत राहूं दिलें नाहीं, म्हणजे रात्रौ माणसें निजलीं म्हणजे सर्वांना उचलून वाड्याबाहेर रस्त्यावर नेऊन ठेवी. हें त्या बिचाऱ्या ब्राह्मणास काय माहीत ? रात्रौ त्या ब्राह्मणाचें कुटुंब व मुलें निजल्यावर, नित्य नियमाप्रमाणें, विठ्ठलभटजी यांनीं दर्भासनावर बसून वेद म्हणण्यास सुरवात केली. एक तासभर वेदघोष झाल्यावर, विठ्ठलभट बसले होते त्याचे वरील माडीवर, दण्ण करून मोठा आवाज झाला. तेव्हां विठ्ठलभट समजले कीं जुना वाडा असेल तेव्हां कांहीं तरी पडलें असावें, असें समजून पुन्हां वेद म्हणण्यास सुरवात केली. तेव्हां कांहीं वेळानें दार उघडल्यासारखें वाजलें. तेव्हां मात्र विठ्ठलभटजी मनांत समजलें कीं, ह्या वाड्यांत कांहीं तरी भुताटकी असावी. कारण असा चौसोपी वाडा सर्व सोयींचा असतां हा रिकामा कां ? असे तर्क जों चालले आहेत तों पुन्हां आणखी एक मोठा आवाज झाला. तेव्हां तर त्यांची खात्रीच झाली कीं, येथें कांहीं तरी समंधीक बाधा खास आहे. परंतु हे भटजी कोंकणांतले आणि त्यांत मोठे तेजस्वी होते. रात्रौ बारा वाजले तरी तसेंच मोठ्या धिटाईनें पुन्हां वेदघोष तसाच चालू ठेविला. पुन्हां दार वाजलें व लगेच एक भव्य पुरुष त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला. तरी विठ्ठलभटांनीं त्याच्याकडे न पाहिल्यासारखें करून मोठ्या जोरानें म्हणूं लागले. तें पाहून तो ब्रह्मसंबंध त्यांच्यासमोर बसून त्यांच्याबरोबर वेद म्हणूं लागला.

काय चमत्कार आहे पहा ! दोघेही मिळून सारखे एक तासभर म्हणत होते. नंतर त्या ब्राह्मणानें म्हणणें बंद केलें. तेव्हां ब्रह्मसंधानें त्या वेदोनारायणरूपी विठ्ठलभटास साष्टांग नमस्कार घालून 'आज माझी इच्छा तूं तृप्त केलीस' तेव्हां तुला काय पाहिजे तें माग, असें तो ब्रह्मसंध बोलला. तेव्हां विठ्ठलभट म्हणाले जगांत निरिच्छ असा कोणीच झाला नाहीं. हें जरी खरें तरी माझी विशेष इच्छा अशी आहे कीं, तूं नेहमीं रात्रौ माझ्याबरोबर वेद म्हणण्यास यावें. हें ऐकून तो ब्रह्मसंध फारच संतुष्ट झाला. आणि म्हणाला, तुम्हास लागेल तितके प्रापंचिक सामान या पलीकडच्या खोलींतून घेत जावें. म्हणजे मी तुमच्याबरोबर अनाध्यायखेरीज रोज म्हणण्यास येत जाईन. मात्र हा प्रकार तूं कोणाजवळ बोलूं नको. दुसरे दिवशीं सकाळीं ती गांवांतील मंडळी त्या वाड्याजवळ जों येतात तों दाराबाहेर कोणासच फेकून दिलें नसून विठ्ठलभटजी मुलांबाळांसह वाड्यांतच आहेत! वाड्यांत जाऊन विठ्ठलभटजीस विचारूं लागले कीं या वाड्यांत काल रात्रौ तुम्हांला कांहीं चमत्कार दृष्टीस पडला किंवा नाहीं ? तेव्हां विठ्ठलभट म्हणाले ज्याचें मन खरें निर्मळ आहे त्यांस सर्व जगही निर्मळच असणार ! शिवाय " वाजे पाऊल आपुलें म्हणे मागें कोण आलें । छाया आपुली देखिली शंका (भिती) अंतरीं वाटली" ॥ या तुकारामाच्या अभंगाप्रमाणें सर्व मनावर अवलंबून आहे. सर्व मनाचे खेळ आहेत. हें ऐकून ती मंडळी सर्व निराश होऊन गेली.

वेदमूर्ती विठ्ठलभटांचा निग्रह पाहून व त्यांची अद्वितीय विद्वत्ता पाहून, वांई येथील विद्वान मंडळी त्यांचा बहुमान ठेवूं लागली. याप्रमाणें सदरहु वाड्यांत बरींच वर्षें गेल्यावर विठ्ठलभटासारख्या विद्वान व तपोनिधि ब्राह्मणाच्या सहवासानें त्या समंधास सद्गति मिळाली. त्या ब्रह्मसमंधानें अमुक दिवशीं मी या योनींतून मुक्त होणार आहें. आपल्या सारख्याच्या सहवासाचें हें फल होय. मी मुक्त झाल्यावर आपणाबरोबर वेद म्हणण्यास येणार नाहीं म्हणून कदाचित् तुम्हाला मी आतां कां येत नाहीं अशी शंका येईल, म्हणून हें सांगितलें आहे हें ऐकून विठ्ठलभटासही ब्रह्मानंद झाला. पुढें प्रतिवर्षीं देवाचे दिवाळींत कोंकणांतील देवांना जसे नैवेद्य घालतात तसा नैवेद्य [या ब्रह्मसमंधाच्या नांवानें] वांई येथील ' महापुरुष ' या नांवानें घालूं लागले. तो हल्लींही यांच्या वंशांत चालू आहे. इतकेंच नव्हे तर घरांत मुलेंबाळें कोणी भ्यालीं अगर आजारी पडलीं तर या ' महापुरुषाच्या ' नांवानें अंगारा लावल्यास त्यांना गुण येतो.

विठ्ठलभटांची एक मुलगी लग्नाची असून सुस्वरूप व गोरी होती. मिरजकर पटवर्धन बाळासाहेब यांनीं आपल्या पदरच्या कांहीं मंडळीस मुलगी पहाण्यास सांगितलें होतें. या मंडळींना वांई येथील विठ्ठलभट गोखले यांची कन्या लग्नाची असल्याचें समजून ती मंडळी वांई येथें मुलगी पहाण्याकरितां आली. मुलगी पहातांच पसंत झाली. तेव्हां मुलीला घेऊन मिरजेस येण्याबद्दल विठ्ठलभटास त्या मंडळींनीं सांगितलें. तेव्हां विठ्ठलभटांनीं सांगितलें मुलगी दाखविण्यास मी घेऊन येणार नाहीं. तेव्हां ती मंडळी मिरज येथें परत आली. जाहलेली हकीकत यजमानांनीं ऐकून घेतली व तुम्ही सर्वांनीं पसंत केल्यास मला पाहण्याची कांहीं जरूर नाहीं, असें यजमानांनीं सांगितलें. पुढें विठ्ठलभटांचे मुलीबरोबर मिरजकर बाळासाहेब पटवर्धन यांचा विवाह जाहला. वांई येथें विठ्ठलभट स्वर्गस्थ झाल्यावर त्यांचे पुत्र रामचंद्र, बळवंत व कमळाकर हे मिरजकरांचे मेहुणे असल्यामुळें त्रिवर्ग बंधु मिरज येथें किल्ल्यांत येऊन राहिले. रामचंद्र विठ्ठल यांनीं मिरजकरांबरोबर यात्रा केल्या होत्या. मिरजकरांनीं यांच्या घराण्यास तैनात सुरू केली होती. हल्लीं नोकरी तैनात चालू आहे.

रामचंद्र विठ्ठल यांचे वंशांतील लक्ष्मण ऊर्फ गुंडोपंत हे मिरज-मळा संस्थानांत नोकर आहेत व त्रिंबक कृष्ण हे कागल येथें आपटे वकील यांच्याकडे आहेत. गंगाधर केशव ऊर्फ भुत्या हा परागंदा आहे. केशव रामचंद्र गोखले हे मिरज किल्ल्यांत आहेत. हरी महादेव हे मिरज मळा संस्थानांत नोकर आहेत. श्रीधर महादेव हे मिरज संस्थानांत नोकर आहेत.

बळवंत विठ्ठल या पुरुषाचे वंशांतील बळवंत यांचे पणतू भिकाजी कृष्ण हे सांगली संस्थानांत नोकर असून हल्लीं शहापूर येथें रहात आहेत. हे गायनपटु आहेत. भिकाजीपंतांचे चुलतबंधु श्रीपाद भास्कर हे मुंबई येथें कमिशन एजंट

आहेत. गणेश जनार्दन हे मिरज किल्ल्यांत वडिलार्जित घरांत राहून शेती व व्यापार करितात. सदाशिव जनार्दन हे आयुर्वैदिक वैद्य आहेत. आणि विष्णु जनार्दन हे मिरज संस्थानांत नोकर आहेत.

या किल्ल्यांतील गोखल्यांपैकींच एक घराणें श्री नरसिंहवाडी येथें आहे. महादेव विश्वनाथभट यांनीं मिरजकरांचे अन्नछत्रावर नोकरी धरली होती. हल्लीं महादेवभट यांचे चिरंजीव नरहर महादेव हे वाडी येथें वंडिलार्जीत नोकरीवर आहेत. (नोकरीस वडिलापासूम ६३ वर्षे झालीं अद्यापि चालू आहे.) यांचे चिरंजीव दत्तात्रय नरहर यांनीं किराणा मालाचें दुकान घातलें आहे.

अलिबाग येथील गोखले.

विठ्ठलभट रामभट यांचे चुलते बाळंभट विष्णुभट; या बाळंभटाचे नातू भिकंभट ऊर्फ भिकाजी विष्णु यांचे चिरंजीव गोपाळ भिकाजी हे अलिबाग नजीक नारंगी (श्री कनकेश्वराचे पायथ्याशीं) येथें आले. नारंगी हा गांव पुण्याजवळील चिंचवडचे श्री मोरयांस इनाम आहे. गोपाळभट हे भिक्षुक होते. यांनीं नारंगी येथें गांवठी शाळा चालविली होती. म्हणून यांना सर्वजण मास्तर असें म्हणत. त्यांचे चिरंजीव सदाशिवराव हे त्यावेळचें शिक्षण पुरें करून त्यांनीं तलाठ्याची नोकरी धरिली. पुढें वाढत वाढत शेवटीं कलेक्टरचे डेपुटी चिटणीस झाले. सन १९०० सालीं यांनीं पेनशन घेतली. नंतर १९०४ सालीं हे अलिबाग येथेंच स्वर्गस्थ झाले. नारंगी येथें पूर्वी घर होतें. हल्लीं अलिबाग येथें घर बांधिलें आहे. सदाशिव गोपाळ यांना पुत्र सहा आहेत. पहिले विष्णुपंत हे डेपुटी अकौंटंट असून अलिबाग येथेंच आहेत. यांचे चिरंजीव सिताराम विष्णु हे एम्. ए. आहेत. हे दादर येथें इंडियन एज्युकेशन सोसायटींत आहेत. कृष्णाजीपंत हे ठाणें येथें वेड्याचे हॉस्पिटलमध्यें कंपाउंडर आहेत. गणपतराव हे मुंबई येथें जनरल पोष्टांत नोकर आहेत. वामनभटजी श्री क्षेत्र वांई येथें असून आपली शाखा पूर्ण संपवून आणखी अध्ययन चालूच आहे. वामनभट स्नानसंध्येशील असून वैदिक धर्माचे खरे अभिमानी आहेत. दत्तात्रय सदाशिव हे सन १९१० सालीं बी. ए. झाले. हल्लीं अलिबाग येथें कलेक्टरचे चिटणीस आहेत. आणि जनार्दनपंत हे मुंबई येथें सॉलिसिटरचे ऑफिसांत क्लार्क आहेत. गणपतराव यांना दोन मुलगे व दत्तोपंत यांना एक मुलगा आहे.

होळी या गांवीं गोखले यांचे घरांचे कित्येक चौथरे मात्र हल्लीं शिल्लक राहिले आहेत. होळी येथील गोखले यांनीं होळीपासून एक मैलावर दळे या

गांवीं जाऊन वस्ती केली. हल्लीं दळें या गांवीं गोखल्यांची घरें सुमारें १०।११ असावींत या गांवींही कांहीं घरांचे फक्त चौथरे मात्र दृष्टीस पडत आहेत. विद्यमान होळी येथें गोखले यांचें घर नांदतें आहे. केशव नारायण व वासुदेव नारायण हे दोघे बंधु मात्र होळी येथें असतात. वासुदेवराव जरी दळें येथें दत्तक गेले आहेत; तरी ते मुलाबाळासह होळी येथेंच रहात आहेत. होळी व दळें येथील गोखले यांच्या घरीं कोणतेंही कार्य असलें म्हणजे होळी येथें या घराण्यांतील वडील घराण्याचा चौथरा आहे त्या चौथऱ्यावर प्रथम नारळ व विडा ठेऊन त्या चौथऱ्यास नमस्कार करून मग इतर देवास जाणें, अशी परंपरा चालत आल्या प्रमाणें अद्यापि तसेंच चालत आहे.

सदरहु वडील घराण्यांतील वंशज हल्लीं कोणीच नाहींत.याच वडील घराण्यांतील मुलगी श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांस केली होती. तींच यशोदाबाईसाहेब होय. होळी येथील श्री भरतदुर्गा देवीला (हल्लीं जिला भराडी म्हणतात, तीच भरतदुर्गा होय.) सुवर्ण मुकुट व एकशेआठ सुवर्ण पुतळ्यांची माळ या प्रमाणें दोन जिन्नस श्रीमंत यशोदाबाईसाहेब पेशवे यांनीं दिले. पैकीं सुवर्ण–मुकुट मात्र होळी येथें आहे.मुकुट गुरवाचे घरीं असतो. मुकुटाचें वजन अर्धा शेर आहे.

पोंबुर्लें येथील भुते गोखले.

गोविंद सदाशिव हे पोंबुर्लें येथील रहाणारे होत. यांनीं पुणें येथें येऊन घर संपादिलें. हे पुणें रेकार्डकीपर होते. यांचे चिरंजीव वामनराव गोविंद हे टाईपरायटरचें काम करीत असत. हल्लीं वामनराव यांचे चिरंजीव लक्ष्मण वामन हे एकटेच आहेत. लक्ष्मण वामन लहान असल्यामुळें त्यांची घरची व्यवस्था व शिक्षण त्यांचे मामा केळकर हे पाहत आहेत. त्यांचें घर नारायणपेठेंत ४०९ नंबरचें आहे.

नारायण चिंतो हे वैदिक असून पोंबुर्लें येथेंच रहातात. भास्कर हे मोजणी खात्यांत नोकर आहेत. वासुदेव हे विड्याचे [खाण्याचे] पानाचा व्यापार मुंबई येथें करितात. हरि विनायक हे कोल्हापुरास व्यापार करितात. वासुदेव विनायक हे पोंबुर्ल्यास आहेत. नारायण बाबजी हेही पोंबुर्लें येथें आहेत.

चिमणाजीचे नातू गोविंद लक्ष्मण हे बेळगांव येथें आले, हे खासगी नोकर होते, यांना पुत्र दोन; कृष्ण व लक्ष्मण. कृष्णाजी गोविंद हे सन १८९५ त म्याट्रिकच्या परिक्षेस मुंबईला गेले होते. नापास झाल्यामुळें पुढें शिक्षण सोडलें आणि व्यापारांत शिरले. बेळगांव येथील 'गोविंद गुंडो काळकुंद्रीकर' यांच्या कापडाचे दुकानांत नोकरीवर राहिले. त्या दुकानांत

१६।१७ वर्षें नोकरी केली. गोविंद गुंडो यांचे चिरंजीव हरि गोविंद काळकुंद्रीकर यांनींच कृष्णाजीपंतास नोकरीवरुन कमी केलें. गांवांतील लोकांस हें समजतांच पुष्कळ लोकांनीं कृष्णाजीपंतास आग्रह केला कीं. तुम्ही स्वतंत्र दुकान सुरू करा. यावरून कृष्णाजीपंत हे कापडाचे व्यापारांत बाकबगार असून लोकप्रिय आहेत हें उघड होत आहे. सन १९१६ आगष्ट मध्यें हे नोकरी वरून निघाल्यावर लगेच सप्टंबर महिन्यांत कृष्णाजीपंतांनीं स्वतःच्या मालकीचें दुकान सुरू केलें. सचोटीनें व नेकीनें चालणाऱ्यास परमेश्वर खालीनें यश देतो यांत संशय नाहीं. त्याप्रमाणें कृष्णाजीपंतांनीं चार वर्षांत कर्जाची फेड करून. हल्लीं अदमासें २० हजारपर्यंत माल दुकानांत शिल्लक ठेवला आहे.कृष्णाजीपंतांचे कनिष्ट बंधु लक्ष्मणराव हे म्यॉट्रिक व स्कूलफायनल पास झाल्यावर १९०१ च्या खानेसुमारींत त्यानीं नोकरी धरिली. नंतर जज्ज कोर्टात एक वर्ष भर होते. नंतर आग्रि कलचर खात्यांत २५ रुपये पगारावर नोकरीवर राहिले. हल्लीं १५० रुपये पगार चालू आहे. कृष्णाजीपंतांनीं बेळगांव येथें घर विकत घेतलें आहे.

रामचंद्र घोंडो व मोरो विसाजी हे पोंबुर्लें येथें शेती वाडी करीत आहेत. यांच्या घरण्यास ' भुते गोखले ' कां म्हणतात! त्याचें कारण, यांच्या कुटुंबांत गोंधळ करण्याची चाल आहे म्हणून यांना 'भुते गोखले' असें म्हणूं लागले.होळी या गांवींच असतांना या कुटुंबांतील पुरुषानें नवरात्रांत गोंधळ घालण्याची चाल पाडिली. म्हणून त्या कुटुंबांतील सर्वांस ' भुते गोखले ' असें म्हणूं लागले. मोरो विसाजी यांना होळी येथून भातार्चे उत्पन्न येत आहे. नारो विश्वनाथ गोखले हे पोंबुर्ल्यास आले असें म्हणतात, परंतु पुढील जुन्या कागदावरून विश्वनाथ हे पोंबुर्ल्यास आले. आज कर्मीत कमी २५० अडीचशें वर्षांची वरती पोंबुर्ल्यास आहे. मोरो विश्वनाथ हे वयोवृद्ध आहेत. यांना पुत्र पांच; दत्तात्रय, विनायक व कृष्ण हे मुंबई येथें आहेत. कृष्णाजी मोरो यांनीं पोंबुर्लें येथें तीन वर्षें शाळामास्तराचें काम केलें होतें. नंतर मुंबई येथें दोन वर्षें खासगी नोकरी केली. सन १९१५ सालीं किराणा मालाचें स्वतंत्र दुकान सुरू केलें. हल्लीं दोन दुकानें चालविलीं आहेत. पारतंत्र्यते सारखें दुसरें दुःखच नाहीं. हें ज्याला समजलें तो हरतऱ्हा करून स्वतंत्र उद्योग चालवितो. सर्वांत आनंद कोणता म्हणाल तर स्वतंत्रता होय ! येशवंत मोरो यांनींही खाममांव येथें बिस्कीटांचा स्वतंत्र धंदा चालविला आहे.

श्री.

नारो विश्वनाथ गोखले वा॥ मौजे पोंबुर्लें तर्फ खारेपाटण सुा॥ सन सितैन मया व अलफ कारणें श्रीमंत राजश्री स्वामीचे शेवेसी लिहून दिल्हा कतबा ऐसाजे आपला कुणबावा व ठिकाण मौजे होळी कसवा मिठगौणे येथें वतनी आहेत त्या कुणबाव्याचे तिजणुक आपला बाप करी त्यास नेवाडे सबब

निघोन मौजे पोंभुर्ले येथें गेले. त्यास वर्षें तीस झालीं. तेथील कुणबावा व वर्कस व आगर जमीन आहे. त्यास आपला निम्मेचा विभागी गणेशभट विा केशव भट गोखले हे कुणबावा टाकून वर्षें साठ जाहलीं. हल्लीं सासवडीं आहे. त्यास कुणबावा कसबा मौजे मजकूरच्या रयतास लावून दिवाण तिचणुक करून घेतो हें खरें यास अंतर जाहलें तर दिवाणाचा अन्याई हा कतबा लिहून दिल्हा सही छ. ७ जिल्हेज बी कलम खुद्द.

श्री.

राजश्री याविराजित राजमान्य राजश्री नारोपंत गोखले स्वामी गोसावी यासी—

सेवक खोत व महाजन व उपाध्ये व समस्त ग्रामस्त मौजे होळी-दळें नमस्कार विनंती उपरी पूर्वी केशवभट ताटे [ताटे हेंही विशेषणच आहे.] यांनीं श्रीलक्ष्मीनारायणाची देवाची स्थापना केली त्यास तेच देवाची पूजा करीत होते. ते मृत्यू पावले तेव्हां पुढें त्यांचे पुत्र गणेशभट गोखले पूजा करीत होते. ते निघोन देशांतरास गेले तेव्हां पूजा पडली. पुढें गणेशभट कुणबावा करीत होता तो ब्राम्हणास लावून पूजा चालती केली. त्यावर हल्लीं तुम्ही आलेत आणि तुम्ही आपली निम्मे तक्षीम मागितलीत तर तुम्ही ज्यादिवशीं आपलें ठिकाणावर घर बांधून रहाल तेव्हां तुमचे निम्मे तक्षीम हवालीं करूं. त्या कुणबाव्याकडे श्रीच्या पूजेचा कांहीं कज्या नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंती शके १६८९ सर्वजित नाम संवत्सरे पौष शुा ४ बीं कलम महादेव माहाजनी मौजे मजकूर.

निशाण्या.

१ बाळंभट बापट, १ गणेशभट बापट, १ रामाजी हरी भांबे वस्ती होळी, १ विठ्ठल महाजनी. १ शंभुभट गोखले, १ गोविंदभट बरी [गोखले], माहादाजी अनंत गोखले.

वरील भुते गोखल्यापैकीं एक घराणें हल्लीं पुणें येथें आहे. तें गणेश दिनकर गोखले यांचें होय. गणेश दिनकर हे पुण्यास इनाम कमटींत काम्करून होते. यांस पुत्र दोन. विष्णु व दत्तात्रय. विष्णु गणेश हे भावे स्कूल मध्यें मास्तर होते, यांना हल्लीं पेनशन मिळतें. दत्तात्रय गणेश हे पोलीस डिपार्टमेंटमध्यें नोकर होते, हल्लीं पेनशनर आहेत. नारायण व शंकर विष्णु हे बाँबे ऑफिसांत नोकर आहेत. निळकंठ हे न्यू पूना कालेजांत आहेत.

मणचें व पुणें येथील गोखले.

होळीहून जो एक गोखले निघाला तो प्रथम तारळ येथें गेला. नंतर तारळहून मणचें या गांवीं आला. येथून मुटाट येथें गेला. मिळुन तारळ, मणचें व मुटाट या तिन्ही गांवीं विद्यमान गोखल्यांची घरें आहेत. मात्र तारळ या गांवीं एकच घर व त्या घरांत एकच गोखले आहे. तो विद्यमान 'गांधर्व महाविद्यालयांत' आहे. मणचें गांवातून रामचंद्र गणेश गोखले हे पेशवाई अम्मलांत पुणें येथें आले. भिडे यांची मुलगी पेशव्यांनीं करून घेतली त्या भिड्यांस पेशव्यांनीं वाडा बांधून दिला. त्याच भिडे घराण्यांत रामचंद्र गणेश गोखले यांनीं आपली मुलगी दिली होती. सदरहू मुलीनें आपलें बंधू गणेश राममंद्र गोखले यास आपल्या वाड्याच्या दक्षिण बाजूची कांहीं जागा रहाण्याकारितां दिली. गणेश रामचंद्र यांनीं त्या जागेंत घर बांधिले. सदरहु घरांत विद्यमान गणेश रामचंद्र यांचे चिरंजीव रामचंद्र व नातू केशवराव हे रहात आहेत. हें घर बुधवारपेठेंत असून त्याचा म्यु. नं. ८ आहे. गणेश रामचंद्र यांच्या बहिणीनें घर बांधण्यासहि द्रव्याची मदत केली होती.

गणेश रामचंद्र यास पुत्र तीन; रामचंद्र, त्रिंबक व नारायण. तिघांपैकीं रामचंद्र हे हल्लीं हयात आहेत. यांचें वय ७३ वर्षांचें आहे. वयमान परत्वें हल्लीं अशक्तता आल्यामुळें सर्व उद्योग बंद पडले. यांनीं व्यापार व कंत्राट या कामावर दोन पैसे मिळविले आहेत. पायानें विशेष चालवत नाहीं म्हणून, हल्लीं फक्त मार्केटमध्यें भाजीकरितां व देवदर्शनास तेवढें घरा बाहेर जातात. त्रिंबकराव यांचे पुत्र केशवराव हे बी. ए. आहेत. हे फर्ग्युसन कॉलेजांत नोकर आहेत. त्रिंबकराव गणेश हे मिलिटरी फायफन्स मध्यें नोकर होते. नारायणराव गणेश हे बाउंडरी सेटलमेंट ऑफिसर होते. ते सन १९१२ सालीं वारले यांचें चिरंजीव विष्णुपंत हे ॲग्रिकलचर कॉलेजांत प्रोफेसर आहेत. यांना दोन मुलगे आहेत.

रामचंद्र गणेश यांचे चुलत बंधु विष्णु सदाशिव यांनीं विनायक यांस दत्तक घेतलें. हे विनायक विष्णु नातें येथें शेती करीत आहेत. त्यांनां मुलगे चार; कृष्णाजीपंत जी. आय. पी. रेलवेत. स्टेशनमास्तर आहेत. हरी हे मुंबई येथें सॉलिसिटर ऑफिसांत आहेत. त्रिंबक हे जी. आय. पी. रेलवे ऑफिसांत आहेत. विष्णु हे नातें येथें शाळा मास्तर आहेत.

मणचें येथें केशवभट रामभट व त्यांचे चुलत बंधु अनंत गणेश हे दोघे बंधु सुमारें दोनशें वर्षांपूर्वी तारळहून आले. अनंत गणेश यांचें वंशजाची माहिती वर दिलीच आहे आतां केशवगट यांच्या वंशाची माहिती हेतोः–केशवभटाचे नातू विश्वनाथ रामचंद्र हे जमखंडी येथें नोकर होते. यांचे चिरंजीव सदाशिव विश्वनाथ हे श्रीमंत अप्पासाहेब जमखंडीकर यांच्या पाशी नोकर होते. हल्लीं मणचें येथें वयोवृद्ध झाल्यामुळें

अंथरुणावर पडून आहेत. त्यांचें वय९०वर्षांचें असावें असें वाटतें. यांचें वडिलाचे चुलत बंधु लक्ष्मण माहादेव यांचे नातू केशव बापूजी यांचा व लक्ष्मण माहादेव यांचे बंधु वासुदेव माहादेव यांचें नातू विठ्ठल बल्लाळ यांचा असे हे दोन्ही वंश चालू आहेत. सदाशिव विश्वनाथ हे जरी फार थकले आहेत, तरी कांहीं जुन्या गोष्टी सांगायला लागले म्हणजे त्यांच्या आंगांत स्फुरण येतें. यांचें दोन मुलगे; गोविंद व दत्तात्रय. गोविंद सदाशिव हे वऱ्हाडमध्यें वाशिम येथें हायस्कुलांत मास्तर आहेत. दत्तोपंत हे कोची येथें व्यापारी–दलाल आहेत. गोविंदराव यांचें चिरंजीव रामकृष्ण हे बी. ए. आहेत.

जिल्हा धारवाड ता. हावेरी पैकी हावनूर या गांवीं परशरामपंत जोग या नांवाचे सावकार रहात होते. त्यांच्याकडे मणच्यांहून लक्ष्मण माहादेव गोखले हे नोकर म्हणून राहिले. लक्ष्मणपंतांचे नातू केशव बापूजी हे हावनूर येथें वयाचे दाहावे वर्षापासून वयाचे ७० वर्षापर्यंत होते. पुढें नोकरी चालूच होती. लक्ष्मणपंत घरीं मणचें येथें येऊन वारले. केशवराव हे हावनूर येथेंच वारले. बापूजी लक्ष्मण हे त्यावेळीं मणचें येथें होते. मणचें येथें घर व शेती आहे. केशव बापूजी यांस मुलगे दोन. वासुदेव व दत्तात्रय. वासुदेव केशव हे मुंबई येथें म्यु. स्कूलमध्यें नोकर आहेत आणि दत्तात्रय हे कोर्टांत नोकर आहेत. वासुदेव माहादेव यांचें पणतु विनायक हे नातें येथें दत्तक गेले आहेत. धोंडदेवाचें मुलगे भिकाजी हे स्वामी झाले आहेत. तिसरे पणतु व्यंकटेश; व्यंकटेश यांस पुत्र दोन; वासुदेव व गोविंद. वासुदेव हे बी. ए. असून सेंट्रल बँकमध्यें नोकर आहेत. चवथें पणतू गणेश विठ्ठल हे पेनशनर असून मुंबई येथेंच रहात आहेत. त्यांचें पुत्र कृष्णाजी गणेश हे हेल्थ ऑफिसांत नोकर आहेत. वासुदेवराव व कृष्णाजी हे मुंबई येथें एकेच ठिकाणीं रहात आहेत.

मणचें येथें गोखल्यांचीं घरें चार आहेत. काशिनाथ कृष्ण हे कोची येथें व्यापार करितात. बाकी सर्व मणचे येथें शेती करून आहेत. मणचे या गांवीं व्याघ्रेश्वराचें स्थान फार रम्य आहे. मणचें हा गांव डोंगराचें पायथ्याशीं असून गांवास खाडी अगदीं जवळ आहे.

अणसुरें, आपट व गिरे-कुवेशी येथील गोखले.

होळी–दळ्याहून अणसुरें या गांवीं प्रथम एक पुरुष आला. नंतर अणसुऱ्याहून कुलाबा जिल्ह्यांतील तालुका पनवेल पैकीं, 'आपट' या गांवीं येऊन वस्ती केली. आपट या गांवीं हल्लीं वामन कृष्णाजी, नारायण रघुनाथ, व गोविंद सदाशिव वगैरे गोखले मंडळी शेती वगैरे करून आहेत. भास्कर केशव हे बाँबे ऑफिसांत

पुणें येथें आहेत. यांनां पगार १५० दीडशें रुपये आहे. पांडुरंग व मोरेश्वर हे पोष्टांत नोकर आहेत. यांचेपैकींच गोखले इंदोरला आहेत. महादेव श्रीधर हे धुळ्यास वकील होते. हेच इंदोर येथें आले.यांना मुलगे पांच; विनायक हे मद्रू येथें ऑईस फ्यॉक्टरींत नोकर आहेत. मोरेश्वर हे हुकुमचंद मिल मध्यें नोकर आहेत. चिंतामणी गव्हमेंट अकौंट ऑफिसांत आहेत. भालचंद्र ओरिएंटल इन्शुअरन्स कंपनींत आहेत. नारायण माहादेव हे टिळक कॉलेजांत राहून बी.ए.झाले आहेत.

शंकरभट गोविंदभट हे होळीहून गिरे-कुवेशीं येथें रहाण्यास गेले असावेत. गिरे कुवेशीहून वाडा-खोल येथेंही यांच्यापैकीं कोणी रहाण्यास गेले. मिळून होळीचेच गोखले दोन्ही ठिकाणीं राहूं लागले. शंकरभटांचे नातू कृष्णंभट गुणंभट हे प्रसिद्ध वैदिक होते व ते पंचग्रंथी होते. त्यांचे चिरंजीव बाळंभट सुद्धां पंचग्रंथी असून चांगले वैदिक होते. कृष्णंभटतात्या यांचे नातू महादेव गणेश हे हैद्राबाद येथें जाऊन गवई बनून मिरज येथें आले. महादेवबुवा हे कोल्हापूर दरबारांत नोकर राहिले. सदरहु नोकरी महादेवबुवांचे नातू सदाशिवबुवा गणपतीबुवा यांच्याकडे हल्लीं आहे. सदाशिवबुवांचे दुसरे बंधु अनंत हे मिरज येथेंच माहादाजीपंत गोखले यांचे चिरंजीव आपा गोखले यांस दत्तक गेले आहेत. तिसरे बंधु चिंतामणी हे मुंबई येथें कंपौंडर आहेत. कृष्णबुवा महादेवबुवा हे मिरज येथें रहात आहेत. मिरज येथील घर महादेवबुवांनींच बांधिलें आहे.

कोंकणांत गिरे–कुवेशी,वाडा–खोल या गांवीं अनंत व धोंडो गणेश यांचे पूर्वज रहात असत. हें भिक्षुक घराणें होय. विश्वनाथ रामचंद्र हे खोल गांवीं शेती करीत असत. गणेश विश्वनाथ हे मुंबई येथें जी. आय. पी. रेलवेंत नोकर होते. यांचे मुलगे दोन; अनंत व धोंडो. या दोघांचें शिक्षण म्यॉट्रिकपर्यंत झालें आहे. अनंतराव व धोंडोपंत हे दोघेही बी. बी. सी. आय. रेलवेंत नोकर आहेत. शिवाय घरबसल्या थोडा व्यापारही करितात. ते मुंबई येथें रहात आहेत.

वाडा-खोल येथें बापूजी जनार्दन हे शेती करून आहेत. नरसिंह जनार्दन हे बिरवाडी येथें रहात आहेत. चिंतामण जनार्दन पुणें येथें म्यु. स्कूलमध्यें मास्तर आहेत आणि विश्वनाथ जनार्दन हे मुंबई येथें लोकसेवक छापखान्यांत असून कामिशन एजंट आहेत.

मौजे गिरे कुवेशीहून गुणंभट शंकरभट व बाळंभट शंकरभट या दोघांचे वंशज देशावर गेले. शंभूभट बाळंभट हे सुंदरशी येथें गेले. यांच्या वंशजांनीं प्रांत माळवामध्यें सुंदरशी येथें कायमचें रहाण्याचें ठिकाण केलें आहे. मौजे डोळेगांव जिल्हा सातारा येथें जमीन व सुंदरशी येथें इनाम जमीन व घर केलें आहे. सुंदरशीहून इंदोर येथें गणपतराव गोखले आले यांचे जवळ दत्तात्रय मुकुंद आहेत. वामन मुकुंद हे इंदोर येथें कॉलेजांत आहेत. गंगाधर रामचंद्र हे नागपूर ॲग्रीकलचर कॉलेजांत आहेत. कृष्णंभट शंभूभट हे मुक्काम बेड्याखेडी

येथें रहात आहेत. व रामचंद्र मोरेश्वर हे सुंदरशी येथें रहात आहेत. दोघेही शेती करीत आहेत.

शंभूभट बाळंभट हे वैदिक व सिद्धांती ज्योतिषी होते. त्यांनीं पुण्यास परीक्षा दिली होती. आपाभटजी व मोरभटजी हे वैदिक होते. त्यांनीं बडोद्यास शके १८१०त परीक्षा दिली होती.

होळी-कुवेशी, गव्हाण व वाडा-खोल येथील गोखले.

कुवेशी हा गांव होळी व दळें या गांवापासून अगदीं जवळ आहे. पूर्वी हा गांव विशेष ब्राह्मण वस्तीचा होता. त्या मानानें हल्लीं जरा कमी आहे. कुवेशी येथें श्री रामेश्वराचें देवालय असून हें स्थान बरेंच जुनें आहे. कुवेशी येथें ज्या पुरुषानें इनाम संपादिलें त्याचे आजे अगर पणजे यांपैकीं कोणी तरी प्रथम कुवेशी येथें येऊन उपाध्येपणाची वृत्ती संपादिली आहे. पुढें सनदेची नकल देत आहें त्यावरून वरील अनुमान खरें ठरतें. विद्यमान होळी येथें नांदतें घर असें एकच आहे. रामचंद्र विष्णु गोखले हे वयोवृद्ध पुरुष हल्लीं वडिलार्जित ठिकाणांत रहात आहेत. यांच्याजवळ असलेल्या अस्सल सनदेची नकल पुढें देत आहे.

श्री.

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ४८ शुभकृत नाम संवत्सरे क्षत्रीयकुलावतंस श्री राजा शंभू छत्रपति स्वामी याणी वेदमूर्ती राजश्री जीमभट बिा गोविंदभट उपनाम गोखले गोत्र काश्यप सूत्र हिरण्यकेशी यांसी दिल्हे वृत्तीपत्र ऐसाजे तुम्ही पनाल्याचे मुक्कामीं स्वामी संनीध येऊन विनंती केली मौजे गिरे काा मिठगवणें कुवेशी काा मजकूर येथील उपाध्येपणाची वृत्ती पुरातन आपली आहे त्यास पूर्वी आपणांस धर्मादाय तांदुळ पावत होते. ते दूर करून राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी होते. त्याणी अण्णाजीपंताच्या धारीयानें वाडा कुवेशी येथें आपले पुरातन ठिकाणापैकीं इनाम जमीन दस्तकरी ५० पनासाची देऊन पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें वृत्तीचा उपभोग करीत असतां शाम (W) क (ल) च्या अवतारामध्यें वृत्तीपत्रें होतीं ती गेलीं याकरितां आपण पनालीयाचे मुक्कामीं राजश्री शिवाजी राजे दाजी यांसमीप येऊन हें वर्तमान सांगितलें त्यावरून त्याणीं पनास लारीची वृत्ती आपणास करार करून महालीचे कारकुनाची चतुःसिमा करून दिल्ही आहे. त्याप्रमाणें चालवणें ऐसीं पत्रें करून दिल्हीं.

सदरहु सनदेप्रमाणें हल्लींही कुवेशी व दळें येथें इनाम जमीन चालू आहे. इंग्रजी सनद सन १८९४ त ता. २६ फेब्रुवारीत कुवेशीची व ता. १७ मे सन १८९२ त मजरे दळेची नंबर ३ इंग्रजी सनद ची रामचंद्र विष्णु गोखले

यांच्या नांवची मिळाली आहे. रामचंद्र विष्णु यांना मुलगे तीन; गोविंद, मोरेश्वर व गणपती. गोविंद व मोरेश्वर हे मुंबई येथें व्यापारी नोकरीवर आहेत. गणेश हे कॉलेजांत आहेत.

जीवभट गोविंदभट यांचे निपणतू भास्कर भिकंभट हे कोंकणांतून निघोन प्रथम श्री कृष्णाकांठीं हरिपूर येथें लागू यांचेकडे आले. पुढें लागू यांच्या सहाय्यानें यांनीं सांगली संस्थानांत नोकरी धरली. पुढें हे कमाविसदार झाले. कमाविसदार झाल्यावर यांची नेमणूक गव्हाण, अंजनी, जाखापूर, कुची व कुंडलापूर या पांच गांवांवर झाली. गव्हाण या गांवीं फसली सन १२६० त बंड जाहलें होतें. बंडापूर्वी ५।६ वर्षें भास्करराव गोखले या गांवावर कमाविसदार झाले होते. गव्हाण गांवीं वरील सालांत लालगिरी गोसावी यानें श्रीमंत आप्पासाहेब सांगलीकर यांच्याविरुद्ध बंड उभारिलें. आपल्या अम्मलाखालील गांवांत बंड उत्पन्न झाल्यामुळें भास्करराव यांना विशेष काळजी उत्पन्न झाली. बंड जाहल्याचें दरबारी कळविल्यावर दरबारकडून बंडखोरास व त्याचे साथीदारास पकडून नेण्याकरितां आलेल्या अम्मलदारास भास्कररावांनीं चांगली मदत केली. पुढें संस्थानांत कायम घारेबंदी झाल्यामुळें कमाविसदार हुद्याची जागा कमी केली. त्यावेळीं भास्करराव हे कमी जाहले. पुढें भास्करराव हे गव्हाण येथेंच राहून शेती व व्यापार करूं लागले. गव्हाण येथें ज्या जागेवर यांनीं घर बांधिले, ती जागा हयातीपर्यंतच्या करारावर गहाण घेतली होती. यांच्या पश्चात् सदरहु करारास अनुसरून यांच्या नातवंडांनीं घराची किंमत व जागेवरील रक्कम घेऊन जागा सोडली. आणि दुसरी जागा घेऊन दोन घरें बांधिलीं.

गव्हाण व अंजनी या गांवीं जमीनी संपादिल्या; गव्हाण अंजनीचे मळ्यांतील विहिर बांधिली; गव्हाणनजीक मिरज संस्थानापैकीं मळणगांवीं श्री हरिश्चंद्र या देवाचा वार्षिक उत्साह आज अदमासें ६०।६२ वर्षें होत आलीं सारखा चा आहे. त्या उत्साहाचे पहिल्या दिवसाच्या खर्चाची व्यवस्था जमीन देऊन कायमची केली. हें सर्व भास्करराव यांनीं केलें. भास्करराव हे गव्हाण येथें सन १९०२ मध्यें वयाचे ९७ व्या वर्षी वारले. यांना दोन मुलगे होते. पहिले कृष्णाजी हे वडिलांपासून विभक्त राहिले होते. हे सन १९०१ मध्यें वारले. दुसरे रामचंद्र हे वडिलांजवळ होते. रामचंद्र हे सन १९०३ मध्यें वारले. व्हाण येथें भास्करपंतांनीं लोकप्रीती विशेष संपादिली होती. कृष्णाजीचे पुत्र बळवंतराव व रामचंद्रपंत यांचे पुत्र गोविंदराव या दोघांनीं गव्हाण येथें वडिलार्जित जमीन व व्यापार करून प्रपंच चालविला आहे. कोंकणांतील उत्पन्नही यांना मिळत असतें.

जीवभट गोविंदभट यांच्या दोन मुलांपैकीं पहिले बाळंभट यांच्या वंशाची माहिती मागें दिलीच आहे. आतां दुसरे पुत्र रामभट या वंशजाची माहिती

देतों. रामभटाचे नातू रामभट व बाळंभट; रामभटाचे पणतू वासुदेव विठ्ठल हे व्यापारी नोकर आहेत. बाळंभटाचे नातू वामन लक्ष्मण यानें कुवेशी येथील घरदार सर्व विकलें. यांचे तीन पुत्र; रामचंद्र व शंकर हे दोघे व्यापारी खात्यांत नोकर आहेत व तिसरे हरी हे विद्यार्थी आहेत हे मुंबई येथें असतात. कुवेशी येथें गोखले यांचीं चार घरें होतीं. पैकीं एक घर रामचंद्र विष्णु यांचें नांदतें आहे. एका घरास कुलुप आहे. आणि एका घराचा अर्धा भाग विकी झाला आहे.

जीवभट गोविंदभट याचे नातू लक्ष्मणभट बाळंभट यांचे पणतू गणेश सदाशिव हे जमखंडी येथें आले. प्रथम जमखंडी येथें भिक्षुकी करीत होते. नंतर हे श्रीमंत कै. आप्पासाहेब जमखंडीकर यांच्या मातोश्री जवळ होते. यांनीं जमखंडी येथें घर बांधिलें. यांना तीन मुलगे; हरी, सखाराम व विष्णु. हरी गणेश हे संस्थानांत नोकर आहेत. यांचे चिरंजीव दवाखान्यांत नोकर आहेत. गजानन सखाराम हे बँक ऑफ इंडियामध्यें नोकर आहेत. विष्णु गणेश हे मुंबई येथें म्युनिसिपल ऑफिसांत नोकर आहेत. गणेश सदाशिव यांचे बंधू विनायक व गोपाळ; विनायक सदाशिव यांचे नातू सिताराम बाळकृष्ण हे महाड—बिरवाडी येथें आहेत. गोपाळ सदाशिव यांचे नातू गोविंद शिवराम हे बी. ए. च्या क्लासांत होते. यांनीं कुवेशी येथील आपल्या हिश्शाची इष्टेट घरासुद्धां विकली आहे.

खोल हा गांव विजयदुर्गपासून २।२॥ मैलांवर आहे. तेथील गोपाळभट चिमणभट हे शास्त्री होते, यांना दोन मुलगे; वामन व हरि; हरिभट हे दशग्रंथी वैदिक होते. वामन गोपाळ हे सन १८७३ च्या सुमारास कुलाबा जिल्ह्यांत पेण गांवीं आले. व तेथून १८९३ च्या सुमारास धुळें येथें व्हॉक्सनेटर इन्स्पेक्टर म्हणून गेले. चिंतामण हरि हे सन १९१८ सालीं बी. ए. झाले. हल्लीं मालेगांव येथील म्यु. इंग्रजी शाळेचे हेडमास्तर आहेत. गजानन वामन हे अंमळनेर येथें व्हॉक्सनटेर डॉक्टर आहेत. वडिलोपार्जित घर व जमीन खोल गांवीं होती. गोपाळभट आपलें कुटुंब वारल्यावर घराचा त्याग करून यात्रेस गेले. नंतर वामनराव यांनीं शेताची नासाडी जाहल्यामुळें त्याचा हक्क सोडून दिला.

वाडा—पडेल येथून रघुनाथभट बाबाजी हे सहकुटुंब कोल्हापूर येथें आले. यांचे पुत्र महादेव हे जन्मतांच त्यांची मातोश्री वारली. नंतर रघुनाथभट यांनीं त्या मुलास कोल्हापूर येथें एका अश्वत्थाचे पारावर ठेवून आपण कोंकणांत निघोन गेले. आणि कोंकणांत त्यांनीं दुसरें लग्न केलें. या दुसऱ्या कुटुंबास मुलगा झाला त्याचें नांव कृष्ण ठेविलें. इकडे कोल्हापूर येथें अश्वत्थाचे पारावर महादेव यास ठेवून गेल्यानंतर कांताचार्य पंडित यांच्या मातोश्रींनीं पारावरील महादेव या मुलास उचलून घेऊन घरीं नेलें. व त्यांस लहानाचें मोठें केलें. महादेव रघुनाथ गोखले हे कोल्हापूर येथें भोपे यांच्याकडे कारकून होते. त्यांचे चिरंजीव वासुदेव

महादेव यांचें शिक्षण कोल्हापूर येथें झालें. स्कूल फायनल १८९१ त पास झाले. नंतर १८९२ त म्याट्रिक झाले. नंतर इचलकरंजी संस्थानांत 'गोविंदराव इंग्लिश स्कूल' मध्यें सन १८९३ त पंधरा रुपये पगारावर शिक्षक झाले. तेव्हांपासून ते हल्लींही शिक्षकाचेंच काम करीत आहेत. हल्लीं पगार तीस रुपये मिळतो. यांना दोन मुलगे आहेत ते विद्यार्थी आहेत.

हाळी–कुवेशीहून सदाशिवपंत गोखले उजैनकडे मामलतीचे कामावर होते. त्यांनीं तिकडे बरेच दिवस मामलतीची वगैरे कामें करून परत वस्तीस कोंकणात गेले, व बरेच वयातीत होऊन वारले. त्यांचे चिरंजीव नारोपंत हे कोंकणांत सुमारें वयाचे बीस वर्षांपर्यंत होते. व पुढें त्यांचे व त्यांच्या सापत्न मातोश्रींचें पटेनासें झाल्यामुळें ते रागाऊन देशावर आले. ते प्रथम पुण्यास आले. ते ज्या ठिकाणीं राहिले त्यांच्या शेजारीच भागवत उपनांवाचे कोणी जहागिरदार रहात असत. त्यांची व यांची ओळख झाल्यावर, मुलगा चांगला होतकरू व हुषार पाहून, त्यास आपले जहागिरीचे गांवीं येशील काय म्हणून विचारिलें. नारोपंतांनीं कारकुनीची नोकरी देत असल्यास येतों असें सांगितलें. जहागिरदारसाहेबांनीं ती गोष्ट मान्य केली. आणि नारोपंतास आपले जहागिरीचे गांवीं, अहमदनगर जिल्ह्यांतिल वामोरी या गांवीं, पाठवून दिलें. तेथें हुषारीनें व कर्तबगारीनें नारोपंत मुख्य दिवाण बनले. व तेथेंच त्यांनीं आपल्या आयुष्याचे सर्व दिवस घालविले. शेवटचे जहागिरदार बाबासाहेब भागवत यांचे अतोनात खर्चामुळें जहागिरीस कर्ज झालें. व अखेरीस जहागिरदारसाहेबांस सालिना नेमणूक करून देऊन, सरकारनें ती जहागीर खालसा केली. नारोपंत यजमानांस वरचेवर इषारा देत असतांना त्यांचें न ऐकून वाटेल तशी उधळपट्टी चालविली होती. म्हणून अखेर, जहागीर जप्त जाहली व त्यामुळें नारोपंतांचें उत्पन्न बंद झालें, तेव्हांपासून पदरमोड करून प्रपंच चालविला. मुलें बरींच मोठीं होईपर्यंत, त्यांस कोठें उद्योगधंद्यास जाऊं न दिल्यानें, त्यांचाही द्रव्यार्जनाचा मार्ग खुंटला. पुढें कसे बसे त्यांनीं दिवस काढले. विपन्नावस्थेतच नारोपंतांचे नातू कृष्णाजी रामचंद्र यांनीं आपला विद्याभ्यास पुरा करून वऱ्हाडांत नोकरीकरितां गेले. प्रथम शाळाखात्यांत आणि नंतर रेव्हिन्यु खात्यांत नोकरी करून ट्रेझरी हेड्अकौंटंटचे जागीं पेनशन घेतलें. कृष्णाजीपंत हे हल्लीं जबलपूर येथें रहात आहेत.

होळी व दळें येथील देवतांचीं नावें.

श्री अंजनेश्वर,	श्री भरतदुर्गा (भराडी)
ब्राह्मण,	चव्हाटा,
स्थानेश्वर,	श्री गणपती,
श्री वेळणेश्वर,	श्री महालक्ष्मी.

रा. लक्ष्मण गोविंद गोखले, व रा. कृष्णाजी गोविंद गोखले, बेळगांव.

कै० सेनापती नरहर गणेश उर्फ बापू गोखले, तळेखांजण.

पिरंदवण वाडी--तळेखाजण येथील गोखले.

सरदार बापू गोखले यांचे निपणजे महादेवभट गोखले हे किंवा महादेवभटांचे आजे यांपैकीं मौजे पिरंदवण वाडी तळेखाजण येथे कोण रहाण्यास आले, तें नक्की समजत नाहीं. परंतु बापूंचे निपणजे महादेवभट यांजपासून तळेखाजण येथें वस्ती असल्याचें समजतें. ह्या घराण्याचे पूर्वजही होळीहूनच तळेखाजण येथें आले. बापूंचे आजे बाळाजीपंत गोखले असें कोठें कोठें लिहिलें आहे, तें चूक आहे. ते बाळाजीपंत नव्हते. ते बाळंभट होते. बापू गोखले यांनीं पिरंदवण येथे श्री मल्लिकार्जुनाचें देवालय बांधिलें आहे. हें देवालय पुण्यांतील देवालयाच्या धर्तीवर बांधिलें आहे. सर्व कोंकणपट्टींत अशा बांधणीचें देवालय नाहीं.

तळेखाजण येथें बापूंचें घर सर्व पडलें असून दगडी चौथरा, दरवाजा व कांहीं भिंती फक्त राहिल्या आहेत. ऐतिहासिक कालांतील वीर पुरुष बापू गोखले यांच्या पडलेल्या घराच्या आंतील बाजू सर्व ओसाड झाली असून आंत कोल्हीं कुत्रीं सध्यां हागत आहेत ! कालगती विचित्र आहे ती अशी, जो पुरुष महाराष्ट्राचा वाली, सेनानायक, पंत प्रधानाचा मुख्य सेनापती अतुल प्रतापी अशा बापू गोखले यांच्या घराची कोण ही दुर्दशा ! त्या घरास पाहून या लेखकाच्या नेत्रांतून दुःखाश्रू निघाले व तशा अश्रुभरित नेत्रांनीं त्या घराचें व त्या परमपूज्य भूमीचें बराच वेळ निरीक्षण करून एक मोठा उसासा टाकून, बापूंच्या त्या ओसाड घरांतून हा लेखक बाहेर पडला. या घरास लागून असलेल्या घरांतही बापू गोखले यांचे भाऊबंद रहात आहेत. पूर्वी हीं दोन्ही घरें मिळून मोठा वाडा होता, असें वाटतें. बापूंच्या घरास लागून असलेल्या घरांतही विद्यमान बापू ह्या नांवाचे गोखले रहात आहेत. या बापू गोखल्यांजवळ कागदपत्र जुने आहेत परंतु, ते दाखविण्याची त्यांची इच्छा नाहीं. कारण हे इंग्रजी अमलांतील बापू होत. सरदार बापू यांनीं देवालय बांधिल्याचे कागद दाखवा म्हणून पुष्कळ विनवणी केली परंतु व्यर्थ ! अमुक साली देवालय बांधिलें आहे. अमुक केलें आहे. तमुक केलें आहे असें तोंडीं सांगतात. तें कांहीं उपयोगी नाहीं.

सरदार बापू गोखले यांच्या भाऊबंदांपैकीं सध्यां चांगल्या स्थितींत असून अगदीं जवळचे असे धारवाडास कामनकटयावर रहात असलेले रामचंद्र बल्लाळ गोखले व कृष्णाजी गोविंद गोखले हे आहेत. या जवळच्या व लांबच्या इतर गोखल्यांनीं आणि इतिहासभक्त व शूर पुरुषांच्या अभिमान्यांनीं, तळेखाजण येथील सरदार बापू गोखले यांच्या पडक्या घराचे कांहीं तरी योग्य स्मारक करावें अशी या लेखकाची सर्वांना नम्र विनंती असून सर्वांबरोबर हा लेखकही थोडी झीज सोसण्यास तयार आहे.

सरदार बापू गोखले यांची पुष्कळ माहिती निरनिराळ्या स्वरूपाची चरित्ररूपानें छापिली गेली आहे. शालिग्रामकृत "बापूंचें चरित्र" धनुर्धारीकृत "जवानमर्द ब्राह्मणभाई" वगैरे सर्व वाचकांच्या वाचण्यांत आलें असेलच. म्हणून मी चर्वित चर्वण न करितां मला जी कांहीं अप्रसिद्ध माहिती उपलब्ध झाली ती यापुढें देत आहें. त्यापूर्वी ज्यांच्या कडोन ती माहिती मिळाली; त्यांच्या संबंधीं थोडी माहिती देणें युक्त असल्यामुळें प्रथम ती माहिती देतों.

धोंडोपंत गोखले यांच्या घराण्यासंबंधीं व आपला उत्कर्ष कसा झाला या संबंधीं कै० गणेश सदाशिव साठे यांनीं श्रीक्षेत्र काशी मुक्कामीं जी खासगत यादी शंभर कलमांची शके १७७३ त लिहिली, त्यांतील कांहीं कलमांतील आमच्या या पुस्तकास उपयुक्त तेवढा भाग कै० गणेश सदाशिव साठे यांनीं लिहिल्या बरहुकूम पुढें देत आहें. याचें कारण पूर्वीच्या लोकांची भाषापद्धती कशी होती हेंहि वाचकास समजावें म्हणून होय. सदरहु याद बंडाच्या पूर्वीची लिहिली गेली आहे. कै० गणेश सदाशिव साठे यांचे वंशज हरी दिनकर साठे हे चुलत नातू असून पेनशनर आहेत, हे बेळगांव येथें स्वतःचे घरांत आहेत. यांचे एक चिरंजीव पोलीस इन्स्पेक्टर असून, दुसरे चिरंजीव बी. ए. एल्. एल्. बी. आहेत. सदरहु यादी पेनशनर रा. हरिभाऊ साठे यांच्याकडे या लेखकानें मागितली व त्यांनीं ती यादी दिली याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे.

"यादी खासगत राजश्री गणेश सदाशिव साठे मुक्काम श्रीक्षेत्र काशी आमचे कुळांत वडिलांपर्यंत सात पिढ्या अग्निहोत्र घेऊन स्वधर्मेंकरून श्रीअग्निनारायणाची सेवा करीत आले, त्यांचे मागें आम्ही त्रिवर्ग बंधु वडील भिकंभट, दुसरे चिमणभट व तिसरे आम्ही, आमचे पोटीं संतान नाहीं. भिकंभट यांस पुत्र चार व चिमणभट यांस पुत्र एक, उभयतां बंधु व पांच पुत्रांचा योगक्षेम आम्ही कोणत्या रीतीनें चालविला व उभयतां बंधू व पांच पुत्रांनीं कोणत्या रीतीनें चालले लिहिली पूर्वजापासून आम्ही काशीस येईन, जेथपर्यंत जी जी वर्तमानें जाहली त्याच्या इतिहासाचे दोन भाग कल्पिले. मिळून कलमे शंभर पैकीं अठरावे कलमांत अनेक प्रकारचा इतिहास वर्तमानें जाहलीं तो तयार जाहला आहे तो एक भाग मागाहून पाठवूं. बाकी नव्याणव कलमाचा इतिहास प्रपंचसंबंधी वगैरे मजकुराचा हल्लीं सभ्यास पाहण्यास पाठविला आहे यांत कलमें संगतवार नाहींत. मागें पुढें पडलीं आहेत व अशुद्धहि कांहीं पडले असेल ते तात्पर्येंकरून सिद्ध करून लिहिलें आहे. त्याजविषयीं सभ्य गुणवान यांणीं अशुद्धाचा त्यागपरित्याग करून अर्थाचे तात्पर्य ग्रहण केले पाहिजे अशी सभ्यास आमची प्रार्थना आहे.

१ आमचे पूर्वजांनीं सात पिढ्या अग्निहोत्र घेऊन यज्ञनारायणाची सेवा करीत आले. त्यांत आमचे पणजे कृष्ण अग्निहोत्री यांनीं पन्नास साठ वर्षेपर्यंत चातुरमास्ये नक्षत्र इष्टी वगैरे करून प्रसिद्ध जाहले. त्याचे पोटीं रामभट अग्नि-

होती त्यांणीही पन्नास साठवर्षेपर्यंत अग्निहोत्र घेऊन अग्नीची सेवा उत्कृष्ट केली. ते मोठे पुण्यवान त्यांवर अग्निनारायणाचा अनुग्रह होऊन रात्रौ स्वप्नांत चौघे ब्राह्मण तुळसीच्या माळा गळ्यांत घालून, भस्म कपाळीं लावून पंधरा दिवशीं पुढिलें एकादशीस तुम्हास न्यावयास येतों सिद्ध असावें म्हणोन सांगून अदृश्य जाहले.त्यांणीं हें वर्तमान लोकांजवळ सांगू लागले. तेव्हां लोकांस खरें वाटे. यानंतर पंधरा दिवसांनीं एकादशीचे दिवशीं सूर्योदयास रामभट यांणीं मुलापाशीं आज आम्ही निश्चयें करून प्रयाण करणार आमचे मागें हा धर्म तुम्ही चालवाल तर तुमचें कल्याण आहे असें बोलून दृष्टी करून दोन प्रहरीं वेदींत दर्भासनावर बसून, आतां आम्ही येतों,म्हणोन बोलले. देहअवसान केलें. त्यासमई लोक बहुत मिळाले होते. हा चमत्कार मोठा पाहून सर्व प्रांतांत आश्चर्य जाहलें. त्यांचे पाठीमागें आमचे वडील सदाशिवभट यांणीं अग्निहोत्र घेऊन पन्नास वर्षें अग्नीची सेवा केली. त्यांत ग्रहदशेमुळें दुखण्यांत पडले. तो प्रकार तुमचे समजण्यांत आलाच आहे. तेव्हां वडिलांनीं माहादेवभट काका यास अग्निहोत्र देऊन, आमचे वडील पुत्र भिकंभट याचे लग्न होताच त्यांणीं अग्निहोत्र घेऊन आमचा परंपरागत धर्म चालवावा यांत अंतर करतील तर कांहीं येक अकल्याणाचा विलक्षण शब्द बोलून स्वर्गस्थ जाहले. तिन्ही पुरुषही पुण्यवान ते एकादशीसच स्वर्गस्थ होत आले.

२ आम्हास लिहिणें शिकण्याकरितां मौजें उपले (तळेखांजणजवळ आहे.) येथें शाळेंत ठेविलें.तेथें अप्पासाहेब व बापूसाहेब गोखले हेही शाळेंत ल्याहावयास येत होते. त्यांची आमची ओळख पडली. तेथें वर्ष दीडवर्ष राहून सर्व लिहिणें व कांहीं लीलावती वगैरे शिकलों. त्यांच वर्षी आप्पासाहेब व बापूसाहेब निघोन धोंडोपंतदादा गोखले यांजपाशीं लष्करांत गेले व वासुदेवपंत मामाही लष्करांत गेले. त्याचकडे लष्कर बाजारचे व शेठीप्णाचे व पागेच्या चंद्या व मुदपाकाचे काम जाहले. आम्ही उपळ्याहून डोंगरास आलों. बाळाजीपंत मामा नंदूरबार आवडाहून घरीं आले होते. त्यांणीं आमचें अक्षर व हिशेब करण्याची रीत तपासून मजवर ममता करूं लागले.

३ महिपतराव साठे पुण्यांतील यांस दत्तक पुत्र पाहाण्याकरितां कारकून पालखीसुद्धां सरंजाम घेऊन आला होता. त्याणें पत्ता लावीत मी डोंगरास होतो, तेथें वडील काका यांजकडे येऊन मला पाहून हा मुलगा महिपतराव साठे याचे दौलतीस द्यावा म्हणोन बोलले. तेव्हां आमचे मातोश्रीस बलावून विचारिले. तिणें आपले विचारास येईल तसे करावें म्हणोन सांगितलें. तेव्हां बाळाजीपंत मामा यांणीं वडील काकास हा मुलगा शाहाणा दैववान होईल; त्यास द्यावयाचा नाहीं, असें स्पष्ट आल्या कारकुनास सांगितलें. या मुलास पुढें गोखले याचे खटलें लष्करांत जावयाचें आहे त्याचबरोबर मामा यांजकडे पाठवून देतों, म्हणो-

न मातोश्रीस सांगितलें. पुढें गोखले याचे खटलें तळेखांजणाहून लष्करांत जाण्याकारितां डोंगरास आलें. त्याजबरोबर आमची रवानगी मामा यांणीं केली. लष्करांत गेलो. तेथें मामा यांणीं आप्पासाहेब व बापूसाहेब व यांची भेट करवून या मुलाचें संरक्षण आपले जवळ ठेवून करावें म्हणोन हातीं दिल्हें. त्याजवरोन उभयतांची शाळेंतील ओळख होतीच त्याजबरोबर आम्हांवर लोभ करूं लागलें. पंक्तीस आपलेबरोबर भोजनास व बसावयास घोडी देऊन,ममता करूं लागलें.

५ टिपूचे मुलखांतील पेंढारी गोखले यांच्या कौलानें लष्करांत आले. त्याप्रों गोखले यांणीं निवड करून पाचशें स्वार चांगले चाकरीस ठेवून त्यांतील मुख्य सरदार तीन असामी मिळोन एक रिसाला पांचशें स्वारांचा करून तो रिसाला आप्पासाहेब यांणी आपले खासगीकडे वहिवाटीस ठेविला. त्यांत मुख्य कारभारी आम्हांस नेमून दरमहा शंभर रुपये तैनात व पांच स्वार पोकलीस व हाताखालीं लिहिणार कारकून पंधरा रुपये दरमाहाचा व पागेपैकीं दोन घोडीं बसावयास व पांच माणसें. याप्रों नेमणूक ठराव करून दिल्ही. पुढें याचे मुख्य तीन सरदारास व आम्हांस धोंडोपंत दादा गोखले यांजकडोन वस्त्रें देवविलीं. त्याप्रमाणें आम्ही रिसाल्याचें काम पाहूं लागलों. तेव्हांपासून आमचा उदयकाळ दिवसेंदिवस होत चालला.

६ पेंढारी याचे रिसाल्याचें काम आम्हाकडे जाहल्यापासून टिपूचे मुलखांत गोखले यांचें लष्कर गेलें. तेव्हां धोंडजी वाघ पट्टणाहून दोनतीन हजार स्वारानिशीं पळून जात असतां गोखले याचे फौजेशीं गांठ पडून लढाई होऊन वाघाची फौज मोडली. वाघ पळून गेला. त्यांत गोखले याचे फौजेस व सरदारास दोनतीनशें घोडीं व कांहीं चीजवस्त वगैरे बहुत सांपडली. त्या लढाईत मी गर्द व्हावयाचा परंतु पेंढारी यांणीं मोठी मर्दुमकी करून आम्हांस बचाविलें. नंतर हा मुलगा लहान असतां या वयांत येवढ्या लढाईत आज याचे धैर्याची पराकाष्ठा पाहिली म्हणोन कचेरींत सर्व सरदार लोकांत धोंडोपंत दादा यांजपाशीं आप्पासाहेब यांणीं तारीफ केली. तेव्हां दादा यांणीं आपलेजवळ बसवून डोईवर हात ठेवून हा मुलगा मोठा शूर दैववान होईल म्हणोन बोलले. त्या लढाईत आम्हास साहा घोडी मोठी व कांहीं रोख भांडीं चीजवस्त दागिने मिळोन तीन हजार रुपयांचा विषय मिळाला. त्यापासून आम्हावर सरकारची मर्जीची अभिवृद्धी होत चालली.

७ टिपूकडील वकील मुसलमान हैदराबादेस सरकारांत दोनशें स्वारानिशीं जात होता. ती बातमी गोखले यास समजून त्यास शिकस्त करून आणावा म्हणोन आम्हास रिसाल्यासुद्धां जावें म्हणोन सरकारची आज्ञा जाहली. तेव्हां आम्हीं जाऊन बारा कोसांवर त्याची गांठ घालून त्यास शिकस्त करून सावनूर मुक्कामीं लष्करांत सर्व स्वारानिशीं आणिला. त्यास गोखले यांणीं चौकी देऊन

त्याचीं घोडीं दोनशें खेरीज दौलत मिळून एक लाख रुपयांचा आकार घेतला. त्यांत आम्हांस चीजवस्त मिळून हजारबाराशें रुपयांचा विषय मिळाला.

१५ राजमंडळाकडील कोल्हापुराहून पेशजी रत्नाकरपंत अप्पा पंधरा हजार फौज व तोफासुद्धां कर्नाटकांत येऊन नवे हुबळी वगैरे ठाणीं घेतलीं. हें वर्तमान पुणें सरकारास समजोन घोंडोपंत-दादा गोखले यास दहा हजार फौजेनिशीं जाऊन बंदोबस्त करावा म्हणोन आज्ञा जाहली. त्याप्रों गोखले फौज व तोफा सुद्धां जाऊन सावनूरचा आश्रा करून राहिले. रत्नाकरपंत तेथें जाऊन सावनूरनजीक करटगीस उतरून यांची त्यांची दोनअडीच महिने लढाई चालली होती. नंतर एकेदिवशीं गोखले यांणीं एकदिल होऊन त्याचे फौजेवर चालून घेतले. तेव्हां मोठी लढाई होऊन रत्नाकरपंत यांजकडील फौजेचा मोड होऊन, परत कोल्हापुरास गेले. त्या लढाईंत गोखले यांस जखम कानावर मोठी लागली. व रत्नाकरपंत यांजकडील फौजेची लूट बहुत मिळाली. व चार तोफा व साहेब नौबत व हाती सापडले. त्या वर्षी आम्ही लष्करांत गेलों.

१६ घोंडोपंत-दादा गोखले यासी व घोंडी वाघ यासी वैर पडोन हलीहालसा कराणी नजीक मोठी भारी लढाई होऊन घोंडोपंत दादा व आप्पासाहेब उभयतां सरकारकामास आले. बापूसाहेब गोखले व चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन सांगलीकर या उभयतांस जखमा लागल्या, त्याचा इतिहास बहुत आहे तो पुढें लिहिण्यांत येईल. पुढें घोंडजी वाघ याचे पाठीस वसलीसाहेब लागोन कौताल (जतनुवर) मोठी लढाई होऊन घोंडजी वाघ ठार जाहला. नंतर गोखले यांस सावनूर सरसुभा अकरा महालांचा अम्मल करावा म्हणोन व गदगडवन नवलगुंद वगैरे अम्मल बसवावा म्हणोन सांगोन वसलीसाहेब पट्टणास गेले. नंतर हिंदुस्थानांत जाण्याकरितां मारी फौज घेऊन परतून आले. गोखले यांस श्रीमंतांकडोन गोखले यांचे फौजेचे एक लाख रुपये दरमहा घ्यावयाचा ठराव करून गाहीगडाकडे बरोबर घेऊन गेले. सावनूर सरसुभ्याचें काम वासुदेवपंत मामा यांजकडे सांगोन मामा यास पालखीचीं वस्त्रें व भालदार व तैनात पांच हजारांची नेमणूक जहाली. बंदोबस्तास बाळाजीपंत मामा यांस शंभर घोडयांची पागा व नगारा निशाण भालदार पालखी खेरीज दोनशें स्वारांचें पथक याप्रमाणें नेमणूक जाहाली व रामचंद्र व्यंकटेश व काशीराव कोकरदाने हजार फौजेनिशीं ठेविले व आम्हास आबदागिरीचीं वस्त्रें देऊन तैनात दरमहा दीडशें रुपये व शागिर्दपेशा दहा माणसें याप्रमाणें नेमणूक करून दिल्ही व शंभर स्वार व चारशें पायदळ देऊन सावनूर ठाणेदारीचें काम नेमिलें. पुढें करटगीकर देशपांडे यांणीं काटकाई करून तीन चार हजार फौज जमा करून ठाणी घातूं लागले; त्यासी व सरसुभ्याचे फौजेस नऊ महिनेपर्यंत लढाई चालली होती. त्यांत आम्हांस व मामांस व रामचंद्र व्यंकटेश यांस दोन वेळां जखमा

लागल्या. शेवटीं गोखले यांणीं वसलीसाहेब यांस सांगोन सरसुभ्याचे कुमकेस एक पलटण द्यावें म्हणोन पुण्यास लिहून आलें. त्याप्रमाणें पलटण आलें. तेव्हां देशपांडे याची फौज उघळली देशपांडे पळून गेले. सरसुभ्याचा बंदोबस्त केला. गोखले गाहीगडाहून (गाईलगडाहून) परत पुण्यास आले. तेव्हां सावनूरचे महाल सोडावें म्हणून ठरलें. देशपांडे याचे मसलतीमुळें खर्च जाहला होता, त्याजबद्दल मक्ता गोखले यास पांच लक्ष रुपये द्यावे. म्हणोन मोदी याचे विद्यमानें ठरून सरसुभ्याचें काम सरकारांतून रामचंद्रपंत काटेबागी यास देऊन दोन हजार फौजेनिशीं सावनुरास आले. त्यास गोखले यांणीं त्याजकडोन पांच लक्षांपैकीं तूर्त दीड लक्ष रुपये सरसुभ्याचे फौजेचे खर्चास द्यावयाचे ठरोन सावनूर सोडून आम्ही गोखले यांचे लष्करांत गरगास गेलों.तेथें फौजेचे हिशेब होऊन काटेबागी याजवर वराता दिल्हा.आमचे स्वार सिबंदीचे पंचेचाळीस हजार रुपयांची तोड करून वराता दिल्हा. बाकी वीस हजार रुपये आमचे खुद्द राहिले, तो ऐवज पुढें नवलगुंदचे कामांत मिळाला. याचा विस्तार पुढें लिहिला जाईल.

६१ बापूसाहेब गोखले यांची स्त्री यमुनाबाईसाहेब गोखली यांस पुणें मुक्कामीं वीस हजाराचा सरंजाम व इनाम गांव तीन द्यावयाचे ठरोन गोखले याचे वकीलीचे काम आम्हाकडेस होऊन आम्ही धारवाडास आलों. तेथें सरंजामाचे गांव मौजे इनसी, बालेहाळ, बेळूर, कलकीर, हिरेमुलंगी व हागनूर; येकूण सहा गांव व इनाम पैकीं मौजे मालिकवड येकूण सात गांव कर्नाटकांतील लावून घेतले. त्याची वहिवाट आम्ही आपलेकडेस बाईचे खर्चास पाठवीत होतों. आम्हांस दरसालीना सहाशें रुपये तैनात खेरीज भोजनखर्च वगैरे लागेल तो याप्रमाणें ठरवून घेतले. तें काम सात आठ वर्षें आम्हाकडे होतें. व वकिलीचें काम आम्हाकडेसच होतें. जहागिरदार संस्थानी व सरंजामी पटवर्धन सहित वगैरे कर्नाटक प्रांतांतील येकंदरचे वगैरे येकंदर बेहडे पुण्याहून आले. ते मुनावणीचें काम आम्हाकडे जाहले याजवरून सर्व साहेब लोक व दिवाण मुनसी वगैरेसी स्नेह पडोन आम्हांस उपयोग बहुत प्रकारचा होऊन आमचा लौकिक दिवसेंदिवस बहुत वाढोन प्रसिद्धपणा जाहला व जाहागीरदारांकडील वकील आण्णा शाहापूरकर व नाना कोल्हापूरकर व मिरजकर वगैरे सर्व वकीलांचा ऋणानुबंध बहुत पडोन त्यांत आम्हास उपयोग अनेक प्रकारचा जाहला व सर्व साहेब लोकांची वगैरे मर्जी संपादून हरएक कामांत आम्ही वागोन प्रसिद्धतेनें पावलों याप्रमाणें इंग्रजी सरकारचे दरबारांत सर्व कामांत वागत होतों. आजपर्यंत मोठया टेकीनें वागलों. यमुनाबाईसाहेब यांचे सरंजामाची वहिवाट आठ वर्षेपर्यंत केली. बाईसाहेब सातारेनजीक कृष्णातीरीं वडूथ येथें राहिली होती. त्यांस पुत्र द्यावा म्हणोन प्रयत्न चालविला होता.परंतु दैवयोगें करून त्यांचे बुद्धीस भ्रंश होऊन गंगाधरपंत वगैरे वगैरे लबाड लोकांचे

मर्जीस अनुसरोन विपरीत बुद्धीनें ब्रह्मावर्तास निघोन गेली. तेथें रामचंद्र व्यंकटेश यासी वैर पडोन शेवटीं काशीस येऊन फिरोन ब्रह्मावर्तास गेली. तेथें देवआज्ञा जाहली. सरंजामाचें उत्पन्न आम्ही पूर्वीच सोडून गोपाळपंत गोखले यांजकडे जाहले. नंतर आपासाहेब नरगुंदकर यांणीं आट दहा हजार रुपये बाईस देऊन आपण गांव करून घेतले. शेवटीं बाई मेल्यावर गांव जप्त होऊन नरगुंकरांचे दहा हजार रुपये बुडाले."

कै० गणेश सदाशिव साठे यांनीं आपले गांव नवलगुंद येथील सर्व व्यवहार व प्रपंच सोडून, काशीवास पतकरून, प्रापंचिक व ऐतिहासिक आपणांस माहिती असलेली सर्व हकीकत शंभर कलमांत आणून, ही कलमें मोडी लिपींत सुरेख लिहिलेली आहे. मात्र त्यांतील मुख्य महत्त्वाचें जें ऐतिहासिक कलम अठरावें तें जर मिळालें असतें तर त्यावेळची सर्व ऐतिहासिक विश्वसनीय व फार महत्त्वाची माहिती उपलब्ध झाली असती. असो. हल्लीं नवलगुंद येथें सदरहु साठे यांचा जुना वाडा व जमीन जुमला असून तो त्यांचें वंशजांकडे चालत आहे. नवलगुंद येथें धोंडोपंतदादा गोखले यांचाही वाडा होता. तो हल्ली सर्व मोडकळीस आला आहे.

रा. कृष्णाजी गोविंद गोखले-धारवाड व दत्तात्रय काशिनाथ गोखले सौदाळें यांच्या संग्रहांतील खुद्द बापूंच्या हातचीं पत्रें पुढें देत आहें.

श्रीगजानन.

तीर्थरूप मातुश्री बाई वडीलाचे शेवेशी.

अपत्यें बापूनें दोनी कर जोडून चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विशेषना तागायत छ. १६ जमादिलाखर इंदुवासरे घुणें येथें बागेंत वाडेलांचे आशिरवादें-करून वर्तमान यथास्थित आहे. विशेष. वडीली श्री दक्षणमानस यात्रेहून आषाढ शु॥ ५ भौमवारी नवलगुंदास मंडळीसह येऊन शु॥ ६ सौम्यवासरेचे आसिरवाद पत्र पाठविले ते छ. १४ मीनहूस मंदवारीं पावलें बहुत आनंद जाहला. इच्छित सुसमई प्रविष्ट जाहलें वडिलांचें पत्र यावयाचे पूर्वी सावनुरास येणें जाहल्याची पत्रें मोदीखान्याकडे येऊन आम्हाकडे सांगणें आलें त्याजवरून दु किता विनंती पत्रें वडिलांस लिहिलींच आहेत तींही पावलीं असतील. श्रीच्या दर्शनास गुर्लहुसुरास जाणार म्हणोन पत्रांत लिहिलें आहे. त्याप्रों जाणे जाहलेंच असेल श्रीस विनंती पत्रें मुद्दाम दोहों इंदुवासरचीं नवलगुंदास डंबलच्या जोडीबरोबर रवाना केलीं तींही वडिलांकडे पावलीं असतील. प्राा होऊन आसिरावादोक्ती निघतील त्या

त्यावयास आज्ञा जाहली पाहिजे. आज इंदुवारचे विनंतीपत्र श्रीस लिहिले आहे. प्राा व्हावें श्रीहरीगुरुभक्तीपरायण राजश्री रघुनाथबाबा यांचें येणें जाहाले येणेकरून बहुत हर्ष जाहला त्यांच्या दर्शनाची इच्छा आहे. त्यास मर्जीचा डौल पाहून पुसोन इकडे येणे कृपाकरून जाहल्यास घोडें माणसें व सोबत लावून देऊन रवानगी जाहली पाहिजे वडिलांच्याही दर्शनास दहा महिने होत आले परंतु यात्रेचे श्रम बहुत जाहले असतील व तिकडील खटलीं आहेत त्यास श्रीची आज्ञा इकडे येण्याविसी कधी होत्ये व दर्शनाचा लाभ किती दिवसांत घडेल येविसीचें लिहिलें पाहिजे रा मदनासिंग जमातदार तिकडील बंदोबस्तास ठेऊन आलों. मागें मोगलांकडील लोक आहेत. त्यांची व यांची कटकट.कलम बिंड्यावरून वसली येथून आज्ञा. कलागत माजवावी असी नाहीं. असे असतां आज्ञेशिवाय वर्तणूक करून मसलत माजवून व्यर्थ खराबा होतात. तालुक्याची खराबी होत्ये. निळोपंत गोडबोले याचे इतल्यानें वर्तावें असें त्यास सांगितलें होतें. हाली त्याचेही मानीत नाहीं. यास्तव जमातदार यासही पत्र लिहिलें आहे. त्याप्रों आपण राजश्री भास्करपंत मराठे यास पाठवून निळोपंत यास भेटोन तिकडील मजकूर उभयतांच्या विचारें आपला नक्ष राखून समेट होय असें करवावें त्याजकडील मजकूरही वरचेवर समजत नाहीं. मोगलांकडील फौजेचे बोलणे काय तेंही समजत नाहीं. अविचारासी संबंध पडला आहे यास्तव भास्करपंत यास पाठवून त्याणी जमातदारासही सांगावयाचा प्रसंग पडेल तसें सांगोन समेट—
(अपुरें पत्र आहे.)

श्रीगजानन.

स्वामीचे चरण शेवेशी चरणरज बापूजी गणेश दोनीकर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता्या आधीक आषाढ शुा्या इंदुवासर पावेतों स्वामीच्या कृपेकरून सर्व वर्तमान यथास्थित आहे. विशेष किले कांगोरी येथें लोक जाऊन मोर्चे बसलेच आहेत. परजन्य काळ बहुत संकट पडेल × × सर्व आधार स्वामीचे चरणाचा अनेक प्रकारच्या अडचणी प्राप्त जाहल्या आहेत, यातून पार करणार स्वामी समर्थ आहेत शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीगजानन.

स्वामीचे चरण शेवेसी चरणरज बापूजी गणेश दोनीकर जोडून शिरसाष्टाग नमस्कार विज्ञापना ता्या पौष शुा्या ९ इंदुवासर पावेतों मुा्या पुणें येथें वर्तमान यथास्थित आहे विशेष आलीकडील मजकूर श्रीमंत यजमान स्वामी यासी एक दोन वेळां एकांतीं बहुतच बोलणें जाहलें मर्जी बहुत प्रसन्न आहे. एकांतींचीं बोलणींहि बहुत खातर जमेची जाहाली मागील देण्या संबंधें व पुढील बंदोबस्ताची बोलणी जाहली आहेत. स्वामीचे आशीर्वादे करून सर्व यथा-

स्थित घडोन येईल त्याप्रमाणें विनंती लिहून पाठवितो,सारांश सर्वोपरी स्वामीचा अनुग्रह येणेकरून सर्व घडत आहे. माझी सर्व लाज स्वामीस मिळाली आहे. आघार चरणाचा येणेकरून स्वस्थ आहों * * * * हे विज्ञापना.

सदरहु तीन पत्रें धारवाडचे गोखले यांच्याजवळील होत, आतां प्रथम आणखी एक खुद्द बापूच्या हातचें पत्र व एक लढाई प्रकरणीं अपुरें पत्र देतोः–

श्री

वडिलांचे शेवेसी आपत्ये बापूनें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ. २२ जिल्काद पावेतो सुखरूप आहे. विाा वडिली माकणीस दुली सागवानी पाठविणे विसी सुबाना याजबरोबर सांगोन पाठविलें. त्याजवरून दुली सागवानी एक पाठविली आहे. पावली याचें उत्तरास आशा व्हावी बहुत काय लिहिणे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

श्री

राजश्री निळोपंत गडबोले याचे जासूद आज मंदवारीं लष्करांतून आठवे दिवशीं बागलकोटास आले. श्रीमंतांची स्वारी व बापूसाहेब व सरदार मंडळी झाडून जमाने पुढील तुकडी श्रीमंत महाराजाची, मध्यें इंग्रज. इंग्रजांचे भोंवते फौजा कोशीं दोन कोशीं यापरी जुन्नरपासून ओतूर ब्राह्मणवाडापर्यंत मुलखडी [मुलखु] नदीवर चालले मुक्काम नदीवर जाहाला.तेथून ** पर्यंत मुक्काम जाहाला पुढें आकुर्ले पावेतों गेले. इंग्रज पुढें इणमंतदरी धरून नीटच पु– (अपूर्ण)

सरदार बापु गोखले यास तैनात जाबता जाहला होता, तो पुढीलप्रमाणेंः—

गोखले यांचा तैनात जाबता सलास अशर मया तैन व अलफ (सन १८१३ इ.)

जातीस चिरंजीव सुध्धा ३००० स्वार	९६००००
गाडदी २५००	३०२५००
तोफा नग ५	३२५००
	१२९५०००

सरंजाम.

१ नवलगुंद सदेशकत व मामले तोरगल	८ अळूर
२ गदक देखील देसकत	९ संमत कलकीरे
३ डंबल	१० मौजे कुमसी सातळगांव
४ लोखडी वगैरे गांव	११ जकात नाका पाटस
५ इंडी	१२ कसबे म्हसवड
६ परगणे अलमेले	१३ परगणे कडेवळीत
७ कसबे मलवडी व वुध	१४ परगणे शेवली

आगबोटीनें विजयदुर्ग बंदरावर उतरून लहान होडी करून या विजयदुर्ग खाडीतून तळेखाजण येथें जावें. तळेखाजण हा गांव अगदीं खाडीच्या कांठावर आहे. तळेखाजणपासून सुमारें एक मैलावर पिरंदवण हा गांव आहे. पिरंदवण येथें अगदीं नदीच्या कांठीं श्री मल्लीकार्जनाचे देवालय, बापूसाहेब यांनीं बांधिलें आहे. बापूंचे आजे बाळंभट ऊर्फ बल्लाळ हे शेती भाती करीत होते. यांना पुत्र पांच होते. पांच पुत्रापैकीं हल्लीं दोन पुत्रांचा वंश चालू आहे. धोंडो, गणेश, मोरो, विश्वनाथ, व लक्ष्मण; मोरो व लक्ष्मण यांचा वंश हल्लीं आहे. धोंडोपंत गोखले हे मोठे हुषार लेखणीचे बाके व तलवारीचे मजबत असे होते. धोंडोपंत यांचा विवाह नरगुंदचे संस्थानिक व्यंकटरावजी भावे यांची कन्या आनंदीबाई इच्याशीं झाला.धोंडोपंतास आपत्य झाले नाहीं.गणेशपंत गोखले हे शेतीवाडी करीत होते. यांना पुत्र दोन; पहिले रत्न माहादाजी ऊर्फ आप्पा व दुसरे रत्न नरहर ऊर्फ बापू.श्रीमंत सवाई माधवराव यांच्या कारकीर्दीत नाना फडणवीसाचे चुलत बंधू गंगाधरपंत भानू हे विजयदुर्ग किल्ल्याचे अधिकारी होते. त्यांच्या हाताखालीं धोंडोपंत गोखले हे कारकुनी करीत होते. एकेवेळीं विजयदुर्गचे सुभेदार भानू हे पुण्यास कांहीं कामाकरितां गेले असतां, विजयदुर्गप्रांतीं कोळवणांनीं बंडावा करून वाटसरूंना लुटून रयतेस त्रास देऊं लागले. तेव्हां धोंडोपंतांनीं बंडखोरांचा मोड करून, त्यांतील कांहीं पुंड लोकांस पकडून आणून त्यांचा शिरच्छेद करविला. यामुळें इतरांना चांगली दहशत बसली. लेखणी बहादुर धोंडोपंत हे युद्धकुशल असल्याचे ऐकून पुण्यांतील लेखणीबहादर नाना फडणवीस यांनीं त्यांना पुण्यास बोलावून कर्नाटकांत रवाना केलें. धोंडोपंतांनीं सर्व कर्नाटक प्रांत आपल्या पराक्रमानें दणाणून सोडिला म्हणण्यास हरकत नाहीं. धोंडीवाघाबरोबर आपल्या पुत्रवत् दोघा पुतण्यासह लढत असतां, त्या वाघानें धोंडोपंत गोखले व आप्पा गोखले यांचा शिरच्छेद करून तो विजयानें धुंद झाला.

बापू घायाळ झाले होते व यांना मदत करण्याकारतां सांगलीकर चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन हे लढत असतां यांनाही जखम झाली होती. वरील दुःखकारक बातमी बापूंना समजतांच त्या संतापाचे जोरांत तसेंच उठून, त्या वाघाचा प्राण घेण्याकरितां, त्याच्यावर तुटून पडले. आणि एका घावासरशी त्या वाघाचे तुकडे करून टाकले. यावेळीं सांगलीकर व वेलस्लीसाहेब यांनीं बापूंना चांगली मदत केली. ह्या लढाईचे वर्णन मी विशेष न करण्याचे कारण यापुढें जे प्रकरण मी देत आहे. त्यांत सर्व हकिकत बापूंच्या एकंदर पराक्रमाची अखेरपर्यंतची माहिती येत आहे.

बापूंचेबरोबर रणसंग्रामात सारखे असणारे पाच्छापूरकर म्हणून जे होते; त्यांनीं सर्व घडलेली हकिकत लिहून ठेविलेली नुकतीच उपलब्ध झाली आहे. सन १९२१ सालचे 'भारत इतिहास संशोधक मंडळाचे' संमेलनांत सदरहु

पाच्छापूरकर यांची जुन्नरी कागदावर लिहिलेली बखर आमचे पहाण्यांत आली. ती बखर बरीच मोठी आहे. परंतु त्या बखरीवरून थोडक्यांत बापूंच्या संबंधाचा तेवढा भाग मी पुढें देत आहेः—

" सरदार बापूसाहेब गोखले यांचे आजे बाळाजीपंत विजयदुर्ग तालुक्यांत मौजे पिरंदावण याची वाडी मजरे तळेखाजण येथें रहात होते. यांस गणेशपंत व धोंडोपंत असे दोघे पुत्र; पैकीं गणेशपंत यांस आप्पासाहेब व बापूसाहेब हे दोघे मुलगे, व धोंडोपंत यांस फक्त एक कन्या ही आप्पासाहेब नरगुंदकर यांस दिली होती. बापूसाहेबांना गोविंदरावबाबा व विठ्ठलराव असे दोघे पुत्र; पैकीं विठ्ठलराव लहानपणींच वारला व गोविंदरावबाबा इंग्रजांचे लढाईंचे वेळीं ज्वरानें वारला. आप्पासाहेबांना संतती नव्हती. ते धोंडुजी वाघाचे लढाईत ठार झाले.

बापुसाहेब यांचे वडील गणेशपंत हे विजयदुर्गांत दफ्तरदारी करून प्रपंच चालवीत असत. पुढें धोंडोपंत हे चाकरीकरितां विजयदुर्गचें मामलेदार भानु यांजकडे गेले असतां त्यांनीं धोंडोपंतास बावडे व करवीर या भागांत चोर व दरवडेखोर यांचा बंदोबस्त करण्याची कामगिरी दिली. ती त्यांनीं चांगली बजावल्यामुळें त्यांस बक्षीस मिळून सरदारीची असामीही पण मिळाली. ही बातमी नाना फडणीस यांस कळून त्यांनीं धोंडोपंतास पुण्यासच राहणेविषयीं आज्ञा केली. शके १७०८ मध्यें नाना फडणीस कर्नाटकांत स्वारीस गेले असतां धोंडोपंतास बरोबर घेतलें. नानांच्या परवानगीनें गोखले. यांनीं शत्रूकडील चार पांच सरदारमंडळी फितवून आणिली व पुढें बदामी किल्याजवळ बरीच खस्त मेहनत केली. नाना फडणीस फारच प्रसन्न झाले. श्रीरंगपट्टणावर दोस्तांची स्वारी झाली, त्यावेळीं धोंडोपंत यांस परशरामभाऊ पटवर्धन यांचे हाताखालीं पाठविलें. धारवाडच्या वेढ्यांत छेबिन्याचें काम गोखले यांजकडे आलें असतां एक दिवस पहाटे टिपूच्या सैन्यानें गोखले यांचे पथकावर हल्ला केला; शत्रूनें बाण व तोफा यांचा वर्षाव केला. पण गोखले हे जागा धरून राहिले. परशरामपंत भाऊ यांनीं बरीच शिफारस केली व सरकारांतून गोखले यांना पागा व वस्त्रें दिलीं. श्रीरंगपट्टणच्या स्वारीत गोखले हे लढाई संपेपर्यंत राहून त्यांनीं बरीच कामगिरी केली. त्यामुळें पेशवे हे त्यांच्यावर कृपादृष्टि ठेवूं लागले.

श्रीरंगपट्टणच्या स्वारीहून परत आले त्याचवर्षी कित्तूरकर देसाई यांनीं बंड करून संगोली वगैरे ठाणीं घेतलीं. विसाजीपंत पाछापूरकर व रामचंद्रपंत ओक वगैरे मंडळीकडून त्याचें पारिपत्य करणें बरोबर झेपेना. तेव्हां धोंडोपंत यांस पागा व तोफखाना देऊन पाठविलें. ते येण्यापूर्वी देसाई यांनीं तोफा वगैरे आणून फारच दंगा माजविला. पाछापूरकर वगैरे मंडळी तहाच्या बेतांत होते; इतक्यांत गोखले येऊन दाखल झाले. कगोनूरचे (कोगनूर) मैदानांत लढाई झाली. गोखल्यांनीं आपल्या लोकांच्या दोन टोळ्या करून हल्ला केला. स्वतः

सैन्यासह घोडीं घातलीं, देसायांचा मोड झाला. ठाणीं माहादजी खंडेराव यांचे हवालीं करून, आपण, निजाम अलिखान यांचें सरदार पापा पंडित व चिंतो पंडित हे कनकगिरी तालुकेत स्वारी करीत होते, त्याजवर चालून गेले. लढाई होऊन पंडितद्वयास धारवाडास बंदींत ठेऊन मोगलाईची खंडणी वसूल केली. इतक्यांत गुडगडीकर नाईक व सुरापूर नाईक यांचा खटका वाढून सुरापूरकरांनीं गुडगुडी संस्थान घेतलें. धोंडोपंतांस मदतीस घेऊन गुडगुडीकरांनीं सुरापूरकरांचा मोड करून संस्थान परत घेतलें. गोखल्यांनीं परत येतांना हत्ती व घोडे पुष्कळ आणिले व संस्थानाकडून खंडणीही घेतली. श्रीमंतांना कळतांच त्यांनीं मोठ्या समारंभानें गोखले यांस मोत्याची कंठी व शिरपेच वस्त्रें दिलीं.

पुढें सावनूर तालुक्यांत अरलीकटी, कारडगी या माहालांत बंडावा झाला असतां त्याचा मोड गोखल्यांनीं केला व सावनुरास मुक्कामास होते. इतक्यांत कांहीं कारणामुळें नाना फडणीसांची इतराजी होऊन पागा व तोफखाना त्यांचे हातीं राहूं नये असा हुकूम आला व गोखले यांस पुण्यास बोलाविलें.

गोखले यांच्यावरील नानाचा राग पांच सहा महिनेच टिकला. पुढें शाहा असदलिखान मोगल याचा होनगुंद तालुकेंत उपद्रव झाला असतांना पुन्हां गोखले यांसच पाठविलें. त्यावेळीं सरदार बापूसाहेब गोखले हे पुण्यास वकीलीस होते. त्यांस ही मोहिमी वस्त्रे, सवदा व सिकेकठार देऊन पाठविलें ते होनगुंदास पोहोचतांच मोगल सरदार मोठ्या सैन्यानिसी चालून आला. गोखले यांचें सैन्य थोडें पण हिमत भारी असल्यामुळें, त्यांनीं आपल्या लोकांस दम देऊन शत्रूच्या सैन्यांत घोडीं घातलीं मोगलाकडील लोकांनीं फारच मेहनत घेतली. तुंबल युद्ध झालें. शाहादत अलिखान यानें गोखले " कांहां " म्हणत येऊन धोंडोपंतावर वार केला; पण धोंडोपंत यांनीं शाहादत अलिखानाचा हातच कलम केल्यामुळें त्याच्या तरवारीनें फक्त धोंडोपंतांच्या हातासच जखम केली. खान परत फिरतो हें पाहून धोंडोपंतांनीं त्याच्या अंगावर उडी घातली; व दोघेही खालीं आले. खानास कैद केलें. आप्पासाहेब व बापुसाहेब या बधुद्वयांनीं तरवार चांगलीच चालविली. खानाचा मोड होऊन त्याची फौज लुटली गेली. नंतर खानाचा बहुमान करून त्यास पाठवून दिला.

इकडे श्रीमंत सवाई माधवरावांच्या अकालीं मरणानंतर नाना फडणीस यांनीं तुंगभद्रेपैयत राजे रजवाड्यांकडून खंडण्या घेऊन दुसऱ्या वर्षी बरीचशी ठाणीं घेण्यास सुरवात केली. यावेळीं गोखले सावनुरांत होते. तेव्हां करवीरकरांचे सरदार रत्नाकरपंत यांनीं पाछापूरपासून तुंगभद्रेपर्यंत मुलूख घेतला. व सावनुरास गोखले यांस शह दिला. गोखले यांजकडे दीड दोन हजारच सैन्य होतें. महिनाभर दररोज सावनुरचे मैदानांत लहान सहान चकमकी होत असत. एक दिवस करवीरकर सरदार चालून आले. मनस्वी लढाई होऊन

घोंडोपंतांस तोंडावर जखम झाली. आप्पासाहेब व बापुसाहेब यांनीं त्यांना संभाळून परत आणिलें. यावेळीं पाछापूरकर, कोकरे, घाटगे, घोरपडे, जगताप वगैरे सरदारांनीं चांगलींच मदत केली. लढाई तीन महिनेपर्यंत लांबून खर्चाची टंचाई भासू लागली. तेव्हां लढाई देण्याचा विचार एकमतें होऊन सैन्याच्या दोन टोळ्या करून घोंडोपंतांस पालखींत घालून चालून गेले.करवीरकर सरदार दाहा हजार फौजेनिशी चालून आले. दोन तासपर्यंत तोफातोफी व पायदळाच्या फैरा होऊन गोखले यांनीं एकदम घोडीं घातलीं. मातब्बर लढाई झाली. चांगले चांगले लोक सरकारकामास आले. शत्रूचा मोड होऊन गोखले यांनीं हत्ती, घोडीं व तोफखाना असे काबीज केलें. नंतर जखमी लोकांना दुरस्त करून पालख्या, अब्दागिऱ्या, वस्त्रे वगैरे बक्षीस दिलीं. तुंगभद्रेपासून घटप्रभेपर्यंत ठाणीं बसवून कित्तूरकर वगैरेपासून खंडणी वसूल करून हानगलास छावणी केली.

इतक्यांत टिपू सुलतान व इंग्रज यांची लढाई होऊन टिपू ठार झाला, व त्याचें राज्य इंग्रजांचे ताब्यात गेलें.टिपूकडील घोंडजी वाघ हा पेशव्यांच्या प्रांतांत येऊन बंडाळी करूं लागला. त्याजवर हल्ला होऊन तो करवीरकरांकडे गेला. नंतर पटवर्धनांनीं करवीरकरावर स्वारी केली. त्यावेळीं गोखले यांस त्यांचे मदतीस पाठविण्याचें ठरलें. गोखले यांच्या सरदारांना मागील करवीरकरांच्या लढाईतील बाक्षिसें पोहचलीं नव्हतीं; तीं त्यांना देऊन सरंजाम तोफा व पायदळसह करवीरास गेले. पटवर्धनांनीं तीन महिनें वेढा देऊनही किल्ला जेरीस आला नव्हता; तो गोखले येतांच मातब्बर लढाई होऊन जेरीस आला. इतक्यांत होळकरांचें राजकारण होऊन पटवर्धन शह उठवून पुण्यास परत आले. गोखले कित्तूरास गेले. बापुसाहेबांची बायको प्रसूत होऊन बारली. घोंडजी वाघ करवीरांतून पाछापुरास गेला, व पुढें मोगलाईत जाऊन बराच जमाव केला व घारवाडजवळ गरगास येऊन घोंडोपंत गोखले यांजवर हल्ला करण्याचें ठरविलें. कित्तूरास पाणी नाहीं व हालिहाळास गेल्यास इंग्रजांची मदतही वेळ पडल्यास मिळेल, म्हणून गोखले हालिहाळास निघाले. पण कित्तूरकरांनीं फितवा करून वाट चुकवून झाडींत नेले, व वाघास बातमी दिली, तो सैन्यानिशीं आला. गोखल्यांनीं बुणगे व कांहीं फौज हालिहाळास रवाना केली. वाटेंत एका नाल्यांत तोफ रुतलेली काढत असतांना शत्रूचा हल्ला आला. सावध होऊन लढाई सुरू झाली. घोंडोपंत, आपासाहेब, बापूसाहेब व इतर सरदार मंडळी चालून गेली. पाच्छापूरकर जखमी झाल्यामुळें त्यांना परत पाठवून आपासाहेब व घोंडोपंत शत्रूच्या लोकांत मारीत सुटले. गोखल्यांची फळी फुटली झाडींत पुन्हा जमाव झाला नाहीं. घोंडोपंत जखमी होऊन मुक्कामास परत आले. आपासाहेबांस गराडा पडला असतां शत्रूची फळी फोडून बाहेर आले. व पुन्हा त्यांच्यांत शिरले. पांचशेंहे पठाणांचा गराडा पडला असतां हे पांच घटकांपर्यंत

त्यांच्याशीं बेधडक झुंजत होते. पण अखेरीस शत्रूचें लोक फार असल्यामुळें पंचवीस एक वार लाणून स्वर्गस्थ जाहले त्यांची पत्नी अस्थीवरोबर सहगमन गेली. बापूसाहेबही जखमी होऊन मुक्कामास आले. लवकरच इंग्रजांची मदत येऊन वाघाचा शह सुटला. महिनाभर हालिहाळास राहून इंग्रजांबरोबर वाघाचे पारिपत्यास निघाले. लवकरच वाघाची गांठ पडली व त्याचा मोड झाला. मग नवलगुंदास राहिले. होळकर परत गेल्यावर, माहाडाहून बाजीराव पुण्यास आले. त्यावेळीं नगरप्रांतीं बाराभाई व बावनपागे हे मुलुख लुटीत चालले. त्यांचे पारिपत्यास पानशे, पुरंदरे व बापु गोखले यांस सैन्य देऊन पाठविलें. माहालाच्या मुक्कामीं बावनपागे यांचा पराभव होऊन आठ दिवसांनीं बाराभाई यांस हातनुरास मुक्काम करून शह दिला. कांहीं दिवस गेले. गोखले यांची रसद बंद झाली व पैसाही संपला अशा बऱ्याच अडचणी येऊन,सरकारकामीं प्राण गेल्यासही वेहत्तर म्हणून शत्रूवर हल्ला करून मांडवगणच्या मैदानांत त्यांचा मोड केला. विठोजी याच प्रसंगीं पाडाव आले,त्यांस श्रीमंतांकडे पाठाविले नंतर बागलकोटास शह देऊन तोफा व रसद मिळाविली व पुढें बदामीनजीक कित्तूरच्या तळ्यावर मुक्कामास असतां कित्तूरकर काटकांनीं गोळागोळी केली त्या प्रसंगीं लढाई होऊन रखोपंत पाच्छापूरकर ठार झाले. बापूसाहेबांस त्वेष आला. किल्ला सर केला व तीनशेहें काटकांची कत्तल केली. पुढें बापूसाहेब कोण्णूरास दसऱ्यापर्यंत राहून नवलगुंदची जमाबंदी करून गदवले संस्थानची खंडणी घेऊन, सुरापूरकरांनीं मदनसिंग सरदारास लुटलेलें ऐकून त्यांच्यावर स्वारी करून खंडणी वसूल केली. इतक्यांत श्रीमंतांकडून, सावनूरतालुका पटवर्धनाकडे होता, तो घेण्यास आज्ञा झाली. मजल दर मजल करून सावनूरचीं ठाणीं तोफा लावून घेतलीं. पटवर्धनांस कळतांच दाहा हजार फौजेनिशीं बापुसाहेबांस शह दिला. बापुसाहेबांनीं आपल्या सैन्याच्या चार टोळ्या करून पटवर्धनांस तोंड दिलें; पण पटवर्धनांचें सैन्य मोठें, त्यामुळें पराजय पावून परत सावनूरास आले. दुसरे दिवशीं सैन्याचा जमाव करून पुन्हा लढाईस गेले. संध्याकाळपर्यंत भयंकर गोळागोळी झाली. नंतर पटवर्धनांवर चालून गेले. तोफांची फारच मारगिरी झाली. हातास हात लाधूं लागले. गोखले यांनी घोडीं घातलीं; इतर सरदारही बरोबर आले. निकराची तरवार चालवून पटवर्धनांची फळी फोडली. त्यांच्या फौजेचा मोड होऊन बापुसाहेबांचे लोक दाहा कोसपर्यंत पाठलाग करीत सुटले. सैन्य उधळून जाऊन पटवर्धन लक्ष्मेश्वरास राहिले. श्रीमंतांकडून वकील येऊन गोखले व पटवर्धनांचा सल्ला झाला. सावनूर प्रांत सरकारच्या अमलांत आला. सरदार मंडळीस बक्षिसें, किताब व वस्त्रें देऊन बापुसाहेबांची तारीफ करून सरफराजी केली, व हुजूर राहाणेंविषयीं आज्ञा केली.

पुण्यास येतांना बापुसाहेबांनीं नवलगुंद, मुगद, तेगूर वगैरेंतून मामुली खंडणी वसूल केली. इकडे श्रीमंत पंत प्रतिनिधि चांगल्या लोकांना काढून नालायक व हलक्या इसमांच्या सांगण्याप्रमाणें वागूं लागले. नवे कारभारी व तेलणी-सारखी मंडळी वाटेल तसा धिंगाणा घालूं लागली. चोर व दरवडेखोर हे अतिशय होऊन प्रजा फार त्रस्त झाली. म्हणून प्रतिनिधि यांस मार्गास आणण्याकरितां व तेलणीस कैद करण्याकरितां मोहिमी वर्‍हे देऊन बापुसाहेबांस रवाना केलें. प्रतिनिधि वगैरे सरदारमंडळी वर्धनगड किल्ल्यांत आश्रयास होती. त्यांचा पराजय करून वसंतगड, कमलगड, महिपतीगड वगैरे किल्ले व विजापूर माहाल ताब्यांत घेऊन व तेलणीस कैद करून घेऊन परत आले. पुढें कोंकणांत कोलगडगारी किल्लेदार दरवडे घालीत होते. त्यांचे पारिपत्यास बापुसाहेबांनीं बाळाजीपंत मराठे, जगताप, गोविंदराव बाबासाहेब गोखले व पाछापूरकर वगैरे सरदार पाठवून बंदोबस्त केला. कोलगडगारी किल्ला सबंध बारा महिने लढला. पण, गोखल्यांच्या सरदारापुढें टिकाव लागला नाहीं. तसेंच गोखल्यांनीं नाशिक; त्रिंबक व कोपरगांव येथें विसाजीपंत गोखले यांस पाठवून भिल्लांचा बंदोबस्त करविला. याप्रमाणें बापुसाहेबांचें पुणें दरबारांत बरेंच वजन पडत चाललेलें पाहून विसाजीपंत गोखले यांस वैषम्य वाटून श्रीमंतांच्या मनांत भलताच ग्रह (बापुसाहेबांविषयीं) उत्पन्न केला. श्रीमंतांनीं बापुसाहेबांकडे असलेल्या प्रांताच्या सोडचिठ्या मागितल्या; त्या बापु गोखल्यांनीं एकदम दिल्या. त्यामुळें विसाजीपंत वगैरे मंडळी खोटी ठरून बापुसाहेबांवर पुन्हा पूर्ववत मर्जी झाली; व त्यांस अकरा बारा लक्षांचा मुलूख दिला व लढाईकरितां काढलेलें त्यांचें कर्ज अठरा लक्ष रुपये सरकारांतून फेडलें गेलें.

कंपनीसरकारशीं श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं तैनाती फौजेच्या पद्धतीप्रमाणें—सब्-सिडीअरी सिस्टिम—तह केला होता; पण कंपनीचें असह्य दडपण सहन करणें अशक्य झाल्यामुळें सरदार मंडळीचा सल्ला घेऊन लढाई देण्याचें ठरविलें. त्यावेळीं लिंगो भगवान नांवाचा वकील बापु गोखल्यांचेंकडे आला. त्यानें इंग्रजांचें, " तुम्ही पेशव्यांच्या नोकरीस लागलां, त्यावेळीं आम्हीं आपल्यासंबंधीं खातरजमा दिली होती. ही गोष्ट न विसरतां, आमची दोस्ती ओळखून हल्लींच्या प्रसंगीं वागावें, " इत्यादि म्हणणें कळाविलें. या फितुरीच्या निरोपास बापूंचें उत्तर असें होतें कीं, " तुम्ही खातरजमा दिली ही गोष्ट खरी; पण आज मी आपल्या म्हणण्याप्रमाणें वागल्यास आपणांसच बट्टा; व शिवाय मला हरामपणा येईल. नोकरानें केव्हांही इमानानें वागलें पाहिजे. आपण मला दौलत द्याल; पण स्वामीद्रोहानें लोकापवाद तर येईलच शिवाय नीतिदृष्ट्या अधःपात होऊन परमेश्वराजवळ मी गुन्हेगार ठरेन. स्वामिकार्यांत प्राण गेल्यासही हरकत नाहीं, पण माझ्या हातून आपण म्हणतां तसें होणें शक्य नाहीं. " इकडे श्रीमंतांच्या

आज्ञेनुसार सैन्याची तयारी चालली होती. बापु गोखले यांस मुख्य नेमलें व लढाई गणेशखिंडीच्या मैदानांत सुरू झाली. दोहींकडून तोफा डागण्यास सुरवात झाली. गोखल्यांनीं जातीनिसी घोडीं घातलीं. पलटणें संभाळून मागें सरलीं व त्यांनीं तोफांची मारगिरी व पलटणाच्या फेरा एकदम केल्यामुळें गोखल्यांचे हजार स्वार कामास आले; पण पाछापूरकर वगैरे सरदारांनीं पलटणाची फारच नासाडी केली. गोखल्यांचा घोडा जखमी झाला असतां जागा न सोडतां तसेच उभे राहिले. तोफखाना व पायदळ यांनींही बरीच कामगिरी केली व जागा कायम राखिली. प्रहर रात्रपर्यंत लढाई होऊन नंतर तहकूब झाली. पांच सहा शें लोक जखमी झाले. तह करण्याचा विचार चालला. गोखल्यांनींही तह करण्यास कबुली दिली. पण बाजीरावसाहेबांच्या मनास न येऊन लढाई पुढें चालविण्याचें ठरलें.

गारपिरावर सर्व सरदार, तोफखाना व सैन्य जमा झालें. इंग्रजांचे कुमकेस रसद व पलटणें येत होतीं. नारो आपटे यांजकडून रसद मारून आणिली. इंग्रजांचा मुक्काम गारपिराजवळ नदीवर पडून रोज गोळागोळी चालली होती. केव्हां केव्हां नदींतही उभे राहून मराठे लढत होते. इंग्रजांचा जोर तोफा व पलटणावर असे, दोन चार हल्ले परत हल्ले झाले. पेशव्यांची फारच नासाडी झाली. पराभवाचा रंग दिसतांच गोखल्यांनीं तोफखाना वगैरे सिंहगडास पाठविलें. श्रीमंतांना चवदा वेळ सासवडास जाण्यास विनंती केली. पण, भले लोक 'पेशवे भ्याले' म्हणतील म्हणून लढाईत राहिले. अखेरीस पाछापूरकर व गद्रे यांजबरोबर सक्त निरोप पाठविला, तेव्हां सासवडास गेले. दुसरे दिवशीं पटवर्धन, विंचूरकर, गोरे वगैरे सरदार एक एक जाऊं लागले. यामुळें निरुपायास्तव गोखलेही सासवडच्या रस्त्यानें निघाले. सासवडास जेवण करून जेजूरीहून देऊरास मुक्काम केला. इंग्रजांनीं पुण्याचा बंदोबस्त केला व जेजूरीस मुक्कामास आले. श्रीमंतांनीं पटवर्धन वगैरे सरदार घेऊन पंढरपुराकडे निघावें व बापु गोखल्यांनीं वीस कोस अंतर ठेऊन लढत जावें असा बेत ठरून श्रीमंत पंढरपुराकडे निघाले. बापु गोखलेही त्याच वाटेनें निघाले. वाटेंत चार पांच वेळ लढाया दिल्या. खेरी जवळील लढाईत बक्षिसें जाहीर केल्यामुळें सरदारलोकांनीं बरीच मर्दुमकी गाजविली. भीमातीरावर कुरली मुक्कामास इंग्रजांचा छापा पडला असतां तो संभाळून घेतला. श्रीमंतांचा मुक्काम ब्राह्मणवाडीस (जुन्नर प्रांत) होता. यावेळीं बापू गोखले यांचा मुलगा बाबासाहेब हा ज्वरानें बारला. त्याची स्त्री बारा वर्षांचीच होती,पण मंडळींच्या आग्रहास न जुमानतां सती गेली.फुलगांव,आपटीहून जेजूरीच्या रोखें जात असतां वाटेंत इंग्रजी सैन्याची गांठ पडली. पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणें बापू गोखल्यांनीं लढाई करून मार्ग मोकळा करण्याची तयारी करून हल्ला केला. मैदानांत निभावणी पडेना; म्हणून कोरेगांवास गेले. तेथें तुंबळ युद्ध

होऊन पांचपन्नास सरदार ठार झाले; व बरीच फौज कामास आली. जेजुरीस जाऊन मुधोळास गेले. तोफखाना, पायदळ निपाणीकडे रवाना केलें. आपण स्वतः बागलकोटावरून बेळगांवास येऊन निपाणीच्या मैदानांत लढाई करावी असा बेत केला. पंढरपुराहून एलफिन्स्टन येणार ही बातमी ऐकून सुरपालीहून खडे होऊन उगारास आले. तेथील साहेबास बातमी कळून तो महिसालास निघाला असतां वाटेंत लढाई झाली. गोखल्यांनीं कवळ्यास मुक्काम केला. कर्नाटकांतून स्मिथ-साहेब आले. दोघांचेही शह संभाळून श्रीमंतांना साताऱ्यास पाठवून आपण नित्य रहिमतपुरानजीक लढाई देत होते. एलफिस्टन व स्मिथ यांच्या भेटी झाल्या. श्रीमंत-साताऱ्याहून फलटण देशीं जाणार हें ऐकून त्यांना पकडण्याकरितां पहाटेस कूच करून नादगिरीस आले. गोखल्यांना बातमी समजून त्यानीं इंग्रजास दुपारपर्यंत घोळवून श्रीमंतांस जाण्यास अवकाश दिला. ते घाट उतरून फलटणांत कांबलेश्वरास गेले. इंग्रज सातारा वगैरे किल्यास गुंतून राहिले. श्रीमंतांनीं पंढरपुरचा बंदोबस्त करून परांडयाच्या रोखें कूच केलें व आष्टे गांवाजवळ मुक्काम झाला. स्मिथ साहेब दोन तीन दिवसांत येणार ही बातमी कळतांच श्रीमंतांनीं रात्रीं कूच करावें असें गोखल्यांच्या विचारानें ठरलें.; पण आपासाहेब देसाई सरलष्कर यांनीं, दुसरे दिवशीं पौर्णिमेचें स्नान व भोजन करून जाणें विषयीं आग्रह केला, व त्या दिवशीं छापा आल्यास आपण संभाळूं अशी हमी दिली. हें ऐकून गोखले चिंताग्रस्त झाले. सरदारमंडळी गोखल्यांचें तर ऐकत नव्हतीच; पण श्रीमंतांस बदसल्ला मात्र देत असत अशी स्थिति असतां लढाई संपल्यावर मागें कांहींहि होवो असा विचार करून गोखले स्वस्थ होते. चतुर्दशीस दुपारीं कूच नगारा होऊन फौज परांडयाच्या रोखें गेली. गोखलेहि तयार झाले. सूर्योदयीं श्रीमंत भोजनास बसले असतां छापा आला. गोखल्यांनीं सरलष्कर यास बोलावणें पाठविलें. व आपण श्रीमंतांकडे गेले व छापा आल्याचें कळविलें. मध्यरात्रीं कूच करणेचा बेत निपाणीकर सरलष्करांच्या सल्यानें रहित केला. नें जेवतां जावें तर अधीर व बेसावध म्हणतील, इत्यादि विचारानें श्रीमंत त्रस्त झाले. उत्तर देतांना गोखले यांस कठोरपणें बोलले कीं, " आपण शूर सावध व कुशल हें जाणून तुमच्यावर आम्ही विश्वास ठेऊन बेफिकीर असावें, तों आपण नेहमीं निष्काळजीनें वागून आयते वेळीं गडबड करावी. " हें ऐकून गोखल्यांनीं उत्तर केलें कीं, " दुसऱ्यांचें ऐकून कालचा बेत बिघडविला, व आमच्यावर आतां रोष झाला. सेवकावर स्वामीची गैरमर्जी झाली असतां त्यानें लढाईत स्वामिकार्यीं मरावें किंवा जय संपादून त्यास भेटावें हेंच योग्य तेव्हां आपण भोजन सावकाश करून निघावें; आपले चरणदर्शन पुनरपि होईल तर ठीकच; नाहींतर हेंच शेवटचें " असें बोलून नमस्कार केला व श्री

मारुतीचें स्मरण करीत निघाले. तों सरलष्कर "फौज घेऊन येतों म्हणून सांगा" असें बोलून झाडयास गेल्याचें कळलें.

फौजेची तयारी करून गोखले इंग्रजांचे सन्मुख जाऊन राहिले. लक्ष्मणसिंग जमादारानें बाणाच्या टप्यांत इंग्रज आल्याची बातमी कळविल्यावरून श्रीमंतांस वर्दी दिली, तों अजून फौजेतच होते. म्हणून पाच्छापूरकरास पुन्हा पाठवून मेण्यांतून उतरवून घोडयावरून पाठविलें. जातांना निपाणीकरास गोखले यास मदत करण्याविषयीं सांगितलें. बापू गोखले पंढरपूरच्या रोखें परतूं लागले. स्मिथ सैन्याच्या दोन तुकडया करून तोंड राखीत चालला. गोळागोळी चाललीच होती. अशा प्रसंगी निपाणीकर सरलष्कर यांनीं "आपला निभाव लागणार नाहीं. गोखल्यांनीं परत फिरावें," इत्यादि बोलून आम्ही श्रीमंतांकडे जातों." असें म्हणून लढाई सोडून गेले, इकडे लढाई जोरांत सुरू झाली. पांचशें-हे स्वार व घोरपडे, मुधोळकर, सितोळे, पाच्छापूरकर वगैरेसह गोखल्यांनीं हल्ला केला बंदुकीच्या व तमचेच्या फैरा झडल्या. अशा वेळीं बापूसाहेब गोखले पन्नास खासे मंडळीसह मारीत चालले. पहिली तुकडी हटली. दुसरीनें गोखले वगैरेस पोटीं घेतलेलें पाहून पहिल्या तुकडीचेही लोक आले. गोखले आदिकरून मंडळींनीं जाहलीम तरवारी चालविल्या. पन्नास खाशांपैकीं दहा बाराच फळी फोडून परत आली. लढाईत बापुसाहेब व स्मिथ यांची गांठ पडून जखमा लागल्या असें ऐकीव वर्तमान आहे. पण परत आलेल्या दहाबारा इसमांनीं, बापूसाहेबांस कांहीं पाहिलें नाहीं. बापूसाहेब गोखले यांची अखेरी कशी झाली याचा पत्ता नाहीं. इंग्रजांनीं पेशव्यांचा पाठलाग केला, त्यांच्याबरोबरच बापूसाहेबांची पत्नी यमुनाबाई ही होती. ती बऱ्याच अडचणी सोसून गंगाखेडास जाऊन राहिली. पाच्छापूरकर वकील या नात्यानें इंग्रजांकडे गेले असतां मालकमसाहेबांनीं. "यमुनाबाई कोठें आहे, तिचा तपास करावा. सरंजामाचा मुलुख हवालीं करून देतों. बापूसाहेबांस दत्तक पुत्र करावा" असें सांगितलें. यमुनाबाई सासवडास येऊन राहिल्या. एक वर्षांत दौलतीच्या सनदा वगैरे झाल्या. नंतर यमुनाबाई साताऱ्यास जाऊन राहिली. पाच्छापूरकर सर्व व्यवस्था करून आपल्या गांवीं परत गेले." अस्तु

धनुर्धारीकृत 'जवानमर्द ब्राह्मणभाई' या पुस्तकांत बापू गोखले यांच्या संबंधीं दिलेली माहिती वाचून पहातां बापूंच्या शौर्याचें वर्णन जितकें त्यांनीं उत्तम केलें तितकेंच वाईट वर्णन शेवटच्या श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या संबंधीं केलें आहे. 'नांव सोनूबाई व हातीं कथलाचा वाळा' अशी एक म्हण आहे. त्याप्रमाणें हे धनुर्धारी आहेत. 'धनुर्धारी नामधारी' हे हल्ली हयात नाहींत. त्यांनीं शेवटच्या बाजीरावावर खरी माहिती नसतांना वाटेल ते आरोप करणें म्हणजे आपल्या मनाचा हलकेपणा जगास दाख-

विणें दुसरें काय ? रावबाजीस या धनुर्धारीनें जीं निंदाव्यंजक विशेषणें दिलीं आहेत, त्यांत तर त्यांनीं आपल्या कमकुवत अकलेचें प्रदर्शनच केलें आहे. पेशवाई रावबाजीनें घालविली कीं, पेशव्यांनीं पोसलेले सरदार पट्टे बेमान झाल्यामुळें पेशवाई गेली हें ज्याला अवगत नाहीं, त्यानें भलतेंच अनुमान करून तें प्रसिद्ध करणें अत्यंत निंद्य होय.

रावबाजी अत्यंत भिला होता असें इतिहास अवगत नसलेल्यांनीं लिहिणें साधारण मूर्खपणाचें म्हणतां येईल.परंतु इतिहास व नाटकें लिहिणाऱ्यांनीं असली घोडचूक करणें म्हणजे जाणूनबुजून द्वेषबुद्धीनें निंदा करून आपल्या मनाचा कर्मपणा व्यक्त करणें होय. पूर्वीपासूनचा इतिहास नीट निरीक्षण केल्यास पेशवाई जाण्याला खरें कारण काय ? व तो दोष विशेषतः कोणावर येतो हें सहज समजण्यासारखें आहे. प्रत्यक्ष जो पुरुष बापूंच्या बरोबर रणमैदानांतही असे, अशा पुरुषानें बापूंची ऐतिहासिक माहिती बखररूपानें लिहिली असून, ती नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. ही 'पाच्छापूरकर यांची बखर' फारच महत्वाची आहे. सदरहू पाच्छापूरकर यांनीं त्या बखरीचा तर्जुमा गव्हर्नरइन्कौन्सिलकडे पाठविल्याचें त्या बखरींत प्रथमारंभीं ध्वनित केलें आहे.

राज्य कोणीं घालविलें,याचा खल करून एकमेकांचीं मनें एकमेकांपासून कलुषित करणें हें सध्याचे परिस्थितीस अगदीं वाईट आहे. पेशवाई गेली म्हणण्यापेक्षां मराठेशाई गेली म्हणणें हेंच योग्य आहे. ज्या कारणास्तव मराठेशाई गेली तीं कारणें अद्यापि आपणामध्यें त्यावेळेपेक्षां आतां जरी कमी आहेत, तरी तीं समूळ नाहींशीं झाल्याशिवाय पुन्हां मराठेशाई होणें, दुरापास्त आहे. राज्यक्रांती होण्याची वेळ आली म्हणजे प्रथम बुद्धि जाते. मग, बुद्धि गेली म्हणजे द्वेषरूपी महापुरुषाचा अवतार होतो. व हा अवतार सर्वांचें वाटोळें करतो. अशी वेळ पेशवाईअखेर आली होती. शेवटचे बाजीराव पेशवे शूर नव्हते म्हणणें अगदीं मूर्खपणाचें होईल. ते शूर होते व भिले तर नव्हतेच.रणसंग्रामामधून निघून जाण्याबद्दल बापूंनीं कित्येकवेळां श्रीमंतांचीं आर्जवें केलीं परंतु ते न ऐकतां श्रीमंत लढाईमध्यें बापूंच्या जवळ सारखे असत. बापूंचें म्हणणें " दाहांचा पोशिंदा असावा " म्हणून वेळो वेळीं बापूसाहेबच श्रीमंत बाजीरावसाहेब यांना लढाईंतून दूर रहाण्याबद्दल आग्रह करीत होते. असो, छत्रपति शिवाजीमहाराज यांचे पुत्र संभाजीमहाराज काय कमी शूर होते ! शिवाजीमहाराजापेक्षांही तो भयंकर शूर पुरुष होता. परंतु तो विषयलंपट झाल्यामुळें, त्यांचा तो शूरपणा मातीमोल झाला. हे जसें, तसेंच शेवटच्या बाजीरावाचें झालें. बाजीराव विषयलंपट होता. त्यामुळें त्याच वर्गातील त्यांना स्नेही भेटले. मग चांगल्या लोकांची दुर्दशा झाली. परंतु, पहिली चूक नाना फडणवीसाची. ती कोणती म्हणाल तर, परशरामभाऊ पटवर्धन यांनीं चिमाजी आप्पा यांस गादीवर

बसविलें असतां, नाना फडणवीसानें कारस्थान करून चिमाजीस गादीवरून काढून बाजीरावास पेशवाईपदावर बसविलें. दुसरी चूक बाजीराव मराठेशाई चालविण्यास जर योग्य नव्हता, तर श्रीमंतांनीं पदरीं बाळगलेल्या मोठमोठ्या सरदारांनीं एकत्र होऊन, बाजीरावास अटकेंत ठेवून दुसरा पेशवा करून मराठेशाई चालवावयाची होती. परंतु तसें न करतां दुर्बुद्धी व द्वेष यानें संचार केल्यामुळें ते सरदार कर्तव्यपराङ्मुख झाले आणि स्वार्थी बनले. ही दुसरी चूकच सर्वांस जास्त भोवली. असो. जें कांहीं झालें तें नीट शोधक बुद्धीनें पहावें. व ज्या कारणास्तव मराठेशाई गेली तीं कारणें थोडींबहुत आपणांत असलेलीं सोडावींत म्हणजे पुन्हां मराठेशाई खास होईल. खरें पहातां ईश्वरी नेमानेमच तसा ! कारण शेवटचा पेशवा विषयी व्हावा, व पदरचे सर्व सरदार स्वार्थी होऊन मराठेशाईशीं बेमान व्हावे म्हणजे वाईट होण्याची वेळ आली म्हणजे तसें व्हावयाचेंच. त्यांत कोणाकडेच बोल नाहीं. भविष्यताच तशी !!

धोंडोपंतदादा गोखले यांचे बंधु मोरोपंत गोखले यांच्यापैकीं वासुदेव गणेश हे जबलपूर येथें आहेत. दत्तात्रय गोविंद आसंगी येथें व गंगाधर गोविंद हे पोस्ट खात्यांत नोकर आहेत. परशराम रामकृष्ण हे वऱ्हाडांत चिखलदरा येथें आहेत. व हल्लीं तळेखाजण येथें बापू मोरो गोखले हे आहेत. धोंडो बल्लाळचे बंधु लक्ष्मण बल्लाळ यांचें पणतू लक्ष्मण दिनकर हे धारवाड येथें आहेत. यांना दोन मुलगे; दिनकर हे वैदिक आहेत व माहादेव शिवणकाम शिकतो. लक्ष्मण बल्लाळ हे कोंकणांतून मुळगुंद गांवीं आले. तेथें ६० । ७० वर्षे होते. त्यानंतर त्यांचे नातू दिनकर रामचंद्र हे जिल्हा बेळगांव पैकीं मुरगोड येथें आले. मुरगोड येथेंही ६० वर्षें होते. त्यानंतर त्यांचे चिरंजीव लक्ष्मणराव हे धारवाड येथें राहूं लागले. हे वैदिक आहेत. यांनीं धारवाड येथें खास घर केलें आहे. यांचें चुलत बंधु गणेश, अनंत व दत्तात्रय आप्पा हे जमखंडी संस्थानांत आहेत.

बापूसाहेब यांचे चुलत बंधु परशराम कृष्ण हे गुर्लहसूर येथें बापूंची पहिली बायको आनंदीबाई राहात होती तिचेजवळ हे राहिले होते. ती वारल्यानंतर परशरामपंत धारवाड मुक्कामीं आले. यांना दोन मुलगे; बल्लाळ व हरी यांचे पुत्र धोंडो यांचें कुटुंब तुंगाबाई गोखले ह्या हल्लीं धारवाड येथें स्वतःचे घरांत राहात आहेत. तुंगाबाईना मुलगी आहे. मुलगा नाहीं. परंतु त्यांचा विचार मुलगा दत्तक घेऊन आपणांस पाणी पाजण्यास हकदार करण्याचा आहे.

बल्लाळ परशराम हे धारवाड येथें वकील होते. यांनीं धारवाड येथें घर खरेदी केलें होतें. बल्लाळ यांना मुलगे दोन; गोविंद व रामचंद्र; गोविंदराव हे मामलेदार होते. हे सन १९०० सालीं वारले. बल्लाळ यांचे पश्चात गोविंदराव व रामचंद्र यांनीं निरनिराळीं घरें बांधिलीं व विभक्त झाले. गोविंदराव यांना चार मुलगे; भास्करराव हे डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर होते. हे सन १९२१ सालीं वारले.

दिनकर गोविंद हे बी. ए. होऊन सन १९०४ साली वारले. कृष्णराव गोविंद व वामनराव गोविंद हे सावकारी व व्यापार करीत आहेत. रामचंद्र बल्लाळ हे पोलीस खात्यांत नोकर होते. पोलीस इन्स्पेक्टरचे जागीं ७। ८ वर्षे काम करून नंतर सन १९०४ साली पेनशन घेतली. हल्लीं घरची सावकारी करीत असून पेनशन घेत आहेत. यांचे चिरंजीव नारायणराव हे सराफीचे दुकान चालवीत आहेत. नारायणरावांचे बंधु माधवराव हे बी. ए. होऊन सन १९०६ सालीं वारले. यांचा विष्णु नांवाचा मुलगा विद्यार्थी आहे. नारायणराव यां मुलगे पांच आहेत.

कऱ्हाड येथील गोखले.

बापुसाहेब गोखले यांचे निपणजे माहादेवभट; माहादेवभटांचे नातू लक्ष्मण गोविंद हे सन १८०४। ५ चे सुमारास कऱ्हाड येथें आले. यांचें कोंकणांतील उत्पन्न अलीकडे सुमारें ६। ७ वर्षांपूर्वी पांडुरंग गुंडो गोखले यांनीं सर्व विकलें. लक्ष्मण गोविंद यांना कऱ्हाडचे पंतप्रतिनिधि यांनीं कऱ्हाडानजीक मौजे गोळेश्वर गांवीं सुमारें पांचशें रुपये उत्पन्नाची जमीन इनाम दिली. ती जमीन लक्ष्मण गोविंद यांच्या वंशजांकडे चालली आहे. लक्ष्मण गोविंद यांचे नातू लक्ष्मण सखाराम व पणतू पांडुरंग गुंडो व निपणतू पुरुषोत्तम पांडुरंग हे हल्लीं कऱ्हाड येथें रहात आहेत. वडिलार्जित घराचे हल्लीं दोन हिस्से झाले आहेत. लक्ष्मण गोविंद गोखले यांना भेटण्याकरितां बापूसाहेब गोखले त्यांच्या घरीं गेले असतां बापूंच्या डोक्यांस त्या घराचा वासा लागला. तेव्हां बापूसाहेब यांनीं तो वासा उपसून काढला. आणि लक्ष्मण आण्णास नवें घर बांधून दिलें. तेंच घर विद्यमान मोडकळीस आलें आहे. पांडुरंगपंतांचे चिरंजीव पुरुषोत्तमपंत यांना य[illegible] लेखकानें पाहिलें नाहीं. तरी त्याच्या एका परम मित्रानें आमच्याकडे पुरुषोत्तमपंतांचे चारित्र लिहून पाठवून 'गोखले घराण्याच्या इतिहासांत' तें तुम्ही अवश्य छापावें अशी विनंती करून ही सेवा निष्फळ न व्हावी अशी आशा प्रदर्शित केली आहे. हें चारित्र पाठविणारे गृहस्थही या लेखकाच्या थोडे परिचयाचे आहेत. तेव्हां सदरहू चारित्र त्यांच्याच शब्दांत जसेंच्या तसें पुढें देत आहें.

कऱ्हाडचें झाकलें माणीक.

(ले.:—दत्तात्रय रघुनाथ आठवले.)

औंध येथें श्री० दादासाहेब मेहेंदळे यांचे येथें म्हणजे आपले पणजोळीं माझा चरित्रनायक ता. १५।११।९८ (नरकचतुर्दशी शके १८२०) रोजीं जन्मास आला. मातृमुखाचा आस्वाद घेणें विधात्यानें ललाटीं न लिहिल्यानें माझ्या चरित्रनायकाच्या तिसरे वर्षीच त्याची मातोश्री सौ. लक्ष्मीबाई गोखले इहलोक सोडून गेल्या. पुढें रा. दादा गोखले यांनीं द्वितीय विवाह केला. सौ. रखमा-

बाई गोखले या जरी रा. पुरुषोत्तम पंतांच्या सापत्न मातोश्री होत्या तरी त्या दोघांचे प्रेम सख्या मायलेकरांसही लाजविणारे होते. माझ्या म्हणण्याचे प्रत्यंतर चरित्रनायकाच्या 'आई' या कवितेत चांगलेच पहावयास सांपडले. रा. पुरुषोत्तमपंतांचे मराठी सहायत्तेपर्यंतचे व इंग्रजी पांच ईयत्तेपर्यंतचे शिक्षण कऱ्हाडच्या म्युनिसिपल शाळांतून झाले. पुढे ते सातारा न्यूइंग्लिश स्कूलमधून स्कूलफायनल व म्याट्रिक पास झाले. साताऱ्यास पेंचाच्या परिस्थितीत त्यांनी कसे अब्रूने व नेकीने दिवस काढले ते पाहिले म्हणजे कोणत्याही निर्दय मनुष्याला पुरुषोत्तमपंतांविषयी प्रेमाचा पाझर फुटल्यावाचून राहणार नाही. रा. गोखले मॅट्रिक झाले त्या सालीं न्यूइंग्लीशस्कूलमध्ये पहिले आले होते. त्यानंतर त्यानीं पुण्यास आपले मामा रा. जोगळेकर यांचे येथे राहून आपला कॉलिजच्या कोर्स पुरा करण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे त्यांनी प्रिव्हियस परीक्षा दिलीहि. परंतु पुढे पुण्याच्या मॅडी फीव्हरने त्यांस चांगलाच हात दाखविला. आणि त्यामुळे अद्यापिही ते बेजार आहेत. जेवणाव्यतिरिक्त आपल्या मामास सहसा कशाचीही तोशीस लावावयाची नाही. या कृतसंकल्पामुळेच मध्यंतरी त्यांनी कांहीं दिवस पुण्याच्या दैनिक ज्ञानप्रकाशाच्या संपादकीय स्टाफवर कामही केले. रा. पुरुषोत्तमपंतांनीं ज्याला एकदां आपला मित्र म्हटले त्याच्यावर त्यांचे किती अमोल प्रेम असते व त्याच्या ते मध्यरात्रीलाही कसे उपयोगीं पडतात याचें प्रत्यंतर म्हणजे रा. रामचंद्र बळवंत फडके, दत्तात्रय रामचंद्र पंडित, शामराव महादेव वाचासुंदर व मी स्वतां म्हणजे दत्तात्रय रघुनाथ आठवले होत. माझ्यावर तर त्यांचे इतके अगणित उपकार आहेत कीं, ते मी फेडीन म्हटल्यानें फिटणार नाहींत. केवळ माझ्या दारिद्र्याकडे बघून रा. पुरुषोत्तमपंतांनीं माझ्या सुशिलाताईचा स्वीकार करण्याचें वचन दिले होतें. पण पुढें ईश्वरीइच्छा कांहीं निराळीच होती. ती काय हें पुरुषोत्तमपंतांनीं सुशीलाताईच्या निधनावर लिहिलेल्या 'माझी सुशीला' या खंडकाव्यावरून चांगलें निदर्शनास येईल. रा. पुरुषोत्तमपंतांच्या अंगीं नाटयनैपूण्यही चांगलेच आहे हें त्यांच्या सर्व परिचितांस ठाऊक आहे.

इ. स. १९१८ च्या एप्रिल महिन्यांत रा. पुरुषोत्तमपंत पुण्याच्या शालापत्रकांत प्रथम चमकले. त्यानंतर त्यांच्या कविता कऱ्हाडची कर्तव्य जागृति, पुण्याचें राजकारण, लोकसंग्रह, बालमाला, विद्यार्थी, मुंबईचा विविध ज्ञानविस्तार, उषःकालमाला, धुळ्याचा कर्मयोगी, इस्लामपूरची भारतमाता, पळसापूरचा भाग्योदय, अंजनगांवचें आर्यावर्त वगैरे वृत्तपत्रांतून व मासिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाल्या असून त्यांचे गद्य लेखहि पुण्याची बालमाला व गुलाब कऱ्हाडची कर्तव्य जागृती, मुंबईचें कीर्तन मासिक वगैरे मधून आलेले आहेत.

शिवाय त्यांनीं 'झांकलें माणिक' ही एक कादंबरी प्रसिद्ध केली आहे. ते आपले लेख व कविता साधारणपणें 'महाराष्ट्रीय' व 'जननीजनकज' या नांवांनीं प्रसिद्ध करीत असतात. child is the farther of man या म्हणींत जर कांहीं तथ्य असेल तर कऱ्हाडचे रा. पुरुषोत्तमपंत गोखले हे महाराष्ट्राचे एक झांकलें माणिक आहेत असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. त्यांच्या वाङ्मयचरित्रांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट असेल तर त्यांना कोणताही गुरु नाहीं. 'स्वावलंबन' हें पुस्तक तयार असून त्यांची होऊं घातलेली पुस्तकांत 'गंगाभागिरथी' व 'मी मेल्यावर' या कादंबऱ्या, 'पांचजन्य अथवा हें काय?' (अजून नक्की नाहीं.) हें नाटक व बापूसाहेब गोखले यांचे चुलते धोंडूदादा गोखले यांच्यावरील 'दादा गोखले' हा पोवाडा हीं विशेष हृदयंगम आहेत.

शक्य तितकें दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याचा ज्यांचा नैसर्गिक कलच त्यांच्या जाणत्या वयाचा एक दिवसही दुसऱ्याच्या उपयोगीं पडल्यावांचून जावयाचा नाहीं. कऱ्हाडच्या विद्यार्थीसंघानें जें मोफत वाचनालय चालविलें होतें. त्यांत पुरुषोत्तमपंतांनींच प्रामुख्यानें भाग घेतला होता. इतकेंच नव्हे तर संघानें केलेल्या बहुतेक सर्व चळवळींत रा. पुरुषोत्तमपंत हे प्रामुख्यानें पुढें असतातच असें मला वाटतें. रा. पुरुषोत्तमपंतांच्या निर्भीड स्पष्टवक्तेपणामुळें आणि बाणेदार स्वाभिमानामुळें कऱ्हाडचीं मोठमोठीं धेंडेंही त्यांचें साभिमान कौतुक करतात. व थोडेंसें भिऊनही वागतात. रा. पुरुषोत्तमपंतांचें सार्वजनिक चरित्र दुसऱ्या कोणत्याही कारणासाठीं स्मरणीय झालें नाहीं. तरी त्यांनीं पुण्यांत केलेल्या व त्यामुळें महाराष्ट्रांत फैलावलेल्या चहाच्या बहिष्काराच्या चळवळीबद्दल तरी त्यांचें नांव चिरस्मरणीय होईल. पुणेरी पुढाऱ्यांची सक्रिय सहानुभूती नसतां कऱ्हाडचा एक इसम आपल्या मित्रांच्या मदतीनें पुण्यांतील सर्व हिंदु हॉटेलांतून पंधरा दिवस चहाला अजीबात अर्धचंद्र देतो ही साधी गोष्ट नव्हे.

रा. पुरुषोत्तमपंतांबद्दल लोकमत कसें आहे याबद्दल मी विशेष लिहिण्याची जरूर नाहीं. कोणा उपव्याप्यानें ता. २१ नोव्हेंबर १९२० रोजीं त्यांच्या मृत्यूची खोटी बातमी प्रसिद्ध केली. त्यावेळीं त्यांच्याबद्दलचें लोकमत चांगलेंच पडताळलें गेलें. लोकसंग्रह व ज्ञानप्रकाश यांनीं त्यांच्यासंबंधीं काढलेले उद्गार जरी लक्षांत घेतले तरी बस्स आहे. आपल्या मृत्यूची खोटी कंडी उठविणारा उपव्यापि हातीं सांपडला असतां 'जा तुझें कर्म तूं केलेंस' म्हणून त्यास पुरुषोत्तमपंतांनीं सोडून दिलें. यावरून त्यांची क्षमाशीलता उत्कृष्ट रीतीनें व्यक्त होते. मनमिळाऊ, तत्त्वप्रेमी, स्पष्टभाषी, स्वाभिमानी, दीर्घोद्योगी, प्रेमळ व बाणेदार अशा पुरुषोत्तमपंतांसारख्या तरुणांची लोकसंग्रहानें म्हटल्याप्रमाणें आज महाराष्ट्रास जरूर आहे.

बापूसाहेब गोखले यांचे निपणजे महादेवभट; महादेवभटांचे पणतू गणेश, गोपाळ, बाबजी व लक्ष्मण बल्लाळ; हे सर्व तळेखाजण येथील रहाणारे होत. पैकीं गणेश बल्लाळ यांचे नातू काशिनाथ विष्णु हे हल्लीं पेनशनर आहेत. काशिनाथपंत यांनीं ता. देवगडपैकीं सौंदाळें या गांवीं जमीनजुमला खरेदी घेऊन हल्लीं सौंदाळें येथेंच रहात आहेत. हे ज्युडिशियल डिपार्टमेंटमध्यें नोकर होते. पेनशन घेतल्यावर सौंदाळें गांवीं राहून वृद्धापकाळ ईश्वरभजनांत घालवीत आहेत. यांना दोन मुलगे; महादेव हे घरीं शेती करतात व दत्तात्रय हे घरीं व मुंबई येथें रहातात.

लक्ष्मण बाबजी हे पेनशनर असून तळेखांजण येथें वडिलार्जित ठिकाणीं रहात आहेत. लक्ष्मण बल्लाळ यांचे पणतू गणेश विठ्ठल व विनायक विठ्ठल हे सांगली येथें रहात आहेत. विठ्ठल सदाशिव यांनीं सांगली येथें मधुकरी मागून विद्याभ्यास केला. नंतर सांगली संस्थानांतच यांनीं नोकरी धरली. कांहीं दिवसांनीं अव्वल कारकून झाले व मग मामलेदारही झाले. पुढें गणपती देवस्थानच्या नोकरींत असतां पेनशन घेतलें. यांनीं जुन्या सांगलींत घर विकत घेतलें. यांचे पहिले चिरंजीव गणेश विठ्ठल गोखले हे अग्रिकलचर ग्रयॉज्युएट असून हल्लीं सांगली संस्थानांतच अग्रीकलचर खात्यांत नोकर आहेत. त्यांनीं गेल्यावर्षी वडिलार्जित घराची उत्तम दुरस्ती केली. यांचे कनिष्ट बंधु विनायकराव विठ्ठल हे बी. बी. सी. आय. रेलवे खात्यांतील इंजनियरिंग खात्यांत नोकर आहेत. यांचें कोंकणांत वडिलार्जित घर व शेत आहे.

बापूसाहेब गोखले यांचे निपणजे महादेवभट; महादेवभटांचे नातू बाबदेव रामभट; बाबदेवाचे निपणतू हरि बाळाजी व दत्तात्रय बाळाजी हे तळेखांजण येथें शेती भाती करून वडिलार्जित घर व ठिकाण संभाळून आहेत.

मिरज, उपळावी व सांगली येथील गोखले.

मिरज, उपळावी व सांगली येथील गोखले यांचा मूळ पुरुष नारायणभट ऊर्फ जानभट व बापू गोखले यांचे निपणजे महादेवभट हे सख्खेबंधु किंवा चुलत बंधु असावेत असें वाटतें. नक्की सांगतां येत नाहीं. नारायणभट ऊर्फ जानभट यांना पुत्र सात होते. पैकीं चार पुत्रांचा वंश हल्लीं चालू आहे. मिरज येथील रामाजीपंत गोखले यांचे वडीलपुत्र विसाजीपंत गोखले यांनीं आपल्या घराण्याची माहिती स्वदस्तुरनें लिहून ठेविलेली अस्सलबरहुकूम नक्कल पुढें देत आहें.

" आजे नारायणभट ऊर्फ जानभट राहणार तळेखांजण यांसी तिघे पुत्र पद्माकरपंत, रामाजीपंत व विठ्ठलपंत; पद्माकरपंत यांचा वंश कोंकणांत आहे. विठ्ठलपंत यांचा वंश उपळावीस आहे. रामाजीनाईक यांस पांच पुत्र; विसाजीपंत, दिनकरपंत, नारोपंत, भास्करपंत व सखोपंत. दिनकरपंत वारल्यावर कुटुंब सह-

गमन गेलें. पुढें वंश नाहीं. नारोपंत यांचें कुटुंब रमाबाई पुणें मुक्कामीं हयात असोन त्यांस सरकारांतून दरसाल दोनशें रुपये पोटगी मिळत असते. पुत्रसंतान नाहीं. भास्करपंत यांचे चिरंजीव विश्वासराव म्हणून असून ते पुण्यामध्यें खासगत मिळकतीवर घर करून सरकारी कामावर असतात. सखोपंत यांचे नातू दिनकरपंत, घोंडोपंत व नरसोपंत हे सांगलीस असोन दिनकरपंत वारले आहेत. शके १७४३ माा वा ५ रोजीं विसाजीपंत यांनीं हयात असतां पुणें मुक्कामीं विश्रामबागेच्या वाड्यांत दत्तक घेतले असोन ते वा ६ रोजीं वारले. पुढें सरकारांत मंजूर होऊन दोन हजार रुपये पेनशन मिळवावयास लागले. पैकीं मातुश्रीकडे दोनशें हे रुपये परभारे खर्चास पोहोंचत असून बाकी १८०० रुपये पोंचतात. दत्तक मांडीवर घेणार मातुश्री भवानी बाई म्हणणार सहगमन गेल्या.

विसाजीपंत वारल्यानंतर चार वर्षें अजमासानें दिनकरपंत मिरज मुक्कामीं वारले. तोंपावेतों पांच भाऊ एकत्र असोन नंतर थोडे दिवसांनीं विभक्तपणा जाहला. तो नारोपंत, भास्करपंत व पुरुषोत्तम सखाराम व रामचंद्र विसाजी. सांगली मुक्कामीं आप्पासाहेब यांजकडे जाऊन, नारोपंत व पुरुषोत्तम सखाराम व रामचंद्र विश्वनाथ (विसाजी) या त्रिवर्गांचीं व भास्करपंत यांचीं परस्परें वाटणींसंबंधें फारखतें जाहलीं. त्यांत पुणें मुक्कामचा हिशेब भास्करपंत यांणीं आप्पासाहेब यांचे विद्यमानें गुदरावा. नंतर मिरज मुक्कामची जिनगी वगैरे असेल ती एकत्र करून विभाग व्हावे. यापुढें एकमेकांचा उत्पन्नाबद्दल व जिनगीबद्दल संबंध नाहीं. असा मजकूर असोन त्याप्रमाणें हिशेब गुदरले नसलेमुळें मिरज मुक्कामीं प्राप्ती त्रिवर्गांकडे राहिली. नंतर पुढें कांहीं दिवसांनीं नारोपंत फक्त विभक्त होऊन निराळे राहिले. पुरुषोत्तम सखाराम वयानें वडील असोन सर्व जिनगी व कागदपत्र त्यांचे तावेंत होते. पुढें कांहीं दिवसांनीं आम्ही विभक्त राहिलों. पुढें पुरुषोत्तमपंत यांजपाशीं पेनसिनीचे सनदेबद्दल फक्त तूर्त मागणें केलें असतां तक्रार चालून अखेर जिनगी वांटणी वगैरे न देतां ते सांगलीस राहिले. व आम्ही मिरज मुक्कामीं राहिलों. "

ऐतिहासिक माहिती.

" या घराण्याचे मूळ पुरुष नारायणभट ऊर्फ जानभट गोखले हे असोन त्यांचे दुसरे चिरंजीव रामाजी नाईक गोखले यांस श्रीमंत कैलासवासी गोविंद हरि पटवर्धन मिरजकर यांणीं शके १६७९ म्हणजे फसली सन ११६७ मध्यें [इ. स. १७५७ त] तुम्हांस कापडाचे दुकानीं योजिलें. तुमचें जें चालविणेचें तें रीतीनें चालविलें जाईल असें वचन होतें. त्याप्रमाणें पटवर्धन सरकारचे पदरीं राहून त्यांजकडे सरकारांत लागणारें दरसाल एक लाख रुपये पावेतों किंमतीचें कापडसामान खरेदी करून देणेंत येत असे. सदरहु बाबतींत श्रीमंतांचेकडून शके १६९६ म्हणजे फसली साल ११८४ [इ. स. १७७४ त] लेखी यादी

मिळाली. पुढें सदर कामगारीसाठीं श्रीमंतांना रामाजी नाईक यांना फसली साल ११६७ [इ. स. १७५७] मध्यें आपले पदरीं आणून ठेविलें. व त्यास तैनात करून देणेंत येऊन तैनात जाता शके १६९८ म्हणजे फसली साल ११८६ [इ. स. १७७६ त] मध्यें ३७५ तिनशें पंच्याहत्तर रुपयेचा करून देण्यांत आला. पुढें रामाजी नाईक यांना फसली सन १२०१ [इ. स. १७९१] त पटवर्धन सरकाराकडून अबदागिरीचीं वस्त्रें देणेंत आलीं होतीं.

सदर रामाजीनाईक यांना संस्थान मजकूरपैकीं मिरज प्रांत मौजे उपळावी येथील कमाविशीचें काम फसली सन ११९४ (इ. स. १७८४) सालीं सरकारांतून देणेंत आलें असोन त्याजवा गांव सादिलवारांतून नेमणूक फ. स. ११९५ (इ. स १७८५) सालीं करून देणेंत आली होती. त्याप्रमाणेंच तालुके कुचीपैकीं मौजे अगळगांव येथील कमाविशीचें कामही आमचे घराण्याकडे सरकारांतून देणेंत आलें. दोन्ही गांवचें कमाविसीचें काम आमच्या घराण्याकडे असोन तें आमचे आजे दिनकर पुरुषोत्तम यांचे हयातीपर्यंत म्हणजे इ. स. १८६४ इसवी अखेर (शके १७८६) चालत होतें.

आमचे घराण्यापैकीं सखाराम रामाजी यांस पटवर्धन जाहागिरीकडून संरजामानिसी पेशवे सरकारांत सिलेदारी चाकरीस पाठविणेंत आले होते. ते त्रिंबकजी डेंगळे यांजबरोबर गेले असोन त्यांस एका छावणीस ठेवून डेंगळ परत पुण्यास आल्या मागें ते छावणींत सिलेदारी नोकरींत मयत जाहले तींच सिलेदाराची नोकरी आमचे पणजे पुरुषोत्तम सखाराम:यांस जाहागिरींतून चालवून फ. स. १२३५ (इ. स. १८२५) सालीं सांगली संस्थानचे माजी अधिपती श्रीमंत कैलासवासी आप्पासाहेब यांणीं तैनात जाबता करून दिला. त्यांत नक्त नेमणूक रुपये १९८९ व जमीन मौजे अगळगांव तो कुची येथें ऐन खर्च ११९२ ची मिळून रुपये ३१८१ ची नेमणूक करून देणेंत आली असोन ती तैनात पणजे पुरुषोत्तम सखाराम यांचें हयाती पासून आजे दिनकर पुरुषोत्तम यांचे हयातीमध्यें फ. स. १२६५ (इ. सन १८५५) पावेतों चालली. त्यानंतर त्यावेळचे सांगलीसंस्थानचे कारभारी कोन्हेरराव बापूसाहेब यांणीं तैनातीचे उत्पन्नास अटकाव केला. त्यावरून आमचे आजे दिनकर पुरुषोत्तम यांणीं त्यांस पत्र पाठविलें. त्यावरून सदर कारभारी मजकूर यांजकडोन आमचे आजे दिनकर पुरुषोत्तम यांना " एकंदर तैनातदारांबद्दल ठराव होईल त्याप्रमाणें तुमचेबद्दलही ठराव होईल. तोंपर्यंत जमिनीचा फाळा सरकारांत देण्याबद्दल मामलेदार कबुलायती मागतील त्या देणेस हरकत नाहीं. " म्हणून मजकुराचें उत्तर आलें. त्याप्रमाणें पुढें योग्य अशी तजवीज कांहींच न होतां सदर कारभारी यांणीं सालीना रक्कम रुपये ४७५ ची तैनात करून दिली. त्यास आमचे आजे दिनकर पुरुषोत्तम हे नाराज होऊन

त्यांणीं सदर तैनातीचा ऐवज बिलकूल न घेतां आमचे वडील दत्तोपंत व चुलते वासुदेवराव व विनायकराव हे अल्पवयस्क असतां त्यांचें लहानपणींच मयत जाहले. सन १८६४.

वरील कलमांत रकम रुपये ३१८१ च्या नेमणुकीबद्दल जो मजकूर आला आहे, तो फक्त आमच्या घराण्याकडे कमाविशींनें असलेल्या अगळगांव येथील जमिनीबद्दलचाच असोन तेथील जमिनीपैकीं कांहीं जमीन आमचे चुलत चुलते सदाशिव नरसिंह गोखले यांचे घराण्याकडे रयताव्यानें चालत होती व ती जमीन पुढें त्यांचेच अल्पवयांत चरितार्थाचे अडचणीमुळें विकली गेली आहे. वरील प्रमाणेंच मिरजप्रांत तालुकेपैकीं मौजे उपळावी गांवही आमचे घराण्याकडे कमाविशींनें होता व तेथेंही कांहीं जमिनी अगळगांवप्रमाणेंच इनाम असाव्या असें वाटतें व त्यांचीही अगळगांवाप्रमाणेंच स्थिती जाहाली असावी असें दिसतें. याचें कारण त्या वेळच्या जमिनीपैकींच हल्लींचे सर्वे नंबर ६।७ च्या दोन जमिनी रयताव्यानें (अदमासें ४० एकरच्या) खुद्द माझे खात्यास दाखल असोन ते नंबर उपळावी गांवचे पाश्चिमेस सरकारी बाळापूर डेरीचे बागेस लागून ओढ्यांत जें घरण आहे. त्याचे पूर्व बाजूस आहेत. परंतु सदरचे जमिनीबद्दल मात्र अगळगांवाप्रमाणें आमचेजवळ लेखी दाखला कांहींच खात्रीपूर्वक न मिळालेमुळें नक्की माहिती सांगणें कठीण आहे.

आमचे चुलत आजे नरसो पुरुषोत्तम यांनीं प्रपंचाचे हलाकीमुळें बंद पडलेली तैनात चालू होण्याबद्दल सांगलीहुजूरकडे काम चालाविलें. पुढें ३२ महिन्यांनीं ता० २६—६—१८७० त त्यांचें नांवें १५० रुपेंची तैनात चालू जाहली. पुढें हे सन १८७३ त मयत जाहले. यामुळें सांगली येथील या घराण्यांत कर्ता पुरुष असा कोणीच राहिला नाहीं. त्यामुळें तैनात व जुजबी मानमरातब जे चालू होते ते सर्व बंद पडले. आमचे चुलत चुलते सदाशिव नरसिंह हे अगदीं अल्पवयी असल्यामुळें व त्यांचे चुलत बंधु रामचंद्र हेही लहान असल्यामुळें सदाशिव यांच्या मातोश्रींनीं आपले हिशाची आगळगांव येथील जमीन विकली व प्रपंच चालविला. पुढें मातोश्री निवर्तल्यामुळें सदाशिवरावांस फारच हलाकीच दिवस आले. तशाच अडचणींत त्यांनीं मराठी अभ्यास पुरा करून सांगली येथें दिवाणी खात्यांत उमेदवारी पत्करली. शिवाय इतर वेळांत वैद्यकीचा अभ्यास करून प्रसिद्ध आवासाहेब सांवारे वैद्य यांच्या जवळ अभ्यास करून यांनीं पुढें दवाखाना घातला. आणि वैद्यकी सुरू केली. या योगानें प्रापंचिक स्थिती साधारण सुधारली. यांनीं बंद पडलेल्या तैनातीसंबंधीं पुन्हां खटपट करून १५० रुपये पुन्हां सन १९०० सालांत चालू करून घेतली. सदाशिव नरसो यांचे पुत्र हणमंत हे विद्यार्थी आहेत. दत्तात्रय दिनकर यांनीं संस्थानांत फौजदाराचें काम केलें. होतें. मिळोन हल्लीं या सांगली येथील गोखले घराण्यांत विद्यमान तीनच पुरुष

हयात आहेत. जुने सांगलींत या घराण्याचा जो वाडा आहे, तो 'गोखले वाडा' सांगली संस्थानचे त्या वेळचे अधिपती श्री० चिंतामणराव आप्पासाहेब यांनीं आमच्या पणजोबास (पुरुषोत्तम सखाराम गोखले यांस) २१०० एकवीसशें रुपयेस छ. १२ माहे जिल्काद सु॥ आर्बा सलासीन मयातैन व अलफ या सालांत (सन १८३३ त) गोविंद गंगाधर व गोपाळ भास्कर सहस्रबुद्धे सांगली यांजकडून दिला." तेव्हांपासून आमचे पुरूष त्या वाड्यांत रहात आले व हल्लीं आम्ही रहात आहों. आमचे चुलते विनायकराव हे मिरजेस रामचंद्र विसाजी ऊर्फ तात्या गोखले यांना दत्तक गेले आहेत. परंतु सांगली संस्थानांत नोकर असल्यामुळें येथेंच वाड्यांत रहात आहेत. याना संतती नाहीं. सिताराम दत्तात्रय हे सांगली येथेंच नोकर आहेत. व्यंकटेश दत्तात्रय हे रेलवेंत नोकर आहेत आणि हणमंत सदाशिव हे विद्यार्थी आहेत.

सिताराम दत्तात्रय यांनीं विशेष काळजी घेऊन कागदपत्र पाहून वरील माहिती त्यांनीं चांगली संगतवार लिहिलेली आम्हांस दिली. ती तशीच त्यांच्याच शब्दांत वर दिली आहे. मात्र त्यांतील ऐतिहासिक महत्वाचा तेवढा भाग देऊन, अलीकडील माहितीची गरज नसल्यामुळें ती कमी केली आहे. विशेषतः सिताराम पंत गोखले यांनीं जे परिश्रम केले त्यांबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे.

मिरज येथें जे रामजी नाईक प्रथम गोविंद हरि पटवर्धन मिरजकर यांच्या पदरीं राहिले त्यांच्या तीन मुलां पैकीं पहिले विसाजीपंत यांनीं तळेखाजण येथील चुलत बंधु रघुनाथ पद्माकर यांचे चिरंजीव रामचंद्र यांस दत्तक घेतलें. याच दत्तकपुत्रानें स्वहस्तें लिहिलेली माहिती मागें दिलीच आहे. मिरज येथें मालगांव वेशीजवळ जो मोठा वाडा गोखले यांचा हल्लीं आहे; तो वाडा या घराण्यांतील कोणत्या पुरुषानें बांधिला, तें नमूद केलेलें नाहीं. तरी अंदाजानें असें ठरवितां येईल कीं, तो वाडा विसाजी भास्कर व सखो हे एकत्र असतांनाच बांधिला असावा. रामाजी नारायण व विठ्ठल नारायण हे एकत्र होते. परंतु विठ्ठल नारायण हे उपळावीस कां गेले तें पुढें येईलच. रामचंद्र विसाजी ऊर्फ तात्यासाहेब गोखले यांचे दत्तक पुत्र सांगली येथील पुरुषोत्तम सखाराम यांचे नातू विनायक दिनकर हे होत. हे दत्तक पुत्र विनायकराव रामचंद्र नोकरीमुळें सांगली येथेंच राहतात. सखोपंत यांच्या वंशजांची माहिती वर दिलीच आहे. आतां भास्करपंत यांच्या वंशाची माहिती देतोः—

भास्करपंतांचे वंशज घुणें येथें सदाशिव पेठेंत वडिलार्जित घरांत रहात आहेत. भास्करपंतांचे वडील बंधु विसाजीपंत; विसाजीपंत व भास्करराव हे दोघेही धोंडोपंत दादा गोखले यांच्याबरोबर कर्नाटकांतील प्रत्येक स्वारींत होते. बापूसाहेब कर्नाटकांतून परत पुण्यास आले तेव्हां हे दोघे बंधु त्यांच्या बरोबर पुण्यास आले. बेरड, भिल्ल, प्रतिनिधी व सुरापुरकर यांचा बंदोबस्त बापूसाहेबांनीं विसाजीपंत व भा-

स्करपंत यांच्या हस्तें करविला. यांचीं कामें पाहून सरदारीची नेमणूक फौजसुद्धां स्वतंत्रपणाची विसाजीपंत व भास्करपंत यांना श्रीमंतांनीं दिली. पुढें पेशवे सरकार व इंग्रज यांच्यामध्यें पुणें, कोरेगांव, गोपाळ–आष्टें वगैरे ठिकाणीं ज्या लढाया झाल्या त्या सर्व लढायांत विसाजीपंत व भास्करपंत हे गोखले बंधु बापुसाहेब गोखले यांच्या बरोबर होते. आशिरगडपर्यंत हे बंधुद्वय श्रीमंतांच्या बरोबर होते. पुढें श्रीमंत पेशवे मालकम साहेबांचे ताब्यांत गेल्यावर यांना पुण्यास जाण्याविषयीं हुकूम झाला.

पुण्यास आल्यावर एलफिस्टन साहेबांनीं विसाजीपंत यांची व त्रिवर्गबंधु व पुतणे यांच्या नेमणूका स्वार पायदळ मिळोन १०१८०० रुपयांची नक्त नेमणूक करून दिली. पुढें दोन वर्षांनीं स्वारपायदळ कमी करून, सर्व खासे मिळोन ३५००० रुपयांचें सरंजामी गांव दिले. ते विसाजीपंत मरेपर्यंत चालले. पुढें सरकारनें भास्करपंत व दिनकरपंत व नारोपंत व पुतणे पुरुषोत्तम सखाराम यांना मिळून १०००० रुपये पेनशन ठरवून दिलें. भास्करपंत हे सरकारचा अम्मल झाल्यावर बंदोबस्ताचे कामांत उपयोगीं पडले. सबब बक्षिस एक हजार रुपये पेनशन जास्त देऊन एलफिस्टनसाहेब विलायतेस गेले. सखारामपंत यांना सातपुड्यांत भिल्लांचा बंदोबस्त करण्याकरितां पेशवे सरकारांनीं नेमिले होते, त्या कामांत ते सन १८१३ त पडले. विसाजीपंत गोखले शके १७४३ भाद्रपद वा ६ (सन १८२१) रोजीं पुणें येथें वारले. भास्करपंत हे पुणें येथें सन १८६० मध्यें वारले. दिनकरपंत हे मिरज येथें शके १७४५ कार्तिक वा ११ (सन १८२३ त) मरण पावले.

भास्करपंतांचे पुत्र विश्वनाथपंत हे मुनसफची परीक्षा पास झाल्यावर यांना सबजज्जाची जागा मिळाली. यांनीं आपला वडिलार्जित सरंजाम आपले नांवें चालावा म्हणून पुष्कळ खटपट केली; परंतु सरंजाम मिळाला नाहीं. सेकंडक्लास सरदारांत यांचें नांव दाखल होतें. विश्वनाथपंत हे मोठे कर्मठ व बाणेदार होते. तसेंच न्यायाचे कामांतही चोख होते. यांनीं पेनशन घेतली होती. यांना पुत्र चार; पहिले गंगाधरपंत हेही सबजज्ज होते. नंतर स्माल कॉज कोर्टाचे रजिस्टार होते. हे नोकरीवर असतांनाच वारले. दुसरे नारायणराव हे कै० श्री० आप्पासाहेब पटवर्धन जमखंडीकर यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी होते. पुढें त्याच संस्थानांत कुंदगोळ येथें मुनसफ होते. तिसरे सितारामपंत हे घरींच असत. चवथे गणेश हे व्यापार करीत होते. गंगाधरपंत यांना पुत्र पांच; पैकीं कृष्ण, सदाशिव व हरी हे अल्पवयांतच वारले. त्रिंबकराव हे हल्लीं वकील आहेत. वामनराव हे फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट होते. वासुदेवराव नारायण हे मोत्याचा व्यापार करीत आहेत. सितारामपंतांचे मुलगे गोविंदराव व गोपाळ हे धारवाड येथें व्यापार करीत आहेत. त्रिंबकराव यांनीं म्यॅट्रिक झाल्यावर वकिलीची परीक्षा

दिली. पुढें ४ । ५ वर्षांनंतर वाकिली करूं लागले. त्रिंबकराव यांना वाकिली करूं लागल्यास पंधरा वर्षें झालीं. हल्लीं वाकिली चालूच आहे. हे स्नानसंध्येशील असून स्वभावानें गरीब आहेत. त्रिंबकराव गंगाधर ऊर्फ तात्यासाहेब यांचें नांव सेकंडक्लास सरदाराचे पटांत परंपरेप्रमाणें चालू आहे. हे सदाशिवपेठेंत आपल्या वडिलार्जित घरांतच रहात आहेत. सदरहू घराचा हल्लींचा म्यु. नं. ६०४ आहे. तात्यासाहेब गोखले यांना भास्कर या नांवाचा एक मुलगा आहे. वासुदेवराव नारायण यांच्या मुलाचें नांव दिगंबर होय.

पद्माकर नारायण यांचा वंश तळेखाजण येथें आहे. पद्माकर यांचे नातू जनार्दन रघुनाथ; यांचे नातू विष्णु रामचंद्र हे हल्लीं तळखाजण येथें आहेत. याना मुलगे दोन. वासुदेव रघुनाथ यांचे पणतू गणेश वासुदेव व विष्णु रामचंद्र हे एकत्र आहेत. हे तळेखाजण येथें शेती वाडी करून आहेत. विष्णुपंत वयोवृद्ध झाले आहेत. हे कुटुंब जरा बऱ्या स्थितींत आहे. हा लेखक यांच्याच घरीं तळेखाजण येथील माहिती घेण्याकरितां गेला होता.

उपळावी येथील गोखले.

मिरज येथील रामाजी नाईक गोखले व विठ्ठल नारायण गोखले हे सख्खे बंधू मिरज येथें एकत्र होते. विठ्ठलराव हे मोठे कर्मठ असून ते वेदशास्त्रसंपन्न होते. एके दिवशीं भर दोन प्रहरीं वैश्वदेव करून भोजन न करतां एका वस्त्रानिशीं सहकुटुंब जे घराचे बाहेर निघाले ते उपळावी येथें जाऊन, उपळावीचे पश्चिमेस ओढ्यानजीक जाऊन राहिले. हल्लीं त्या ठिकाणीं फक्त चौफेर दगडी भिंती मात्र आहेत. विठ्ठलपंत मोठे स्नानसंध्येशील असल्यामुळें, ते निर्जन ठिकाण त्यानां फार पसंत झालें. चिंतामणराव आप्पासाहेब सांगलीकर यांनीं बाळापूरशेरी म्हणून जी आहे, ती शेरी विठ्ठलपंतांचे स्वाधीन केली. त्या शेरींत विद्यमान जे मोठमोठाले आंब्याचे वृक्ष आहेत ते सर्व विठ्ठलपंत गोखले यांनीं लाविलेले होत. विठ्ठलपंत यानां बागाईताचा नाद विशेष होता. शेरीपासून जवळच यांचा एक मळा आहे. तो मळा त्यांच्या वंशजाकडे हल्लीं आहे. त्या निर्जन रानांत ओढ्याचे कांठीं ७।८ वर्षे राहिल्यावर पुढें उपळावी गांवांत ओढ्याचे कांठीं वाडा बांधून वाड्यासभोंवार तट बांधिला व एक विहीर बांधिली, आणि त्या वाड्यांत येऊन राहिले. विठ्ठलपंत यांना साक्षात्कार होऊन जी मूर्ति मिळाली;ती श्री सिद्धेश्वराची मूर्ति यांनीं उपळावी गांवचे उत्तर बाजूस स्थापन करून दगडी गर्भागार विठ्ठलपंतांनीं बांधिला. त्या गर्भागाराचे समोरील सभामंडप गांवकरी यांनीं बांधिला. उपळावी हा गांव हल्लीं सांगलीकरांचा आहे. विठ्ठलपंतांनीं शेती भाती करून प्रपंच चाल-

विला होता. वाडयास लागून ओढयाचे कांठीं फुलझाडें लाविलीं होतीं. येथील श्रीसिद्धेश्वराचें स्थान जागृत आहे. सर्पदंश झालेल्यास जर श्रीसिद्धेश्वरासमोर नेऊन ठेविले तर तो दंशमुक्त होतो.

विठ्ठलपंत यांचे पुत्र नऊ; परंतु हल्लीं दोन पुत्रांचा वंश चालू आहे. वामन व त्रिंबक. वामन विठ्ठल यास पुत्र पांच. पैकीं दोन दत्तक गेले. पहिले चिरंजीव रामचंद्र वामन यांस पुत्र तीन; नारो, सखाराम व गोपाळ; नारो यास सदाशिव म्हणून एकच मुलगा होता, तो वारला. त्याची मुलें आहेत. दुसरें सखाराम रामचंद्र हे हल्लीं उमरावती येथें आहेत. यांनीं शेती भाती केली होती. हल्लीं वयोवृद्ध असल्यामुळें मुलाजवळ आहेत. यांना मुलगे दोन; पहिले श्रीपाद हे बी. ए. असून हे शिक्षक आहेत. रामचंद्र सखाराम हे दुसरे चिरंजीव, हे बी. ए. एल्. एल्. बी. असून वकील आहेत. हे सर्व उमरावती येथें रहात आहेत.

तिसरे गोपाळ रामचंद्र हे सबूजज्य होते. हल्लीं पेनशनर आहेत. हे आगळगांव येथें रहातात. यांना दोन मुलगे आहेत. पहिले वामनराव हे एल्. एम्. अँड. एस्. झाल्यावर विलायतेस गेले. तेथून L. R. C. P. &. S. D. P. H. या परीक्षेंत उत्तीर्ण होऊन १९११ सालीं परत आले. नंतर ग्वाल्हेर संस्थानचे लष्करबरोबर ईष्ट आफ्रिकेस गेले होते. सन १९१८ सालीं परत आले. नंतर हल्लीं ग्वाल्हेर स्टेट सिविल सर्जनचे जागेवर आहेत. दुसरे येशवंतराव इंटरची परीक्षा झाल्यावर १९०८ सालीं ब्यॉरिस्टरचा अभ्यास करण्यास विलायतेला गेले. ते १९११ सालीं पास होऊन परत आल्यावर मुंबई येथें हायकोर्टात प्रॅक्टिस करूं लागले. दुसरे महादेव वामन यांचे पुत्र दत्तोपंत हे उपळावी येथें शेती करून आहेत. यांनीं आपला दुसरा मुलगा वामन; हा चुलते बल्लाळ वामन यास दत्तक दिला आहे.

त्रिंबक विठ्ठल यांचे नातू पांडुरंग हरि; पांडुरंग हरि यांस पुत्र तीन; केशव, शिवराम व विष्णु; केशवराव यांनीं सांगली येथें लोखंडी सामानाचें दुकान घातलें आहे. शिवराम हे शाळामास्तर आहेत. आणि विष्णुपंत यांनींही सांगली येथें लोखंडी सामानाचें दुकान घातलें आहे. यांची शेती व घर उपळावी येथे आहे.

नारायणभट ऊर्फ जानभट यांचे चवथे पुत्र लक्ष्मण यांचा वंश पुणें येथें आहे. लक्ष्मण यांस पुत्र दोन; हरी व बाजी; पैकीं हरीचे पणतू बाळकृष्ण गोविंद हे पोलिस इन्स्पेक्टर असून पंढरपूर येथें रहातात. बाजी लक्ष्मण हे पेशवाईत पुण्यास आले असावेत. यांना पुत्र तीन; पैकीं येशवंत बाजी यांस हरि, लक्ष्मण व रामचंद्र असे तिघे मुलगे. पैकीं हल्लीं रामचंद्र ऊर्फ भाऊसाहेब गोखले हे आहेत. यांनीं तालमीचा शोक पुरा केला. हे सार्वजनिक कामाचे कट्टे भक्त

आहेत. यांचे दोघेही वडीलबंधु वारल्यामुळें प्रपंचाचा सर्व बोजा ह्यांच्यावर पडला. त्यामुळें यांनीं जी शरीरसंपदा संपादन केली ती तशीच ठेवण्यास तालमीचा व्यासंग प्रपंचाच्या दगदगीमुळें होईनासा झाला. भाऊसाहेब गोखले यांचा स्वभाव फार गरीब असून ज्ञानसंध्येशील आहेत. यांच्या वडीलबंधूंचे तीन मुलगे आहेत. चिंतामण, गणेश व मोरेश्वर लक्ष्मण; हे तिघे पुतणे व भाऊसाहेब हे वडिलार्जित घरांत एकत्र राहून भाताचा व्यापार करीत आहेत. यांचें घर सदाशिवपेठेंत म्यु. नं. ९४६ चें आहे.

तळेखाजण येथील नारायणभट बाळंभट यांस पुत्र चार; पैकीं तिघांचा वंश हल्लीं चालू आहे. नारायणभटाचे पुत्र कृष्णाजी नारायण हे कोंजळगडावर मामलतीचे कामावर होते. यांनीं प्रथम वांई येथें ब्राह्मण–शाहीत वास्तव्य केलें होतें. नंतर गंगापुरींत राहण्याकरितां घर बांधिलें. हल्लीं त्याच घरांत कृष्णाजी नारायण यांचे दत्तक पणतू नारायण विष्णु हे रहात आहेत. विष्णु बल्लाळ यांनीं नारायण यांना दत्तक घेतलें. नारायण ऊर्फ नानासाहेब गोखले हे वडिलार्जित धंदा, शेती व व्यापार करीत आहेत. यांना सार्वजनिक कामाची हौस आहे. स्वभावही गरीब आहे. यांचे चिरंजीव दत्तात्रय हे विद्यार्थी आहेत. नानासाहेब गोखले कोंकणांतील उत्पन्नापैकीं एक चतुर्थांश हिश्शाचे मालक आहेत.

भास्कर नारायण यांचे दत्तक पुत्र महादेव; यांस पुत्र दोन; हरी व कृष्ण; हरी महादेव हे गवई आहेत. आणि कृष्णाजी महादेव हे व्यापारी आहेत. कृष्णाजी महादेव यांनीं मुंबई येथें भाजीपाल्याचें दुकान घातलें आहे. ह्या धंद्यास १५।१६ वर्षें झालीं. कृष्णाजीपंत गोखले यांचेजवळ हरीभाऊही केव्हां केव्हां असतात. यांना तळेखांजण येथें उत्पन्न आहे.

नारायणभटाचे तिसरे पुत्र बापू यांचे नातू येशवंत काशिनाथ हे कोंकणांतून केळवडें गांवीं आले. या गांवीं येशवंतराव यांनीं गांवठी शाळा घातली होती. हे शके १८१८ त मयत झाले. यांचे वडील पुत्र गोविंदाराव हे भोर संस्थानांतील ५।६ गांवचे कुळकर्णपण करीत आहेत. यांनीं केळवडें येथें थोडीशी जमीन घेतली आहे. यांचे कनिष्ठ बंधु नारायण हे वाई येथें गंगापुरींतील विष्णु बल्लाळ गोखले यांस दत्तक गेले आहेत. गोविंदराव गोखले यांनाही तळेखाजण येथें उत्पन्न आहे.

सावळगी, जमखंडी व चिकोडी येथील गोखले.

तळेखाजणहून चिमणाजी कृष्ण ऊर्फ चिमणाजी आप्पा गोखले हे प्रथम सांगलवाडी येथें आले. अदमासें १२५ वर्षांपूर्वी आले असावेत. चिमणाजीचे बंधु अनंत कृष्ण हे जमखंडीस आले. आणि सदाशिव कृष्ण हे मंगळवेढें येथें आले. तळेखाजण येथील कृष्णाजी गणेश यांचे तीन मुलगे तीन ठिकाणीं देशा-

वर आले. चिमणाजी कृष्ण हे सांगलवाडीहून जमखंडी संस्थानांतील विद्री तालुक्यांत मौजे तदलबागी येथें प्रथम आले असावेत. चिमणाजी कृष्ण यांस पुत्र पांच; पैकीं हल्लीं दोघांचा वंश चालू आहे. पांडुरंग, चिमणाजी व मेघःशाम हे प्रथम जमखंडी संस्थानांत नोकर राहिले. मेघःशाम चिंतामण हे संस्थानतर्फे वकील होते. व पांडुरंग चिंतामण हे कंचेरींत होते. पुढें बाळाजी पांडुरंग हे कमाविसदार झाले होते. गंगाधर बाळाजी हे संस्थानमध्येंच नोकर होते. गंगाधर बाळाजी यांचें वय सुमारें ८१।८२ वर्षांचें असावें. हे आतां जमखंडी येथें स्वतःचे घरांत आहेत. यांचे पुत्र चार; पहिले पांडुरंग यांचा पत्ता नाहीं. दुसरे व्यंकटेश हे मेक्यॉनिकल इंजिनीयर होते. हे बागलकोट मुक्कामीं अकस्मात् १९११ मध्यें वारले. तिसरे दत्तात्रय हे जमखंडी येथें दिवाणी कोर्टांत नोकर आहेत. चवथे विनायकराव गोखले हे मेक्यॉनिकल इंजिनीयर व मोटार ड्रायव्हर आहेत. विनायकराव गोखले यांनीं मोटारगाडी चालविण्याच्या संपूर्ण माहितीचें पुस्तक "सचित्र मराठी मोटार गाईड" या नांवाचें सन १९१४ सालांत छापिलें आहे. सदरहू पुस्तकाची दुसरी आवृत्ती सन १९१७ त छापिली आहे. सदरहू पुस्तकांत मोटारच्या प्रत्येक भागाचें छायाचित्र देऊन व त्याचें यथार्थ वर्णन केल्यामुळें सदर पुस्तक फारच उपयुक्त झालें आहे. विनायकराव गोखले श्रीमंत जमखंडीकर सरकार यांचे खास मोटारड्रायव्हर आहेत.

मेघःशाम चिमणाजी हे जमखंडी संस्थानचे तर्फे वकील होते. त्यानंतर त्यांचे पुतणे शिवराम मोरेश्वर हे वकिलीचे कामावर होते. चिंतामण शिवराम हे संस्थानांत खासगी कारभाऱ्याचे जागीं पुष्कळ वर्षें होते. त्याशिवाय मुनसफ मामलेदार या हुद्यांच्या जागीही होते. यांनीं जमखंडी येथें घर बांधिलें आहे. यांचे बंधु विश्वनाथपंत हे सावळगीपासून ७।८ मैलांवर असलेल्या तदलबागी या गांवीं असतात. यांचे दोन मुलगे श्रीधरपंत व कृष्णराव हे तेथेंच आहेत. हे तदलबागी येथें शेती व व्यापार करीत असतात.

चिंतो शिवराम यांना पुत्र तीन; मोरेश्वर, मेघःशाम व नरसिंह. मोरो चिंतामण ऊर्फ पंडितराव हे हल्लीं अव्वल कारकून असून सावळगी येथें आहेत. मेघःशाम चिंतामण ऊर्फ शंभूराव हे हायकोर्ट प्लीडर असून जमखंडी येथें फर्स्टक्लास सब्जजाचे जागीं आहेत. नरसिंहराव चिंतामण हे बी. ए. असून एल्. एल्. बी. चा अभ्यास करीत आहेत.

गणेश अनंत हे प्रथम जमखंडी येथेंच होते. नंतर पडसळगी येथें जाऊन राहिले. गणेशपंत यांनीं उपळावीचे गोखल्यांपैकीं गोविंद यास दत्तक घेऊन, त्यांस विष्णु हें नांव ठेविलें. विष्णु गणेश यांचे मुलगे दोन; पहिले हरि विष्णु हे जमखंडी येथें राहून 'क्षुधाशांतीभुवन' चालवीत आहेत. दुसरे गणेश यांचा पत्ता नाहीं.

चिमणाजी कृष्ण यांचे तिसरे बंधु सदाशिव कृष्ण हे प्रथम मंगळवेढें येथें आले. सदाशिव कृष्ण यांचे चिरंजीव विठ्ठल यांना मंगळवेढें येथील म्हैसकर यांनीं मुलगी दिली होती. पुढें विठ्ठलपंतांचे चिरंजीव सदाशिव हे जमखंडी संस्थानपैकीं मौजे सावळगी येथें आपले मावसबंधु दाजीबा फडके यांच्याकडे आले. पुढें सदाशिव विठ्ठल यांनीं सावळगी येथेंच वास्तव्य केलें. सदाशिव विठ्ठल यांनीं सावळगी येथें घर बांधून जमीन संपादिली. पुढें सदाशिवपंत यांचे चिरंजीव विठ्ठल ऊर्फ आबा यांचा अभ्यासक्रम झाल्यावर, डिस्ट्रिक्ट प्लीडर झाले. आणि वकिली करण्याकरितां आबासाहेब चिकोडी येथें गेले. आबासाहेब गोखले वकील हे चिकोडी येथें प्रसिद्ध होऊन गेले. यांनीं चिकोडी येथें सुमारें २७ वर्षें वकिली केली. आबासाहेब यांनीं चिकोडी येथें स्थावर व जंगम इस्टेट केली असून त्यांनीं आपल्या धंद्यांत चांगला लौकिक मिळविला. हे सन १९१६ चे आक्टोबर महिन्यांत तारिख १६ रोजीं चिकोडी येथेंच स्वर्गस्थ झाले. आबासाहेब गोखले यांना तीन मुलगे आहेत. येशवंत, रामचंद्र व शिवराम; येशवंतराव हे पुणें येथें नूतनमराठी विद्यालयांत अभ्यास करून सन १९१२ सालीं म्याट्रिक झाले. पुढें फर्ग्युसन कॉलेजांतून सन १९१८ त बी. ए. झाले. नंतर सन १९२० मध्यें एल्. एल्. बी. झाले. येशवंतराव विठ्ठल हे हल्लीं चिकोडी येथेंच वकिली करीत आहेत. वडिलार्जित घर व जमीन सावळगी येथेंही आहे. रामचंद्र व शिवराम हे घरगुती व्यवहार पहात आहेत. जमखंडी व चिकोडी येथील या गोखले घराण्यास " चोळकर गोखले " असें म्हणतात.

खालील अस्सल ऐतिहासिक पत्रें घोंडोपंतदादा आपा व सेनापती बापू यांचेसंबंधीं असल्यामुळें तीं पुढें देत आहे—ऐ. ले. संग्रह पृष्ठ ५४०० श० १७२० (इ. स. १७९८) नं. ४२३१ (जेष्ठ शु० ६–२१ मे) देवराव देशपांडे याजकडोन बाळासाहेबास पत्र मिरजेस रवाना छ० ४ जिल्हेज. समान तिसैन—

"राजश्री घोंडोपंत गोखले यांचा मुक्काम मुदलावीस आहे. राा रत्नाकरपंत राजाज्ञा यांचा मुक्काम मुरीबन नजीक तोरगल येथें आहे. गोखले यांस व राजाज्ञा यांस तीन कोसांचे अंतर आहे. यादवाड प्रांताची पांच खेडीं गोखले यांनीं मारलीं. उभयतांची लढाई होणार म्हणून वर्तमान आहे. "

ऐ. ले. संग्रह पत्र नं. ५०६८ (श्रावण शु० १५–१५ आगष्ट.)

दोदवाड येथील कमाविसदार बापूजी–तीर्थो यांचें मिरजेस बाळासाहेब यांस पत्र १३ रबिलावलचें—

" टिपूचें अस्ताव्यस्त जाहलेवर घोंडजी वाघ पळोन आला तो बिदनूर तालुकेंत जमाव दहा पंधरा हजारापर्यंत मिळून स्वारी शिकारी करीत बैसला आहे. राजश्री घोंडोपंत गोखले आपले जमावासुद्धां हानगलावरी राहून सोंबे बिदनूर

प्रांतांत स्वारी करून खेडींपाडीं लुटून आणतात. याकरितां इंग्रज चित्रदुर्गाचें ठाणें घेऊन बिदनूर तालुकेचे सरदेस हरिहर बसवा पटणचे सुमारें दोन तीन पलटणें आलीं म्हणोन बाजारी वर्तमान आहे."

श. १७२० श्री. इ. स. १७९८, ऐ. ले. संग्रह
नं. ४५२५ [भाद्रपद व. ९–४ आक्टो.]

सेवेसीं कृष्णाजी परशुराम गद्रे साष्टां नमस्कार विज्ञापना तागायत छ० २३ रबिलाखर गुरुवासर चार घटका दिवसपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. छ० २२ रबिलाखर रोज बुधवारीं करवीरकरांच्या फौजेबरोबर लढाई जाली त्याचा तपशील कलमें—

१ मंगळवारीं भोजनोत्तर सर्वत्र मानकरी भले लोक व शिलेदार व गाडद्यांचे जमादार व रोहिले व आरब वगैरे यांस बोलावूं पाठवून तीर्थ राजश्री दादींनीं विचारलें कीं, " करवीरकर महाराज यांचे फौजेचें प्राबल्य होऊन दिवसेंदिवस बळावत चालली. सावनूरचे रस्ते बंद जाहले. दाणा मिळत नाहीं. खर्चाचा गवगवा, तुमची तलबही चढली आहे. आणि कृष्णराव देशपांडे कारडगीकर हे दक्षिणस्थाची फौज हरिहरानजीक आहे. तेथें कुमकें आणावयाबद्दल गेले आहेत. कुमक आल्यानंतर सर्वत्र एकमत होऊन शहरावर चालोन द्यावें असा [शत्रूचा] बेत ठरावांत आला. सावनुरांत खैरमिय्या आहे त्याचेंही संधान करवीरांकडे आहे हें पक्कें समजणेंच आहे. त्यापक्षीं दिवस घेऊन परिणाम नाहीं. तूर्त मजजवळ पैसा नाहीं. परंतु माझ्या रक्षणार्थ श्रीमंतांचें पुण्य आहे तेंच पार पाडणार. तुम्ही सर्वत्रांनीं मजवर कृपा करून करवीरकरांची फौज फार व आम्ही थोडे हें चित्तांत न आणितां मारुतीचें नांव घेऊन तीन टोळ्या करून लहानथोरांनीं एकसारखें चालोन द्यावें. माझी जखम ओली आहे. परंतु श्रीमंतांचे कृपें या प्रसंगीं ती जखम ओली असें मला भासत नाहीं. सर्वत्रांनीं कृपा केली असतां फत्ते होते. अगर दुसरें, सर्व संकटांतून दूर होतों ! या रीतीनें दादांनीं पदर पसरून सर्वत्रांस मागून घेतलें. तेव्हां सर्वत्रांनीं म्हटलें कीं, दादा, आपण धन्याच्या जागीं आम्हांस आपण जी आज्ञा केली ती आम्हास मान्य आहे. आपणांस जखमा लागल्या त्यासमयीं आम्हां सर्वत्रांची चाकरी घडली नाहीं. आमच्या चित्तांत आपली आज्ञा व्हावी इतकेंच मागणें आहे. सर्वांचें बोलणें एकच पडोन सर्वांस गोष्ट मान्य होऊन चालोन द्यावयाचा निश्चय ठरला. कलम.

१ छ० २२ रबिलाखर रोज बुधवार बारा घटका दिवसास झाडून फौज व पायदळ व कवाईती व आरब तोफखानासुद्धां झाडून सलतनसुद्धां तयार करून

---

५ पत्र सावनूराहून, ६ धोंडोपंत गोखले, ७ टिपूची फौज करवीरकरांच्या कुमकेस आणण्याकरितां.

खुद्द दादा पालखीत बसोन शहराबाहेर आले. तों करवीरकरांच्या व आपले लष्करच्यामध्यें ओढा आहे त्या अलीकडे इकडील फौज गेली तव पावेतों करवीरकरांच्या गोटाजवळ छबीना मात्र होता. तो कांहीं अलीकडे येत नव्हता. राहिल्या जागींच उभा होता. तें पाहोन पाव लोक आम्हांकडील पुढें घातलें. त्यांचे पाठीवर दोनशें स्वार उभें केलें. इतकेंच करवीरकरांकडील लोक ज्या ओढ्यांत होते त्याच ओढ्यांत येऊन पडले. इकडील पायदळास त्याजकडील पायदळास गोळागोळी होत होती. हें त्याणीं पाहोन त्यांचीं फौज झाडून पांचसहा हजार खासे तयार होऊन फरा धरून उभे राहिले. तें दादांनीं पाहोन पहिल्या संकेताप्रमाणें टोळ्या जाहल्या. उजवे बाजूस राजश्री बापूसाहेब यांचे मांडीस निम्वळ हजार खासे, डावे बाजूस राजश्री आप्पासाहेब यांचे मांडीस सातआठशें खासे, मध्यें पायदळ व तोफा व अरब. त्यांचे पाठीमागें खुद्द दादा. [याप्रमाणें] झाडून फौजसुद्धां तयार होऊन चालोन धावावयाची योजना करीत असतां इकडील डावे बाजूच्या तुकडीवर करवीरकरांकडील दीडहजार खाशांनीं चालोन घेतलें. ते बंदुकीच्या गोळीच्या टप्पेवर निकड करीत आले, पाठीमागें त्यांची झाडून फौज तयार होऊन येत होती. इतक्यांत इकडील तोफेची मारागिरी व लयनांच्या शिलकी झडूं लागल्या. त्या त्यांनीं खातरेंत न आणितां सर्वत्र जेथून निकडीनें घोडीं घातलीं. तेव्हां निकडीचा समय. या समयीं कमती जाली असतां घर बसणार नाहीं, हे समजोन दादा घोड्यावर बसोन श्रीमंतांचे चरण हृदयांत आणोन दोनी टोळ्यासुद्धां चालोन घेतलें. उभयपक्षी खणाखणी अर्ध घटकापर्यंत मातबर जाहली. इकडील निकड विशेष जाहली. त्या समयीं करवीरकरांचा मोहरा किंचित माघारा जाहला. तेव्हां सर्वत्रांनीं निकड करून त्याबरोबरच त्यांच्या गोटांत शिरले. त्यासमयीं त्याच्यानें गोटांत निभाव न पडेसे होऊन सोडून निघाले. त्याच्या पाठीस दोनकोसपर्यंत पाठलाग केला. इतक्यांत अस्तमान जाहला. दिवस असतां तर आणखी पाठलाग होता. परंतु रात्र जाहली. दिसेनासे जाहलेमुळें माघारें फिरोन त्यांच्या तळावर येऊन मुक्काम केला व डेरे राहुट्या बाजारखुणगें वगैरे झाडून लुटले गेले. लूट माफ म्हणोन चालोन घेते समयीं सर्वांस सांगितलें होतें. कलम. (८ कवाईतीच्या. ९ बंदुकी)

१ त्यांजकडील खासे ठार व जखमी मिळोन चारशेंपर्यंत अदमासें होईल. मुख्य खुद्द पांढरे सरदार व व्यंकटराव घोरपडे व निळकंठराव शिंदे मनोळकर व मोंगलाकडील पठाण मातबर सरदार होता तो याप्रमाणें चार असामी ठार जाहले. कोणी जखमी म्हणतात. व हिंम्मतबहादर यास तीन जखमा लागल्या याप्रमाणें मोड खावून कुंदगोळच्या मार्गानें गेले. कलम.

१ इकडील खासे पायलोक वगैरे सुद्धां दोनशेंपर्यंत ठार व जखमी होतील. अद्याप गणती लागली नाहीं. मागाहून सविस्तर लिहितो. कलम.

१ सरकारांत करवीरकरांकडील हत्तीवरील साहेब नौबत व निशाणे दोन व तोफा दोन सरंजामसुद्धां हत्ती व पालख्या वगैरे आले. गणती जाल्यावर मागाहून कळविती. कलम.

१ एकंदर लष्करांत लहानमोठे घोडे मिळोन पांचसातशें व उंटें पावणेतीनशें व डेरे दोन मुद्धां व गुरें बकरीं वगैरे लूट भारी जाहली आहे. याचें पक्के समजेल ते मागाहून लिहितो. तूर्त जाहले वृत्त समजले ते जलदीनें कळावे म्हणोन लिहिले आहे. कलम.

येकूण सहा कलमें लिहिलीं आहेत. सारांश श्रीमंतांच्या पुण्योदयें करून व मारुतीच्या कृपे मोठे यश आले. असमानी फत्ते जाहली असें आहे. विदित होय हे विज्ञापना.

नं. ५१३२ श्रीगजानन. [भाद्र० व० १३–२७ सन०]
पेा छ० ६ जमादिलावल० सन मयातैन व अलफ.

श्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव रावजी स्वामीचे सेवेसी.

पोष्य धोंडो बल्लाळ [गोखले] कृतानेक सा।। नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २६ रबिलाखर पावेतों मुक्काम सावनूर आपले कृपे करून वर्तमान यथास्थित आहे. विशेष. श्रीमंत राजश्री भाऊ यांची व करवीरकर यांची लढाई होऊन बिघडली म्हणून राजश्री आप्पासाहेब यांचे पत्र आले याजवरून सविस्तर कळलें. होणार तें जाहलें. अतःपर त्यांचे परीक्षेचा समय आहे. त्यांचे पुण्यैकरून आहो हें पुष्कळ ! सर्वांनीं सर्वस्वांस उदार होऊन एक विचार करून मसलतींचा उद्योग होऊन शत्रूचा सूड घ्यावा हा पुरुषधर्म आहे. येविषईंचा विचार तेथें असतील त्यांत बोध होऊन पक्केपणें ठरेल त्यांत मी आहें. मजपाशीं पांचहजार फौज तीनहजार पायदळ तोफा सरंजाम सुद्धां आहे. पक्का निश्चय जाहल्यानें ईश्वर अनुकूल होईल. या उद्योगास मसलत मोठी, पैका पाहिजे, परिणाम कसा होईल, धनीपणाचा विचार एकप्रकारचा, पुरवणी मागून होणें कठीण, मोठेपणाप्रमाणें पदरीं पैसा नाहीं हे अंदेशे समजावणार बहुत मिळतील ! परंतु ते चित्तांत आणावयाचा हा समय नव्हे. पटवर्धन यांच्या घराण्यांत कैलासवासी गोविंदपंतनाना त्यांच्या वंशानें दौलत मिळविली ती पाठीमागें भाऊ यांनीं रक्षिली; त्यापेक्षां पुढेंही त्यांचे कोणी आहेत असें म्हणविणें आपल्याकडे आहे. इतकें विस्तारें मी लिहावें अशी माझी योग्यता नाहीं. परंतु भाऊंजवळ माझें वचन गुंतलें आहे कीं, चार [पुत्र तुमचे] तसा मी पांचवा. यास्तव हें [लिहिणें] लौकिकी नव्हे, बहुत काय लिहिणें कृपावृद्धी असावी हे विनंती.

तळेखाजण येथील गोखले यांची माहिती संपली. आतां सेनापती बापूसाहेब गोखले हे सन १८१७ च्या गोपाळ–आष्टयाच्या लढाईंत कामास आले.

ही गोष्ट इंग्रजी ग्रंथकार लिहितात, आणि अमुक अमुक शस्त्रानें त्यांना आम्ही ताडण करून ठार केले वगैरे म्हणून,त्यांना ओळखून दहन करविलें असेंही इंग्रजी ग्रंथांत असल्याचें समजतें. बापूसाहेब सदरहु लढाईत कामास आले ही गोष्ट निर्विवाद आहे.परंतु खऱ्या बापूंचें प्रेत कोणासच सांपडलें नाहीं. जर बापूंचें खरें प्रेत सांपडतें तर तें प्रेत त्यावेळच्या इंग्रजी लष्करी अधिकाऱ्यानें बापूंच्या बायकोच्या स्वाधीन खास केलें असतें, आणि आमच्या धर्माप्रमाणें त्यावेळीं बापूंची बायको यमुनाबाई ह्या सती गेल्या असत्या. बापूसाहेब यांचें कुटुंब यमुनाबाई ह्या त्या वेळीं प्रत्यक्ष असतांना जें बापूंचें प्रेत म्हणून इंग्रजी लष्करी लोकांनीं ठरविलें होतें तें प्रेत सुद्धां खऱ्याखोट्याच्या निर्णयाकरितां, यमुनाबाईना दाखविल्याचा कोठें उल्लेख नाहीं. यावरून बापूसाहेब यांचें प्रेत खास सांपडलें नाहीं. हेंच खरें! आणि म्हणूनच त्यांनीं आपलें सौभाग्य कायम ठेविलें होतें.

ज्या रणधुरंधर अतुल प्रतापी सेनापती बापूनीं आपल्या क्षात्र तेजानें पाश्चात्य वीरांनां थक्क करून सोडलें. तो वीर रणसंग्रामास पाठ देऊन कधींच जाणार नाहीं. त्यांच्या बायकोच्या समजुतीप्रमाणें जर कदाचित् ते रणसंग्रामांतून पाठ देऊन जाते तर पुन्हां युद्ध सामुग्री जमवून आपल्या धर्माकरितां महाराष्ट्र देशाकरितां व छत्रपतीच्या गादीकरितां रणसंग्रामांत शत्रूशीं युद्ध करण्याकरतां खास आले असते. परंतु बापूसाहेब यांनीं आपला देह रणकुंडास अर्पिला हेंच खास.

तारळ येथील गोखले.

तारळ हा लहानसा गांव तळेखाजणजवळ आहे. हल्लीं तारळ येथें एकच गोखले यांचें घर आहे. महादेव विष्णु गोखले हा एकटाच त्या घरांतील पुरुष होय. महादेव विष्णु गोखले हा मुंबई येथे गांधर्व महाविद्यालयांत शिकत आहे. शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी तारळ येथें गोखले यांचीं घरें जास्त होतीं.

गणेश लक्ष्मण गोखले हे तारळ येथोन निघोन महाडनजीक मौजे साकडी या गांवीं आले. साकडी येथें गणेश लक्ष्मण यांनीं जमीन संपादिली व घरही बांधिलें. यांना चार पुत्र होते. पहिले कृष्ण हे तळेखाजण येथील बापू गोखले यांच्या घराण्यांत दत्तक गेले. दुसरे लक्ष्मण हे कराची येथें इंजिनीयर खात्यांत नोकर होते. तिसरे श्रीधर व चवथे सदाशिव हे साकडी येथेंच शेती करीत होते. नरहर लक्ष्मण हे बिरवाडी येथे शेती करीत आहेत. केशव श्रीधर व गणेश श्रीधर हे मुंबई येथें एकत्र रहात आहेत. केशवराव हे हल्लीं 'मुंबईवैभव' छापखान्यांत नोकर आहेत. गणपतराव हे प्रथम लाकडाचे वखारींत नोकर होते.

हल्लीं भागीदार आहेत. गोविंद सदाशिव हे मुंबई येथें गव्हर्मेंट सेंट्रल प्रेसमध्यें नोकर आहेत.

तारळहून बळवंत रघुनाथ गोखले हे देशावर प्रथम कुरुंदवाड येथें आले असावेत. यांच्या दशापैकींच गोखले कौलापुरास आले. बलवंत रघुनाथ यानां मुलगे तीन रामचंद्र, विनायक व कृष्ण. रामचंद्र व विनायक हे कुरुंदवाड संस्थानांत नोकर होते. विद्यमान कुरुंदवाड येथील राजवाड्याजवळ असलेलें गोखले यांचें घर विनायकराव गोखले यांनींच बांधिलें. विनायकराव यांचे नातू गणेश रामचंद्र हे मुंबई येथें गांधर्व महाविद्यालयांत आहेत. कृष्णाजी बळवंत हे वैदिक होते. कृष्णाजी बळवंत यांस दोन मुलगे; गोविंद व गोपाळ. गोविंद व गोपाळ यांचें बाळपण कुरुंदवाड येथें गेलें. आणि विद्यार्जनही कुरुंदवाड येथेंच झालें. गोविंदराव यांनीं पोलिस खात्यांत कॉन्स्टेबलची नोकरी धरली. पुढें नाईक व जमादार होऊन, हल्लीं (फौजदार) सबइन्स्पेक्टर असून सातारा जिल्ह्यांपैकीं सवालाखी आष्टें या गांवीं आहेत. यांची नोकरी २५ वर्षें झाली म्हणावयाची. गोपाळ कृष्ण हे बाँबे मिलटरी अकौंट आफिसांत नोकर आहेत. गोविंदराव यांचे थोरले चिरंजीव मोरेश्वर हे न्यू पूना कॉलेजांत बी. ए. च्या सेकंड ईयरमध्यें आहेत.

सांगली संस्थानांतील मौजे कौलापूर या गांवीं गोखले यांचें एक घर आहे. या कौलापूर येथील गोखल्यांपैकीं शंकर विष्णु हे शहाबाद येथें नोकर असल्याचें समजतें. शंकर विष्णु यांचे चुलत बंधू सदाशिव व पुरुषोत्तम रामचंद्र हे रेलवेंत नोकर आहेत.

तारळ येथील गोखल्यांपैकीं एक घराणें पुणें येथें आहे. हरी जनार्दन यांस तीन मुलगे; विनायक, महादेव व गणेश. विनायक हरी यांचे दोन मुलगे. एक चिंतामण विनायक हे एल्. बी. असून धुपदाळ येथें रहात आहेत. दुसरे दत्तात्रय विनायक हे मेडिकल कॉलेजांत आहेत. महादेव हरी ऊर्फ सोनोपंत गोखले हे रेव्हिन्यू खात्यांत नोकर होते. हल्लीं पेन्शनर असून हे पुणे येथें खेडकर यांचे वाड्यांत रहात आहेत. गणेश हरी यांचे दोन मुलगे; रामचंद्र गणेश व कृष्णाजी गणेश हे रेल्वे खात्यांत नोकर आहेत.

महादेव हरी गोखले यांचे अगदीं जवळचेच गोखले मोठे प्रसिद्ध होऊन गेले. ते विठ्ठल चिंतामण गोखले होत. हे 'विठ्ठल चैतन्य' या नांवानेंच फार प्रसिद्धीस येऊन गेले. इ. स. १८८८–८९ चे सालीं हे 'विठ्ठल चैतन्य' मिरज येथें आले होते. हे मिरज येथें दोन वेळां आले होते. त्या सालीं हा लेखक मिरज हायस्कूलांत इंग्रजी शिकत होता. विठ्ठल चैतन्य हा पुरुष मोठा भव्य, बोलणार विलक्षण, रुआबदार. आंगांत भगवी पायघोळ कफनी घातलेला असा होता. प्रथमच्या खेपेस मिरज येथें, त्यांनीं आरंभिलेल्या कामास बरीच मदत

मिळविली. या विठ्ठल चैनन्य बुवांनीं गड्डूर स्टेशनावर यात्रेकरूंच्या सोईसाठीं मठ बांधण्याकरितां भिक्षांदेही पत्करली होती. " आपणास कुटुंब वगैरे कांहीं नाहीं. आमचें वयही सुमारें चाळीस वर्षांचें; तेव्हां कांहीं तरी आपल्या हातून देशसेवा घडावी म्हणोन, गड्डूर स्टेशनवरून गाणगापूर येथें श्रीदत्तदर्शनास जाणाऱ्या येणाऱ्या यात्रेकरूंच्या सोईसाठीं गड्डूर स्टेशनावर मठ बांधून, आपलें यात्रेकरूंच्या सेवेंत आयुष्य खर्चावें असा माझा हेतू आहे. व त्याप्रमाणें मठ बांधण्याचें काम चालूं केलें, तरी आपल्या देशबांधवांनीं यथाशक्ति मदत करावी." वगैरे त्या बुवांचें म्हणणें असे. या विठ्ठल चैतन्य बुवांनीं, एक वर्गणीदारांचें नोंदबुक ठेविलें होतें. ज्यांनीं ज्यांनीं मदत केली त्यांनीं त्यांनीं मदत केलेला आकडा व स्वतःची सही केलेली त्या बुकांत असे.

हे विठ्ठल चैतन्य ऊर्फ गोखले बुवा पुन्हां दुसऱ्या खेपेस मिरजेस आले. ते पूर्वीच्याच ठिकाणी म्हणजे काशीविश्वेश्वराचे धर्मशाळेंत उतरले होते. हा लेखक काशीविश्वेश्वराचे हौदावर स्नान करण्याकरितां गेला होता. तों पुन्हां विठ्ठल चैतन्य यांचें दर्शन झालें. तेव्हां नमस्कार चमत्कार झाल्यावर या लेखकानें विठ्ठल चैतन्यबुवांनां प्रश्न केला कीं, या खेपेस तुमच्या बरोबर बायका मंडळी कोठली ? हा प्रश्न या लेखकाचा ऐकतांच, बुवाजी एकदम गंभीर चेहरा करून मोठ्या विनयानें हंसत हंसत म्हणाले "छे ! छे ! काय भयंकर अडचण व आम्हांला मठांत मोठी पंचाईत पडूं लागली कीं,यात्रेकरूंच्या मठांत उतरलेल्या सुवासिनी स्त्रियांना मठांत कोणी कुंकू लावण्यासही नाहीं !! तेव्हां आम्हाला त्या अडचणीकरितां लग्न करणें भाग पडले. ती लहान असलेली आमची बायको व दुसऱ्या स्त्रिया त्या तिच्या पाठराखणी आहेत. " हे बुवांचें भाषण ऐकून गेल्या वर्षाचे बोलण्याचे समर्थनार्थ 'मठाच्या सोईकरितां लग्न केलें आहे. ' हें बुवांचें बोलणें लेखकाचे कानीं पडतांच, आपल्या गरजेकरितां भलतेंच निमित्त सांगणाऱ्या बुवांचें विलक्षण आश्चर्य वाटलें ! असो, सदरहु विठ्ठल चैतन्य (विठ्ठल चिंतामण गोखले) यांनीं गड्डूर स्टेशनवर धर्मशाळा बांधून त्या धर्मशाळेस " विठ्ठल चैतन्यमठ" असें नांव देऊन यात्रेकरूंची सोय उत्तम केली आहे. यांत संशय नाहीं. विठ्ठल चैतन्य हे हल्लीं हयात नसून त्यांचा द्वितीय कुटुंबापासून झालेला मुलगा विद्यमान त्या मठांत आहे, असें समजतें. असो, हें सर्व झालें तें ठिकच आहे. परंतु या विठ्ठल चैतन्य बुवांनीं ग्वालेर येथें हत्तीदान घेतल्याची खरी हकीकत आम्हास समजली ती पुढील प्रमाणेः–

महाराज शिंदेसरकारचे बंधू श्रीमंत बळवंतराव भय्या हे सन १८९६ त रजेवर गेले असतां, महाराजांनीं धर्माध्यक्ष याचा चार्ज राव० चिंतामणराव वैद्य चीफ जज यांच्याकडे दिला. त्या वेळेस कर्मधर्मसंयोगानें श्रीमंत बाबासाहेब शितोळे एकाएकी वारल्यानें त्यांच्या उत्तर क्रियेस मोठा दान धर्म झाला. त्यावेळीं

"विठ्ठल चैतन्य" ऊर्फ दत्त गोखले हे राव० चिंतामणराव वैद्य यांच्याकडे गेले, आणि म्हणाले, मी हत्तीदान घेण्याकरितां आलों आहे, तरी हत्तीचें दान मला देण्याची मेहेरबानी करावी. राव० चिंतामणराव वैद्य यांनीं त्या इसमाकडे पाहिलें तों आंगांत भगवी कफनी आणि डोक्यास गुंडाळलेलें सुद्धा भगवेंच ! ते पाहून तुम्ही कोण, राहणार कोठले वगैरे प्रश्न विचारतांच; "आपण गांणगापूरला जाण्या येणाऱ्या यात्रेकरूंच्या सोईकरितां गडूर स्टेशनवर "विठ्ठल चैतन्य" नावांचा मठ बांधिला आहे. आतां विहिरीचें काम चालूं आहे. म्हणून पैशाची फार जरूर आहे. म्हणून मी हत्तीदान मागतों. माझें नांव विठ्ठल चिंतामण गोखले ऊर्फ विठ्ठलचैतन्य. " हें सर्व ऐकून घेतले व राव० वैद्य यांनीं त्यांस हत्ती दान दिला. हत्ती दान घेणाऱ्यास सर्व काळा पोषाख, कमरेस काळ्या म्यानाची तलवार लाऊन गांवांतून हिंडवून, गांवा बाहेर एकाद्या शिवालयांत पोंचवावयाचा. पुन्हां त्यानें गांवांत यावयाचें नाहीं. त्याप्रों त्यास पोषाक देऊन हत्तीवर बसवून हत्ती दानाची ५०० रुपये दक्षणा देऊन त्यांस गांवाबाहेर पोंचविले व त्यांवर शिपायाचा पहारा ठेविला.

दुसरे दिवशीं गांवा बाहेर हत्ती विकत घेण्याकरितां गिऱ्हाईक गेले आणि त्या ' दत्त गोखले ' यांच्याजवळ हत्ती किती रुपयास विकणार वगैरे विचारूं लागले. तेव्हां ' दत्त गोखले ' म्हणाले आम्ही हत्तीदान जें घेतलें तें हत्ती विकण्याकरितां नव्हे. आम्हाला हत्ती विकावयाचा नाहीं. हे ऐकून ते सर्व गिऱ्हाईक राव० वैद्य यांच्याकडे गेले. तेव्हां राव० वैद्य जजसाहेब यांनीं त्या हत्ती दान घेणाऱ्या ' दत्त गोखले ' यांस निरोप पाठविला कीं, तीन हजार रुपयास हत्ती विकावा. सदरहू निरोप ऐकून त्यानें त्या गिऱ्हाइकास सांगितलें कीं, जज्जसाहेबास सांगा कीं " मी हत्ती विकण्याकरितां दान घेतला नाहीं, आमचे पूर्वज पराक्रमी होते त्यांनी लढाया मारून हत्तीवर बसत होते. आतां लढाईचा तर काळ गेला; आणि आम्हास आपल्या मालकीच्या हत्तीवर बसण्याची इच्छा झाली ! तेव्हां ती हौस पुरी झाल्याशिवाय हत्ती आम्ही विकणार नाहीं." हा निरोप पाठवून हे ' विठ्ठलचैतन्य ऊर्फ दत्त गोखले ' दुसरे दिवशीं सकाळीं ग्वालेरहून निघोन गेले. ही वरील हकिकत वांचून वाचकांस आश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

आतां ही वरील हकिकत संपली. आणखी या ' विठ्ठलचैतन्य ' यानीं एक चमत्कारिक प्रकार केला. वरत्या कामीं अखेर मुंबई मुक्कामीं त्यांस चांगलें फजीत पाहून जावें लागलें तो चमत्कार या लेखकानें पाहिला आहे. तो येणेप्रमाणें:—

मुंबई येथें 'पांडुरंग बळीभद्र' या चाळीतील बंगल्यांत, विठ्ठल चैतन्य गोखले यांनीं गाणगापूर येथें एका झाडाखालीं एकाएकी उत्पन्न झालेला दत्तअवतार म्हणून एक फक्त हत्तीचर्माचा सांगाडा असलेला मनुष्य आणून एका खोलींत,

एका आसनावर बसवून ठेविला. आणि बरोबर कांहीं भक्तमंडळी अशा थाटानें त्या बंगल्यांत राहिले. त्या अवताराची प्रत्येकाजवळ स्तुति करावी, भजन व आरती वगैरे थाट करावा. हा अवतार आलेला मुंबईत सर्वत्र प्रसिद्ध झाल्यावर रोज दर्शनाकरितां झुंडीच्या झुंडी सारख्या येत जात होत्या. या अवताराची बातमी एकून हा लेखकही एके दिवशीं तेथें गेला. प्रथम विठ्ठलचैतन्य गोखलेबुवा यांची भेट झाली. त्यांनीं मोठ्या आदरानें 'या तुम्हीं आपटेसाहेब, या या असें बसा !' म्हणून आपल्याजवळ बसवून घेऊन इकडील तिकडील खबरबात झाल्यावर म्हणालें, 'हें पहा आज १५।२० दिवस झाले उजाडल्यापासून रात्रौ १०।११ वाजेपर्यंत ही अशी गर्दी असते. त्या अवतारापुढें कोणी पैसे ठेवतात कोणी फळें ठेवतात तर कोणी मिठाई ठेवतात असें सारखें चालू आहे.' हें ऐकून व ती लोकांची गर्दी पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. आणि त्या अवतारांचें केव्हां एकदां दर्शन घेईन असें झालें. इतक्यांत गोखलेबुवांच्या इशाऱ्यानें त्यांच्या एका भक्तानें माझ्यापुढें दोन लाडूं व पाणी भरलेला पेला आणून ठेविले. आणि 'घ्या प्रसाद घ्या' असें म्हणूं लागले. तेव्हां मी म्हणालों, एकदां दत्त अवतारांचें दर्शन घेऊं आणि मग प्रसाद खावूं. तेव्हां गोखलेबुवा म्हणाले कां अशी घाई कां ? आधी प्रसाद घ्या मग स्वस्थपणानें जरा गर्दी कमी झाल्यावर दर्शन घ्या. आणि दुपारीं एथेंच महाप्रसाद घेऊन चला. तेव्हां मी मोठ्या पेचांत पडलों; नाहीं म्हणावें तरी पंचाईत ! होय म्हणावें तर आमच्या कामाची खोटी होणार ! मग त्यांना मीं सांगितलें कीं, आणखी केव्हां तरी मी महाप्रसादास येईन. पण आज मी एका स्नेहाकडे जाणार आहे. असें म्हणून पुढें आलेला प्रसाद खावून अवताराचे दर्शनास गेलो. वर वर्णन केल्याप्रमाणें ते जातकरूं मनुष्य पाहिल्याबरोबर असा चमत्कार वाटला कीं, हें जिवंत प्रेत आहे कीं मेलेलें ! असें जो मनांत विचार येतात तो त्या अवतारानें आमच्याकडे पाहून डोळ्यांतील बुबुळें सारखी फिरविण्यास सुरवात केली. मी चांगला अर्धा तास तेथें बसून नीट निरीक्षण केलें आणि तो सर्व प्रकार पाहून मला हांसें आलें. जगांत पैसा मिळविण्याकरितां काय काय चमत्कार लोक करतात याबद्दल राहून राहून मला आश्चर्य वाटत होतें. इतक्यांत 'गोखलेबुवा' म्हणाले, 'कस काय आपटे' ! असें म्हणतांच; मी त्यांच्याबरोबर खोलीचे बाहेर येऊन जरा बाजूस गेल्यावर मी त्यांना म्हणालों दुनिया तर झुकविलीत बुवा. वरील माझे बोलणें ऐकून, गोखलेबुवा म्हणाले, 'छे हें कांहींच नव्हे तुम्ही जर या अवतारांचें सोंग घेतलें असतेत तर लाखों रुपये मिळून याहीपेक्षां जास्त प्रस्त माजलें असतें.' हें ऐकून मीं त्यांना सांगितलें कीं, आतां येथून लौकरच गाशा गुंडाळा. नाहीं तर विलक्षण फजीती होईल. 'छे. हो. आणखी दोन महिने तरी हें असेंच चालणार,' असें तें म्हणालें. नंतर नमस्कार

चमत्कार करून हा लेखक आपल्या उद्योगास निघोन आला. या गोष्टीस १५।२० दिवस झाले असतील नसतील तों त्या गोखलेबुवास फजित होऊन मुंबईतून मार खाऊन पळून जावें लागलें.

पुणें येथील गोखले.

वंशवृक्ष नंबर ७ मध्यें प्रभाकर केशव गोखले यांचा वंशवृक्ष दिला आहे. वेळणेश्वराहून चिंतामण गणेश गोखले हे प्रथम देशावर देहू या गांवीं आले. चिंतामण हे वैदिक होते. यांना दोन पुत्र; केशव व विठ्ठल. हे दोघेही वैदिकच होते. केशवभट हे आपले वयाचे ८२ वे वर्षी सन १९०२ मध्यें करमाळें येथें वारले. त्यांचे पुत्र प्रभाकरपंत हे सोलापूर जिल्ह्यांत करमाळें गांवीं लोकलबोर्डांत नोकर आहेत. यांनीं पुणें येथें नारायण पेठेंत घर बांधिलें आहे. घराचा म्यु. नं. ३१३ आहे. प्रभाकरपंतास दोन मुलगे आहेत. हल्लीं ते रजेवर असल्यामुळें पुणें येथेंच रहात आहेत. विठ्ठल चिंतामण यांचे पुत्र गोविंद; गोविंद यांचा वंश गुजराथमध्यें पेटलाद गांवीं असावा असें समजतें.

वंशवृक्ष नंबर १ मध्यें मौजे नाधवडे येथील गोखले यांचा वंशवृक्ष दिला आहे. सदरहू वंशापैकींच अनंत विष्णु गोखले होत. हे हल्लीं कोंकणांत कोलें गांवीं असतात. यांना पुत्र रघुनाथ, गणेश, कृष्ण व नारायण; रघुनाथ हे कोल्हापूर येथें भिक्षुकी करीत असतात. गणेश अनंत हे पुणें येथें असून त्यांनीं फराळाचें दुकान सुरू केलें आहे. कृष्ण व नारायण खासगी नोकर आहेत. नाधवडें हा गांव संस्थान बावडापैकीं होय.

वंशवृक्ष नंबर ७ मध्यें नोंदले आहे, त्यांतील महादेव गोविंद हे शाळामास्तर होते. यांस पुत्र एक झाला. त्याचें नांव पंढरीनाथ. पंढरीनाथ पांचवर्षांचां असतां वडील वारले. नंतर १५ वे वर्षी आई वारली. तेव्हां पंढरीनाथ हा एका चिवडेवाल्याजवळ नोकर राहिला. नंतर पुढें पंढरीनाथ यांनीं नोकरी सोडून स्वतंत्रपणें चिवडा करून विक्ण्यास सुरवात केली. पांच वर्षें पंढरपूर येथें राहून नंतर पुणें येथें सुरवात केली. चिवडा तयार करून (लहान मूल चारचाकी गाडींतून फिरवितात तसल्या) चारचाकी गाडींत भरून नित्य संध्याकाळीं सुमारें चार वाजतां घरांतून निघोन निरनिराळ्या पेठेंतून हिंडत तोंडानें कांहीं म्हणत चिवड्याची विक्री करून रात्रौ सुमारें ९ ते १० वाजतां घरीं येतात. याप्रमाणें नित्यक्रम अदमासें १५।१६ वर्षें पंढरीनाथ गोखले यांनीं पुणें येथें चालविला आहे. चिवडा चांगला करितात. म्हणून विक्री होते. व त्यामुळें पैसे चांगले मिळतात. यांच्यापैकीं कांहीं गोखले महाड येथें आहेत असें समजतें.

वंशवृक्ष नंबर ७ मध्यें नोंदिले आहे. कृष्णाजी व गोपाळ मोरेश्वर गोखले यांना औंधचे पंतप्रतिनिधी श्रीमंत परशराम श्रीनिवास यांनी सन १८१३।१४

सालीं विच्युद व मनु या गांवीं अदमासें चारशें रुपये आकाराची जमीन इनाम दिली आहे. गोपाळ मोरेश्वर यांचे नातू दिगंबर दत्तात्रय गोखले हे हल्लीं वडिलार्जित उत्पन्न घेत असून, औंध येथें रहात आहेत

आज जवळ जवळ पावणे तीन वर्षें होत आलीं. " गोखले व गोखले–रास्ते घराण्याचा इतिहास " संबंधीं संशोधन व लेखन सुरू आहे. या संबंधानें वर्तमान पत्रांत जाहिरात पुष्कळ वेळा दिली व स्वतः ही सर्वत्र हिंडून माहिती मिळविली; ती वरील प्रकरणांत विदित केलीच आहे. परंतु, श्रीवर्धन, आड, हर्णे, आंजर्ले, ब्रम्हावर्त, प्रयाग, श्रीक्षेत्रकाशी, मथुरा, भोर, शिरवली, पेण नजीक वाखरूळ, ता० रोहेपैकीं सुडकोली, चांदवड वगैरे बऱ्याच ठिकाणीं गोखले यांचीं घरें विद्यमान असून त्यांच्या कडेन अद्यापि कांहींच माहिती मिळत नाहीं. तसेंच सुमारें एक महिन्यापूर्वी सदाशिव गणेश गोखले या नांवाचे एक इसम पुणें येथें आमचे बिऱ्हाडी येऊन आम्हांस भेटले. आणि त्यांनीं " आपलें घराणें मस्तानीचा मुलगा समशेर बहादर याच्या वंशावरोबर उत्तरहिंदुस्थानांत गेलें. हल्लीं आमचीं घरें दोन तीन तिकडे जाहलीं आहेत. मीं लवकरच आपणांकडे सर्व माहिती व वंशवृक्ष पाठवितों. मी हल्लीं जबलपूर येथें असतों." वगैरे सांगून गेले. त्यावर त्यांचा कांहींच पत्ता नाहीं.

लोकमान्य नाटक कंपनीचे मालक नारायण रामचंद्र ऊर्फ नानबा गोखले यांनीं, सामाजिक नाटक मंडळीचे मालक रामभाऊ गोखले, व चित्ताकर्षक संगीत कंपनीचे मालक कै० रघुनाथ गोखले यांचे फोटो आम्हांस देऊन, ते पुस्तकांत घालण्यास (ब्लॉक व प्रिंटिंग खर्च) जो खर्च लागेल तो आपण देतों असें सांगून, त्यांच्या बद्दल आपला अभिमान व्यक्त केला हें नानबा गोखले यानां भुषणावह आहे.

पृष्ट २७ मध्यें गोशाळे-रास्ते यांची राहिलेली माहिती पुढील प्रमाणें:—

अथणी तालुक्यांत विद्यमान असलेला गांव झुंझुरवाड, हा गांव श्री० नानासाहेब चिंचणीकर यांनीं दुर्गाआकास चोळीबांगडीकरितां वंशपरंपरेनें इनाम दिलेला हल्लीं त्यांच्या वंशाकडे म्हणजे रा. कृष्णराव बाळासाहेब गोशाळे-रास्ते यांच्याकडे चालू आहे.

(पृष्ठ ६४ मधील पुरवणी)

गराडें येथील गोखले यांची माहिती पृष्ट ६१ ते ६४ पर्यंत दिली आहे. परंतु त्यामधील चुकून राहिलेली माहिती यापुढें देत आहें. ती येणें प्रमाणें:–

गंगाधरपंत ऊर्फ तात्यासाहेब यांनीं गराडे येथें सुमारें ५०।६० वर्षें साव-कारी केली. परंतु त्या अवधींत ते एकदां सुद्धां कोर्टाची पायरी चढले नाहींत; किंवा एकाही कुळास देशोधडीस लावून त्याची त्यांनीं जमीन संपादन केली

नाहीं. शेतकऱ्याची जमीन घेणें हें त्यांना महापातक वाटत असे. गंगाधरपंत अत्यंत परोपकारी व धार्मिकवृत्तीचें असून सदाचरणी होते. ते विद्याव्यासंगी असून थोरले चिपळूणकर वगैरे मंडळींशीं त्यांचा बराच स्नेह असे.४०।५० वर्षांपूर्वी जेव्हां शिक्षणाचा विशेष प्रसार झालेला नव्हता त्या वेळींही तात्यासाहेब यांनीं गराडें येथें ५००।६०० लोकवस्तीचे ठिकाणीं नेटिव्ह जनरल लायब्ररींची स्थापना केली. त्याचप्रमाणें लोकलबोर्डाची प्राथमिक शिक्षण देणारी शाळा व ब्रँच पोष्टऑफिसची स्थापनाही त्यांनींच केली. गराडकर गोखले या घराण्याची विशेष प्रसिद्धी होण्यास याच पुरुषाचा लौकिक कारणीभूत झाला. या घराण्यांत हे पुरुष अत्यंत भाग्यशाली होंते. यांना पुत्रपौत्र वगैरे मिळून ४० मंडळी होती. यांचा जन्म शके १७४५ त झाला. हे आपल्या वयाचे ८५ वे वर्षीं म्हणजे शके १८३० मध्यें स्वर्गस्थ झाले. तात्यासाहेब यांचे नातू नारायण रामचंद्र गोखले बी. ए. एल् एल्. बी. हे पुणें येथें वकीली करीत आहेत.

रामचंद्रपंत गोखले हे पुणें येथें सराफीचा धंदा करीत असत. यांचे कुटुंब वारलें तेव्हां यांचे चिरंजीव नारायण हे २॥ वर्षांचे होते. यांस गराड्यास मावशीकडे म्हणजे गंगाधरपंततात्या यांच्या आईकडे पाठविलें. तेथें ते राहून मराठी शिकून पुण्यास इंग्रजी व इंजीनियरिंग शिकण्यास ते व केशवराव राहून पुढें दोघेही सरकारी नोकरींत दाखल झाले. रामचंद्रपंत यांस व्यापारांत खोट आल्यामुळें ते परदेशांत उज्जनीस जाऊन राहिले व तेथेंच ते वारले. नारायणराव लहानपणीं गराड्यास असल्यामुळें त्यांस तेथील मंडळीचा फार लळा असे व त्यांस गराडचा फार अभिमान होता. गराडकर गोखल्यांचे घरची आज इतकी उन्नती झाली आहे त्याचें सर्व श्रेय नारायणरावांस आहे. सरकारी नोकरी सुटल्यावर ते पुण्यांतील त्यावेळचे प्रसिद्ध कंट्राक्टर रामचंद्र महादेव हरडीकर यांचेजवळ चार वर्षें होते. त्यावेळीं कुलाब्याचे ल्युनायटिक असायलम व कोल्हापूरचा पंचगंगेचा पूल त्यांनीं बांधिला. पुढें नारायणराव हे जामनगरास स्टेट इंजिनीयर राहिले. तेव्हां त्यांनीं चार मैलांवर नदीस बंधारा बांधून तेथून कयानल खोदून पाणी आणून शहरांतील तलावांत सोडलें. त्याबद्दल तेथील जामसाहेब यांनीं नारायणराव यांस फार मोठें बक्षीस दिलें होतें. पुढें ते मोरबीस राहिले. तेथें त्यांनीं मच्छु नदीवर ५० फुटांच्या बारा कमानींचा पूल बांधिला व वढवाण पावेतों रेलवेची सर्वे केली.

नारायणराव यांचा स्वभाव फार शांत असून लोकांवर उपकार करण्याची व आपले कुटुंबांतील माणसांस शिकविण्याची त्यांची मोठी हातोटी असे. यांच्याच शिकवणीमुळें गणेश गोविंद गोंडळास सुपरिंटेंडेंट प. ब. व मोरो गंगाधर जामनगरास असिस्टंट इंजिनीयर झाले. पुष्कळ लोकांस सर्वेईगचें काम शिकवून त्यानीं अन्नास लावलें. पैकीं गणपतराव गोडबोले, मोरोपंत

साठे व तांबे वगैरे होत. त्यांच्या मनांत पुढें मुलांस व्यापारीशिक्षण मिळावे ह्या हेतूनें त्यांनीं टांक बंदरावर मुंबईस इमारती लाकडांची वखार काढली. परंतु त्यांचे चिरंजीव चिंतामणराव हे ऐन तरुणपणांत म्हणजे २७।२८ वें वर्षी वारले. कर्ता मुलगा वारल्यामुळें, नारायणरावांना अत्यंत दुःख झाले. पुढें ५।६ वर्षांनीं नारायणराव वारले.

चिंतामणराव गोखले यांचें कुटुंब श्री. रमाबाई गोखले या डॉ. विश्वनाथराव गोखले यांच्या मातोश्री होत. यांचा जन्म घुण्यांतील प्रसिद्ध साठे यांचे कुटुंबांत झाला. श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे यांच्या मातोश्री याही याच साठे घराण्यांतील होत. दुर्दैवानें लहानपणींच श्री. रमाबाईंवर वैधव्याचा प्रसंग आला. त्यावेळीं त्यांच्या लहान दोन मुली, एक मुलगा व मुलासारखाच एक लहान दीर यांचें पालन करण्याचें काम यांच्याकडे आलें व ते त्यांनीं आपले सासरे नानासाहेब यांच्या आश्रेत राहून नीट रीतीनें बजावले. सर्व मुलें बारा वर्षांचे आंतच असतांना नानासाहेब मुंबई मुक्कामीं अकस्मात काल. ज्यानें निवर्तले. प्रपंच्याचा सर्व बोजा श्री. रमाबाई यांजवरच येऊन पडला. अशा प्रसंगास पाठ देऊन रा. विश्वनाथराव व दामोदरपंत या मुलांना उत्तम वळण लावून यांनीं त्यांचा विद्याभ्यास नीट करवून त्यांस नांवारूपास आणलें.श्री. रमाबाई अत्यंत मायाळू व सात्विकवृत्तीच्या व भाविक आहेत. त्यांच्यावर कुटुंबांतील सर्व मंडळींचें फार प्रेम आहे. डॉ. विश्वनाथराव गोखले फार कष्टाळू आहेत. यांचा स्वभाव गरीब व शांत आहे. पुणें येथें हे प्रख्यात डॉक्टर असून बरेच नांवारूपास आले आहेत.

सेनापती बापूसाहेब गोखले यांचा पुणे येथें मोठा वाडा होता. सदरहु वाड्यांतील श्रीराम मंदीर मात्र विद्यमान आहे. श्रीराम मंदिराचा सभामंडप सात महिरपीचा (कमानीचा) आहे. श्रीराम मंदीर व सभामंडप यांचें लाकडी काम चांगलें असून मजबूत आहे. विद्यमान बापूसाहेब गोखले यांच्या वाड्यापैकीं श्रीराम मंदीर व दोन विहिरी कायम असून, बाकी सर्व वाडा नामशेष झाला आहे. श्रीरामाचे पुजारी आपटे म्हणून आहेत. सदरहु आपटे कोंकणात गोळप येथें आहेत असें समजतें.पुजारी आपटे यांनीं श्रीरामाची पूजानैवेद्य करून सदरहु वाड्याची मालकी उपभोगावी असें आहे. पुजारी आपटे यांची भेट न झाल्यामुळें विशेष खुलासेवार माहिती मिळाली नाहीं. सेनापती बापूसाहेब गोखले यांच्या वाड्यांतील श्रीराम मंदीर पुणे येथें शुक्रवार पेठेंत आहे.

